महाकवि बिहारी यांच्या 'सतसई'चा मराठी अनुवाद

रसलीना

अनुवादकः **राजा बढे**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

‘बिहारी – सतसई’ चा

मराठी अनुवाद

‘रसलीना’

अनुवादक— राजा बढे

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई

अनुक्रमणिका

प्रथमावृत्ती : जून, १९८३

© प्रकाशकाधीन

प्रकाशक

सचिव
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ,
मंत्रालय , मुंबई ४०० ०३२

मुद्रक
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय
चर्नीरोड, मुंबई ४०० ००४

किंमत ४० रुपये

अनुक्रमणिका

रसिका!

बिहारिचा वाग्विलास हा शारदीय आल्हाद।.
वीणारव वागीश्वरी छेडीत मंजुनिनाद ॥
मायबोलिचा बोल हा अमृतास दे साद ।
अशी मराठी मोहनी रसमय हा पडसाद ॥

रचिता रसना रंगली शब्दांकित हा छंद ।
भावविभावन लोभवी करिते मानस धुन्द ॥
ललित रम्य कविताकृती, प्रणयी सुखसंवाद ।
रुचेल रुचिरा हा तुला रसिका, रसानुवाद ॥

--राजा बढे

अनुक्रमणिका

निवेदन

मराठी भाषेला आणि साहित्याला आधुनिक ज्ञानविज्ञानाच्या व आधुनिक सांस्कृतिक मूल्यांच्या आविष्काराचे सामर्थ्य प्राप्त व्हावे, आधुनिक शास्त्रे, ज्ञानविज्ञाने, तंत्र आणि अभियांत्रिकी त्याचप्रमाणे भारतीय प्राचीन संस्कृती, इतिहास, कला इत्यादी विषयांत मराठी भाषेला विद्यापीठाच्या स्तरावर ज्ञानदान करण्याचे सामर्थ्य प्राप्त व्हावे, विविध विद्या व कलाविषयक उत्कृष्ट ग्रंथांची निर्मिती करून मराठी भाषेला जागतिक उच्च स्थान मिळवून द्यावे या उद्देशाने महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृती मंडळाने बहुविध वाङ्मयीन कार्यक्रम आखला असून तो व्यवस्थितपणे कार्यवाहीत आणण्याकरिता विश्वकोश समिती, इतिहास समिती, भाषांतर समिती, विज्ञान समिती, मराठी वाङ्मयकोश समिती, मराठी शब्दकोश समिती, ललितकला समिती, प्रकाशन समिती आदी समित्या स्थापन केल्या आहेत.

२. ललितकला समितीच्या कार्यक्रमात, मंडळाच्या बहुविध वाङ्मयीन कार्यक्रमास अधिक संस्कृतिप्रवण करण्यासाठी ललितकलाविषयक नाट्य, नृत्य, वाद्य, चित्र, मूर्ती व गायन या विषयांचे संशोधन, विवरण व इतिहास यांचा अंतर्भाव आहे. या कार्यक्रमात कला व कलासंबंध विषयांवर मूलभूत संशोधन करून लिहिलेले ग्रंथ, संगीत व संगीतशास्त्र, नाटक व नाट्यशास्त्र, नृत्य व शिल्प इत्यादीवरील प्रमाणभूत जुन्या ग्रंथांची भाषांतरे, विविध कलांचा इतिहास, कलाकारांची चरित्रे इत्यादी वाङ्मयाच्या प्रकाशनाबरोबरच संस्कृत व मराठीतर अन्य भारतीय भाषांतील तसेच पश्चिमी व अन्य परदेशी भाषांतील ललितकलाविषयक अभिजात वाङ्मय मराठीत भाषांतरित करून प्रकाशित करण्याचा कार्यक्रम अंतर्भूत आहे. या कलांचा वाङ्मयाच्याद्वारे मराठी वाचकांस संक्षेपाने व विस्ताराने परिचय करून देणे हा मंडळाचा महत्त्वाचा उद्देश आहे.

३. या योजनेखाली मंडळाने कै. के. नारायण काळे यांनी अनुवादित केलेले स्तानिस्लावस्कीचे ‘अभिनय साधना’, श्री. श्री. ह. देशपांडे यांनी अनुवादित केलेले कोपलँडचे ‘संगीत व कल्पकता’, कै.डॉ. श्री. ना. रातंजनकर यांनी लिहिलेले ‘पं. विष्णु नारायण भातखंडे’, प्रा. र. पं. कंगले अनुवादित ‘रस-भावविचार’ व ‘दशरूपक विधान’ (भरत नाट्यशास्त्र रससिद्धांतविषयक अध्याय ६ व ७ आणि नाट्यशास्त्रविषयक अध्याय १८ व १९ ची भाषांतरे), श्री. श्री. ह. देशपांडे अनुवादित ‘महाराष्ट्राचे संगीतातील कार्य’, श्री. बा. गं. आचरेकर लिखित ‘भारतीय संगीत व संगीतशास्त्र’, डॉ. गो. के. भट अनुवादित विशाखदत्तचे ‘मुद्राराक्षस’, डॉ. शं. अ. टेंकशे लिखित ‘रागवर्गीकरण’, शार्ङ्गदेवाचे ‘संगीत रत्नाकर’, स्तानिस्लावस्कीचे ‘Building a Character’ व स्टॅविन्सकीचे ‘Poetics of Music’ ही पुस्तके प्रकाशित केली आहेत. भरतमुनीचे संगीतशास्त्र (भरत नाट्यशास्त्रातील संगीतविषयक अध्याय २८), नंदिकेश्वराचे ‘अभिनयदर्पण’, भामहाचे ‘काव्यालंकार’, आनंदवर्धनाचे ‘ध्वन्यालोक’, दंडीचे ‘काव्यादर्श’, कवि हालाची ‘गाथासप्तशती’, कवि बिहारीची ‘सतसई’, जयदेव कवीचे ‘गीतगोविंदम’, भरत के. अय्यर यांचे ‘Kathakali’ इत्यादी ग्रंथांची भाषांतरे मंडळाच्यावतीने क्रमाने प्रकाशित व्हावयाची आहेत. याशिवाय, श्री. पार्वतीकुमार संपादित ‘तंजावूर नृत्य प्रबंध’, डॉ. भा. कृ. आपटे संपादित ‘Maratha Wall Printing’, डॉ. सौ. श्यामला बनारसे लिखित ‘सांगीतिक मानसशास्त्राची मूलतत्वे’, डॉ. श्री. व्यं. गोखले यांचे ‘हिंदुस्थानी संगीतातील लय आणि ताल विचार ’ इत्यादी ग्रंथही लवकरच मंडळाच्यावतीने प्रकाशित होणार आहेत.

अनुक्रमणिका

४. मंडळाने स्वतः प्रकाशित केलेल्या व करावयाच्या ललितकलाविषयक ग्रंथांखेरीज तज्ज्ञ लेखक व कलाकार आणि कलासंस्था यांना कलाविषयक संशोधनासाठी व प्रकाशनासाठी अनुदानेही मंडळाने दिली आहेत. श्री. ह. वि. दात्ये यांची 'गायनी कळा', श्री. निखिल घोष यांचे 'रागतालाची मूलतत्वे व अभिनय स्वरलेखन पद्धती' (इंग्रजीत व मराठीत), प्रा. अशोक दा. रानडे यांचे 'संगीताचे सौंदर्यशास्त्र', पंडित बाळकृष्ण कपिलेश्वरी यांचे 'श्रृतिस्वरदर्शन' व 'स्वरप्रकाश', डॉ. ना. ग. जोशी यांचे 'मराठी छंदोरचनेचा विकास', श्री. वा. र. देवधर यांनी लिहिलेले 'कै. विष्णु दिगंबर पलुस्कर यांचे चरित्र', व 'थोर संगीतकार', इत्यादी ग्रंथांच्या प्रकाशनाकरिता मंडळाने सुयोग्य अनुदाने दिली आहेत. गांधर्व महाविद्यालयाच्या 'संगीत कलाविहार' या मासिकालाही गेली अनेक वर्षे मंडळाचे अनुदान दिले जात आहे.

५. संगीत विषयांतील संशोधनाच्या संदर्भात, महाविद्यालय, मुंबई येथील भौतिकी विभागामध्ये मंडळाच्या अनुदानाने संगीत-ध्वनि-विज्ञानाचे मौलिक संशोधन झाले आहे. त्यामधून व्यावहारिक उपयोगाच्या दृष्टीने लक्षणीय अशी माहिती व वाद्य मिळू न शकल्यामुळे ते कार्य आता स्थगित केले आहे. तानसेन म्युझिक ॲकॅडेमी, मुंबई या संस्थेला स्वयंचलित 'सूरमंडल' तयार करण्यासाठी मंडळाने अनुदान दिले आहे. श्री. वा. दा. मोहिते, सांगली यांना ४८ श्रुतिंवर आधारलेल्या सप्तकाची बाजाची पेटी तयार करण्यासाठीही अनुदान दिले आहे. डॉ. ह. वि. मोडक, आस्तव विभाग, वाडिया महाविद्यालय, पुणे यांना दक्षिण भारतातील देवळांतील स्तंभांमधून निघणाऱ्या संगीतसुरांच्या संशोधनाकरिताही अनुदान दिले असून त्यांची ध्वनिमुद्रिते तयार झाली आहेत. दण्डतारारहित तंबोरा तयार करण्याचा प्रयत्न कै. डॉ. श्री. ब. निंभोरकर, अमरावती यांनी काही वर्षे केला. त्याकरिताही मंडळाने अनुदान दिले होते. एकंदरीत संशोधनाच्या प्रयत्नातून प्रायोगिक उपयुक्ततेच्या दृष्टीने लक्षणीय यश प्राप्त झालेले नाही हे येथे नमूद केले पाहिजे. परंतु संशोधनाचे प्रयत्न सतत चालले पाहिजेत व त्याकरिता उत्तेजनही दिले पाहिजे म्हणून मंडळ सतत प्रयत्नशील आहे. जे. ग्रिफिथ्स् या इंग्लिश संशोधक-कलावेत्त्याने अजिंठा येथील चित्रांचा संग्रह काही वर्षांपूर्वी प्रसिद्ध केला. अजिंठा येथील चित्रकला ही भारतातील प्राचीन चित्रकलेचा एक वैभवशाली भाग आहे. या चित्रसंग्रहाचे पुनर्मुद्रण करून ते प्रकाशित करण्याची कार्यवाही देखील मंडळातर्फे चालू आहे.

६. महाकवी बिहारी हा राजस्थानचा थोर कवी १७ व्या शतकात होऊन गेला. मिर्झा राजे जयसिंग यांच्या दरबारी राजकवीचा मान त्यांना होता. त्यांनी रचलेली 'सतसई' 'बिहारी की सतसई' म्हणून हिंदी साहित्यात सुविख्यात आहे. आजवर हिंदीमध्ये 'सतसई' चे भाष्य व रसचर्चाही बरीच झालेली आहे. हा रीतीकालीन कवी; याची सर्व कविता श्रृंगाररसप्रधान असून ऋतुवर्णन आणि नायकनायिकांच्या प्रेमभावांचे चित्रण त्यांनी मोठ्या रसाळपणे केलेले आहे. भक्ती आणि नीतीचे माहात्म्यही त्यांनी सांगितले आहे. केवळ ७०० दोह्यांचा एक ग्रंथ लिहून महाकवी पदवी पावलेला हिंदी भाषेतील हा पहिलाच कवी असेल. 'व्यंजना' हे याच्या काव्याचे मुख्य वैशिष्ट्य आहे. भाषेच्या माधुर्यासाठी आणि शब्दांच्या चपखल निवडीसाठी यांनी अनेक बोलभाषांचा आश्रय घेतला आहे. त्यांच्या कवितेत संस्कृत, पाली, अपभ्रंश, अवधी, व्रज, बुन्देलखंडी या भाषांतील शब्द मुक्तपणे वावरताना दिसतात. दोह्यासाठी दोन ओळीच्या चिमुकल्या छंदात या कवीने रसभावांचे समुद्र गोठवून ठेवले आहेत. या अमोल ग्रंथाच्या अनुवादाने मराठी साहित्यात एक महत्त्वाची भर पडणार आहे. या ग्रंथाचा कवी श्री. राजा बढे यांनी केलेला 'रसलीना' हा अनुवाद मूळची रसवत्ता मुळीच हरवीत नाही. प्रस्तुत ग्रंथ मराठी वाचकांना सादर करण्यास मंडळास आनंद होत आहे.

अनुक्रमणिका

७. सुप्रसिद्ध पंडित श्रीनाथ द्विवेदी यांनी कवी बिहारी यांच्या काळच्या सामाजिक व सांस्कृतिक परिस्थितीचे दिग्दर्शन, त्यांच्या काव्यग्रंथाचे मध्ययुगीन हिंदी साहित्यातील स्थान, काव्यातील प्रमुख रस, शैली, ऋतुवर्णन या संबंधीचा आढावा घेणारी प्रदीर्घ प्रस्तावना या अनुवादास लिहिल्याबद्दल त्यांचा मी मंडळाच्यावतीने आभारी आहे.

यशोधन
मुंबई ४०० ००१
६ जून, १९८३

डॉ. सुरेंद्र बारलिंगे
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ.

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

निवेदन ५
'बिहारी सतसई॰ रसानुवाद, -रसलीना' ९
रसलीना.. ४९
पर्यायी भाषांतर २९३

‘बिहारी सतसई’ रसानुवाद, ‘रसलीना’

दिशा संकेत

हिंदी साहित्याची पार्श्वभूमी

महाकवि बिहारी विरचित ‘सतसई’ या काव्याचा परामर्ष घेताना हिंदी साहित्यात त्या संबंधात बरेच मंथन झाले आहे. त्याच्या केवळ संक्षिप्त माहितीसाठी व वाग्‌विलासासाठी त्यासंबंधीच्या इतिहासाचे एक त्रोटक चित्र रेखाटीत आहे. सतसईकार बिहारींच्या पूर्वीची परिस्थिती व त्या वातावरणात निर्माण झालेले साहित्य याचे यथार्थ दर्शन घडल्यास ‘सतसई’ चे आकलन सुलभ होऊं शकेल.

आचार्य रामचंद्र शुक्लजींनी हिंदी साहित्य इतिहासाचे विभाजन फारच मननपूर्वक केलेले आहे. आम्ही येथे त्यांच्याच भूमिकेकडे अंगुलीनिर्देश करूं इच्छितो.

सम्राट हर्षवर्धनानंतर भारत वर्षाची संघशक्ती लहान लहान राज्य खंडांत विभाजित झाली. प्रत्येक राजा स्वतःला सम्राट समजू लागला. रमणीसाठी रणकंदने सुरू होऊन रणांगणे गाजू लागली. आपापसातील लढ्यामुळे शक्ती क्षीण झाली व याचवेळी यवनांची आक्रमणे सुरू झाली. याच कालखंडाला वीरगाथा काल असे संबोधण्यात आले. याच काळात राजदरबारांत चारण कवींना प्रतिष्ठा प्राप्त झाली. जळजळत्या लेखणी बरोबरच तळपत्या तरवारी फिरविण्याचे कसबही त्यांच्या अंगी होते. शापवाणी व चापपाणी या दोन्ही आयुधांनी ते सुसज्ज असत. आणि आपल्या वाणीचा आणि खड्गाचा चमत्कार ते रणांगणावर दाखवीत. याच युगात ‘रासो’ या ग्रंथाची निर्मिती झाली. तरवारींची खणखण व कंकणाची किणकिण याचा मधुर गुंजारव या ग्रंथात निनादित झाला आहे. ‘पृथ्वीराज रासो’ या ग्रंथात वीर आणि श्रृंगार या दोन रसांचा अद्‌भुत संगम झाला आहे.

मोंगल शासन स्थिर झाले. शाही दरबारातील वातावरण बदलले. हिंदी कवींची प्रतिष्ठा ओसरली. धर्म, संस्कृति आणि राजनीति यांचा त्रिकोण सिद्ध झाला आणि त्याच्या सर्वबाजूंनी संघर्ष निर्माण झाला. परिस्थिती अशी काही बदलली की भारतीय कविता कामिनीला साधुसंतांच्या कुटिरांचा आश्रय घ्यावा लागला. याच कालखंडाला ‘भक्तिकाल’ हे नामाभिधान प्राप्त झाले. कबीर, सूरदास, तुलसीदास इत्यादि कवींनी भक्तीची सरस ज्ञानगंगा प्रवाहित केली. ‘रामचरितमानस’ व ‘सूरसागर’ या अमर साहित्याची रचना याच कालात झाली. यद्यपि वीरगाथाकाल किंवा भक्तिकाल याचे विवेचन या ठिकाणी अप्रस्तुत असले तरी धर्मरक्षणासाठी कोदंडधारी रामकृष्णाचे आवाहन करण्याचा हा काळ होता असे अवश्य म्हटले पाहिजे. श्रीरामचंद्राने आपल्या बाहुबलाने राक्षसांचा निःपात करून रामराज्याची स्थापना केली आणि श्रीकृष्णाने आपल्या युक्ति, शक्ति इ. मुत्सद्देगिरीने असुरांचा विनाश केला तसेच आपल्या मनमोहक लीला विलासांनी जनजीवनाला मानसिक शांतता प्रदान केली व त्यांच्या जीवनात चैतन्यही पेरले.

परंतु ज्या काळात प्रस्तुत ‘बिहारी सत्‌सई’चे शिल्प निर्माण झाले. त्या काळातील राजनैतिक, आर्थिक आणि सामाजिक स्थिती अगदी भिन्न होती. मोगलांचे शासन सुदृढ झाले होते. कोठे कोणी डोके वर काढले तर ते चेचून काढले जात असे. या अशा लहान सहान लढायां व्यतिरिक्त दुसरा कुठलाही प्रबल संघर्ष नव्हता. त्यांच्या दरबारात विलासाची लयलूट चालू होती. सुरा, सुंदरी आणि संगीत यांचे मनोरंजक

वातावरण दरबारी दिमाखात गाजत होते. राजांच्या तलवारी निष्प्रभ होऊन मखमली म्यानात गंजत पडल्या होत्या. रजपूतांच्या प्रतिष्ठेने शरणागती पत्करली होती. पराजित मनोवृत्ति एकतर अंतर्मुख होऊन बसते अगर विद्रोही बनते. किंवा आपली गेलेली प्रतिष्ठा टिकविण्यासाठी विजेत्याची हांजीहांजी करू लागते. या ठाकुर लोकांत विद्रोह करण्याचे सामर्थ्य नव्हते आणि साहसही नव्हते. विजेत्यांचे अनुगमन करणे हेच त्यांना सुलभ वाटले. त्यामुळे हास्यविलासी रंगेलपणाचा प्रभाव त्यांच्याही दरबारांत पडला. पुन्हा एकदा कवींना या राजदरबारात जाण्याचा सुयोग आला. आपल्या दुर्बल मनोवृत्तीच्या व विलासी आश्रयदात्याच्या रंजनासाठी कविवृंद श्रृंगाराच्या नांवाखाली श्रृंगाराचीच भ्रष्ट चेष्टा करू लागले. त्यांची रसिकता स्वैर सुटली. या कालखंडाला, श्रृंगारकाल (काहींच्या मते रीतिकाल) म्हटले जाते. बिहारी या श्रृंगारकालातीलच प्रतिनिधी कवी गणले जातात.

श्रृंगारकालाच्या आर्थिक स्थितीचे अनुमान सहज करता येईल. त्या काळी फक्त शासक आणि प्रजा हे दोनच वर्ग समाजात होते. राजा हाच कर्तुम्अकर्तुम् होता. विलासी राजांच्या विलास सामुग्रीचा सर्व भार प्रजेलाच सोसावा लागत असे. राजमहालाच्या चार भिंतीबाहेर डोकावण्यास कवींना वेळ नव्हता व त्यांना तशी आवश्यकताही नव्हती. समाज जीवनाशी त्या कवींचा संपर्कच तुटला होता. ते या विलासी वातावरणातच मग्न होते. त्यामुळे प्रजेच्या सुखदुःखाची, त्रासाची त्यांना तमा नव्हती. मग त्यांची गाऱ्हाणी कोण ऐकणार व त्यांच्या जखमांवर मलमपट्टी तरी कोण करणार? श्रृंगारकालातील साहित्यात तत्कालीन समाजाचे जे चित्र प्रतिबिंबित झाले आहे त्यावरून त्या कालातील स्वैरश्रृंगार अभिसाराची मुक्त मोकळीक असणारा तो समाज असावा तरी कसा याची कल्पना करताच मन हादरते-अस्वस्थ होते. श्रृंगारकालांतील बहुतेक सर्व साहित्यरचना राजदरबारातच लिहिल्या गेल्या आहेत. त्या रचना रीतिबद्ध तशाच रीतिसिद्ध व रीतिमुक्तही आहेत. रीतिमुक्त कवी धनानंद होत. त्यांचा या प्रसंगाशी संबंध नाही. बव्हंशी या कालखंडात जो कवी रीतिग्रंथ (लक्षण व उदाहरणासहित) लिहित नसे तो कवीच गणला जात नसे. आणि याच कारणामुळे आचार्य शुक्लजींनी या कालखंडाला रीतिकाल म्हणून संबोधिले आहे.

बिहारीने काव्याला नवीन वळण लावले. त्यांनी कोणत्याही रीतिग्रंथाची रचना केली नाही. परंतु, 'बिहारी सत्सई' छंदशास्त्राच्या सर्व प्रवृत्तींची एक वैशिष्ट्यपूर्ण पण आगळीच रचना मानली जाते. कवी बिहारींनी नायिकाभेदावर कोणताही ग्रंथ लिहिला नाही. पण सतसईतील सर्व दोहें नायिका भेदाचीच उदाहरणे आहेत. श्रृंगाराच्या या प्रवृत्तीची भूमिका भक्तिकालातच तयार झाली होती. प्राकृत व अपभ्रंश या भाषेतील रचनेमध्ये जे वास्तव समाजजीवनचित्र अंकित केले आहे ते कृष्णभक्तांच्या साहित्यात खपू शकले नाही. कारण त्यांचा संबंध सर्वसाधारण लौकिक जनजीवनाशी होता, आणि यांचा सामान्य जीवनापासून दूर श्रीकृष्णाच्या अलौकिक प्रेमाशी जुळलेला होता.

श्रृंगारकालातील कवि, कृष्णभक्त कवींच्या काव्याने प्रभावित झाले. सूरदास तसेच कृष्ण संप्रदायातील इतर कवींनी राधाकृष्ण आणि अनेकानेक गोपींबरोबर केलेल्या रासलीलांची रचना आपल्या काव्यांतून केली. याचाच परिणाम श्रृंगारासाठी एक विशाल अन् विस्तृत भूमिका आपोआपच निर्माण झाली. या कवींनी नायिकाभेद कल्पून परकीया प्रेमाचा प्रकार चवीने आविष्कारला व त्याला राधा कृष्णाच्या प्रेमभक्तीचा परिवेष दिला. त्यांचे म्हणणे असे की —

'आगे के सुकवि रीझि हैं तों कविताई
नतु राधिका कन्हाई सुमरिन को बहानो हैं'

अनुक्रमणिका

(राधा कृष्णाच्या स्मरणाच्या ढोंगाखाली ही शृंगारिक रचना करण्यातच हे कवि गुंग झाले).

या प्रमाणे श्रृंगारकालात नायक व नायिका, राधा व कृष्णाच्या स्वरूपात रेखिल्या गेल्या. विचारपूर्वक पाहिले तर विद्यापति आदि कवींनी राधाकृष्णाला देवत्वपदावरून पदच्युत करून भूतलावरील जनसामान्यात आणून उभे केले. त्यांनी राधाकृष्ण हे भक्तीचे नव्हे तर श्रृंगाराचेच दैवत मानले. वीर काव्यांत श्रृंगाराची अमूप सरस रचना झाली आहे. प्रत्येक युगात शृंगार कोणत्या ना कोणत्या स्वरूपात अस्तित्वात होताच पण श्रृंगार काव्यांत तो आपल्या प्रबल वेगाने दृश्यमान झाला.

थोडक्यात श्रृंगार काव्याची हीच पार्श्वभूमि आहे आणि त्यातीलच महाकवि बिहारी बहुचर्चित रीतिसिद्ध कवी म्हणून वाखाणले गेले आहेत.

कवी बिहारीचा जीवनवृत्तांत

बिहारीचा जन्म ग्वाल्हेर येथे झाला. 'जनम ग्वालियर जानिये' खंड बुंदेले बाल। तरुनाई आई सुघर मथुरा बसि ससुराल॥ काही समीक्षक हा दोहा बिहारीचाच आहे असे मानतात. काहींचा त्याला विरोध आहे. त्यांच्या जीवनाशी सुपरिचित असणाऱ्या दुसऱ्या व्यक्तीने हा दोहा लिहिला असण्याचाही संभव नाकारता येत नाही. [हिन्दी साहित्यांत, प्राचीन कवींच्या बाबतीत असे अनेक भ्रम आहेत. जन्म, स्थिती, स्थान, मातापित्याची नांवे तसेच रचनेसंबंधी संदेह व्यक्त केला गेला आहे.] यांच्या वडिलांचे नाव 'केशवराय' होते या बाबतीतही मतभेद आहेत. एक वर्ग हिन्दी प्रसिद्ध कवी केशवदासांनाच यांचे पिता मानतो तर दुसरा वर्ग केशवदास हे त्यांचे गुरु असावेत असे मानतो. हे कांही जरी असले तरी बिहारीचे वडील 'केशव' या नावानेच ओळखले जात व ते कवीही होते हे निश्चित. कदाचित त्यांना विशेष प्रसिद्धी मिळाली नसावी एवढेच म्हणता येईल.

'असती'च्या 'ठाकुर' कवीने बिहारीच्या पत्नीलाही कवियत्री ठरविण्याचा खूप प्रयत्न केला आहे. पण या गोष्टींची चर्चा दुसऱ्या कोणीही केलेली नाही.

बिहारी धौम्य गोत्री घरवारी माथुर चौबे होते. त्यांचा जन्म वि. सं. १६५२ ई. सन १५९५ मध्ये झाला. त्यांना एक भाऊ व बहीण होती. जेव्हा बिहारी ७—८ वर्षांचे होते तेव्हां त्यांचे वडील ग्वाल्हेर सोडून 'ओडछां'ला गेले. तिथेच बिहारींना हिंदीचे प्रसिद्ध कवी 'केशवदास' यांच्या सान्निध्याचा लाभ झाला. बिहारींनी त्यांच्याकडूनच मार्गदर्शन घेऊन काव्यग्रंथांचे अध्ययन केले. 'ओडछा' जवळच 'गुडौ' गावात महात्मा नरसिंह दासजी ['जम करि-मुँह-तरहरी परयो यह धरहरि चितलाव । विषय तृषा परिहरि नरहरि के गुन गाव॥']रहात होते.बिहारींनी त्यांच्याकडून संस्कृत प्राकृत ग्रंथाची संथा घेतली व अध्ययन केले.

काही दिवसानंतर 'ओडछा'चे महाराज इंद्रजीतसिंह यांचे वैभव ओसरले व बिहारीचे वडील ही ओडछा सोडून वृंदावन येथे गेले. तिथे बिहारींनी संगीतशास्त्राचा अभ्यास केला. आणि त्याच वेळी मथुरेला त्यांच्या विवाहाचा योग जुळून आला. बिहारी आपल्या सासुरवाडीलाच राहू लागले. सासुरवाडीत रहाणाऱ्या घरजावयाच्या अनुभवाचे सटीक वर्णन 'बिहारी सतसई'त सापडते.

आवत जात न जनियतु तेजहि तजि सियरानु
घरहँ जँवाई लौं घट्यौ, खरौ पूस-दिन मानु'

अनुक्रमणिका

वि. स. १७१

त्याच काळात (सं. १६७५) शाहजादा शाहजहाँ वृंदावनला गेला होता. त्याने महात्मा नरहरिदासांचे दर्शन घेतले. शाहजहाँसमोर महात्माजींनी कवी बिहारींची फार प्रशंसा केली. होतकरू बिहारीची योग्यता पाहून शहाजहाँने त्यांना आग्र्यास येऊन रहावयास सांगितले. [श्री नरहरि नर नाह कौ दीनी बाँह गहाई। सगुन आगरैं, आगरे रहत आइ सुख पाई ॥ पत्रिका-भाग ८ अंक १ पृष्ठ ११८] बिहारी आग्र्याला जाऊन राहू लागले. तिथे त्यांना उर्दू व फारसीचे अध्ययन करण्याची संधी मिळाली. त्यांनी अब्दुलरहीम खानखानाची भेट घेतली. त्यांच्या गौरवपर कांही दोहेही लिहिले. बिहारीच्या कवित्वशक्तीवर प्रसन्न होऊन खानखानांनी त्यांना भरपूर पुरस्कार दिला.

वि.सं. १६७७ मध्ये शाही दरबार भरला. त्या उत्सवात भारतातील पुष्कळ राजे महाराजे सम्मिलित झाले होते. बिहारींनी आपल्या प्रतिभेचा चमत्कार दाखविण्याची सुवर्ण संधी लाभली. कित्येक राजांनी त्यांना वार्षिक वृत्ति देण्याची घोषणा केली. सं. १६७७ मध्ये नूरजहाँच्या कुटिल नीतिमुळे बादशहा जहाँगीर आणि शहाजादा शाहजहाँ यांच्यात मनोमालिन्य निर्माण झाले. त्यामुळे तो आग्र्यापासून दूर राहू लागला आणि त्याचे आश्रित बिहारी यांचीही स्थिती त्यामुळे अस्थिर झाली. आता त्यांना इतर राजा महाराजाकडे जाणे येणे भाग पडले. ते आग्र्यालाही मधून मधून जात असत. सं. १६९२ मध्ये जेव्हा बिहारी आग्र्याला गेले तेव्हा त्यांना कळले की 'आमेर'चे महाराजा जयसिंग आपल्या नूतन राणीवर मुग्ध होऊन राजमहालाच्या बाहेरही पडत नाहीत. राजकारभार देखील पहाणे त्यांनी सोडून दिले आहे. आदेश असा होता की रंगात भंग करणाराची मुळीदेखील गय केली जाणार नाही. यामुळे प्रधान व महाराणी चौहानी हे फार बेचैन झाले होते. बिहारी तिथे पोहचले. त्यांनी आपला समाचार महाराजांना पोहचविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, पण दाद लागेना. शेवटी माळिणीकरवी निम्न दोहा महाराजापर्यंत पोहचविण्यात ते कसे तरी सफल झाले.

'नहिं पराग, नहि मधुर मधु, नहि विकासू इहिं काल।
अली, कली ही सैं बंध्यो, आगै कौन हवाल' ॥ वि.स. ३८

महाराज हा दोहा वाचून शुद्धीवर आले आणि प्रसन्न मनाने बाहेर आले. त्यांनी पुरस्कार देऊन बिहारींचा खूप गौरव केला. 'अशा प्रकारची कविता आपण नित्य ऐकवाल तर प्रत्येक दोह्याला एक मोहर याप्रमाणे आपणाला पारितोषिक देण्यात येईल.' (माझ्या मते हे मानधन फारच कमी होते) असे महाराजांनी बिहारींना अभिवचन दिले. महाराणी चौहानीने प्रसन्न होऊन 'काली पहाडी' हा गाव त्यांना इनाम दिला. त्यावेळी चौहानी राणी गर्भवती होती. थोड्याच दिवसांत राजकुमार राजसिंहाचा जन्म झाला. त्याप्रीत्यर्थ आनंदोत्सव सोहळा साजरा करण्यात आला. या प्रसंगी बिहारींनी बरेच दोहे रचले [सतसईनंतर त्यांची कोणतीच रचना उपलब्ध नाही. संभवतः उर्वरित आयुष्यात बिहारी केवळ हरिनामस्मरणात निमग्न राहिले असावेत.] आणि अगणित पुरस्कार प्राप्त केला. बिहारी ही एक रसिक व्यक्ति होती. ही रसिकता नागरी स्वरूपाची होती. साधारण ग्रामीण जीवनाशी त्यांच्या वृत्तीचा मेळ बसत नव्हता. इतर नागरिकांप्रमाणे त्यांचा स्वभावही विनोदी असावा; तरी सुद्धा नागरी जीवनातील कटु अनुभवांची नोंदही त्यांनी सतसईतील दोह्यामधून घेतलेली आहे. असे अनेक दोहे सतसईंत वाचायला मिळतात.

अनुक्रमणिका

'आमेर' चा निरोप घेतल्यानंतर फिरत फिरत बिहारी आपले दीक्षा गुरु महात्मा नरसिंहदास यांना भेटायला वृंदावनला गेले. काही समीक्षकांच्या मते बिहारीनी 'जोधपूर' व ''बुंदी येथेही स्थलांतर केले असावे, परंतु या संबंधी काही प्रमाण मिळत नाही. आपली वार्षिक वृत्ति घेण्यासाठी ते तिकडे जाणे अशक्य मात्र नाही. आपले जीवनातील अंतिम दिवस मात्र त्यांनी वृंदावनातच घालविले आणि तिथेच वि. सं. १७२१ मध्ये त्यांनी देह ठेवला.

'सतसईचा' प्रत्येक दोहा तजेलदार मोत्याप्रमाणे आपला पृथगात्मक प्रभाव वैशिष्ठ्यपूर्ण रीतीने प्रगट करतो आणि एका सूत्रात ओवल्याप्रमाणे त्यांची 'मुक्तामाळही बनून जाते. कवीने 'सतसई' मध्ये प्रेम आणि भक्ति यांचा अपूर्व मेळ घातलेला आहे. 'सतसई' मोंगलकालीन ऐश्वर्य संपन्न विलासी रचना आहे. ललित कलांना विकसित व्हायला जितकी संधी मोंगलकालात मिळाली तेवढी पुढे कधीच लाभली नाही. मोंगल बादशहांत ललित कलेबद्दल मनस्वी प्रेम होते. राज्यांत विद्रोह होण्याचा प्रश्नच नव्हता. सर्वत्र शांतीचे साम्राज्य नांदत होते. चैन व ख्यालीखुशालीतच प्रजाही निमग्न होती. धर्माच्या दृष्टीनेही अकबरापासून शहाजहानपर्यंतचा काल विशेष वाईट नव्हता. त्यावेळच्या कवींनीही धर्माला विशेष उदार बनविण्याचा प्रयत्न केला. प्रजेला आपल्या धर्माबाबत पूर्ण स्वातंत्र्य लाभले होते. 'बिहारी सतसई'च्या या कालयुगीन वातावरणात झालेले काव्यटजनही विचार करण्यासारखे आहे. थोड्या प्रबंधकाव्याखेरीज जे काही लिहिले गेले ते मुक्तक काव्य आहे. 'सतसई'ची देखील मुक्तक काव्यातच गणना होते. 'मुक्तक' काव्यात पूर्वापार संबंधाची काही आवश्यकता नसते आणि अर्थबोध सहजपणे होऊ शकतो. जो कवी प्रसंगोचित भावनांचे प्रगटीकरण सहज सुलभतेने करील, तो तितकाच सफल मुक्तककार होईल.

"बिहारी सतसई" आणि त्याची परंपरा

वीरगाथा कालापासून आधुनिक युगापर्यंत हिंदी काव्याचे सांगोपांग मूल्यांकन केले तर दहा बारा ग्रंथ असे मिळतील की ज्यांना सर्वश्रेष्ठ ग्रंथ म्हणून नामाभिधान देता येईल. 'पृथ्वीराज रासो', 'पद्मावत', 'रामचरित मानस', 'सूर सागर', 'रामचंद्रिका', 'बिहारी सतसई', 'उद्धव शतक', 'कामायनी', प्रियप्रवास, साकेत, तुलसीदास आणि दीपशिखा यांत अधिकतर कथाकाव्ये आहेत. कथाकाव्यात, जीवनाची विविधता, मनोभावाची सखोलता, कल्पना विलास, आणि रूपसौंदर्य आदि गुणांचे सूक्ष्म चित्र रंगविण्याची अनुकूल संधी लाभते. आणि याचमुळे कथाकाव्यांचे लेखन करणाऱ्या कवींना काव्य जगतात वरिष्ठ स्थान सहजगत्या मिळते. मुक्तककारही आपल्या गाथामध्ये एकसूत्रता आणण्याचा सफल प्रयत्न करतो. त्यालाही वरिष्ठ दर्जा प्राप्त होतो. कथाकार कवीप्रमाणेच मुक्तक कवींनाही तीच मान्यता मिळते. ('बिहारी सत्सई' चे हेच वैशिष्ट्य होय.)

संस्कृतमधील 'अमरू शतका' च्या प्रसिद्धीचे हेच रहस्य आहे. 'बिहारी सतसई'च्या लोकप्रियतेचे रहस्य देखील यातच सामावले आहे. बिहारीच्या काव्यात आणखी एक विशेषता आढळते. आणि ती ही की बिहारींनी सतसईत आलंबनाच्या कोमल आणि मधुर चित्रांचे सुरम्य रेखाटन केले आहे.

'सतसई'त श्रृंगार, भक्ति, सूक्ति, विनोद, नायिकाभेद, अलंकार, ध्वनि, रसादि शब्द शक्तींची साहित्यिक उपादाने, ही सर्व शोधल्यास मिळू शकतील. 'सतसई'त संभोगवर्णन जितके रसाळ आणि सफल झाले आहे तेवढे विप्रलंभ नसावेसे वाटते. विप्रलंभ श्रृंगारासाठी जी मनोदशा हवी असते तिचा आढळ त्यांत दिसत नाही. बिहारी त्यापासून पूर्ण वंचित झालेले दिसतात. 'सतसई'त जेथे वियोगवर्णन आले आहे

अनुक्रमणिका

त्या ठिकाणी बहुधा अतिशयोक्तीच्या चमत्कारांची रेलचेल दिसून येते, ह्यांचे हेच कारण असावे. संयोग आणि वियोगी जीवनाच्या स्थितीचा प्रत्ययकारी अनुभव कवि भुक्तभोगी असल्याशिवाय येणे शक्य नाही; आणि ती अभिव्यक्ति प्रभावकारीही होऊ शकत नाही. परंतु बिहारीने विरहाला मीलनाचे पूर्णत्व प्राप्त करून दिले आहे. ही सुद्धा बिहारींची एक विशेषताच मानली जाईल.

बिहारीने ज्या प्रेमाचे वर्णन 'सतसई'त केले आहे ते देखील कमी विलक्षण नाही. 'वीरगाथा' कालात नायिका तलवार गाजविणाऱ्या वीर पुरुषावर प्रेम करीत असत. संत कवीचे प्रेम निराकार परब्रह्मावर होते. सूफी कवींनी लौकिक प्रेमालाच पारलौकिक बनविले—सूर, तुलसी आदि भक्त कवींनी सगुण साकार भगवंताच्या चरणी प्रेमपूजा वाहिली. श्रृंगारकालातील प्रेम पूर्णपणे नायक नायिकेच्या परस्पर परिपूर्तीसाठीच गायिले गेले. परंतु बिहारीची प्रेमविव्हल नायिका, भय, लाज, संकोच इत्यादि सात्विक भावांनी मंडित झाली आहे. यामुळेच बिहारींनी रंगविलेले प्रेमप्रसंग इतर कवींपेक्षा आगळे वाटतात.

'बिहारी सतसई'त भक्तीचे वर्णन देखील आहे. पण ते केवळ मनोदशेचे तत्कालिक चित्रण वाटते. बिहारी तत्कालीन कुठल्याही भक्तिवादात शिरले नाहीत. ते अनुरागाचे कवी होते. विराग त्यांच्या चित्तवृत्तीला मानवत नव्हता. भक्तकविसारखी पावनता, कोमल कातरता, आणि दीन भावनांचा अविष्कार, 'सतसईत' कुठेच दिसून येत नाही.

'सतसई'त निसर्गवर्णनही आगळ्या प्रकाराने केले आहे. त्या संबंधीची चर्चा पुढे प्रसंगानुसार केली जाईल. भावनेच्या आहारी न जाता कवी जेव्हा जीवनाच्या कटु अनुभवांचे वर्णन करतो, तेव्हा जनहित त्याचे लक्ष्य बनते. अशा रचना सूक्तींच्या श्रेणीत येतात. 'सतसई'त अशा दोह्यांची वानवा नाही.

'मीत न नीत गलितु ह्वै, जो धनु धरियै जोरि।
खाए खरचैं जो जुरै, तो जोरियै करोरि॥ वि.स. ४८१

('अर्ध उपाशी राहुनी युक्त न ती तडजोड
संभाळुनि संसार तो जुळवी लाख करोड') रसलीना ४८१

कैसे छोटे नरनु तै सरत बडनु के काम।
मढौ दमौ जातु क्यों, कहि चहे मौ चाम॥ वि.स. १३१

('करू शकेना सान ते, जें थोरांचे काम। ')
मढेल कैसी दुंदुभी लाऊनी ऊंदिर चाम र. ली. १३२॥

बडे न हुजै गुनन बिनु बिरद बडाई पाई।
कहत धतुरे सौं कनक गहनौ गढ्यौ न जाइ॥ वि.स. १९१

(गुणाविना नच थोरवी, असुनी केवळ नांव।
कनक नाम धत्तूर घे, घडति न डाग जडाव॥ रसलीना १९१

कनकु कनक तैं सौगुनी सादकता अधिकाई
उहि खाएँ बौराइ जगु इहि पातैं ही बौराइ

(शतपट कनकाहून ते मादक सुवर्णप्रेम
माजवि गिळतां धत्तुरा, केवळ मिळता हेम रसलिना १९२)

(सतसईतील मूळ दोह्यांच्या अवतरणासोबतच, श्री.बढे यांनी केलेला यथार्थ रसानुवादही उद्‌धृत करीत आहोत. त्यावरून 'रसलीना' तील रसग्रहणाची कल्पना वाचकांना येऊ शकेल.)

असे कितीतरी दोहे सतसईत मिळू शकतात. बिहारी सतसईत ७१० दोहे संकलित केलेले आहेत. या श्रृंगारप्रधान ग्रंथांत अनेक सामान्य प्रवृत्तीही ग्रथित केल्या आहेत. या ग्रंथातील भावप्रतिमा जितक्या सुगठित व मनोरम आहेत, तेवढेच काव्यकला शिल्पही अप्रतीम आहे.

आता आपण सतसईच्या परंपरेचाही थोडक्यात विचार करू या. अपभ्रंश साहित्यात 'दूहा' छंद महत्त्वपूर्ण मानला गेला आहे. पण हिंदी साहित्यात दोहा छंदाला खास असे महत्त्व नाही. संस्कृत साहित्यात शतक सप्तशती अथवा सप्त शतिका असल्या रचनांची प्राचीन परंपरा आहे. सातशे दोह्यांची एकसंध रचनापद्धती हिंदी कवींनी संस्कृत साहित्यातून उचलली आहे. ['बिहारी की सत्‌सई' पद्यसिंह शर्मा—पृष्ठ ७१.] संस्कृत आणि प्राकृतात संख्येच्या आधारावर जे ग्रंथ निर्माण केले गेले आहेत त्यांची संख्या अल्प नाही. जार्ज ग्रियर्सनने पंचशिका, शतक आणि सप्तशती ग्रंथाची मोजदाद करताना ती संख्या ३१ इतकी आहे असे सांगितले आहे. [सतसई सपाक—शामसुंदर गुप्त, पृष्ठ ४.] प्रस्तुत प्रसंगी या सूचनाफलकाच्या चर्चेची आवश्यकता नाही. पण या सूचीमुळे संख्यावाचक ग्रंथांची परंपरा प्राचीन आहे एवढे निश्चित कळते. प्राकृत भाषेत लिहिलेली 'गाथा सप्तशती' या परंपरेचा आद्य ग्रंथ होय. या ग्रंथापासूनच या परंपरेचा प्रारंभ मानला जातो. 'गाथा सप्तशतीं'चा संग्रह सातवाहनाने केला आहे. ज्याला 'हाल' कवी म्हणूनही निर्देशिले जाते. या संबंधीही पुष्कळच मतभेद निर्माण झाले आहेत. मराठीचे प्रसिद्ध साहित्य इतिहास संशोधक श्री. स. आ. जोगळेकर यांनी गाथा सप्तशतीची विस्तृत प्रस्तावना लिहिली आहे. त्यांनी प्रत्येक गाथेचे प्रामाणिक विवरणही केले आहे. त्यांनी सातवाहन अर्थात कवि हाल यानेच हा ग्रंथ संकलित केला आहे हे मान्य केले आहे. डॉ. त्रिभुवनसिंह आपल्या 'दरबारी संस्कृत हिंदी मुक्तक' या ग्रंथात हाल यानेच गाथा सप्तशती संकलित केली हे अविछिन्नपणे सांगितले आहे. या वादविवादात न पडता सतसईची परंपरा विकसित करणाऱ्या या आदिग्रंथाची चर्चा आपणाला या ठिकाणी जास्त उपयुक्त होईल व अधिक औचित्यपूर्ण वाटेल.

प्राकृत गाथा सप्तशती

गाथा सप्तशतीचा संग्रह सातवाहनाने केला आहे. सातवाहनाचेच दुसरे नाव "हाल"होते. गाथा सप्तशतीची पार्श्वभूमी तत्कालीन लोकजीवनावर आधारलेली आहे. या ग्रंथात त्या काळच्या समाजजीवनाचे चित्र रेखाटले आहे. याची भाषा महाराष्ट्रीय प्राकृत आहे. विप्रलंभ श्रृंगार, दैनंदिन जीवनातील सजीवता, नैसर्गिक प्रवृत्तीची दृश्य चलत्‌चित्रे, ग्रामीण जीवनातील माया, मोह, मत्सरादि व्याभिचारी भाव भावनांचे मनोहारी लीला विलास, इत्यादींचे सजीव तसेच मौलिक वर्णन, यात या गाथांचे विशेषत्व दिसून येते. यातील श्रृंगार जनजीवनाशी संबंधित आहे. हा ग्रंथ केवळ सतसईच्या परंपरेला

प्रमाणभूत नसून श्रृंगारात लौकिक सतसईकाराने अनेक प्रकारे प्रेरणा धारण केली आहे. महाकवी कालिदासावरही गाथा जीवनाची यथार्थ प्रतिष्ठापना करण्यासही कारणीभूत झाला आहे. या ग्रंथापासून सप्तशतीचा प्रभाव झाल्याचे सिद्ध झाले आहे. या ग्रंथाला आदर्श मानून दोन प्रकारच्या सतसई लिहिल्या गेल्या आहेत. पहिली भक्ती आणि सूक्तिप्रधान रचना व दुसरी श्रृंगारप्रधान रचना.

कीथने या ग्रंथाचा रचनाकाल इ.स. पूर्व २०० हा मानला आहे. ग्रियर्सनने इ.स.चे ५ वे शतक सांगितले आहे. पण या कालाला पंडित संशोधकांनी अप्रमाणित ठरविले आहे. संशोधनाच्या आधारे गाथा सप्तशती पहिल्या शतकातच रचली गेली असे निश्चितपणे मान्य करण्यात आले.

आर्या सप्तशती

सतसईच्या परंपरेत गोवर्धनाचार्यांच्या 'आर्या सप्तशती' या ग्रंथाच्या रचनेमुळे एक नवीन दिशा दृग्गोचर झाली. या आर्या सप्तशतीचा रचना काल १२ वे शतक मानले गेले आहे. गोवर्धनाचार्य, बंगालचा राजा लक्ष्मणसेन यांच्या दरबारी राजकवी नियुक्त होते. या रचनेवरही गाथा सप्तशतीचा अधिक प्रभाव दिसून येतो. हे त्यांनी स्वतःच मान्य केले आहे. आर्या छंदात लिहिलेल्या सप्तशतीतील वर्ण्य वस्तू संख्या आणि श्रृंगारप्रधान अभिव्यंजनाची निवड 'गाथा सप्तशतीनुसारच केलेली आढळते. या दोन सप्तशतींच्या मध्यकालात इ.स.८५० च्या जवळपास प्रसिद्ध अमरू शतकांची रचना झाली. अमरू कवीच्या श्रृंगारात अद्‌भुत रसप्रवाह संमीलित झालेले दिसून येतात. परंतु गाथा व आर्या सप्तशतीमध्ये एक पारंपारिक क्रम आढळतो म्हणून सतसईच्या परंपरेत या ग्रंथांना विशेष महत्त्व आहे. [लालचंद्रिका—संपादक जार्ज अब्राहम ग्रियर्सन (भूमिका).]

तुलसी सतसई

हिंदी साहित्यात 'सतसई' या प्रकाराचा प्रारंभ 'तुलसी सतसई' व 'रहीम सतसई' या ग्रंथांपासून झाला आहे. वि.सं. १६४२ हा तुलसी सतसईचा रचनाकाल मानला गेला आहे. ही सतसई सात भागांत विभागलेली आहे. पहिल्या भागात भक्तीचे निरूपण केले असून दुसऱ्यात उपासना व पराभक्तीचे विवरण आहे. तिसऱ्यात रामभजन व चवथ्या विभागात आत्मबोधाची व्याख्या केली आहे. पाचव्यात कर्म सिद्धांत व सहाव्यात ज्ञानसिद्धांताचे निरूपण आहे व सातव्यात राजनीतीचे वर्णन केले आहे. एकूण तुलसीचा अंतर्हेतू नीति व उपदेशप्रधान आहे. याला 'सूक्तिप्रधान सतसई' म्हटले तरीही चालण्यासारखे आहे.

रहीम सतसई

रहीम सतसई ही तुलसी सतसईच्या समकालीन आहे. पण ही सतसई अपूर्णावस्थेत आढळते. तुलसी सतसईप्रमाणेच यातही नीतिबोध व उपदेश यांना प्राधान्य दिलेले आहे. रहिमने स्वानुभवाच्या आधारावर याची रचना केलेली आहे. तुलसी ज्ञानाचा महिमा गातात. ते मर्यादावादी आहेत आणि रहिमने सदाचाराला महत्त्व दिले आहे. नीति आणि अनुभव सूक्तिस्वरूपात व्यक्त करण्यात रहीम फार कुशल होते. दोन्हीचा सुंदर मेळ घालून रहिमने हा सूक्तिसंग्रह रचला आहे.

अनुक्रमणिका

मतिराम सतसई

'मतिराम सतसई' व 'बिहारी सतसई' हे ग्रंथही समकालीन आहेत. 'मतिराम सतसई' ही रचना प्रासंगिक किंवा परिस्थिती विशेष घटनांवर आधारलेली नाही आणि मोहरांच्या लोभानेही लिहिलेली नाही. "मतिरामने" समयानुकूल आपल्या उन्मत क्षणांचा मुक्त भावनिर्देश त्यात कुशलतेने, गोवला आहे. आणि त्यामुळेच त्यांच्या दोह्यात सहृदयता, सरसता आणि मनोहारी भाष्याचा हृदयंगम संगम झाला आहे. याचा रचनाकाल वि.सं. १६९० च्या आसपास मानला जातो. 'मतिराम सतसई' त त्यांच्याच 'रसराज' व 'ललितललाम' या ग्रंथांतील अधिकांश दोहे संकलित केले असा लोकापवाद आहे. बिहारी आणि मतिराम यांच्या सतसईंची तुलना केली तर बिहारींचे दोहे काव्याच्या दृष्टीने अधिक समृद्ध आहेत हे सिद्ध होईल. मतिरामने आपल्या विभिन्न ग्रंथांच्या रचनेतच आपल्या साऱ्या प्रतिभाशक्तीचा व्यय केला पण बिहारीने आपली सारी शक्ती सतसईतच केंद्रित केली. 'बिहारी सतसई'च्या प्रसिद्धी नंतर इतर हिंदी कवींमध्ये जणु चढाओढ सुरू झाली आणि तिचा आदर्श ठेऊन अनेक रचना प्रसृत केल्या. (१) रसनिधि सतसई (रचना काल सं. १६६० ते सं. १७१७ च्या दरम्यान), 'वृन्द सतसई' (रचना सं. १८६१), 'राम सतसई' (रचना काल सं. १८६० ते १८८० पर्यंत), 'विक्रम सतसई' (रचना सं. १८३९ ते सं. १८८६ पर्यंत) या सर्व ग्रंथांवर बिहारीचा प्रभाव पडलेला आहे.

बिहारींनी आपल्या पूर्ववर्ती संस्कृत, प्राकृत आणि हिंदीपासून प्रेरणा घेतली आहे. पण फक्त श्रृंगारप्रधान काव्याचाच प्रभाव त्यांच्या मनोवृत्तीत अधिक दिसून आला. जरी बिहारींनी गाथा सप्तशती, अमरू शतक आणि आर्या सप्तशतीचे अनुकरण केले तरीही त्यांच्या मौलिक अभिव्यक्तीचे तेज काही आगळेच आहे.

सतसईच्या परंपरेचे अध्ययन केल्यानंतर ही परंपरा अखंड, सुदीर्घ आणि सुदृढ असल्याची साक्ष पटते. 'मुक्तक' काव्यात दोहा व आर्या छंद हाच विशेषत्वाने वापरला आहे. आणि तोच अतिशय युक्त वाटतो. सतसईच्या परंपरेत विशषतः तीनच ग्रंथांना बहुमान्यता मिळाली. प्राकृतांतील गाथा सप्तशती, संस्कृतमधले 'अमरू शतक' व 'आर्या सप्तशती' आणि हिंदीतील 'बिहारी सतसई'. हे ग्रंथ काव्यातील निकषावर उजळून निघालेले आहेत. या ग्रंथांमध्ये श्रृंगार भावनेला जेवढा वाव मिळाला तेवढा भक्तीभावनेलाही मिळू शकला नाही. 'रसाळता' हे एकमेव त्यांच्या लोकप्रियतेचे कारण म्हणता येईल.

बिहारी सतसईवरील टीका

बिहारी सतसईच्या संबंधित टीकांचा क्रम जवळजवळ पंधरा सोळा वर्षांनंतर सुरू झाला. सतसई इतकी लोकप्रिय झाली की, वाचक वर्ग विभिन्न दृष्टिकोनातून तिचा रसास्वाद घेण्यावरच थांबला नाही तर तिच्यावर विविध प्रकारे टीकाग्रंथांची रचनाही करू लागला. हिंदी अथवा हिंदीच्या अन्य उपभाषांच्या व्यतिरिक्त संस्कृत, फारसी, उर्दू आणि गुजराथी इत्यादी भाषांमध्ये गद्य व पद्य दोन्ही रूपांत सतसईवरील टीकांचा प्रसार होऊ लागला. या टीकाग्रंथातील काहींचा नामनिर्देशच केवळ सांपडतो पण काही मात्र प्रकाशित झाल्या आहेत. त्यांचा सामान्य परिचय देणे आवश्यक वाटते. [हा परिचय "कविवर बिहारी", "बिहारी की वाग्विभूति", "मिश्रबंधु विनोद" आणि "बिहारी विहार" यामधून उद्धृत केला आहे.]

अनुक्रमणिका

(१) कृष्णलालची टीका

बिहारी सतसईवरील ही पहिली टीका मानली जाते. हिच्या उपसंहारात निम्नलिखित दोहा दिलेला आहे.

> 'संवत, ग्रह ससि जलधि, छिति, छह वासर चन्द।
> चैत्र मास परव-कृष्ण मैं पूरन आनंद कन्द॥' [ग्रह ९ ससि १ जलाधें ७ छिति १. अंकानाम् वामतोगति :—१७१९.]

काही टीकाकार या दोह्याला सतसईच्या समाप्तिचा सूचक मानतात. पण इतर अधिकांश टीकेत हा दोहा सापडत नाही. म्हणूनच हा दोहा कृष्णलालच्या टीकेच्या समाप्तिचा असावा असे वाटते. त्याच्या अनुसार हा काल सं. १७१९ चैत्र कृष्ण ६ म्हणजे ३१ मार्च १६६२ इ.स. हा ठरतो. हिच्या आधीची कोणतीच टीका उपलब्ध नसल्यामुळे कृष्णलालच्या टीकेलाच सतसईवरील पहिल्या टीकाग्रथांचे भाग्य प्राप्त झाले. हिच्या शेवटी आणखी एक दोहा दिलेला आहे.

> 'प्रथम देवबानी हुती कुनी नरबानी कीन।
> लाल बिहारी कृत कथा पढै सो होय प्रबीन॥'

प्रथम संस्कृतमध्ये नंतर ब्रजभाषेत ही रचना झाली आहे. लाल कवी म्हणतात जो हिचे पठण करील तो साहित्य प्रवीण होईल. बिहारीच्या पुत्राचे नाव कृष्ण कवी असावे अशी वदंता आहे. [बिहारीना संतान नव्हते—त्यांनी आपला पुतण्या निरंजन याला दत्तक घेतले होते. अशीही आख्यायिका आहे.] त्यांनी कवित्त व सवैय्यात टीका लिहिली आहे. या टीकेची जयपुरी मिश्रित व्रज भाषा आहे.

हिचा अर्थही सामान्य श्रेणीचा आहे. यांत शब्दलंकार, ध्वनि इत्यादीचे संकेत मिळत नाहीत. एका दोह्याचा अर्थ पहा.

> **'पारयो सोरु सुहाग कौ इन बिनु ही पिय नेह।**
> **उन दौहीं अखियाँ ककै कै अलसौं हीं देह॥ वि.र.६६२**

'मुग्धा स्वाधीन पतिका-सखी सखीशी संवाद करते।' 'हे सखी, इन राधिका बिनाही भरतार सौ नेह सुहाग कौ सोर पारयो है। सो कैसैक नायका के अलसोही देह करने तै नायक दोनु हीं आँखियाँ करि कै देखि सो चित्त चढी।'

> **नयनि जागरण लालिमा, आळसलेले देह ।**
> **धूर्त सवति या दाविती नसतांही पतिस्नेह॥६६२॥—रसलीना**

(२) मानसिंहाची टीका

ही टीका उदयपूरच्या 'विजय गछ' या ग्रामनिवासी कवि मानसिंगची आहे. ते उदयपूरचे महाराज राजसिंह ह्यांचे दरबारी कवि होते. या टीकेची रचना वि.सं. १७३४-३५ च्या मध्यकाली झाली असावी असे मानले जाते. ही टीका देखील साधारण श्रेणीचीच आहे. दोह्याचे अर्थ अशुद्ध आणि अग्राह्य आहेत. उपरोक्त

दोह्याचा अर्थ कसा केला तो पहाण्यासारखा आहे. 'पंडिता नायिका श्री राधाजू श्रीकृष्णजू सों कहैं है। पारयो सोरू इन बिनु इन पिय के नेह बिनु ही हमारौ ब्रजमंडल में यों ही झूठौ ही सुहाग कौ सोर पसारयौ है। इन दौहीं कै अलसौं' इन दोनु अँखियाँ देखें ही कौ सुहाग है। अर कै अलसौंही नींद भरी देह कै हमारे घर आइ सोवन कौ सुहाग ह इत्यर्थः'

(३) अनवर चंद्रिका

शुभकरण व कमलनयन नावाच्या दोन कवींनी मिळून हा टीका ग्रंथ लिहिला आहे. अनवरखाँ दिल्लीचे सामंत होते. त्यांच्या आग्रहाने ही टीका लिहिली गेली आहे. हिचा रचनाकाल सं. १७७१ हा आहे. हिच्या रचनेच्या संबंधात खालील दोहा लिहिला आहे.

> 'जु है बिहारी सतसया मैं कवि-रीति-विलास ।
> सो अब अनवर-चंद्रिका सब कौ करै प्रकास ॥

ही टीका १६ भागांत लिहिली आहे. यांत वक्ताबोधव्य, संदर्भ, अलंकार ध्वनि आदि कथन करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. पण दोह्यांचा अर्थ विशद करण्याचा अधिक प्रयत्न केला गेला नाही. तरी ध्वनिभेदाच्या जाणिवेने प्रसंग समजण्यास सहाय्य मिळते. पूर्वोक्त दोह्याचा त्यांनी दिलेला अर्थ पहा. 'जौ याही नायिका की सखी की उक्ती है तौ याही कौं झूठी कहति है । ताकि आगे कहते है यह कि कोऊ टोकै नहीं । जौ सौति की कै बाकी सखी की उक्ति होइ तौ अमर्थ ईर्षा संचारी । विभावना अलंकार प्रथम भेद.'

(४) कृष्ण कविची कवित्तबंध टीका

या टीकेचा रचनाकाल सं. १७८२ हा आहे. यांत सतसईचा अर्थ समजावून देण्याचा प्रयत्न दिसून येतो. ही छंदबद्ध टीका असली तरीही यांत नायिकाभेद वर्णिलेला आहे. पूर्वोक्त दोह्यांच्या आधी खालीलप्रमाणे भूमिका लिहिलेली आहे.

> (नर। अक्षर ३३। गुरू १५, लघु १८।)

'यह नायिका सौति कौ अलसवलित देखि अरू रसमसी आँखि देखि सखी सौ काकु ध्वनि कहति हैं । अन्य संभोग-दुःखिता होइ । जो सखी नायिका सौं कहै तो रिस निवारन होइ।'

या दोह्याच्या आशयाने पुढील कवित्त छंद रचला आहे.

> सैं करि आँखि उनींदी करी अघ उनत सो मुख बोल उचारयो।
> बारहि बार जम्हाइ कै यों ही खरौ तन आरस कै ढर ढारयौ॥
> झूठि जतावलि है सुख सेन जगी यह जामिनी जामिनि चारयौ।
> देखि तौ प्रीतम की बिन प्रीति सुहाग कौ सोर कितौ इहिं वारयौ॥

(५) साहित्य चंद्रिका

अनुक्रमणिका

ही “कर्ण” कवीची रचना आहे—हिचा रचना काल संवत् १७९४ वि. आहे.

(६) अमर चंद्रिका

ही टीका केशव कवीचे प्रसिद्ध टीकाकार सुरति मिश्र यांनी लिहिली आहे—जोधपूर येथील महाराज अभयसिंहचे सचिव भण्डारी नाडूला अमरचंदा यांच्या आदेशानुसार ही लिहिली गेली. हिचा रचनाकाल वि. सं. १७९४ आहे.

(७) रसचंद्रिका

१९व्या शतकातील ही पहिली टीका होय. नरवरगढचे महाराजा छत्रसिंह यांच्या आदेशावरून ‘ईसवी खाँ’ याने ही टीका लिहिली आहे. यांत दोह्यांचा अर्थ स्पष्ट करण्याचा स्तुत्य प्रयत्न केला गेला आहे. अकारादि क्रमाने दोह्याची मांडणी करणे हे या टीकेचे वैशिष्ट्य होय.

(८) हरि प्रकाश टीका

संवत् १८३४ मध्ये हरिचरण दासाने ही रचना केली आहे. हिच्या संबंधात रत्नाकरजी लिहितात “यांची सतसईवरील टीका फारच उत्तम व अर्थजिज्ञासूकरिता अतिशय उपयोगी आहे.”

(९) प्रताप चंद्रिका टीका

जयपूर नरेश महाराजा प्रतापसिंहाचे आश्रित मनिराम यांनी अनुमानतः सं. १८५० च्या सुमारास ‘प्रतापचंद्रिका’ हा टीका ग्रंथ लिहिला. यांत अर्थबोध असून नसल्यासारखा आहे.

(१०) सतसैया वर्णार्थ अथवा देवकीनंदन टीका

रचना काल सं. १८६१. बाबू देवकीनन्दनसिंहाला प्रसन्न करण्यासाठी ठाकुर कवीने ही टीका लिहिली आहे.

(११) रणछोडजींची टीका

गुजराथमधील रणछोडजी दीवान यांनी ही टीका लिहिली आहे. हिचा रचना काल उपलब्ध नाही.

(१२) लाल चंद्रिका टीका

फोर्ट विलियम कॉलेजचे हिंदीचे अध्यापक श्री. ‘लल्लजीलाल’ यांनी ही लालचंद्रिका टीका लिहिली आहे. ही सामान्य जनांच्या बोलीभाषेत रचली आहे. हिची भूमिका ग्रियर्सन साहेबांनी लिहिली आहे. हे संस्करण उपलब्ध नाही. याशिवाय आणखी काही टीका ग्रंथ आढळून येतात. त्यांची केवळ चर्चाच ‘मिश्र बंधु विनोद’ मध्ये वाचायला मिळते. त्या विशेष महत्त्वपूर्ण नसाव्यात अशी शक्यता वाटते.

(१३) नवाब जुल्फिकार अली यांची टीका

ही कुंडलियो छंदबद्ध रचना असून रचना काल वि.सं. १९०३ मानलेला आहे. ही विशेष उल्लेखनीय नाही.

(१४) रसकौमुदी टीका

ही छंदंबद्ध टीका श्री. जानकी प्रसादजी उपनाम 'रसिकेश' यांनी वि.सं. १९२६ मध्ये लिहिली. हिची छंदरचना महत्त्वपूर्ण आहे. यात बिहारीच्या केवळ ३१६ दोह्यांचाच परामर्ष घेतला आहे.

(१५) प्रभुदयाल पाण्डे यांची टीका

हिचे प्रकाशन सं. १९५३ मध्ये झाले. हिची भाषा परिमार्जित आहे. ही हिंदी खडी बोलीतील पहिली टीका समजली जाते. हिच्यात अन्वय, सरलार्थ आणि शब्दांची व्युत्पत्तीही दिलेली आहे.

(१६) पं. अम्बिका दत्त व्यासांची टीका

रचना काल वि. सं. १९४८.

(१७) भावार्थ प्रकाशिका टीका

प्रकाशन वि. सं. १९६०. ही टीका विद्यावारिधी पं. ज्वालाप्रसाद मिश्र यांनी लिहिली आहे.

(१८) बाबा सुमेर सिंहाची टीका

हिची निर्मिती बहुधा वि. सं. १९५५-६० च्या दरम्यान मानली गेली आहे.

(१९) संजीवनी भाष्य

हे भाष्य पंडित पद्‌मसिंह शर्मा यांनी केले आहे. ह्यात दोन विभाग आहेत. पहिल्या विभागात सतसईची समीक्षा आहे आणि इतर कवींशी बिहारींची तुलना केलेली आहे. दुसऱ्या विभागात सतसईवरील टीका आहे. या भाष्याचे प्रथम प्रकाशन वि. सं. १९७५ मध्ये झाले आणि द्वितीय संस्करण वि. सं. १९७९ मध्ये प्रसिद्ध झाले. या संजीवनी भाष्याला हिंदी साहित्यसंमेलनाने १,२०० रुपयांचे मंगलाप्रसाद पारितोषिक प्रदान केले आहे.

(२०) विहारी बोधिनी

ही लाला भगवान दीन उपनाम 'दीन' यांनी लिहिली आहे. हिचा रचना काल वि. सं. १९७८ हा आहे. ही शुद्ध हिंदी खडीबोलीत लिहिली आहे. ही टीका महत्त्वाची मानली गेली आहे.

(२१) रामवृक्ष बेनीपुरीची टीका

हिचे प्रकाशन सं. १९८२ मध्ये झाले, विद्यार्थ्यांकरिता ही उपयुक्त गणली गेली आहे.

(२२) बिहारी रत्नाकर

हा ग्रंथ वि. सं. १९८३ मध्ये प्रकाशित झाला. ह्यांचे रचनाकार बाबू जगन्नाथदास रत्नाकर यांनी फार परिश्रमाने या ग्रंथाची रचना केली. त्यांना याबाबतीत मूळ सतसईच्या प्रतिसाठी बरेच संशोधन कार्यही करावे लागले. यात संशोधनाची सामग्रीही दिलेली आहे. दोह्यांचा क्रम लावून पाठ निर्णय करण्यात त्यांना सतत २२ वर्षे श्रम करावे लागले. ही अत्यंत महत्त्वपूर्ण टीका असून अधिकृत म्हणून सर्वमान्य झालेली आहे. यात शब्दार्थ, अवतरण आणि भावार्थ दिला गेला आहे. शेवटी अकारादि क्रमाने सूचि व सात अन्य टीकांचे प्रसंग दिल्यामुळे हा ग्रंथ अत्यंत उपयुक्त म्हणून सिद्ध झाला आहे. जे दोहे बिहारीकृत असणे संदेहपूर्ण वाटले त्यांचे संकलन परिशिष्टात केले आहे. ही टीका अत्यंत प्रामाणिक गणली गेली आहे.

विसाव्या शतकात लिहिलेल्या अन्य टीकाही प्रत्ययास येतात. ईश्वरीप्रसाद कायस्थाची टीका, सरदार कवींची टीका, गदाधराची टीका, अयोध्या प्रसादांची टीका इत्यादी आणखीही काही टीकाकारांची नावे सापडतात. हिंदी खेरीज अन्य भाषांमध्येही सतसईवरील टीका आढळतात.

(१) संस्कृत गद्य टीका

या टीकेच्या संदर्भात ‘बिहारी विहार’ च्या प्रस्तावनेत म्हटले आहे – “या अपूर्व टीकेच्या रचनाकाराचे नाव सुरुवातीपासून शेवटपर्यंत ग्रंथात कुठेच आढळत नाही.”

(२) आर्यागुंफ टीका

सतसई दोह्यांचा, आर्याछंदात केलेला हा संस्कृत अनुवाद आहे. हिचे रचनाकार पं. हरिप्रसादजी हे आहेत. ते काशी येथील राजश्री चेतसिंहाचे प्रधान कवी पंडित होते. ही रचना सं. १८३७ मध्ये झाली. एक उदाहरण पहा—

‘मेरी भवबाधा हरौ, राधा नागर सोई ।
जा तन की झॉई परै स्यामु हरित द्युति होइ ॥ १ ॥’
‘सा राधा भवबाधा विविधामपहरतु नागरिकी ।
यस्यास्तनु तनुकान्त्या कान्तः श्यामो हरिर्भवति ॥’

(३) शृंगार सप्तशती टीका

पं. परमानंद भट्ट यांनी सं. १९२५ मध्ये ही रचना केली. यात प्रथम संस्कृतानुवाद सरळ भाषेत केला आहे, नंतर हिंदी अनुवाद आणि त्यानंतर संस्कृत गद्यात विस्तृत टीका अशी वैशिष्ट्यपूर्ण रचना योजिली आहे.

(४) जोशी आनंदी लाल यांची फारसी टीका

हिचा रचना काल सन १८९३ असा आहे व टीकेचे नाव 'सफरंगें सतसई' ठेवले आहे. उर्दूमध्ये दोन टीका आढळतात. पहिली 'गुलदस्तार बिहारी' आणि दुसरी 'गुलजारे बिहारी'. पहिलीचे रचनाकार मुंशी देवीप्रसाद कायस्थ 'प्रीतम' हे आहेत. उर्दूमधील शेर या रचनेप्रमाणेच सतसईच्या दोह्यांचा शेर या काव्यप्रकारात अनुवाद केला आहे. एका दोह्यासाठी एकच शेर त्यांनी योजला आहे हे यांचे वैशिष्ट्य म्हणता येईल. ह्यात हिदीच्या तत्सम आणि तद्भव शब्दांचे प्रयोग केले गेले आहेत. हिची रचना सं. १९६० मध्ये झाली.

(५) भावार्थ प्रकाशिका—गुजराथी टीका

गुजराथी भाषेचे प्रसिद्ध कवि श्री. सविता नारायण व गणपति नारायण ह्यांनी सं. १९६९ मध्ये या ग्रंथाची रचना केली. ही टीका देखील महत्त्वपूर्ण मानली जाते.

या प्रमाणे 'बिहारी सत्सई' वरील टीकांचा परिवार समृद्ध आहे.

बिहारींचे वाक्चातुर्य

कविवर बिहारींनी आपल्या सतसईत भावरमणीयता व अर्थगौरव यावर जेवढा भर दिला आहे तेवढा नाद सौंदर्यावर दिलेला नाही. काव्याचे गांभीर्य सुरक्षित राहील इतपतच नादसौंदर्य त्यांनी उपयोजिले आहे. बिहारीच्या मनोवृत्तीत उद्भावनांची एवढी प्रबल शक्ती होती आणि भाषेवर त्यांचा एवढा अधिकार होता, की शब्द त्या भावनेवर हिंदोळत असत. म्हणूनच दोहा छंद त्यांनी सराईतपणे आणि सफलतेने वापरला. हे माझे विवेचन जास्त स्पष्ट करण्याकरिता विभिन्न कवी शायरांच्या त्याच प्रसंगावरील रचनेची उदाहरणे उद्धृत करतो. बिहारीचा एक दोहा असा आहे.

'लिखन बैठी जाकी सबीगही गहि गरब गरूर।
भये न केते जगत के, चतुर चितेरे कूर॥३४७॥

याच भावनेवर जौक साहेब लिहितात—

शक्ल तो देखो मुसब्बिर खींचेगा तसवीरे यार,
आपही तस्बीर उसको देखकर हो जायगा।

याच आशयावर मसहफीही लिहितात—

न हो महसूस जो किसशै तरह नक्शेमें ठीक उतरे,
शबीहे यार खिंचवाई कमर बिगडी दहन बिगडा।

अनुक्रमणिका

बिहारीचे दोहे व उर्दू शायरांचे शेर यात भावसाम्य दिसून येते. पण अर्थ आशयाचा वैभवाचा विचार केला तर बिहारीची व्यापक भूमिका आणि अर्थगौरव आगळाच दिसून येतो.

चित्रकार (मुसव्विर) प्रियतमेचे चित्र काढू शकेल याबद्दलचा संदेह जौक साहेबाच्या मनात दिसून येतो. त्याचा विश्वास त्यांना वाटत नाही असे वाटते. 'चित्रकारच तिला पाहून चित्रासारखा बनेल ही भीति त्यांच्या मनात आहे. जौकच्या कथनात वाक्प्रचार वापरण्याची कुशलता दिसून येते. मसहबी साहेबाने प्रियतमेचे चित्र (शबी हे यार) काढण्याची चित्रकाराला संधि तर दिली आहे, पण प्रत्यक्ष चित्रात मात्र कमर बिघडली व चेहराही बिघडला. कारण चित्रकाराला तशी अनुभूतीच आली नाही. (कारण फारसी आणि उर्दू काव्यात प्रियतमा बिनचेहऱ्याची व कंबर विरहित असते). चित्रकाराचा त्यांत मुळीच दोष नाही. बिहारी हीच भावना निराळ्या तऱ्हेने प्रगट करतात.ते म्हणतात, 'जगातल्या प्रसिद्ध चित्रकारांनी तिचे चित्र रेखाटण्यासाठी एकदा का अनेकदा प्रयत्न केला. चित्र काढण्यासाठी तें मोठ्या गर्वाने तिच्यासमोर बसले. पण तिच्या नवनवोन्मेषी सौंदर्याने भारावून ते तिचे पूर्ण चित्र रेखाटू शकले नाहीत. जौक आणि मसहफीने चित्र न बनवण्याची कारणे दिली आहेत. बिहारीनी याबाबतीत मौन धरले आहे. कदाचित त्याची असंख्य कारणे असू शकतील. म्हणूनच या दोह्यात त्याचे कारण न देता ते आपल्या रसिक वाचकांच्या कल्पनेवर व विवेकशक्तीवर सोपवितात! आणि हेच त्याचे संयमित वाक्चातुर्य यातच दिसून येते आणि ते इतर कवी शायरांपेक्षा वेगळे वाटतात. हीच भावना श्रृंगार सतसई मध्ये कशी रंगविली आहे. ती पाहू या.

सगरब गरब खींचैं सदा चतुर चितेरे आय।
पर बाकी बांकी अदा नेकु न खींची जाय।

यात नायिकेचे (बांकी अदा) श्रृंगारिक हावभाव चित्र बनविण्यात अडथळा आणतात. रसलीनेत हेच चित्र श्री. राजा बढे यांनी किती यथार्थपणे अनुवादित केले आहे हे देखील पाहण्यासारखे आहे.

'क्षणा क्षणाला वाढते, नवतीचे लावण्य
तनु कांती मनमोहिनी, पाहुन वाटे धन्य
गर्वगुणी जगतातले, सजले चतुरसुजाण
चित्रकुशलता थांबली, गळला तो अभिमान
वर्णवे न वरवर्णिनी. सौंदर्याचे गूढ
चित्र राहि अपुरेच ते, चित्रकार दिङ्मूढ' (रसलीना).

बिहारींच्या वाग्चातुर्याचे एक आणखी उदाहरण देऊन हे प्रकरण समाप्त करू इच्छितो.

'दीठि परोसिन ईठि ह्यौ कहे जु गहे सयानु।
सबै सँदेसे कहि कह्यौ मुसकाहट में मानु ॥३८३॥

हा दोहा वाचून कवीला काय म्हणायचे आहे हे सहसा लक्षात येत नाही. पण नायिका भेदाची परंपरा जाणणाऱ्या रसिक वाचकांना सहज उलगडा होऊ शकेल की, ही शेजारीण दुसरी कोणी नसून नायिकेची सवत असावी. तीच आज धीट होऊन आणि इठि म्हणजे हितैषिणी बनून नायिकेकडे येऊन निरोप सांगते की तू आपल्या पतीला सांग की माझ्या घरी आज कुणी नसल्यामुळे माझं अडलेलं एक काम त्यांनी केलं तर माझ्यावर फार कृपा होईल." पति घरी आल्यानंतर नायिका शेजारणीचा निरोप त्याला

हसत हसत सांगते. पर्यायाने शेजारणीवर आपलं प्रेम आहे हे मी जाणते हे आपल्या मंदस्मिताने ती सूचित करते. आपला क्रोधही तिने उपहासात्मक मंदस्मितात परिणत केला आहे. [हे अन्यसंभोग दुःखितो नायिकेचे मनोभाव आहेत.]

रसलीना म्हणते—

"कुणीच नाहीं ग घरीं, एकलीच मी आज।
करितिल माझें काज का सखे तुझे पतिराज"
ओळखून संकेत तो, प्रीतीचा परिवेष
हासत सांगे प्रियकरा, शेजीचा संदेश ॥र. ली.॥३८३॥

बिहारींच्या काव्यप्रतिभेचे हे अनोखे सामर्थ्य आहे. सत्सई अशा प्रकारच्या उदाहरणांनी ओतप्रोत भरलेली आहे. बिहारींचे शब्दप्रयोग, शब्दमैत्र, वर्णमैत्री, वर्णवृत्त आणि अर्थगौरव, यामुळे त्यांचे काव्य उच्च श्रेणीचे बनले आहे. ज्याच्या काव्यावर इतकी विशद व सर्वांगीण चर्चा झाली असा भाग्यवान कवी हिन्दी साहित्यात बिहारीशिवाय दुसरा नाही.

ऋतु वर्णन आणि निसर्ग चित्र

श्रृंगार-काल ही सामंतयुगाची देणगी आहे. सामंतांच्या मैफलीत कवी कलाकारांचा आदर अवश्य राखला जात होता. पण जे त्यांची दूषित सौंदर्यप्रियता व अस्वस्थ विलासी मनोवृत्तीची जिज्ञासा शमवीत त्यांना बहुमान मिळे. बिहारी देखील राजा जयसिंहाचे दरबारी कवी होते. त्यांचे काव्य जनजीवनासाठी नव्हे तर राजामहाराजांच्या मनोरंजनासाठीच लिहिले गेले आणि मोहरांच्या मोलाने विकले गेले. त्यामुळे या कविकडून योजनाबद्ध ऋतुवर्णन अथवा निसर्गवर्णनाची अपेक्षा करणे चुकीचे ठरले असते आणि पुन्हा मुक्तक काव्यात व दोह्यासारख्या लघुछंदात प्रबंधाप्रमाणे विस्तृत ऋतुवर्णनाला जागा नसते. तरी पण निसर्ग नानाविध रूपाने मानवी जीवनाला प्रभावित करीत आला आहे. बिहारीही त्याला अपवाद नाहीत. आपल्या आश्रयदात्याच्या राजमहालाच्या परिसरात, वन, उपवन, पशु, पक्षी, पुष्करणी, तडाग इ. आपल्या बंदिनी दृष्टितून जेवढा निसर्ग पाहू शकत होते, तेवढे निसर्गवर्णन त्यांच्या काव्यात अगत्याने आले आहे. निसर्गाच्या उन्मुक्त वातावरणात विहार करायला त्यांना वेळच नव्हता व तशी त्यांना आवश्यकताही वाटली नसावी. म्हणूनच बिहारी सत्सईत जे काही प्रकृति वर्णन आले आहे ते एकतर आलम्बन रूपात अथवा उद्दीपनरूपात. विशुद्ध प्रकृतिवर्णन अभावानेच मिळते. परंतु परंपरागत ऋतुवर्णन आणि निसर्गचित्र कुठे कुठे आढळून येते.

निसर्गाचें आलम्बनरूप संश्लिष्ट चित्र
'छकि रसाल-सौरभ सने मधुर माधवी गंध।
ठौर ठौर झौंरत झँपत भौंर झौंर मधु अंध ॥४९६॥ वि.स.
(रसालमंजिरि गंध घे, माधवि मुकुल मरंद।
पिउनि फिरति मदधुंद ते, झुकति झुलत मिलिंद—रसलीना-४९६)

या दोह्यात वसंताच्या सौम्यश्रीचे मोहक आणि सजीव चित्र रेखाटलेले आहे. निसर्गाचे मादक सौंदर्य, वास्तववादी रूपविधान आणि वासंतिक वैभवाची अपूर्व अभिव्यक्ती करण्यात कलाकार पूर्ण यशस्वी झाला आहे. या लहानशा छंदात श्रृंगारप्रिय वातावरण तर निर्माण झाले आहेच, पण त्याच्या अनुषंगाने निसर्गाशी बिहारींचा रागात्मक संबंधही व्यक्त झालेला आहे. नायिकाभेदानुसार मानिनी नायिकेचा मान खंडित करण्याचा सखीचा प्रयत्नही त्यात लक्षित होतो.

श्रृंगारकालीन सौंदर्यप्रियतेला अनुरूप अशा निसर्गवर्णनाबरोबरच कवीच्या संवेदनशीलतेचे एक चित्र पहा :—

'कहलाने एकत बसत, अहि मयूर मृग बाघ।
जगतु तपोवन सौ कियौ, दीरघ-दाघ निदाघ ॥४८९॥

वसति विकल एकत्र तेअहि मयूर मृग वाघ।
बने तपोवन जगत हे, येता ग्रीष्म निदाघ ॥ रसलीना ॥४८९॥

ग्रीष्म ऋतुच्या प्रखरतेमुळे व्याकुळ झालेले पशु, पक्षी आपले वैमनस्य विसरून एकत्र जमले आहेत. अशी स्थितीत कवीला हे जग तपोवनाप्रमाणे भासते.

आता पावसाचे आलम्बन रूप पहा :—

पावस घन अँधियार मही रह्यो भेद नहिं आनु।
रात द्यौस जान्यौ परतु लखि चकई चकवानु॥४८६॥

गगनी घन अंधार हा, धुंवाधार बरसात।
चक्रवाकयुग आरवे, कळून ये दिनरात॥रसलीना॥४८६॥

ग्रीष्म आणि वर्षाऋतुवर्णनात कवीचे सूक्ष्म निरीक्षण अवश्य प्रगट झाले आहे. पण निसर्गाच्या प्रती कोमल भावनांचा अभावही स्पष्टपणे जाणवतो.

तरीपण बिहारी चमत्कारी कवी होते. त्यांनी जेथे निसर्गाचे चेतन स्वरूप अंकित केले आहे ते अद्वितीय आहे. एका शरद ऋतुचे हे चित्र पहा :—

'अरुन–सरोरुह–कर–बरन, दृगखंजन, मुख चंद।
समैय आइ सुन्दरि सरद, काहि न करति अनंद॥४८७॥
अरुण कंज कर चरण युगें दृगखंजन मुखचंद्र
शारदीय सुरसुन्दरी, देत अमित आनंद॥रसलीना॥४८७॥

[आरक्त कमलाप्रमाणे जिचे करचरण आहेत आणि खंजन पक्षाप्रमाणे जिचे डोळे आहेत, चंद्राप्रमाणे जिचे मुख आहे अशी शरदसुंदरी येताच कुणाला आनंदित करणार नाही!]

अनुक्रमणिका

आलम्बन स्वरूपात शारदीय सौंदर्य कवीला संवेदनशील बनवते. उल्हास आणि आनंद त्याच्या मनांत ओसंडून वहातो. निसर्गातील मानवीय संवेदनांनी कवीचे निसर्गाबरोबर तादात्म्य होते.

मानवीय क्रियाकलापाच्या धरातलावर बिहारींनी काढलेले अलौकिक चित्र पहा :—

'लपटी पुहुप-पराग-पट, सनी स्वेद मकरंद।
आवति नारि नवोढ लौं, सुखद वायु गति मंद ॥३९२॥ सतसई

सुमपरागपट लेउनी, दंवबिंदु मकरंद
येत लहर नवोढेपरी, टाकित पद गति मंद ॥ रसलीना ॥३९२॥

'गोप अथाइन तैं उठे, गोरज छायी गैल।
चलि-लिलि आब अभिसाकी, भली संझौखैं सैल' ॥१७६॥
कुणी न बघती सुनी ओसरी, गेले ग गोपाळ।
सहलीला ही वेळ चांगली गोरज सायंकाळ॥
गोहन परते मागुती—विसावते गोकूळ।
डोळे कुणिही रोखितां—सहज उडते धूळ॥रसलीना॥१७६॥

'कौन सुनै कासौं कहौं, सुरति बिसारी नाह।
बदाबदी ज्यौं लेत है, ए बदरा बदराह॥६३॥
सांगू कुणाला कसे सखे, मला विसरले नाथ।
भरले काळे मेघ हे जीव घेइ बरसात॥रसलीना॥६३॥

पहिल्या दोह्यात रूपक आणि उपमा यांच्या संयोगाने कवीची चेतना मधुरतर आणि सुंदरतर बनतेच, पण त्याचबरोबर मानवी प्रवृत्तीच्या वर्णनात 'नवोढा' (नववधू) हे उपमान वायूच्या कोमल स्पर्शाची जाणीव करून देते, तशीच कविप्रतिभेचा प्रत्ययही आणून देते. दुसऱ्या दोह्यात दूती अभिसारिकेला म्हणते 'अग संध्याकाळ झाली असून गोधुलीची वेळ झाली आहे—प्रियकराला भेटायला संधिकालच चालून आला आहे बघ!'

तिसऱ्या दोह्यात नायिकेला प्रियकराप्रमाणेच काळे मेघ देखील निष्ठुर भासतात, यांत आश्चर्य वाटण्यासारखे नाही. तुलसीदासासारख्या मर्यादावादी कवीचा मर्यादा पुरुषोत्तम रामही व्याकुळ होऊन म्हणतात 'घन घमण्ड गर्जत नभ घोरा। पियाबिन डरपत मन मोरा॥ '

मर्यादित रूपरेखेच्या सीमेत विस्तृत विवेचनाला जागा नसते. इथे थोडक्यात एवढेच सांगता येईल की, बिहारीचा अनुभव जीवनव्यापी होता. त्यांनी राजमहालातील नायक नायिकांच्या कामक्रीडा निरीक्षणावरच भर दिला नाही, तर तत्कालीन सामाजिक विशेषतेचेही गहन अध्ययन केले होते. जिथे त्यांना कटुसत्य सांगण्याचा प्रसंग आला तिथे त्यांनी निसर्गाच्या संश्लिष्ट चित्राची उभारणी केली आहे. बिहारी पार्थिव सौंदर्याचे उपासक असले तरी निसर्गही त्यांना अपरिचित नव्हता.

अनुक्रमणिका

बिहारींची रसज्ञता

सत्सईच्या या विवेचनांत –'रसांचे शास्त्रीय विवरण अभिप्रेत नाही.' या संबंधात आचार्य रामचंद्र शुक्ल लिहितात, "मुक्तकांत प्रबंध काव्याप्रमाणे रसप्रवाह अपेक्षित नसतोच. प्रबंधात कथाप्रसंगाच्या प्रवाहात– वाचक वाहवत जातो आणि अंतःकरणात एक स्थायीभाव निर्माण होतो. यातच रससिंचनाचा शिडकाव मनाला मोहरून टाकतो आणि हृदयकलिका क्षणकाल उमलून उठते." साहित्याचा कुणीही अभ्यासक शुक्लजींच्या या मताशी सहमत होईल. प्रबंध काव्यात कथाप्रवाहाबरोबरच रसविलासाकरिताही पुष्कळच वाव असतो आणि विविध रसांची सृष्टि निर्माण केली जाऊ शकते. मुक्तकाच्या अल्पशा परिमितीत मात्र हे संभवत नाही. बिहारींचे मुक्तछंद तर अतिशय लघुकाय आहेत. त्यांच्या दोह्यात रसमीमांसेचा शोध घेणे सुजाणतेचे होणार नाही.

बिहारींची मूळ प्रवृत्तीच श्रृंगारिक आहे. ते रूपसौंदर्याचे पारखी आणि प्रेमाचे उपासक होते. भक्तीचे काही दोहे त्यांनी रचले खरे पण त्यामुळे त्यांची भक्तकवींत गणना करणे अन्यायाचे होईल. श्रृंगाराचा स्थायी भाव रति अथवा प्रेम आहे. बिहारींनी त्याचीच साधना केली आहे. जेथे रूपसौंदर्याचा अभाव नव्हता, मंद श्वासोश्वासाने जेथील वातावरण सुंगधित झाले होते असे विलासी दरबारी वातावरण त्यांच्या कविमनाला लाभलेले होते. तेव्हा त्यांच्या चित्तवृत्ती श्रृंगाररसाने फुलून आल्यास नवल नाही.

आम्ही पूर्वीच निवेदित केले आहे की बिहारी हे संयोगाचे कवि आहेत. वियोग त्यांना विशेष मानवत नाही, पण या दोन्हींची मूळ प्रेरणा प्रेमच असते. बिहारीसमोर कालिदास व तुलसीदास यांच्या स्वकीया प्रेमाचा आदर्श होताच. पण सूरदासांचा प्रेमादर्श त्यांच्या मनोवृत्तीला जास्त पोषक होता. सूरदासाने राधाकृष्ण व कृष्ण गोपींच्या रासलीलातून प्रेमाचे प्रांगण अधिक विस्तृत केले. सूरच्या श्रृंगारवर्णनाबद्दल आचार्य रामचंद्र गुप्त सारखे उदार समीक्षकही तक्रार करतात. [हिंदी साहित्याचा इतिहास.] "समाजावर होणाऱ्या परिणामांची या लोकांना खंत नसते. आपल्या भगवत्प्रेमाच्या पुष्टीसाठी ज्या श्रृंगारमय लोकोत्तर छटांनी आणि आत्मोत्सर्गाच्या अभिव्यंजनांनी त्यांनी जनतेला रसोन्मत्त केले आहे, त्याचा लौकिक स्थूलदृष्टी ठेवणाऱ्या विषयवासनासक्त जीवावर कसा प्रभाव पडेल याची जाण त्यांनी ठेविली नाही. ज्या राधाकृष्णाच्या प्रेमाला या भक्तींनी आपल्या गूढातिगूढ मधुराभक्तीचा विषय बनविले तेच घेऊन नंतरच्या कवींनी श्रृंगाराच्या उन्मादकारी उक्तींनी हिंदी काव्याला भारून टाकले." [भ्रमरगीत सार–भूमिका.]

शुक्लजींच्या या अभिप्रायांतून दोन गोष्टी दिसून येतात. पहिली ही की त्यांनी कृष्णभक्तीत श्रृंगाराच्या अतिरेकी वर्णनाला कल्याणकारी मानले नाही आणि दुसरी–श्रृंगारकालांतील विलासी वर्णनांचे उत्तरदायित्व त्यांनी कृष्णभक्तकवीवरच टाकले आहे.

कृष्णभक्तकवींनी राधा-कृष्णाच्या प्रेमाचा अंगिकार केला. श्रृंगारकालातील कवींनी दोन पावले पुढे टाकून साधारण नायक-नायिकावर राधाकृष्णाचा रंग चढविला. श्रृंगारकालात राधाकृष्णाच्या प्रेमभक्तीवर रंगेल दरबारी दरवडा घातला गेला आणि हेच ते विलासी दरबारी प्रेम ठरले आणि बिहारींच्या श्रृंगाराचा हाच स्थायीभाव होता.

बिहारींच्या संयोगवर्णनात मनोभावनांचा उन्माद आहे पण तिथेच प्रेमाच्या कोमलतंतूची नादवीणाही झंकारते. संयोगाची वृत्ती पार्थिव असते आणि प्रियतमेची प्रत्येक वस्तु प्रिय असते. बिहारींनी परंपरागत वर्णनाहून अगदी आगळ्याच प्रकारे आपली मुक्तक रचना केली आहे आणि तीच रसिकांना भुरळ पाडते.

'उड़ति गुड़ी लखी लाल की, अँगना अँगना माँह।
बौरी लौं दौरी फिरति, छुवति छबीली छाँह॥३७३॥
बघत अंगना प्रियकरा उडवित उंच पतंग।
घडे अंगणीं सावली उडता स्वैर विहंग॥
पतंगछाया पाहूनी, विसरुनि सारे भान।
धरायास ते धावते प्रेमी हृदय अजाण॥रसलीना॥३७३॥

या इवल्याशा दोह्यात रसज्ञ बिहारींनी किती मजेशीर भावाभिव्यकी केली आहे. नायक पतंग उडवीत आहे. त्या पतंगाची सावली नायिकेच्या अंगणात पडते. त्या छायेलाच स्पर्श करण्यासाठी ती अंगणात इकडून तिकडे धावत आहे. इथे त्या पतंगाची छाया हा आलम्बन विभाव आहे आणि त्याला स्पर्श करून नायिका संयोगसौख्य भोगू पहाते.

एक नायिका आपल्या प्रियकराच्या चिंतनात इतकी निमग्न आहे की ती स्वतःलाच नायक समजू लागली आणि स्वतःच्याच रूपावर मोहित झाली. नायक तिच्या रूपावर ज्याप्रमाणे मोहित होईल तीच भूमिका ती स्वतः आरशात पाहून वठविते व मुग्ध होते.

'पिय के ध्यान गही गही, रही वही है नारि।
आपु आपुही आरसी, लखि रीझति रिझवारि॥५८३॥
आलिहि होई भृंगि ती-घे भ्रमराचा ध्यास
स्वयेंच रमणी रमण हो रमवी दर्पण भास —रसलीना॥५८३॥

उपर्युक्त उदाहरणांनीच बिहारींची रसज्ञता स्पष्ट होत असली तरी आणखी काही उदाहरणे देण्याचा मोह अनावर होतो.

वचन विनोद :—

बतरस लालच लाल की, मुरली धरी लुकाइ ।
सौंह करैं भौंहनु हँसै, दैन कहै नटि जाइ ॥४७२॥
'आतुर बोलायास ती, मुरलि ठेवि लपवून ।
शपथ घेत, भिवई हसे, नटत वळे मुरकून ॥
मला कशाला मागतां, असून अपुली चूक
असेल मेली कुठें तरी-मला नसे ठाऊक ॥रसलीना ४७२॥

गोचारण :—

उन हरकी हँसि कै इतै, इन सौंपी मुसकाइ ।
नैन मिले, मन मिलि गये, दोऊं मिलावत गाइ ॥१२८॥
गोधन घेउनि तो निघे चारावया वनांत ।
गाय आपुली घालते चतुरा ती कळपांत ॥
अडवी, हांसत सोंपवी, ती ही मुरकत मान ।
नैना नैन, मिनली मनें, सहज घडे गोदान ॥ रसलीना ॥१२८॥

नयन चातुरी :—

कहत, नटत, रीझत, खिझत, मिलत, खिलत, लजियात ।
भरे भौन में करत हैं । नैननु हीं सब बात ॥३२॥
नटुनी लाजत हासती, चिडति, खुलति, हो मेळ।
कळत न कळतां बोलती, रमति गमति किति वेळ॥
प्रीतीची दृगभाषणें-घेति परस्पर झेल।
लोकादेखत चालतो, हा डोळ्यांचा खेळ॥रसलीना॥३२॥

संयोगाच्या सात्विक कंपनाचे आणखी एक उदाहरण पहा :—

कियौ जु चिबुक उठाइ कै, कम्पित कर भरतार।
टेढी यै टेढी फिरति टेढैं तिलक लिलार॥५१८॥
धरूनि हनू कर कम्पिता लावी कुंकुमरेख।
दावित दिमाख वाकडा, मिरवी ललाटलेख॥रसलीना॥५१८॥

आता विप्रलंभात बिहारींची रसज्ञ कविप्रतिभा कशी प्रत्ययास येते हे पहाणे देखील उचित होईल. बिहारींनी विरहवर्णनांत करूणरसाचा स्वीकार विशेष केला नाही. त्यांनी पूर्वराग व प्रवास वर्णन यांचेच चित्र रेखाटले आहे. बिहारी फार सूज्ञ कवी होते. विरहवर्णनांत प्रवासाला त्यांनी फार महत्त्व दिलेले आहे याचे कारण प्रवासात विरहाला अनुकूल असा वाव मिळतो. पण बिहारीचे विरहवर्णन चमत्कारपूर्ण अतिशयोक्तिने भारलेले आहे. त्यामुळे वाचकांचे मन दिङ्मूढ होऊन जाते. इथे एक दोन उदाहरणे देऊन मी हे विवरण स्पष्ट करतो.

इत आवति चलि जाति उत, चली छ-सातक हाथ।
चढी हिंडौरे सैं रहै । लगी उसासनु साथ॥३१७॥
सातपावलें इकडुनि तिकडे, झुकता खाई झोल।
विरहकृशा ती श्वासकम्पिता, डुलतो तनुहिंदोल॥रसलीना॥३१७॥

नायिका विरहवेदनेमुळे इतकी अशक्त झाली आहे की, श्वास ओढतेवेळी सात-सहा पावले मागे ओढली जाते आणि सोडतेवेळी तेवढीच पुढे सरते. मागे पुढे जाणाऱ्या हिंदोळ्यासारखी तिची स्थिती झाली आहे.

अनुक्रमणिका

आडे दै आले बलन जाडे हूं की राति।
साहस ककै सनेह बस, सखी सबै ढिग जाति॥२८३॥

थंडीचे दिवस असले तरी ती ओलीच वस्त्रे नेसते तरी तिचा विरहदाह शमत नाही. तिच्या सख्या स्नेहवश तिला भेटायला आल्या तरी त्यांनाही विरह धग लागू नये म्हणून ओल्या वसनाच्या आडच रहावे लागते.

औंधाई सीसी सु लखि विरह बरनि बिललात।
बुचही सूखि गुलाबि गौं छींटौ छुई न गात॥२१७॥
विरहानल तिज पोळवी विकल दीन असहाय।
शमवायाते दाह तो केले शीत उपाय॥
गुलाबजल ते सिंचिता तळमळते ती काय।
शिवे न देहा थेंब ही, धगेच जळुनी जाय॥रसलीना॥२१७॥

“नायिकेचे शरीर विरहतापाने जळत आहे. तिच्या सख्या शीतोपचार करीत आहेत. गुलाबजलाची बाटलीच तिच्या अंगावर उलटी करतात पण त्यांचा एक थेंबही तिच्या देहापर्यंत पोचत नाही. विरहधगेने मधेच जळून जातो.”

याला कुठल्या प्रकारचा विप्रलंभ मानता येईल! —पण त्यांत वास्तव दर्शन व स्वाभाविक वर्णन मात्र झाले आहे.

‘करे के मीड़े कुसुम लौं, गई बिरह कुम्हिलाइ।
सदा समीपिनि-सखिनु हूँ, नीठि पिछानी जाइ॥५१६॥ सतसई
करि चुरल्या कुसुमापरी कोमजली विरहांत।
ओळखती न सख्या तिला, समीप असुनि घरांत॥ रसलीना॥५१६॥

“विरह वेदनेमुळे नायिकेची दशा चुरगळल्या, कोमेजल्या कुसुमासारखी झालेली आहे. तिच्या समीप सतत असणाऱ्या मैत्रिणी देखील तिला ओळखू शकत नाहीत.”

बिहारींनी विरहाला मीलनातच पूर्णत्व प्रदान केले हेच त्यांचे मोठे वैशिष्ट्य आहे.

‘बिछुरै जिये, सकोच इहिं, बोलत बनत न बैन।
दोऊ दौरि लगे हियैं, किये लजौं है नैन ॥५७८॥ सतसई
विरही, जगतांहि भेटती, संकोचें धरि मौन।
मौनमिठीच परस्परा, मारिति लज्जित नन ॥ रसलीना ॥५७८॥

परदेशांत गेलेला नायक जेव्हां आपल्या प्रियतमेला भेटतो तेव्हां प्रेमाधिक्यामुळे किंवा विरहांत आपण जगलो या जाणीवेने, दोघेही संकोचून मौन धरतात, लाजतात आणि मौनमिठीत निमग्न होतात. असे मनोहारी भावांचे सुंदर वर्णन बिहारीसारखा प्रतिभासंपन्न कवीच करू शकतो. जरी बिहीरींनी विरहवर्णनात

अतिशयोक्तीचा वापर केला असला तरी संयोगात प्रेमाच्या विभिन्न भावनांचा हृदयंगम संगम साधला आहे. मनोदशांच्या रमणीय छटांचे मनोहारी चित्रण डोळ्यासमोर उभे केले आहे.

"बिहारी सत्सईत" काही दोहे भक्तीभावनेवरही आधारित आहेत. पण बिहारी भक्तांप्रमाणे संसारातून विरक्त होऊन भगवंताची भक्ती करू शकले नाहीत आणि भगवतभक्ताप्रमाणे परमात्मा भेटीची व्याकुळताही त्यांच्या मनात उद्‌भवली नाही, म्हणून त्यांच्यावर कुठल्याही संप्रदायाचा आरोप लावता येणार नाही. भिन्न भिन्न संप्रदायवादाचा अस्विकार करताना ते म्हणतात. —

अपनें अपनें मत लगे वादि मचावत सौर।
ज्यौं त्यौं सबही सेइबो एक नन्दकिसोर॥५८१॥ सतसई
द्वैता द्वैत उपासना, भिन्न भिन्न सिद्धांत।
मतामतांचा गलबला दर्शनीय वेदांत॥
उपास्य दैवत वेगळे—पूजित भावफुलोर।
सर्वाभूतीं सारखा एकच नंदकिशोर॥ रसलीना ॥ ५८१॥

बिहारी इतर भक्तांप्रमाणे दीन भाव दर्शवीत नाहीत.

"करौ कुबत जग कुटिलता, तजौ न दीनदयाल।
दुखी होहुगे सरल हिय, बसत त्रिभंगीलाल॥४२५॥ सतसई
कपटी मी निंदा जगी होवो दीनदयाल।
सरल हृदयि वसणे तुम्हां कठिण त्रिभंगीलाल॥रसलीना॥४२५॥

"जग माझी निंदा करीत राहो, मी माझी कुटिलता सोडणार नाही कारण मी जर कुटिलता सोडली तर माझे हृदय सरळ बनेल.आणि तुम्ही तर त्रिभंगीलाल आहात. (तीन ठिकाणी वक्रता धारण केलेले). तेव्हा माझ्या सरळ हृदयांत वास करणे तुम्हाला अतिशय कठीण जाईल. त्यापेक्षा कुटिल रहाणेच योग्य नव्हे का? "

कबीराप्रमाणे बिहारींनीही ढोंगी भक्तावर कठोर प्रहार केले आहेत.

"जपमाला, छापैं, तिलक, सरै न एकौ कामु।
मन काँचे नाचै वृथा, साँचै राचै रामु॥१४१॥ सतसई
'वृथाच नाचे लेउनी गंध टिळा जपमाळ।
राम मिळेना दांभिका—भक्ता मिळे कृपाळ॥ रसलीना ॥ १४१ ॥

वस्तुतः बिहारी हे लहरी कवी होते. जे ज्यावेळी अंतःकरणात स्फुरले ते त्यांनी मनमोहक रीतीने काव्यातून अभिव्यक्त केले. ते जरी भक्त नसले तरी मनांत उन्मळून आलेल्या भावभावना त्यांनी निर्भयतेने शब्दात गुंफल्या. ते खऱ्या अर्थाने कलाकार कवी होते; आणि कलावंत कवी कुठल्याही एका संप्रदायाचा नसतो. त्याची दृष्टि सर्वत्र सौंदर्य हेरित असते. सत्यं शिवं सुंदरम् हा त्यांचा दंडक असतो.

सतसईवरील पूर्ववर्ती प्रभाव

कोणत्याही कवीवर त्याच्या पूर्ववर्ती कवींचा जसा प्रभाव पडतो तसाच समकालीन कवींचा देखील पडल्याशिवाय रहात नाही. म्हणूनच कुणाही कवीची, नितांत मौलिक कवी म्हणून गणना करणे कितपत उचित आहे, हे सांगणे कठिण आहे. मात्र व्यर्थच कीस काढणाऱ्या समीक्षकांची धिटाई वेगळी आहे.

कवीच्या मनोवृत्तीप्रमाणेच अनुकूल प्रतिकूल भावभावनेचे प्रभाव त्याच्या मनावर होत असतात आणि तो आपल्या प्रतिभेने ते संस्कारित करून, आपल्याला अनुरूप बनवून काव्यांत मांडतो. याला बिहारी तरी कसे अपवाद ठरतील! बिहारी आपल्या पूर्ववर्ती कवीच्या काव्यांतील भावानुभावाने प्रभावित झाले असले तरी त्यांनी त्यांचे अंधानुकरण मात्र केले नाही. त्यांनी भिन्न भावना संगोपित व संस्कारित करून आपल्या मनोभूमिकेनुसार त्यांना सुसंस्कृत रूप दिले व रसिकांना आपल्या काव्यांतून मनोहारी दर्शन घडविले. बिहारीचा प्रसिद्ध दोहा पहा—

'नहिं पराग नहिं मधुर मधु, नहिं विकासु इहि काल।
अली कली ही सौं बँध्यौ, आगैं कौन हवाल ॥४३॥
'नच होय विकास अजून पुरा, फुलले न पराग तिला पुरते।
रसकेसरिं ना मधुगंध भरे, उलली नच पाकळि कोष रिते॥
तरिही कलिकेवर भाळुनिया, अलि गुंजित फेर धरी भवती।
कामांध जना सुचते न दुजे, पुढती मग होइल काय गती ॥४३॥ रसलीना.

हाच भाव प्रकट करणारी गाथा—गाथासप्तशतीमधे मिळते

'जाव ण कोस विकासं पावइ ईसीस मालई कलिअ।
मअरन्द पाण लोहिल्ल मर तावच्चिअ मलेसि॥५-४४॥

याचाच संस्कृतानुवाद :—

यावन्न कोश विकासं प्राप्नोतीषं-मालती कलिका।
मकरन्दपानलोभयुक्त भ्रमर तावदेव मर्दयसि॥४•४४॥
'मधुमालतिची कळी कोवळी, ओलवि तिजसी ओस।
उलली नच रे पराग फुलले, भरला नच मधुकोष॥
मरंद प्याया होसि उताविळ, उचित न लंपट भ्रमरा।
चुरगाळुनि पाकळी निष्ठुरा, चुंबिसि नाजुक अधरा॥' शेफालिका॥४•४४॥

यांतील भाव असा आहे की "अजून मालती कलिकेच्या कोषात रस भरला नाही. पाकळ्यांची उमलही पुरती झाली नाही, तिचा पूर्ण विकास झालेला नाही तरीही मकरंदाचा आस्वाद घेण्यासाठी हपापलेल्या भ्रमरा! तिचे निर्दयपणाने तू मर्दन करतो आहेस."

एक दुसरा दोहा पहा :—

‘कंजनयनि मंजन किये बैठी ब्यौरति बार।
कच-अँगुरी बिच दीठि दै, चितवति नंदकुमार॥७८॥ सतसई
स्नात मंगला राधिका, कंजनयनिं भयभीत।
बसे उन्हांतच अंगणीं, घनकुंतल सुकवीत॥
करी बहाणा कामिनी, सारित कचसंभार।
करांगुलीतुनि पाहते, हळूंच नंदकुमार॥७८॥—**रसलीना**

याला मिळती जुळती सप्तशतीतील आर्या पहा.

चिकुरविसारणतिर्यक्नतकण्ठी विमुखवृत्तिरपि बाला।
त्वमपि मंगुलिकल्पित कचावकाशा विलोकयति॥२३१॥ आ.स.

केस सावरण्याच्या मिषाने आपली मान तिरपी करून नायिका अधोमुख अशी पाठ वाकवून बसली आहे; व केस सावरतांना हळूच बोटांच्या फटीतून नंदकुमाराकडे बघत आहे.’

एक असेच उदाहरण अमरूशतकातील उद्‌धृत करतो.

शून्यं वासगृहं विलोक्य शयनादुत्थाय किंचिच्छनै,
निद्राव्याजमुपागतस्य सुचिरं निर्वर्ण्य पत्युर्मुखम्।
विश्रब्धं परि चुंब्य जातपुलकामालोक्य गण्डस्थली,
लज्ञानम्रमुखी प्रियेण हसता बाला चिरं चुम्बिता॥८२॥

आता हाच भाव प्रगट करण्यात बिहारींचे कौशल्य पहा.

‘मैं मिसहा सो यौ समुझि मुहँ चुम्यौ ढिग जाइ।
हँसौ, खिस्यानी गल गह्यौ रही गरै लिपटाइ॥६४२॥ —सतसई
चुंबियलें मुख मी सखे, बघुनि लागली झोप।
हसले ते, मी लाजलें, पळांत जिरला कोप॥
मिस्किल ग किति बाइ ते—मला न कळला भास।
लाज लपविली मिठीत मी, गळ्यात ये करपाश॥६४२॥ —रसलीना

याप्रमाणे सतसईचे अनेक दोहे—गाथा सप्तशती, आर्या सप्तशती, अमरूशतक यातील मुक्तकांशी मिळते जुळते आहेत. परंतु बिहारींनी त्यांतील भाव आत्मसात करून आपल्या शैलीने अभिव्यक्ति केलेली आहे. या ठिकाणी आम्हाला अभिव्यक्तीच्या दृष्टीने बिहारींची श्रेष्ठता सिद्ध करायची नसून, बिहारींनी पूर्वसूरीपासून जे काही उचलले, ज्या भाव प्रभावाने त्यांना प्रेरित केले, त्याच भावना त्यांनी त्याच तोलाने व लालित्यपूर्ण पद्धतीने कशा सादर केल्या आहेत हे वाचकांच्या नजरेस आणून द्यावयाचे आहे.

अनुक्रमणिका

येथे समकालीन कवीसंबंधी चर्चा केल्यास अनावश्यक विस्तार वाढेल. बिहारी एक विलक्षण प्रतिभासंपन्न कवी होते, हेच आम्हाला येथे सुचवायचे आहे. प्रभावाची गोष्ट गौण असते. अभिव्यक्तीलाच कलेमध्ये खरे महत्त्व प्राप्त होते.

सतसईची छंद योजना

सतसई ही पूर्णपणे दोहा छंदात रचलेली आहे. श्रृंगारकालातील बहुतेक सर्व कवींनी, कवित्त, सवैय्या, घनाक्षरी छंदांचा आधार घेतला आहे आणि त्या सर्व कवींनी एक ना एक लक्षणग्रंथही लिहिला आहे. पण बिहारींनी कुठलाच लक्षणग्रंथ लिहिला नाही ; आणि दोह्याशिवाय इतर छंदांचा उपयोगही केला नाही. सतसईत एकदा सोरठ छंद दिसून येतो. पण तो अपवादात्मक म्हणावा लागेल. आणि तो छंदही दोह्याच्या निकटवर्ती आहे. मुक्तकात दोहा छंद सर्वांत लहान आकाराचा असतो. दोहा अर्ध-सम-मात्रिक आहे. पहिल्या आणि तिसऱ्या चरणात १३-१३ व दुसऱ्या व चवथ्या चरणांत ११-११ मात्रा असतात. अल्पाक्षरांत व्यापक अर्थाचे संयोजन करणे हे दोह्याचे वैशिष्ट्य असते. बिहारीसारखा रसज्ञ कवी या छंदात सराईतपणे लिहू शकतो. मग त्याला इतर छंदांचे काय होय! दोह्यात रूप, भाव, चेष्टितांचे समन्वित चित्र रेखाटण्याला कौशल्य लागते. बिहारींनी आपले सर्व सामर्थ्य दोह्यांच्या रचनेत ओतले आहे आणि प्रभावपूर्ण भावचित्रे रंगविण्यासाठी वस्तु-व्यापाराचीही चोखंदळपणे त्यांनी निवड केलेली आहे. आपल्या कलात्मक चेतनेसंबंधी रसिकांना बिहारींनी म्हटले आहे.

‘तंत्री,—नाद, कवित्त—रस, सरस राग, रति रंग।
अनबूडे, बूडे तिरे, जे बूडे सब अंग॥९४॥ —सतसई
सरस राग संगीत ते तंत्री नाद तरंग।
रसिता कविता कामिनी, अनुरागी रति रंग॥
पुनवेची रस कौमुदी, चंद्रकलेचा संग।
सर्वांगी बुडता तरे, बुडती न भिजता अंग॥९४॥ —रसलीना

कलेच्या दृष्टीने बिहारींच्या दोह्यात कसलीही उणीव दिसत नाही. कलात्मक सूक्ष्मता, भावात्मक पोत आणि चित्रमय व ध्वनिसंवर्धित भाषाविलास हा बिहारींचा खास विशेष आहे. त्यामुळेच बिहारी इतर कवींहून अनन्यसाधारण ठरले आहेत. ह्याच वैशिष्ठ्यांमुळे खालील दोहा सतसईसंबंधी लिहिला गेला असावा.

“सतसैय्या के दोहरे जनु नावक के तीर।
देखत कौ छोटे लगैं धाव करैं गंभीर॥

याचाच मराठी अनुवाद असा.

सतसईचे दोहरे, तीक्ष्ण विलक्षण बाण।
घाव करिति गंभीर ते दिसती जरी लहान॥ —श्री. बढे

अनुक्रमणिका

'ज्याप्रमाणे नळीतून सोडलेले बाण दिसण्यात लहान असले तरी घाव मात्र खोल करतात. तद्वतच सतसईचे दोहे लहान असले तरी आपली स्मृति अढळ ठेऊन जातात.' त्यांची ही किमया खालील एका उदाहरणावरून कळून येईल.

'दृग उरझत, टूटत कुटुम, जुरत चतुर—चित प्रीति।
परति गाँठि दुरजन हियैं, दई नई यह रीति॥३६३॥—सतसई
भेटति दृग, तुटत कुटुंब, चतुर चित्त जुळवीत।
दुर्जन हृदयी अढीं पडे-ही प्रीतीची रीत॥३६३॥—रसलीना

या इवल्याशा छंदात अनेक स्थितींचे वर्णन केलेले आहे. दोह्याचा आकार, परिवेषाची विलक्षणता व प्रेमाची व्यापक परिभाषा ही पाहण्यासारखी आहे. प्रेमात नेत्र गुंततात, पण कुटुंब तुटते (त्यांचा संबंध सुटतो) सरस हृदयांच्या प्रेमाने स्नेहगाठी जुळतात पण दुष्टांच्या हृदयात मात्र गाठ उठते. गुंतणारे एक आणि तुटणारे दुसरेच—एकाची स्नेहगाठ पडते तर दुसऱ्याच्या हृदयात अढी पडते—थोड्या व मोजक्या शद्बात केवढा मोठा आशय भरला गेला आहे पहा.

दोह्याच्या या वैशिष्ट्यासंबंधी 'रहीम' जी म्हणतात,

'दीरघ दोहा अरथ के आखर थोरे माहिं।
ज्यों रहीम नट कुंडली सिमिट कूद चढि जाहिं॥

अल्पाक्षरात व्यापक अर्थ सामावून घेणे हे शब्दसामर्थ्यांवर व दोहा छंदाच्या समाहार शक्तीवर अवलंबून आहे. बिहारीच्या दोह्यात हे शक्तिसामर्थ्य परिपूर्णतेने दिसून येते.

सतसईची भाषा

गोकुळातील गोरसावर पोसलेली आणि मनमोहन कृष्णाच्या लीलांनी अलंकृत झालेली ब्रजभाषा काव्याच्या एका विशाल युगाला समृद्ध आणि सरस बनवीत आहे. अवधचे महाकवि महात्मा तुलसीदासही ब्रिजभाषेचा मोह टाळू शकले नाहीत. सूरदास तर ब्रजभाषेचे रससिद्ध कवि आहेत. सूरदासांचे सर्वच साहित्य ब्रजभाषेचा गौरव वाढवीत आहे. भक्तिकालापासून श्रृंगारकालापर्यंत आणि आधुनिक युगाच्या प्रारंभापर्यंत काव्यसाहित्य प्रांतावर ब्रिज भाषेचे एकछत्री साम्राज्य विद्यमान होते. आम्हाला येथे बिहारीच्या भाषेवर विचार करावयाचा आहे. परंतु येथेही सूरपूर्वदेखील ब्रिजभाषेचे अस्तित्व अबाधित होते, हा संकेतही लक्षात घ्यायला हवा. पण त्याचे विवरण येथे विशेष महत्त्वाचे नाही. म्हणूनच अगोदर बिहारीच्या भाषेचा व रचनाशैलीचा स्तर विचारात घेतला पाहिजे.

बिहारी चित्रमयी भाषेचे कुशल कलावंत कवी आहेत. ध्वनि हा त्यांच्या कवितेचा प्राण आहे. त्यांना आपल्या शब्दशक्तीची पुरेपूर जाण होती. आणि शब्दगंधाचे ते पारखी होते. आणि म्हणूनच एवढ्याशा टीचभर दोहाछंदात संश्लिष्ट चित्र ते सहजतेने रंगवू शकले. हे एक चलचित्र निरखण्यासारखे आहे—

अनुक्रमणिका

"भौंह ऊंचे, आँचरु उलटि, मौरि मोरि मुँ हु, मोरि।
नीठि नीठि भीतर गई, दीठि दीठि सौं जोरि ॥२४२॥ —सतसई
भिवई उंचावनि बघे, मजसी सखि सानंद।
अंचल उडवुनि दाविते, त्रिवलि, उदर, कटिबंध॥
लचकत मुरडत मान, ती थबके क्षण दारांत।
दृष्टी दृष्टिस भेटवी, पाय निघेना आंत॥
हंसीचा घे डौलही, स्मित उमटे ओठांत।
लाउनिया चटका उरिं, वीज पळाली आंत॥२४२॥—**रसलीना**

'भिवई उंच करणे, बहाणा करून पदर हटविणे, मागे वळून पहाणे, नेत्रपल्लवी करणे व इच्छा नसताही पटकन घरात निघून जाणे, इत्यादि शब्दांच्या संयोगाने विविध भावयुक्त एक गतिशील चित्र एका फटकाऱ्यात निर्माण झाले आहे.

दुसरे एक स्थिरचित्रण पहा—

बतरस-लालच लालकी, मुरली धरी लुकाइ।
सोहँ करै सैहन हॅंभौं, दैन कहै, नटि जाँइ ॥४७२॥—सतसई

'या चित्रात रसिक नायिका आपल्या प्रियकराला अधिक वेळपर्यंत थांबवू इच्छित आहे. यासाठी व त्याने बोलावे म्हणून त्याची बासरी ती लपवून ठेवते. प्रियकर शपथ घेऊन ती मागतो, ती हसते, देते म्हणते, पण अखेर नकार दर्शविते.'

तसेच हे एक ध्वनिचित्र पहा—

रनित भृंग-घंटावली, झरति दान मधुनीरु॥
मंद मंद आवतु चल्यौ, कुंजर कुंज समीरु॥३८८॥—सतसई
—किणति भृंग घंटावली, गळत मधुर मकरंद।
वसंत कुंजसमीर हा कुंजर चाले मंद॥३८८॥—रसलीना

कवी वसंतऋतुच्या सुखद वायूचे वर्णन करीत ध्वनि संकेताने हत्तीचे चित्र डोळ्यासमोर उभे करितो.

व्रजभाषेत समास पद्धतीची अधिक संयोजना अशोभनीय वाटते. रूपसौंदर्य अथवा स्तुतीच्या संदर्भात कवीने समासपद्धतीच्या शब्दावलीचा प्रयोग केलेला आहे. ब्रिजभाषेला अनुरूप व अनुकूल अशा लहान लहान समासांचे काव्यात नियोजन करून त्यांनी भाषेला ओज आणले आणि अलंकृत करून तिचे वैभव वाढविले. त्यांच्या भाषेमुळे कधी गतिविरोध निर्माण झाला नाही किंवा अर्थबाधाही उप्तन्न झाली नाही. उलट ती अधिक अर्थसुलभ व सुंदर झाली.

'विकसित-नववल्ली-कुसुम-निकसित परिमल पाई॥१७५॥

वरीलप्रमाणे कुठेकुठे सामासिक शब्द आले आहेत पण त्यामुळे अर्थबोधाला अडथळा होत नाही. शब्द द्राक्षारसाप्रमाणे ओठावर सहज विरघळतात व अर्थ सुलभतेने कळतो.

'समरस-समर-सकोच-बस-बिबस-न ठिक ठहराइ॥५२७॥

लाक्षणिक शब्द विन्यासाचे उदाहरण पहा.

'ऑखिनु आँखि लगी रहै, आँखैं लागति नाहिं॥६२॥

बिहारींनी ब्रिज भाषेतील शब्दांखेरीज अरबी आणि फारसी शब्दांचा प्रयोग आपल्या काव्यात बराच केला आहे.

फारसी शब्द :— खूनी (दो. ३२५) खुस्याल (दो. ३२५) ताफता (दो. ७०) चसमा (दो. १४०-१५१) चौगान (दो. १७८) सिरताज (दो.४) छाहगीर (दो. २३१).

अशा प्रकारचे कित्येक शब्द दाखविता येतील.

अरबी शब्द :—इजाफा (दो. २) रकम (दो. २२०) हमामु (दो. २८१) हवाल (दो. ३८) मौज (दो. ८०) आदि. पण आज हे शब्द भाषेत रुढ झाले आहेत.

बिहारी सत्सईत चार शब्द असे आहेत की, त्या कालापर्यंत कुण्याही कवीने या शब्दांचा वापर केला नव्हता. आमिर (दो. २२०=अत्याचारी शासक) सबी (दो. ३४९=चित्र) अकस (दो. ४१९=दुष्मनी किंवा वैर) सबील (दो ६५४=उपाय) हे चारी शब्द अरबीच आहेत.

भाषेच्या संबंधी.—बिहारींनी शब्दांची तोडमोड करून, त्यांनी अत्याधिक प्रयोग केले असा त्यांच्यावर आरोप करण्यात येतो. पण हे सर्व त्यांना शब्द छंदात बसविण्यासाठी त्या अनुरोधाने करावे लागले, जसे स्मर साठी समर, ज्यौं-ज्यौ साठी जज्यौं, कै कै साठी ककै इत्यादि. पण हे दोष इतर साहित्यिक गुणांनी झाकले गेले आहेत.

बिहारीच्या भाषेचा शास्त्रीय दृष्टीने विचार केल्यास त्यासाठी एक स्वतंत्र व विस्तारपूर्वक ग्रंथच लिहावा लागेल. त्यांची भाषा साहित्यिक, वाक्यरचना डौलदार व व्यवस्थित आणि शब्दप्रयोग व्याकरणशुद्ध आहेत. वाक्यरचनेची सुयोग्य बांधणी आणि सांकेतिक शब्दप्रयोगाचे सौष्ठव त्यांच्या काव्यसंहितेत जागोजागी दृष्टीस पडते. या शिवाय प्रसंगानुरूप त्यांची भाषा शब्दांची निवड करून आपले स्वरूपही बदलत असते. शुद्ध व्रजभाषेचा प्रयोग फारच थोड्या कवींनी केला आहे. सूरदासांचीही शुद्ध व्रजभाषा नाही. बिहारींची भाषा कांही अंशी परिमार्जित व्रजभाषा म्हणता येईल. पण तिचे साहित्यिक स्वरूपच जास्त प्रभावी आहे.

श्रृंगारकालीन कविंमध्ये शुद्ध ब्रजभाषेचा फक्त "घनानंद" या कवीनेच आपल्या काव्यातून सुयोग्य उपयोग केलेला दिसतो. त्यांच्या भाषेतील सरसता गोकुळातील गोरसावरच पुष्ट झालेली आहे. "तुह कौन

सी पारी पढे हो लला, मन लेहु पैं देहु छँटा कब ही.' घनानंदाची ही निर्दोषता व भाषेची सफाई त्यांच्या संपूर्ण काव्यातून आढळून येईल.

आपल्या काव्याभिव्यक्तीला अनुकूल असलेल्या अवगत भाषांतील शब्दांचा बिहारींनी निःसंकोच वापर केलेला आहे. पण त्यामुळे भाषेचे माधुर्य वाढून तिला नाविन्यच प्राप्त झालेले दिसते. अरबी व फारसीतील शब्दांची उदाहरणे आपण पाहिली आहेतच. आता शेजारी प्रचलित असलेल्या भाषांच्या शब्दांचा त्यांनी कसा उपयोग केला ते आपण पाहू या. बिहारींनी अवधी (पूरबी) भाषेतील आपल्या भावाभिव्यक्तीला अनुकूल अशा शब्दांची निवड करून त्यांनी काव्य प्रवाहात समरस करून टाकले आहे.

'स्तन मन, नयन नितंब को बर्डी इजाफा कीन' किंवा
'पिय तिय सो हँसि कै कह्यौं, लखे दिठौना दीन'

येथे 'कोन' व "दोन" या शब्दांचा प्रयोग यमकासाठी केला आहे. कारण व्रजमध्ये 'कीन्हौं' वा 'कीनौं' 'दीन्हौं' वा 'दिनौं' असा शब्दप्रयोग केला जातो. मग या शब्द परिवर्तनामुळे बिहारींनी आपल्या शब्दमैत्रीला तडा लागू न देता भाषेची सरसता वृद्धिंगत केली आहे. कांही ठिकाणी 'कियौ' च्या ऐवजी 'किय' चा उपयोग पदपंक्तीत केलेला आढळतो जसे —

'मनु ससि सेखर की अकस, किय सेखर सत चंद।'

बुन्देलखंडी शब्दासाठी 'खंड बुंदेले बाल' योजणे पर्याप्त वाटेल. बिहारींच्या भाषेत 'लखबी' 'करबी' 'पायबी' इ. प्रयोग अधिकतर आढळतो. बुंदेलीतील 'स्यौ' या अव्ययाचा प्रयोगही त्यांनी बराच केला आहे. 'गीधे' 'बीधे' 'चाला' इ. शब्दांना त्यांनी भावनेनुरूप, वर्णवस्तुशी सुसंवादित केले आहे.

श्रृंगारकालातील बहुतेक सर्वच कवी शब्दसंगतीच्या बाबतीत बरेच चोखंदळ होते. अनुप्रासयुक्त रचनेचा त्यांना हव्यास होता. बिहारींनी अनुप्रासाबरोबरच अनुकूल ध्वनि निर्माण करण्यात सुयश मिळविले व तो प्रयोग त्यांनी फार सफलतेने केला.

सामर्थ्यशील कवी सुसंगत शद्बसंहितेची मांडणी कुशलतेने करतो. युक्त शद्बाची नवीन निर्मिती करतो, कारण भाषेची क्षमता सीमित असते. यासाठीच आपल्या भावाभिव्यक्तीसाठी कवीला अनेक साधनांचा उपयोग करावा लागतो. कधी कधी अभिव्यक्तीसाठी व भाषेला सक्षम बनविण्यासाठी कवीला नवीन शब्दांची निर्मितीही करावी लागते ; त्यामुळे पंडितांच्या व समीक्षकांच्या क्षोभालाही त्यास बळी पडावे लागते. बिहारी देखील याला अपवाद नव्हते.

अनुवादक आणि अनुवाद

महाकवी बिहारींच्या लोकप्रिय सत्सई या अमर काव्याचा छायानुवाद वा रसानुवाद आणि तोही त्याच दोहा छंदात गुंफणे, ही एक साहित्याच्या दृष्टीने गौरवपूर्ण घटना होय. बिहारींनी आपल्या या रचनेत जीवनाचे रहस्य लपविलेले नाही उलट ते उघडपणे मांडले आहे. हेच यातील गूढ तत्त्व आहे. आणि म्हणूनच सूज्ञ व रसज्ञ वाचक त्यांत रमतो व अमर्याद आनंदाचा अनुभव लुटतो. याच कारणांमुळे सतसई वारंवार वाचण्याची

इच्छा होते. सतसईवर बहुविध टीका रचल्या गेल्या त्याचेही हेच रहस्य होय. या काव्याच्या सुषमेनेच कविवर्य श्री. राजा बढे यांनाही अनुवादाकरिता प्रेरित केले असावे. या कार्याकरता कवीला किती आत्मचिंतन करावे लागले असेल व किती श्रम घ्यावे लागले असतील, याचे अनुमान करणे काही लोकांना सहज वाटेल, मी मात्र हे पाहून अतिशय विस्मित झालो आहे. खडीबोलीतील हिन्दी काव्याचा मराठी अनुवाद काही सीमेपर्यंत सरळ मानता येईल. पण बिहारींची ती साहित्यिक व्रजभाषा, जीत अनेक बोलीभाषेतील शब्द वेषांतर करून समरस झाले आहेत त्यांच्याशी एकरूप होऊन, समजून घेऊन छायानुवाद करणे, अत्यंत सामर्थ्यवान, प्रतिभासंपन्न कलावंत कवीच करू शकेल. त्यात पुन्हा ब्रजभाषा ही 'शौरसेनी' च्या निकटची तर मराठी प्राकृत भाषेच्या जवळची. असे असूनही मराठी भाषेतील श्री. बढे यांचा हा अनुवाद इतका स्वाभाविक, सरस, व यथार्थ वठला आहे की, वाचकाला सहसा मूळ काव्य व त्याचा अनुवाद यांतील अंतर जाणवणार नाही. सफल अनुवादाची हीच कसोटी होय अशी माझी धारणा आहे.

बिहारींची कला, चित्रविधान, ध्वनिसंचय आणि प्रेमप्रसंग इतके गुंतागुंतीचे आहेत की सहसा ते आत्मसात होत नाहीत—त्यासाठी मनाला एकाग्र करावे लागते. कविवर श्री. राजा बढे यांनी किती मनोयोगाने हे सर्व आत्मसात केले असेल आणि यथार्थ अभिव्यक्तीसाठी मराठी भाषेच्या मूळ प्रकृतीच्या मुशीत ओतून त्यांचा आविष्कार करण्यासाठी कशी गहन समाधी लावावी लागली असेल त्यांना. या त्यांच्या साधनेचा विचार करता मी केवळ चकित होतो. मती दिङ्मूढ होते.

भाषेची प्रकृति, शैली, शब्दगंध, अर्थबोध, भावतत्त्व व उच्चारणाची भिन्नता प्रत्येक भाषेत आढळते. म्हणूनच अनुवादकाला दोन्ही भाषांवर पूर्ण अधिकार प्राप्त झाल्याशिवाय एवढेच नव्हे तर त्यातील मर्म कळल्याशिवाय, सफल अनुवाद करणे शक्य नाही. श्री. बढेजींचा हिंदीवर केवळ स्वाभाविक अधिकारच नाही, तर त्यातील मर्म कळण्याची पूर्ण क्षमता त्यांच्या ठिकाणी आहे. ते मूलतः नागपूरनिवासी आहेत; आणि लहानपणापासून हिंदीच्या संपर्कात रहाण्याची त्यांना संधी मिळाली आहे. हिंदीचे प्रसिद्ध साहित्यकार त्यांचे घनिष्ठ मित्र आहेत. पद्‌मावतकार मलिक मोहम्मद जायसी पासून ते कविवर नरेन्द्र शर्मा यांच्या साहित्यावर अधिकारवाणीने चर्चा करण्याची क्षमता त्यांनी प्राप्त केली आहे. त्यांच्या हिंदी साहित्य अध्ययनाचे हेच प्रमाण होय.

मराठी साहित्याविषयी माझे ज्ञान त्यामानाने अल्पच म्हणता येईल. मराठी साहित्यावर साधिकार चर्चा करण्याची योग्यता मी अजूनपर्यंत अर्जित करू शकलो नसलो तरी मला काव्याची अतिशय ओढ असल्यामुळे, सरस रचनेतील मर्म मी जाणू शकतो. श्री. बढे यांच्या भावगीतांनी मला विशेषरीतीने आकर्षित केले. 'माझिया माहेरा जा, रे पाखरा' हे गीत मला अतिशय आवडले. असे वाटते की समग्र 'मेघदूत' एकवटून या भावगीतात ते पूर्ण सरसतेने बहरून उठले आहे. तेच शिल्प आणि तीच मनोभूमि, पण एक फार मोठे अंतरही दिसून येते. मेघदूतातील यक्ष विरहवेदनांनी एवढा व्याकुळ आहे की जड आणि चेतन यांतील ज्ञान त्याला होत नाही. तो जड मेघाद्वारे आपल्या प्रियेला संदेश पाठवीत आहे. पण भावगीताची भूमिकाच वेगळी आहे. त्याचा दूत जिवंत विहंग आहे. एक लाडकी लेक, जी आपल्या सासुरवाडीला आहे. ती एका पक्षाद्वारे आपल्या आईला निरोप धाडीत आहे. तिला एक वहिनी आहे आणि भाऊ पण. भारतीय संस्कृतीचे किती पवित्र चित्र या भावगीतात उमटले आहे. आणि त्यातील भावना किती हळूवारपणे हाताळल्या हे पाहण्यासारखे आहे. 'चांदणे शिंपीत जाशी' या त्यांच्या आणखी एका भावगीताचा मी निर्देश करतो. आणि तो यासाठी नव्हे की ते गीत मला आवडले, तर त्यातील निसर्गाचा कोमल स्वर मनाला छेडून जातो. आणखी एक आठवण ताजी आहे. ती आठवताच माझे मन आनंदाने भरून जाते. 'गेट वे ऑफ इंडिया' च्या

परिसरात उभारलेल्या शिवछत्रपतींच्या पुतळ्यासमोर कवि बढे रचित 'जय जय जय शिवराया' या गीताला हजारोंच्या जमावाने एका स्वरात प्रतिसाद दिला. तसे पाहिले तर 'शिवराय छत्रपती झाले' हे शिवछत्रपतींच्या राज्यारोहणाचे गीत कमी का यशदायी झाले?

या ग्रंथाच्या प्रस्तावनेच्या संदर्भात मी श्री. राजा बढे यांच्या निवासस्थानी गेलो. त्यांना खोदून खोदून प्रश्न विचारले तेव्हा मी अधिकच बेचैन झालो. मला कळले की या ६० वर्षांच्या बाल ब्रह्मचाऱ्याचें 'माझिया माहेरा जा', 'क्रांतिमाला', 'हसले मनि चांदणे' इ. काव्यसंग्रह आणि एक नाटक, 'अशी गंमत आहे' एवढेच प्रकाशित साहित्य आहे. मी मोठ्या गंभीरतेने त्यांना विचारले 'आणखी अप्रकाशित रचना किती आहेत?' त्यांनी हसत म्हटले 'पुष्कळ' आणि त्यांची मुखमुद्रा गंभीर अन् मौन झाली.

मी विचार करूं लागलो. या कलावंत कवीची एवढी थोर योग्यता असूनही मराठी साहित्यिकात ते इतके नजरेआड कसे राहिले? आजचे युग जाहिरातबाजीचे आहे पण या तपस्वी कवीने आत्मप्रचार व गटबाजीपासून स्वतःला अलिप्त ठेवले. स्वप्रसिद्धीसाठी त्यांनी काहीही प्रयत्न केले नाहीत, हेच त्याचे कारण असावे. तथापि मी हे विश्वासपूर्वक सांगू शकतो की जर श्री. बढे यांचे साहित्य अप्रकाशित व काळोखातच राहिले तर मराठी भाषिक रसिक वाचक एका सरस काव्याला वंचित होतील.

मी मोठ्या संकोचाने त्यांना विचारले. "आपण गृहस्थीजीवन कां स्वीकारलं नाही?" त्यावेळी त्यांच्या मुखावर स्वाभिमान प्रदीप्त झालेला दिसला. त्यांनी सांगितले 'मला या गोष्टीचा विचार करायला वेळच मिळाला नाही. कॉलेज जीवनातच अशी कौटुंबिक परिस्थिती निर्माण झाली की कुटुंबाची जबाबदारी माझ्या खांद्यावर येऊन पडली. मीच आपल्या कुटुंबात सज्ञान होतो. सारी भावंडे लहान होती. नंतर आपल्या अपंग धाकट्या बहिणीकडे संकेत करून ते म्हणाले—'ही ताईच आमच्या कुटुंबासाठी झिजली. तिचा त्याग फार मोठा आहे. तिच्यामुळेच सारी भावंडे लागी लागली. तिने आपले जीवनच कुटुंबाच्या चरितार्थाकरिता समर्पित केले आहे. तरीही आमच्या कुटुंबात जे आपण पहाल ते याच ताईच्या त्यागाचे आणि तपस्येचे फल आहे. बंधु द्विवेदी ती फार लाबंलचक कहाणी आहे आणि आपल्या या प्रस्तुत विषयाशी तिचा कांही संबंधही नाही.'

'आता एक अंतिम प्रश्न मी विचारू इच्छितो'. त्यांची मौन स्वीकृती पाहून मी विचारले, 'आपण हिंदी संबंधीचा आपला दृष्टिकोण सांगा, आणि बिहारी सतसईकडे आपण कसे काय आकर्षित झालात?' श्री. बढे यांना पान खाण्याची इच्छा झाली. त्यांनी पानाचे साहित्य जवळ ओढून म्हटले, 'आपण एक नाही दोन प्रश्न विचारले आहेत. मीही थोडक्यात उत्तर देतो. मला वाटते की हिंदीला दुर्वांची उपमा देणे अतिशय उचित होईल. ज्याप्रमाणे दुर्वा कितीही तुडविली जावो, तिला कितीही अवरोध येवो, ती सदा मुखरितच रहाते. हरळीचे मूळ अमर असते. तशीच हिंदी आहे. जितका ज्या प्रदेशाचा तिला अधिक विरोध झाला तशी ती जास्तच विकसित झाली आहे. तसे मी हिंदीला राष्ट्रभाषेच्या रूपात नव्हे, तर एका सरस व प्रगल्भ भाषेच्या रूपात ग्रहण केले. राजनीतीत द्यूताचे फासे कसे फेकले जातात हे आपण जाणताच.

आता राहिली बिहारी सतसईची गोष्ट. बिहारींबद्दल विद्यार्थीदशेत असतानाच मला ओढ लागली होती. त्याबद्दल माझ्या हिंदी स्नेही मित्रांकडून बरेच कळले होते. कळत न कळत, सतसईबद्दलचा माझा व्यासंग वाढला. तीवर मी इतका मुग्ध झालो की केव्हातरी याचा अनुवाद करावा ही इच्छा जागृत झाली. 'बिहारी रत्नाकर' ची जी प्रत मजजवळ आहे व आजपर्यंत ती मी जपून ठेवली आहे. ती मी माझ्या एका

अनुक्रमणिका

कॉलेज मित्राकडून लांबविली आहे. ही पहा माझ्या उशाशी नेहमीच असते." त्यांनी मला पुस्तक काढून दाखविले आणि आम्ही दोघेही खद्‌खदून हसूं लागलो.

या वयस्क कवीचे व्यक्तिमत्वही कमी आकर्षक नाही. गौरवर्ण, ऊंच शरीरयष्टी, विशाल, उन्नत ललाट, भूरी भिवई, रेखीव नासिका, गंभीर सलील नेत्र आणि झब्बा, धोतर व कोल्हापुरी चप्पल, हा त्यांचा साधा वेष. या सर्व वैशिष्ट्यांसह कविवर्य बढे, आपल्या मंदगतीने येताना दुरूनच ओळखू येतात. स्मितमुद्रा व विनोदी स्वभावामुळे नवीन पिढीतील लोकही त्यांचे मित्र बनले आहेत. त्यांचा दिवाणखाना पेशवेकालीन बैठकीची आठवण करून देतो व तीमधील मांडणीची कलापूर्ण रंगसंगती त्यांच्या सुरूची संपन्नतेची साक्ष पटविते.

तरुण वयातच 'बिहारी सतसई' मध्ये विहार करणाऱ्या या कवीने आपल्या जीवनाच्या उतरत्या काळात, पूर्वीचा संकल्प सिद्ध केला आहे. 'रसलीना' या नामाभिधानाने सतसईचा रसानुवाद त्यांनी रसिकांना सादर केला आहे. ही त्यांची तपस्या आणि कठोर परिश्रम पाहून मला आश्चर्य वाटले. सतसईच्या अनेक टीका झालेल्या आहेत, भविष्यातही कदाचित होतील, परंतु सुरम्य व सुललित अनुवादाचे पहिले श्रेय श्री. बढे यांच्या 'रसलीना' लाच मिळेल यामध्ये शंका नाही. अनुवादप्रधान टीकांची चर्चा झाली पण शुद्ध रसानुवाद आजवर कुठल्याच भाषेत झाला नाही. तो प्रथमच मराठी भाषेत करून श्री. बढे यांनी श्रेय तर संपादन केलेच पण मराठीचीही प्रतिष्ठा वाढविली आहे. त्यांचे हे उदाहरण भविष्यकाळात अन्य भाषीय साहित्यिकांनाही प्रेरित करील असा विश्वास वाटतो.

भाषात्मक संयोजनात बहुतेक तथाकथित मठाधीशांच्या मुखांतून ऐकायला मिळते साहित्यिक देवीघेवी मुळे, मराठीतील श्रेष्ठ साहित्याचे हिंदीत व हिंदीतील श्रेष्ठ साहित्याचे मराठीत अनुवाद व्हायला पाहिजेत. परंतु असे रचनात्मक कार्य करायला सरसावणारा फारच विरळा. मराठीचे सुप्रसिद्ध कवी श्री. राजा बढे यांनी कठोर परिश्रमाने ही उक्ती केवळ साकारच केली नाही तर एक आदर्शही प्रस्थापित केला. अन् एक आव्हानही दिले आहे. जेव्हा हिन्दीतील कवी, कलावंत या दिशेने सक्रीय होतील तेव्हा या स्तुत्य प्रयत्नांचा वास्तविक गौरव होईल.

या रसानुवादातील काही वैशिष्ट्ये

'रसलीना' या शीर्षकाने अलंकृत होऊन 'बिहारी सतसई' मराठी साहित्यात अवतीर्ण होत आहे. आणि त्याबरोबरच दोहा छन्दही प्रथमच प्रयोगात येत आहे. 'रसलीना' दोहा छंदातच रचली गेली आहे.

दोहा छंद अर्धसममात्रिक छंद आहे. 'रसलीना' तील हा दोहा छन्द पहा:

।	।	ऽ	ऽ	।	।	ऽ	।	ऽ		।	।	ऽ	ऽ	।	।	ऽ	।		
भ	व	बा	धा	ह	रि	रा	धि	के	।	छ	बि	छा	या	अ	भि	रा	म	।	
।	।	ऽ	ऽ	।	।	ऽ	।	ऽ		ऽ	।	।	।	।	।	।	ऽ	।	
त	नु	कां	ती	प्र	ति	बि	म्ब	ता	।	हो	य	ह	रि	त	घुं	ति	शा	म	॥

अनुक्रमणिका

या छंद रचनेतही प्रथम आणि तृतिय चरणात १३ मात्रा असून द्वितीय व चतुर्थ चरणात ११ मात्रा आहेत. तसेच दोहा छंदात जी भावाची घडण, रंगीन शब्दरचनेचे लालित्य व कंपनांच्या अभिव्यक्तिचे औचित्य, जसे सतसईत आहे—तेच 'रसलीना' च्या दोह्यातून ओतप्रोत विद्यमान आहे. बिहरींनी ज्या साक्षेपाने रचना केली आहे त्या साक्षेपाशी हा कवीही समरस झालेला आहे, याचा प्रत्यय येतो. श्री. बढे यांचे हे असाधारण कौशल्य आहे आणि याच सायुज्यतेमुळे ते सतसईचा अनुपम अनुवाद करण्यास समर्थ झाले आहेत.

गद्य साहित्याचा अनुवाद अपेक्षाकृत सरळ होऊ शकतो. परंतु काव्यात भावभावनांची गुंतागुंत व कल्पनेची भरारी असते, म्हणूनच बिम्बविधान करणाऱ्या शब्दांचा अनुवाद करणे फार कठीण असते. मी येथे एक उदाहरण देऊन 'रसलीना' काव्य छायानुवाद व सफल छायानुवाद कसा आहे हे सिद्ध करू इच्छितो.

प्रथम बिहारींचा दोहा घेऊ.

'औंधाई सीसी सुलाखे, बिरह बरनि बिललात।
बीचहि सूखि गुलाब गौ छीटौं छुई न गात॥२१७॥ सतसई

श्री. बढेजींचा अनुवाद :

"विरहानल तिज पोळवी, विकल दीन असहाय!!
शमवायाते दाह तो केले, शीत उपाय ॥२१७॥—रसलीना

जर हा अनुवाद केवळ भावानुवाद असता तर याचे रूप कांही आगळेच झाले असते. आणि येथेच बिहारीच्या चमत्कारपूर्ण अतिशयोक्तीचा आश्रय घ्यावा लागला असता. पण अनुवादक प्रथम दोह्यांचा संदर्भ देऊन आपल्या वाचकांना सचेत करतो आणि अतिशयोक्त चमत्कारापासून तो अलिप्त रहातो. 'रसलीना' च्या रचनेत भावांचे संतुलन तर झाले आहेच पण अर्थगौरवही समर्थपणे सांभाळला आहे. मला हे अत्यंत स्वाभाविक वाटते. कारण बिहारीने राजमहालात व राजे रजवाड्यांच्या सान्निध्यात जे सौख्य उपभोगिले, जी चैन केली, विलासी जीवनाचे नाना रंग ढंग अवलोकन केले, ते या विसाव्या शतकात कुठून आढळणार ? श्री. बढे हे नावाने राजा असले तरी ते आपल्या मानसिक साम्राज्याचे. श्री. राजा बढे हे विसाव्या शतकांतील जागृत कवी आहेत. त्यामुळे त्यांच्या अभिव्यक्तीत असा फरक पडणे माझ्या दृष्टीने अगदी स्वाभाविक वाटते.

बिहारीचे सतसईतील श्रृंगारिक दोहे हे नायिकाभेदावर रचलेले आहेत. "सतसई" हे कांही एक सलग सुसंगत कथाकाव्य नव्हे की ज्यात वर्ण्यवस्तूचा प्रसंगानुरूप कलाविकास साधला आहे. त्यांतील प्रत्येक दोह्याची पार्श्वभूमि वेगवेगळी आहे. ती जर वाचकाला अवगत झाली नाही तर त्यातील अर्थ समजूनही रसास्वाद घेण्याचा आनंद त्यास उपभोगता येणार नाही. श्री. बढे यांनी सतसईवर रचलेल्या अनेक टीकाग्रंथाचे, व्यासंगी व मर्मग्राही परिशीलन करून, प्रत्येक दोह्यातील नायिकेची परिस्थिती, प्रसंग व भाव भावना जाणून घेतल्या आहेत व प्रत्येक दोह्याची पार्श्वभूमी गद्यात कथन केली आहे हे या अनुवादाचे आगळे वैशिष्ट्य होय. यामुळे प्रियकरावर अनुरक्त झालेली पूर्वानुरागिणी, सुरतामुळे गर्वित झालेली अंकुरितयौवना, मदिरापानाने धुंद झालेली मदालसा, विरहाने तळमळणारी, उत्कंठिता, विरहिणी इ.

अनुक्रमणिका

भिन्नभिन्न नायिकांचे—परिस्थिती सापेक्ष यथातथ्य केलेले भावदर्शन—ही सर्व रम्यचित्रणे त्यांच्या अनुवादात यथार्थतेन शद्वांकित केलेली आढळतात.

श्रृंगाररसाचा स्थायीभाव ‘रति’ होय. त्यामुळे या काव्यात जी श्रृंगार चेष्टिते विविध रूपांनी प्रगट होतात त्यांचे नेटके अर्थगर्भरूप रसानुवादात प्रतिबिंबित झालेले आढळते.

“चमकति चंचल नयन ते, विरल ओढणी आंत।
सुरसरिता जलि खेळते मीन युगुल मौनांत॥—रसलीना
ओठ हासती कोपता, पापणीत ये पाप।.
मुकामार हा मोहवी शापातही उःशाप॥
शिवे न अशिवा आसवे, शीवीत शीतल राग।
मिळती लोभी नैन ते दिठींत ये अनुराग॥४६८॥—रसलीना

बिहारींनी शब्दलालित्याने नायिकेच्या हावभावांचे व अंगविक्षेपांचे जे रमणीय क्रीडाचित्र रेखाटले आहे त्या सर्व मनोवृत्तीचे श्री. बढे यांनी, त्यातील सौंदर्य, नादमाधुर्य, तरल कोरीव संवेदना टिपून घेऊन कशा रेखीव व युक्त शब्दयोजनेने वर्णन केलेले आहे त्याचे प्रत्यंतर वरील काव्यपंक्तीत दिसून येईल.

बिहारींनी अनुप्रासयुक्त शब्दांची जशी योजना केली आहे तशीच श्री. बढे यांनी अर्थसधन चित्रमयी भाषेची रचना करून मूळ काव्यातील रसास्वाद मराठी रसिकासमोर ठेवला आहे. या रसानुवादात अशी अनेक खेळकर, खोडकर व सुरूचिर भावचित्रे रंगविली आहेत; ती वाचताना एक चलचित्रच रसिक वाचकांच्या मनःचक्षुपुढे उलगडले जाते. आणि त्यातील नादमाधुर्ययुक्त हळुवार शब्दलाघव मनाला भुरळ पाडते.

अनुरक्तांचा संयोग आणि वियोग या श्रृंगाररसाच्या नाण्याच्या दोन बाजू आहेत. बव्हंशी संयोगामुळे उत्तान श्रृंगार व वियोगात विप्रलंभ श्रृंगाराची गुंफण केली जाते. पण सतसईमध्ये संयोग वियोगाची सांगड मोठ्या नाविन्यपूर्ण व ललित शब्दबंधाने घातलेली दिसून येईल. त्यामुळे विरहव्याकुळ झालेल्या नायकाकडे चोरून टाकलेला दृष्टिक्षेप, ती मूक आमंत्रणे, नायिकांच्या मुखावरील भाव, नेत्रपल्लवी, कटिविभ्रम इ. अंगप्रत्यंगाच्या मनोवेधक श्रृंगारिक हालचाली व चेष्टिते विविध रूपांनी प्रगट होतात. त्यांचे नेटके अर्थगर्भ रूपनाट्य रसानुवादात प्रतिबिंबित झाले आहे. उदाहरणादाखल ४६८ ह्या दोह्याचा वरील अनुवाद पहा.

बिहारींनी शब्दलालित्याने नायिकेच्या अंगविक्षेपाचे केलेले भावरम्य क्रीडाचित्र अनुवादातही तेवढ्यात बहारीने वठविलेले दिसून येईल. मूळरचनेतील भावाविष्करण मराठीतील क्रियावाचक अनुयुक्त शब्दयोजना, नादमाधुर्य, रचनेचा तोल व तालातील तरल-संवेदना इत्यादींचा सुसंबद्ध मेळ घालून यथार्थ रसानुवाद केलेला आहे. तो परिपूर्णतेने यावा म्हणून उपरोक्त दोह्याचा थोडा विस्तारही केला आहे. त्यामुळे मनोभूमिका कळून ते चित्र ठसठशीतपणे रसिकासमोर उभे राहते.

तसेच बिहारींनी आपल्या दोह्यात जे वर्णन रेखाटले आहे त्याचा श्री. बढे यांनी कुठेही संक्षेप केला नाही की अपलाप केला नाही. तसेच कल्पनांची भर वा भेसळ करून अवास्तव विस्तारही केला नाही. असे

करण्यात श्री. बढे यांनी दाखविलेला संयम व मर्मग्राही दृष्टी जशी स्पृहणीय आहे, त्याचप्रमाणे मराठी शब्दशक्तीचा योग्य ठिकाणी अचूक उपयोग करून रचना करण्याचे त्यांचे आगळे तंत्रकौशल्यही दिसून येते.

कवी बिहारींनी आपल्या मुक्तकांना शीर्षके दिलेली नाहीत. परंतु श्री. बढे यांनी रसानुवादात प्रत्येक कणिका अगर मुक्तकाला ती दिलेली आहेत. जसे 'मीलन संकेत' 'गुंतागुंत' 'प्रेमसमेट' 'लाजरी धिटाई' 'नग्नदीप्ति' 'चुरचुरते सौंदर्य' 'तेच बाई ग तेच' वाकडीवाट, इत्यादी. त्यामुळे काव्यातील मध्यवर्ती कल्पनेचा वाचकांना जसा बोध होतो तसेच प्रत्येक मुक्तकाची पार्श्वभूमि दिल्यामुळे स्थल, काल, व प्रसंग परिस्थितीचेही ज्ञान होते व काव्याचा रसस्वाद घेण्यास वाचकांची मनोभूमिका तयार होते.

जसा एखादा कुशल चित्रकार आपल्या कुंचल्याने प्रतिमेतील हावभाव रंगसंगती साधून प्रगट करतो तद्‌वतच श्री. बढे यांनी या रसानुवादात शब्दगंध व वेचक नादमय शब्द संहितेने व अर्थमाधुर्याने विनटलेली चलचित्रे, स्थितिचित्रे व नाट्यचित्रेही रंगविली आहेत. आंगिक हावभावाच्या व विभ्रमाच्या बारीकसारिक मनोरम छटा दाखविणारी भावचित्रेही या अनुवादात दिसून येतील. यातील वानगीदाखल काही उदाहरणे पहा.

कुंतल बंध :—

पीत गौर पाठीवरी, सुटले केस मुलाम।
सुटते चित्त जगांतुनी सुटते जीवित काम॥
बांधित विंचरूनी जई, मावे नच आनंद।
नजर बांधतो नीलिमा-कुंतल वेणी बंध ॥५७३॥—रसलीना
"छुटे छुटावत जगत तै, सटकारे, सुकुमार'
मनु बाँधत बेनी-बँधे नील, छबीले बार" ॥५७३॥—सतसई

नटपुतळी :—

सुंदर तनु ती रंगभू, नायक चतुर अनंग।
नटपुतळी नयनांतली, शिकवी नवरसरंग॥
मृदंग नर्तनि रंगवी, पारंगत रसभाव।
नयनलास्य गति चंचला, अनंत ललित विभाव॥२८४॥—रसलीना
"सब ॲग करि राखी सुधर नाइक नेह सिंखाइ।
सजुत लेति अनंत गति पुतरी पातुर-राइ॥२८४॥—सतसई

मदनाचे विंधान :—

पीत गौर उरु गौरवी, लुशित कांति वरदान।
पृथल जघनयुग गोजिरें, मदनाचे विंधान॥
नवतीचे लावण्य ते, झुरती कदलीकंद।

अनुक्रमणिका

पाहुनिया तरुणा जना, गुप्त होय आनंद॥२१०॥ रसलीना
"जंघ जुगुल लोइन निरे, करे मनौ विधि मैन।
केलि-तरुनु दुख दैन ए, केलि तरुन-सुख दैन" ॥२१०॥—सतसई

मिताक्षरी :—

हृदय पत्रिके वरी कोरिला, अलक्ष प्रीतिलेख।
विरह आंच लागतां दिसे, मिताक्षरांत सुरेख॥४५७॥—रसलीना
छतौ नेहु कागर हियै, भई लखाइ न टाँकु।
विरह-तचै उघऱ्यौ सु अब सेंहुड कैसौ आँकु॥—सतसई

पदन्यास :—

मंद मंद पदमंजिरी, रुणुंझुणुं पायल बोल।
पायघडी पसरीत, ये अरुण रंग हिंदोल।
उचलुनि टाकित चालता, एक एक पाऊल।
बंधुजीव फुलवी फुले, ठायिं ठायि अनुकूल॥४९०॥ —रसलीना
पग पग मग अगसन परत चरन-अरुन दुति झूलि।
ठौर ठौर लखियत उठे दुपहरिया से फूलि॥४९०॥—सतसई

घायाळ शिकारी :—

लोचन सायक हे सखे, करिति विषम संचार।
शिकार हो घायाळ ती, शिकारीहि बेजार॥३५०॥—रसलीना
'अलि, इन लोइन-सरनु, कौ खरौ विषम संचारु।
लगैं लगाएँ एक से, दुहुँनु करत सुमारु॥४५०॥—सतसई

नेत्रविलोक :—

दीठी दीठ ती भेटता, वर्षत अमृत अंश।
विरहीं आठव देइ ग, सहस्त्र वृश्चिक दंश॥६१५॥—रसलीना
'जे तब होत दिखादिखी भई अमी इक आँक।
दगैं तिरीछी डीठि अब, ह्वै बीछी कौ डाँक॥६१५॥—सतसई

लाज लगाम :—

लाज लगाम न मानिती, करिती खेंचाखेंच।
मुजोर नयन तुरंग हे, ओढ घेति तिकडेच॥६१०॥—रसलीना
'लाज लगाम न मानहीं, नैना मो बस नाहिं।

अनुक्रमणिका

ए मुँहजोर तुरंग ज्यौं, ऐंचते हूं चलि जांहिं॥६१०॥—सतसई

नको, नकोऽ न ऽः—

भिवई भिववित वाकडी, वदनी 'ऊंहूं ऊंहूं' बोल।
डोळे भिडवित, ओढता हात देतसे झोल॥
येत जवळ ती हळू हळूं, सोडविता मणिबंध।
'मला न अवडे, जा नको, भलता सलता छंद'॥६८३॥—रसलीना
भौंहनु त्रासति, मुँह नटति, आँखिनु सौ लपटाति।
ऐंचि छुडावति करु, दूँची आगै आवति जाति॥६८३॥—सतसई

अचानक भेट :—

एकटीच वटविटपीं भटकत, बिकट वाटिका दाट।
निकट किती तरि कळे न कांही भूल भुलावण वाट।
लटकत वटपारंबी गुंतवि बेली विटप लपेट।
झुकत झळकतो मुकुट, सावरित नटवर देई भेट॥१६२॥—रसलीना
'लटकि लटकि लटकतु चलतु, डटतु मुकुट की छाँह।
चटक-भऱ्यौ नटु मिलि गयौ, अटक भटक-बट माँह॥१६२॥—सतसई

अशी कितीतरी उदाहरणे या रसलीनामधून देता येतील. पण तो मोह मी आवरता घेतो. श्री. बढे यांनी बिहारीच्या सतसईचा, त्यांच्या परिमार्जित व्रजभाषेचा 'रसलीना' हा रसानुवाद मराठी भाषेत केलेला आहे. त्या भाषेतील नैन (नयन), रैन (रात्र) पैन, उलहना, बनवारी सुनमुन, चुनरी आदि शब्दांचा प्रयोगही त्यांनी आपल्या काव्यांत केलेला आहे. पण हे शब्द आता सर्वत्र परिचित आहेत. अभिजात संगीत गायनाच्या चीजांमधून हे शब्द आलेले आहेत एवढेच नव्हे तर मराठी लावणी वाङ्मयातही या शब्दांचा बराच वापर झालेला आहे. तेव्हा या शब्दांच्या योजनेमुळे सुविद्य वाचकाला रसास्वाद घेण्यास मुळीच अडथळा येणार नाही याची खात्री वाटते. उलट या शब्दयोजनेमुळे भाषेची रसवत्ता, जडणघडण व सौंदर्य वाढलेलेच दिसून येईल.

श्री. राजाभाऊ बढे यांनी सतसईचा 'रसलीना' नामक जो रसानुवाद केला आहे, त्याचे माझ्या अल्पमतीप्रमाणे समीक्षण केले आहे. या रसानुवादाच्या काव्यरचनेचा पोत रसयुक्त शब्दगुंफेमुळे रेशमासारखा मृदुमुलायम झालेला आहे. त्याचप्रमाणे विविध अर्थालंकारामुळे त्याचे अंग भर्जरी व लालित्यपूर्ण व आशयघन शैलीमुळे गर्भश्रीमंती थाटाचे झाले आहे. बिहारी कवींनी शब्दांची जी आतषबाजी केली, तोच शब्दविन्यास व अर्थलाघव श्री. बढे यांनी रसानुवादात प्रगट केल्याचा आढळ वाचकांना येईल.

श्री. बढे यांच्या शब्दांना मोत्यांचे तेज आहे तर अर्थगर्भ रचनेत चंद्रज्योतीचे सौंदर्य आहे. या रचनेत सहजस्फूर्त लयबद्धता येऊन, लय व ताल यांच्या तरल संवेदनांचा प्रत्यय येतो. त्याचप्रमाणे कलासंपन्न साहित्यस्पंदने जागृत करण्याचे विलोभनीय वैशिष्ट्य या अनुवादात प्रतीत होते. ज्याप्रमाणे बिहारीची

सतसई अनेकवेळा वाचूनही वाचकांची तृष्णा शमत नाही, त्याचप्रमाणे 'रसलीना' चा आस्वाद घेतानाही रसिकांना अनुभव येईल असा मला विश्वास वाटतो.

सरतेशेवटी महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक मंडळाने, मला प्रस्तावना लिहावयाला सांगून माझा जो गौरव केला, त्याबद्दल सांस्कृतिक मंडळाचा मी अतिशय ऋणी आहे. मंडळाचे मी मनःपूर्वक आभार मानतो. बिहारी काव्याचे समीक्षण करणाऱ्या लेखकांचाही मी अत्यंत आभारी आहे.

मूळ हिंदी प्रस्तावना लेखक

श्री. श्रीनाथ द्विवेदी

मराठी अनुवाद

श्री. राजदेरकर, गं. द.

अनुक्रमणिका

रसलीना

१ **मेरी भव-बाधा हरौ राधा नागरि सोइ।**
जा तन की झाँई परै स्यामु हरित-दुति होइ॥१॥

राधास्तुति

या सप्तशतीचा संकल्प सिद्ध व्हावा म्हणून महाकवि बिहारी, राधाकृष्णाची मंगलभावे प्रार्थना करतो. या सप्तशतीतून, राधामाधव लीलारसश्रृंगारच विशेषत्वानें ग्रथित केला आहे. स्वकुल सांप्रदायाप्रमाणे राधिकेलाच अग्रेसरत्व देऊन स्तुती करीत आहे, "हे राधिके, मला या भवबाधेतून मुक्त कर. तुझ्या सुंदर देहाची पीतगौर आभा अंगावर पडताच नीलकलेवर शामदेखील हरित होतो. तसेच माझे कष्मल म्हणजे पाप तुझ्या द्युतीने हरित कर."

भवबाधा हरि राधिके, छबि छाया अभिराम।
तनुकांति प्रतिबिंबिता, होय हरितद्युति शाम॥१॥

* *

२ **अपने अँग के जानि कै जोबन-नृपति प्रबीन।**
स्तन, मन, नैन, नितंब को बडौ इजाफा कीन ॥२॥

यौवन उदारता

मुग्धेचा यौवनविकास पाहून, मोहित झालेला नायक स्वतःशीच म्हणतो, "हा यौवननृपति उदार असला तरी आपपरभाव त्याच्या ठिकाणीही दिसून येतोच. आपल्या अंगचे जाणून, स्तन, मन, नयन व नितंब या कुटुंबियांना केवढा प्रदेश बहाल केला, ते बघा तरी."

जाणुनि अपुल्या अंगचे यौवननृपति उदार।
स्तन, मन, नयन, नितंब, या देत वतन विस्तार॥२॥

* *

३ **अर तैं टरत न बर-परे, दई मरक मनु मैन।**
होडा होडी बढि चले चितु, चतुराइ नैन॥३॥

यौवनागम

नवयौवना नायिकेच्या सौंदर्यविकासावर अनुरक्त झालेला नायक प्रशंसेने स्वगत म्हणतो, "यौवनागमामुळं, हिच्या सौंदर्यदेहांतून उत्साह कसा ओसंडतो आहे. चित्त, चातुर्य व डोळे यांनी जणु हटवाद धरला आहे. पैज लावली आहे की, मदनाची मर्जी कुणावर अधिक दिसून येते. आणि अधिक उन्माद कुणाला दिलेला आहे याचे प्रात्यक्षिकच ते करीत आहेत."

चित्त चातुरी लाविती पैज नयन हटवाद।
अधिक कुणातें गौरवी मदन चढवि उन्माद॥३॥

* *

अनुक्रमणिका

४ **औरै-ओप कनीनिकनु गनी घनी-सिरताज।**
मनीं धनी के नेह की बनीं छनीं पट लाज॥४॥

वशीकरण

नवयौवना नायिकेच्या नयनांचे व त्यांतील उज्वल तेजांचे, सखी कौतुक करीत तिला उत्साहित करते, "अग तुझ्या डोळ्यांतील तेजाचं स्नेहाकर्षण कांही वेगळंच आहे. पापणीच्या पडद्याआड लपलेल्या कनीनिका म्हणजे प्रियकराला आकर्षित करणारे वशीकरण मणीचं आहेतसं वाटतं."

झळक आगळी लोचनां कनीनिकेचे वेज।
लाज लपविते पापणी, वशीकरण-मणि तेज॥४॥

* *

५ **सनि-कज्जल चख-झख-लगन उपजौ सुदिन सनेंहु।**
क्यौं न नृपति है भोगवै लहि सुदेसु सबु देहु॥५॥

मीनेचा शनी

"सखे, तुझ्या काजळ लावलेल्या काळ्याभोर डोळ्यांत जणु शनी आणि मीन या दोन ग्रहराशींची युतीच झालेली दिसते. डोळेभेटीत मीनेचा शनी, प्रेम उदित करून, हृदयावर अधिकार गाजवतो असं भविष्य सांगतं."

काजळ कलित लोचनीं, शनी मीन युति चार।
स्नेह उदित दृग मीलनीं, ये तनुवरि अधिकार॥५॥

* *

६ **सालती है नटसाल सी, क्यौं हूँ निकसति नाँहि।**
मनमथ-नेजा-नोक सी खुभीखुभी जिय माँहि॥६॥

कर्णशल्य

नायिकेच्या कानांतील कुंडलावर भाळलेला नायक, मोठ्या चतुराईनं दूतीला तिची भेट करून द्यायला सुचवितो. "तिच्या कानांतील कुंडल, कामदेवाच्या भालशूलाप्रमाणं माझ्या हृदयांत सारखे सलत आहेत."

मदन भालफल शल्य तें कर्ण विभूषित डूल।
सलतो सल तो या उरीं निघे न निघतां शूल॥६॥

* *

७ **जुवति जोन्ह मैं मिलि गई, नैंक न होति लखाइ।**
सौंधे कै डोरैं लगी अली चली सँग जाइ॥७॥

अनुक्रमणिका

यौवन चंद्रिका

शुक्लाभिसारिकासौंदर्य सुगंधाची महती तिच्या सख्या गात आहेत, “त्या युवतीची गौरतनुकांती चांदण्यात इतकी एकजीव झाली आहे की ती वेगळी म्हणून दिसतच नाही. तिच्या अंगसुगंधाला भाळून, तिची भृंग सखी मागोमाग जाताना दिसते, म्हणूनच तिचं अस्तित्व कळून येतं.”

दिसे न यौवन चंद्रिका, चांदण्यात सित अंग।
गंधरेणुं वलयासवें, जाय अली तिज संग॥७॥

* *

८ **हौं रीझी, लखि रीझि हौ छबिहिं छबीले लाल।**
सोनजुही सी होति, दुति-मिलत मालती माल॥८॥

सुवर्णा

दूती नायिकेच्या अंगकांतीचं वर्णन करून नायकाची मिलनोत्कंठा जागविते. “मी तर बाई तिच्यावर अगदी मोहून गेले. तिच्या सुवर्ण कांतीमुळं गळ्यातील मालती माळ ही सोनजुई सारखी भासते.”

पीत गौर तनुकांतिनें मोहित मी ब्रिजलाल।
सोनजुई परी भासते गळां मालती माळ॥८॥

* *

९ **बहके, सब जिय की कहत, ठौरु कुठौरु लखैं न।**
छिन औरै, छिन और से, ए छबि-छाके नैन॥९॥

मत्तलोचना

दूती नायिकेला सांगते, “तूं आपले प्रेमोन्मत्त डोळे नीट सांभाळ बरं, लोक काय म्हणतील याचा नीट विचार कर.” त्यावर ती म्हणते, “मी काय करूं ग, रूप वारुणी पिऊन हे मेले इतके धुंद झाले आहेत, की मनांत असेल नसेल ते सारखे बरळत असतात. काळ वेळ देखील बघत नाहींत.”

रूप वारुणी प्राशितां, धुंद जाहले नैन।
काळ वेळ ना पाहती सांगति, मन बेचैन॥९॥

* *

१० **फिरि फिरि चितु उत हीं रहतु, टटी लाज की लाव।**
अंग-अंग-छबि-झौंर मैं भयौ भौंर की नाव॥१०॥

कांतिविवर्त

पूर्वानुरागिणी नायिका आपल्या सखीला आपली स्नेहदशा सांगते. “सखे, प्रियकराच्या अंगकांतिवलयाच्या भोवऱ्यांत सांपडलेल्या नावेसारखी माझी स्थिती झाली आहे. लज्जेचा दोर तुटल्यामुळं, माझी मानसनौका या कांतिविवर्तांत गिरक्या घेत आहे.

लाज सुटे, मन भोवतीं फिरे, चित्त घे धांव।
कांति विवर्ती सांपडे शीडाविण ही नाव॥१०॥

* *

११ **नीकी दई अनाकनी, फीकी परी गुहारि।**
तज्यौ मनौ तारन-बिरदु बारक तारि॥११॥

गजेंद्रतारक

भक्ताची उपरोधिक मागणी, “हे गजेंद्रतारक प्रभो, माझी करुण हांक तुझ्या कानीं नाही का आली! की गजेंद्रतारक हे आपले ब्रीदच तूं पार विसरलास !”

ऐकतांहि नच ऐकिली, कानीं पडे न हांक।
‘गजेंद्रतारक’ बिरुद हें सोडिलीस का भाक॥११॥

* *

१२ **चितई ललचौंहैं चखनु डटि घुँघट-पट माँह।**
छल सौं चली छुवाइ कै छिनकु छबीली छाँह॥१२॥

छायास्पर्श

त्याला बघताच नायिकेने केलेले प्रेमदर्शक हावभाव व चेष्टिते पाहून नायक मुग्ध झाला. तो स्वगत म्हणतो, “ओढणी बाजूला सारून तिनं धीटपणानं डोळ्याला डोळा भिडवला. आणि लालस नजरेनं माझ्याकडे पाहिलं, आणि क्षणांत माझ्या पावलावर आपली पडछाया पाडून, वंदन करून ती निघून गेली.”

पदर सारुनी पाहती लोचन लालस धीट।
जातां स्पर्शित पाउलें पडछायेनें नीट॥१२॥

* *

१३ **जोग-जुगति सिखए सबै मनौ महामुनि मैन।**
चाहत पिय-अद्वैतता काननु सेवत नैन॥१३॥

नयनपरिहास

नवयौवना मुग्धेचे सौंदर्य व डोळ्यातील चमक पाहून, सख्या तिचा परिहास करतात. “हे तुझे नयन, योगी बनून काननचारी झाले आहेत. मदनरूपी महामुनीकडून त्यांना गुरुमंत्र मिळालेला दिसतो. त्यामुळे प्रीतिची सायुज्यता, समाधि अद्वैती तपप्रयोग त्यांना अवगत झालेले आहेत.”

अनुक्रमणिका

कानन चारी जाणती नयन, महामुनि योग।
अद्वैती सायुज्यता साधित प्रीति प्रयोग॥१३॥

*   *

१४ **खरी पातरी कान की, कौन बहाऊ बानि।**
आक-कली न रली करै अली, अली, जिय जानि॥१४॥

कर्णेजप

मध्या नायिकेला प्रियकर अन्यस्त्रीरत आहे हे कळतांच ती रागावते, सखी तिला समजाविते, "अग, तू कुणाच काय ऐकतेस! हे हलके कान फार घातक असतात. रसिक भ्रमर रुईच्या फुलावर कधी भाळेल का?"

उगाच संशय हा सखे घातक हलके कान।
भुले न मंदारा अली, करी न मिलिंद गान॥१४॥

*   *

१५ **पिय-बिछुरन कौ खुसह दुखु, हरषु जात त्यौसार।**
दुरजोधन लौं देखियति तजत प्रान इहि बार॥१५॥

दुःखानंद

नायिका मुग्धा असताना, माहेरी जाताना विरह दुःख तिला विशेष जाणवत नसेल पण आता मध्या झाल्यावर व संसाराची चव कळल्यानंतर माहेरी जाताना आनंदाबरोबर वियोग दुःखही जाणवतं, एकाच वेळी हर्ष व खेद मनात उद्‌भवतात. या तिच्या दोलाचल मनस्थितीचं सखी वर्णन करते. "माहेरी जाताना तिच्या डोळ्यात आसूं व ओठांत हासूं उमटले आहेत, आनंद व दुःखाची समा साधली आहे. दुर्योधनाच्या प्राण त्यागाच्या वेळची स्थितीच ती अनुभविते."

सुखदुःखाच्या मीलनीं विकल होति असहाय।
सुयोधनासह प्राण हे जातां निश्चल काय॥१५॥

*   *

१६ **झीनैं पट मैं झुलमुली झलकति ओप अपार।**
सुरतरू की मनु सिंधु मैं लसति सपल्लव डार॥१६॥

विरल वसना

विरल वसनांतून फुटून बाहेर पडणारी नायिकेची तनुकांती पाहून मोहित झालेला नायक स्वगत म्हणतो, "या श्वेत विरल वसनांतून हिची सुंदर देहकांति परावर्तित होऊन विलसते आहे. जणुं काय कल्पवृक्षाची डहाळच सपल्लव आकाशगंगेत जलक्रीडा करीत आहे."

विरल वसन तनुकांति ती, झिलमिल झळके अंग।

सुरतरु पल्लव डोलवी, मानस सिंधु तरंग॥१६॥

*   *

१७ **डारे ठोडी-गाड, गहि नैन-बटोही, मारि।**
चिलक-चौंध में रुप-ठग, हाँसी-फाँसी डारि॥१७॥

चिबुक-खळी

नायकाची दृष्टि तिच्या अंगांगावरून शोभा पहात फिरत असतां हनुवटीच्या खळीत कोसळली. शोभाधिक्यामुळें तिला तिथून निघावेसें वाटत नाहीं. डोळ्यांचा हा अपघात नायक स्वताच सांगतो. "या सौंदर्य ठगांनी आपल्या झलकीनं अंध करून या माझ्या भटक्या नयन वाटसरांना हनुवटीच्या खळीत दाबून आणि हास्याचा गळफास घालून लुटलं ते बिचारे त्या खळीतच पडून राहिले. बेहोशानं त्यांना बाहेरच निघता येईना."

चिबुक खळीतच सांपडे, नेत्रपथिक बेभान।
हास फांस घाली गळां, रूपचोर घे प्राण॥१७॥

*   *

१८ **कीनै हँ कोरिक जतन अब कहि काढै कौनु।**
मो मन मोहन-रुपु मिलि पानी मैं को लौनु॥१८॥

लावण्य-लवण

सखीची शिकवण ऐकून नायिका म्हणते, "सखे, मोहनाचं लावण्यरूप माझ्या मनीं मानसीं लवणासारखं मिसळून गेलं आहे. कितीही यत्न केला तरी पाण्यांतून लवणं वेगळं कसं काढतां येईल?"

मनमोहन लावण्य तें लवण मानसीं होय।
कसें ग राहिल वेगळें मीलनिं मिळतां तोय॥१८॥

*   *

१९ **लग्यो सुमनु ह्वै, है सफलु, आतप-रोसु निवारि।**
बारी, बारी आपनी सींचि सुह्रदयता-बारि॥१९॥

संदेशगोपन

नायक आज या ठिकाणी येणार, पण अजून आला नाहीं. वेळ टळल्यामुळं नाईका रुष्ट झाली. उद्वेगानं वाटिकेत ती भटकत आहे. तिच्या मैत्रिणी तिथे आहेत एवढ्यात दुती परत येऊन माळिणीला संबोधून म्हणते, "हे माळिणी, जलसिंचन करून ओलाव्यानं बाग टवटवीत राखलीस तर तुझी सुमनकामना सफल होईल व वाटिका फुलांनी बहरेल."

सुमन सफल हो कामना, वाटिकेतलें फल।
जलसिंचन करि माळिणी काल असें अनुकूल॥१९॥

अनुक्रमणिका

*　　　　*

२०　**अजौ तऱ्यौना हीं रह्यौ श्रुति सेवत इक-रंग।**
नाक-बास बेसरि लह्यौ बसि मुकुतनु कैं संग॥२०॥

बेसर

कवी नासिकेतील बेसरीचं वर्णन करताना सत्संगाची प्रशंसा करतो. "आजवर कानांच्या सहवासात राहून कुंडल अधोगतच राहिले. पण नाकाच्या सहवासानं बेसर मानधन बनली. ती नाकवासी झाली. नाक हे देहाचे भूषण, तयाचे सांन्निध्य म्हणजे बेसरीचा गौरवच म्हणायचा. श्रुतिवेदादी ऐकूनही मानवाची अधोगति टळली नाही. पण जीवनमुक्ताच्या सहवासाने अधमाचाही उद्धार झाला.

श्रुति भूषण ताटंक तें होय अधोगत मान।
नाकामधली चौफुली सहवासें घे मान॥२०॥

*　　　　*

२१　**जम-करि-मुँह-तर हरि पऱ्यौ, इहिं धर हरि चित लाउ।**
विषय-तृषा पारहरि अजौं नरहरि के गुन गाउं ॥२१॥

गुणधीर

कवीचे मनोगत; "यमरूपी हत्तीच्या पुढ्यात तूं पडलेला आहेस. वेड्या मना, त्या नरहरीचे स्मरण कर, विषयवासना सोड, तोच तुला या भवसागरांतून पार करील."

काळनाग, मुखिं तू सदा, नरहरिगुणिं धरि धीर।
परि हरि विषय तृषा मना, पार करिल भवतीर॥२१॥

*　　　　*

२२　**पलनु पीक, अंजनु अधर, धरे महावरू भाल।**
आजु मिले, सु भली करी; भले बने हौ लाल॥२२॥

भले! भले! ब्रिजलाल

प्रौढा धीरा नायिकेची उक्ती नायकाप्रत : "पापण्यांना पानांचा पीक लागलेला आहे. ओठांना काजळ शोभते आहे. भालाला आलत्याची खुलावट, अहाहा! ब्रिजलाल, आज तुमचं ध्यान किती मोहक नि सुंदर दिसते म्हणन सांगू !"

पानपीक पापणीवरी भालि महावर लाल।
अधरीं अंजन लागलें भले भले ब्रिजलाल॥२२॥

*　　　　*

अनुक्रमणिका

२३ **लाज-गरब-आलस-उमग-भरे नैन मुसकात।**
राति-रमी रति देति कहि औरै प्रभा प्रभात॥२३॥

अनुदान

सखी प्रातःकाली नायिकेच्या नेत्रांची विचित्र तऱ्हा पाहून रात्रीच्या विपरीत रतीचं रहस्य ओळखून म्हणते, "लाज, आळस, गर्व आणि औत्सुक्य इत्यादि भावांची रंगसभाच, तुझ्या डोळ्यांत भरलेली दिसते. आणि ते सारे रात्रीच्या अनुदानाची चर्चा करीत आहेत."

लाज मदालस लोचनीं, प्रीतिभाव, अभिमान।
हंसत सांगती नेत्र हें, रात्रीचें अनुदान॥२३॥

* *

२४ **पति रति की बतियाँ कहीं, सखी लखी मुसकाइ।**
कै कै सबै टलाटलीं, अलीं चलीं सुख पाइ॥२४॥

बहाणा

नायक व नायिका रंगमहालात विनोद करीत आहेत. तिथे तिच्या सख्याही उपस्थित आहेत. त्यावेळी बोलता बोलता नायक हळूच रति-इच्छा सूचित करतो. नायिका स्मित संमति देते व मैत्रिणीकडे पहाते. समंजस सख्या बहाणा करून एक एक तिथून निघून जातात.

सखी सहेली देखतां बोलति मन रिझवीत।
पति रति सुचवी पाहुनी हळुंच तिला खुणवीत॥
चतुर मैत्रिणी जाणती अनुसूचित इंगित।
जाति बहाणे सांगुनी, गालिं हसूं खुलवीत॥२४॥

* *

२५ **तो पर वारौं उरवसी, सुनि राधिके सुजान।**
तू मोहन कैं उर बसी है उरबसी-समान॥२५॥

उर्वशी

श्रीकृष्ण अन्य गोपीकडे गेलेला पाहून राधा रुसवा धरते. सखी समजावीत तिला म्हणते, "अग राधे तू इतकी सुंदर आहेस, की इंद्राची अप्सरा उर्वशी देखील तुझ्यावरून ओवाळून टाकावी. मोहनाच्या मनांत तू उरभूषण म्हणून बसली आहेस."

ओवाळिल गे उर्वशी, तुजवर अपुलें प्राण।
उरीं वससि तूं राधिके, उर्वशीच कीं जाण॥२५॥

* *

अनुक्रमणिका

२६ **कुच-गिरि चढि, अति थकित है, चली डीठि मुँह-चाड।**
फिरि न टरी, परियै रही, गिरी चिबुक की गाड॥२६॥

लंपटा

नायिकेचं सौंदर्यनिरीक्षण करताना तिच्या हनुवटीवरील खळीला भाळलेला नायक स्वगत म्हणतो, "कुचशैल चढून दृष्टी शिणली, तिचं पाऊल पुढेच पडेना तरी ती मुखमोहनी मुळं तिकडे वळली. पण अनावधानानं चिबुकखळीत जाऊन साठवली. आणि अति थकल्यामुळं तिथून मुळीसुद्धा हलली नाही."

चढत दृष्टि कुच शैल ती, वदनिं वळे ये शीण।
हनू खळीतच कोसळे, लीलंगत रसलीन॥
खिळली तशीच राहि शोभा पाहत द्वाड।
लोकरीतिची लंपटा नसेच कसली चाड॥२६॥

* *

२७ **बेधक अनियारे नयन, बेधत करि न निषेधु।**
बरबट बेधतु मोहियौ तो नासा कौ बेधु॥२७॥

नासिका वेध

नायिकेच्या सर्वांग सौंदर्यावर मोहित झालेला नायक म्हणतो, "तुझे नयनबाण अति तीव्र तर आहेतच, आणि हृदयभेद करणं हे त्याचं सहज कर्म, पण तुझी विंधली गेलेली नासिकादेखील, माझं हृदय वेधून टाकते."

नेत्रबाण अति तीक्ष्ण ते, सहज वेधिती प्राण।
विंधियली ती नासिका, विंधित हृदय अजाण॥२७॥

* *

२८ **लौनैं मुहुँ दीठि न लगै, यौं कहि दीनौ ईठि।**
दूनी है लागन लगी, दियैं दिठोना, दीठि॥२८॥

दिठोणा

दृष्ट लागू नये म्हणून लाविलेलं गोलबोट, मुखाची शोभा अधिक वाढवतं. नायक परिहासानं म्हणतो, "तुला दीठ लागू नये म्हणून सखीनं तुझ्या गालावर हा दिठोणा लावलाय खरा, पण त्यामुळं दृष्टी मात्र दुपटीनं लागते."

गालिं दिठोणा लावि ती, कधीं न लागो दीठ।
दृष्टि, दुपटी लागते ते सौंदर्य अवीट॥२८॥

* *

अनुक्रमणिका

२९ **चितवनी रूखे दृगनु की, हाँसी-बिनु मुसकानि।**
मानु जनायौ मानिनी, जानि लियौ पिय, जानि॥२९॥

मानापमान

मानिनीनं केलेल्या अविर्भावावरून, तिचा अभिमान कळून स्मित करणाऱ्या प्रियकराची अवस्था सखी सांगते, "नायिकेचा रुक्ष दृष्टिक्षेप व विनोदावाचून आलेलं हसू पाहून, ती मानिनी रागेजली आहे हे त्याला कळलं."

दृष्टिंत ये उपहास, तियेच्या ओठावर स्मितहास।
भासे चित्त उदास, प्रेमळा सोडि कोरडे श्वास॥
अस्वागत हे खास ओळखी कठोर प्रिय परिहास।
मानिनिचा अभिमान जाणुनी साजण करी निवास॥२९॥

* *

३० **सब ही त्यौं समुहाति छिनु, चलति सबनु दै पीठि।**
वाही त्यौं ठहराति यह, कविलनवी लौं दीठि॥३०॥

कठपुतळी

परकीया नायिकेची दृष्टि इतस्तता फिरून अखेर उपपतीवरच स्थिरावते हे लक्षात येताच सखी तिला म्हणते, "तुझी दृष्टि सर्व सभाजनांना न्याहळून पुढे जाते आणि परत मागे वळून त्याच व्यक्तीवर थांबते. कठपुतळी थांबते न अगदी तशीच, त्यामुळे 'चित्तचोर कोण' ते अचूक ओळखता येतं."

दृष्टिचें फुलपाखरू, उडत फिरे भवताल।
परतुनि येत विसावते पसरित मायाजाळ॥
सभाजनीं ती पाहते, परते तयासमोर।
कठपुतळीपरि थांबली, पाहुनिया मनचोर॥३०॥

* *

३१ **कौन भाँति रहि है बिरदु अब देखिवी, मुरारि।**
बीधे मोसौं आइ कै गीधे गीधहिं तारि॥३१॥

प्रभू परिक्षा

भक्ताची उक्ति :— "हे मुरारि, आता तुमच्या परिक्षेची वेळ आलेली आहे. तुमच्या ब्रीदाचा तुम्हाला पडताळा द्यायचा आहे. तुम्ही संपातिसारख्या पतित गृध्राचा उद्धार केला पण त्याच्याहून मी तर जास्तच पतित आहे. आतां बघूं या परीक्षा!"

मी पापी प्रभु पाहुं द्या, कसें पाळतां ब्रीद।
गृध्र संपाती तारिला, मी तर अधिक पतीत॥३१॥

अनुक्रमणिका

*   *

३२ **कहत, नटत, रीझत, खिझत, मिलत, खिलत, लजियात।**
भरे भौनमैं करत हैं नैनुन हीं सब बात॥३२॥

डोळे झेल

नायक नायिकेच्या चतुर नेत्रपल्लवीचं वर्णन सखी करते, “सर्व आप्तजन भोवती असताना ते परस्पर डोळ्यांनीच बोलतात, आपले अभिप्राय कळवितात, हसतात काय नि नटतात काय. कधी रागवतात तर कधी रमतात आणि एकत्र येऊन आनंदित होतात. या साऱ्या खेळांची जमलेल्यांना चाहूल देखील नसते.”

नटुनी लाजत हासती, चिडति खुलति हो मेळ।
कळत न कळत बोलती. रमति गमति किति वेळ॥
प्रीतीची दृगभाषणे, घेत परस्पार झेल।
लोकांदेखत चालतो हा डोळ्यांचा खेळ॥३२॥

*   *

३३ **वाही की चित चटपटी, धरत अटपटे पाइ।**
लपट बुझावत बिरह की कपट भरेऊ आइ॥३३॥

समेट

उत्तमा खंडिता नायिका नायकाला म्हणते,“जिथं रात्रभर तुम्ही होता, तिथंच परत जाण्याची उत्सकता तुमच्या मनात आहे. म्हणूनच तुमची पावलं नीट पडत नाहीत. तुमचं कपट मी पुरेपूर ओळखते, तरीही तुम्ही त्या अपराधासह मला प्रिय आहात. तुमच्या केवळ दर्शन सुखानं मी सारं दुःख विसरून जाते.”

आतुर मिलनिं कां पुन्हां ओढ घेति हे पाय।
जिथें कंठिली रात ही तिथेंच मन तें जाय॥
विरह अनल हा विझविते तुझी प्रिया उरभेट।
कपट कळे रे राजसा, करिते तरिहि समेट॥३३॥

*   *

३४ **लखि गुरुजन-बिच कमल सौं सीसु छुवायौ स्याम।**
हरि-सनमुख करि आरसी हियैं लगाई बाम॥३४॥

बिंबसंकेत

नायक नायिकेची प्रेमचेष्टा सखी सखीला सांगते, “राधीकेला वडील मंडळीत बसलेली पाहून, शामसुंदराने हातातील कमलपत्र डोक्याला लावलं व आपला लीन प्रणाम सूचित केला. नायिकेनं तो भाव उमजून, आरशात शामसुंदराचं प्रतिबिंब झेललं व तिनं तो आरसा

हृदयाशी लावला. आणि पुन्हा दर्पणात सूर्यबिंब पाडून ते कुचयूग्मांत धरलं. याचा संकेत अर्थ असा की सूर्य अस्ताचलीस जातांच भेट घेता येईल."

आप्त स्वजना संगति पाहि प्रियेतें शाम।
कमल पुष्प शिरिं ठेउनी सुचवी लीन प्रणाम॥
करिचें दर्पण बिंब ती धरि पुढती अभिराम।
कवळीं हृदयीं राधिका प्रतिबिंबित घनशाम॥३४॥

* *

३५ **पाइ महावरू दैंन कौं नाइनि बैठी आइ।**
फिरि फिरि, जानि महावरी, एडी मिडति जाइ॥३५॥

रंगसंभ्रम

सखी दासीचा परिहास करीत नायिकेच्या टांचेच्या लालीची प्रशंसा करते, "पायाला महावर (आळता) लावायला दासी येऊन बसली. पण नायिकेच्या टाचाच इतक्या लाल की महावरवटी वेगळी दिसेना. ती महावर समजून टांचच दाबीत होती."

पायिं महावर रंगवटी लावित सखी उगाच।
रंगसंभ्रमीं चोळते लाल लाल टांच॥३५॥

* *

३६ **तोहीं निरमोही, लग्यौ मो ही इहैं सुभाउ।**
अनआऐं आवै नहीं, आऐं आवतु, आउ॥३६॥

चित्त चोर

उपपती नायकाला नायिकेचे उपहास पत्र, :— "हे कठोरा, माझं मन तुझ्यात इतकं गुंतलं आहे की, तू गेलास म्हणजे तुझ्या मागोमाग ते येतं आणि परत आलास की तुझ्याबरोबरच परत येतं, तोपर्यंत माझं चित्तच ठिकाणावर नसतं."

चित्त न येथें जिवलगा, तुझिया मागे जाय।
छायेपरि तें धावतें सोडिते न ती काय॥
तूं येतां नच, येइना, तुझ्याविना असहाय।
येतां, येइल परतुनी तुझेंच धरुनी पाय॥३६॥

* *

३७ **नेहु न, नैननु कौ कछू उपजी बडी बला इ।**
नीर-भरे नितप्रति रहैं, तऊ न प्यास बुझाइ॥३७॥

रूपतृषार्ता

पूर्वानुरागिणी नायिका आपल्या डोळ्यांची दर्शनाभिलाषा कथन करते. "सखे हा स्नेह नव्हे ग, माझे डोळे सदाच पाण्यानं भरले असले तरी त्यांची दर्शन तृषा शमत नाही."

स्नेह न नयनीं राजसा कासाविस हें प्राण।
पिउनि आसवें सारखी मिटे न रूप तहान॥३७॥

* *

३८ **नहिं परागु. नहिं मधुर मधु, नहिं बिकासु इहिं काल।**
अली, कली ही सौं बँध्यो, आगैं कौन हवाल॥३८॥

अकालभोग

भ्रमराच्या रुपकानं कवी प्रणयासक्त जीवांना उपदेश करतो. "अजून जिला पराग आले नाहीत, रस भरला नाही, रंग धरला नाही, अशा कलिकेवर आसक्त होऊन मूढा भ्रमरा! तिच्या भोवती फेर धरितोस, गुंजारवाने मोह घालतोस! आजच ही कथा तर पुढे काय होणार हे दिसतंच आहे."

नच फुलले सुमपरागही नच भरला मधुकोष।
भ्रमर कळीवर भाळला होय खुळा बेहोष॥
उलली ना ती पाकळी, थरथरते मृदू काय।
मिठी सुटेना आज ही, पुढें कळेना काय॥३८॥

* *

३९ **लाल, तुम्हारे बिरह की अगनि अनूप, अपार।**
सरसैं बरसैं नीर हूँ, झर हूँ मिटै न झार॥३९॥

पाऊसझड

दूती नायकाला नायिकेची हृदय व्यथा कथन करते. "हे सुभग, तुमच्या विरहाची ज्वाला इतकी विलक्षण आहे की पाऊस पाण्यात ती अधिकच वाढते आणि उन्हाळझळीतही मिटत नाही."

बरसाती सर वाढवी तव विरहाग्नि अपार।
उन्हाळ झळ ही तापवी अधिकच ग्रीष्म दुपार॥३९॥

* *

४० **देह दुलहिया की बढै ज्यौं ज्यौं जोबन-जोति।**
त्यौं त्यौं सौं त्यैं सबैं बदन मलिन दुति हप्रति॥४०॥

अनुक्रमणिका

यौवन ज्योति

नवयौवना मुग्धेच्या मैत्रिणींचा आपसातील आमोद प्रमोद "या नवपरिणिता मुग्धेच्या देहावर जसजशी यौवन कांती चढून उज्वलता येत आहे, तसतसे सवतीच्या मुखावरील तेज मलीन होत आहे."

यौवन ज्योती वाढती अंग अंग उजळीत।
सवतमुखीं ये म्लानता भरता रंग कळींत॥४०॥

* *

४१ **जगतु जनायौ जिहिं सकलु, सो हरि जान्यौ नाँहि।**
ज्यौं आँखिनु सबु देखियै, आँखि न देखी जाँहि ॥४१॥

दृगपरीस

कुणा आत्मज्ञानियाची स्वगत उक्ति, "ज्या परमेश्वराच्या कृपेनं सारं जग आपल्याला दिसतं त्याच प्रभूला आपण मात्र पाहू शकत नाही. ज्या डोळ्यांनी सर्व जग पहाता येतं ते डोळे स्वतःलाच पाहू शकत नाहीत.

जग जाणवि जो आपणा तो ना पाहिला ईश।
दृग बघती जग भोवतीं ते दृग होति परीस॥४१॥

* *

४२ **मंगलु बिंदु सुरंगु, मुखु ससि, केसरि-आड गुरू।**
इक नारी लहि संगु, रसमय किय लोचन जगत॥४२॥

मंगल-गुरु-चंद्रयूती

नायिकेच्या भालावर कुंकुमबिंदी व आडवी केशरगंधचिरी पाहून नायकाचे डोळे अनुरागमय होतात. लाल बिंदुचा मंगल आणि मुखरुपी चंद्र आडव्या केशरगंधचिरीचा बृहस्पती, या तिन्ही ग्रहांच्या युतीनं ती सुंदरी माझ्या लोचनांना रसमय बनविते."

मंगल गुरु ग्रह चंद्र युति भालावरति सुरेख।
विधि रेखित ललिताक्षरें शुभ भाग्याचा लेख॥
झाले लोचन जगत हे रसमय प्रणय मिलिंद।
हृत्कमलीं घे कोंडुनी चाखित सौख्य मरंद॥४२॥

* *

४३ **पिय तिय सौं हँसि कै कह्यौ, लखैं दिठौना दीन।**
चंदमुखी, मुखचंदु तैं भलौं चंद-समु कीन॥४३॥

अनुक्रमणिका

गालबोट

सखी सखीला म्हणते, "नायिकेने गालबोट लावलेले बघून प्रियकर हसत म्हणतो, "हे चंद्रमुखी हे गालबोट आपल्या मुखचंद्राला लाऊन तू हुबेहूब चंद्राची प्रतिकृतीच उठवलीस."

गालबोट तें पाहुनी प्रिय बोले स्मित हास।
चंद्रमुखी मुखचंद्र करी चंद्राचा उपहास ॥४३॥

* *

४४ **कौंहर सी एडीनु की लाली देखि सुभाइ।**
पाइ महावरू देइ को, आपु भई बे-पाइ॥४४॥

सखि संभ्रम

सखी सखीला सांगते, "इंद्रायणीच्या फळासारख्या लालसुरंग टाचा पाहून सखीला महावर रंग लावताना संभ्रम पडला. ती तशीच हात आखडून बसली."

इंद्रायणी फलापरी पाउल लाल सुरंग।
कसें महावर लावणे होय सहचरी गुंग॥४४॥

* *

४५ **खेलन सिखए, अलि भलैं चतुर अहेरी मार।**
कानन चारी नैन-मृग नागर नरनु सिकार॥४५॥

नरमृगया

नायिकेची अंतरंगिनी सखी, तिनं आपल्या नयन कटाक्षानं घायाल केलं हे जाणून परिहासात्मक बोलते. "सखे कामदेवासारख्या चतुर शिकाऱ्यानं तुझ्या या काननचारी मृगांना मृगया करण्यात चांगलच तरबेज केलय. नागरजनांची मृगया ते सहजच लीलेनें आणि कुशलतेनें करतात."

खेळवि शिकवी लक्षिता चतुर शिकारी मार।
काननचारी नैनमृगा नरमृगया सविकार॥४५॥

* *

४६ **रससिंगार-मंजनु किए, कंजनु भंजनु दैन।**
अंजनु रंजनु हूँ बिना खंजनु गंजनु, नैन ॥४६॥

तिचे डोळे

श्रृंगाररसांत अवगाहन करीत यथोचित हावभावांचा आविष्कार करणारे तिचे डोळे आपल्या विमलतेनं कमळालाही लाजवितात. आणि स्वाभाविक असणाऱ्या काजळकोरीनं अंजन न लावताही खंजन पक्षाचा गर्व हरण करतात."

अनुक्रमणिका

कंज भंजना लोचनें साधित रसश्रृंगार।
नयनांजन ना लाविता करिती खंजनहार॥४६॥

*   *

४७ **साजे मोहन-मोह कौं, मोही करत कुचैन।**
कहा करौं, उलटे परे टोने लाने नैन॥४७॥

जादूटोणा

पूर्वानुरागिणी नायिकेचे सखीशी हितगूज "सखे, मोहनाला मोहनी घालताना मी आपल्या नयनांत जादू भरली पण त्याचा परिणाम मात्र उलट झाला. माझी जादू माझ्यावरच उलटली अन् मीच मोहनाला भाळले."

मीठ मोहरी घालतां धरते जादूटोणा।
मोह घालितां मोहना मीच मोहिले कोणा।
जादुगार हे नैन सखे करिति कसे गारुड।
काय करुं मी बाइ ग घेती उलटा सूड॥४७॥

*   *

४८ **याकैं उर औरै कछू लगी बिरह की लाइ।**
पजरै नीर गुलाब कैं, पिय की बात बुझाइ ॥४८॥

शीतल आग

विरहिणी नायिकेची मनस्थिती सखी इतरांना सांगते. "तिच्या हृदयाला विरहाची कांहीं विलक्षणच आग लागली आहे. गुलाबपाणी शिंपलं तर ती अधिकच भडकते. पण प्रियकराचं नांव काढताच शमते."

लोक विलक्षण बाइ ग ही विरहाची आग।
गुलाब जल तें चेतवी, विझवी प्रियानुराग।
अंग अंग इंगळासवें जळतो माझा गांव।
शमतो श्रवण ये जसे गोड प्रियाचें नांव॥४८॥

*   *

४९ **कहा लेहुगे खेल पैं, तजौ अटपटी बात।**
नैंक हँसौंही हैं भई भौंहैं, सौंहैं खात॥४९॥

अवेळ चेष्टित

मानिनी नायिका रागेजली आहे. सखी तिला शपथा घालून समजाविते. ती शांत झाली असता नायक पुन्हा सवतीचं नांव घेतो. पण सखी मोठ्या खेळकरपणानं त्याचं वचन उडवून लावते व त्याला सचेत करते. "असा अवेळी खेळ कसला करता ती बिचारी आतांच कुठे शांत झाली आहे. मिठाचा खडा टाकून जमत आलेलं दूध उगाच कां नासवतां?"

तिला कशाला चिडवितां करिता काय कुचाळी।
आधिच ती रागेजली चढती भिवय।
आण घालुनी आणले, जरा कुठें ये हासूं।
कळींत दंवबिंदूच ती दिसे लोभला आसूं ॥
थट्टा तरि सूचते कशी दूध लागते नासूं।
लाजेला ये लालिमा, नकाच काजळ फासू ॥४९॥

* *

५० **डारी सारी नील की ओट अचूक चुकैं न।**
मो मन-मृगु करवर गहैं अहे ! अहेरी नैन॥५०॥

नैन शिकारी

नायक नायिकेचे प्रियाराधन करतो "प्रिये तुझे कर्बर नयन, चित्त्यासारखे नील वस्त्राच्या पालवीमागे दडून, अचानक, व अचूक माझ्या मनोमृगावर झेप घेतात."

नीलांबर तें साजिरें लावण्याचें झाड।
निळी पालवी झाकुनी तरुशाखेच्या आड।
चित्यापरि घे नेमका अचूक दृष्टि क्षेप।
नैन शिकारी घेति हे मनोमृगावर झेप॥५०॥

* *

५१ **दीरघ सास न लेहि दुख, सुख साईं हिं न भूलि।**
दई दई क्यौं करतु है, दई दई सु कबुलि॥५१॥

दैव भोग

कुणा विपत्तीग्रस्ताला त्याचा मित्र धीर देतो. या संकटात सापडल्यानंतर केवळ 'दैव दैव' करून उपयोगी नाहीं. दैवानेच दिलेला हा भोग धैर्याने सहन कर. उसासे सोडीत बसू नकोस देवावर विश्वास ठेव."

'दैव दैव' करिसी वृथा देवच देई भोग।
लांब उसासे सोडिसी भाग्याचा हा योग॥
आशेनें हुरळुं नको निराशेत निश्वास।
सुख दुःखांतहि संयमी ठेवि चित्ति निश्वास॥५१॥

* *

५२ **बैठि रही अति सघन बन, पैठि सदन-तन माँहि।**
देखि दुपहरी जेठ की छाँहौं चाहति छाँह॥५२॥

अनुक्रमणिका

स्वयं दूतिका

पूर्वानुरागिणी, स्वयंदूतिका नायिका नायकाला म्हणते, “अशा भयंकर उन्हात आपण कुठे निघालात! या घरात येऊन थोडा विसावा घ्या. जेष्ठातील दुपारची सावली देखील आडोसा शोधते, सघन कांतारात लपते किंवा तरुतली घेर घालून बसते. छपराखाली भिंतीच्या कुशीत शिरते, आणि वाटेवरून चालताना पाय धरून राहते.”

भर दुपारची सावली पडते ना बाहेर।
अंग चोरुनी घेतसे तरुभोवतीं घेर।
परसांतिल छपरातलीं भींतीच्या उदरांत।
लपते येऊनि सानुली मायेच्या पदरात॥
माध्यान्ही माथ्यावरी येतांना रविराय।
भीतीने वाटेवरी, छाया धरिते पाय॥५२॥

* *

५३ **हा हा ! बदन उघारि, दृग सफल करैं सबु कोइ।**
रोज सरोजनु कैं परैं, हँसी ससी की होइ॥५३॥

डोळ्यांचे पारणे

खंडिता नायिकेने नायकाला पाहून उदासिनता दाखविण्यासाठी घुंघट ओढून घेतला आहे. चार डोळ्यांची नजरानजर झाल्यावर तिचा राग ओसरेल या कल्पनेनं सखी तिच्या स्वरूपाची प्रशंसा करीत घुंघट काढण्याला प्रवृत्त करते. “सखे, आपला मुखचंद्र असा झाकू नकोस. आमच्या डोळ्यांचे पारणे तरी फिटू दे. तुला अशी अभ्राविरहित पहाताना चंद्राचा देखील माज उतरेल. चंद्रकांत पाझरू लागेल.”

‘हं हं, झाकूं नकोस ग सखि अपुला मुखचंद्र।
फिटुं दे बाई पारणें, सरीज नयनानंद॥
अभ्रारिविरहित पाहतां सरेष ती नाराज।
सहज सखे उतरील ग त्या चंद्राचा माज॥५३॥

* *

५४ **होमति सुखु, करि कामना तुमहिं मिलन की, लाल।**
ज्वालमुखी सी जरति लखि लगनि अगनि की ज्वाल॥५४॥

ज्वालामुखी

पूर्वानुरागिणीची विरहव्यथा, सखी नायकाला सांगते. “हे ब्रिजलाल, अनुरागरूपी अग्नीची ज्वालामुखीसारखी ज्वाला प्रज्वलित झालेली पाहून, तुमच्या भेटीची कामनाच ती त्यात हवन करते आहे.”

ज्वालामुखिपरि भासते अनुरागाची आग।

अनुक्रमणिका

धरि ती मीलन कामना हवन करी सुख त्याग॥५४॥

*　　　　*

५५ **सायक सम, मायक नयन, रंगे त्रिविध रंग गात।**
झखौ बिलखि दुरि जात जल, लखि जलजात लजात॥५५॥

मायाविनी सांज

दूति नायकाला संकेतस्थळी नेण्यासाठी म्हणते, "सायंकाळसारखे मायावी व त्रिविध रंगांनी रंगलेले तिचे डोळे पाहून, त्या सरोवरांतील कमले देखील लाजली आणि मीन असूये दुःखित होऊन पाण्यांत लपले."

संध्ये सम मायावी त्रिविध रंगिं नयन नटे।
दूरजलीं लपति मीन, संकोचित कमल मिटे॥५५॥

*　　　　*

५६ **मरी डरी कि टरी बिथा, कहा खरी, चलि चाहि।**
रही कराहि कराहि अति, अब मुंह आहि न आहि॥५६॥

व्यथेची कथा

प्रोषितपतिका नायिकेच्या निश्चेष्ट परिस्थितीचं वर्णन सखी करते, "अग तू इथं अशी उभी कां आहेस, चल जरा लौकर. ती निष्प्राण झाली की तिची व्यथा पार मिटली ते बघ. कण्हता कण्हता ती एकदम थांबली, अन् आता तर 'हाय हाय' असे दुःखीत उद्‌गारही तिच्या मुखातून निघत नाहीत."

काय कथूं ग तिची व्यथा, पहा तूंच करि घाइ।
मरणीं मरतां मिटली 'हाय' नि श्वासहि नाहिं॥५६॥

*　　　　*

५७ **कहा भयौ जौ बीछुरे, मो मनु तोमन-साथ।**
उडी जाउ कितहूँ, नऊ गुडी उडाइक-हाथ ॥५७॥

उडता पतंग

गणिका नायिका गायनासाठी परदेशी गेली आहे. तिथून ती आपल्या यजमानाला लिहिते "यावेळी आपण दूर दूर असलो तरी काय झालं! माझं मन तर तुमच्यातच गुंतून राहिलं आहे. आपण वाटेल तेव्हा ओढून धरू शकता! पतंग अंतराळात वाटेल तसा उडाला तरी तो विवश असतो. दोरा उडविणाऱ्याच्या हातीच असतो. तो केव्हाही उतरवून त्याला जवळ घेऊ शकतो."

सख्या पतंगापरी उडे मी दूर जरी मनचोरा।

अनुक्रमणिका

ओढायातें परी खालती तुझिया हातीं दोरा॥५७॥

*　　　　*

५८　**लखि, लोने लोइननु कैं कोइनु, होइ न आजु।**
कौनु गरीबु निवाजिबौ, कित तूठ्यौ रतिराजू॥५८॥

नयन मारिती मूठ

कुलटा नायिकेच्या नयनकडात कामदेवाची झलक व उपपतीला भेटण्याची उत्सुकता पाहून, सखी परिहासानं म्हणते, "आज तुझ्या डोळ्यांत उत्कंठेची आगळीच चमक दिसते, ज्याच्यावर तुझी कृपादृष्टी वळली, असा तो भाग्यवान कोण आहे बरं! कुणावर हें लावण्य लुटविणार आहेस?."

कोणासाठीं मदनिके लावण्याची लूट।
भाग्यवंत तो कोण ग, नयन मारिती मूठ॥५८॥

*　　　　*

५९　**सीतलताडरु सुबास कौ घटै न महिमा-मूरू।**
पीनस वारैं जौ तज्यौ सोरा जानि कपूरु॥५९॥

गुण महिमा

कविची प्रास्ताविक उक्ति, "अरसिकाने गुणांचे चीज केले नाही, तरी गुणवंताचा अनादर होत नाही, किंवा त्याचा महिमा कमी होत नाही, पिन्नस रोग्यानं कापराचा सोरा म्हणून त्याग केला तरी कापराची शीतलता व सुगंध नाहीसा होत नाही."

गुणमहिमा नच हो कमी अनांदरे गुण अंध।
पिन्नस रोग्यातें जसा सोरा, कापुर गंध॥५९॥

*　　　　*

६०　**कागद पर लिखत न बनत, कहत संदेसु लजात।**
कहि है सबु तेरौ हियौ मेरे हिय की बात॥६०॥

पहिलें पत्र

प्रोषित पतिकेने प्रियकराला पत्रातून विरहवृत्तांत कथन केला. पण ते अपुरे वाटून कल्पना येण्यासाठी एक दोहा तिने लिहिला, "या टीचभर कागदावर माझी विरह व्यथा कशी कळवू! लिहितानाही लाज वाटते. अश्रू लिहू देत नाहीत. हात सारखा थरथरतो. काही सूचतच नाही-एवढंच लिहिते-माझं हृदय तुमच्याजवळच असल्यामुळे माझे मनोभाव तुम्ही त्यालाच विचारून ते गूज ऐकून घ्या."

मनिचे मनि लाजत मी लिहितांना पत्र प्रिया।

अनुक्रमणिका

जाणाया मन माझें पुसणें अपुल्या ह्रदया॥
देह इथें एकलाच तुजजवळी ह्रदय रिघे।
तूंच सांग तूंच बोल, हितगूज तें ऐकुनि घे॥६०॥
* *

६१ **बंधु भए का दिन के, को तारयौ, रघुराइ।**
तूठे तूठे फिरत हौ झूठे बिरद कहाइ॥६१॥

खोटे बिरुद

भगवंताजवळ भक्ताची मागणी, "हे प्रभो रामचंद्रा, तुम्ही कुठल्या दिनाचे बंधू झालां, कुठल्या पतिताला तुम्ही तारलत! कीं ज्यामुळं दीनबंधू म्हणून तुम्ही खोटं बिरुद मिरवितां! वास्तविक खरा पतित व दीन तर मीच आहे."

कोण बंधु ते तारले दीनबंधु रघुनाथ ।
बिरुद खोटें मिरवितां, पतित खरा मी नाथ ॥६१॥
* *

६२ **जब जब वै सुधि कीजियै, तब तब सब सुधि जाँहि।**
आँखिनु आँखि लगी रहैं, आँखैं लागति नाँहि॥६२॥

आठव

वियोगिनी नायिका आपली दशा सखीला सांगते, "प्रियकरा, तुझी आठवण येताच मी देहभान विसरते. तुझ्याकड डोळे लागले असल्यामुळे हे डोळेच लागत नाहीत... माझी नीजच हरवली."

तुज आठवितां विसरते प्रिया सुटे अवधान।
डोळे नच हे लागती, तुझे लागलें ध्यान॥
दृष्टि तरळते, वाहते आसवांत काळीज।
मिटते ना ही पापणी, हारवली रे नीज॥६२॥
* *

६३ **कौन सुनै, कासौं कहौं, सुरति बिसारी नाह।**
बदाबदी ज्यौं लेत हैं ए बदरा बदराह॥६३॥

काळे मेघ

प्रोषित पतिका नायिका सखीला म्हणते, "सखे प्रियकर मला विसरले, हे मी कुणाला कसं सांगू! त्यांतून ही बरसात लागली. काळे मेघ भरून आले आहेत! आता कसं होईल ग माझं."

सांगु कुणाला कसे सखे, मला विसरले नाथ।

अनुक्रमणिका

भरले काळे मेघ हे, जीव घेई बरसात॥६३॥

* *

६४ **मैं हो जान्यौ, लोइननु जुरत बढि है जोति।**
को हो जानतु, दीठि कौं दीठि किरकिटी होति॥६४॥

खुपरी प्रीत

पूर्वानुरागात नायक वा नायिकेचे स्वगत बोल, "मला वाटलं दृष्टभेट झाली म्हणजे दृष्टि आनंदित होईल, हृदय फुलून येईल. पण झाल उलटंच. दृष्टभेट झाली आणि आता डोळे आल्यासारखे डोळ्यातून सारखी आसवंच गळतात आणि हृदय दुःखानं भरून येतं."

घडतां डोळे भेट ही फुलते मन सुखवित।
येती भरुनी आसवें खुपते नयनीं प्रीत॥
जुळवी पहिली प्रीत ही नवनजरांचा वेध।
सखे अखेरी ती ठरे जीव फुलांचा मेघ॥६४॥

* *

६५ **गहकि, गाँसु औरै गहे, रहे अधकहे बैन।**
देखि खिसौहैं पिय-नयन किए रिसौं हैं नैन ॥६५॥

मायाजाल

नायक प्रातःकाळी नायिकेकडे आला. नायिका प्रीतीन उचंबळून त्याच्याशी बोलू लागली. पण एकाकी त्याच्या डोळ्यातील लाली बघून संशयाने तिने भिवया चढवल्या, त्यामुळे तीचे बोल मधेच तुटले."

येत उमाळा, आवरी अधरीं आतूर बोल।
हसूं पाहतां लोचनीं, रोषें नेत्र अबोल॥
चेष्टेनें रागेजली, लाल जहाले गाल।
संशय येई मानसीं कळले मायाजाल॥
पाहुनि लाली लोचनीं भिवई चढली ऊंच।
बोथटले स्मरबाणही सरला प्रतिप्रपंच॥६५॥

* *

६६ **मैं तासौं कैवा कह्यौ, तू जिन इन्हैं पत्याइ।**
लगालगी करि लोइननु उर मैं लाई लाइ॥६६॥

फितुर डोळे

पूर्वानुरागात विकल झालेली नायिका आपली विकलता सखीला सांगते. सखी त्यावर म्हणते, "अग मी तुला कितीदा बजावलं की, या घरातील फितुरावर, चोरावर मुळी

अनुक्रमणिका

देखील विश्वास ठेऊ नकोस. हे मेले फितुर डोळेच चोराला चोरवाट दाखवून घर लुटवतात, घरात घेतात अन घरधन्याला फशी पाडतात. तरी तू माझं ऐकलं नाहींस. आता काय!"

'ठेऊं नको विश्वास मुळीं' ग, सखी तिला समजावी।
हेर घरांतिल फितूर डोळे, करितो लावालावी।
चित्तचोर तो घरांत घेतो, जाग बाई ग जाग।
गुपित मनांतील सांगूनि चोरा घरा लावितो आग॥६६॥

* *

६७ **बर जीते सर मैन के, ऐसे देखे मैं न।**
हरिनीके नैनातु तैं, हरि नीके ए नैन॥६७॥

शरसंधान

सखी नायकाजवळ नायिकेच्या डोळ्यांची प्रशंसा करते. "हे हरी, हिचे डोळे हरिणनयनांहूनही विलक्षण प्रभावी आहेत. त्यांनी मन्मथ बाणांनाही हरवलं आहे. जिंकून त्याचा शरधिच हस्तगत केला आहे. मी असे मोहक पण घातकी डोळे कधी कुठेच पाहिले नाहीत."

विलोल सुंदर मदनातेही जिंकिति जे लडिवाळे।
सहज हरिति हरिप्राण विंधुनि मनोमृगीचे डोळे॥६७॥

* *

६८ **थोरै ही गुन रीझते, बिसराई वह बानि।**
तूम हूँ, कान्ह, मनौ भए आजकाल्हि के दानि ॥६८॥

वृत्ति विसर

कवी श्रीकृष्णाला व्यंगोक्तीनं आपल्या काळांतील दातारांची गुणग्राहकता सांगतो. "हे कृष्णा, पहिले तर तुम्ही अल्पगुणावरही मोहित होत होता, पण आतां मात्र ती वृत्ति विसरलात असं दिसतं! तुम्ही एवढे उदार असूनही, आजच्या दानशूरासारखे कृपण कसे बनलात?"

अल्प गुणावर भाळूनी, केलें कौतुक मान।
वृत्ति विसरला आज ती दाते कृपण समान॥६८॥

* *

६९. **अंग-अंग-नग जगमगत दीपसिखा सी देह।**
दिया बढाऐं हूँ रहै बडौ उज्यारौ गेह॥६९॥

अनुक्रमणिका

दीपशिखा

सखी नायकाजवळ नायिकेच्या रूपाची प्रशंसा करते. "तिच्या अंगावरील अलंकारांची झगमग दीपशिखेभोवती असणाऱ्या तेजोवलयासारखी भासते. अंधारातही तिचं घर उजळलेलं दिसतं.

अंग अंग नग झगमगे दीपशिखेपरि देह।
दीप विझवितां उजळते अंधारातहि गेह॥६९॥

*   *

७० **छुटी न सिसुता की झलक, झलक्यौ जोबनु अंग।**
दीपति देह दुहूनु मिलि दिपति ताफता रंग॥७०॥

मोरपंखी

नायिकेच्या वयसंधीचे वर्णन सखी करते, "अजूनही तिच्या अंगी अल्लड खेळकरपणाची झांक आहेच आणि नुकतीच यौवनछटाही दृगोचर होऊ लागली आहे. शैशवाची सांज शोभा आणि यौवनाची उषा अरुणिमा यांचा मनोहर संगम, या वयसंधिकाली शैशव सीमेवर दिसून येतो. ही मोरपंखी शोभा अवर्णनीय आहे.

शैशव शोभा ती उरे, येई यौवन रंग।
मोरपंखि घेई छटा रंग मिलनीं अंग॥७०॥

*   *

७१ **कब कौ टेरतु दीन रट, होत न स्याम सहाइ।**
तुम हूँ लागी जगत-गुरू जग-नाइक, जग-बाइ॥७१॥

जगरीत

कवीचे आवाहन. "हे प्रभो, मी तुझ्या नांवानं कधीचा बाहतो आहे. माझी हाक तुझ्या कानी नाही का आली? की हे जगन्नायका, आजच्या जगाच्या चालीरीतींचा तुझ्यावरही प्रभाव पडला आहे!"

किति हाकारुं मोहना, घेसि न कांरे धाव।
जगन्नायका तुजवरी जगताचाच प्रभाव॥७१॥

*   *

७२ **सकुचि न रहियै, स्याम, सुनि ए सत्तरौं हैं बैन।**
देत रचौहौं चित कहे नेह-नचौ हैं नैन॥७२॥

विसंगती

नायिकेची समजूत घालताना नायकाने हात टेकले. निराशेनं तो निघून जाईल या भीतीनं सखी विनोद करून त्याचा उत्साह वाढविते. "तिची ही कठोर वचनं तुम्ही मनावर घेऊ

नका. आणि संकोचित होऊ नका. हे नाटक सारं लटकं आहे. तिचे डोळे बघा कसे मनातल्या मनांत हसताहेत ते!"

कट वच लटके मोहना होऊं नका बैचैन।
राग नसे अनुराग हा सांगति चंचल नैन॥७२॥

* *

७३ **पत्रा हीं तिथि पाइयै वा घर कैं चहूं पास।**
नितप्रति पून्यौहिं रहै आनन-ओप-उजास॥७३॥

पंचांग तिथी

नायिकेच्या मुखचंद्राची प्रशंसा सखी नायकाजवळ करते. "तिथी एक तर पंचांगावरून कळते किंवा चंद्रोदयावरून. पण तिच्या घराच्या आसपास मुख चंद्रामुळे सदाच पौर्णिमा नांदत असल्यामुळे तिथे पंचांग पाहूनच तिथी सांगावी लागते."

नांदतसे नित पौर्णिमा, इंदूवदन विकास।
पंचांगातुनि तिथी कळे घरानिकट लोकांस॥७३॥

* *

७४ **बसि सकोच-दसबदन-बस साँचु दिखावति बाल।**
सियलौं सोधति तिय तनहिं लगनि-अगनि की ज्वाल॥७४॥

अग्निदिव्य

सखी सांगते,"आजवर संकोचामुळं ती तुम्हाला भेटू शकली नाही, आणि आपलं प्रेम तिनं मनातल्या मनात झांकून ठेवलं. पण वृद्धिंगत होऊ लागल्यामुळे संकोचानं ते दाबून ठेवणं अशक्य झालेलं आहे. उलट विरहाग्नीनं ती संतप्त झाली असल्यानं हे तिचं प्रेम उघडं पडलं. संकोचरूपी दशवदनाच्या विवशतेन ती हतबल झाली. आपल्या देहाला विरहाग्नीत जाळून घेऊन ती जानकीप्रमाणेच अग्निदिव्य करीत आहे. संकोचाच प्रायश्चित घेत आहे. या शुद्धिनच तिच तुमच्यावरील प्रेम सिद्ध होत."

अशोकवनिं हा विवश करी दशवदनी संकोच।
विरह अनल जाळीत जानकी जीवन शुधि घे शोच॥७४॥

* *

७५ **जौ न जुगति पिय मिलन की, धूरि मुकति-मुँह दीन।**
जौ लहियै सँग सजन, तौ धरक नरक हूँ की न॥७५॥

मीलनमोह

गोपिका उद्धवाला सांगतात,"प्रिय मोहनाच्या मीलनाची युक्ती आम्हाला सांग. तुझी मुक्ती आम्हाला नको. त्याची भेट हीच आमची मुक्ती. त्यांच्या सहवासात नरक देखील आम्हाला स्वर्गतुल्य वाटेल."

नको मुक्ति रे उद्धवा, युक्ति तुझी बहुसाल।
शामल सुंदर लाडका भेटवि रे ब्रिजलाल॥
नरकपुरी प्रिय ती अम्हा सजणासर विकराल ।
मोहन मोहच मुक्ति ही कोमल बंध मुणाल॥७५॥

* *

७६ चमक, तमक, हाँसी, ससक, मसक, झपट, लपटानि।
ए जिहिं रति, सो रति मुकति; और मुकति अति हानि॥७६॥

कुंहूं कुंहू

कुणी कामी रतिप्रशंसा करीत आहे. "ज्या रतिसुखात चमक दमक आहे, तीच रति परमानंददायिनी होय, आणि अशी मुक्तरती नसली तर तो विनाश समजावा."

लपट झेप चमक झमक अधरि मधुर हासे।
मुक्त मनें रति विरतां शयनिं स्वर्ग भासे॥
रात छळत तळमळता—चुरता तनु चुरगळता।
मुकतां रति होत हानि, मुक्ति मिळे रति फळता॥
कुंजर रति झुंज सजे टोचता पराणी।
हिसक मसक, लपट, झपट उंहूं कुंहूं कुंहूं वाणी॥७६॥

* *

७७ मोहूं सौं तजि मोहु दग चले लागि उहिं गैल।
छिनकु छाइ छबि-गुर-डरी छले छबीलैं छैल॥७७॥

मंतरलेला गूळ

पूर्वानुरागिणी नायिका सखीला म्हणते, "छबिरूपी मंतरलेल्या गुळाची चटक लाऊन, त्या बांके छैल विहारीनं, माझ्या डोळ्यांना आपल्या नादी लावलं. आता त्याची पाठ ते सोडीत नाहीत."

गोड रूप छबि पाहतां मंतरलेला गूळ।
चटावली ही लोचनें चाखुनि घेती भूल॥
दारि घरी छायेपरी तुझिया मागोमाग।
ससेमिरा हा पाठिशी लागे जागोजाग॥७७॥

* *

७८ कंज-नयनि मंजनु किए, बैठी ब्यौरति बार।
कच-अँगुरी-बिच दीठि दै, चितवति नंदकुमार ॥७८॥

अनुक्रमणिका

स्नातमंगला

नायिकेची प्रणयलीला सखी सखीला सांगते, "ती कंजनयनी राधिका न्हाऊन उन्हात आपले केस सुकवीत बसली होती. केस सावरण्याच्या मिषानं हळूच बोटांच्या फटीतून तिनं नंदकुमाराकडे पाहिलं."

स्नात मंगला राधिका, कंजनयनिं भयभीत।
बसे उन्हांतच अंगणी घनकुंतल सुकवीत॥
करी बहाणा कामिनी सारित कचसंभार।
करांगुलीतुन पाहते हळच नंदकुमार॥७८॥

* *

७९ **पावक सो नयननु लगै जावकु लाग्यौ भाल।**
मुकुरु होहुगे नैंक मैं, मुकुरु बिलोकौ, लाल॥७९॥

हातचे कंकण

प्रियकराच्या भालावर महावररंग लागलेला पाहून नायिका म्हणते, "हे प्रियकरा, तुझ्या भालाला लागलेले महावर, माझ्या डोळ्यांना अग्निसारखा चटका लावतं. जरा आरशांत बघा, नाहीतर पुसल्यावर नाही म्हणाल!"

भालिं महावर लागलें खूण उमटली लाल।
खुपते नयनां माझिया जळती अनल ज्वाल॥
मुरकत मुरकत हासतां मुकुर पहा ब्रिजलाल।
हात कंकणा आरसा नव्हते कांहिं म्हणाल॥७९॥

* *

८० **रहति न रन, जयसाहि-मुख लखि, लाखनु की फौज।**
जाँचि निराखरऊं चलै लै लाखनु की मौज॥८०॥

लक्षदान

कवी राजा जयसिंहाची युद्धकुशलता व दानशूरता याचा गौरव करतो, "जयसिंह समोर येताच, रणांगणात लक्षावधी सेनासमूहही जाग्यावर ठरत नाही आणि मुर्खांनाही त्याच्या औदार्यामुळे लक्षावधी होनांची प्राप्ती होते."

जयसिंहाच्या सन्मुख न ठरे लाखांची सेना।
उदारता दे निरक्षराही लाख, मागतांना॥८०॥

* *

८१ **दियौ, सु सीस चढाइ लै आछी भाँति अएरि।**
जापैं सुखु चाहतु लियौ, ताके दुखहिं न फेरि॥८१॥

अनुक्रमणिका

दुःखाचा आहेर

कुणा विपत्तीग्रस्ताला सज्जनाचा उपदेश—"देवानं दिलेल्या सुखदुःखाचा तूं विनम्रतेनं अंगिकार कर. ज्याच्यापासून तुला सुख पाहिजे आहे त्यानं दिलेलं दुःखही तू हसतमुखाने सहन कर."

देत सौख्य वा दुःख ही प्रभू, नको अव्हेर।
सुखें अंगिकारी मना दुःखाचाही अहेर॥८१॥

*   *

८२. **तरिवन-कनकु कपोल-दुति बिच बीच हीं बिकान।**
लाल लाल चामकर्ति चुनीं चौका-चीन्ह-समान ॥८२॥

रददंश

अन्यसंभोगदुःखिता नायिका, नायकाकडून परत आलेल्या दूतीच्या गालावर दातांची मंडलाकृति वठलेली पाहून चतुराइनं व व्यंगार्थानं तिची भलावण करीत म्हणते, "तुझ्या कानातील सुवर्णवेलीचं सोनं, तुझ्या गालाच्या कांतीशी एकजीव झाल्यामुळं मधुन मधुन नुसत्याच दात रोवलेल्या खुणासारखं वाटतं. अर्थात तो दंतव्रण नव्हे म्हणा!"

कुंडल द्युति ती लीन हो सहज सुवर्णी गाल।
रदनदंश तो भासतो, चिन्ह उमटलें लाल॥८२॥

*   *

८३ **भोहि दयौ, मेरौ भयौ, रहतु जु मिलि जिय साथ।**
सो मनु बाँधि न सौंपियै, पिय, सौतिनि कैं हाथ ॥८३॥

गुंतागुंत

सपत्नीवर नायकाचे प्रेम आहे हे जाणून नायिका त्याला म्हणते, "राजसा! मला दिलेलं आपलं मन, दुसऱ्या कुणालाही देऊं नका. कारण माझंही मन त्यात गुंतलेलं आहे. या ओढाताणीत माझ्याच गळ्याला फास बसेल."

मला दिले मन राजसा देतां अन्य कुणास।
माझेंही मन गुंतलें तेढ पडे जीवास॥
ओढ तुझी तिकडे जरी, गुरफटला रे श्वास।
ओढाताणित या अशा लाउ नको गळफांस॥८३॥

*   *

८४ **कुंजभवनु तजि भवन कौं चलियैं नंदकिसोर।**
फूलति कली गुलाब की, चटकाहट चहूँ ओर॥८४॥

अनुक्रमणिका

चटक पहाट

उपपतीने परकीयेबरोबर रात्रभर कुंजात विहार केला आणि पहाट झाली तरी तिला मिठीत घेऊन तो पहुडला आहे. नायिका कुललाजेच्या भीतीनं, त्याला पहाट झाल्याचं जाणवून लौकर बाहेर पडायला विनविते, "आतां पहाट झाली पहा, बाहेर चांगलच चटकलं आहे, कुंजातून बाहेर पडायला हवं. गुलाबाच्या कळ्या फुलताना पाकळ्यांचा चुटचुट आवाज येत आहे. जणू चुटक्या वाजवून आटपा म्हणून सुचवीत आहे आणि मलाही घरी परतायची चुटपुट लागली आहे."

सोड मिठी यदुनंदना, झाली पहा पहाट।
जाऊं या सदनीं सख्या, मोडूं नका वहिवाट॥
किलबिलती बघ कोटरीं मंजुल खंजन गात।
चुटचुटती कलिका कशा उलतांना कुंजांत॥८४॥

* *

८५ **कहति न देवर की कुबत कुल-तिय कलह डराति।**
पंजर-गत मंजार-ढिग सुक ज्यौं सूकति जाति॥८५॥

पंजरकीर

सखी सखीला सांगते, "अग ती बिचारी कुलवधु, कुलकलहाला भिऊन दीरानं केलेले चाळे पतीला सांगत नाही. त्यामुळं त्याला जास्तच अवसान चढतं आणि ती बिचारी मनातल्या मनात जळते. अगदी मांजरासमोर ठेवलेल्या पिंजऱ्यातल्या पोपटासारखी तिची गत. दिवसेंदिवस बिचारी कृश होत आहे."

कुलकलहा भिउनी वधू उदास मनिं दिलगीर।
पतिला नच ती सांगते छळतो लंपट दीर॥
मांजर समोर सारखें, जणुं कीं पंजर कीर।
कृश होई ती कोमला, रातंदिन अवधीर॥८५॥

* *

८६ **औरै भाँति भए ब ए चौसरु, चंदनु चंदु।**
पति-बिनु अति पारतु बिपति मारतु मारुतु मंदु ॥८६॥

चंद्रताप

विरहाने पीडित नायिकेचा ताप, चंदन, गजरे, चांदणी सहल इ. शीतोपचाराने शमवू बघते, त्यावेळीं नायिका म्हणते, "सखे, ही चंदनउटी, मोगऱ्यांचे गजरे, चांदण्याचे स्नान, हे सारे उपचार माझे वैरी झाले आहेत ग. हे सारे सौख्याऐवजी संतापच देतात आणि मंदपवन तर माझ्या प्राणावरच उठला आहे."

चंदन गजरे मोगरा चंद्र देतसे ताप।
पति विरही अति दुरित ये, मंदपवन हो शाप॥८६॥

अनुक्रमणिका

*   *

८७ **चलन न पावतु निगम-मगु जगु, उपज्यौ अति त्रासु।**
कुच-उतंग गिरिव गह्यौ मैना मैनु मवासु॥८७॥

अनंग चोर

नायिकेच्या कामोद्दीपक कुचांची शोभा आठवीत नायक स्वगत उद्गारतो, “या कुचरूपीं उत्तुंग शैल शिखरावर अनंगचोरांचा सदैव निवास आहे. त्यामुळे वाटसरांना मोठा घोर लागला आहे. जग काही सरळमार्गानं जाऊ शकत नाही. वहिवाटीच्या वाटेवरच हे या ठगांचं संकट आल्यामुळंच ती वाट बिकट ठरली (आणि वाकडी वाट धरणं प्राप्त झालं.)”

कुच उत्तुंग गिरीवरी अनंग घातक चोर।
बिकट वाट वहिवाटिची वाटसरांना घोर॥
कुचलावे तरि तया कसे, बनले धीट मुजोर।
निकट जाउनी व्हायचें चोरावरती मोर॥८७॥

*   *

८८ **त्रिबली, नाभि दिखाइ, कर सिर ढकि सकुचि, समाहि।**
गली, अली की औट कै, चली भली बिधि चाहि॥८८॥

आंतर दर्शन

नायकाला बघताच नायिकेने जी मनमोहक हालचाल केली आणि आपलं प्रेम प्रगट केलं, ती आठवून नायक म्हणतो, “मला समोर पाहून व संकोच वाटलासे दाखवून तिनं डोळ्यावर पदर घेण्याच्या मिषानं हात ऊंचावून, आपले मंदोदर, त्रिवली व निम्ननाभि आदिंचे आंतरदर्शन घडवीत व सखीच्या चोरून माझ्याकडे पहात गल्लीतून पसार झाली.”

लोकलाज लटकीच ती दावित सखि संकोच।
झांकित मुख पदरांतली, सन्मुख बघतां तोंच॥
त्रिवली सुंदर नाभि ती दिसे उचलतां हात।
चुकवित नजर सहेलिची चोरुनियां पहात॥
आंतर दर्शन गोजिरें घडवुनियां निमिषांत।
शिरली बिजली ती जशी वाकड्याच वळणांत॥८८॥

*   *

८९ **देखत वुरै कपूर ज्यौं उपै जाइ जिन, लाल।**
छिन छिन जाति परी खरी छीन छबीली बाल ॥८९॥

अनुक्रमणिका

छबीली

नायिका विरहक्षीण झाल्याचं सखी वर्णन करते, "हे ब्रिजलाल तुझ्या विरहात ती दिवसेंदिवस इतकी क्षीण होत आहे की एखाददिवशी ती छबीली कापरासारखी भुर्रकन उडून जाईल."

दिसंदीस ती क्षीण होतसे विरहानें ब्रिजलाला।
कापरापरी जाइल उडुनी क्षणीं छबीली बाला॥८९॥

* *

९० **हँसि, उतारि हिय तैं, दई तुम जु तिहिं दिना, लाल।**
राखति प्रान कपूर ज्यौं वहै चुहुटिनी-माल॥९०॥

कर्पूरगौरी

दूती नायकाला सांगते, "ब्रिजलाल, त्या दिवशी तुम्ही आपल्या कंठातील लवंगमाला, मोठ्या प्रेमाने हसून तिला दिलीत. ती माळ तिच्या हृदयाला कापरासारखी जपते."

आठवतो का दिन तो, हांसत दिलीत लवंगमाला।
तिजला अपुल्या कंठामधली काढुनिया ब्रिजलाला॥
जाइल उडुनी आनंदानें कापरापरी काया।
जपते रुळतां तिचिया हृदया तीच माळ यदुराया॥९०॥

* *

९१ **कोऊ कोरिक संग्रहौ, कोऊ लाख हजार।**
मो संपति जदुपति सदा बिपति-बिदारनहार॥९१॥

लक्षित शाम

कुणा समाधानी भक्ताची उक्ती, "मला लक्ष नको नि दशलक्ष नको. ही संपत्ती घेऊन मी काय करूं? केवळ तुझ्या चरणाकडे माझे सदैव लक्ष रहावे हीच माझी मनीषा आहे. हे संकटविमोचन शाम, एवढीच माझ्यावर कृपा कर!"

लक्ष कोटि धनसंपदा नकोच तें सुखधाम।
लक्ष लागलें श्रीपदीं संकट मोचन शाम॥९१॥

* *

९२ **द्वैज-सुधादीधित-कला वह लिखि, दीठि लगाइ।**
मनौ अकास-अगस्तिया एकै कली लखाइ॥९२॥

अनुक्रमणिका

अगस्ताची कळी

नायक व नायिकेने शरदातल्या शुक्ल द्वितियेला चंद्रास्तकाली मीलनसंकेत ठरविला आहे. अगस्तवृक्ष हे संकेतस्थान! आज तो दिवस उगवला. नायिका वडीलधाऱ्या मंडळीत बसलेली आहे. चंद्रास्ताची वेळ झाली. सखी तिला तिथे येऊन संकेताची चतुराईनं आठवण करून देते.

गगन अगस्ताची कळी पहिला येत फुलोर।
अस्ताचलिं शरदांतली रम्य बिजेची कोर॥९२॥

*　　　　*

९३ **गदराने तन गोरटी, ऐपन-आड लिलार।**
हूठ्यौ दै, इठलाइ, दग करै गँवारि सुवार ॥९३॥

रानगौरी

कुणा ग्रामीण तरुणीला, मुरकताना पाहून नायक स्वगत म्हणतो, “ती भरदार तनुयौवना, रासवट नटमोगरी, ललाटावर आडवी चिरी रेखून, आपल्या डोळ्यांनी हासत मुरडत हृदयाचा अचूक ठाव घेते.”

गोरटी तरणीताठीं रानटी नटमोगरी।
कुंकवाची चिरी भाळी, ठेवी हात कटीवरी॥
मुरके लचके, फिरके भोवतीं रानभिंगरी।
नेमका घाव घालोनी करी घायाळ सुंदरी॥९३॥

*　　　　*

९४ **तंत्री-नाद, कबित्त-रस, सरस राग, रति-रंग।**
अनबूडे बूडे, तरे जे बूडे सब अंग॥९४॥

रसमग्न

संगीत, काव्यरस आणि रमणीरतिरंग यात सर्वस्वाने बुडले तेच खरे तरले. आणि जे ह्यात बुडाले नाहीत, वरवरच तरंगले तेच खरोखर बुडले.

सरस राग, संगीत, तें तंत्री नाद तरंग ।
रसिता कविता कामिनी, अनुरागी रतिरंग ॥
पुनवेची रसकौमुदी चंद्रकलेचा संग।
सर्वांगीं बुडतां तरे, बुडति, न भिजतां अंग ॥९४॥

*　　　　*

९५ **सहज सचिक्कन, स्याम-रुचि, सुचि, सुगंध, सुकुमार।**
गनतु न मनु पथु अपथु, लखि बिथुरे, सुथरे बार॥९५॥

अनुक्रमणिका

विपथ मनोरथ

नायिकेच्या रेशमी कुंतलावर भाळलेला नायक नित्य कर्तव्य विसरून तिच्या भेटीच्या चिंतेत आहे. हे पाहून त्याचा निकटवर्ती मित्र त्याला समजावतो. त्या उपदेशावर नायक म्हणतो, "निसर्गतःच स्निग्ध, कोमल, काळेभोर आणि कुटिल पण अमल अशा सुंगधित केशपाशात माझं मन गुंतून पडलं आहे. मनोरथ पथ अपथ याचा विचारच करीत नाही. केवळ धावत सुटतो."

शाम तरल शुचि कुंतला स्निग्ध गंध अरुवार।
पथ विपथ न मनोरथा, बघता कच सुकुमार॥९५॥

* *

९६ **सुदुति दुराई दुरति नहिं, प्रगट करति रति-रूप।**
छूटैं पीक, औरै उठी लाली ओठ अनूप॥९६॥

झाकाझाक

नायकाने नायिकेचे अधरपान केले. त्यामुळे ओठावर लाली चढली. तिने तो रक्तिमा तांबुल पानाने झाकली. पण तांबुलरस पुसल्यावर चुंबनलाली प्रगट झाली. ते पाहून व तिची रतिलक्षित करून सखी म्हणते, "सखे, मूळची तुझ्या ओठांची रक्तिमा तांबुलरसाने का झाकणार आहे? तो पुसल्यावर देखील, तुझ्या ओठावर आगळीच लाली विलसते आहे."

चुंबन लाली ना लपे, पुसतां तांबुल पाक ।
पडेल उघडी बाइ ग, अधरीं झाकाझाक ॥९६॥

* *

९७ **वेई गडि गाडैं परीं उपट्यौ हारु हियैं न।**
आन्यौ मोरि मतंगु मनु मारि गुरेरनु मैन ॥९७॥

मदन गुलेल

नायकाच्या वक्षस्थली, हारातील मोत्यांचे गोल ठसे उमटले आहेत. ते लक्षून खंडिता नायिका म्हणते, "प्रियकरा, असे संकोचित होऊ नका. तुमच्या वक्षावर वठलेली ती मोत्यांची निर्गुण माळ नव्हे हो, आपल्या सारख्या मत्तमतंगजाला मदनानं गलोल मारून इकडे वळवून आणलं त्या गलोल गोट्यांची ती चिन्हं आहेत."

मोत्यांची ती माळ निर्गुणी, वठला उरिं मणिझेल।
मतंगमन वळवीत आणि हा मारित मदन गुलेल॥९७॥

* *

९८ **नैंक न झुरसी बिरह-झर नेह-लता कुम्हिलाति।**
नित नित होति हरी हरी, खरी झालरति जाति ॥९८॥

अनुक्रमणिका

हिरवी डहाळ

सखी नायकाला नायिकेच्या दरदिनी वृद्धिंगत होणाऱ्या प्रीतीचं वर्णन करून सांगते, "ती प्रेमलता विरहानं करपली असली तरी कोमेजली नाही. प्रीतपालवीनं तिची डहाळ नेहमी हिरवीगार असते."

प्रेमलता विरही जळे, कोमजते न जिव्हार ।
फुटे नव्हाळी पालवी डहाळ हिरवीचार ॥९८॥

* *

९९ **हेरि हिंडौरैं गगन तैं परी परी सी टूटि।**
धरी धाइ पिय बीच हीं, करी खरी रस लूटि॥९९॥

रूपलुटी

नवोढा नायिका सखीसमवेत हिंदोळ्यावर झोके घेत आहे. अचानक नायक तिथे येतो. त्या बरोबर ती संकोचानं तिथून पळ काढण्याच्या निमित्तानं हिंदोळ्यावरून खाली उडी घेते. प्रियतम, त्वरित धांवून तिला अलगद वरचेवर झेलतो आणि आलिंगन देत भुईवर उभी करतो. हा वृत्तांत सखी सख्याना सांगते, "अग, आम्ही बागेत, जांभळी झुल्यावर ऊंच ऊंच झोके घेत होतो. तेवढ्यात तिचा प्रियकर अचानक तिथे आला. संकोचानं तिनं उंच चढविलेल्या हिंदोळ्यावरूनच खाली उडी घेतली. पण त्यानं धाऊन तिला मधोमधच झेलली. ती चंद्रकोरीसारखी कलली आणि त्यानं साळसूदपणे घट्ट आलिंगनाचा आनंद लुटून, त्या भित्रीला पडूं न देता, सरळ उभी केली."

प्रियास अवचित पाहतां, लाजता, दृष्टिक्षेप।
मेघझुल्याहुनि अप्सरा घेइ खालती झेप॥
सांवरि आवरि धाउनी, मधेच धरिला झेल।
भुजांतरी कवळी तिला, खूप साधला खेळ॥
साळसूद पण पहा पुन्हां, घेइ संकटीं धांव।
कळूं न देई ती कुणा रूपलुटीची हाव॥९९॥

* *

१०० **नैंक हँसौंहीं बानि तजि, लख्यौ परतु मुहुँ नीठि।**
चौका-चमकनि-चौंध मैं परति चौंधि सी दीठि॥१००॥

दंतद्युति

नायकाच्या अपराध शंकेमुळे रुष्ट झालेली नायिका उपहासाने हसत हसत आपला राग व्यक्त करते. त्यामुळे नायकाचे डोळे संकुचित होतात. हे पाहून सखी नायिकेला सावरण्याचा प्रयत्न करते. "सखे, तुझं हे सदैव हसणं सोडून दे. त्यामुळं भलताच विपर्यास होतो. या तुझ्या दंतद्युतिमुळं बघणाऱ्याचे डोळे दिपतात आणि तुझा चेहराही त्यांना नीट बघता येत नाही. हे जरा लक्षात घे."

हसूं नको ग अशी सदा, सोड तुझी ही खोड।
दंतद्युति दिपवील ग होइल ना हिरमोड॥
दृष्टीसंभ्रम हा सखे करील जोड विजोड।
चकोरासही रुचेल ना रूपचांदणें गोड॥१००॥

* *

१०१ **प्रगट भये द्विजराज-कुल, सुबस बसे ब्रज आइ।**
मेरे हरो कलेस सब, केशव केसवराइ॥१०१॥

कविकुलकीर्ति

कवी श्री केशव भगवानाचे रूपक आपले पिताश्री केशवराय यांच्याशी करून दुःख हरणाची प्रार्थना करतो, 'हे द्विजकुलोत्पन्न चंद्रवंशीय ब्रिजवासी केशवराय, माझे क्लेश हरण करा.'

केशव केशवराय हे चंद्रवंशिं द्विजराज।
माझे क्लेश हरी तसा केशव तो ब्रिजराज॥१०१॥

* *

१०२ **केसरि कै सरि क्यौं सके, चंपकु कितकु अनूपु।**
गात-रूपु लखि जात दुरि जातरूप कौ रूपु॥१०२॥

सुवर्ण देहिनी

नायिकेच्या गौरांगाचं वर्णन सखी नायकाजवळ करते. "तिच्या गौरांगाची बरोबरी केशर करूं शकणार नाही. चंपक फिका पडेल. तिच्या सुवर्णकांती पुढे जातरूप देखील झांकोळते."

सुवर्णमय देहिनी पाहुनी, सुवर्ण चंपक झुरे।
जातरूप सौंदर्य फिके हो,कोषीं केसर विरे॥
केशरास नच, स्वर्णचंपका तिची न येई सरी।
जातरूपही उणे पाहतां सुवर्ण तनु गोजिरी॥१०२॥

* *

१०३ **मकराकृति गोपाल कैं सोहत कुंडल कान।**
धरयौं मनौ हिय-धर समरु, ज्यौढी लसत निसान ॥१०३॥

मकर ध्वज

सखी नायकाकडे जाऊन आलेली आहे. नायिकेच्या सौंदर्यवर्णनाचा प्रभाव नायकावर पडून तो काममोहित झाल्याचे सखी नायिकेला सांगते 'सखे, गोपालाच्या कानांतील मकराकृति कुंडल थरथरत होते, जणुं काय कामदेवानं त्याच्या हृदयाचं अधिराज्य जिंकून घेतलं आणि त्याच्या विजयाचा मकरध्वज कानांच्या देवडीवर फडफडत होता.'

मुकुंद कानीं डोलती मकरकुंडलें आज।

अनुक्रमणिका

मकरध्वज देवडीवरी, स्मर ह्रदिं करि अधिराज॥१०३॥
कंजनयन दल कंपिता उलता भ्रमता मिलिंद।
थरथरती ती कुंडलें मोहित होइ मुकुंद॥
जिंकुनि मन्मथ गाजवी ह्रदयावर अधिराज।
मकरध्वज देवडीवरी, फडफडतो स्मरसाज॥१०३॥

*　　　　*

१०४ **खौरि-पनिच, भृकुटी-धनुषु बधिकु समरु, तजि कानि।**
हनतु तरुन-मृग तिलक-सर सुरक-भाल भरि तानि॥१०४॥

भ्रूभंग

नायिकेचा भ्रुकुटिभंग पाहून नायक मोहित होतो. “आडव्या भ्रुकुटिधनुष्याचा कंकर ओढून हा कामरूप शिकारी, सूक्ष्म भालतिलकाच्या चंद्राकृती बाणानं तरुण मनोमृगांची पारध करतो आहे.”

कुंकु आडवे कंकर भ्रूधनु खेचित लक्षावधी।
तरुणमृगातें, तिलक भाल शर, विंधित स्मरपारधी॥१०४॥

*　　　　*

१०५ **नीकौ लसतु लिलार पर टीकौ जरितु जराइ।**
छबिहिं बढ़ावतु रबि मनौ ससि-मंडल मैं आइ॥१०५॥

रवि चंद्र युति

नायिकेच्या भालावरील जडावबिंदीची शोभा पाहून मोहित झालेला नायक स्वगत म्हणतो, “तिच्या ललाटावर जडावबिंदी इतकी सुंदर दिसते, की जणु काय, चंद्रमंडलावर येऊन सूर्यच तिची शोभा वाढवीत आहे.”

भालावरती जडावबिंदी खुले चांदण्या रातीं।
चंद्रमंडळी रवि वाढवि कीं विधुबिंबाची कांती ॥
जडावबिंदी शोभली भाली लावित नार।
रवि येई विधुमंडळि वाढवि कांति अपार॥१०५॥

*　　　　*

१०६ **लसतु सेत सारी-ढप्यौ, तरल तरयौना कान।**
परयौ मनौ सुरसरि-सलिल रबि प्रतिबिंबु बिहान॥१०६॥

अनुक्रमणिका

तनुकंप

नायिकेच्या कानांतील ताटंक (दागिना) दाखविण्याचे मिषाने, सखी नायिकेचा तनुकंप सूचित करते. "तिच्या कानांतील ताटंक कंपित तनुमुळें डोलत आहे. तो तिच्या शुभ्र पदरांतून गंगेच्या पाण्यातील, प्रभातसूर्य प्रतिबिंबाप्रमाणे तरळतो आहे."

कानीं कुंडल झाकलें, डुले क्षौम वसनांत ।
भानुबिंब कीं तरल तें, सुरसरिता सलिलांत॥१०६॥

* *

१०७ **हम हारीं कै कै हहा, पाइनु पारयौ प्यौरु।**
लेहु कहा अजहूँ किए तेह-तरेरयौ त्यौरु॥१०७॥

किती ग समजावू!

सखि, नायिकेचा राग ओसरण्यासाठी म्हणते—"आम्ही हां हां म्हणून त्याला थोपविलं अन् समजुतीनं तुझ्या पायी पडायला लावलं, पण तुझा हट्ट आपला कायमच! अशा रागानं भिवया चढवून तुला काय हवंय! तो इथून निघून जावा, अशी का तुझी इच्छा आहे?"

समजाउनि आणले तयाला, तुझिया पडला पायीं।
'हां हां' करितां तुला सारखें अम्ही हारलो बाई॥
परिही ताठा तुझा सरेना, रोष तयावर वाया।
अभिमानें चढवोनी भिवया, लावतेस परताया॥१०७॥

* *

१०८ **सतर भौंह, रूखे बचन, करिती कठिण मनु नीठि।**
कहा करौं है जाति हरि हेरि हँसौंहीं डीठि॥१०८॥

रागाविर्भाव

सखीनें नायिकेला मान कसा धरावा, यासंबंधी शिकवण दिली. पण प्रियकराला पहातांच तिला हसूं आलं व तिचा अविर्भाव कांही टिकला नाहीं. आपल्या या विवशतेचा वृत्तांत नायिका सखीला सांगते, "सखे, तूं सांगितल्याप्रमाणे सगळं केलं बघ, भिवया काय चढवल्या, लटक्या रागाचा आव काय आणला, डोळे उदासीन केले, कटुवचनं उच्चारून दूर सरून बसले, पण हें सारं व्यर्थ गेलं. हे डोळेच घातकी मेले बघतांच हसत सुटले, आणि त्यांनी माझा सारा अविर्भाव लटका पाडला."

हृदय कठिण, भ्रूवक्रता, रुक्षवचन कटु भाव।
यौवन ताठा दाउनी लटका आणित आव॥
हुरहुरते तरि अंतरीं, सोसत अपुला जाच।
काय करूं गा दृष्टि ही, हसे तया बघताच॥१०८॥

* *

अनुक्रमणिका

१०९ **वाहि लखैं लोइन लगै कौन जुवति की जोति।**
जाकैं तन की छाँह-ढिग जोन्ह छाँह सी होति॥१०९॥

चंद्रसाउली

सखी नायिकेच्या तनुद्युतीची नायकाजवळ प्रशंसा करते—"तिच्या अंगकांतीची तुलनाच होऊ शकत नाही. दुसरी कुणी रमणीही तिची बरोबरी करू शकत नाही. तिच्या द्युतिमुळं चांदणं देखील तिच्या पडछायेसारखं वाटतं."

तुले न युवती अन्य ती, अंगकांति अभिराम।
पडछायेपरि चांदणे तिचिया निकटीं शाम॥१०९॥

* *

११० **कहा कहौं वाकी दसा, हरि प्राननु के ईस।**
बिरह-ज्वाल जरिबो लखैं मरिबौ भई असीस॥११०॥

विरह वेदना

सखी नायकाला, नायिकेची विरहवेदना कळविते—"हे, प्राणेश, तिची विरहदशा मी काय सांगू! विरहज्वालेने तिला जिवंत जळतांना पाहून, मरणानंच तिची सुटका झाली तर बरं असं वाटतं."

काय दशा सांगू तिची हे हरि प्राणाधार।
विरहें मरणीं मारता मानिल ती उपकार॥११०॥

* *

१११ **जेती संपत्ति कृपन कैं, तेती सूमति जोर।**
बढत जात ज्यौं ज्यौं उरज, त्यौं त्यौं होत कठोर॥१११॥

गर्वकठोर

कविची प्रास्ताविक उक्ति 'कृपणाजवळ जेवढी संपत्ती जास्त, तेवढीच कठोरताही वाढत जाते. उरोज जसजसे वाढत जातात तसतसे अधिकच कठोर होत असतात.'

कृपण संपदा वाढता अधिकाधिक ये जोर।
उरज जसजसे वाढती अधिकच होति कठोर॥१११॥

* *

११२ **ज्यौं ज्यौं जोबन-जेठ दिन कुचमिति अति अधिकाति।**
त्यौं त्यौं छिन छिन कटि-छपा छीन परति नित जाति॥११२॥

जौवनवंती

नायिकेच्या शरीरावरील यौवनागमाची मधुर चाहूल व सौंदर्यशोभा सखी नायकाला सांगते—"जसजशी यौवनरूपी जेष्ठमासात कुचरूपी दिनाची सीमा वाढत जाते, तशी तशी कटिरूपी रैन क्षणाक्षणाला संकुचित होते" (इकडे कुचविस्तार तिकडे कटिसंकोच).

जेष्ठ यौवन दिनापरी कुच सीमा विस्तार।
आकुंचित कटि रैन हो क्षण क्षण क्षीणाधार॥११२॥

* *

११३ **तेह-तरेसै त्यौंरु करि कत करियत हग लोल।**
लीक नहीं यह पीक की, श्रुतिमनि झलक कपोल॥११३॥

तांबुलपीक

पहाटेच नायक नायिकेकडे आला आहे. अनवधानानं, त्याच्या गालावर लागलेला तांबुलपीक न पुसता राहिला आहे. तो पाहून नायिका रागावते. पण चतुर सखी ते सावरून घेण्यासाठी व नायकाला सूचित करण्यासाठी म्हणते, "अग भिवया चढवून एवढी रागवतेस कशाला? त्यांच्या कपोलावर तो काही तांबुलपीक नव्हे वेडे. कानातील लालमण्याची झाक गालावर पडली आहे. तिच्यावर रागवण्यात काय अर्थ?"

रागे भिवई चढविसी, हारवलाच हरीख।
संशय बाई तो तुझा, चंचंल नयनीं तीख॥
झांक पडे झांकले न तें कानांतिल माणीक।
गालावरती कवडसा, नव्हेच तांबुल पीक॥११३॥

* *

११४ **नैंक न जानी परति, यौं परयौं बिरह तनु छामु।**
उठति दियैं लौं नाँदि, हरि, लियैं तिहारौं नामु ॥११४॥

उत्कंठिता

दूती, नायकाला, नायिकेचा विरह निवेदित करिते — "विरहामुळे ती इतकी क्षीण झालेली आहे की, ती सहजपणे दिसून देखील येत नाही; निर्जीव भासते. पण तुमचं नांव कानी पडताच, विजेच्या शलाकेसारखी तेजाळून उठते."

विरहानें अति क्षीण ती, दिसे न दुबळा देह।
तुझे नांव परि ऐकतां ज्योतिर्मय हो गेह॥११४॥

* *

११५ **नभ-लाली चाली निसा, चटकाली धुनि कीन।**
रति पाली, आली, अनत आए बनमाली न॥११५॥

अनुक्रमणिका

कुठे कंठिली रात

उत्कंठिता नायिका सखीला म्हणते, “सखे, पहाटेच्या काळोखात अरुणलालीची कोवळी छटा दिसू लागली. चिमण्यांची किलबिल सुरू झाली. पण वनमाली अजून आले नाहीत. मला वाटतं त्यांनी कुठंतरी अन्य रमणीसह हा रात्र घालविली असावी.”

नभलाली चाळते निशा, चिंव चिंव वनकुंजांत।
क्षितिजावर अरुणिमा उठे, झुंजुंमुंजुं येइ प्रभात॥
ये न अजुनि वनमाली सखे, सरली सारी रात।
अन्य कुणा रमणीशी गमे रमला रतिरंगात॥११५॥

* *

११६ **सोवत सपनैं स्यामधनु मिलिहिलि हरत बियोगु।**
तब हीं टरि कित हूँ गई, नींदौ नींदनु जोगु॥११६॥

स्वप्नरंजन

नायिकेने नायकाला स्वप्नात पाहिले, आणि तेवढ्यातच तिची नीज चाळवली. मध्येच सौख्यात असा बिब्बा घालणाऱ्या नीजेला ती म्हणते, “अग, स्वप्नात त्यांची भेट झाल्यामुळे, मी माझे वियोग दुःख विसरले. केवढा आनंद झाला होता मला! पण मेली ही नीज जन्माची दुष्ट नि अवखळ! ऐनवेळी ती पळाली, अन् माझे डोळे उघडले! दुष्ट मेली! आता मी तिला म्हणू तरी काय? आपलच नशीब खोटं!”

आलिंगन बंधनांत मी, स्वप्निं पाहिला शाम।
कुरवाळित हनु शांतवी विरह काम सुख धाम॥
ऐनवेळिं पापणीतुनी पळते मेली नीज।
पदराने पुसते पुन्हां छळता डोळे भीज॥११६॥

* *

११७ **संपति केस, सुदेस नर नवत, दुहुनि इक बानि।**
विभव सतर कुच, नीच नर, नरम विभव की हानि॥११७॥

वळणाचे पाणी

कविची प्रास्ताविक उक्ति- “श्रेष्ठपद प्राप्त झाल्यावरही, कुलवंत आणि कुंतल विनम्रतेनंच रहातात. पण तीच श्रेष्ठता कुचांना आणि नीचाना प्राप्त झाली, तर ते अधिकच ताठर बनतात. पण विभवकाल संपला कीं त्यांना कोणी विचारीत नाही—ते आपोआप नरम पडतात.”

वैभवांतही लीन हो कुंतल केश कुलीन।
ताठरती कुच, नीच ही-सरता होती दीन॥११७॥

* *

अनुक्रमणिका

११८ **कहत सबै कबि कमल से, मो मत नैन परवानु।**
नतरुक कत इन बिय लगत उपजतु बिरह-कृसानु॥११८॥

वणवा

पूर्वानुरागात नायिका सखीला सांगते, "सर्वच कवी, कमलांची नयनांना उपमा देतात. पण मला वाटतं ते खरे वज्रपाषाणच आहेत. म्हणूनच नजरानजरांची टक्कर झाल्यावर ठिणगी उडते आणि विरहवणव्यानं सारा देह पेटून उठतो."

कमलापरी ती लोचने-देती कवि उपमान।
गमती मजला नेत्र ते कठिण वज्रपाषाण॥
दृष्टी दृष्टीस लागतां ठिणगी उडते जाण।
यौवन मदनासहित हे सहज पेटते रान॥
वाढवि वणवा वाहूनी समीर निस्संदेह।
अश्रूंनीहि विझे न तो आंतुनी जळतो देह॥११८॥

* *

११९ **हरि हरि! बरि बरि उठति है, करि करि थकी उपाइ।**
वाकौ जुरु, बलि बैद, जौ तो रस जाइ तु जाइ॥११९॥

रसौषधि

सखी, नायकाला नायिकेची विरहव्यथा कथन करते—"हाय! हाय, 'हरि,हरि' करीत ती क्षणाक्षणाला तळमळत उठते. माझे तर सारे उपाय थकले—काही गुण नाही. हे वैद्यराज आता आपण तिला सांभाळा, मी तुमचे पाय धरते. तिला प्रीतीरस पाजताच ती खास बरी होईल आणि ती रसौषधि तुमच्यावाचून तिला कोण देणार? तेव्हा चला. आता घाई करा."

हाय, हाय, असहाय ती, थकले सर्व उपाय।
उठते बसते, तळमळे कोमजली मृदु काय॥
सखि माझी ती वाचवा, धरिते तुमचे पाय।
प्रीती रस तिज पाजुनी, धावुनिया कविराय॥११९॥

१२० **यह बिनसतु नगु राखि कै जगत बड़ौ जसु लेहु।**
जरी विषम जुर जाइयै आइ सुदरसनु देहु॥१२०॥

विषमज्वर

विरहिणी नायिकेची दशा, सखी पत्रद्वारे नायकाला कळविते, "हे कांतिहीन, मलीन होऊ पहाणारं स्त्रीरत्न वांचवून आपल्या पदरी यश घ्या. आपल्या सुदर्शनानं तिचा हा विषमज्वर सहज उतरेल"

विषमज्वर उतरेल तो-जरी सुदर्शन द्याल ।

अनुक्रमणिका

वाचविणें स्त्री रत्न हें तव हातीं ब्रिजलाल॥१२०॥

*   *

१२१ **या अनुरागी चित्त की गति समुझैं नहिं कोइ।**
ज्यौं ज्यौं बूड़ै, स्याम रँग, त्यौं त्यौं उज्ञल होइ॥१२१॥

आगळी रीत

एका भक्ताची उक्ति—"या अनुरागी हृदयाची रीत कांही आगळीच आहे. शामरंगांत रंगताच ते अधिकच उज्वल होतं."

प्रणयिजनांच्या अनुरागाची कळे न कांही रीत ।
शामरंगिं रंगतां चित्त हें उज्वल होय पुनीत॥१२१॥

*   *

१२२ **बिय सौतिनु देखत दई अपने हिय तैं, लाल।**
फिरति सबनु मैं डहडही उहैं मरगजी माल॥१२२॥

प्रीति निर्माल्य

प्रेमगर्विता नायिकेची ऐट, तिचा तोरा सखी नायकाला सांगते—"हे सुभग, अन्य सवतींना पाहून, तुम्ही तिला दिलेला हार, मोठ्या दिमाखानं त्याच्यासमोर गळ्यांत घालून मिरविते आहे."

सवतीतें पाहुनी, दिलेला हृदयावरला हार।
प्रफुल्ल वदनें निर्माल्याचा मिरवी ती उपहार॥१२२॥

*   *

१२३ **छला छबीले लाल कौ नवल नेह लहि नासि।**
चूँबति चाहति, लाइ उर पहिरति, धरति उतारि॥१२३॥

प्रेममुद्रिका

पूर्वानुरागिणी नायिकेच्या प्रेमदशेचं वर्णन सख्या आपसात करीत आहेत. "प्रियकराच्या प्रेमाची साक्षी, ती भेटअंगठी तिला लाभताच, ती कुठं ठेऊं नि कुठं नाहीं, असं तिला झालंय. तिचं चुंबन घेत ती हृदयाशी काय धरते! पुन्हा पुन्हा तिच्याकडे बघते-कुणी चोरून बघतील या भीतीनं संकोचून बोटातून काढून पोटी खोचून ठेवते. पण तिच्या या कृतीमुळंच मनात असलेलं प्रेम उघडं पडतं. हे तिला काही कळत नाहीं."

भेटीची अंगठी तिच्या अंगुलीत अरुवार।
चुंबित लावी हृदयास ती बघुनी वारंवार॥
संकोचित कुणि पाहतां, काढुनि घे निमिषांत।

[अनुक्रमणिका](#)

पोटीं खोचुनि ठेविते-लपे न प्रीति मनांत॥१२३॥

* *

१२४ **नित संसो हंसौ बचतु, मनौ सु इहिं अनुमानु।**
विरह-अगिनि-लपटनु सकतु झपटि न मीचु-सचानु॥१२४॥

विरही हंसी

सखी नायकाला नायिकेचा विरह निवेदित करते—“विरहामुळं, आतां मरते कीं मग, अशी केविलवाणी तिची स्थिती झालेली आहे. तिचा प्राणहंस, काळससाण्याच्या पकडीतून अलगद निसटतो. श्वास अजून चालू आहे. काळ पक्षी टपून बसलेला आहे-पण विरहज्वाला धगधगत असल्यामुळें-ससाण्याला त्या हंसीवर झेप घेतां येत नाहीं.”

मरणीं मरते मोहना, तुझा लागला ध्यास।
प्राणहंस तो तळमळे, अजुन चालतो श्वास॥
विरहज्वाला पोळती, घालि सारखी खेप।
काळससाणा घेइना हंसीवरती झेप॥१२४॥

* *

१२५ **थाकी जतन अनेक करि, नैंक न छाडति गैल।**
करी खरी दुबरी सु लगि तेरी चाह चुरैल॥१२५॥

अतृप्त कामना

सखी नायकाला नायिकेचा विरह जाणवते, “तुझ्याबद्दलच्या अभिलाषेनं तिला अगदी दुर्बल करून टाकलं आहे. तीच तिला सारखी छळते आहे. कितीही यत्न केले तरी तुझी कामना तिला सोडीत नाहीं.”

टळे न टळतां ही बला, अबला दुर्बल हाय।
तुझी कामना सोडिना थकले सर्व उपाय॥१२५॥
(सोडी न आस चुडेल ती थकले सर्व उपाय)

* *

१२६ **लाज गहौ, बेकाज कत घेरि रहे, घर जाँहि।**
गोरसु चाहत फिरत हौ, गौरसु चाहत नाँहि॥१२६॥

गोरस चोर

स्वयंदूतिका नायिका श्लेषवचनानं आपला अभिप्राय प्रियकराला कळविते. सोबतच्या गौळणींना वाटतं ती त्याला चांगली खडसावत आहे, “अहो आम्हाला असे वाटेवर का अडविता? तुम्हाला हवं असलेलं दहिदुधाचं दान तर आम्ही अगोदरच दिलं आहे. जरा थोडी लाज धरा. गरती नारींना असं अडवणं बरं नव्हे. मनाची नाही तरी जनाची असू द्या.

अनुक्रमणिका

आम्हाला घरी जाऊ द्या. तुम्हाला गोरस हवा असला तर तो घरी मिळेल-असा भररस्त्यावर नव्हे!"

वाट अडवितां कां अशी, नसतां कांहीं काज।
चोरुनि गोरस मागशी, धरी जनांची लाज॥
सांजवेळ सरतांच ही, देइन सदनीं आज।
मिळेल घरिं धारोष्ण ही गोरस तो रसराज॥१२६॥

* *

१२७ **धाम घरीक निवारियैं, कलित ललित अलिपुंज।**
जमुना-तीर तमाल-तरु-मिलित मालतीपुंज॥१२७॥

मीलन संकेत

स्वयंदुतिका नायिका आपल्या वचनचातुरीन संकेतस्थान सुचवीत, प्रियकराला तिकडे भेटायला सांगते. "यमुनातीरीं तमालतरूंच्या गर्द छायेजवळ, भ्रमरगुंजित अशा मालतीकुंजात ही दुपारची वेळ विश्रांतिला चांगली आहे."

उन्हातले विश्रांतिस्थल तें, यमुनातट कांतार।
तमालतरु अलिंगिति छाया, कळे न ग्रीष्म दुपार॥
सुमनसंग गुंजारव मंजुल करिलोलुप अलि पुंज।
मुकुल उमल बोलावित जवळी मालति मीलन कुंज॥१२७॥

* *

१२८ **उन हरकी हँसि कै, इतै इन सौंपी मुसकाइ।**
नैन मिलैं मन मिलि गए दोऊ, मिलवत गाइ॥१२८॥

गोदान

नायक सकाळी आपल्या गायी वनात चरायला घेऊन निघाला. नायिकेने आपली गायही त्या कळपात घातली. त्याचवेळी दोघांची दृष्टभेट झाली आणि मनात मन मिनले. सखी सखीला सांगते, "नायकाने हसतच कळपात गाय घालताना तिला अडवले व तिनेही मुरकत मुरकत हसून आपली गाय कळपात घातली. या मेळातच डोळेभेट घडली आणि गोदान साधलं."

गोधन घेउनि तो निघे चारावया वनांत।
गाय आपुली घालते चतुरा ती कळपांत॥
अडवी हांसत सोपवी ती ही मुरकत मान।
नैना नैन, मिनली मनें, सहज घडे गोदान॥१२८॥

* *

अनुक्रमणिका

१२९ **परयौ जोरु, विपरित रति रुपी सुरत-रन-धीर।**
करति कुलाहलु किंकिनी, गह्यौ मौन मंजीर॥१२९॥

पुरुषाथित

रंगमहालातील सख्या किंकिणी नादावरून, प्रौढा नायिकेच्या विपरीत रतिचे अनुमान करीत, आपसात बोलत आहेत,—"मंजीर पुल्लिंगी असल्यामुळे नायकाचा पक्ष धारण करून, नायकाच्या वरचढ वृत्तीला सहाजिकच उत्तेजना देतो. पण आज कसा मुका मैंद बनला आहे. आणि ही किंकिणी, नायिकेच्या पक्षाची पण नेहमी दबून बसल्यामुळे मुकी व अबोल असणारी आज आनंदानं कोलाहल करीत आहे. यावरून वाटतं नायिकेचा प्रतिद्वंदीजोड खाली निपचीत पडला असून ती सुरतरणधीरा त्याच्यावर मात करीत आहे."

झाले ग विपरीत हे वरी सुरत रणधीर।
कोलाहल करि किंकिणी, मौन होति मंजीर॥
स्तंभित होती पाहतां काय उलटलें द्वंद।
पडे बांधला सुंद तो वरचढ हो उपसुंद॥१२९॥

* *

१३० **बिनति रति विपरित की करी परसि पिय पाइ।**
हँसि, अनबोलैं हीं दियौ उतरु, दियौ बताइ॥१३०॥

मूक संमति

सखी सखीला सांगते—"प्रियकराने तिचे पाय धरून विपरीत रतीची विनंती केली. तिने, काही न बोलतां, दिव्याकडे वळून हळूच फुंकर घालून दीप मालविला."

विनवी प्रियतम बहुपरी होउनि पदीं विनीत ।
रति विपरीत करावया नयनांनी खुणवीत॥
बाहुपाशीं ओढुनी प्रियेस घेइ समीप।
हसे हळूंच न बोलतां, शयनिं मालवी दीप॥१३०॥

* *

१३१ **कैसे छोटे नरनु तैं सरत बडनु के काम।**
मढ़यौ दमामौ जातु क्यौं, कहि चूहे कैं चाम॥१३१॥

थोर ते थोर

कवीची प्रास्ताविक उक्ति—"छोट्या माणसाकडून मोठी कामं कशी पार पडणार? उंदराच्या चामड्यानं नगारा कसा मढवितां येईल?"

करुं शकेना सान ते, जें थोरांचें काम।

अनुक्रमणिका

मढेल कैसी दुंदुभी लाउनि उंदिरचाम॥१३१॥

* *

१३२ **सकत न तुव ताते बचन मो रस कौ रसु खोइ।**
खिन खिन औटे खीर लौं खरो सवादिलु होइ॥१३२॥

आटीव दूध

सकाळी अपराधी नायकाला पाहून प्रेयसी त्याला परुष वचनांनी ताडते. शठ नायक गोड बोलून, तिचा राग शांतविण्याचा प्रयत्न करतो—"तुझे हे तापलेले बोल, माझ्या प्रेमानंदाचा स्वाद अधिकच वाढवीत आहेत. प्रतिक्षणी कढत असलेल्या आटीव दुधाचा स्वाद आणखीच मधुर व रुचकर होत जातो."

राग तुझा नित वाढवी अधिक प्रीतिचा स्वाद।
पळ पळ आटुनि दूध, दे अमृतमय आस्वाद॥१३२॥

* *

१३३ **कहि, लहि कौनु सकै दुरी सौनजाइ मैं जाइ।**
तन की सहज सुबास बन देती जौ न बताइ ॥१३३॥

कांचनगौरी

सखी, नायिकेच्या गौरवर्णाचं व तिच्या अंगसुगंधाचं रसमय वर्णन करीत नायकाची अभिलाषा चेताविते. "ती सोनजाईत लपली असता वेगळी दिसत नाही. फक्त अंगसुगंधावरून, ती तिथे असावी, असं वाटतं."

सोनजाइतुनि सोनसळी, दिसे न लपले अंग।
सहज परी तनुगंध तो कळवि आगळा रंग॥१३३॥

* *

१३४ **चाले की बातैं चली, सुनत सखिनु कैं टोल।**
गोएं हूँ लोइन हँसत, बिहँसत जात कपोल॥१३४॥

पहिली रात

नायिका अनूढा, परकीया, मुदिता आहे. ज्याच्यावर तिचं प्रेम होतं त्याच्याशी तिचा विवाह झाला नाही. आज तिची पहिली मीलनरात आहे. तो तिच्या श्वशुरगृहाजवळच रहातो. त्याला भेटायला मिळेल या आशेने ती सासरी जायला उत्सुक आहे, पण माहेर सोडतानाही तिला वाईट वाटतंच. आनंदाचं हंसू या दुःखापेक्षा अधिक आहे—ते गालावर उमटतं. हे पाहून सखी म्हणते—"सासरी जायचं आहे, हे कळताच,प्रियकर भेटीच्या आतुरतेचा आनंद माहेरच्या ताटातुटीच्या दुःखावर मात करून गालावर उमटतोच. ती दाबते—पण दबत नाही".

सखी सहेलींचा थवा, कुजबुजतो परसांत।
चिडवित, आज कनी अमुची आली मीलन रात॥
आनंदोत्सुक ती मनीं, अधरि हसूं लपवीत।
परि बाई गालावरी रंगवि लाज गुपीत॥१३४॥

* *

१३५ **सनु सूक्यौ, बीत्यौ बनौ, ऊखौ लई उखारि।**
हरी हरी अरहरि अज्यौं, धरि धरहरि जिय नारि॥१३५॥

लवथवती तूर

अनुशयाना नायिकेला सखी धीर देते—“सखे, शेतातला सोनताग सुकला, कापसाचे दिवसही सरले. ऊस होता लपायला, पण त्याचीही तोड झाली. तरी तू घाबरू नकोस, धीर धर! अजूनही पलीकडल्या शेतात, नुकतीच फुलावर आलेली हिरवी तूर उंच माथ्याने लवथवते आहे.”

सोनताग सुकला ग बाई, सरला बघ कापूस।
लपवायाला उंच वाढला तोहि तोडला ऊस॥
धीर धरी तरि देत दिलासा होउं नको आतूर।
येत फुलावर लवथवते ती अजुनी हिरवी तूर॥१३५॥

* *

१३६ **आए आपु, भली करी, मेटन मान-मनोर।**
दूरि करौ यह, देखि हे छला छिगुनिया-छोर॥१३६॥

लपवा ती अंगठी

नायिका अपराधी प्रियकरावर रागवलेली आहे. तिची समजूत घालण्याकरिता तो आला असताना, सखी त्याच्या बोटात अन्य स्त्रीची अंगठी बघून हळूच म्हणते, “कृपया ती अंगठी करांगळी बोटातून काढून लपवा, नाहीतर तिचा राग आणखी भडकेल. फार बरं केलंत, तुम्ही आलात ते, मी स्वागत करते तुमचं, पण ती अंगठी अगोदर लपवा, ती आणखी आग लावील.”

स्वागत हो आलात तें, तिचा घालवा राग।
लपवावी ती अंगठी, उगाच लावील आग॥
मान मुरड अभिमान तो हराल जरि चातुरी।
करांगळीवरली मुदी तिला न मुदिता करी॥१३६॥

* *

१३७ **मेरे बूझत बात तू कत बहरावति, बाल।**
जग जानी बिपरीत रति लखि बिंदुली पिय-भाल॥१३७॥

अनुक्रमणिका

रात्रीच्या खुणा

दंपतीनी रूपपरिवर्तन करून, रात्री विपरीत रतीचा आस्वाद घेतला. नायकाने सर्व श्रृंगार उतरून ठेवला. पण भालावर बिंदी मात्र तशीच राहिली. सखी ते बघून नायिकेची चेष्टा करते, "अग सखे, मी तुला एवढं विचारते तर अशी उडवाउडव का करतेस! प्रियकराच्या भालावरील बिंदीनं, जगाला सांगायचं ते सारं सांगितलं बरं का! असला विपरीत प्रकार लपून रहायचा नाही."

लपविलास कितिही जरी अपुला रात विलास।
भालावरली बिंदुली, सांगे सर्व जगास॥
कळली बरं का बाइ ग तुमची आतुर प्रीत।
भालि उमटली ती चिरी, रति केली विपरीत॥१३७॥

* *

१३८ **फिरि फिरि बिलखी हू लखति, फिरि फिरि लेति उसासु।**
साईं! सिर-कच-सेत लौं बीत्यौ चुनति कपासु॥१३८॥

उध्वस्त संकेतस्थल (कापुसवेंच)

अनुशयाना नायिकेचे संकेतस्थल कापसाच्या शेतात आहे. कापसाचा तिसरा वेचा झाल्यावर कपाशी कापली जाईल व तिचे संकेतस्थल उध्वस्त होईल. त्यामुळं तिला फार वाईट वाटतं. तिच्या या दुःखाचं वर्णन तिची सखी आपल्या मैत्रिणीजवळ करून खेद प्रदर्शित करते, "कपाशीचा शेवटला वेचा करताना, ती लांब उसासे सोडीत आहे. आता कापणीत शेत उजाड होणार—व हे संकेतस्थल मिटणार, या कल्पनेनं ती दुःखित आहे".

टाकि उसासा, श्वास घे, दुःख अंतरीं तेंच।
पुरे होय ती कापणी, तिसरी कापुसवेंच।
हाय अभागी लुंचते जसे पांढरे केंस।
उरे न जागा मीलना—कुठे भरावी शेंज॥१३८॥

* *

१३९ **डगकु डगति सी चलि, ठठुकि चितई, चली निहारि।**
लिए जाति चितु चोरटी वहै गोरटी नारि ॥१३९॥

पापणीतले चोर

नायक दूतीजवळ नायिकेच्या हावभावाचं वर्णन करीत आपलं प्रेम प्रगट करतो— "हंसीसारख्या डौलदार चालीनं डगमग डोलत ती किंचित् थबकली. वाकड्या नजरेनं माझ्याकडे बघत, ती चित्तचोरटी बघता बघता माझं चित्त चोरून नेत आहे".

डगमगती उर चालता थबकत निरखित नार।
चित्तचोरटी गोरटी, दे बिजली चट्कार॥१३९॥

अनुक्रमणिका

*   *

१४० **करी बिरह ऐसी, तऊ गैल न छाडतु नींचु।**
दीनैं हूँ चसमा चखनु चाहै लहै न मीचु ॥१४०॥

अंध अंतक

सखी नायिकेची विरहदशा नायकाला विदित करते,"विरहाने ती इतकी क्षीण व दुर्बल झाली आहे की चाळिशी लाविली तरी ती मृत्यूला दिसनार नाही. हा नीच विरह मात्र तिची पाठ मुळीच सोडित नाही. सारखा तिला छळतो".

चाळिशीतुनी अंतका दिसे न दुबळा देह।
विरह नीच हा सोडिना पाठ तिची तें गेह॥१४०॥

*   *

१४१ **जपमाला, छापैं, तिलक सरै न एकौ कामु।**
मन-काँचै नाचै बृथा, साँचै राँचै रामु ॥१४१॥

भक्तिदंभ

दांभिक भक्तावर कविचा कोरडा—"जपमाळा, तप्तमुद्रा, टिळा लाऊन का कधी प्रभू प्रसन्न होतो! या वरवरच्या उपचारांनी राम मिळत नाही. अंतरंगानं राम रमतो".

वृथाच नाचे घेउनी दंभ टिळा जपमाळ।
राम मिळेना दांभिका, भक्ता मिळे कृपाळ॥
(कांचेपरि प्रतिबिंब ते-मनिं क्षण भंगुर रूप।
सांच्यातुनि ओतिल्या हृदीं मूर्ति वसे अपरूप)॥१४१॥

१४२ **जौ वाके तन की दसा देख्यौ चाहत आपु।**
तौ बलि, नैंक बिलोकियै चलि अचकाँ, चुपचापु॥१४२॥

चतुर दूति

प्रोषितपतिका नायिकेची दूति, तिच्या विरहव्याकुलतेचं वर्णन करून नायकाला तिच्याकडे येण्याला उद्युक्त करते. ती म्हणते—"जर माझ्यावर तुमचा विश्वास नसेल, आणि तिची विकलावस्था तुम्हाला पहायची असेल तर हळूच अगदी गुपचुप माझ्याबरोबर चला. तिला तुमची चाहूल लागता कामा नये. कारण तुम्ही आल्याची जाणीव होताच ती प्रफुल्लित होईल आणि माझं म्हणणं तुम्हाला खोटं वाटेल. तेव्हा त्वरित चला आणि पडताळा पहा".

काय सांगु मी तिची दशा, तो विरहाचा ताप।
कळूं न देताना तिला चला पहा चुपचाप॥
जपून टाका पाउलें-म्हणाल खोटी हूल।
प्रफुल्लिता होइल ती, लागतांच चाहूल॥१४२॥

अनुक्रमणिका

*   *

१४३ जटित नीलमनि जगमगति सीकँ सुहाई नाँक।
मनौ अली चंपक-कली बसि रसु लेतु निसाँक॥१४३॥

निळी मोरणी

नायिकेच्या नासिकेतील निळ्या मोरणीचं नायक कौतुक करीत म्हणतो, "तिच्या चाफेकळीसारख्या सुंदर नासिकेवर नीलमण्याची मोरणी किती छान शोभते. तिची चमक पाहून, चंपकाकडे कधी न झुकणारा भ्रमर, आज लोभून रसलोलुपतेने त्या चंपककलिकेवर बसला आहे असं वाटतं".

नीली मोरणी, नासिका रेखिव, झाक सुरंग।
चांपेकळिवरि निशंक कीं बसे नील रसभृंग॥१४३॥

*   *

१४४ फेरु कछुक करि पौरि तैं, फिरि, चितई मुसकाइ।
आई जावनु लैन, जिय नेहैं चली जमाइ ॥१४४॥

विरजण

नायक आपल्या मनमोहक शेजारणीच्या प्रणयचेष्टिताने अनुरक्त होऊन स्वतःशीच म्हणतो, 'पडवीतून बाहेर पडताना तिनं मागे वळून पाहिलं, डोळे हसत बोलले, "दही जमवायला विरजण मागायला मी आले होते" पण विरजण माझ्या मनात पडलं आणि प्रेम जमवून ती निघून गेली.'

'विसरलेच ग विरजण न्याया' परते लाजत लीन।
पहात माझ्याकडे पुटपुटे लोभस शेजारीण॥
पडलें विरजण मनांत माझ्या जमून आले दही।
चटावली ही मनी चोरटी डोळे आकुनि पिइ॥१४४॥

*   *

१४५ जदपि तेज रौहाल-बल पलकौ लगी न बार।
तौ ग्वैंड़ौ घर कौ भयौ पैंड़ौ कोस हजार॥१४५॥

अंगण

नायक परदेशाहून परतला आहे. गांवसीमेवर पोचताच भेटीची उत्कंठा इतकी वाढली कीं घराचं अंगण शेकडो कोस अंतराचं आहे असं त्याला वाटलं. नायिकेला तो आपल्या प्रेमाधिक्याची जाणीव देत आहे,"प्रिये, इतक्या लांबून घोड्यावरून शीघ्रगतीनं यायला मला पळाचा देखील अवधि लागला नाही, पण अंगण ओलांडताना मात्र शेकडो कोसांचं अंतर कापावं लागलं".

अनुक्रमणिका

वायुगती हा पोंचवी वारु धरीं हो तोष।
अंगण परि हें वाटलें दूर शेकडों कोस॥१४५॥

* *

१४६ **पूस-मास सुनि सखिनु पैं साईं चलत सवारु।**
गहि कर बीन प्रबीन तिय राग्यौ रागु मलारु॥१४६॥

मेघमल्हार

प्रौढा प्रवत्स्य प्रेयसी, प्रियाच्या परदेशगमनाला संगीत अडसर घालण्याचा प्रयत्न करते. सखी इतर सख्यांना सांगते, "पौषाच्या पहाटेला पती दूरदेशी जाणार या कल्पनेने सकाळीच उठून ती मेघमल्हार आळवीत बसली. (अकाल धुंवाधार पाऊस पडला तर त्याचं जाणं लांबेल ही आंतरिक इच्छा!)".

कळलें जातिल ते उद्या पहाट होता दूर।
तो पौषातिल प्रीतिचा वियोग दिन ये क्रूर॥
येवो अडवाया तरी पाउस धुंवाधार।
घेउनि वीणा ती बसे आळवीत मल्हार॥१४६॥

* *

१४७ **बन-तन कौं, निकसत, लसत हँसत हँसत, इत आइ।**
दृगं-खंजन गहि लै चल्यौ, चितवन-चैंपु लगाइ॥१४७॥

खंजन चाप

नायिका आपल्या दाराशी आली. नायक हसत हसत तिकडूनच वनात जायला निघतो. त्याच्या त्या लाघवी दृष्टिक्षेपानं ती त्याच्याकडे आकर्षित झाली व मागोमाग जायला निघाली. सखी तिला अडवून विचारते,"अग, तू निघालीस कुठं?" त्यावर ती उत्तरते, "सखे, मी काय करू ग! तो इकडून हसत हसत आला. माझे दृगखंजन फडफडूं लागले. त्यानं आपल्या मोहक नजरेच्या पाशानं त्यांचे पंख बांधले आणि पापणीचा चाप लाऊन, त्यांना आपल्या मागोमाग वनात ओढून नेत आहे".

पायरीवरी आपुल्या, आले मी बाहेर।
मला पाहुनी हासती ते डोळ्यांचे हेर॥१४७॥

१४८ **मरनु भलौ बरु बिरह तैं, यह निहचय करि जोइ।**
मरन मिटै दुखु एक कौ, बिरह दुहूँ दुखु होइ॥१४८॥

समाधान

परस्परानुरक्त प्रेमीजीवांच्या भेटी गाठी तुटल्या. विरहाने आंतल्याआत तळमळत असता नायिकेचा अंत होतो. त्याचे सुहृद नायकाचे समाधान करतात. "विरह दुःखात सारं आयुष्य घालविण्यापेक्षा या दुःखातून तिची लवकर सुटका झाली यातच तूं समाधान मान.

दोघापैकीं एकतरी सुखी होऊ दे. आणि ती तुझी कोमलांगी प्रिया सदैव दुःखांत राहिल्यापेक्षा तिच्या मरणसौख्यात तूही सुखी हो".

विरह दुःख हें साहिना, येई मरणा कींव।
दोघामधुनी होऊं दे सुखी एकतरि जीव॥१४८॥

* *

१४९ **हरषि न बोली, लखि ललनु, निरखि अमिलु सँग साथु।**
आँखिनु ही मैं हँसि, धरयौ सीस हियैं धरि हाथु॥१४९॥

प्रीति संकेत

सखी सखीजवळ क्रियाविदग्धा नायिकेच्या भावनांचं वर्णन करते. "नायक अमित्र मंडळीच्या मेळात बसला असता, ती मोठ्या चतुराईनं व सूचकतेनं, काही न बोलता, डोळ्यांनी हसत आपल्या हृदयावर हात ठेऊन, व तोच शिरी घेऊन आपली प्रीतिमान्यता त्याला कळवते."

तया पाहतां अनोळखी त्या मित्रांच्या मेळांत।
न बोलतांही नयन हासती उरीं ठेविते हात॥
संकेतानें लाउनि हृदया शिरीं घेतसे तोच॥
सहजपणें ती चतुरा देई तया प्रीतिची पोंच॥१४९॥

* *

१५० **को जानै, है है कहा; ब्रज उपजी अति आगि।**
मन लागै नैननु लगैं, चलै न मग लगि लागि॥१५०॥

व्रजवणवा

पूर्वानुरागिणी नायिका विरहतापाने संतप्त होऊन अंतरंगिनी सखीला म्हणते, "कोण जाणे काय होइल ते, या वृंदावनात आज वेगळाच वणवा पेटला आहे. अगोदर डोळे जळतात आणि मग मानस-सरोवरालाही आग लागते, त्याची धग सोसवत नाही ग!"

कळे न होइल काय तें, व्रजा लागली आग।
नयनालागी, जीवालागी, वणवा जागोजाग॥१५०॥

* *

१५१ **धरु धरु डोलत दीन है, जनु जनु जाचतु जाइ।**
दियैं लोभ-चसमा चखनु लघु पुनि बड़ौ लखाइ॥१५१॥

अनुक्रमणिका

लघु उदारता

लोभनिंदाः कवीची उक्ती, “लोभी माणूस दारोदार याचना करतो. लोभाचा चष्मा लावल्यामुळे, त्याला लघुपुरुषही भारी उदार वाटतो.”

लोभी दावित दीनता फिरतो दारोदार।
लोभ-चाळिसी लाविता, लघुता दिसे उदार॥१५१॥

* *

१५२ **लै चुभकी चलि जाति जित जित जल-केलि अधीर।**
कीजत केसरि-नीर से तित तित के सरि-नीर॥१५२॥

जलकेलि

जलक्रीडा करीत असलेल्या नायिकेकडे दूति नायकाचं लक्ष वेधते. व तिच्या अंगप्रत्यंगाचं व गौरवर्णाचं कौतुक करते, “ती बघा, ती सुवर्णहंसी जलक्रीडा करीत आहे. ज्या ज्या बाजूला ती डुबकी घेते, तिथलं तिथलं सरितेचं पाणी, तिच्या अंगकांतीमुळं केशरी रंगाचं वाटतं.”

घे डुबकी, जलकेलि ती करितां कांपित तीर।
तनुकांतीनें केशरी हो सरितेचे नीर॥१५२॥

जलकेलि करी सरितेत सखी, कलती जलकापित जात जशी।
उरि कुंभ तरंगवि काय वरी, लहरीवर वाहत घेइ उशी॥
चुबके जळ, पाठ पन्हाळ भरे, तरि घे डुबकी वळवीत कुशी।
वलयांतुनि ये वर कंजमुखी, उडवीत तुषार मिलिंद जशी।
कचकुंतल गुंफियलें सलिलों, जलबिंदु सरांतुनि मोतिलरी।
तनुकांति प्रभा जल गौरविते, सरिता जणुं केशरि रंग वरी॥१५२॥

* *

१५३ **छिरके नाह नबोढ-दग कर-पिचकी-जल-जोर।**
रोचन-रँग-लाली भई बिय-तिय-लोचन कोर॥१५३॥

लोचनलाली

सखि संवाद—“जलक्रीडा करताना प्रियकराने आपल्या ओजळींनं प्रियतमेच्या डोळ्यांत पाण्याची पिचकारी मारली. पण त्यामुळं इतर रमणीचेच डोळे लाल झाले!”

नयन नवोढेचे भरी, कर पिचकारी मारि।
होती लोचन लाल ते बघता दुसऱ्या नारि॥१५३॥

* *

१५४ **कहाँ लडैते दग करे, परे लाल बेहाल।**

अनुक्रमणिका

कहुँ मुरली, कहुँ पीतपट, कहुँ मुकुट, बनमाल॥१५४॥

नयनझुंज

नायिकेच्या नेत्रकटाक्षानं घायाळ झालेल्या नायकाचं वर्णन दूती आपल्या सखीजवळ करते. “सखे, तू आपल्या डोळ्यांना भारीच लाडावून ठेवलं आहेस. अन भांडखोर तरी किती! बघ त्यांनी काय प्रकार केला तो! उगाचच बिचाऱ्या मोहनाशी लढत घेतली, आणि त्याचे केवढे हाल केलेत! पीतांबर एकीकडे, वनमाला दुसरीकडे, कुठे मुरली, कुठे मुगुट, अशा बेभान स्थितीत कदंबातळी बिचारा घायाळ होऊन पडला आहे.”

लाडवले डोळे तुझे,प्रियास करि घायाळ।
कुठें मुरलि ती, पीतपट, मुकुट, कुठें वनमाळ॥१५४॥

* *

१५५ **राधा हरि, हरि राधिका बनि आए संकेत।**
दंपति रति-बिपरित-सुखु सुरतहूँ लेत॥१५५॥

विपरीत रती

राधामाधवाच्या रसलीलेतील विपरीत रतीचं वर्णन, सखी, सखीजवळ करते, “राधा, कृष्णाचा वेष धारण करून, ती कृष्ण बनली, आणि राधेची वेषभूषा करून कृष्ण बनले राधा. दोघेही संकेतस्थळी भेटून विपरीत रतीचा आनंद लुटीत आहेत.”

राधा हरि हो, हरी राधिका, सजुनि ठरे संकेत।
दंपति रति विपरीत ती सहज सुरत सुख घेत॥१५५॥

* *

१५६ **चलत पाइ निगुनी गुनी धनु मनि-मुत्तिय माल।**
भेंट होत जयसाहि सौं भागु चाहियतु भाल॥१५६॥

गुणप्रशंसा

गुणहीन व गुणवंत या दोघानांही उपहार देणाऱ्या जयसिंहाच्या औदार्याचा गौरव.

गुणहीनाही धन मिळे, गुणास मौक्तिक माळ।
भाग्य अभाग्याचें खुले-दे जहसिंह नृपाळ॥१५६॥

* *

१५७ **जसु अपजसु देखत नहीं देखत साँवल-गात।**
कहाँ करौ, लालच-भरे चपल नैन चलि जात॥१५७॥

अनुक्रमणिका

निलाजरे

नायिका श्रीकृष्णाकडे सारखी पहात आहे. "कुलवधूनं परपुरुषाकडे असं एकटक बघू नये." असं सखी तिला सांगते. त्यावर नायिका उत्तरते, "काय करूं ग, हे डोळे मेले भारीच लालसी, शामसुंदराला पहाताच त्यांचं भानंच नाहीसं होतं. कीर्ति अपकीर्तिची पर्वा न करता सारखे त्याच्या मागोमाग फिरतात."

काय करूं ग सांवळा मनमोहन अभिराम।
चंचल मन हें धांवतें पाहताच घनश्याम॥
बाई भारिच लालसी, निलाजरे हे नैन।
फिरती मागोमाग ते होउनिया बेचैन॥१५७॥

१५८ **नख-सिख-रुप भरे खरे, तौ माँगत मुसकानि।**
तजत न लोचन लाँलची ए ललचौहीं बानि॥१५८॥

मेले लोभी

नायिका उभी राहून सारखी नायकाला बघते आहे. सखी म्हणते, "अग, एकदा पाहून पुरे नाही का झालं? चल आता निघू या". त्यावर ती म्हणते "थांब ग जरा. माझ्याकडे एकदा पाहून ते हसले की जाऊया. माझे हे डोळे त्यांचं नखशिखान्त सौंदर्य प्यायले खरे, पण मेले हावरे त्यांच्या मधुस्मिताची अजून वाट पहात आहेत. ते काय आपला लोभी स्वभाव जन्मात सोडणार आहेत?"

प्याले ग नखशिखान्त मी सखे सावळे रूप।
पहावया स्मित एकदां गालीं, सौख्य अमूप॥
अडले हें डोळे तिथें कसा आवरू क्षोभ।
अति लोभी ही लोचनें सुटे न यांचा लोभ॥१५८॥

* *

१५९ **छै छिगुनी पहुँचौ गिलत अति दीनता दिखाइ।**
बलि बावन कौ ब्यौतु सुनि को, बलि तुम्हैं पत्याइ॥१५९॥

त्रिपादभूमि

नायिकेच्या गुणरुपावर मुग्ध झालेला नायक, तिची भेट घडवून आणण्यासाठी दूतीला विनवितो. त्यावर त्याची चेष्टा करीत दूती म्हणते, "भलेच आहात की हो तुम्ही! बोट दिलं की मनगट धरायला तयार! याबाबतीत तुमचं पाऊल सदाच पुढे! बलिराजाच्या उदारतेचा फायदा घेऊन बटुवामनानं त्रिपादभूमि बळकावली. मग तुमचा तरी विश्वास कोण धरील? तुमचंही धोरण तेच!"

दिली करांगलि धरितसा मनगट भली न रीत।
पहिलें पाउल टाकुनी बटू त्रिपद जिंकीत॥

अनुक्रमणिका

बळी देत, विश्वासता, घेत बळी, भूदान।
बटु वामन बहु धूर्त ती, मूर्ति दिसे जरि सान॥१५९॥

* *

१६० **नैना नैंक न मानहीं, कितौ कह्यौ समुझाइ।**
तनु मनु हारैं हूँ हँसैं, तिन सौं कहा बसाइ॥१६०॥

दोन जुगारी

पूर्वानुरागिणी नायिका, नायकाला पाहून मंदस्मित करते. "परपुरुषाकडे पाहून असं हसू नये" असे सखीने सुचविताच, ती आपली प्रेमविवशता प्रगट करीत उत्तरते, "अग या डोळ्यांना मी कित्ती सांगते, समजावते, पण यांना नीती अनीतीची मुळीदेखील चाड नाही. बिलकूल ऐकत नाही माझं. पक्के मेले जुगारी आहेत. तनमन पणाला लाऊन जुगार खेळतात आणि हरल्यानंतरही हसतच रहातात! तन आणि मन माझं जातं! त्यांना काय! दुसऱ्याच्या जीवावर खेळणारे मेले हे जुगारी. अगदीच बेशरम आहेत."

ऐकती न ही लोचने, कळे न दृष्टीकोन।
तन मन हरता हासती, खुळे जुगारी दोन॥१६०॥

१६१ **मोहन-मूरति स्याम की अति अदभुत गति जोइ।**
बसतु सु चित-अंतर, तऊ प्रतिबिंबितु जग होइ ॥१६१॥

अंतर्यामिन

शामसुंदराचे स्वरूप मनोमनी भरलेल्या भक्तांचे उद्‌गातर, "मनमोहन माझ्या मनोमनी वसत असला तरी अखिल जगातही मला तोच भरलेला दिसतो".

मोहन मूर्ती सुंदरा तेजोमय अविलंब।
वसे अंतरी रूप तें जगति पडे प्रतिबिंब॥१६१॥

* *

१६२ **लटकि लटकि लटकतु चलतु, डटतु मुकट की छाँह।**
चटक-भरयौ नट मिलि गयौ अटक भटक-बट माँह॥१६२॥

अचानक भेट

राधेला श्रीकृष्णासह भांडीर वनातून बाहेर पडताना सख्यांनी पाहिलं. प्रिय भेटीत घरी यायला विलंब लागला. राधा सारवासारव करीत गौप्य गोपनाचा प्रयत्न करते. "अग त्या भांडीर वनाच्या चक्रव्यूहात मी सापडले. कुठे वाटच दिसेना, कित्ती भटकले. भीती वाटली, काय करावं, काही सुचेना, अगदीं रडकुंडीला आले. पण अखेर दैवानंच खैर केली. आणि शामसुंदराची माझी भेट झाली. त्यांनीच मला त्या घनदाट वनातून वाट दाखवून, बाहेर आणले. त्यांचे उपकार कसे फेडू!"

अनुक्रमणिका

एकटीच वट विटपी भटकत बिकट वाटिका दाट।
बिकट किती, तरि कळे न काही भूल भुलावण वाट॥
लटकत वट पारंबी गुंतवि वेली विटप लपेट।
झुकत झलकतो मुकुट सावरित नटवर देई भेट॥१६२॥

* *

१६३ **मलिन देह, वेई बसन, मलिन बिरह कैं रूप।**
पिय-आगम औरे चढ़ी आनन ओप अनूप॥१६३॥

प्रियागम

'प्रियकर येणार' ही वार्ता कळताच विरहिणीची काया हर्षाने प्रफुल्लित झाली. अंगांगावर नव्या कांतीची झळाळी दिसू लागली. मुखम्लानता विरली. अंगावरील मलीन वसनही खुलून उठले.

तनु म्लान मलिन वसन नेसली विराणी।
कुंतल निस्नेह तसे, दिसत दीनवाणी॥
प्रियकर येतांच परी कांति खुले देहीं।
रोमांचित अंग अंग मोहर मन मोही॥१६३॥

* *

१६४ **रंगराती रातैं हियैं प्रियतम लिखी बनाइ।**
पाती काती बिरह की छाती रही लगाइ॥१६४॥

विरहकातर

'परत येणार' हे वाक्य असलेले प्रियकराचे प्रेमपत्र वाचल्यानंतर तिच्या सुखातुर व बेभान स्थितीचं सखी वर्णन करते, "प्रियकराचं पत्र हातीं पडताच ती सुखावली. आगमनाची वार्ता वाचताच तिचा आनंद गगनात मावेना. ती पत्रिका, विरह कातरून टाकणारी कातरच तिला वाटली."

प्रेमपत्र तें उरीं लावते मिटुनी लोचन पात।
कातर ती हो विरह कातरी, येत चांदणीरात॥१६४॥

* *

१६५ **लाल, अलौकिक लरिकई लखि लखि सखी सिहाँति।**
आज काल्हि मैं देखियतु उर उकसौंही भाँति॥१६५॥

कुंवारशीव

कुंवारशीव ओलांडूं पहाणारी, अंकुरित यौवना नायिकेच्या मखमली अंगावरील ऊर उमल, ती नवी नव्हाळी, सखी नायकाला सांगते, "ब्रिजलाल, तिचा अल्लडपणा पाहून

मैत्रिणींनाही हेवा वाटतो. आजकाल तिच्या मखमली देहावर जरतार गुंफली जात आहे. वक्षस्थळी कमल कळ्यांची उमल दिसू लागली आहे. ती मधून मधून थरथरत्या हातांनी संकोचून आपलं वक्ष चाचपते व या नवलाईन मोहरते.”

बघुनी अल्लडता तिची करिता वेडेचार।
वयें वाढतां मैत्रिणी करुं बघती अनुकार॥
कुंवार सीमा संपता अशांत उमले ऊर।
चाचपते उर आपुले लागे मनिं हुर हूर॥१६५॥

* *

१६६ **बिलखी डभकौंहें चखनु तिय लखि, गवनु बराइ।**
पिय गहबरि आऐं गर राखी लगाइ॥१६६॥

कंठालिंगन

नायकाला सोडून जाताना पाहून प्रेयसीचे डोळे भरून आले. कंठ दाटून आला. तिची शोकाकुल परिस्थिती पाहून नायकाला गहिवर आला व तिला त्याने घट्ट आलिंगन दिले.

तिचिया नयनीं आसवें दाटूनि येई कंठ।
गहिवर येई जिवलगा, आलिंगित आकंठ॥
निघता प्रवास संपवी ही प्रीतिची कीर्त।
उल्लंघील कसा पुढें प्रयाग संगम तीर्थ॥१६६॥

* *

१६७ **प्रतिबिंबित जयसाहि-दुति दीपति दरपन-धाम।**
सबु जगु जीतन कौं करौ काय-ब्यूह मनु काम ॥१६७॥

कायव्यूह

राजा जयसिव्हाने बांधलेल्या शीशमहालाचे व राजसौंदर्याचे कविकृत वर्णन—“ त्या दर्पण धामांत, राजा जयसिंगाची अनेक सौंदर्य बिंबे भरलेली दिसतात. जणूं काय जग जिंकायला काम देवाने हा सौंदर्याचा ‘कायव्यूह’ च रचिला आहे.

नृपति छबी प्रतिबिंबवी अगणित दर्पणधाग।
जग जिंकायाते जणूं ‘कायव्यूह’ रचि काम ॥१६७॥

* *

१६८ **बाल, कहा लाली भई लोइन-कोइनु माँह।**
लाल, तुम्हारे दगनु की परी दगनु मैं छाँह॥१६८॥

अनुक्रमणिका

प्रत्युत्तर

प्रभातसमयी नायक नायिकेच्या घरी आला आहे. अन्य ठिकाणी रात्रीचे केलेले जागरण लालबुंद त्याच्या डोळ्यात अजून तरंगते आहे. ती लाली बघताच नायिकेचे डोळेही क्रोधाने लाल होतात. तरी तो शठकपनाटकी तिचे डोळे लालबुंद होण्याचे कारण विचारतो. "प्रिये! तुझे डोळे असे लाल का ग दिसतात?" ती त्वरित उत्तर देते, "प्रियकरा, ती लाली नव्हे हो, तुमच्या डोळ्यांची अरुणिमाच माझ्या डोळ्यांत प्रतिबिंबित झालेली आहे!"

प्र.—'कां ग तुझे डोळे असे आज भासती लाल'।
उ.—'प्रतिबिंबच नयनांतले अपुल्या तें ब्रिजलाल'॥१६८॥

* *

१६९ **तरुन कोकनद-बरनबर भए अरून निसि जागि।**
वाही कैं अनुराग दग रहे मनौ अनुरागि॥१६९॥

निशिजाग

प्रौढा खंडिता अधीरा नायिकेचे चतुर बोल—"रात्रीच्या जागरणामुळे रक्तकमलासारखे झालेले डोळे किती सुंदर दिसताहेत. रातोत्पलाच्या अनुरागाची अरूण शोभाच उमटलेली भासते."

रक्त कमल नयनीं फुले, अरुणराग निशिजाग।
उमटे हा तव लोचनी रागिणिचा अनुराग॥
घालविली सारी निशा काल कुठें ब्रिजराज।
जागरणाची रक्तिमा नयनीं दिसते आज॥१६९॥

* *

१७० **तजतु अठान न, हठ परयौ सठमति, आठौ जाम।**
भयौ बामु वा बाम कौं रहै कामु बेकाम॥१७०॥

काम विव्हळ

दूती, प्रियकराला नायिकेच्या विरहव्यथेची व कामविव्हलतेची कथा सांगते, "दिनरात अपराधाविना काम तिचा छळ करतो आहे. त्या दुष्टानं तिचा प्राण घेण्याची प्रतिज्ञाच केली आहेसे वाटतं."

छळतो तिजसी सारखा अपराधाविण काम।
आठो प्रहरी चालवी निष्कारण संग्राम॥
बाई भारिच दुष्ट हा बसे मांडुणी ठाण।
दावि वाकडी वाट ही हटवादी घे प्राण॥१७०॥

* *

१७१ **आवत जात न जनियतु, तेजहिं तजि सियरानु।**
धरहँ जँवाई लौं धट्यौ खरौ पूस-दिन-मानु॥१७१॥

घरजावाई

पौष्य मासातील दिवस हा लहान असतो. त्या दिवसाची तुलना कवी घरजावायाशी करतो. "या पौष्य मासांतील दिनमान घर जावायाच्या मानाप्रमाणेच कमी झालेले दिसते. आता आपली उग्रता सोडून तो अगदी थंड पडलेला आहे."

पुसे न कोणी येता जातां कांहिं न उरला मान।
कतिरांहीन घरजावाया परि पौष्यातील दिनमान॥१७१॥

* *

१७२ **चलत चलत लौं लै चलैं सब सुख संग लगाइ।**
ग्रीषम-वासर सिसिर-निसि प्यौ मो पास बसाइ ॥१७२॥

ऋर शिशिर

नायक परदेशी जायला निघाला. विरह व्याकुल नायिकेची सखी तिची समजूत घालून धीर देते. त्यावर ती म्हणते, "बाई ग ते गेलेत खरे पण जाता जाता ही शिशिररात व ग्रीष्मदिवस मला छळायला ठेऊन गेलेत. त्यांची छळणा मी कशी ग सहन करू."

संगे घेउनि सर्व सुखें ही जिवलग जाई दूर।
ग्रीष्म दिवस अन् शिशिर रात ही ठेऊनि मागे क्रूर॥१७२॥

१७३ **बेसरि-मोती-दुति-झलक परी ओठ पर आइ।**
चूनौ होइ न चतुर तिय, क्यों पट-पों छयौ जाइ॥१७३॥

संभ्रमिता

यौवनागमाने नायिकेच्या देहावर नवे तेज आले आहे. या विमलकांतीची झळाळ तिला सर्वांगी सजविते. नाकातील बेसरमोत्याचे तेजकिरण तिच्या ओठावर पडल्यामुळे, तिला सारखा ओठाला चुना लागल्याचा भास होतो. ती तीनतीनदां हातानं पुसते. पण तो पुसता पुसत नाही. ही तिची संभ्रमित स्थिती पाहून, सखी परिहास करीत म्हणते, "अग, तुझ्या ओठावर बेसरमोत्याचं किरणबिंब पडलं आहे तो काही चुना नव्हे. मारे पदरानं पुसतेस ती! तो पुसणार आहे वाटतं!"

अधरीं तुझिया बेसर मोती-झाक, नव्हे ग चुना।
पदरानें पुसतेस सारखी चोरुनि चोरुनि पुन्हा॥१७३॥

१७४ **चितु बितु बचतु न, हरत हठि लालन-दग बरजोर।**
सावधान के बटपरा ए, जागत के चोर॥१७४॥

अनुक्रमणिका

जागृत चोर

पूर्वानुरागिणी नायिका दूतीला प्रियकराच्या डोळ्याचे गाऱ्हाणे सांगते—"अग त्यांचे डोळे सावध डाकू आणि जागृत चोर आहेत. त्यांच्यापासून माझं चित्तधन बचावणं अगदी अशक्य आहे."

जीव जागवुनि घालती, चतुराईनें चोर।
सावधपणि हा दरवडा, नेत्र दरवडेखोर॥
कसें चित्तधन वाचवूं दृग ते बहु बलजोर।
सावध करुनी चोरती जागृतीतले चोर॥१७४॥

*   *

१७५ **बिकसित-नवमल्ली-कुसुम-निकसित परिमल पाइ।**
परसि पजारति बिरहि-हिय बरसि रहे की बाइ॥१७५॥

बैरी सौरभ

वर्षाकालीं नव मल्लिकेचा गंध लुटून वहाणारा वैरी गंधवाह, विरही हृदयांची जाळपोळ करतो. नायिकासखिसंवाद—"सखे नवमल्लिकेचा गंध लुटून वहाणाऱ्या पहिल्या पाऊसधारांनी भिजलेला हा पवन, आपल्या स्पर्शानं माझं हृदय पोळतो जिवलगाची आठवण देऊन जीव जाळतो आहे ग!"

विकसित नव मालतिचा परिमळ, पहिली पाउसधार।
सिंचित जाळी विरही हृदया समीर गंध तुषार॥१७५॥

*   *

१७६ **गोप अथाइनु तैं उठे, गोरज छाई गैल।**
चलि,बलि,अलि, अभिसार की भली सँझौखैं सैल॥१७६॥

संधिकाल

प्रियभेटीसाठी संध्यासमय अभिसाराला अनुकूल असल्याचे दूती नायिकेला सूचित करते. "अग, ओसरीवर आता कुणीच नाही. गोप केव्हाच उठून गेले आहेत. संध्या देखील गोरज धूलीनं धूसर झालेली आहे. यावेळीं अभिसारानिमित्त सहलीला निघण्याची उत्तम संधी आहे. चल, घाई कर. सखे, ही संधी दवडू नकोस!"

कुणी न बघती, सुनी ओसरी गेले ग गोपाळ।
सहलीला ही वेळ चांगली गोरज सायंकाळ।
मोहन परते मागुती विसावते गोकूळ।
डोळे कुणिही रोखितां सहजच उडते धूळ॥१७६॥

*   *

अनुक्रमणिका

१७७ **पहुँचति डटि रन-सुमट लौं, रोकि सकैं सब नाँहि।**
लाखनु हूँ की भीर मैं आँखि उहीं चलि जाँहि ॥१७७॥

लक्षवेध

नायिकेच्या नेत्र कटाक्षाकडे लक्ष वेधित दूती म्हणते, "रणांगणात चढाई करणाऱ्या वीरासारखे, तुझे डोळे, नेमका वेध घेऊन, लक्षावधी लोकातून आपला प्रतिद्वंद्वी हुडकून त्यावर प्रहार करतात, कुणीही त्यांना अडवू शकत नाही."

लक्षावधि सैन्यांत घुसोनी जाय जसा रणधीर ।
कुणी न अडवी , डोळे गाठति लक्ष्य आपुलें नीट ॥
लोकादेखत लक्षवेध तो व्यूह मोडूनी चाल ।
येत पुढें कोवळी धिटाई हतबल हो रखवाल ॥१७७॥

* *

१७८ **सरस सुमिल चित-तुरँग की करि करि अमित उठान**
गोइ निबाहैं जितियै खेलि प्रेम-चौगान ॥१७८॥

कंदुकगोल

सखी नायिकेला शिकवण देते. "वेडे, प्रेम कधी लपून रहात नाही, ते सर्वांगांनी बडबडत असतं. (पोलो खेळावरील रूपक) तुझा चित्तवारू असा ठायीच उडवून काय उपयोग? पुढे चाल करून मैदान मारायला हवं. तुझ्या उठावणीला अडविण्याची कुणाची टाप आहे हे तरी बघू!"

सरस चित्त अनुराग तुरग तो करित उठावण वेंध।
टोलवीत ने खेळ चातुरी चकवित चुकवित गेंद॥
देत नजर कधि लपवुनि छेडुनि घेई तिरका झोल।
सहज जिंकिते प्रेमखेळ ती मारुनि कंदुक गोल॥१७८॥

* *

१७९. **हँसि हँसि हेरतिनवल तिय मद गे मद उमदाति।**
बलकि बलकि बोलति बचन, ललकि ललकि लपटाति॥१७९॥

उन्मादिता

मैत्रिणींनी तिला मदिरा पाजून नायकाकडे नेली. त्या मदिराधुंदित तिनें केलेले प्रीतीचे चाळे दूती सख्यांना सांगते. "मदिरेच्या धुंदीत तिनं काय काय चाळे केलेत म्हणून सांगू! झुकत डोलत, बोलली काय! बरळली काय, पदराची आठवण नाही. लाजेला वाव नाही, हसण्याला मर्यादा नाही. अगदी साखळीची सुटली होती. अशी बेभान तिची दशा. आणि अखेर तर तिनं कहर केला. सगळ्यांदेखत नायकाला अशी कडकडून मिठी मारली की काही पुसू नका!"

अनुक्रमणिका

पिउनी मदिरा उन्मादित ती झुलत झुके मदधुंद।
हसत हसत बोलते-बरळते विस्कटला कचबंध।
पदर उडे उर उघडे घाया सुळीं भीति संकोच।
कसून मारी मिठी प्रियांते दबे दुधारी खोच॥१७९॥

* *

१८० **मिलि चंदन-बेंदी रही गौरैं मुँह न लखाइ।**
ज्यौं ज्यौं मद-लाली चढ़ै, त्यौं त्यौं उघरति जाइ॥१८०॥

मदिर सौंदर्य

नायिकेच्या गौरांगावर मदिरा पिऊन चढलेल्या लालीची दूती नायकाजवळ प्रशंसा करते. व ही धुंद मीलन संधी साधायला उत्तेजित करते. आलेली घडी दवडू नका हा तिचा संदेश, "तिच्या मुखावर लावलेली चंदनाची बिंदी गौरवर्णात मिसळून गेल्यासारखी भासते, पण जशी जशी मदिरेची धुंदी चढत जाते, तशी तशी आलेल्या लालीमुळं ती बिंदी उमटून दिसते."

गौर मुखावर चंदन बिंदीं दिसेन चर्चित भालीं।
निखरून येई चढे जसजशी मधुर मदिरेची लाली॥१८०॥

* *

१८१. **मैं समुझौ निरधार, यह जगु काँचो कॉच सौ।**
एकै रुपु अपार प्रतिबिंबित लखियतु जहाँ॥१८१॥

अनंतरूप

अद्वैतवाद्याचे मनोगत "माझा असा निर्धारित सिद्धांत आहे की जग हे कांच भिंगासारखे आहे. प्रभूचे एकच रूप अनंतरूपांनी वस्तूवस्तूतून दृगोचर होते."

कांच, भिंग सम भासे जग हें असत्य क्षणभंगूर।
अनंत रुपें प्रतिबिंबित हो एकरुप अंकूर॥१८१॥

* *

१८२. **जहाँ जहाँ ठाढ़ौ लख्यौ स्यामु सुभि-गसरमौरु।**
बिन हूँ उन छिनु गहि रहतु दगनु अजौं वह ठौरु॥१८२॥

प्रिय आठव

श्रीकृष्ण गोकुळ सोडून मथुरेला गेले. गोपगोपिकांना हा वियोग असह्य झाला असला तरी दुःखात सुख म्हणून श्रीकृष्ण सहवासाने रमणीय झालेली स्मृतिस्थळे त्यांना अधिकच प्रिय वाटतात. त्याच्या आठवणीतच ते मनाच समाधान करतात.

अनुक्रमणिका

अजुनी नयना सुखविती कुंज पुलिन स्मृति धाम।
जिथे खेळला सावळा मनमोहन अभिराम॥१८२॥

*　　　　*

१८३. **रँगी सुरत-रँग, पिय-हियैं लगी जगी सब राति।**
पड पैंड पर ठठुकि कै, ऐंड-भरी ऐंडाति॥१८३॥

रतिसुख गर्विता

रतिकेली नंतर, प्रेम गर्विता नायिकेची चेष्टा मैत्रिणी आपसात करतात. "प्रियकराच्या मिठीत रात्रभर जागरणात रमलेली नायिका, सवतीसमोर मारे मुरकत कशी मिरवते पहा तरी."

सुरत रंगि रंगली अंगना, अंग अंग सुखसाथ।
आवळीता ती मिठीत जिवलग जागरणाची रात॥
वशीकरण साधलें, मनाशी आठवीत रति भेट ।
गर्वभरें ठुमकते दावित सवतीतें ती ऐट॥१८३॥

*　　　　*

१८४ **लालन, लहि पाऐं दुरै चोरी सौंह करैं न ।**
सीस-चढ़े पनिहा प्रगट कहै पुकारैं नैन ॥१८४॥

शपथ सांगतो

नायक अन्य स्त्रीकडून सकाळी परत आला आहे. व तो शपथेवर आपला अपराध लपविण्याचा प्रयत्न करतो आहे. पण त्याच्या डोळ्यातील लाली छपत नाही. त्याचे समर्थन ऐकून नायिका म्हणते, "अहो, शपथ खाऊन का कुठं चोरी लपणार आहे? तुमचे डोळेच, काय सांगायचं ते ओरडून सांगताहेत की."

आण घालिता लपे न चोरी, हे अंतरिचें हेर ।
नयन सांगती ओरडून ते काय आंत बाहेर ॥१८४॥

*　　　　*

१८५. **तुरत सुरत कैसें दुरत, मुरत नैन-जुरि निठि ।**
डौंडी दै गुन रावरे कहति कनौडी डिठि ॥१८५॥

नजर चोर

प्रौढ खंडिता अधीरा नायिकेनं केलेली प्रियकराची पुष्पपूजा. "नुकतंच कार्य संपलेलं दिसतंय, डोळ्याला काही डोळा देता येत नाही. नजर कावरी बावरी दिसते. चुकून नजरानजर झाली तर डोळे खाली झुकतात. ही तुमची चुकवाचुकवीच आंतलं गुपित बडबडते."

अनुक्रमणिका

सुरत सांगते सुरत ही सरली ती नुकतीच ।
नजर चुकविते चोरटी नजरा नजर न तीच ॥
चुकून मिळतां टाळते, करित नयन संकोच ।
देति दवंडी पिटुनिया अपराधाची पोंच ॥१८५॥

* *

१८६ **मरकत-भाजन-सलिल-गत इंदुकला कैं बेख ।**
झींन झगा मैं झलमलै स्यामगात-नखरेख ॥१८६॥

नखलेखा

अन्य स्त्रीशी केलेल्या रतिसमरांत नायकाच्या वक्षस्थलावर नखक्षत उमटले आहे. ते पाहून खंडिता नायिका म्हणते, "पाण्यानं भरलेल्या नील पात्रात चंद्रकलेचं प्रतिबिंब पडावं तसं या शामवक्षावर उमटलेली नखरेखा चंद्रकलेच्या डौलानं मिरवीत मला व्यथित करते."

नीलसरीं प्रतिबिंबली चंद्रकलेची रेख ।
शाम तनुवर उमटला नखलेखा आलेख ॥१८६॥

* *

१८७. **बालमु बारैं सौति कैं सुनि परनारि-बिहार ।**
भो रसु अनरसु, रिस रली, रीझ खीझ इक बार ॥१८७॥

भाव विरोध

सवतीकडे न जाता, परकीयेकडे रात्र कंठिली हे कळताच नायिकेच्या मनात उठलेले परस्पर विरोधी भावतरंग दूती इतर सख्यांना सांगते. "नायक सवतीकडे न गेल्यामुळे पळभर ती आनंदित होते. पण पळात परकीयेच्या विचारानं दुःखित होते. क्षणात रोष उत्पन्न होऊन त्याच्या उपहासाला ती प्रवृत्त होते. असूया, आनंद, दुःख, कोप, चीड, उपहास या सर्व भावना एकाच वेळी मनात नाचू लागतात."

सवतीकडे न कंठिली, परनारीसह रात ।
सुखी होय ती कामिनी, अशी ऐकतां मात ॥
असुया दुखवी, हासवी, उपजे भाव विरोध ।
राग, हर्ष, उपहास तो चीड खेद उपरोध ॥१८७॥

* *

१८८. **दुरत न कच बिच कंचुकी, चुपरी, सारी सेत ।**
कवि-आँकनु के अरथ लौं प्रगटि दिखाई देत ॥१८८॥

अनुक्रमणिका

कंचुकीलक्षणा

अंकुरित नायिकेचा, हळुं हळुं होणारा कंचुकीउर दूती सखींना सांगते "अग आता पांढऱ्या साडीतून दिसायचं ते दिसतंच, कंचुकी तीकडे पडतेयसं वाटतं."

प्रगट पहाताना दिसे कुचकंचुकी उभार ।
कवि अक्षर लक्षणेपरी कळवि अर्थ संभार ॥१८८॥

*   *

१८९. **भई जु छबि तन बसन मिलि, बरनि सकैं सु न बैन ।**
आँग-ओप आँगी आँग आँगी, दरी दुरै न ॥१८९॥

रंगसंगति

केशरी काचोळी व वसन नेसलेल्या गौरवर्णी नायिकेच वर्णन सखी करते. "अग तिचा मूळचाच लालगोरा रंग, अन् अंगावर केशरी साडी व त्याच रंगाची काचोळी त्या गोजिरीनं घातल्या न घातल्या सारखीच वाटते."

तनुकांतींत विलीन हो आंभरणांचा रंग ।
वसनविहीनच भासते सखिचे सुंदर अंग ॥
आभरणें ती तंग, रंग हो तनुकांतीत विलीन ।
अंग गौर कुचमंडळ सुंदर भासे कुंचुकहीन॥१८९॥

१९०. **सोन जुही सी जगमगति अँग अँग जोबन-जोति ।**
सुरँग, कसूँभी कंचुकी दुरंग देह-दुति होति ॥१९०॥

कुसुंबी काचोळी

सखी, नायिकेच्या यौवन सौंदर्याची नायकाच्या मनावर मोहिनी घालते. कुसुंबी कांचोळी अंगात घातल्यामुळ तो रंग तनुद्युतीची कुसुंबी झाक यांचा मनोहर संगम मनाला भुरळ पाडतो"

सोनजुईपरि अंग झळाळे सुंदर यौवन ज्योत ।
कुसुंब रंगी लाल कंचुकी पडे दुरंगी झोत ॥१९०॥

*   *

१९१. **बडे न हूज गुननु बिनु बिरद-बडाई पाइ।**
कहत धतूरे सौं कनकु, गहनौ गट्यौ न जाइ॥१९१॥

वर्ण धत्तूर

कविची प्रास्ताविक उक्ती, "नुसत्या नावाच्या मोठेपणानं अंगी गुण बाणत नाहीत. धोतऱ्याला कनक म्हटलं तरी त्याचे दागिने घडत नाहीत.

अनुक्रमणिका

गुणाविना नच थोरवी, असुनी केवळ नांव।
कनक नाम धत्तूर घे घडति न डाग जडाव॥१९१॥

* *

१९२. **कनकु कनक तैं सौगुनौ मादकता अधिकाइ ।**
उहिं खाऐं बाराइ, इहिं पाऐं हीं बौराइ ॥१९२॥

मादक सुवर्ण

कविची उक्ती, "धन किंवा सुवर्ण यांची धुंदी धोतऱ्यापेक्षा शतपटीनं अधिक असते. त्यामुळं माणूस जास्त उन्मत्त बनतो. धोतरा चाखून माणूस धुंद होत असला तर सुवर्ण केवळ पहाताच त्याला शतपटीनं धुंदी चढते."

शतपट कटकाहून तें मादक सुवर्ण प्रेम ।
गिळतां माजवि धत्तुरा, धुंदवि बघतां हेम ॥१९२॥

* *

१९३. **डीठि बरत बाँधी अटनु, चढि धावत न डरात ।**
इतहिं उतहिं चित दुहुनु के नट लौं आवत जात ॥१९३॥

सज्जा–रज्जु

नायक व नायिका अमोर समोर असलेल्या आपल्या घरांच्या सज्जावरून एकमेकाकडे नजर लावीत आहेत. परस्पर हृदयांची अंतरावरून देवाणघेवाण चालू आहे. दोरीवरून इकडून तिकडे चालणाऱ्या डोंबाऱ्याप्रमाणं त्यांची मनं नजरेच्या बांधल्या दोरावरून, कसबी नटाप्रमाणं तोल सांभाळून इकडून तिकडे फिरत आहेत.

सज्जावरूनी बांधला दो नजरांचा दोर ।
इकडुनि तिकडे धांवते मन हें मौन मुजोर ॥
रज्जुवरुनी चालतां चित्त नटापरि धीट ।
घडता डोळे भेट ती बंध ताणले नीट ॥१९३॥

* *

१९४. **झटकि चढति उतरति अटा, नैंक न थाकति देह ।**
भई रहति नट कौ बटा अटकी नागर-नह॥१९४॥

प्रीत भिंगरी

नायक खाली कुठेतरी उभा आहे. नायिका त्याला पाहण्यासाठी तिनतिनदा गच्चीवर येते. तिची ही चढउतर सखी भिंगरीच्या रूपकानं सांगते, "पट्‌कन ती गच्चीवर येते, डोकवते, पुन्हा खाली जाते. सारखी तिची चढउतार चालू आहे. बिचारीला थकवा देखील येत नाही. हातातील गोफाला गुंडाळत्या उलगडत्या भिंगरीसारखी ती खालीवर फिरत आहे."

अनुक्रमणिका

येइ न थकवा, घालित फेरे गच्चीवर सारखी।
प्रेम रज्जुवर भिंगरीपरी चढत उतरते सखी॥१९४॥

*   *

१९५. **लोभ-लगे हरि-रूप के करी साँटी जुरि, जाइ।**
हौं इन बेची बीच हीं लोइन बडी बलाइ॥१९५॥

लोभी दलाल

पूर्वानुरागिणी नायिकेचे सखीशी हितगुज, "अग, माझे डोळे अगदी एखाद्या लोभी दलालासारखे आहेत. शामसुंदराच्या रूपाला भाळून, मला न विचारता माझं चित्त व मन त्यांनी परस्परच विकून टाकलं."

हरिरूपातें मोहुनी लोभी नयन दलाल।
विकलें ग बाई मला दिला परस्पर माल॥१९५॥

*   *

१९६ **चिलक, चिकनई, चतक सौं लफति सटक लौं आइ।**
नारि सलोनी सांवरी नागिनि लौं डसि जाइ ॥१९६॥

गव्हाळी नागीण

[नायक कुणा सावळ्या सुंदरीवर मोहित झाला आहे. तिला दाखवीत तो दूतीला म्हणतो, "ती सावळी सुकुमारी, नागिणीसारखी सळसळत येऊन, हसत मुरकत दंश करून, बिजली सारखी झटकन निघून गेली"]

नितळ अंग, सळसळते बिजली, नागिण रंग गव्हाळ ।
डसे जिव्हारी, हसे मुरकुनी, जाय करुनि घायाळ ॥१९६॥

*   *

१९७ **तोरस-राच्यौं आन्-बस कहौ कुटिल-मति कूर ।**
जीभ निबौरी क्यौं लगै, बौरी, चाखि अँगूर ॥१९७॥

द्राक्षासव

[नायक अन्य स्त्रीवर अनुरक्त आहे. हे कळताच, नायिका रुष्ट झालेली आहे सखी तिची प्रशंसा करीत समजूत घालते. "सखे लोक उगाच कानात जहर ओततात, त्यांचं काय ऐकतेस? एकदा मधुर द्राक्षांची चव घेतल्यावर कुणी कडु निंबोली चाखील का? वेडी आहेस तू अगदी."]

ऐकुं नको ग सखे कुणाचें खोटें नाटें कांहीं।
उगाच कानीं जहर ओतती, भले न बघते त्याहीं ॥

अनुक्रमणिका

रुचे न रसिका वरवरला तो निंबोनीचा नूर।
चवी चाखतां एकदांच हें टंचमधुर अंगूर॥१९७॥

* *

१९८ **जुरे दुहुनु के दग झमकि, रुके न झीनैं चोर।**
हलुकी फौज हरोल ज्यों परे गोल भीर ॥१९८॥

संगीन संगर

[नायकाला बघताच, नायिकेनं मुखावरून ओढणी घेतली. पण ती विरल असल्यामुळे, नायकाची नजर, ती भेदून आत तिच्या डोळ्यांशी लढत घेत आहे. हे नयनसंगर सखी सखींना सांगते. "तिने मुखावर घेतलेली विरल ओढणी भेदून दोघांचेही डोळे बालेकिल्ल्यांतच परस्परांना भिडले. बालेकिल्ल्याची कोवळी रक्षक सेना गारद झाली. आता मुख्य सेनेवरच सारा भार पडला. त्यांनी या हातघाईच्या चढाईत परस्पर संगिनी रोखल्या. आणि चार डोळ्यांचे संगीन समर सुरू झाले."]

भिडती सेनासंघ संगरी नाजुक चमू विजोड।
फोडुनी घुंघट गोट, अघाडी सेना करी बिमोड।
रोखिति नैनानैन, संगिनी, खणा खणी दृगमोड।
अर्ध्या झुकल्या, अर्ध्या मिटल्या पापणीत तडजोड॥१९८॥

* *

१९९. **केसर केसरि-कुसुम के रहे अंग लपटाइ।**
लगे जानि नख अनखुली कत बोलति अनखाइ॥१९९॥

केशर किंजल

[सखी खंडिता नायिकेचा भ्रमनिरास करून, तिचा रोष घालविते. "बाई ग त्यांच्या अंगावर त्या नखांच्या खुणा नव्हेत. उटी लावताना ते केशर पराग चिकटले आहेत. तूं उगाच का त्याच्यावर कोपतेस?]

केशर रंगी, अंगि तयाच्या तूंच लाविली उटी।
संदेहानें बघसि कां ग देह छटा गोरटी॥
अंगिं चिकटलें चुकार चुरलें केशर कुसुम पराग।
जखम नखाची नव्हेच बाई, वृथाच धरिसी राग॥१९९॥

* *

२००. **दग मिहचन मृग-लोचनी भस्यौ, उलटि भुज, बाँहथ ।**
जानि गई तिय नाथ के हाथ परस हीं हाथ ॥२००॥

अनुक्रमणिका

उलटा फासा

नायक पाठीमागून येऊन नकळत नायिकेचे डोळे झाकतो. ती तो करस्पर्श ओळखूनही हात तसेच राहू देते. उलट आपल्या बाहुने त्याला उलटे कवटाळते. सखीवचन, "त्या मृगनयनीचे डोळे प्रियकरान मागून हळूच झाकले. तिनं अचूक ओळखलं, व उलट बाहुंनी त्याला आलिंगन देऊन पुढ झुकवलं व आपल्या अंगावर ओढून घेतलं.

हळूच येउनि मागुती नयन झाकितो नाथ।
सहज ओळखी स्पर्शता दोन कुणाचे हात॥
तसेच कवळी ती तयां उलटे भुजबंधात।
अंग अंग घे दाबुनी धरिते उत्संगांत॥२००॥

* *

२०१ **तजि तीरथ, हरि, राधिका, तन-दुति करि अनुराग।**
जिहिं ब्रज-केलि-निकुंज-मग पग पग होतु प्रयागु॥२०१॥

प्रेम-प्रयाग

कविची वृंदावनासंबंधीची प्रेमभावना.-
"मना, तीर्थयात्रा सोडून तू कृष्णराधेचे ध्यान कर. गोकुळ वृंदावनात जा. तिथे, जिथे जिथे राधाकृष्णानी प्रेमविहार केला, ती ती स्थळे त्यांच्या चिरंतन प्रेमामुळे प्रयागच बनले आहे. पावलोपावली तुला प्रयाग यात्रा घडेल."

नको तीर्थ हरि राधिका तनु द्युति वरि अनुराग।
व्रजकुल केलि-निकुंजि या पदिं प्रेमप्रयाग॥२०१॥

* *

२०२. **खिन खिन मैं खटकति सु हिय, खरी भीर मैं जात ।**
कहि जु चलि, अनहींचितै, ओठनु, हीं बिच बात ॥२०२॥

मुटपुट

(नायिकेने प्रियकराला गर्दीत पाहिले. ती सखीच्या कानात कुजबुजताना नायकाचे लक्ष तिकडे वेधले. तिच्या ओठांची हालचाल थांबली. पण ही गोष्ट नायकाच्या मनाला बोचली. तो सखीला म्हणतो, "गर्दीतून जाताना तिने माझ्याकडे चोरून पाहिले अन् मैत्रिणीच्या कानात काहीतरी पुटपुटली. ती पुटपुटच माझ्या मनात सारखी खटकते आहे.")

गर्दी मधुनी पाहिलें-न पाहतांहि अबोल।
सखिच्या स्कंधीं चाचपे, सहजच झुकवी तोल॥
खुणावीत नजरेतुनी, हळूंच हलती ओठ।
पुटपुट ती उरिं टोचतें उपहासाचें बोट॥२०२॥

* *

अनुक्रमणिका

२०३ **अजौं न आए सहज रँग बिरहू-दूबरैं गात ।**
अब हीं कहा चलाइयति, ललन, चलन की बात ॥२०३॥

अपुरी हौस

प्रियकर नुकताच परदेशातून परत आला आणि तो लौकरच परत जाणार. त्याने परत जाऊ नये म्हणून सखी त्याला विनविते. "वियोगानंतर पहिली भेट होते न होते, तो पुन्हा परत जायचे हे उचित नव्हे. अहो अजून पुरता रंग भरला नाही. हौस फिटली नाही. मिठी पडली नाही तोच तोडून निघायचं! इतके काहो कठिण होता."

विरहानंतर ती घडे, पहिली वहिली भेंट ।
मिठी तोडुनी का पुन्हां परतायाचें थेट ॥
अली न अजुनी टवटवी, चढला पुरता रंग ।
हौस न पुरली ती पुरी, नच धरिले हो अंग ॥२०३॥

* *

२०४ **अपनैं कर गुहि आपु हठि हिय पहिराई लाल।**
नौल सिरी औरै चढी बौलसिरी की माल॥२०४॥

बकुल माळ

वनविहार करताना नायकाने आपल्या हाताने गूंफून बकुळीची माळ नायिकेच्या गळ्यात घातली. या प्रेमोपहाराने ती अधिकच फुलून उठली, तिच्या तनुकांतीचं वर्णन सखी करते."आपल्या हातानं गुंफलेली बकुळमाळ तिच्या गळ्यात घालताच ती मोहरली, तिचं तनुसौंदर्य अधिकच खुलून दिसते."

बकुल माळ घाली गळां स्वकरें गुंफुनी नाथ।
कांति खुलावी अधिक ती नवलाई नवजात॥२०४॥

* *

२०५ **नई लगनि, कुल की सकुच बिकल भई अकुलाइ।**
दुहूँ ओर एची फिरति, फिरकी लौं दिन जाइ॥२०५॥

अस्थिरा

पूर्वानुरागिणी नायिकेची अवस्था सखी सखीला सांगते. "नायिकेची प्रीति आणि कुलरीति यांच्या ओढाताणीत तिची फिरकीप्रमाण गति झालेली आहे. दिनरात्र ती अस्थिर आहे."

नवा प्रणय अनुराग तो विकल करी कुल लाज।
फिरकीपरि दिन ओढिते, चित्त गरगरे आज॥
रुचे न तनश्रृंगारही फुला फुलांचा साज।
दोहिकडे मन धांवते– सुचे न कांही काज॥२०५॥

अनुक्रमणिका

*   *

२०६ **इत तैं उत, तैं इतै, छिनु न कहू ठहराति ।**
जक न परति,चकरी भई फिरि आवति फिरि जाति ॥२०६॥

बावरी

पूर्वानुरागिणीची दर्शनोत्कंठा सखी सांगते, "चकरीसारखी, प्रियदर्शनासाठी इकडून तिकडे ती सारखी फिरत आहे."

इथुनि तिथें ती तिथुनि इथें पल ना स्थिर हे पाय ।
चढे उतरते भिंगरी तशीच गति असहाय ॥२०६॥

*   *

२०७ **निसि अँधियारी नील पटु पहिरि,चली पिय-गेह।**
कहौ, दुराई क्यों दुरै दीपसिखा सी देह॥२०७॥

निशाभिसार

अंधेच्या रात्री दिसू नये म्हणून नायिकेने निशाभिसार केला आहे. पण सखी मार्गात बरोबर ओळखते. ती म्हणते, "रात्रीची रंगसंगती साधून तू निळा अभिसार केला आहेस खरा, पण वेडे तुझी दीपकळीसारखी अंगकांती का कुठे लपणार आहे. ती अंधारातच उजळून दिसते".

निशाक्सांनीं नीलवसन नेसुनी निघालिस गेह ।
सोडुनि, कैसी लपविशील ग दीपशिखेपरि देह ॥२०७॥

*   *

२०८ **रह्यो ढीठु ढाढसु गहैं ससहरि गयौ न सरू।**
मुरयौ न मनु मुरवानु चभि, भौ चूरनु चपि, चूरू॥२०८॥

सुर-मार

प्रेयसीच्या पायातील पैंजण झार ऐकून मोहित झालेला प्रियकर दूतीला म्हणतो, "माझ मन तिच्या पायातील पैंजणातच गुंतून राहिलं. पैजणांच्या मंजुल स्वरांचा मार खात, त्या आघातानं तिथेच चूर झालं. पण तिचे पाय सोडले नाहींत."

दोन पावलावरी बांधले, मन हें झालें चूर।
चूर चूर हो पैंजण घातें, तरी न होई दूर॥
सुरासुरीं तो घुंगरमारा करिते पायल झार।
धीर धरोनी तरी साहते सुरांतले हे वार॥२०८॥

*   *

अनुक्रमणिका

२०९ **सोहत अँगुठा पाइ कै अनवटु जरयौ जराइ।**
जीत्यौ तरिवन-दुति, सुढरि परयौ तरनि मन पाइ॥२०९॥

शरणागत

नायिकेच्या पायांतील अंगठ्यावरील अनवट (जोडवें) शोभेचं सखी वर्णन करते. "तिच्या पायातील अंगठ्यात अनवट इतकं शोभून दिसतं की जणु काय त्या ताटंक (अनवट) द्युतीमुळं हतप्रभ होऊन सूर्यदेखील तिच्या चरणी शरण आला आहे."

अनवट जडितें अंगठा, उतरे तो रवि काय ।
द्युतिकिरणीं तरणीं ढळे धरी तरुणीचे पाय ॥२०९॥

* *

२१० **जंघ जुगल लोइन निरे करे मनौ बिधि मैन ।**
केलि-तरुनु दुख दैन ए, केलि तरुन-सुख दैन ॥२१०॥

मदनाचें विंधान

प्रेयसीच्या मृदुल मनोहर जघनांची नायक स्वगत प्रसंसा करतो. "ते जघन इतके सुंदर आहेत की ते बघून कदलीकंदानाही तिचा हेवा वाटावा व हे मदनाचे विंधान बघून तरुण आनंदित व्हावेत".

पीत गौर उरु गौरवी, लुशित कांति वरदान ।
पृथुल-जधन-युग गोजिरें मदनाचें विंधान ॥
नवतीचें लावण्य तें झुरती कदली कंद ।
पाहुनिया तरुणा जना गुप्त होय आनंद ॥२१०॥

* *

२११ **रही पकरि पाटी सु रिस भरे भौंह, चितु, नैन ।**
लखि सपनैं तिय ऑन-रत जगतहु लगत हियैं न ॥२११॥

स्वप्न दिठीं

त्या सुभगेनं स्वप्नात प्रियकराला अन्य मिठीत बघताच, ती रागावून त्याच्यापासून दूर झाली. ही मात दूती सखीला सांगते, "स्वप्नदिठीत प्रियकराला अन्य मिठीत पहाताच, जागृतीतही ती त्याजपासून दूर सरकली व रागाने भिवया चढवून, बाजूस वळून पलंगाची गात घट्ट धरून पडून राहिली"

प्रिया पाहते प्रियकरा मिटल्या स्वप्न दिठींत।
रतिरंगीं रंगला सखा पडुनी अन्य मिठींत॥
कोपें चढवी भीवया, धरूनी मंचक गात।
पाठ फिरवि एकीकडे पहुडे लोटुनि हात॥२११॥

अनुक्रमणिका

२१२ किय हाइलु चित-चाइ लगि, बजि पाइल तुव पाइ।
पुनि सुनि सुनि मुँह-मधुर धुनि क्यौं न लालु ललचाइ॥२१२॥

पदमंजीर

सखी म्हणते, "सुभगे, केवळ तुझ्या पायातील मंजिराच्या ध्वनीन तो एवढा चाळवला आहे, तर तुझे मंजु बोल ऐकायला तो गुणग्राही किती अधीर झाला असेल याचा विचार कर".

हरवि भान, मन कयि लालारिन मंजुल पदमंजीर ।
ऐकायातें मधुर बोल तव, किती ग बाइ अधीर ॥२१२॥

* *

२१३ साहस सहसु, कीनै जतन हजारु ।
लोइन-सिंधु तन पैरि न पावत पारु ॥२१३॥

रूपसिंधू

दूती प्रियकराच्या असीम सौंदर्याचं वर्णन नायिकेजवळ करते. "लाख प्रयत्न करूनही त्याच्या रूप लावण्याचा अथांग सागर, हे डोळे पार करू शकणार नाहीत".

लावण्यांचे तुफान तें अथांग दर्या कांठ।
तरंग ते हेलावती, सौंदर्याची लाट॥
साहस केलें बाइ ग, कितिदां केला धीर।
तरी न तरले नैन हे, रूपसिंधूचे तीर॥२१३॥

* *

२१४ पट की ढिग कत ढांपियति, सोभित सुभग सुबेष।
हद रद छद छबि देति यह सद रदछद की रेख॥२१४॥

मधुकंस

प्रेयसीच्या ओठावर रददंश उमटला आहे. ती कधी पदरानं, तर कधी ओठ दाबून ती लपवू पहात आहे. सखी हे बघून तिचा परीहास करते. "अग ओठावरील ते प्रीतिचिन्ह अशी लपवतेस कां! या रदनदंशामुळं तर त्यांची शोभा अधिकच वाढली आहे.

छबि सुंदर, अति सुभग तो परिसीमित रददंश।
पदरानें कां झांकिसी अधरांचा मधुकंस॥२१४॥

* *

२१५ नाह गरजि नाहर-गरज, बोलु सुनायौ टेरि।
फँसी फौज में बंदि-बिच हँसी सबनु तनु हेरि॥२१५॥

अनुक्रमणिका

हरिगर्जित

सेनांच्या मध्ये बंदिनी असलेली रुख्मिणी, श्रीकृष्णाची आव्हान गर्जना ऐकून हर्षित झाली. ती मनात म्हणते,"बघा ते आले, आता या रुख्मिणीला बंदित कोण ठेऊ शकणार! ही हरिगर्जना ऐकून या कोल्ह्यांची तारांबळ उडेल". या कल्पनेनं तिला हसूं आलं.

येतां ती हरि-गर्जितें, सिंहाचा हुंकार।
कोल्ह्यांची कुइ थांबली, करिता वन संचार॥
सशापरी शिशुपाळ तो, पळतो सेनाभार।
राजबंदिनी रुक्मिणी, हंसत करी सत्कार॥२१५॥

* *

२१६ **बाल-बेलि सूखी सुखद इहिं रूखी रुख-धाम।**
फेरि डहडही कीजियै सुरस सींचि, घनस्याम॥२१६॥

उन्हाळ झळ

कलहान्तरिता नायिकेच्या सखीची उक्ती, मानी नायकाला ती सुचविते, "अहो चतुर, आपल्या रुक्ष चेष्टेनं, ती सुकुमार वेल कोमेजून गेली आहे. तुमच्या हृदयाचा ओलावा मिळताच ती पुन्हा टवटवेल. करा न बिचारीवर एवढी दया!".

उन्हाळ झळ बाला लता सुकवी उतरे झील।
जल सिंचुनियां पालवी तिजसी हे घननील॥२१६॥

* *

२१७ **औंधाइ सीसी, सुलखि बिरह-बरनि बिललात।**
बिच हीं सूखि गुलाबु गौ, छीटौ छुई न गात॥२१७॥

विरहानल

नायिकेच्या विरहतापांचं वर्णन दूती नायकाजवळ करते. "विरहतापानं ती तळमळते आहे. तिच्या जिवाची काहली झाली आहे. काही केल्या विझत नाही. शीत उपाय म्हणून गुलाबपाणी अंगावर शिंपताच, तुषार देहाला न लागता वरचेवरच जळून त्यांची वाफ होते".

विरहानल तिज पोळवी, विकल दीन असहाय।
शमवायातें दाह तो केलें शीत उपाय।
गुलाबजल तें सिंचितां, तळमळतें ती काय।
शिवे न देहा थेंबही मधेंच जळुनी जाय॥२१७॥

* *

अनुक्रमणिका

२१८ **तजी संक, सकुचति न चित बभ्रत बाकु कुबाकु।**
दिन छिनदा छाकी रहति छुटतु न छिनु छबि छाकु॥२१८॥

रूपवारुणी

पूर्वानुरागातील नायिकेच्या प्रेमधुंदीची कथा मैत्रिणी आपसात सांगतात “तिनं लोकलाज अगदीच सोडली, बेपर्वा झाली आहे नुसती! वागणं काय! ते बोलणं काय! सदाच प्रियकराच्या रूपाची वारुणी पिऊन त्या नशेतच ती धुंद असते”.

लोकलाज नच भीतिही, उरला ना संकोच।
धुंदीतच रातंदिनीं बरळे, उरे न पोच॥
आसुसले डोळे सदा भेटवी हर्षनिधान।
सुटे न सुटतां तें तिचें रूपवारूणी पान॥२१८॥

* *

२१९ **फिरि फिरि बझति, कहि कहा कह्यौ साँवरे गात।**
कहा करत देखे कहाँ; अली,चली क्यौं बात॥२१९॥

‘सगळं सगळं सांग’

नायिका प्रियकरासंबंधी दूतिला अतिशय उत्कंठेनं विचारते, ही अधीर आतुरता एक सखी दुसरीला सांगते. “पुन्हाःपुन्हा ती मला विचारते, ते तुला कुठं भेटले? काय करीत होते? माझी आठवण काढली का? अगदी एकटेच होते की दुसरं कुणी जवळ होतं! काय म्हणाले! अगदी सगळं सगळं सांग”.

फिरुनि फिरुनि पुसते सखी, कुठें पाहिला शाम।
कुठें गुंतलें होते का ग, करीत कसलें काम॥
डोळे उडवुनि हंसले का ग, दिसला का अनुराग।
माझ्या विषयीं काय बोलले, अगदीं सगळं सांग॥२१९॥

* *

२२० **नव नागरि-तनु-मुलुकु लहि जोबन-आमिर जौर।**
घटि बढ़ि तें बढी घटि रकम करीं और की और॥२२०॥

राजवाटप

यौवनाला अधिकार मिळाल्यानंतर, नृपवर्तनानं देहप्रातांत घडून आलेलं परिवर्तन. सत्तामदानं केलेल्या सुंदर अत्याचारांचं वर्णन सखी दुसरीजवळ करिते. “यौवन नृपतीला तिच्या सुंदर तनूचा नवीन प्रांत मिळताच त्याच्या सीमा सुटल्या व त्यानें अधिकार गाजवायला आरंभ केला. सर्वांगी अदलाबदल करून टाकली. आधीच्या लहानांना मोठेपण मिळालं आणि मोठे होते त्यांचा संकोच केला. असा अत्याचार माजविला.”

तनुप्रदेशीं गाजवी, यौवन नृप अधिकार।

घटवी गुरुता, गौरवी, लघुता करि बडिवार॥
नितंब, स्तन नयना मिळे मुलुख वाढता घेर।
कटि कुंचित, गति चंचला देइ घटित आहेर॥२२०॥

* *

२२१ **कीजै चित सोई, तरे जिहिं पतितनु के साथ।**
मरे गुन-औगुन-गननु गनौ न, गोपीनाथ॥२२१॥

पतिततारक

भक्ताची भगवंताला प्रार्थना, "देवा, माझें गुणावगुण लक्षात न घेता हे प्रभो! मला तार. तूं पतिततारक आहेस आणि मी अतिपतित आहे".

अगणित गुण अवगुणास या गणा न गोपीनाथ।
ह्रदयिं दया मम येउ द्या पतिताते द्या हात॥२२१॥

२२२ **मृगनैनी दग की फरक, उर-उछाह, तन फूल।**
बिन हीं पिय-आगम उमगि, पलटन लगी दकूल॥२२२॥

शकुनवंती

प्रियकराच्या आगमनाची शकुनवार्ता ऐकताच नायिकेच्या वेषभूषा श्रृंगाराची लगबग सखी सांगते. "ती पहा मृगनयनी, आज किती धांदल उडालीय तिची! शुभशकुन झाल्यामुळं भेटीची उताविळता तिला श्रृंगार देखील सुचू देत नाहीं. "डावा डोळा लवला, जघनबाहुंना स्फुरण आलं. त्यामुळं प्रियागमाची सूचनाच मिळाली असं वाटून तिची तारांबळ उडाली. तिची लगबग सुरू झाली."

लवे पापणी धाग ती, मृग नयनीं हो धुंद।
आनंदे मन मोहरे, लाज कपोली बुंद॥
वसन नेसतें रेशमी करिते सखि श्रृंगार।
शकुन तनूचें सांगती, जिवलग अजि येणार॥२२२॥

* *

२२३ **रहे बरोठे में मिलन पिऊ प्रानन के ईसु।**
आवत आवत की भई बिधि की घरी घरी सु॥२२३॥

पाऊल वाजले

दारात पाऊल वाजले. पण आपले प्राणाधार बाहेरच आप्तजनांशी व मित्रमंडळीशी बोलत उभे असलेले पाहून, ती अधीरा आतल्या आत तळमळते. पळाचा विलंब तिची आतुरता अधिकाधिक वाढवितो.

आले बाई वाजले पाऊल तें दारांत।
ऊंबरठ्यावर थांबले बोलत परिवारात।
साहवे न हा अडथळा, विलंब पळ अवकाश।
युगसम वाटे ती घडी आतुर त्या जीवास॥२२३॥

* *

२२४ **रवि बंदौ कर जोऐि, ए सुनत स्याम के बैन।**
भए हँसौं है सबनु के अति अन खौं है नैन॥२२४॥

कदंब चोर

गोपी वस्त्रहरण प्रसंगी श्रीकृष्णाच्या खट्याळ पणाचं हे वर्णन. "तुम्ही सर्वजणींनी हात ऊंचावून सूर्याला नमस्कार केलात तरच तुमची वस्त्रे मी तुम्हाला परत देईन". हें कृष्णाचे बोल ऐकून जलांतील त्या नग्नगोपिकांच्या रागेजल्या डोळ्यांना हसू फुटलं.

कराल जरि रविवंदना दोन्ही जोडुनी हात।
देइन वसने ही तुन्हां ऊंचावीत भुजांत।
नग्न उभ्या जलि गोपिका, ऐकुनिया हे बोल।
कुपित कुमुदिनी लाजती हसती नयन विलोल॥२२४॥

२२५ **हौं हीं बौरी बिरह-बस, कै बौरौ सब गाउँ।**
कहा जानि ए कहत है ससिहि सीतकर-नाउँ॥२२५॥

चंद्रताप

विरहाने आधीच मी तळमळते आहे. त्यातून ही चंद्रकिरणे मला भाजून काढीत आहेत. लोक या तापदायक चंद्राला शीतकर का म्हणतात हेच मला कळत नाही. सारं खोटं आहे ते!".

खुळ्याच या पुरवासिनी पिउनि चांदणें धुंद
चंद्रकरें लोभाउनी, लुटती सौख्य स्वच्छंद॥
झाले ग मी बावरी-हा कसला आनंद।
विरही जनांतें ताप दे शीतल कर हा चंद्र॥२२५॥

* *

२२६ **अनी बडी उमडी लखैं आसिबाहक, भट भूप ।**
मंगलु करि मान्यौं हियैं, भो मुँहु मंगल रूप ॥२२६॥

राजप्रशंसा

कवी, राजा जयसिंहाच्या शौर्याची वाखाणणी करतो. "असिधारी जयसिंहाने परचक्राची मंगल घडी आलेली पहाताच त्याचें मुखही मंगलग्रहासारखेच आरक्त झाले".

अनुक्रमणिका

आली मंगल ही घडी रक्तवदन अनुरुप।
पाहुनियां परचक्र ते असिवाहक जयभूप॥२२६॥

*   *

२२७ **सोवत, जागत, सु-पन-बस, रस, रिस,चैन, कुचैन।**
सुरति स्याम घन की, सुरति बिसरैँ हूँ बिसरे न॥२२७॥

उरजखम

प्रोषित नायिका आपली स्मृतिदशा सखीला सांगते. “जागृतीत, स्वप्नात, रागात, अनुरागात, मीलनात, विरहात, शामसुंदराची स्मृति मला पळभर देखील सोडीत नाहीं ग! विसरू पहाते पण विसराचाच विसर पडतो!”

शयनिं, स्वप्नि जागेपणीं नयनिं वसे अभिराम।
अनुरागीं रागांतही विसरुं कशी रे शाम॥
सुखदुःखातहि आठवे सखि ते लाडिक बोल।
जपते जखमहि ती उरीं आसवांतली ओल॥२२७॥

*   *

२२८ **संगति सुमति न पावहीँ परे कुमति कैँ धंध।**
राखों मेलि कपूर मैँ, ही ग न होइ सुगंध॥२२८॥

हिंग व कापूर

कवीची स्वाभाविक उक्ती, “दुर्जनाला सज्जनसंगती लाभली तरी त्याचा स्वभावगुण जात नाही. कापराजवळ हिंग ठेवला तरी त्याला सुगंध लाभ होत नाही”.

सुमति न होई दुर्मति असो सुसंगति संग।
मेळवितां कापरासवें सुगंध घेइ न हिंग॥२२८॥

*   *

२२९ **बडे कहावत आप सौं, गरुवे गोपिनाथ।**
तौ बदिहौं, जौ राखिहौ हाथनु लखिमनु हाथ॥२२९॥

पैज

दूति नायिकेच्या कोमल हातांचं वर्णन करीत गोपीनाथाशी पैज लावते. त्याच्या मनात तिच्याविषयी रुची उत्पन्न करते. “त्या चारुशीलेचे हात इतके नाजुक आणि सुंदर आहेत की कुणाचंही ते पाहून भान हरतं. त्या हातातून तुम्ही आपलं मन सोडविलंत तर गोपीनाथ, तुमचा निग्रहगर्व मी खरा मानीन! ती सहजच तुम्हाला जिंकील! हवी तर आपली पैज!”

अनुक्रमणिका

पुरे जाहली थोरवी गर्वित गोपींनाथ।
मानिन मी तेव्हां खरी यशहि वशीकरणांत॥
गौर रेशमी पाहतां तिचे मुलायम हात।
गुंतवील मन पल्लवी सहजच हातोहात॥
सुटाल कैसे सुंदरा पडतां मृदु बंधांत।
पैज लावते मोहना जरी जिंकिला त्यांत॥२२९॥

* *

२३० **कौडा आँसू-बूँद, कसि साँकर बरुनी सजल।**
कीने बदन निमूँद, दृगमलिंग डारे रहत॥२३०॥

अयाचित

“पूर्वानुरागिणी नायिका प्रियकराच्या ध्यानात मग्न आहे. तिच्या डोळ्यातून अश्रू आहेत. दूती नायकाला तिच्या दशेचं वर्णन करीत तिला अयाचित मलंग बनवून दान देणारा दाता बनण्यासाठी नायकाला विनविते “तिचे अयाचितासारखे डेळे अश्रूंच्या कवड्यांच्या साखळ्यांनी जखडले आहेत व निश्चेष्ट पडली आहे.”

कपर्द कडिची साखळी आवळले असुबंध।
मलंग डोळे बांधुनी पडे अचेतन बंध॥२३०॥

* *

२३१ **उयौ सरद-राका-ससी, करति क्यौं न चित चेतु।**
मनौ मदन छितिपाल कौ छाँहगीरू छबि देतु॥२३१॥

शरद-पुनव

मानिनी नायिकेचा अभिमान दूर करण्यासाठी सखी तिला म्हणते, “अग; शरदपुनवेचा मधुचंद्र उगवला आहे आणि आपली छत्रचामरं त्यानं मदनाला बहाल केलेली आहेत. तेव्हा त्याच्या दरबारात जाऊन त्या राजराजेश्वराला तुला नजराणा नको का द्यायला! त्यानं चित्तावर अधिकार गाजवायला सुरूवात केली तर तुझी पंचाइत होईल, म्हणून सांगते.”

शरदपुनवमधुचंद्र हा करीत मनसंकेत।
मदनराजया आपुली छत्रचामरें देत॥
चित्त मंडळावरी असा गाजवील अधिकार।
नजराणा दे मानिनी मान राजव्यवहार॥२३१॥

* *

२३२ **ढरे ढार, तेहीं ढरत; दूजैं ढार ढर न।**
क्यौं हूँ आनन आन सौं नैना लागत नै न॥२३२॥

अनुक्रमणिका

अढळपद

नायक कुणा सुंदरीवर भाळला आहे. त्याचा अंतरंगमित्र, ती अप्राप्य आहे, असे सांगून 'हा नाद सोड' म्हणून त्याला विनवितो. त्यावर त्याचे उत्तर,"वेड्या! माझ्या मनात एकदा ती ठसल्यावर दुसरीवर मन जाईल तरी कसं! माझ्या चित्तात तिची जागा अटळ आहे."

ढळलें मन हे एकदां ढळे न चित्तनिधान।
आढळलें नयनास जें अढळ जाहलें जाण॥२३२॥

* *

२३३ **सोवत लखि मन मानु धरि, ढिग सोयौ प्यौ आइ।**
रही, सुपन की मिलनि मिलि, तिय हिय सौं लपटाइ॥२३३॥

झोपेतील वीज

नायिका रागारागानं झोपली आहे. नायक तिच्याजवळ हळूंच बाजूला झोपतो. मधेच कामोद्दीपन झाल्यामुळे ती त्याला करकचून बिलगते. पण आपण झोपेतच आहोत हा भास निर्माण करते. त्यानं आपणाला जागवून आपला राग काढावा ही मनीषा. सखी सांगते, "रागेजून ती झोपली खरी. पण मधेच जणु झोपेतच प्रियकराला मिठी मारून ती तशीच पडून राहिली."

रागें रागे झोपली इकडे फिरवुनि पाठ।
हळूंच येई मंचकी प्रियकर पाहुनि वाट॥
जवळी पहुडे आणुनी, नयनी खोटी नीज।
आलिंगित हृदयेश्वरा झोपेमधली वीज॥२३३॥

* *

२३४ **जोन्ह नहीं यह, तमु वहै, किए जु जगत निकेतु।**
हो उदै ससि भयौ मानहु ससहरि सेतु॥२३४॥

तिमिरनिकेत

प्रोषित पतिका नायिकेला वियोगकाली सर्व जग अंधारमय भासू लागतं चांदणंदेखील अंधाराचंच रूप आहे असं तिला वाटतं. ती सखीला म्हणते "सखे हे चांदणे नव्हेच ग! या मेल्या अंधारानं सारं जगच आपलं निवासस्थान बनविलं आहे. मला वाटतं चंद्रोदय झाल्यामुळं हा अंधारच भीतीनं पांढरा फटक पडलाय!"

चंद्रोदय होतां भयें तमच होतसे श्वेत।
नसे चांदणें हे गमे जग अंधारनिकेत॥२३४॥

* *

२३५ **जात जात बितु होतु है ज्यौं जिय मैं संतोषु।**

अनुक्रमणिका

होत होत जौ होइ, तौ होइ घरी मैं मोषु॥२३५॥

दान संतोष

धनलोभी पुरुषांसंबंधी कवीची उक्ति. "धनसंचय कमी झाला तर ईशइच्छेनेच हे घडले म्हणून संतोष मानणे, किंवा धन मिळविताना ईश्वर इच्छेनेच ते मिळेल ही भावना ठेऊन संतोषी रहाण्यात काय हरकत आहे! त्यामुळे तर सहजच मुक्तिलाभ घडतो. मिळविण्यात संतोष व दानमुक्तीत विशेष आनंद व्हावा. पण नेमकं हे उलटच घडतं".

गेलें धन तें जाऊं द्या, तोषवि हा धनशोष।
मोक्षलाभ हो संचयीं दानतृप्ति संतोष॥२३५॥

* *

२३६ **तन भूषन, अँजन दृगनु, पगनु महावर-रंग।**
नहिं सोभा कौं साजियतु, कहिबैं हीं कौं अंग॥२३६॥

जातीची सुंदर

सखी नायिकेच्या स्वाभाविक सौंदर्याचं वर्णन करते, "ती जात्याच एवढी सुंदर आहे की वरपांगी एवढ्या साजश्रृंगाराची, अलंकारांची तिला मुळी आवश्यकताच वाटत नाही, मेंदी नको, काजळ नको की अंगराग नको, तशीच ती सुंदर दिसते".

नको भूषणें, लोचनीं काजळ, मेहदी रंग।
कांचनकांती सहज ती सुतनू गौर सुरंग॥२३६॥

* *

२३७ **पाइ तरुनि-कुच-उच्चपद चिरम ठग्यौ सबु गाउँ।**
छटैं ठौरू रहिहै वहै, जु हो मोलु छबि नाउँ॥२३७॥

गुंजमाळ

कुपात्री मनुष्याला राजाने उच्चपद दिले. त्याला वेतनही भरपूर आहे. लोक त्यामुळे त्याला सर्वगुण संपन्न समजतात. गळ्यात पडलेली गुंजेची माळ मोत्याच्या मोलानं मिरविते. स्थानभ्रष्ट झाल्याबरोबर त्याचं महत्वही जातं व तो पूर्व पदावर येतो. कविची अन्योक्ती. "तरुणी कुचावर लोळत असल्यामुळे गुंजाची माळ, गुणवंतीच्या अभिमानानं स्वतःची अमोल रत्नांच्या मालिकेत गणना करते, तोऱ्यानं मिरवते. पण ती एकदा तुटून स्थानभ्रष्ट झालीं की ते गुण संपतात व गुंज ती गुंजच ठरते."

तरुणि कुचावर लोळते ती गुंजेची माळ।
मोठेपण मिळतांच हे विसरे अपुला काळ॥
तोरा दावित फसवि, ते रत्नाचा अभिमान।
तुटतां सूतच निर्गुणी उतरे सर्व गुमान॥२३७॥

*   *

२३८ **नितप्रति एकत हीं रहत, बैस-वरन-मन-एक।**
चहियत जुलाल किसोर लखि लयन-जुगल अनेक॥२३८॥

युगुल किशोर

युगुल उपासक भक्ताची उक्ती. "नित्य प्रती एकत्र वसणारे. वय, रंग, रूप व अंतरंगाने एक असणाऱ्या युगुलकिशोराची सौंदर्यशोभा या दोन डोळ्यात कशी सामावणार? त्यासाठी नेत्रयुगुलेही अनंत हवीत."

एकत्रित दिनरात ती, रूप वर्ण वय एक।
युगुल किशोर सुदर्शना दृगयुग देइ अनेक॥२३८॥

*   *

२३९ **मन न धरति मेरौ कह्यौ तूँ आपनें सयान।**
अहे, परनि परि प्रेम की पर हथ पारि न प्रान॥२३९॥

'संभाळ ग बाई'

नायिकेला सखीची शिकवण,"तू आपल्या शहाणपणाच्या घमेंडीत जाऊन माझ्या बोलण्याकडे दुर्लक्ष करू नकोस. माझं ऐक तरी, मी तुला अगोदरच सावध करते. असल्या चोरट्या प्रेमात पडून तू आपले प्राण परक्याच्या हवाली करू नकोस! माझे अनुभवाचें बोल ऐक."

तुझी चातुरी राहुं दे, ऐक देऊनी कान।
उगाच देशिल आपुले परक्या हाती प्राण॥
पडशिल जरी प्रेमांत या नुरेल ठाव ठिकाण।
डाका घालित चोरटे नीट मांडुनी ठाण॥२३९॥

*   *

२४० **नख-रेखा सोहैं नई, अलसौहें सब गात।**
सौंहें होत न नैन ए तुम सौंहें कत खात॥२४०॥

उघड गुपित

खंडित नायिकेचा प्रियकराला समज."आज देहावर अगदी नवे ओरखडे दिसताहेत. देह आळसलेला, डोळे शिणलेले! अशी नजर का चुकविता! सगळं काही उघड उघड दिसतंय, उगाच शपथा कशाला घालता! आपल्या पराक्रमाची चिन्हं साऱ्या देहावर उमटली आहेत. अंग सत्य बडबडतं, जीभ लटकं बोलते."

नवा नवा नख-लेख हा आलसलेला देह।

नयन चुकविती लाजरे उरला नच संदेश॥
गुपित खुलें लपवायला उगा घालित आण।
अंग अंग बोलते वठलें प्रेमनिशाण॥२४०॥

* *

२४१ **हरि, किजति बिनती यहै तुमसौं बार हजार।**
जिहिं तिहिं भाँति डरयौ रहयौ परयौ रहौ दरबार॥२४१॥

मुक्ति नको

सेवातत्पर व दर्शनोत्सुक भक्ताची श्रीकृष्णप्रार्थना. "हे प्रभो, वृंदावनवासी! माझी आपल्या चरणी सहस्त्ररतवार विनंती आहे, की मला आपण मुक्ती देऊ नका. पण आपल्या मंदिरात चिरंतन सेवेचा अधिकार मात्र मला द्या!"

नको मुक्ति मज माधवा विनति पदीं शतवार।
राहूं दे तव मंदिरीं सेवेचा अधिकार॥२४१॥

* *

२४२ **भौंह उँचैं आँचरु उलटि, मौरि मोरि, मुहु मोरि।**
निठि नीठि भीतर गई, दीठि दीठि सौं जोरि॥२४२॥

प्रणयचेष्टित

नायिकेने आपल्या दारातून नायकाकडे पाहून केलेले हावभाव, तो आपल्या मित्रांना सांगतो. "भिवया ऊंचावून, तिनं हर्षोत्फुल्ल नजरेनं माझ्याकडे पाहिलं, पदर खांद्यावर उलटा टाकून त्रिवलीचं व नाजुक कटिबंधाचं दर्शन घडवलं आणि लचकत, मुरडत क्षणभर दारात थांबून जडपावलानं ती आत निघून गेली."

भिवई ऊंचावुनी बघे मजसी सखि सानंद।
अंचल उडवित दाविते, त्रिवली, उदर, कटिबंध।
लचकत मुरडत मान ती, थबके क्षण दारांत।
दृष्टी दृष्टिस भेटवी-पाय निघेनां आंत॥२४२॥

* *

२४३ **रस की सी रुख, ससि मुखी, हँसि हँसि बोलत बैन।**
गूढ मानु मन क्यौं रहै भए बूढ-रँग नैन॥२४३॥

नयन गोपन

खंडिता, धीरा नायिकेची मनधरणी, "हे शशिमुखी, तू हसत हसत बोलत आहेस तरी तुझ्या मनातला रोष डोळ्यात दिसतो आहे. डोळे इंद्रगोपासारखे लाल सुरंग झाले आहेत, आणि गालही त्याला साथ देत आहेत. तुझ्या मनातले गूढ कळू दे तरी!"

अनुक्रमणिका

हसत शशिमुखी बोलते, प्रसन्न प्रणय रसांत।
इंद्रगोप नयनीं दिसे प्रीत गुपित गालांत॥२४३॥

* *

२४४ **जिहिं निदाघ-दुपहर रहै भई माघ की राति।**
तिहिं उसीर की रावटी खरी आवटी जाति॥२४४॥

ग्रीष्मदुपार

दूती नायकाजवळ नायिकेच्या विरहतापाचं वर्णन करते. "शीत सुगंधित वाळ्याच्या पडद्यात, ग्रीष्म दुपार देखील, माघामधल्या थंडीच्या रात्रीसारखी वाटते. पण माझी सखी तुझ्या विरहतापानं वाळ्याच्या पडद्यातही होरपळते आहे".

शीत सुगंधित झिरमिरी वाळ्याच्या पडद्यांत।
ग्रीष्म दुपारहि भासते माघामधली रात॥
विकल होय माझी सखी तळमळते रे आंत।
ऊन झळा वाळाच दे नित तुझिया विरहांत॥२४४॥

* *

२४५ **रही दहेंडी ढिग धरि, भरी मथनिया बारि।**
फेरति करि उलटि रई नई बिलोवन हारि॥२४५॥

धांदल

नायिका ताक घुसळीत आहे. एवढ्यात प्रियकर तिथे येतो. त्याला पहाताच तिची धांदल उडते. उलटी रवी धरून ती पाणीच घुसळू लागते. लक्षात येताच लाजते व पुन्हा बावरते.

दहि दुतली ठेवी तशी, घाई घाइ अधीर।
घुसळे रवि उलटीं धरी माथन भरले नीर॥
येतां अवचित कोण तें, पंजरि बोले कीर।
दधिमंथन करि बावरी तुटती तिरपे तीर॥२४५॥

* *

२४६ **देवर-फूल-हने जु, सु सु उठे हरषि अँग फूलि।**
हँसि करति औषधि सखिनु देह-ददोरनु भूलि॥२४६॥

गोडगुलेल

नायिका आपल्या दीरावर अनुरक्त आहे. दीरानं तिला फुलं फेकून मारताच तिचं अंग अंग फुली फुललं, सखीला वाटलं हिच्या अंगावर दादरे उठले आहेत, तेव्हा काही तरीं औषध लावायला हवं. औषध लावताना ती मनातून हसत होती. एक चतुर सखी दुसरीला

अनुक्रमणिका

सांगते,“अग मी सांगू का, तिचं धाकट्या दीराशीं गुप्तप्रेम चालू आहे. त्यानं तिला फुलं फेकून मारली तिच्या नाजुक देहावर ददोरे उठले.”

येत चोरट्या पावलीं तिचा धाकला दीर।
तिजवरती चतुराइनें सोडि फुलांचे तीर॥
फुलीं फुलावें अंग तें—आठवि गोड गुलेल।
हसे मनाशीं आपुल्या, औषध लावि फुलेल॥२४६॥

* *

२४७ **फूले फदकत लै फरि पल, कटाच्छ-करवार।**
करत बचावत बिय-नयन-पाइक धाइ हजार॥२४७॥

नयनझुंज

चारचौघात बसलेलं ते प्रेमीयुगुल परस्परांशी चोरटी लोचनलढत खेळत आहे. त्या लढतीची तिची संजयसखी वर्णन करते. “दोघांच्याही डोळ्यांचे पायदळ शिपाई पापण्यांची ढाल व कटाक्षांची तरवार घेऊन समोरासमोर आले. आणि एकमेकावर वार करू लागले. चुकवून अडवू लागले. असा घाव बचावाचा खेळ भरसभेत चालू होता.”

रोखुनिया दृगसंगिनी समरीं सैनिक नैन।
परस्परांतें छेडिती टोचुनि चुकवित पैन॥
कटाक्ष खर तलवार ती चालवि वारंवार।
ढाल अडविते पापणी सहज झेलिते वार॥
कटि खाली कधि नेमके करि घावावर घाव॥
वक्षांवरि सहजीं सखी झेलित घाव॥२४७॥

* *

२४८ **पहुला-हारु हियैं लसैं, सन की बेंदी भाल।**
राखति खत खरे खरे खरे-उरोजनु बाल॥२४८॥

शेत राखण

नायक कुणा ग्रामीण स्त्रीला शेत राखताना पहातो. तिच्या निरोगी व नैसर्गिक सौंदर्यावर मोहित होऊन तो स्वगत म्हणतो. “हृदयावर पोथमण्यांची माळ घालून व भालावर सनटिकली लावलेली रानकिशोरी शेतात उभी राहून आपल्या टोकदार उन्नत उरोजांचं शस्त्र घेऊन शेताची राखण करीत आहे.”(आणि केस त्या उरोजांचं.)

भालावर सन बिंदुली गळ्यांत गहुला हार।
शेत राखते उभा उभी उभय उरोज उभार॥२४८॥

* *

अनुक्रमणिका

२४९ लई सौंह सी सुनन की, तजि मरली, धुनि आन।
किए रहति नित रातिदिनु कानन-लागे कान॥२४९॥

नादिनी

नायिकेच्या अनुरागाची स्थिती, दूती नायकाला कथन करते, "जेव्हापासून आपल्या रसवती मुरलीचे मंजुस्वर तिने ऐकले, तेव्हापासून त्या स्वरांशिवाय दुसरा स्वर ऐकायचा नाही अशी जणू काय तिने आण घेतली आहे. तिचे कान सदाच काननाकडेच लागलेले असतात."

मंजु मुरलिरव ऐकतां तेंच लागलें ध्यान।
नको श्रवणिं ध्वनि अन्य तो जणूं घातली आण॥
नाद घेतला एक तो रुचे न कोकिलगान।
रातंदिन ती काननीं बसे लाऊनी कान॥२४९॥

* *

२५० तूं मति मानै मुकतई कियैं कपट चित कोटि।
जौ गुनही तौ राखियै आँखिनु माँझ अगोटि॥२५०॥

कपट नाटकी

शठ नायक खंडिता नायिकेपासून आपला अपराध लपविण्यासाठी कपट नाटक करतो. त्याचा वादसंवाद सखी सांगते, "अतिशय कपटी आहात तुम्ही. अपराध झाकण्यासाठी केलेलं कपट नाटक मला कळत नाही होय! तुमची अशी सुटका होईल असं समजू नका." "बरं बुवा, आम्ही अपराधी आहोंत हे तुमच्याकरिता हवं तर कबूल करतो. मग त्यासाठीं शिक्षा म्हणून, तूं आपल्या, डोळ्यांत मला बंद करून ठेव. आणि दोन्ही भुजांनी करकचून मला बांधून टाक, मग तर झालं."

कपट पुरें मी जाणते-तुमचे लटके बोल।
होइ न सुटका सांगुनी अपराधी चंडोल॥
पटे न तुजसी मानिनी, बांधुनी भुजबंधांत।
कर बंदी मज साजणी दोन सजल नेत्रांत॥२५०॥

* *

२५१ गिरि तैं ऊँचे रसिक-मन बूडे जहाँ हजारु।
वहै सदा पसु नरनु कौं प्रेम-पयोधि पगारु॥२५१॥

प्रेम-पयोधी

कविची स्वाभाविक उक्ती—या प्रेमपयोधीत ऊंच पर्वतासारखी रसिक मने बुडाली, पण तोच प्रेमसागर नरपशू सहज उल्लंघून जातात.

बुडति शतावधि तुंगगिरी रसिक मनें हळुवार।

अनुक्रमणिका

सहज लंघिती नरपशू प्रेमपयोधि अपार॥२५१॥

* *

२५२ **भावकु उभरौंहौं भयौ, कछुकु परयौ भरु आइ।**
सीप-हरा कैं मिसि हियौ निसदिन हेरत जाइ॥२५२॥

मन्मथ पाउले

ज्ञातयौवना नायिकेची कमनीय हालचाल सखी नायकाला सांगते. "ती मुग्धा गळ्यातील शिंपलाहार पहाण्याच्या निमित्तानं वरवर येणाऱ्या कोवळ्या वक्षांकडे वारंवार पहाते, हळूच चांचपते, त्या उभारांची नवलाई तिला मुग्ध करते."

निरखि रातदिन ती उरी रम्य शिंपला हार।
अजाण मुग्धा या मिषें वक्षी येत उभार॥
कशी कुठोनी लागली तिच्या मनीं चाहूल।
वळलें कुंवार शिवेकडे मदनाचें पाऊल॥२५२॥

* *

२५३ **गली अँधेरी, साँकरी भौ भटभेरा आनि।**
परे पिछाने परसपर दोऊ परस-पिछाति॥२५३॥

अंधारी भेट

अरुंद अंधाऱ्या गल्लीत नायक नायिकेची अचानक धडक भेट झाली. पण परस्पर स्पर्शानं त्यांनी एकमेकाला ओळखलं ही गोष्ट सखी सांगते, "त्या अरुंद अंधाऱ्या बोळीतून दोघेही समोरून येत असता धडक भेट झाली. अंगाला अंग लागताच त्या परिचित स्पर्शानं त्यांनी एकमेकांना अचूक ओळखलं."

अरुंद अंधारी दिसे बोळीमधली वाट।
धडक लागुनी भेटती जशी फुटावी लाट॥
आणि अचानक जाणवे परिचित पहिला स्पर्श।
दिठीं दिसेना कांहिही मिठींत मावे हर्ष॥२५३॥

* *

२५४ **कहि पठई जिय-भावनी पिय आवन की बात।**
फूली आँगन मैं फिरै, आँग न आँग समात॥२५४॥

आनंदमात

पतिच्या घरी येण्याचा सुखदायी संदेश ऐकताच नायिकेचा आनंद गगनात मावेना, तिला अंगण ठेंगणं झालं."

साजण अजि येणार ही आनंदाची मात।
फुलीं फुले ती अंगणीं अंग अंग बहरात॥२५४॥

*   *

२५५ **जिन दिन देखे वे कुसुम, गई सु बीति बहार।**
अब, अलि, रही गुलाब मैं अपत कँटीली डार॥२५५॥

कांटेरी डहाळ

विगत वैभव, गलित यौवन व सुख विनाश यावरील ही अन्योक्ति – "हे भ्रमरा, सुंदर सुगंधित पुष्पे या उजाड उद्यानात तुला दिसणार नाहीत. तो वसंतकाल आता संपला, बहर ओसरला. ज्या गुलांबावर तू भाळलास त्याची काटेरी पर्णहीन डहाळ तेवढी उरली आहे."

शोधित फिरसी कशास भ्रमरा उगाच रानोमाळ।
फुला फुलांचा बहर संपला, गेला वसंत काळ॥
तुझा लाडका गुलाब सुकला, उजाड झाला माळ।
उरली केवळ पर्णहीन ही कांटेरीच डहाळ॥२५५॥

*   *

२५६ **मैं बरजी कै बार तूँ, इतकित लेति करौट।**
पँखुरी लगैं गुलाब की परिहै गात खरौट॥२५६॥

देहदहेज

विश्रब्ध नवोढा नायिका, नायकाकडून तोंड फिरवून बाजूस झोपली आहे. सखी हे बघून तिला भीती घालित, व देहाची प्रशंसा करीत तिला कड फिरवायला उद्युक्त करते. "संभाळ गडे, तू एका बाजूस अगदीं कडेला झोपली आहेस, तिकडे पसरलेल्या गुलाब पाकळ्या लागून तुझे गाल खरचटायचं. मग म्हणशील की मी सांगितलं नाही म्हणून! सुचवते हो. तिकडे वळलीस तर बरं!"

कड फिरवुनिंयां झोपशीं सोडुनि अर्धी शेज।
कुणी नसे या बाजुला द्याया देहदहेज॥
सांगुं किती ग मी तुला, उगाच करिसी हाल।
कमल पाकळी लागुनी खरचटती हे गाल॥२५६॥

*   *

२५७ **नीचीयै नीची निपट दीठि कुही लौं दौरि।**
उठि ऊँचैं, नीचौ दयौ मनु कुलिंग झपि, झौरि॥२५७॥

अनुक्रमणिका

लाजरी झेंप

नायिकेची दृष्टि प्रियकराला पाहताच, खाली खाली झुकत, एकदम ससाण्यासारखी वर झेप घेऊन मनोविहंगावर झडप घालून पंख पाडीत पुन्हा खाली झुकते. ही झटापट तो दूतीला सांगतो."मला पहाताच तिची दृष्टि खाली वळत अचानक वर उठली. व पळात मनावर झडप घालून लगेच पुन्हा साळसूदपणे खाली पाहूं लागली."

विनयें खाली पाहूनी करी धूर्त संक्षेप।
उचलुनि वरती पापणी, घेइ अचानक झेप॥
नजर झटापट लाजरी झडप घेतसे नाज।
कुलिंग हे मन पाखरुं नेत ओढूनी बाज॥२५७॥

* *

२५८ **सूर उदित हूँ मुदित-मन, मुखु सुखमा की ओर।**
चिते रहत चहूँ ओर तैं, निहचल चखनु, चकोर॥२५८॥

सखी मुखचंद्र

सखी नायकाजवळ नायिकेची मुखप्रशंसा करते. "रविचा उदय झालावर ही चकोर त्या मुख चंद्राकडे एकटक पाहात चौफेर सुख लुटीत आहे."

रवि येई उदया तरी, सखि मुखचंद्र चकोर।
चाखित सुख चौफेर ते टक लाउनि चितचोर॥२५८॥

* *

२५९ **स्वेद-सलिलु, रोमांच-कुसु गहि दुलही अरु नाथ।**
दियौ हियौ सँग हाथ कैं, हथलेयै हीं हाथ॥२५९॥

पाणि परिणय

पाणिपरिणयात परस्परांचे हात हातात घेताच ते अनुरक्त झाले. ही घटना सखी सांगते, "पाणिग्रहण करताना करात कर गुंफताच, अंग रोमांचित झाले, त्याच हातांनी परस्पर हृदयदान केले. हे अंग रोमांच जणु कुश, स्वेदजल आणि आनंदी आसवं यांनीच दानाचा संकल्प सोडला."

दिले हात हातात हो शुभमंगल अवधान।
कुश पुलक जल आसवें करि हृदयाचें दान॥२५९॥

* *

२६० **दच्छिन पिय, है बाम-बस, बिसराई तिय आन।**
एकै बावरि कैं बिरह लागी बरष बिहान॥२६०॥

अनुक्रमणिका

शशवश कालवीट

स्त्रीबहुल व अनेक पत्नी असणारा नायक, शेजारणीवर अनुरक्त होऊन साऱ्यांनाच विसरला. तिच्या घरीच त्याचं वास्तव्य आहे. पत्नी आपसात बोलतात, "इतके चांगले असूनही या कुलटेनं त्यांना नादी लावलं. आपणा साऱ्यांचाच त्यांना विसर पडला. अगदी शेजारी असूनही वर्ष वर्ष त्यांची भेट घडत नाही—असा हा जवळचा विरह सहन करावा लागतो. मोठी मायाविनी आहे मेली. !"

काळवीट तो सोडुनी हरिणींचा संसार।
शशबाला ती वश करी—जवळ तिचा शेजार॥
दिवस दिवस राही तिथें, सोडुनिया घरदार।
घडे न दर्शन वर्षही, विरहिं सदा अंधार॥२६०॥

* *

२६१ **मोहूँ दीजै मोषु, ज्यों अनेक अधमनु दियौ।**
जौ बाधैं ही तोषु, तौ बाँधौ अपनै गुननु॥२६१॥

सगुण दर्शन

सगुण भक्तीच्या उपासकाची भगवंताला विनवणी. "हे अधमोद्धारका प्रभो! ज्याप्रमाणे तू कित्येक अधमांना मुक्त केलेस तसाच याही अधमाचा उद्धार कर. मला बांधून ठेवण्यातच जर तुला संतोष असेल तर, तुझ्या सगुण भक्तीच्या बंधांनी मला बांधून टाक."

दिली मुक्ति अधमा किती, अधमाधम मी फार।
सगुण भक्ति मज देइ वा गुणीं निर्गुणा तार॥२६१॥

* *

२६२ **चितु तरसतु, मिलन न बनतु बसि परोस कैं बास ।**
छाती फाटी जाति सुनि टाटी-ओट उसास ॥२६२॥

भिंती आड

नायक नायिका दोघेही शेजारी रहातात. दोन्ही घरात फक्त एकच भिंत आड आहे. त्या प्रेमी हृदयांच्या भेटी मात्र राजरोस घडत नाहीत. जवळ असूनही ही ताटातूट. त्या हताश जीवांचे सुस्कारे मात्र भिंती आडून एकमेकांना ऐकू येतात. पण भेटीची आस मिटत नाही. सखी सांगते,"त्या विरह विकल हृदयांची चक्रवाकासारखी स्थिती झालेली आहे. निकट असूनही ही ताटातूट-केवळ सुस्कारे व हुंदके यांचीच देवघेव भिंतीआडून चालू आहे!"

तिकडे भिंती आडुनी ऐकुं येति निश्वास।
विव्हल होई हृदय हे, विकल प्रेम अभिलाष॥
तगमगती मनिंच्या मनीं, असुनी निकट निवास।
तुटे न अंतर, अंतरें तुटती मिटे न आस॥२६२॥

अनुक्रमणिका

*   *

२६३ **जालरंध्र-मग अँगनु कौ कछु उजास सौ पाइ।**
पीठि दिऐ जगत्यौ रह्यौ, डीठि झरोखैं लाइ॥२६३॥

अपुरे दर्शन

नायक नायिकेच्या शेजारी राहतो. तिच्या घरात जाळीच्या झरोक्यातून नायकाच्या घराची गच्ची दिसते. नायकाला त्या जाळीतूनच तिचे अपुरे दर्शन घडले. ती जाळी उघडून बघेल या आशेवर तो रात्रभर बिछान्यावर लेटून टक लावीत खिडकीकडे बघत राहिला. दूती नायिकेला म्हणते, "अग, तुझ्या झरोक्याच्या जाळीतून तुझ्या गोरट्या अंगाची झळक त्याला दिसली. तू जाळी उघडून बघशील या आशेवर तळमळत तो जागत राहिला. किती प्रेम आहे बघ त्याचं तुझ्यावर."

अंग कांतिची झळक ती झरोक्यातुनी येइ।
जाळीमधुनी तें तुझें अपुरें दर्शन होइ॥
पाठ टेकुनी सारखा खिडकीकडे पहात।
डोळे लाउनि घालवी जागरणांतच रात॥२६३॥

*   *

२६४ **परतिय-दोषु पुरान सुनि लखि मुलकि सुखदानि।**
कसु करि राखी मिश्र हूँ मुँह-आई मुसकानि॥२६४॥

पुराण-रंग

पुराणात परस्त्रीगमन दोषाबद्दल पुराणिक बुवा सांगत असता श्रोतृवृंदात बसलेली, पुराणिकाची सौख्यपात्रा साभिप्राय व्यंगार्थानं खुदकन हसली. बोवांनाही हसूं आलं. पण श्रोत्यांना तें कळू नये म्हणून त्यानी ओठ दाबून ते मिटवून टाकलं.

सांगति पुराण रंगुनी परकीया रतदोष।
श्रोतृवृंदिं कुणि परकिया खुदकन हसे सरोष॥
लक्ष वेधिता मिश्रजी, दाबुनि अपुले ओठ।
हसं उमटलें लपविती वरती करुनी बोट॥२६४॥

*   *

२६५ **सहित सनह, सकोच, सुख,स्वेद, कंप, मुसकानि।**
प्रान पानि करि आपनैं, पान धरे मो पानि॥२६५॥

तांबुल दान

नायक काही कामासाठीं नायिकेच्या दारी आला. शिष्टाचारानुसार त्याला पान देण्यासाठीं नायिका दारात आली. पान देताना तिचा अविर्भाव पाहून तो मोहित झाला. हा प्रसंग तो

दूतिला सांगतो. "मला पान देताना तिच्या डोळ्यांत स्नेह, लज्जा, संकोच डोकावला. देह रोमांचांनी महिरला, घामानं चेहरा डंवरला. हातांना कंप सुटला होता. त्या कापऱ्या करानं तांबुलदानाबरोबर, प्राणदानही केलं."

प्रीति, भीति, संकोच तो स्वेद, कंप, सुख भास।
मुठींत घेउनि जीव ती येत करित स्मित हास॥
वश करुनी अनुभाव हे जिंकित पंचप्राण।
अंगुलि लाघव तें करी देतां तांबुल दान॥२६५॥

* *

२६६ **सीरैं जतननु सिसिर-रितु सहि विरहिनि, तन-तापु।**
बसिबे कौं ग्रीषम-दिननु परयौ परोसिनी पापु॥२६६॥

प्रिय विरह ताप

प्रोषितपतिका नायिकेची दूती नायकाला तिचा विरह निवेदित करते. नायकाचं शेजारणीवर प्रेम होतं. त्यामुळं त्या दोघात कलह उत्पन्न होऊन नायक परदेशी निघून गेला. नायिका आता विरहाने संतप्त झाली आहे. दूती नायकाला सांगते. "ती विरह ज्वालेनं होरपळत आहे. शिशिरऋतू तर अतिशय तापदायक वाटतो. त्यात ग्रीष्म दुपारही जवळ येत आहे. शेजारच्या पापाचं फळ ती भोगते आहे."

विरह ज्वाल कराल ती शिशिर शीत उपचार।
ग्रीष्म साहुनी पाप हें करी निकट शेजार॥२६६॥

* *

२६७ **सोहतु संगु समान सौं, यहै कहै सबु लोगु।**
पान-पीक ओठनु बनै, काजर नैननु जोगु॥२६७॥

रंगसंगति

नायकाच्या ओठाला काजळ आणि डोळ्याला पानपीक लागलेला पाहून नायिका उपहासानं म्हणते. "सारे सज्जन म्हणतात की समान संगती साजून दिसते. तांबुल लाली ओठावरच हवी आणि काजळ डोळ्यांनाच शोभतं. स्थळ विपर्यास काही शोभून दिसत नाही."

सुजन सांगती सर्वही साजे संग समान।
ओठीं तांबुल पीक तो नयनीं अंजन छान॥२६७॥

* *

२६८ **तूँ रहि, है ही, सखि, लखौं; चढि न अटा, बलि, बाल।**
सबहिनु बिनु हीं ससि-उदै दीजतु अरघु अकाल॥२६८॥

अनुक्रमणिका

चंद्राविण चांदणे

नायिकेनं चतुर्थीचं व्रत धरलं आहे. चंद्रोदय बघण्यासाठी ती वारंवार गच्चीवर जाते. ती उपाशी असल्यामुळे, तिला चढण्या उतरण्याचा त्रास होऊ नये म्हणून सखी तिला अडवित म्हणते. "अग तू इथंच थांब, मी गच्चीवरून चंद्रोदय बघून येते. कृपा करून तू जाऊ नकोस. चंद्रोदय न होताच लोकांना चांदणं पडल्याचा भास होईल. त्यांची दिशाभूल होईल. अकाल अर्ध्य देऊन ते उपास सोडतील आणि त्याचं पाप तुझ्या माथी बसेल."

थांब इथे ग जाऊं नको, सौधावरति उगीच।
चंद्रोदय तो चवथिचा बघते जाउनि मीच॥
चंद्रावांचुनि चांदणें, जनास होइल भास।
देतिल अर्ध्य अकाल ते सोडितील उपवास॥२६८॥

* *

२६९ **दियौ अरघु, नीचैं चलौ, संकटु भानै जाइ।**
सुचिती है औरौ सबै ससिहिं बोलोवौं, आइ॥२६९॥

संकष्टीचें पारणें

सखी म्हणते, "तू अर्ध्य दिलंस, आतां गच्चीवरून खाली चल. संकष्टी सोडायची आहे ना! आणि इतर स्त्रियांनाही ते बरं होईल. त्यांचं संकट टळेल. बिचाऱ्या सुचित्तानं उपास सोडतील. तू इथं असलीस तर चंद्र कोणता. हा कीं तो, असा त्यांना संभ्रम पडायचा! चल त्यांच्या पदरी पुण्य पडू दे."

अर्ध्य दिलें चल जाऊं ग, चंद्र उदित गगनांत।
सोडायातें पारणें सौधावरुनी आंत।
फिटुं दे त्यांचें पारणें विलोकुनी शशिबिंब॥
भ्रमतिल रमणी पाहुनी हें सुंदर प्रतिबिंब॥२६९॥

* *

२७० **ललित स्याम लीला, ललन, बढी चिबुक छबि दन।**
मधु-छाक्यौ मधुकरू पर्‍यौ मनौ गुलाब-प्रसून॥२७०॥

गोंदण

नायिकेच्या हनुवटीवरील गोंदणाचं सखी नायकाजवळ कौतुक करते, तिच्या इवल्या हनुवटीवरील गोंदण, इतकं सुरेख आणि गोड दिसतं की जणु काय गुलाबाच्या पाकळीवर भ्रमर रस पिऊन धुंद झोपला आहे.

गोंदण तें हनुवटीवरी गोंडस नील करंद।
गुलाब कळिवर भृंग की पहुडे पिउनि मरंद॥२७०॥

* *

२७१ **सबै सुहाएई लगैं बसैं सुहाए ठाम।**
गौरें मुँह बेंदी , लसैं अरुन, पीत, सित,स्याम॥२७१॥

सारच सुंदर

कविची प्रास्ताविक उक्ती. "योग्य स्थानी, योग्य वस्तू सुशोभित दिसते. एवढेच नव्हे तर उत्तम जागी सामान्य वस्तूही उठून दिसते. गौरमुखावर लाल, पांढरी, पिवळी, निळी, कुठलीही बिंदी सुरेख दिसते."

गौर मुखावर बिंदुली, अरुण, पीत, सित, शाम।
सौंदर्यासह सकलही दिसे रम्य अभिराम॥२७१॥

* *

२७२ **भए बटाऊ नेह तजि, बादि बकति बेकाज।**
अब, अलि, देत उराहनौ अति उपजति उर लाज॥२७२॥

पथिक निवास

काही दिवसांपासून नायक फारच कमी वेळ घरात रहातो व इतर रमणींच्या सान्निध्यात दीर्घकाळ घालवितो. सखी टोमणा मारते त्यावर पतीला ऐकू जाईल अशा बेतानं नायिका उत्तरते. "अग, आता हे घर, धर्मशाळा झाली आहे. पाहुण्यांनी थोडावेळ थांबावं, विसावा घ्यावा व निघून जावं, कुणीही उतरावं इथं. तू माझ्याशी उगाच वाद घालतेस! बोलून बोलून मलाच लाज वाटायला लागली आहे. कोडग्यांना त्याचं काय?"

सदन जाहलें हे सखे आतां पथिक निवास।
मलाच उपजे लाज ही, बोलुनी बोलुं कुणास॥
घरचे झाले पाहुणे दोन घडीचा वास।
झालें मन ही कोडगे किती करूं उपहास॥२७२॥

* *

२७३ **मानु करत बरजाति न हौं, उलटि दिवावति सौंह।**
करी रिसौंहीं जाहिंगी सहज हँसौंहीं भौंह॥२७३॥

मुलखाचे लबाड

नायिका नायकासमोर मान धरू इच्छिते. सखी म्हणते, "मान घ्यायला तुला मी कशाला अडवू? उलट मीच म्हणते की तू भरपूर मान घे, पण तुला हे जुळेल का? मारे भिवया वर चढवशील, मान फिरवशील, हे एकपरी जमेल, पण तुझे हे सदाचे हसरे डोळे, या लबाडांना कसं आवरशील! त्यांनाच नीट सांभाळ."

अडवुं कशाला मी तुला, खुशाल करि गे मान।
शपथ उलट मी घालते, झुकवी तो अभिमान॥

अनुक्रमणिका

जुळेल कोपें चढवुनी भिवई साधुनी कोन।
मुलुखाचे परि हासरे लबाड डोळे दोन॥
आवर ग फसवे पुरे, कळे न वेळ अवेळ।
मिटुनि पापणी खेळती नजरबंदिचा खेळ॥२७३॥

* *

२७४ **तिय-तिथि तरुन-किसोर-बय पुन्यकाल-सम दोनु।**
काहूँ पुन्यनु पाइयतु बैस-संधि संक्रोनु॥२७४॥

संगम सीमा

नायिकेची किशोरावस्था संपून ती नुकतीच तारुण्यात पदार्पण करते आहे. वयाचा हा संधिकाल सुखसंगमाला सुयोग्य अवसर आहे. असे सखी नायकाला सांगून, तिच्या भेटीला प्रवृत्त करते."

पुण्यप्रद ये पयतिथी रम्य संक्रमणकाल।
शैशवयौवनसंगमीं स्त्रीसुख सुसंधिकाल॥२७४॥

* *

२७५ **गनती गनिबै तैं रहे, छत हूँ अछत-समान।**
अलि, अब ए तिथि औम लौ परे रहौ तन प्रान॥२७५॥

अवम तिथी

प्रोषित पतिका नायिका म्हणते, "प्रियकराच्या वियोगात हे प्राण असून नसून सारखेच आहेत. जीवन्मृत असे जगण्यात काय अर्थ? हटवादीपणानं प्राण देहात राहिले तरी त्यांची स्थिती अवम तिथी सारखीच आहे. त्याला कोणी गणीत नाही." (अवम तिथी—जी तिथी सुर्योदयाच्या वेळी असते, तीच दिवसभर मानली जाते. सुर्योदयानंतर आलेल्या स्थितीला महत्त्व नाही, तिची गणना कुणी करीत नाही. तीच ही अवम तिथी)."

असुनी नसुनी सारखे अवम तिथी समान।
सखि विरही देहांत या जीवन्मृत हे प्राण॥२७५॥

* *

२७६ **सबै हँसत करतार दै नागरता कैं नाँवँ।**
गयौ गरबु गुन कौ सरबु गएँ गँवारैं गाँव॥२७६॥

गाजरपारखी

कविची उक्ती. "अरसिकात रहाणाऱ्या गुणीजनांची कदर होत नाही. गांवगवार गुणांचीही हेटाळणी करतात. नगरवासी गावंढळात गुण दाखवूं लागला की त्याचे हसे होते."

टाळ्या पिटुनी उपहासानें हसती गांव गवार।
गुणगर्वी या नगरवासिया देती धीट उतार॥२७६॥

*   *

२७७ **जाति मरी बिछुरी घरी जल-सफरी की रीति।**
खिन खिन होति खरी खरी, अरी, जरी यह प्रिती॥२७७॥

जळली मेली प्रीत

नायिका सखीला म्हणते, "हे असलं कसलं ग प्रेम! क्षणाक्षणाला ते गाढ होत जातं आणि आता तर अशी पाळी आलेली आहे, की मी रात्रंदिवस मासळीसारखी तळमळते--थोडा जरी त्यांचा वियोग झाला तर वेड्यासारखी मी मरणी मरते--याचं त्यांना काय? यालाच का प्रेम म्हणतात! जळलं मेलं असलं प्रेम!"

मीनापरि मी तळमळते ग, मरणीं मरते रीत।
रातंदिन ती वाढत जाई जळली मेली प्रीत॥२७७॥

*   *

२७८ **प्रिय-प्राननु की पाहरू, करति जतन अति आपु।**
जाकी दुसह दसा परयौ सौतिनिह संतापु॥२७८॥

सवत संताप

प्रोषित पतिका नायिकेची विरहदशा दिवसेंदिवस असह्य होत आहे. नायकावर तिचे निरातिशय प्रेम आहे. ती गेली तर तोही जगणार नाही अशी लोकभावना आहे. त्यामुळं त्याच्या प्राणांची रक्षणकर्ती तीच आहे. त्यामुळं तिला अधिक जपावं लागतं. सवतीचा संताप त्यामुळं वाढतो. दुःसह विरहदशेतही ती पतीच्या प्राणाला जपते, पण तिची ही दशा पाहून सवतीचा संताप वाढतो."

पति प्राणांची रक्षिता साही विरह विलाप।
पाहुनियां हो सवतिच्या अंगाचा संताप॥
जपते विरहिदशेतही प्राणपतीचे प्राण।
सवतीचा संताप हो पाहुनि सुटते भान॥२७८॥

*   *

२७९ **अहे, कहै न कहा कह्यौ तो सौं नंदकिसोर।**
बड बोली, बलि, होति कत बडे दगनु कैं जोर॥२७९॥

कलहान्तरिता

कलहान्तरितेचा नायकांवरील राग अजूनही गेला नाही. "ते असे कपटी आहेत" इ. लाखोली वहात ती सारखी बडबडते आहे. सखी तिला समजावीत म्हणते,"पण मी

विचारते, एवढं घडलं तरी काय? काय बोलला तुला तो? मला सांग तर खरी! उलट तुझे हे टपोरे डोळेच, भारी मूजोर अन् बडबडे आहेत. तेच तुला फशी पाडतात. त्यांच्यावर मुळी देखील भरवंसा ठेऊ नकोस! अग शामसुंदरानं तुला असं पाहिलं तर तो खदखदून हंसेल."

कां इतुकी रुसलीस ग, झाले लाल कपोल।
काय बोलला तो तुला, कळुं दे तरि ते बोल॥
टपोर डोळे हे तुझे बडबड करिति मुजोर।
पाडतील तुजला फशी हसेल नंदकिशोर॥२७९॥

* *

२८०. **दियौ जु पिय लखि चखनु मैं खेलत फाग-खियालु।**
बाढत हूँ अति पीर सु न काढत बनतु गुलालु॥२८०॥

फाग

होरीचा रंग खेळताना नायकाने प्रियेच्या डोळयात गुलाल उधळला. तिच्या डोळ्यात गुलाल गेल्यामुळे ती डोळे चोळते. पण तो गुलाल त्याच्या मुठीतला असल्यामुळं त्रास सहन करीत तसाच राहू देते.

खेलत फगवा खेळिया, झोकत नयनिं गुलाल।
निघे न डोळे चोळितां गुंजेपरि ही लाल॥
राहूं देई तशीच ती जरी होतसे आग।
प्रियाकडे पाहतां उरीं हसत रंगला फाग॥२८०॥

२८१ **मैं तपाइ त्रयताप सौं राख्यौ हियौ हमामु।**
मति कबहुँक आऐं यहाँ पुलकि पसीजै स्यामु॥२८१॥

निमज्जन धाम

भक्ताची उक्ती. "माझ्या ह्रदयाचे स्नानगृह त्रिविध तापांनी तापलेलं आहे. कधीं शामसुंदर ह्रदयात आलेच, तर पुलकित होऊन स्वेद बिंदूंनी न्हातील आणि करुणार्द्र होतील."

तापत्रय हे तपविती ह्रदय निमज्जन धाम।
येता मति हो पुलकिता स्नात शुचिर्भुत शाम॥२८१॥

* *

२८२ **बहकि बडाई आपनी कत राँचत मति-भूल।**
बिनु मधु मधुकर कैं हियैं गडै न गुडहर, फूल॥ २८२॥

अनुक्रमणिका

रक्तकण्हेर

कण्हेरीच्या फुलावर अन्योक्ती करून, धनाढ्यपतिहित पण गुणहीन व्यक्तिला उद्देशून कवी म्हणतो, "हे कण्हेरी, वृथा मोठेपणाच्या भिकार भपक्याच्या धुंदीत तूं रंगलेली आहेस खरी, पण सुवास आणि मधुरमरंदावाचून तुझ्याकडे मधुकर फिरकणार देखील नाही."

गंध न सुमउद्दाम ही नीरस रक्तकण्हेर।
मोहि न मधुकर जवळिं ये धरि न फेर चौफेर॥२८२॥

* *

२८३ **आडे दै आले बसन जाडे हूँ की राति।**
साहसु ककै सनेह-बस सखी सबै ढिग जाति॥२८३॥

विरहकाहिली

प्रोषितपतिका नायिकेची सखी तिची विरहाकुलता प्रियकराला सांगते, "थंडीचे दिवस असूनही ती ओली वस्त्रे नेसते व पांघरते, तरी तिचा विरहदाह शमत नाही, सखींचा सहवास ही तिचा ताप निववू शकत नाही."

ओलविली वसनेच घे असुनि हिवाळी रात।
निववि न सखि सहवास ही विरहताप देहात॥२८३॥

* *

२८४ **सब अँग करि राखी सुधर नाइक नेह सिखाइ।**
रसजुत लेति अनंत गति पुतरि पातुर-राइ॥२८४॥

नट पुतळी

नायकाला पाहून नायिकेचे चंचल नेत्र विविध भावनृत्य दाखवितात. ते निरखून सखी इतरांना सांगते, "सुंदर तनुच्या रंगभूमीवर, अनंगानं शिकवलेल्या नवरस नृत्याच्या, विविध लयललित भाव गति, तिच्या चंचल नयनातील नट पुतळ्या कुशलतेने दाखवीत आहेत."

सुंदर तनु ती रंगभू, नायक चतुर अनंग।
नटपुतळी नयनांतली शिकवी नवरस रंग॥
मृदंग नर्तनिं रंगवी पारंगत रस भाव।
नयन लास्य गति चंचला अनंत ललित विभाव॥२८४॥

* *

२८५ **सुनत पथिक मुँह माह-निसि चलति लुवैं उहिं गाम।**
विनु बूझैं, बिनु हीं कहैं,जियति बिचारी बाम॥२८५॥

अनुक्रमणिका

माघातली झळ

आपल्याच गावातून आलेल्या पथिकाच्या तोंडून "त्या गावी रात्री माघातही उष्ण झळा चालतात" हें ऐकताच आपली विरहिणी प्रेयसी जीवित असल्याची त्याला खात्री पटते.

येई झळ माघांतही अंग कहाली होय।
उन्हाळाच तो भासतो कांहि न उरलि सोय॥
पथिक बोल हे सांगती, गांवांतिल अनुमान।
जीवित अजुनी विरहिणी, मुठींत घेउनि प्राण॥२८५॥

* *

२८६ **अनत बसे निसि की रिसनु उर बरि रही बिसेषि।**
तऊ लाज आई झुकत खरे लजौं हैं देखि॥२८६॥

पर्यावसान

सखी वचन. "नायक रात्री अन्यत्र राहिल्यामुळे नायिका आतल्या आत अतिशय रागवली. पण पती शरमिंदा झालेला दिसताच त्याला बोलण्याऐवजी ती स्वतःच लाजली."

हृदय जळे कळतां तिला, कुठे कंठिली रात।
बोलवे न कटु लाजते, बघुनी लज्जित नाथ॥२८६॥

* *

२८७ **सुरंग महावरु सौति-पग निरखि रही अनखाइ।**
पिय-अँगुरिनु लाली लखैं खरी उठी लगि लाइ॥२८७॥

मेंदीची लाली

अन्यसंभोगदुःखिता नायिकेचा वृत्तांत कशी सांगते, "सवतीच्या पायाला कलापूर्ण मेंदीचा लाल रंग लागलेला पाहून, इर्षेने ती मनातल्या मनात दुःखित झाली. पण प्रियकराच्या बोटालाही तीच लाली बघताच क्रोध ज्वाला भडकून उठली."

पाय बघुनिया सवतीचे लाल मेंदीचा रंग।
असुयेनें ती रंजली--अनुसूचित हो संग॥
प्रियकर अंगुलि लालिमा, पाहुनि होई लाल।
आग आग हो अंगना अधिकच भडके ज्वाला॥२८७॥

२८८ **मानहु मुँह-दिखरावनी दुलहिहीं करि अनुरागु।**
सासु सदन, मनु ललन हूँ, सौतिनु दियौ सहागु॥२८८॥

गृहप्रवेश

शीलवंत नववधूचा गृहप्रवेश होताच सर्व कुटुंबियांनी तिचे यथायोग्य स्वागत केले. सखी सखीला सांगते, “ती नवपरिणिता घरात येताच, नायकानं आपलं मन, सासूनं सदन, आणि सवतीनी सौभाग्य तिच्या स्वाधीन केलं. सुन्मुख बघताच जणु काय एकाचवेळी हे सर्व तिला मिळालं.”

गृह प्रवेश करिते वधू सुनमुख सुख अनुराग।
सासु सदन दे, साजण मन, सवत देत सौभाग्य॥२८८॥
*		*

२८९ **कत सकुचत, निधरक फिरौ, रतियौ खोरि तुम्हैं न।**
कहा करौ, जौ जाइ ए लगैं लगौंहैं नैन॥२८९॥

ओढाळ मन

खंडिता नायिकेचा नायकावर गहजब. “तुम्ही कशाला संकोचित होता? तुम्ही बेधडक हिंडा. तुमचा त्यात मुळी देखील दोष नाहीं. हे दोन मोह लालची लागट चोर आहेत नं, तेच मेले आपल्या मनाला आड वाटेवर ओढून नेतात. तुमचा काही जोर चालत नाही त्यांच्यापुढे! त्याला तुम्ही तरी काय करणार?“

हवी कशाला लाज ही, कशास हा संकोच।
फिरा कुठें ही निश्चयें प्रीति मिळें घरपोच॥
दोष न इकडे तो मुळीं--लोचन लागट चोर।
नेती ओढूनियां मना--चले न तुमचा जोर॥२८९॥
*		*

२९० **आप दियौ मनु फेरि लै, पलटैं दीनी पीठि।**
कौन चाल यह रावरी, लाल, लुकावत दीठि॥२९०॥

भली रीत

परकीया नायिका नायकाला टोमणा मारते. “मला अगोदर दिलेलं मन, परत घेऊन त्याबद्दल आता मला पाठ दिलीत का! भल्या माणसा! नजर टाळून पळ काढण्यांची ही नवी रीत शिकला तरी कुठे?”

दिलें एकदां घेतलें मन हे दिलीत पाठ।
भली रीत शिकला कुठे नजर टाळता वाट॥२९०॥
*		*

२९१ **गोपिनु सँग निसि सरद की रमत रसिकु रस-रास।**
लहा छेह अति गतिनु की सबनु लखे सब-पास॥२९१॥

अनुक्रमणिका

रासमंडळ

श्रीकृष्णासह झालेल्या रासक्रीडेचं वर्णन गोपिका आपसात करतात. "शरदाच्या चांदण्या राती, यमुनापुलिनावर गोपिकासह रासमंडळ धरले. द्रुतलयगतिमुळे शामसुंदर आपल्या निकटच आहे, असा प्रत्येक गोपांगनेला भास होत होता."

पुनव रात शरदांतली, रमणींचा सुख संग॥
यमुनापुलिनी मधुवनी खेळत हरि रसरंग।
कटि निकटी श्रीरंग हा, द्रुतगति चालत रास।
कलाचतुर, सकलांसही देत सुखद सहवास॥२९१॥

* *

२९२ **स्याम-सुरति करि राधिका, तकति तरनिजा-तीरु।**
अँसुवन करति तरौंस कौ खिनकु खरौंहौं नीरु॥२९२॥

तुझा आठव

उद्धव गोकुळातून परत आल्यानंतर श्रीकृष्णाला गोपिकांची विरहाकुल मनस्थिती कथन करतो. "श्रीकृष्णा! यमुनातिरी तुझ्या आठवणीनं विरह व्याकुल झालेली राधा अश्रू ढाळीत असता, जलात पडलेल्या आसवामुळं यमुनेचं पाणी देखील खारट झालेलं आहे. एवढचं नव्हे, तर गोकुळात ठायी ठायी गोपगोपिकांच्या आसवांचे झरे फुटून, पथापथातून, तुडुंब भरलेल्या नद्या वाहत आहेत."

आठवते रे तुला राधिका, पाहूनि यमुनातीर।
नयनांमधुनी झरति आंसवे खारट होई नीर॥२९२॥

* *

२९३ **गोपिनु कैं अँसुवन भरी सदा असोस, अपार।**
डगर डगर नै है रही बगर बगर कैं बार॥२९३॥

तुझा आठव

ठायीं ठायीं तुज आठविता अनंत फुटले झरे।
डोळ्यांतुनि वाहती आसवें गोपगोपिका झुरे॥
पथापथांतुनि गोकुळांत या तुडुंब भरली नदी।
जीवन वाही ओघ वाहता ओसरतो ना कधीं॥२९३॥

* *

२९४ **दुचितैं चित हलति न चलति, हँसति न झुकति, बिचारि।**
लखत चित्र पिड लखि, चितै रही चित्र लौं नारि॥२९४॥

अनुक्रमणिका

चित्रमूर्ति

नायक चित्रशाळेत चित्रे पहात आहे. नायिकाही तिथे आलेली आहे. त्या चित्र प्रदर्शनात नायिकेचेही चित्र लागलेले आहे. नायक कुठल्या चित्राचं विशेष निरीक्षण करतो, या कुतुहलानं ती त्यांच्या मागं चित्रासारखी उभी राहून त्याच्या पहाण्याला पहात आहे. हे दृश्य सखी सखीला सांगते, "सखे मला विचार तर खरी ती अशी का उभी आहे ती! द्विविध चित्तानं ती हलत नाही की बोलत नाही. हसत नाही की चिडत नाही. नायकाला चित्र पहाताना ती चित्रमूर्तीसारखी एक टक, त्याच्या हावभावाकडे पहात आहे."

हसे न बोले मूक ती, लागु दे न चाहुल।
हालचाल ना कांहिही, वाजते न पाऊल॥
चित्र पाहतां प्रियकरा चित्रमंदिरीं नार।
चित्रापरि ती रहाते द्विविध चित्त सुकुमार॥२९४॥

* *

२९५ **कन देबौ सौंप्यौं ससुर, बहू थुरहथी जानि।**
रुप-रहचटैं लगि लग्यौ माँगन सबु जगु आनि॥२९५॥

कृपण कृपा

ही विनोदी उक्ती, कृपणाच्या उदारतेवरील उपहास आहे. "नव्या सुंदर सुनेचे आखूड हात बघून, अतिथींना अन्नदान देण्याचे पुण्य कार्य त्या कृपणाने तिच्यावर सोपविले. पण तिचे देखणे रूप पाहून सारा गावच याचक बनला व मागणी करु लागला."

आखडते कर सून ती, श्वशुर कृपण धनवान।
अतिथी भिक्षा द्यावया सोपवि तिज कणदान॥
रुप देखणें पाहुनी उलटा होय प्रयोग।
मागे जग हे जोगवा, जुळवायातें योग॥२९५॥

* *

२९६ **निरखि नवोढा-नारि-तन छुटत लरिकई-लेस।**
भौ प्यारौ प्रीतमु तियनु, मनहु चलत परदेस॥२९६॥

मनमोहिनी

नवयौवना मुग्धेच्या मनमोहक सौंदर्याचं व कमनीय शोभेचं वर्णन सखी करते. "नव परिणितेचे शैशव सुटून व यौवन प्रवेश होताना पाहून सवतींना आपला पती अधिकच प्रिय वाटू लागला. जणू काय तो दूर देशी जातो आहे.

निरखित शैशव जाय तें नवतुनी यौवनिं चूर।
प्रिय ती अधिकच प्रियकरा, सोडुनि जातां दूर॥२९६॥

* *

अनुक्रमणिका

२९७ **प्रानप्रिया हिय मैं बसै, नखरेखा-ससि भाल।**
भलौ दिखायौ आइ यह हरि-हर-रुप रसाल॥२९७॥

हरि-हर

खंडिता नायिका नायकाला म्हणते. "जशी विष्णूच्या हृदयी रमा, तशीच तुमच्या हृदयात तुमची प्रियतमा बसली आहे. आणि भालावर शशिशेखराप्रमाणं नखरेखेची चंद्रकोर विलसते आहे. आज आपण मला आपलं हे हरिहर रूप दाखवून धन्य केलंत!"

मनोरमा हृदयीं वसे, नखरेखा शशि भाल।
भले शोभलें आज हें हरिहर रुप रसाल॥२९७॥

* *

२९८ **तिय निय हिय जु लगी चलत पिय-नख-रेख-खरौंट।**
सूखन देति न सरसई खोंटि खोंटि खत खौंट॥२९८॥

ओली जखम

कुचमर्दन करताना प्रियकराने केलेली नख जखम, त्याची नित्य आठवण म्हणून ती ओलीच ठेवते. खपली धरूं देत नाहीं.

कुच चुरतां नख जखम तीं, आठव प्रिय हृदयांत।
ओलीच ठेवी सारखी खरडुनी ती दिनरात॥२९८॥

* *

२९९ **सघन कुंज, धन धन, तिमिरु, अधिक अँधेरी राति।**
तऊ न दुरिहै, स्याम, वह दीपसिखा सी जाति॥२९९॥

दीपशिखा

नायक दूतीला विनवून सांगतो, की अंधारी रात्र आहे. भेटीला योग्य अवसर आहे. तू तिला अभिसार करून त्या वनकुंजात घेऊन ये." दूती नायकाची आतुरता अधिक वाढविण्याकरिता तिच्या रूपाची प्रशंसा करीत त्याची प्रार्थना मोडून काढते. "रात्र काजळी आहे. कुंजात अंधार दाटला आहे हे जरी खरं असलं, तरी शाम तिची दीपशिखेसारखी तनुकांती सारी वाट उजळीत येईल. तेव्हा जगाला कळेलच ते कसं लपवितां येईल?"

काजळ काळी रात अंधेरी कुंज तिमिर घनदाट
शाम! गौरतनु दीपशिखेपरि जातां उजळिल वाट॥२९९॥

* *

अनुक्रमणिका

३०० **स्वारथु, सुकृतु न, श्रमु वृथा; देखि, बिहंग, बिचारि।**
बाज, पराए पानि परि तूँ पच्छीनु न मारि॥३००॥

कुऱ्हाडीचा दांडा

दुष्ट राज्यकर्त्याच्या गुलाम सेवकाला स्वजनघात करताना पाहून कवी म्हणतो, "हे ससाण्या जरा मनात विचार कर! तुझ्या ह्या हीन कृत्यानं तुला पुण्य लोभ तर नाहीच पण नुसतेच श्रम मात्र होतील. परवश होऊन तू स्वजनद्विजांचा नाश करू पहातोस, त्या तुला काय म्हणावे!"

स्वार्थ, पुण्य नच श्रमच वृथा करी मनांत विचार।
बाज, विहंगा, स्वजन द्विजांचा विवश करिसि संहार॥३००॥

३०१ **सीस-मुकुट, कटि-काछनी, कर-मुरली, उर-माल।**
इहिं बानक मो मन सदा बसौ, बिहारी लाल॥३०१॥

हृदयी वसो गोपाल

कवी आपले उपास्य दैवत श्रीकृष्णाची गोपालमूर्ती, सदैव हृदयात राहो यास्तव प्रार्थना करतात.

मोर मुकुट, कटि पीतांबर तें, करि मुरली, वनमाळ।
रूप तुझे सुंदरा सदा या हृदयिं वसो गोपाळ॥३०१॥

* *

३०२ **भृकुटी-मटकनि, पीतपट-चटक, लटकती चाल।**
चल चख चितवनि चोरि चितु लियौ बिहारी लाल॥३०२॥

शामसुंदर

नायिका शामसुंदराला कुठेतरी वनात बघते. त्याच्या स्वरूप सौंदर्याचं वर्णन ती सखीजवळ करते. "भृगुटी मटक, पीतपटाची झळक, ती चटक चाल, दृष्टीची चतुर फेक, असा तो चित्तचोर आनंदमूर्ती शामसुंदर, सखे आज मी वनात पाहिला. त्यानं माझं मनच चोरलं".

भृगुटि भंग, कटि झळक पीतपट, ती चटकीली चाल।
चतुर चितवनी चित्त चोरतो, सखे बिहारीलाल॥३०२॥

* *

३०३ **संगति-दोषु लगै सबनु, कहे ति साँचे बैन।**
कुटिल-बंक-भ्रुव-सँग भए कुटिल, बंक-गति नैन॥३०३॥

अनुक्रमणिका

संगदोष

नायिकेच्या नेत्रकटाक्षांनी घायाळ झालेला नायक सखीला सांगतो "संगतीनं संगदोष लागतो हे वचन अगदी खरं आहे. कुटिल आणि वाकड्या भिवयांच्या संसर्गानं डोळे देखील वाकडेपणा करतात".

संगदोष सकलास हो, सत्यवचन हे जाण।
कुटिल भोवया सवें नयनही सोडि वांकडे बाण॥३०३॥

*　　　*

३०४ **जरी-कोर गौरैं बदन बढी रवरी छबि, देखु।**
लसति मनौ बिजुरी किए सारद-ससि-परिवेषु॥३०४॥

जरीकिनार

सखी नायकाला नायिकेची सौंदर्यशोभा दाखवीत म्हणते, "बघा तिच्या गौरमुखावरील पदराची जरी किनार कशी शोभते आहे! जणु काय, शरदाच्या चंद्रबिंबाभोवती वीजच मंडलाकार झाली आहे"

गौरमुखावर शोभते सुंदर जरी किनार।
शारद इंदूभोवतीं वीज मंडलाकार॥३०४॥

*　　　*

३०५ **चितवनि भोरे भाइ की, गोरैं मुँह मुसकानि।**
लागति लटकि, अली -गरैं, चित खटकति नित आनि॥३०५॥

कलती कोर

नायकाला पाहून नायिकेने केलेले हावभाव, तो आपल्या अंतरंग मित्राला सांगतो, "तिची खेळकर वृत्ती, भाबडी दृष्टी, हळूच स्मित करीत सखीच्या कानात कुजबुजताना केलेली कामनीय हालचाल, माझ्या मनाला भुरळ पाडते"

गौरमुखी स्मित लोचनिं दृष्टि भाबडी पोर।
घालित कर सखिच्या गळा, गगनीं कलती कोर॥
खुलतो झुलता झोक तो कुजबुजता कानांत।
चित्त चेतवी चारुता, मनांत मीलन रात॥३०५॥

*　　　*

३०६ **इहीं द्वैहीं मोती सुगथ तूँ, नथ, गरबि निसाँक।**
जिहिं पहिरैं जग-दृग ग्रसति लसति हँसति सी नाँक॥३०६॥

अनुक्रमणिका

नाकावर हसूं

नायिका नायकावर जराशी असंतुष्ट आहे. नायक तिच्या नथीकडे पहात स्वगत, पण तिला ऐकू जाईल अशा बेतानं म्हणतो, "अग नथे! तूं या सुगर मोत्यांचा अभिमान नक्कीच उतरवलास! तुझ्या मुळं ती सुंदर नासिका हसते आहेसं वाटतं (नाकावरील राग)".

तजेल मोती झाक ती, नाकीं नथ अरुवार।
भासे हसते नासिका गर्वभरे तनुसार॥३०६॥

* *

३०७ **हरि-छबि-जल तैं परे, तब तैं छिनु बिछुरैं न।**
भरत ढरत, बूडत तरत रहत घरी लौं नैन॥३०७॥

घटिका पात्रें

शामसुंदराच्या रूपसौंदर्यावर भाळलेल्या डोळ्यांच्या आसक्तीचं वर्णन नायिका आपल्या सखीजवळ करते. "सखे हे मीनाक्ष हरिरूप सौंदर्य जलात पडल्यापासून बाहेरच निघत नाहीत. सारखे अवगाहन करीत आहेत. घटिकापात्राप्रमाणं तरतात पुन्हा बुडतात, पण तिथून दूर होत नाहीत"

नयन मीन हरिरूपजलीं लहरति गे छबिचूर।
बुडति तरति घटिकेपरी, होति न पळती दूर॥३०७॥

* *

३०८ **मार-सुमार-करी डरी मरी, मरींहिं न मारि।**
सिंचि गुलाब घरी घरी, अरी, बरींहिं न बारि॥३०८॥

जाळूं नकोस ग!

प्रोषितपतिकानायिका विरहतप्त झाल्यामुळे, सखी तिच्या अंगावर गुलाब पाणी शिंपडते. पण त्यामुळं तिची विरह ज्वाला अधिक भडकते, ती सखीला म्हणते "कामदेवाच्या निर्घृण प्रहारानं मी व्याकुळ झाले, मेले ग अगदीं! त्यांत वर गुलाबपाणी शिंपून मला जाळू नकोस!"

जळलें मी, मेले सखे, मदन करी प्रहार।
गुलाबजल शिंपुनी पुन्हां जाळुं नकोस जिव्हार॥३०८॥

* *

३०९ **क्यौं हूँ सहबात न लगै, थाके भेद-उपाइ।**
हठ-दढ-गढ-गढवै सु चलि लीजै सुरँग लगाइ॥३०९॥

दुर्गम दुर्ग

मानिनी नायिकेची मनधरणी करून हरलेली सखी या दुर्गमदुर्गाच्या तटबंदीला नायकालाच सुरूंग लावायला सांगते. "संधी घडून येणे कठीण आहे, उपाय हरले आता या तटबंदीला तुम्हीच सुरूंग लावला, तरच ही दुर्गम गढी जिंकिता येईल".

समज पटे ना मुळिं तिचा न चले नीती भेद।
येइ न संधी जुळुनियां, थकली सर्व उमेद॥
अजिंक्य दूर्गमदुर्ग हा हटातटात अभंग।
पडेल तुम्ही लावता तटबंदीस सुरुंग॥३०९॥

* *

३१० **तो ही को छुटि मानु गौ देखत हीं ब्रिजराज।**
रही धरिक लौं मान सी मान करे की लाज॥३१०॥

लाजेला मान

नायिकेने मान धरला आहे. सखी चतुराईनं बोलून त्याचा निरास करते. "अग त्याला बघताच तुझा मान केव्हाच गळाला. तो गेल्यामुळं वाटणारी लाजच अभिमान धरते आहे."

अविर्भाव हा मानिनी, लटका तव अभिमान।
लाजलीस ग मोहना बघतां झुकली मान॥३१०॥

* *

३११ **न ए बिससियहि लखि नए दुरजन दुसह-सुभाइ।**
आँटैं परि प्राननु हरत काँटैं लौं लगि पाइ॥३११॥

कंटकशल्य

कविची प्रास्ताविक उक्ती. "दुष्ट स्वभावी दुर्जन नम्र झाले तरी त्यांच्यावर विश्वास ठेवता कामा नये. पायी पडले तरी कांट्यासारखे बोचून प्राण घेतील".

दुर्जन धरितां पाय ही धरि न भरवसा जाण।
लागतां कंटक पायीं बोचतां कासाविस हो प्राण॥३११॥

* *

३१२ **सखि, सोहति गोपाल कैं उर गुंजन की माल।**
बाहिर लसति मनौ पिए दावानल की ज्वाल॥३१२॥

गुजसंकेत

अनुशयाना नायिका गुंजनिकुंजात न आल्यामुळे, त्या संकेतस्थलावरून निराशेने परत आलेला नायक, तिला सूचित करण्यासाठी, गुंजेची माळ गळ्यात घालून तिच्या दारावरून जातो. ती सख्यांच्या घोळक्यात बसलेली आहे. श्रीकृष्णाला पाहून ती सखीला

अनुक्रमणिका

म्हणते, “हे बघ सखे, शामसुंदराच्या गळ्यात ती गुंजेची माळ कशी छान शोभते ती! जणु काय वनात दावानल गिळून तो नुकताच आला आहे. आणि लाल ज्वाला हृदयावर उसळते आहे”.

कंठीं हरिच्या शोभते, गुंजगुंफिली माळ।
उरिं दावानल ज्वाल कीं येत उफाळुनि लाल॥
सखे पहा तरि श्रीहरी मंद मंद पदिं येत।
गुपित सांगते राधिका, गुंजकुंजसंकेत॥३१२॥

* *

३१३ **महिली, गरबु न कीजियै समै—सुहागहि पाइ।**
जिय की जीवनि जेंठ, सो माह छाँह सुहाइ॥३१३॥

क्षणसंयोग

कलहान्तरिता नायिकेकडून नायक तिच्या सवतीकडे गेला. तेव्हा ती ताठा मिरवीत असता सखी तिला म्हणते. “अग वेडे क्षणाचं तात्पुरतं भाग्य उजळलं म्हणून उगाच गर्व धरू नकोस. जेष्ठातली सावली जिवाला सुख देणारी असली तरी तीच छाया माघात हुडहुडी भरविते”

दोन घडीचें भाग्य हें, घडला प्रिय संयोग।
न धरी वेडे गर्व, हा केवळ योगायोग॥
छाया ती जेष्ठांतली, शीतल रम्य निदाघ।
भरवि जिवाला हडहुडी छळते येतां माघ॥३१३॥

* *

३१४ **हँसि, हँसाइ, उर लाइ उठि, कहि न रुखौंहैं बैन।**
जकित चकित है तकि रहे तकत तिलौं छे नैन॥३१४॥

चकित, थकित

खंडिता नायिकेला सखी सांगते, “सखे कटू बोलून त्याला छळू नकोस. चकित आणि थकित असा तुझ्याकडे तो आशेनं बघत आहे. वक्रनजरेनं पाहू नकोस. प्रीतीनं त्याला आलिंगन दे”.

हसुनी ओठीं घालि मिठी, बोलुं नको कटु बोला।
चकित, थकित तो पाहतो, लोचनकुंचित लोल॥३१४॥

* *

३१५ **तीज-परब सौतिनु सजे भूषन बसन शरीर।**
सबै मरगजे-मुँह करी इहीं मरगजैं चीर॥३१५॥

अनुक्रमणिका

काजळतीज

हरितालिकेचा सण आहे. रात्री नायकासह रत्यत्सवाचे जागरण नायिकेला घडले आहे. म्हणून सकाळी आळसलेली असल्यामुळे तिने श्रृंगारसाज केला नाही. सणानिमित्त सवती नटून थटून बसल्या आहेत. पण नायिकेचे भिजलेले अन् चुरलेले मलीन वस्त्र पाहून त्यांच्या मुखावर म्लानता पसरली.

नटती लेउनि भूषणें, येतां काजळतीज॥
सवति साज शिणगारिती, सरता जागर नीज ॥
धर्मजलें भिजले तिचें वसन तुटे मणिहार ।
मलीन मुख हो पाहुनी चुरलेला श्रृंगार ॥३१५॥

* *

३१६ **गढ-रचना, बरुनी, अलक, चितवनि, भौंह, कमान।**
आधु बँकाईहीं चढे, तरुनि, तुरंगम, तान॥३१६॥

वाकडी मोड

नायिका नायकावर आसक्त होऊन त्याच्या अधीन होऊ पहाते. त्यावेळी सखी तिला आत्मगौरवाचें रक्षण करण्याची सूचना देते. “अग भृकुटी, दृष्टी, कुंतल, गढी, व धनुष्य यांचं वळण सदा नागमोडी असतं. तसंच घोडा, तरुणी व तान यांना खेचून धरल्याशिवाय ते पुढे ओढ घेत नाहींत”

अलक, दृष्टि, भृकुटी, गढी, यास वाकडी मोड।
तुरग, तान, तरुणी, धनू खेंचताच घे ओढ॥३१६॥

* *

३१७ **इत आवति चलि, जाति उत चली, छसातक हाथ।**
चढी हिंडोरैं सैं रहै लगी उसासनु साथ॥३१७॥

तनुहिंदोल

विरहाने कृश झालेल्या नायिकेची विकलता व श्वासोच्छ्वासाची प्रबलता सखी सांगते “ती तन्वंगी विरहाने क्षीण झाल्यामुळे, चालताना आपल्याच श्वासोच्छ्वासाने इकडून तिकडे हिंदोळ्यासारखी डोलते”

येता जातां इकडुनि तिकडे, झुकतां खाई झोल।
विरहकृशा ती श्वास कंपिता डुलतो तनुहिंदोल॥३१७॥

* *

३१८ **डर न टरै,नींद न परै, हरै न काल-बिपाकु।**
छिनकु छाकि उछकै न फिरि, खरौ बिषमु छबि-छाकु॥३१८॥

अनुक्रमणिका

सौंदर्य धुंदी

पूर्वानुरागिणी नायिकेला आपल्या रूपाची एवढी धुंदी चढली आहे की ती स्वतःला सांभाळू शकत नाही. सखी आपसात बोलतात, “सौंदर्याची मादकता एकदा चढली कीं ती उतरत नाहीं. भीतीला भीत नाही. नीजेला शिवत नाही नीतीला डरत नाही. आळानं मरत नाही”.

उतरताहि ना उतरते रूपछबीची धुंद।
भय नीती नच नीज ये नयनीं मन बेबंद॥३१८॥

* *

३१९ **रमन कह्यो हठि रमन कौं रतिबिपरित-बिलास।**
चितई करि लोचन सतर, सलज, सरोज, सहास॥३१९॥

विस्मित-स्मित

सखी सखीला सांगते, “प्रियकराने नायिकेला विपरीत रतीची मागणी केली. विस्मयाने, ती डोळे मोठे करून, भीतीनं लाजत हसत, रागानं त्याच्याकडे पाहूं लागली”.

हट्ट धरी रतिरमण तो, सुचवि संग विपरीत।
विस्मित स्मित लोचनें करी सलज कुपित भयभीत॥३१९॥

* *

३२० **ऐंचति सी चितवनि चितै भई ओट अलसाइ।**
फिरि उझकनि कौं मृगनयनि दृगनि लगनिया लाइ॥३२०॥

गवाक्ष-विहंग

नायिकेच्या नेमकटाक्षानं विव्हल झालेला नायक, तिच्या खिडकीकडे आशेनं एकटक बघत आहे. सखी मैत्रिणीला सांगते “आपल्या टपोर डोळ्यानं माझ्याकडे चोरून पहात, लालूच दाखवीत व आळस देत ती खिडकीमागे लपली आणि तो, खिडकीकडे डोळे लाऊन कधीचा खाली उभा आहे”.

आकर्षित दृगमोहिनी, लावित लालस आस।
मदालस आळस देत ती अंगमोड करपाश॥
नजर गुंतली ना तुटे मनांत गुंतागुंत।
येइल का ती परतुनी-जाई लाउनि खंत॥३२०॥

* *

३२१ **नर की अरु नल-नीर की गति एकै करि जोइ।**
जेतौ नीचौ है चलै, तेतौ उँचौं होइ॥३२१॥

अनुक्रमणिका

कारंजे

कविची प्रास्ताविक उक्ती, “मानवगती व कारंजाची गती एकसारखी असते. जेवढा नम्र राहील तेवढाच तो उच्चपदी चढेल”.

गति मनुजाची या जगीं कारंजापरि होय।
विनम्र होता खालती उंच उडावे तोय॥३२१॥

* *

३२२ **भूषन-भारु सँभारिहै क्यौं इहि तन सुकुमार।**
सूधे पाइ न धर परैं सोभा ही कैं भार॥३२२॥

शोभा-भार

रूपगर्विता नायिका, आपल्या यौवनाच्या दिमाखात आहे. यौवन भारानं तिची चालही मंदावली आहे. आणि तिच्या हळू हालचालीमुळं अभिसाराला उशीर होत आहे. सखी सांजश्रृंगार लौकर आटोपण्यासाठी घाई करायला सांगते. “सखे हे अलंकार घालून तिच्या नाजुक देहाला किती भार होईल याचा विचार कर. अगोदरच या सौंदर्यशोभेचा तुला भार होतो तुझा तोल जातो, पावले वाकडी पडतात. त्यांत अलंकाराची भर कशाला! तुला डोलपाळणा होईल अगदी”

अलंकार हे घालतां होइल सखये भार।
कशी साहशिल बाइ ग देह तुझा सुकुमार।
शोभेचाही भार हो, सहे न जाई तोल॥
पडति पाउलें वाकडी, डुले काय हिंदोल॥३२२॥

* *

३२३ **मुँह मिठासु, दृग चीकने, भौहैं सरल सुभाइ।**
तऊ खरैं आदर खरौ खिन खिन हियौ सकाइ॥३२३॥

साशंक स्वागत

प्रौढा सादरा धीरा नायिका पतिला अपराधी बघून त्याचा विशेष आदर करते. तिच्या या आदरतिथ्यामुळे नायक साशंक होतो. तो म्हणतो, “भिवईची सरलता, ओठावर मधुस्मितयुक्त लाडिक बोल, नाचरे डोळे, इत्यादी भावाभिनय बघून माझं मन साशंक होतं, मनात काही वेगळंच दिसतंय”.

सरळ भिवइ, सस्नेह नयन ते, ओठीं लाडिक बोल।
क्षण क्षण मन साशंक हो बघुनी भावविलोल॥३२३॥

* *

३२४ **जदपि नाहिं नाहिं नहीं बदन लगी जक जाति।**
तदपि भौंह-हाँसि भरिनु हाँसी यै ठहराति॥३२४॥

अनुक्रमणिका

नको! नको, न

रतिक्रिडेसाठी प्रियकरानं नायिकेचा हात धरला आहे. ती सारखी नको, नको म्हणत, डोळ्यांनी अनुकुलता दर्शविते. सखी सांगते, "तोंडानं सारखी नको, नको, नाही, नाही न उहुं उहुं चा जप चालला होता. पण डोळे अन् भिवया मात्र हसून अनुकूलता दर्शवित होत्या".

'नको, नको ना' सारखी म्हणते धरितां हात।
भिवया हासत वांछिती रतिसमराची रात॥३२४॥

*　　　　*

३२५ **घुटत न पयतु छिनकु बसि, नह-नगर यह चाल।**
मारयौ फिरि फिरि मारियै, खूनी फिरै खुस्याल॥३२५॥

प्रेमनगरी

पूर्वानुरागिणी नायिका आपल्या सखीला प्रीतीची वहिवाट सांगते. "सखे, प्रेमनगरची रीतभात अगदीच विचित्र आणि बेबंद आहे बघ. तिथं वसती करणारानं सदैव सावध असावं लागतं. एकदां तिथे वसती केली की परत सोडता यायची नाही. चोरी, दरवडे हे तर नित्याचे प्रकार. मेलेल्याला मारण्याची मौजच तिथे सदा लुटली जाते. खुनी इसमाचा बहुमान व मरणाराला दंड, असा तिथल्या मदन नृपतीचा दंडक आहे. तेच या अंदाधुंदीचे प्रवर्तक आहेत".

वसती प्रेमनगरची रीत चोरटी चाल।
धजे न सोडुनी जावया मन झालें चवचाल॥
मरणारा मरणीं मरे, साहस मन्मथ घाव।
फिरे खुनी तो मोकळा टाकित उलटा डाव॥
[अहोरात्र तें गाजते, मन चोराचें नांव।
अपकीर्ती आनंदवी असे आगळें गांव]॥३२५॥

*　　　　*

३२६ **चुनरी स्याम सतार नभ, मुँह ससि की उनहारि।**
नेहु दबावतु नींद लौं निरखि निसा सी नारि॥३२६॥

शामारजनी

नायकानं कुणा प्रमदेला शामचुनरी (चंद्रकळा) नेसलेलं बघितलं तेव्हापासून त्याची शुद्धबुद्ध हरपली. आपली ही स्थिति तो दूतीला सांगतो. "तारांकित रजनीसारखी चंद्रकला नेसलेली, व मुखचंद्राचे चांदणे शिंपीत जाणारी ती शामा पाहून माझी नीजच हरवली".

चंद्रकळा सखि नेसली, निळावंतिचा साज।

भान हरवि मुख चांदणें, नीज न येई आज॥३२६॥

*   *

३२७ **कहत सबै, बेदी दियैं आँकु दसगुनौ होतु।**
तिय-लिलार बेंदी दियैं अगिनितु बढ़तु उदोतु॥३२७॥

कुंकुमकांति

कुंकुम भाली लावल्यामुळे नायिकेचें मुखसौंदर्य दशगणी वाढलं. नायक स्वगत म्हणतो, “अंकावर शून्य ठेवलं तर त्याची संख्या दशगुणांनी वाढते हे सर्वपरिचितच आहे. पण तिनं भालावर कुंकू लावल्यामुळं तिचं सौंदर्य अगणित वाढलं”.

दशगुणिं संख्या वाढवी बिंदु ठेविता अंक।
भालि कुंकुम लाविता कांति चढे निःशंक॥३२७॥

*   *

३२८ **तर झरसी, ऊपर गरी कज्जल-जल छिरकाइ।**
पिय पाती बिन हीं लिखी बाँची बिरह-बलाइ॥३२८॥

कज्जल पत्रिका

प्रोषितपतिका नायिकेनं प्रियकराला पत्र पाठविलं, पण त्यात ती आपली दुःख विफलता पूर्णत्वानं लिहू शकली नाही. पत्र लिहितानाच विरहतापाची धग लागून कागद करपला. आणि काजळमिश्रित अश्रू त्यावर पडल्यामुळे तो भिजला. हे बघून नायकाला तिच्या विरहव्यथेची पुरेपूर कल्पना आली. सखी सांगते, “विरहधगेनं करपलेलं, काजळाच्या आसवानं भिजलेलं प्रियतमेनं लिहिलेलं पत्र पाहून त्याला तिच्या हृदयव्यथेचा मजकूर पूर्णपणे कळला”.

विरहि करपली पत्रिका काजळ जळ भिजवीत।
लिखित प्रियेचे वाचतो, नच लिहिलेली प्रीत॥३२८॥

*   *

३२९ **बिरह सुकाई देह, नेहु कियौ अति डहडहौ।**
जैसें बरसैं मेह जरै जवासौ, जौ जमै॥३२९॥

जासवंद (प्रीत-जपा)

प्रोषितपतिका विरहाने कृश झाली तरी तिचं प्रेम सदैव हिरवं असतं, अधिकाधिक वाढतं; सखी नायकाला सांगते, “विरहानं तिचा देह सुकला असला, तरी तिची प्रीती मात्र हरित भरित आहे. पावसाळी मेघवर्षावानं जवासा गवत जळून जातं पण जासवंद हिरवागार होतो. तशीच आसवांनी तिची प्रीची प्रीति फुलते”.

विरहें सुकली देहिनी, हरित भरित परि स्नेह।
जळे जवासा जपा फुले, जैसा बरसत मेह॥३२९॥

*   *

३३० **देखी सो न, जुही फिरति सोनजुही सैं अंग।**
दुति-लपटनु पट सेत हूँ करति बनौटी रंग॥३३०॥

सोनसळी

नायक नायिकेच्या अंगकांतीचं वर्णन करीतो. ती श्वेतवसन नेसूनही सोनजुइसारखी भासते याचं प्रात्यक्षिक तिला दाखवतो, "ती पहा माझी सखी शुभ्रवसनातून मिरवितांना तिच्या अंगकांतीची झलाल पडून ती सोनजुईच की काय असं वाटतं".

क्षौभवसन सित रंगवी सोनकळी तें अंग।
पीतगौर तनुभोवतीं झळाळ सुंदर रंग॥३३०॥

*   *

३३१ **बढत बढत संपति-सलिलु मन-सरोज बढि जाइ।**
घटत घटत सु न फिरि घटै, बरू समूल कुम्हिलाइ॥३३१॥

मनोसरोज

कविची प्रास्ताविक, उक्ती, "संपत्तीरुपी सलिल वाढता वाढता मनरुपी कमलाचा विकास होतो. पण हळू हळू ते कमी होताच चिखल दृष्टीस पडतो. आणि कमलही सुकून नाश पावते"

सलिल संपदा संचयें, मनोसरोज विकास।
सुकता सर कोमेजते समूळ पंकज नाश॥३३१॥

*   *

३३२ **ह्याँ न चलै, बलि, रावरी चतुराई की चाल।**
सनख हियैं खिन-खिन नटत अनख बढावत, लाल॥३३२॥

कपटचातुर्य

प्रौढा खंडिता अधीरा नायिकेचे प्रियकराला वागबाण, "हे बघा आपली चतुराई दाखवून मला राग आणू नका. महाभाग-आपल्या वक्षावरील नखचंद्रकोर मी पाहिली आहे तेव्हा हे कपट कशाला?"

असूं दे अपुली चातुरी ओळखते महाभाग।
हृदय नखांकित दाउनी आणुं नका हो राग॥३३२॥

*   *

अनुक्रमणिका

३३३ **डीठि न परतु समान-दुति कनकु कनक सैं गात।**
भूषण कर करकस लगत परसि पिछाने जात॥३३३॥

कांतिसौंदर्य

दूती नायकाजवळ नायिकेच्या कांतीची प्रशंसा करते. "तिच्या अंगावरील सुवर्णालंकार देहकांतिमुळे दिसून येत नाहीत. केवळ स्पर्शानं त्याच्या कठिणतेमुळेच ती भूषणे आहेतसं वाटतं".

कांचन द्युति तनु, कनक तें कळे न कांति स्नात।
जाणवती करभूषणें कठोर धरिता हात॥३३३॥

* *

३३४ **करतु मलिन आछी छबिहिं हरतु जु सहजु बिकासु।**
अंगरागु अंगनु लगै, ज्यौं आरसी उसाँसु॥३३४॥

अंगराग

"तिने अंगाला लाविलेली चंदन उटी (अंगराग) तिची सौंदर्यकांती मलीन करते. नितळ आरशावर उसासा उमटावा असं तिचं अंग भासतं".

करि मलीन सुंदर छबि, हरुनी सहज विकास।
उसासाच आरशावरी, अंगराग अंगास॥३३४॥

* *

३३५ **पहिरि न भूषन कनक के, कहि आवत इहिं हेत।**
दरपन के से मोरचे, देह दिखाई देत॥३३५॥

कनकालंकार

दूती नायिकेला शीघ्रगती अभिसार करण्याच्या इच्छेने, तिची सौंदर्य प्रशंसा करीत भूषणाला दूषण देते. "अग तुझ्या देहावर हे अलंकार म्हणजे आरस्पानी आरशाला पडलेले मोरचेच वाटतील".

कांचन तनुवरि शोभती नच कनकालंकार।
आरस्पानी आरसा मोरचेच हे फार॥३३५॥

* *

३३६ **जदपि चवाइनु चीकनी चलति चहूँ दिसि सैन।**
तऊ न छाडत दुहुनु के हँसी रसीले नैन॥३३६॥

अनुक्रमणिका

गुपित स्मित

त्यांची प्रीती परस्पर माहित असली तरी जनलोकात ते आपल्या गांवीही नाही अशा सावधतेनं परस्परांशी वागतात पण नजरभेटीत ते गूढ हसू बाहेर फुटतंच, “जनलोकात अनोळख्यासारखं, पण नजर चोरून प्रीतिसंकेत करीत वागत असले तरी डोळे भेट होताच गूढ परिचयाचे हसू ओठातून बाहेर फुटतंच”.

लपत छपत नित चालती अमित गुपित संकेत।
नयन परस्पर भेटतां, सहज स्मित नजरेत॥३३६॥

* *

३३७ **अनरस हूँ रसु पाइयतु, रसिक रसीली-पास।**
जैंसें साँठे की कठिन गाँठ्यौं भरी मिठास॥३३७॥

उसाचे डोळे

मानिनी नायिका मनधरणीनेही मानली नाही, तेव्हा नायक तिच्या घरून परत आला. दूती रागवलेल्या नायकाला पुन्हा परत तिच्याकडे न्यायला त्याची समजूत घालते. “अहो, रसिकराज! असं अरसिक होऊन कसं चालेल! तिच्या डोळ्यातील रागाविर्भावातही अनुराग भरला आहे, तो आनंद आगळाच असतो. तो तुम्हाला काही चाखतां आला नाही! उसाची गाठ डोळ्याजवळ अतिशय गोड असते. हे तुम्हाला सांगायला का हवं?”

रागांतहि अनुराग ये, रसिका पडे न गांठ।
डोळ्याजवळीं लागते गोड उसाची गांठ॥३३७॥

* *

३३८ **गोरी छिगुनी, नखु अरुनु, छला स्यामु छबि देइ।**
लहत मुकति रति पलकु यह नैन त्रिबेनी सेइ॥३३८॥

रंगत्रिवेणी

नायकाने, नायिकेच्या करांगळीत नील मण्याची आंगठी पाहिली. तीवर आसक्त होऊन तो नायिकेच्या सखीला म्हणतो, “तिची गौर करांगळी, आरक्त नख, आणि निळी अंगठी यांचं रमणीय रंगमीलन बघून माझे नेत्र धन्य झाले. या रंगत्रिवेणीत अवगाहन करतांच नेत्रांना रतिमुक्ती मिळाली”.

गौर अंगुली, नील अंगठी, अरुण नरवर ते पैन।
त्रिवेणींत या प्रीतिसंगमीं पावन होती नैन॥३३८॥

* *

३३९ **उर मानिक की उरबसी डटत घटतु दृग-दागु।**
छलकतु बाहिर भरि मनौ तिय-हिय कौ-अनुराग॥३३९॥

अनुक्रमणिका

आकंठ पान

नायक भूषण, वसन विपर्यय करून, अन्य स्त्रीशी रममाण झाला. सकाळी घाईत परतताना वेष बदलला पण कंठात माणिकमाळ तशीच राहून गेली. तो तसाच नायिकेकडे आला. खंडिता नायिका त्याला पाहून म्हणते, "अहाहा! गळ्यात माणकांची माळ पाहून माझे डोळे अगदी निवले, किती सुंदर दिसते नाही! जणु काय स्त्री प्रेमाचा कांठोकाठ भरलेला पेला आकंठ पिताना हे ओघळच कंठावर उतरले आहेत".

कंठीं माणिक हार तो पाहुनी लागे दीठ।
स्त्रीप्रीती आकंठ ती पीता झळके धीट॥३३९॥

* *

३४० **सहज सेत पँच तोरिया पहिरत अति छबि होति।**
जल चादर के दीप लौं जगमगाति तन-जोति॥३४०॥

जल झालर दीपिका

नायिकेच्या सौंदर्याची स्तुती करीत दूती नायकाला भुरळ पाडते. "श्वेत वसन परिधान करून बसलेली माझी सखी किती सुंदर दिसते म्हणून सांगूं! जणुं काय जळाच्या झालरीतून दीपकलिका दृगोचर व्हावी, तशी शुभ्र वसनातून तिची अंगकांति झगमगताना दिसते".

विरलवसन सित नेसतां रुपकांति जितकाम।
जल झालरीतली दीपिका झगमगते अभिराम॥३४०॥

* *

३४१ **कोरि जतन कोऊ करौ, परै न प्रकृतिहिं बीचु।**
नल-बल जलु उँचैं चढे, अंत नीच कौ नीचु॥३४१॥

नीच स्वभाव

नीच स्वभाव बदलता बदलत नाही. कोटी उपाय करूनही त्याचा उपयोग नाही. जळाचे कारंजे नलिकेच्या साह्याने उंच उडविले, तरी जळाची धाव खालीच असते. पाणी नेहमीच उतार पहातं".

करिता कोटि उपायही, सुटे न नीच स्वभाव।
उडवि उंच जळ कारंजें, घेइ खालती धाव॥३४१॥

* *

३४२ **लगत सुभग सीतल किरन, निसि-सुख दिन अवगाहि।**
माह ससी-भ्रम सूर-त्यौं रहति चकोरी चाहि॥३४२॥

माघनिदाघ

कवी माघ महिन्यातील तीव्रतापरहित सुखद रवीचं वर्णन करतो. “माघातील शीतल माध्यान्हामुळं, दिवसाच, रात्रीचं सौख्य अनुभवीत चकोरी चंद्र समजून रवी भोवतींच फेरे घालते”.

शीतल किरणें कोवळी दिन हा येता माघ।
निशिसुख देई दिवसही सुभग निवांत निदाघ॥
ऊन कोवळें ते गमे, चंद्रिकाच चौफेर।
रविभंवती विधुसंभ्रमें धरी चकोरी फेर॥३४२॥

* *

३४३ **तपन-तेज, तपु-ताप तपि, अतुल तलाई माँह।**
सिसिर-सीतु क्यौं हुँ न कटै बिनु लपटैं तिय नाँह॥३४३॥

तोडगा

मानिनी नायिकेला सखी सांगते, “अग शिशिरऋतूची थंडी कशानंही जायची नाही. दुलई तोकडी पडते, उन्हात देखील हुडहुडी भरते. मग रात्री तर विचारू नकोस, लाख उपाय केले तरी पुरुषाच्या आलिंगनउबेशिवाय ती शमतच नाही”.

दुलई होई तोकडी, थंडि न जाय उन्हांत।
शिशिररातची हुडहुडी, आलिंगन बंधांत॥३४३॥

* *

३४४ **रहि न सकि सब जगत मैं सिसिर-सीत कैं त्रास।**
गरम भाजि गढवै भई तिय-कुच अचल मवास॥३४४॥

शीत भयभीत

कुणा श्रृंगारिक व्यक्तीची शिशिरऋतूसंबंधीची अभिव्यक्ती. “शिशिराच्या थंडीला घाबरून ऊब जी पळाली ती कुचयुगाच्या दुर्गम गूढ निवासात जाऊन लपली. तिथून तिला कोण हुसकणार?”

शिशिरशीत भयभीत ती ऊब पळे हरि त्रास।
कुचयुगिं दुर्गमदूर्ग तो तिथे तिचा अधिवास॥३४४॥

* *

३४५ **झुठे जानि न संग्रहे मन मुहँ-निकसे बैन।**
याही तैं मानहु किये बातनु कौं बिधि नैन॥३४५॥

अनुक्रमणिका

उच्छिष्टे

कविची उक्ती, “मनात एक आणि ओठात एक. वचनातला आणि वागण्यातला विरोध यात अभिप्रेत आहे. मनातले बोल डोळ्यातून प्रगट होतात. “मुखातून निघालेले बोल मनाला माहीत नाहीत. वचनाचा आणि मनाचा सदा विरोध असल्यामुळे डोळेच मनाचे प्रतिनिधी आहेत. बोल ही केवळ उच्छिष्टे!”

ओठावरले बोल ते उच्छिष्टें नच वाद।
डोळे बोलति सत्य ते, मनांतील पडसाद॥३४५॥

* *

३४६ **सुधर-सौति-बस पिउ सुनत दुलहिनि दुगुन हुलास।**
लखी सखी तन दीठि करि सगरब, सलज सहास॥३४६॥

रूपगर्विता

‘तो सवतीच्या आधीन असला तरी आपल्या रूपगुणानं मी त्याला सहज वश करीन’ असं त्या रूपगर्विता नवपरिणितेला वाटतं. सखी सखीला सांगते, “तुझा प्रियकर सुरेख सवतीच्या अर्ध्या वचनात आहे, असं सांगताच, त्या रूपगर्वितेनं आपल्या सर्वांगावर नजर फिरवीत-सख्याकडे पाहून किंचित् स्मित केलं”.

सुगुण सपत्नीलुब्धपति, सांगत सखि तिज मात।
सुदेहिनी गुणगर्विता, वधू हसे अधरांत॥३४६॥

* *

३४७ **लिखन बैठि जाकी सबी गहि गहि गरब गरूर।**
भए न केते जगत के चतुर चितेरे कूर॥३४७॥

अपुरे चित्र

अंकुरितयौवना नायिकेची सखी नायकाला तिच्या बढत्या बहारीची, नित्य नव्या सौंदर्याची प्रशंसा करीत म्हणते. “तिच्या क्षणाक्षणाला वाढणाऱ्या रूपसौंदर्याचं वर्णन मी बापडी काय करणार! एवढंच सांगते, मोठे मोठे चतुर चित्रकारही तिच्या सौंदर्यशोभा परिवर्तनामुळं तिच्या पुढं दिङ्मूढ झाले. त्यांना तिचं चित्र काही पूर्ण करता आलं नाही”.

क्षणा क्षणाला वाढतें नवतीचें लावण्य।
तनुकांती मनमोहिनी पाहुनि वाटे धन्य॥
वर्णवे न वरवर्णिनी सौंदर्याचें गूढ।
चित्र राहि अपुरेच ते, चित्रकार दिङमूढ॥३४७॥

* *

३४८ टुनहाई सब टोल मैं रही जु सौति कहाइ।
सु तैं ऐंचि प्यौ आपु-त्यौं करी अदोखिल आइ॥३४८॥

मायाविनी

सखी नायिकेला म्हणते, “अग तुझी सवत चेटकीण आहे. असा गांवात गवगवा होता. तिनं त्याला आपल्या हातचं बाहुलं बनवलं असं लोक म्हणत. पण आतां तू आल्यावर तिच्यावरचा दोष पार निघून जाईल”.

सवत ‘चेटकी’ ही तुझी गावकऱ्यांचा रोष।
तूं येतां परि या घरी जाय तियेचा दोष॥३४८॥

* *

३४९ दृगनु लगत, बेधत हियहिं, बिकल करत अँग आन।
ए तेरे सब तैं विषम ईछन-तीछन बान॥३४९॥

विलक्षण-बाण

नायिकेच्या नेत्रकटाक्षानं नायक विव्हल झाला. सखी नायिकेची उत्सुकता वाढवीत सांगते, “सखे, तुझे हे नयनबाण इतर सर्व बाणांहून अतिशय तिक्ष्ण आणि विलक्षण आहेत. कारण ते लागतात डोळ्याला, जखम होते हृदयाला, आणि विकल होतात सारी गात्रं”!

लागति लोचनिं, विंधिती हृदय, विकल तनु प्राण।
तेढे नयन कटाक्ष ते तीक्ष्ण विलक्षण बाण॥३४९॥

* *

३५० पीठि दिये हीं, नैंक मुरि, कर घूँघट-पटु टारि।
भरि, गुलाल की मूठि सौं, गई मूठि सी मारि॥३५०॥

मला मारिते मूठ

नायिकेने नायकावर ज्या भावनेनं गुलाल भरली मूठ मारली त्याचं वर्णन तो दूतीजवळ करतो. “पाठमोरी असता, तिनं अचानक किंचित् वळून व घुंगट बाजूला सारून, गुलाल भरल्या मुठीनं जणुं काय मूठच मारली असं वाटतं”.

किंचित् सारुनी ओढणी, वळुनि दाविते लूट।
गुलाल भरली मूठ ती, मला मारिते मूठ॥३५०॥

* *

३५१ गुनी गुनी सबकैं कहैं निगुनी गुनी न होतु।
सुन्यौ कहूँ तरु अरक तैं अरक-समानु उदोतु॥३५१॥

अनुक्रमणिका

अर्क गौरव

कविची स्वाभाविक उक्ती: निर्गुणी माणूस, 'गुणी गुणी' म्हणून वाखाणला तरी तो गुणी ठरत नाहीं. अवत्याभवत्यानी बढाईने वाखाणले तरी गुणहीन गुणवंत होत नाहीं. अर्कतरूला अर्क म्हटलं तरी तो अर्का (सूर्य) सारखा प्रकाशमान होत नाही".

गुणी गुणी या गौरवें, निर्गुणी न गुणवंत।
अर्क तरू नच हो कधीं अर्कापरि द्युतिमंत॥३५१॥

* *

३५२ **छुटत मुठिन सँग हीं छुटी लोक-लाज, कुल-चाल।**
लगे दुहुनु इक बेर ही चल चित, नैन गुलाल॥३५२॥

फाल्गुन रंग

फाल्गुनातील रंगखेळात नायक नायिका परस्परानुरक्त झाले हा वृत्तांत सखी सांगते. "गुलालमुठी परस्परावर उगारून सुटताच त्यांची जनलज्जाही सुटली. दोघांच्या विचलित चित्तात आणि चंचल नयनात एकदमच रंग भरला".

सुटे झाकली मूठ ती, लोकलाज कुल चाल।
चलित चित्त नव युगुल तें फेकित नयनिं गुलाल॥३५२॥

* *

३५३ **ज्यौं ज्यौं पटु झटकति, हठति हँसति, नचावति नैन ।**
त्यौं त्यौं निपट उदारहूँ फगुवा देत बनै न ॥३५३॥

नृत्यांगना

फागातील रंगमहोत्सवात, गणिका नाचत नाचत नायकासमोर येते व उपहार मागते. तिच्या ललित विभ्रमानं दिङ्मूढ होऊन तिच्याकडे तो बघत रहातो. कवी वर्णन करतो, "जो जो ती नृत्यांगना नाचत नाचत जवळ येते, नायकासमोर पदर झटकते, डोळे नाचवीत हसते तसा तसा तो भारल्यासारखा तिच्याकडे सारखा बघत रहातो. उपहार देण्याचे भानही त्याला रहात नाही.

निकट येत, पट झटकत हासत हट्ट धरित नृतनार।
नैन नाचवित, मागत, सुचवित होरीचा उपहार॥
पाहि एक टक अंग अंग तें लवचिक नृत्यविहार।
हाव भाव अति ललित चकित हो चलचित रसिक उदार॥३५३॥

* *

३५४ **ज्यौं ज्यौं पावक-लपट सी तिय हिय सौं लपटाति ।**
त्यौं त्यौं छुही गुलाब सैं छतिया अति सियराति ॥३५४॥

गाढाश्लेष

स्त्रीआलिंगनसौख्याचा अनुभव रसिक श्रृंगारिक पुरुष आपल्या मित्राला सांगतो, "जसजशी ती अग्निज्वाळेसारखी अंगना अंगाला बिलगते, तसतशी हृदयावर गुलाबजल शिंपीत चंद्रकलाच कवटाळित आहे असा सुखद आभास होतो. क्षणांत ती बिजलीची चंद्रकला होते.

आलिंगन दे जसजशी अग्निशलाका वीज।
शीत चंद्रिका ती जणूं उरी उगवती बीज॥३५४॥

* *

३५५ **भाल-लाल बेंदी-छए छुटे बार छबि देत।**
गह्यौ राहु, अति आहु करि, मनु ससि सूर-समेत॥३५५॥

रविचंद्रग्रहण

नायिकेने स्नान केल्यावर भालावर सौभाग्य बिंदी लावली. पण केस नीट बांधले नसल्यामुळे काही चुकार केस भाळावर रुळत आहेत. या स्नात मुखचंद्राची शोभा सखी नायकाला सागंते "तिचे भालावर आलेले करळ केस सौभाग्य बिंदीवर पडले आहेत पण त्यामुळे तिच्या मुखाची शोभा अधिकच वाढली. भालावरील लाल बिंदी आणि गौर मुखचंद्र पाहून, राहू एकाचवेळी चंद्रसूर्याचा ग्रास करायला बघतो आहे असं वाटतं".

बिंदी कुंकुम रेखिलें न्हाली आज सुचैल।
चुकार कुंतल लोळती भाली सुटलें सैल॥
रवि बिंबापरि बिंदुली, झाकति कुंतलबंध।
राहु ग्रासतो कीं जणूं एक समयि रविचंद्र॥३५५॥

* *

३५६ **तिय, कित कमनैती पढी, बिनु जिहि भौंह-कमान।**
चल-चित बझैं चुकति नहिं बंक बिलोकनि-बान॥३५६॥

चापकला

नायक नायिकेच्या कटाक्षबाणानं घायाळ झाला. अवसर मिळताच तो तिला म्हणतो, "अहो शिकारी! ही धनुर्विद्या आपण शिकला तरी कुठे! ती भिवयांची तुटलेली कमान, तिला दोरी न लावताच ओढून, अचूकपणे चलचित्तावर वाकडे बाण सोडून घायाळ करता! तुमची ही रमणीय चापकलाच मोह पाडते".

चापकला शिकला कुठें, कंकर नसे कमाल।
अचूक चलचित हेरूनी सोडि वाकडा बाण॥३५६॥

* *

३५७ **दुसह दुराज प्रजानु कौं क्यौं न बढे दुख-दंदु।**
अधिक अँधेरौं जग करत मिलि मावस रबि-चंदु॥३५७॥

द्विराज्य

कविची द्विराज्यातील प्रजेच्या दुःखावरील उक्ती: "द्विराज्याचा अंमल प्रजेला अतिदुःसह कसा होणार नाही! चंद्र आणि सूर्य एकाच राशीत आल्यावर जगांत अंधेर माजल्याशिवाय कसा राहील?"

कुंडलीत एकत्र ये रविचंद्राची रास।
कसा चुकावा वाढता दीन प्रजेचा त्रास॥
द्विराज्य काजीं ये अमा माजवीत अंधेर।
मंदाध सत्ताधीश ते जनास करिती जेर॥३५७॥

* *

३५८ **ललन-चलनु सुनि पलनु मैं अँसुवा झलके आइ।**
भई लखाइ न सखिनु हूँ झुठैं हीं जमुहाइ॥३५८॥

भावगोपन

परकीया प्रवत्स्यपतिकानायिकेच्या चातुरीचं वर्णन कवी करतो, "नायक परदेशी जाणार हें कळताच नायिकेच्या डोळ्यांत आसवे तरारली. पण तिने चतुरतेने चुटकी वाजवून खोटीच जांभई दिली आणि भावगोपन साधलं. सख्यानाही तिची भावना उमगली नाहीं".

उभे अश्रु ते लोचनीं, प्रियकर जातां दूर।
उचंबळुनि मन येतसे भरून आला ऊर॥
उगाच चुटकी वाजवी लटकि जांभई देत।
कळूं न देइ ती कुणा, दुःखित मन संकेत॥३५८॥

* *

३५९ **कंचन तन-धन-बरन बर रह्यौ रंगु मिलि रंग।**
जानी जाति सुबास हीं केसरि लाई अंग॥३५९॥

अंगसुगंध

दूती नायिकेच्या गौरकांतिची व अंग सुगंधाची प्रशंसा करते. "तिच्या कांचनतनूवर केशर रंग उटी दिसून येत नाही. आणि अंगसुगंधापुढं केशरगंधही फिका पडतो".

कांचनतनु वरवर्णिनी चर्चित रमणी अंग।
कळे न मिळतां वेगळा सुगंध केशर रंग॥३५९॥

* *

अनुक्रमणिका

३६० **खरैं अदब इठलाहटी, उर उपजावति त्रासु।**
दुसह संक बिस कौ करै जैसैं सोंठि-मिठासु॥३६०॥

सुंठगोडवा

नायिका स्वभावानेच चिडखोर व मानी आहे. पण आज ती नायकाचा अपराध विसरून मोठ्या प्रेमानंच त्याचं स्वागत करते. हे नायकाच्या लक्षात येऊन तो म्हणतो ‘अग गर्विते, आज तुझ्या या विनम्र वागणुकीमुळं व प्रेमळ हावभावामुळं, माझ्या मनाला बोचल्यासारखं होतंय. सुंठेची माधुरी विषाची शंका आणते”.

सुंठ गोडवा चाखतां मन होई साशंक।
हटवादी अभिमान हा करी न वृश्चिक डंख॥
ओठावर स्मित हास तें नयनीं कोमल भाव।
आदर करिशी आज हा सेवित मधुर स्वभाव॥३६०॥

* *

३६१ **तौ लगु या मन-सदन मैं हरि आवैं किहिं बाट।**
बिकट जटे जौ लगु निपट खुटैं न कपट-कपाट॥३६१॥

कपटभक्ति

हृदयात कपट ठेवून, स्वार्थासाठी भक्तीचं ढोंग केल्यानं परमेश्वर प्रसन्न होणार नाही.

मन सदनी नच ये हरी, दिसे कुठे ना वाट।
घट्ट लाविले जोवरीं खुले न कपट कपाट॥३६१॥

* *

३६२ **है कपूर मनिमय रही मिलि तन-दुति मुकतालि।**
छिन छिन खरी बिचच्छिनौ लखति छाइ तिनु आलि॥३६२॥

कर्पूरमणिमाळ

तिच्या अंगकांतिमुळं तिच्या गळ्यातील मोत्यांची माळ केरवा मण्यासारखी दिसते. त्यामुळं चतुर सखीही फसते. तृण लाऊन त्याच्या आकर्षणाची ती वारंवार परीक्षा घेते.

अंगकांति द्युति भासवी, कंठिं मुक्तामणी हार।
कर्पुरमणि तृण लाउनी बघते वारंवार॥३६२॥

* *

३६३ **दग उरझत, टूटत कुटुम, जुरत चतुर-चित प्रिति।**
परति गाँठि दुरजन हियैं, दई, नई यह रीति॥३६३॥

अनुक्रमणिका

प्रीतिची रीत

परकीया नायिका आपल्या मनातील तर्कवितर्क सखीला सांगते. “ही प्रीतिची रीत बघ कशी आहे ती! व्यवहार सुरू करतात डोळे, आणि परिणामी होतं काय? तर डोळे भेटतात, कुटुंब तुटतं, चतुरांची मने मिळतात आणि दुर्जनांच्या मनात अढी बसते.”

भेटति दृग ते, तुटत कुटुंब, चतुर चित्त जुळवीत।
दुर्जन ह्रदयीं अढी पडे-ही प्रीतीची रात॥३६३॥

* *

३६४ **नहिं नचाइ चितवति दगनु, नहिं बोलति मुसकाइ।**
ज्यौं ज्यौं रुखी रुख करति त्यौं त्यौं चितु चिकनाइ॥३६४॥

लाडी गोडी

प्रौढा धीरा नायिका अपराधी नायकाकडे उदासिन व्यवहार करीत आपला राग त्याला जाणवते. शठ नायक तिला प्रसन्न करण्याकरिता गोड गोड बोलतो. “हे प्रिये, तू आपले चंचल नेत्र नाचवीत माझ्याकडे बघत नाहीस, तुझ्या ओठावर स्मित देखील उमटत नाही. तू जसजशी रुक्षतेनं वागतेस तसतसं माझं मन प्रेमानं उचंबळून येतं”.

नजर नाचवित पाहसी, नच अधरीं स्मित हास।
येत जशी मुखिं रुक्षता, ह्रदयीं स्नेह विलास॥३६४॥

* *

३६५ **वैसीयै जानी परति झगा ऊजरे माँह।**
मृगनैनी लपटत जु यह बेनी उपटी बाँह॥३६५॥

आलिंगनावशेष

खंडिता नायिका नायकाला म्हणते, “अहो रसिक भ्रमर, त्या मनरमणीला आलिंगन दिल्यामुळं तिचे ओले केस आपल्या अंगरख्यावर पुसले गेलेसं वाटतं. तिच्या वेणीबंधाचा ओला ठसा (व कुंकवाची चिरी) स्पष्टपणे खांद्यावर वठलेले आहेत”.

स्नातकुंतला रमणिचे स्कंधी ओले केस।
अंगरख्यावर उमटले अलिंगन अवशेष॥३६५॥

* *

३६६ **प्यासे दुपहर जेठ ते फिरै सबै जलु सोधि।**
मरुधर पाइ मतीरु हीं मारु कहत पयोधि॥३६६॥

जलशोध

जी वस्तू दुर्मिळ आहे तिचा अल्पही लाभ झाला तरी ती महान वाटते. “मरुदेशात जल दुर्मिळ! जेष्टात जलशोधात एखादे कलिंगडे ही लाभले तरी तृषार्तांना ते महान सिंधूसारखे भासते”.

जेष्टातील दुपार ती मरुदेशीं अंगार।
जल शोधाया हिंडती घेति परत माघार॥
कुठें दिसेना थेंब ही शमवायास तहान।
कलिंगडे ही लाभतां वानिति सिंधू महान॥३६६॥

* *

३६७ **विषम वृषादित की तृषा जिये मतीरनु सोधि।**
अमित, अपार, अगाध-जलु मारौ मूड पयोधि॥३६७॥

पयोधी

कवीची उक्ती. “सूर्याच्या प्रखर तापाने तापलेल्या तृषार्तांची तहान तरबूजानं भागली. त्याला जलाशयाचे काय होय! तरबूजच त्याला पयोधी वाटेल”.

प्रखर सूर्य संताप तो शमवायास तहान।
जीवन हो तरबूज ते नको पयोधि महान॥३६७॥

* *

३६८ **निपट लजीली नवल तिय बहकि बारुनी सेइ।**
त्यौं त्यौं अति मीठी लगति, ज्यौं ज्यौं ढीट्यौ देइ॥३६८॥

मदिरा धुंद

नवोढा नायिकेला मदिरा पाजलेली आहे. त्या नशाधुंदीतल्या निर्लज्ज पण सुंदर हावभावांचं वर्णन दूती नायकाकडे करून त्याला तिच्याकडे येण्याला प्रवृत्त करते. “ती स्वभावलाजरी नव बाला मदिरा पिताच. धुंदी चढून अधिकच धीट बनली. त्या धिटाईतले मोहक हावभाव पाहून बघणाराला देखील धुंदी चढते”.

पीता मदिरा लाजरी, प्रमदा होई धीट।
हावभाव धुंदीतले अधिकच गोड अवीट॥३६८॥

* *

३६९ **सरस कुसुम मँडरातु अलि, न झुकि झपटि लपटातु।**
दरसत अति सुकुमारु तनु, परसत मन न पत्यातु॥३६९॥

अनुक्रमणिका

चतुर मिलिंद

मुग्धा नायिकेच्या भेटीला उत्सुक असणाऱ्या नायकाला, सखी घाई न करण्याचे सुचवून त्याची उत्सुकता वाढविते, ती म्हणते, “अहो! सुकुमार कुसुमकलिकेवर भ्रमर एकदम झडप घालीत नाही. हळू हळू गुंजराव करीत तिच्या भोवती फेर धरून तिचा केसर कोष हळुवारपणे हस्तगत करतो”.

कुसुम मुकुल अलि गुंजनी फुलवि धरुनिया फेर।
घेइ झेप नच रसिक तो कुस्करि केसर घेर॥३६९॥

* *

३७० **निरदय, नेहु नयौ निरखि भयौ जगत भयभीतु।**
यह न कहूँ अब लौं सुनी, मरि मारियै जु मीतु॥३७०॥

निर्दय प्रीत

सखी मीलनातुर पण अभिमानी नायिकेला म्हणते, “निर्दये! तुझा हा नवीनच प्रेमप्रकार पाहून, सर्व सखीमंडळ भयभीत झालेलं आहे. आपण मरायचं अन् दुसऱ्याला मारायचं, ही रीत काही और आहे!”

पाहिली न कधि ऐकिली नवीच निर्दय प्रीत।
मरतां मरात मारणे रीत अशी विपरीत॥३७०॥

* *

३७१ **भजन कह्यौ, तातैं भज्यौं न एकौ बार।**
दूरि भजन जातैं कह्यौ, सी तैं भज्यौ, गँवार॥३७१॥

मनोधिःकार

कुणी सज्जन भक्त आपल्याच मनाला उपदेशित आहे. “अरे वेड्या मना! तू श्रीहरीची आराधना कर. तू माझं ऐकत नाहीस! मूढा, विषयाच्या नादी लागून तू आपला जन्म व्यर्थ घालवशील.”

हरी भजनीं रत हो मना, वेद पुराणी गूढ।
सोडी विषयीं वासना रमसी त्यांतच मूढ॥३७१॥

* *

३७२ **नैन लगे तिहिं लगनि जु, न छुटैं हूँ प्रान।**
काम न आवत एक हूँ तेरे सैक सयान॥३७२॥

अनुक्रमणिका

दर्शनलालसा

परकीया पूर्वानुरागिणी नायिका सखीला सांगते, “सखे तू कितीही सांगितलंस, तरी पालथ्या घागरीवर पाणी पडल्यासारखं आहे. तुझे सायास व्यर्थ आहेत. ‘जीव जमत नाही, मन रमत नाही’ अशी माझी गत! डोळ्यात पंचप्राण उत्कंठेनं प्रियदर्शनासाठी जमले आहेत. आशा तुटत नाही, हौस फिटत नाही!”

जीव न जाई जीवनीं जिवा लागली आस।
देशी धीर सखे किती व्यर्थ तुझे सायास॥
आणुनि नयनीं प्राण हे पाहिन प्राणाधार।
झाली घागर पालथी ओतिशी का जलधार॥३७२॥

* *

३७३ **उडति गडी लखि ललन की अँगना अँगना माँह।**
बौरी लौं दौरी फिरति छुवति छबीली धाँह॥३७३॥

पतंगसावली

सखी नायिकेबद्दल इतरांना सांगते, “प्रियकराने उडविलेल्या पतंगाची छाया तिच्या अंगणात पडली. त्या छायास्पर्शासाठी ती बावली, अंगणभर धावत तिच्या मागोमाग पळत आहे”.

बघत अंगना प्रियकरा उडवित उंच पतंग।
घडे अंगणी सावली उडता स्वैर विहंग॥
पतंग छाया पाहुनी, विसरुनि सारे भान।
धरायास तें धावते प्रेमी हृदय अजाण॥३७३॥

* *

३७४ **उँचै चितै सराहियतु गिरह कबूतरु लेतु।**
झलकति दग, मुलकित बदनु, तनु पुलकित किहिं हेतु॥३७४॥

उडता दृष्टिक्षेप

नायक आपल्या गच्चीवरून गिर्रेबाज कबूतर उडवीत आहे. नायिकेनं त्याला खालून पहाताच तिचं सर्वांग पुलकित झालं. सखीनं तिची ही स्थिती बघितली. तेव्हा ती आपली भावना लपविण्यासाठी दृष्टी अधिक उंच करून ती त्या कलाबाज कबुतराची प्रशंसा करते. पण चतुर सखी तिची ही मौज ओळखून म्हणते, “उंच दृष्टी करून तू त्या पलटी घेत, भरारी मारीत असलेल्या कबुतराला पाहून तुझं मन आनंदित झालं. कबुतराची थरथर उरी जाणवली. दृष्टी संकुचित, देह पलकित अन् अधरी स्मित उमटलं! धन्य भाग्य त्या कबुतराचं!”

‘गगनीं ती बघ अधांतरी कबूतराची झेप।’

'तरीच हा सौधावरी उडता दृष्टिक्षेप॥'
येइ तनूवरी शिरशिरीं, ओठीं स्मित अनुकूल।
थरथरतांच कबूतरें ओढिशि उरीं दुकूल॥३७४॥

* *

३७५ **लागत कुटिल कटाच्छ-सर क्यौं न होहिं बेहाल।**
कढत जि हियहिं दुसाल करि, तऊ रहत नटसाल॥३७५॥

वाकडा तीर

सखी नायिकेच्या डोळ्यांची प्रशंसा करीत नायकाची दशा सांगते, "तुझ्या डोळ्यांतून सुटलेले हे वाकडे तीर लागताच तो अचेतन होऊन पडला. आणि हे तीर असे विलक्षण ही हृदय आरपार भेदूनही ते शल्य हृदयात सारखं सलत राहतं."

असुनि वाकडे तीर, हे, जाती भेदुनी पार।
दुभंगताही हृदय हे उरांत सलती खार॥३७५॥

* *

३७६ **जनमु जलधि, पानिपु बिमलु, भौ जग आघु अपारु।**
रहै गुनी है गर-पऱ्यौ, भलैं न मुकता-हारु ॥३७६॥

मुक्ताहार

सर्वगुणसंपन्न असा पुरुष, अपमान, अनादर सहन करीत त्या विशिष्ट स्थानाला चिकटून बसलेला पाहून कवी मुक्ताहाराची अन्योक्ती त्याला ऐकवितो, "जलधी सारख्या थोर कुलात ज्याचा जन्म, पाणीदारपणा, सतेज कांती, विमल स्वरूप आणि अमोल भाग्य लाभले असताना आणि गुणात गुंफून गुणी ठरलेला हा मुक्ताहार, कुणाच्याही गळ्यात पडून, आपला अनादर करवून घेतो. तो आपला मोठेपणा पार विसरतो."

जलधी मधुनी जन्म घे, विमल तेज निर्वेज।
गुणीं गुंफिला तो पहा विशाल हृदयीं शेज॥
तरी अभागी तो खरा साहि आनादर फार।
गळी पडे धरुनी गळा अमोल मोतीहार॥३७६॥

* *

३७७ **गहे न नकौ गुन-गरबु, हँसौ सबै संसारु।**
कुच-उचपद-लालच रहै गरैं परैं हूँ हारू॥३७७॥

अनुक्रमणिका

भाग्यशाली

ही उक्ती पहिल्या उक्तीचे उत्तरस्वरूप आहे. पहिल्यात त्याला लोलंगत ठरविले आहे त्याला उत्तर. 'हा मुक्ताहार गळ्यात पडून राहतो. तो देखील उच्चपदाच्या लालसेने. कुचावरून रुळायला मिळते हे त्याचे भाग्य. आपल्या गुणाचा गर्व तो धरीत नाही.

हेतु पुरस्सर पडे गळा गुंतुनि मोतीहार।
उच्चपदाची लालसा धरुनी कुचसंभार॥
भाग्यवंत तो खरा, खरा गुणी तया अभिमान।
हसे असूया पाहुनी भाग्याचें वरदान॥३७७॥

* *

३७८ **तच्यौ ऑच अब विरह की रह्यौ प्रेम-रस भीजि।**
नैननु कैं मग जलु बहै हियौ पसीजि पसीजि॥३७८॥

अश्रुविमोचन

दूती नायकाला नायिकेची विकलस्थिती व अश्रुपाताचे निवेदन करते. "प्रेमरसाने भरलेले व विरहतापाने कढलेले तिचे हृदय आसवांच्या अर्करूपाने डोळ्यांतून वहात आहे."

प्रेमरसें भरलें पुरे, तापवि विरह अतर्क।
हृदय वाहि नयनांतुनी सखिच्या आसव अर्क॥३७८॥

* *

३७९ **छला परोसिनि हाथ तैं, छलु करि लियौ, पिछानि।**
पियहिं दिखायौ लखि बिलखि, रिस-सूचक मुसकानि॥३७९॥

मुद्रादोष

नायिकेने आपली अंगठी शेजारणीच्या बोटात बघितली. काही बहाणा करून तिने तिच्याजवळून ती मागून घेतली. आणि प्रसंगानं रागात पण हसत चतुराइनं प्रियकरापुढे धरून त्याचं लक्ष तिकडे वेधलं".

बोटामधली अंगठी ओळखली निमिषांत।
करि बहाणा घेइ ती धरि शेजीचा हात॥
मुद्रांकित ती अंगुली बघतां हसतो रोष।
न बोलताही वेधते लक्ष, पतीचा दोष॥३७९॥

* *

३८० **हठि, हितु करि प्रीतम-लियौ, कियौ ज सौति सिंगारु।**
अपनैं कर मोतिनु गुह्यौ, भयो हरा हर-हारु॥३८०॥

अनुक्रमणिका

भुजंगहार

नायिकेने दिलेला मोतीहार हट्ट धरून परकीयेने त्याला मागितला. तो हार ती गळ्यात घालून मिरविताना नायिकेने पहाताच, आपल्या हृदयाला भुजंगच लपेटा घालीत आहे असं तिला वाटलं.

प्रियाकडुनि घे, परकिया हट्ट करुनि अनिवार।
मोतिहार कंठांतला--करी साज शिणगार॥
पाहुनि कंठी सवतिच्या, स्वयें गुंफिली माळ।
गमे तिजसि कीं लपेटला भुजंग उरि विक्राळ॥३८०॥

* *

३८१ **बसे बुराई जासु तन, ताही कौ सनमानु।**
भलौ भलौ कहि छोडियै, खोटैं ग्रह जपु, दानु॥३८१॥

दुष्टग्रहशांति

कवीची प्रास्ताविक उक्ती. "जगांत दुर्जनांचाच आदर होतो. सज्जनांना कुणीच विचारीत नाहीत. दुष्ट ग्रहाची शांती करण्यासाठी त्याला सुवर्ण दान द्यावं लागतं--तपाचरण करावं लागतं".

भले भले ग्रह चांगले, नसे तयांना मान।
दुष्टग्रह शांतीस ते जपतप सुवर्णदान॥३८१॥

* *

३८२ **वै ठाढे, उमदाहु उत; जल न बुझै बडवागि।**
जाही सौं लाग्यौ हियौ, ताही कैं हिय लागि॥३८२॥

बिलग तथा घनदाट (विपक्षी झेल)

नायक समोर उभा आहे. नायिका त्याच्याकडे पाहत हावभावाने प्रीतिसंकेत करते. सखीला मिठी मारते. तिची सूचकता लक्षित करीत सखी म्हणते, "अग तो तर तिकडे उभा आहे. आणि लाजत, मुरकत तू मलाच मिठी मारतेस! सागराच्या लाटा कवटाळून वडवानळ विझत नसतो. त्याला विपक्षीच हवा. त्यालाच जाऊन गाढ आलिंगन दे की!"

जिवलग तव तो तिथें उभा सखे पहा ग नीट।
मिठी मारशी कां मला, वळे चोरटी दीठ॥
उचंबळे प्रीती तुझी--कशि ग आग शमेल।
विझवि न जल वडवानला, हवा विपक्षी झेल॥३८२॥

* *

अनुक्रमणिका

३८३ ढीठि परोसिनि ईठि है कहे जु गये सयानु।
सबै संदेसे कहि कह्यौ मुसकाइट मैं मानु॥३८३॥

शेजीचा संदेश

नायिका अन्य संभोगदुःखिता आहे. नायकाची गुप्त प्रीती शेजारणीवर आहे. एक दिवस नायक घरी नसता शेजारीण तिच्याकडे आली. आणि तिला विश्वासांत घेत, मोठ्या प्रेमानं म्हणाली. (नायकाला गुप्तसंकेत कळावा या हेतूनं) “अग, आज घरी मी एकटीच आहे. माझं एक काम करायला तुझ्या पतिराजांना सांग ना!” तिचा मानस ओळखून नायिका हंसत उत्तरली, “सांगेन अं, जरूर सांगेन”.

कुणीच नाहीं ग घरी, एकलीच मीं आज।
करितील माझे काज का सखे तुझे पतिराज॥
ओळखुनी संकेत तो, प्रीतीचा परिवेष।
हांसत सांगे प्रियकरा शेजीचा संदेश॥३८३॥

* *

३८४ छिनकु चलति, ठठुकति छिनकु, भुज प्रीतम-गल डारि।
चढी अटा, देखति घटा बिज्जु छटा सी नारि॥३८४॥

विद्युल्लता

नायिका नायकासह रात्री गच्चीवर गगनशोभा पहात इकडे तिकडे फिरत आहे. सखी दुसरीचं लक्ष वेधित म्हणते, “ती बघ चमक बिजली! प्रियकर घनशामाच्या गळ्यात हात घालून ठुमकत, ठुमकत मेघशोभा पहात आहे. अचानक वीज कडाडली आणि तिनं भीतीनं प्रियकराला घट्ट आलिंगन दिलं. भीती अन् प्रीती कशी एकत्र नांदते बघ”.

प्रियासवे सौधावरी, घालुनि गळ्यांत हात।
थरकत ती सौदामिनी फिरते मौज पहात॥
अंतराळ भरले डुले शामलघन नभमेघ।
तळपत जशि विद्युल्लता घालि प्रियाते वेंध॥३८४॥

* *

३८५ धनि यह द्वैज; जहा लख्यौ, तज्यौ दृगनु दुख-दंदु।
तुम भागनु पूरब उयौ अहो! अपूरबू चंदु ॥३८५॥

द्वितियेचा चंद्र

कुणी परकीया पूर्वानुरागी नायकाच्या दर्शनभेटीसाठी विकल झाली आहे. तिची सखी शुद्ध द्वितियेची चंद्रकोर पहाण्यासाठी सौधावर आली. तो तिनें नायकाला आपल्या घराच्या गच्चीत पाहिले. ती लगोलग खाली येऊन परकीयेला सांगते. “अग आजची द्वितिया

अतिशय शुभसूचक आहे. तुझं भाग्य उजळलं समज. आज पूर्वेला चंद्रोदय झालेला आहे. या पूर्वचंद्राचं अपूर्व दृश्य पहायला सौधावर चल. तुझा ताप तो सहज हरण करील".

विरहताप शमवील ही आज बिजेची कोर।
चंद्र पाहतां धन्य हे होतिल नयन चकोर॥
सौधावरि सौभाग्य ये उधळीत सुख आनंद।
पूर्व दिशेला उगवला अपूर्व तो मुखचंद्र॥३८५॥

* *

३८६ **लरिका लैये कैं मिसनु लंगरु मो ढिग आइ।**
गयौ अचनाक आँगुरी छाती छैलु छुवाइ॥३८६॥

कुचस्पर्श

क्रियाचतुर नायकाची चातुरी परकीया आपल्या सखीजवळ करते. "माझ्या कडेवरील बाळाला घेण्याच्या मिषानं तो जवळ आला आणि मोठ्या कौतुकानं त्याला उचलून घेतांना माझ्या कुचयुगाला हळूंच अंगुलिस्पर्श केला. माझं सारं अंग मोहरून उठलं".

कडेवरुनि माझ्या गडे मला पाडूनी भूल।
करुनि बहाणा, कौतुकें उचलुनि घेई मूल॥
स्पर्शित कुचयुगुला हळू, बोटाची चाहूल।
मन माझे तें बाइ ग झालें हलके फूल॥३८६॥

* *

३८७ **ढीट्यौ दै बोलति, हँसति पोढ-बिलास अपोढ।**
त्यौं त्यौं चलत न पिय-नयन छकए छकी नबोढ़॥३८७॥

मदिर मुग्ध

नववधूला मदिरापान करवून तिला बेधुंद केलेलं आहे. त्यावेळी, तिच्या प्रौढेसारख्या हालचाली व हावभाव पाहून नायक मुग्ध झाला. सखी सखीला सांगते. "ती पहा मदिरेनं बेहोष झालेली नववधू! ती जसजशी प्रौढेसारखी नटते, चाळे करीत हसते, बरळते, तसतसे प्रियकराचें नयन तिच्यावर अधिकच खिळतात".

मुग्धा ती मदिरा पिता, प्रौढेपरि हो धीट।
मुग्ध नयन हो पाहुनी मधुरविलास अवीट॥३८७॥

* *

३८८ **रनित भृंग-घंटावली झरित दान मधु-नीरु।**
मंद मंद आवतु चल्यौ कुंजरु कुंज-समीरु॥३८८॥

अनुक्रमणिका

कुंजसमीर

कवी सुखद वसंतवायूचं वर्णन करतो. "गुंजित भ्रमरांची घंटिकामाळ घालून सुममरंदस्राव करीत हा वसंतातला कुंजसमीर, कुंजरगतीनं मंद मंद वहात आहे."

किणति भृंग घंटावली, गळत मधुर मकरंद।
वसंत कुंज समीर हा कुंजर चाले मंद॥३८८॥

* *

३८९ **रही रुकी क्यौं हूँ सु चलि, आधिक राति पधारि।**
हरति तापु सब धौस कौ उर लगि यारि बयारि॥३८९॥

रात्रीची झुळुक

कवी राजस्थानातील ग्रीष्म मध्यरात्री वहाणाऱ्या शीतलवायुचं वर्णन करतो. "दिवसभर आणि अर्ध्या रात्रींपर्यंत वाट पाहून नेमकी मध्यरात्री चोरपावलानं येणारी ही वाऱ्याची झुळूक हृदयाला लागून सर्व दिवसाचा शीण घालवते."

दिवसभरी लपते कुठे, सरली अर्धी रात।
निववाया उर ताप ये झुळुक वायुची आंत॥३८९॥

* *

३९० **चुवतु स्वेद मकरंद-कन, तरु-तरु तर बिरमाइ।**
आवतु दच्छिन देस तैं थक्यौ बटोही बाइ॥३९०॥

दक्षिण वारा

कवी शीतल मंदसुगंधित मलयानिलाचं वर्णन रूपकानं करतो.— "भरून आणलेला सुगंध लुटवीत मकरंदकणांचे दंवबिंदू उधळीत, धर्मजलानें भिजलेला, दुरून आल्यामुळे थकलेला तरुतळीं विसावा घेत, मंद मंद वहात आहे".

लुटवित गंध मरंद निघे, तरुतलि घे विश्राम।
थकुनी मंद समीरण ये सोडुनि दक्षिण धाम॥३९०॥

* *

३९१ **पतवारी माला पकरि, और न कछू उपाउ।**
तरि संसार-पयोधि कौं, हरि-नावैं करि नाउ॥३९१॥

प्रभुनावाची नांव

भक्ताचे मनोगत. "स्मरणीचे वल्हे करून प्रभुनामाच्या नांवेनेच हा भवसागर पार करता येईल. अन्य उपाय नाही".

स्मरणी करि पतवार ही, प्रभुनावांची नाव।

अनुक्रमणिका

भवसागर हा तरावया, दुजा नसे रे ठाव॥३९१॥

*   *

३९२ **लपटी पुहुप-पराग-पट, सनी स्वेद मकरंद।**
आवति, नारि नबोढ लौं, सुखद वायु गति मंद॥३९२॥

समीर लहर

कवी शीतल सुंगंधित मंद वायुला नवोढेच्या पदन्यासाची उपमा देऊन वर्णन करतो, "पुष्प परागांचे वस्त्र नेसलेली, मरंदरूपी घर्मजलाने भिजलेली सुखद वायची लहर, नवोढेसारखी मंद मंद पदे टाकीत येत आहे."

सुमपरागपट लेउनी दंवबिंदू मकरंद।
येत लहर नवोढेपरी टाकित पद गतिमंद॥३९२॥

*   *

३९३ **ललन, सलोने अरु रहे अति सनेह सौं पागि।**
तनक कचाई देत दुख सूरन लौं मुँह लागि॥३९३॥

चुरचुरतें सौंदर्य

खंडिता नायिका नायकाला म्हणते, "प्रियकरा! तुमचं सौंदर्य मन मोहतं, हृदय प्रितीनं भारतं—पण तुझे कटू बोल गिळतांना ते सुरणासारखे चुरचुरतात."

सुंदर अति लावण्य तें स्नेहभरित मन चूर।
कटु वच तें मुखिं लागतां सुरणापरि चुरचूर॥३९३॥

*   *

३९४ **न करु, न डरु, सबु जगु कहतु; कत बिनु काज लजात।**
सौंहें कीजे नैन, जौ साँची सौं हैं खात॥३९४॥

दृगसंवाद

खंडिता नायकाला बोलते, "म्हणतात ना 'कर नाही त्याला डर कसली' मग आपण जर अपराधी नाही तर विनाकारण लज्जित का होता! शपथ खायची असली तर चांगला डोळ्याला डोळा भिडवून घ्या की!"

चपापतां कां हो असे मनांत नसतां पाप।
वरि उचला ती पापणी कळेल आपोआप॥
उगाच खोटी शपथ कां! नसला जर अपराध।
कर न तयाला डर नसे घडुं द्या दृगसंवाद॥३९४॥

*   *

३९५ **रहि हैं चंचल मान ए, कहि, कौन की अगोट।**
ललन चलन की चित धरी, कल न पलनु की ओट॥३९५॥

प्रियप्रयाण

प्रवासाला जाणाऱ्या प्रियकराच्या विरह कल्पनेनें, नायिका सखीला म्हणते, "सखे तूच सांग, हे चंचल प्राण या देहात कुणासाठीं ग रहातील? ते प्रवासाला जाणार आहेत, त्यांचं प्रयाण तरी मी कशी अडवू? सखे, हा विरह मी कसा साहू ग! जरा दृष्टीपुढं दिसले नाहीत तर माझा जीव कासावीस होतो. -मग आता तर ते दूरदेशी जाणार!"

कुणासाठि राहतील ग देहीं चंचल प्राण।
दूर जायचें मानसीं अडवूं कशी प्रयाण॥
साहुं कशी सखि सांग ना हा विरहाचा जाच।
चैन पडेना पळभरी दृष्टि आड होतांच॥३९५॥

* *

३९६ **जौ चाहत, चटक न घटै,मैलौ होइ न, मित्त।**
रज राजसु न छुवाइ तौ नह-चीकनौं चित्त॥३९६॥

उज्जल चित्त

कुणी अनुभवी सज्जन 'चित्त मलीन होऊ देऊ नका' असा मित्राला उपदेश करतो, "मित्रा, चित्त न चळता ते उज्वल रहावं अशी तुझी अतीव इच्छा असली तर प्रेमी हृदयाशी स्नेह लावू नकोस—तेल लागलेली वस्तू धुळीनं मलीन होते- हे लक्षात असू दे".

मित्रा जरि वांछिसी तुझें चित्त न होय मलीन।
रजोगुणीं सुख स्नेह तो, सोडि काम रसलीन॥
स्नेह कुणासी लागतां होई चित्त मलूल।
बसे पहारे नित्य ही तेलावरती धूल॥ ३९६॥

* *

३९७ **कोरि जतन कीजै, तऊ नागर-नेहु दुरै न।**
कहैं देत चित चिकनौ नई रुखाई नैन॥३९७॥

मखलाशी

लक्षिता नायिका, मनात श्रीकृष्णावर प्रेम करिते. त्यामुळे तिच्या वागण्या बोलण्यात प्रेमळपणा आलेला आहे. आपली प्रीती लपविण्यासाठी, तिने डोळ्यात उदास भाव आणला आहे. पण तिची मखलाशी ओळखून सखी म्हणते, "गडे तू कितीही यत्न केलेस, तरी हृदयातलं प्रेम लपू शकत नाही. या रक्ष नजरेतूनही प्रीतीचा पाझर बाहेर येतोच"

उदासीन या लोचनीं किती आणसी आव।

सखे लपेना हृदयिंचा मोहन प्रेम प्रभाव॥३९७॥

* *

३९८ **लाल, तुम्हारे रूप की, कहौ, रीति यह कौन।**
जासौं लागत पलकु दृग लागत पलक पलौ न॥३९८॥

नीज हरवली

पूर्वानुरागिणी नायिकेची सखी नायकाला तिची विकलता व अनिद्रा या संबंधी सांगते "अहो सुभग, तुमच्या रूपसौंदर्याची किमया काय म्हणावी! एकदा डोळ्यात भरल्यावर डोळेच मिटू देत नाही, आणि मनाला चैन पडू देत नाही. काय हा छळ!"

शाम सुंदरा रूप तें बघतां चित्त ढळे न।
मिटतें ना मुळिं पापणी, पळ न लागती नैन॥३९८॥

* *

३९९ **कालबूत दूती बिना जुरै न और उपाइ।**
फिरि ताकैं टारैं बनै पाकैं प्रेम-लदाइ॥३९९॥

कृतघ्न

नायिकेनं प्रथम दूतिला नायकाकडे पाठवून आपलं प्रेम जुळवलं, आणि आता तिला टाळूनच दोघेही परस्पर भेटतात, सखी नायिकेला टोमणा मारते, "जरूर होती तेव्हा मी हवे होते. आता काय 'गरज सरो नि वैद्य मरो'."

दूती वाचुनि ना जुळे, सखे परस्पर प्रेम।
जुळतां, तिजला टाळण हाच अखेरीं नेम॥३९९॥

* *

४०० **रह्यौ ऐंचि, अंतु न लहै अवधि-दुसासनु बीरु।**
आली, बाढतु बिरहु ज्यौं पंचाली कौ चीरु॥४००॥

पांचालीचे चीर

नायक परदेशी गेलेला आहे. नायिका तो विरहकाल कसातरी कंठते. येण्याचा अवधी, विरह हळु हळु हरण करतो. पण थोडे दिवस राहिले तरी तो अवधीच विरह अधिक वाढवितो असे तिला वाटते."हा दुःशासनरूपी अवधी विरह हरण करीत असला तरी तो विरह संपता संपत नाही. द्रौपदीच्या वस्त्राप्रमाणे तो वाढतच जातो".

दुःशासन अवधीच हा ओढित विरह अधीर।
वाढत जाई काल पांचालीचे चीर॥४००॥

* *

अनुक्रमणिका

४०१ **यह बरिया नहिं और की, तूँ करिया वह सोधि।**
पाहन-नाव चढाइ जिहिं कीने पार पयोधि॥४०१॥

मनोगत

भक्ताची उक्ती "मना! अंतसमयी प्रभु रामचंद्राची आराधना कर! त्याच्या कृपेने पाषाण तरले व सेतूवरून कपिकुलही पार करून नेलं तो श्रीराम तुलाही तारील".

अंतसमयि घे नाव ते कर्णधार तो शोधि।
तारि तरी पाषाण ते पार करीत पयोधि॥४०१॥

* *

४०२ **पावक-झर तैं मेह-झर दाहक दुसह बिसेखि।**
दहै देह वाकैं परस, याहि दगनु हीं देखि॥४०२॥

पावसाळी आंच

प्रोषितपतिका नायिका सखीला म्हणते, सखे पावकज्वाला या पावसाच्या सरीपेक्षा अधिक शीतल आहेत बघ. ज्वालांचा स्पर्श झाला तरच देह जळेल, पण बरसात नुसती डोळ्यानं पाहिली तरी आग लावते!".

पावक झळ शीतल गमे, पावससर दे आंच।
देह जाळते स्पर्शता, नेत्र झरे बघतांच॥४०२॥

* *

४०३ **चलित ललित, श्रम-स्वेद कन-कलित, अरुण मुख त न।**
वन-विहार थाकी तरुनि-खरे थकाए नैन॥४०३॥

वनविहारिणी

वनविहार करताना थकलेली, घामानं चिंब झालेली नायिकेची देहलता पाहून, नायक त्या आर्द्र सौंदर्याने मोहित होऊन तिच्या मुखाकडे एकटक पाहत राहिला. सखी सांगते, "ती वनविहारिणी, श्रमित हरिणी पहाताच तिच्या आरक्त ललित, दंवबिंदूभूषित मुखकमलावर, त्याचे रसिक नेत्र खिळून राहिले".

वन विहार करिता थके, हरिणी ती सुकुमार।
ललित स्वेदकण अरुण मुखी कलित चलित दृगमार॥४०३॥

* *

४०४ **कुढँगु कोप तजि रँग-रली करतिं जुवति जग, जोइ।**
पावस, गूढ न वात यह, बुढनु हूँ रँगु होइ॥४०४॥

अनुक्रमणिका

इंद्रगोप

मानिनीचा मानभंग करण्यासाठी सखी तिला म्हणते, “अग बरसातीत जरठांनासुद्धा प्रेमभावना उत्पन्न होते. मग तुझ्यासारख्या सौंदर्यवती युवतीनं असं अवघडून बसण्यात काय अर्थ! अग्निपुढे लोणी सहजच वितळतं. पावसाळ्यांत भले भले म्हातारे देखील रंगेल बनतात. (वीरबाहुटे) इंद्रगोपानाही अनुरागी रक्तवर्ण चढतो. मग तुझ्यासारख्या यौवनेची काय कथा! हा अभिमान सोड, आणि वर्षाॠतुला सामोरी जा!”

गूढ नसे हे बाई ग, जरा तरुण करि साथ।
गोसावी ही रंगती येतां ही बरसात॥
हिरवट येई झांक ती, पिवळे जरि ते पान।
जराहि नजरा रंगवी, विसरी वयाचे भान॥४०४॥

* *

४०५ **न जक धरत हरि हिय धरैं, नाजुक कमला बाल।**
भजत, भार-भय-भीत है, धनु, चंदनु, बनमाल॥४०५॥

भार-भय

सखी नायिकेला नायकाचा विरह चतुरतेन जाणवते. “अग चंदनलेप, मोगरीचे हार, त्यांना अगदी नकोसे झाले आहेत. तुझी सुकुमार छबी त्याच्या ह्रदयात असल्यामुळं, तिला भार होऊ नये म्हणून तो ह्रदयावर हार धारण करीत नाही. तुला किती जपतात बघ तरी!”

लावि न चंदनलेप ही, घालि न उरि सुमहार।
ह्रदयिं छबी सुकुमार ती, शंकित तुज ही भार॥४०५॥

४०६ **नासा मोरि, नचाइ जे करी कका की साहैं।**
काँटे सी कसकैं ति हिय गडी कटीली भौंह॥४०६॥

कंटकबोच

नायकाने नायिकेला एकांती गाठून तिची काही छेडछाड केली. त्यावर नायिका, नाक चढवून व भिवया नाचवीत म्हणाली, “देवा शप्पथ मला हे असलं अगदीं आवडत नाही” पण केवळ हे वरवरच होतं. कारण तीही त्याच्यावर मोहित झालेलीच होती. त्यामुळं तिचं अंग पुलकित झालं. तनु कंपित झाली आणि भिवया कंटकित झाल्या. नायक दूतीला सांगतो, “त्या तिच्या ताणून चढविलेल्या भिवया ‘तुम्हाला शपथ आहे, असला अगोचरपणा मला आवडत नाही’ हे बोलणंच मला मुग्ध करतं. त्या टोचणाऱ्या काटेरी भिवया माझ्या ह्रदयात खोल रुतून बसल्या आहेत आणि अजूनही सलताहेत”.

एकांतीं तिज छेडितां, चिडुनि उडविते नाक।
‘सोडा, मज हे नावडे’ बोले दावित धाक॥
घेई शपथ ती चढवुनी भिवई मारित खोंच।

अनुक्रमणिका

तीच सले ग अजवरी हृदयी कंटक बोच॥४०६॥

* *

४०७ **क्यौं बसियै, क्यौं निबहियैं निति नेह-पुर नाँहि।**
लगालगी लोइन करैं, नाहक मन बाँधि जाँहि॥४०७॥

प्रीतीचे शासन

पूर्वानुरागातील नायिका सखीला सांगते. "प्रेम नगरीत नीती न्यायाचं शासनच नाही. अंधेर मातला आहे. तिथं राहून कसं निभेल? हे सराईत लोचन चोर उघड चोरी करतात आणि बिचाऱ्या हृदयाला भुर्दंड भरावा लागतो. त्यालाच बंदीत पडावं लागतं. सारा उलटाच न्याय! सज्जन दिलगीर आणि चोरटे खुशाल!"

प्रीतनगरि भलतेच ग शासन, नीती न्याय।
कठिण बाइ ग राहणे साहत हा अन्याय॥
करिती चोरी लोचने-सराईत हे चोर।
बंदिवान परि चित्त हो, असनी परिचित थोर॥४०७॥

* *

४०८ **ललन-चलनु सुनि चुपु रही, बोली आपु न ईठि।**
राख्यौ गहि गाढैं गरैं मनौ गलगली डीठि॥४०८॥

निरोप घेताना

नायक परदेशी जायला निघाला आहे व तो नायिकेचा निरोप घेतो. पण निरोप घेताना त्याचे डोळे डबडबून आले आहेत. नायिका मौन आहे. त्याच्या डोळ्यात पाणी आल्यामुळे तिचा कंठ दाटून आला. कंठातून बोल फुटेना.

बोलवे न तिज पाहते, घेता तिचा निरोप।
डबडबले डोळेच ते गळा धरित सुख लोप॥४०८॥

* *

४०९ **अपनी गरजनु बोलियतु, कहा निहोरौ तोहिं।**
तू प्यारौ मो जीय कौं, मो ज्यौ प्यारौ मोहिं॥४०९॥

हितचिंतन

नायकाच्या अपराधावर रुष्ट होऊन नायिकेने मौन धरले. नायकाने बराच अनुनय विनय केल्यानंतर तिचा राग उतरला. त्यावर नायक तिचे आभार मानीत असता ती म्हणते. "त्यांत आभार कसले मानायच खरं तर माझंच हित मी बघितलं. कारण तुझ्याशी बोलल्याशिवाय माझा जीव रहात नाही. आणि माझा जीव मला अतिशय प्रिय आहे. त्याच्या रक्षणासाठीच मला हे करावं लागलं, तुमच्यासाठी नव्हेच".

अनुक्रमणिका

प्राणाते प्रिय तू सखा, प्रिय माझे मज प्राण।
माझे हित मी पाहते, नव्हेच हे उपदान॥४०९॥

* *

४१० **रह्यौ चकितु चहुघाँ चितै चितु मेरौ मति भूलि।**
सूर उयैं आए, रही दृगनु साँझ सी फूलि॥४१०॥

संध्यारुण

खंडिता नायिका नायकाला म्हणते “तुम्ही आलात ते सूर्योदयाच्या वेळी पण तुमच्या डोळ्यांत मात्र (रात्र जागरणांची) सांज फुलली आहे. त्यामुळे मी संभ्रमित झाले आहे! ही लाली अरुणाची की संध्येची! एकाच वेळी दिसणारं हे संध्याउषेचं मीलन किती हृदयंगम आहे!”

पहाटेस आलास तूं, नयनी फुलली सांज।
संध्यारुण संगमात या, धन्य जाहली लाज॥४१०॥

* *

४११ **अति अगाधु, अति औथरौ, नदी, कूप, सर बाइ।**
सो ताकौ सागरु, जहाँ जाकी प्यास बुझाई॥४११॥

थोरवी

कविची स्वाभाविक उक्ती, “ज्याच्यामुळं एखाद्याचं ध्येय साध्य होतं--तोच त्याला सर्वस्व वाटतो. मग तो लहान असो की मोठा. तृषार्ताची तृषा, नदी, कूप किंवा सरोवराच्या पाण्यानं शमली तर ते त्याला अथांग सागरासारखे वाटल्यास नवल नाही”.

तृषा जयांची शमविती, देउनि अपुले तोय।
नदी, कुप सर, वापिका, अथांग सागर होय॥४११॥

* *

४१२ **कपट सतर भौंहैं करीं, मुख अनखौंहैं बैन।**
सहज हसौंहैं जानि कै सौंहें करति न नैन॥४१२॥

परिहास लीला

नायिका लटकीच रुसली आहे. पण ती आपले हसरे डोळे नायकासमोर करीत नाही. डोळेभेट झाली की उसनं अवसान संपायचं. तिनं कपटानं भिवया चढविल्या, रागाचा अविर्भाव आणला, कटुबोलांची सरबत्ती केली.पण नजरेला नजर न देता.

उंच चढवी भिवया सखी, ओठावरि कटुबोल।
लपवी परि नच पाहता, हसरे नेत्र विलोल॥४१२॥

अनुक्रमणिका

*   *

४१३ मानहु बिधि तन-अच्छ छबि स्वच्छ राखिबैं काज।
दग-पग-पोंछन कौं करे, भूषन पायंदाज॥४१३॥

दृष्टीचे पायपोस

नायिकेच्या गौरवर्णाची सखी प्रशंसा करते. "तिच्या देहाची शोभा अवर्णनीय आहे. ती नितळ आणि विमल अंगकांती पाहून भानच हरपतं. तिच्या अंगावरील सुवर्ण अलंकार म्हणजे देहाच्या मृदु रेशमी गालिच्यावर चढताना मलीन दृष्टीसाठी पायपुसणेच ठेवले आहेत असं वाटतं".

विमल निरंतर राखिती, तनुशोभा कमनीय।
पायपोस ते दृष्टिचे अलंकार रमणीय॥४१३॥

*   *

४१४ बिरह-बिथा-जल-परस-बिन बसियतु मो-मन-ताल।
कछु जानत जल-थंम-बिधि दुर्जोधन लौं, लाल॥४१४॥

जलस्तंभन

पूर्वानुरागिणी नायिकेनं प्रियकराच्या पत्रात खालील दोहा लिहिलेला आहे. "प्रियकरा मला वाटतं की दुर्योधनासारखा तुम्हालाही जलस्तंभनविधी अवगत असावा. एरवी विरहव्यथेनं भरलेल्या माझ्या मनात आणि आसवांनी भरलेल्या माझ्या डोळ्यांत तुमची मूर्ती अशी कोरडीच राहिली नसती. त्या व्यथेचा वा आसवांचा तुम्हाला किंचितसाही स्पर्श होत नाही".

सुयोधनापरि जाणतां जलस्तंभन विधि, नाथ।
विरहजलीं मम मानसीं, वसता होइ न घात॥
मुळी शिवेना ती व्यथा, अश्रुजलाशय आंत।
तुम्ही कोरडे राजसा, उरे न प्रीति मनांत॥४१४॥

*   *

४१५ रुख-रुखी मिस-रोष, मुख कहति रुखौंहें बैन।
रूखें कैसें होत ए नेह-चीकने नैन॥ ४१५॥

फसवे डोळे

सखी नायिकेला म्हणते, "तू आव तर चांगलाच आणला आहेस ग! आपण त्या गावचेच नाही अशा अलिप्तपणाने वागलीस--तरी तुझे डोळे सहमत दिसत नाहीत त्यांच्यातील स्नेह काही आटला नाही तो वाढताच दिसतोय".

अनुक्रमणिका

कृतक कोप, मुर्खि रुक्षता, अधरावरि कटु बोल।
अनुरागी परि लोचनें बोलति बोल, अबोल॥ ४१५॥

* *

४१६ **पति-रितु-औगुन-गुन बढतु मानु, माह कौ सीतु।**
जातु कठिन है अति मृदौ रवनी-मनु नवनीतु॥४१६॥

कठीणहृदया

मानिनी नायिकेची सखी नायकाला म्हणते, "तिचं रागवणं काही अन्यथा नाही. तुम्ही तसं कारणच दिलंय तिला. म्हणतात ना, पती आणि ऋतु यांचे स्वाभाविक परिणाम सारखेच असतात. माघात थंडीमुळे कुठलाही पदार्थ घट्ट होतो. प्रेमही घट्ट होतं अन् उपपतीच्या अवगुणानं नवनीतासारखं मृदु हृदयही कठीण बनतं".

पति, ऋतु गुणावगुण सारखे--माघ वाढवी शीत।
पति अवगुण, रमणी मन करि कांठीण मृदु नवनीत॥४१६॥

* *

४१७ **त्यौं त्यौं प्यासेई रहत, ज्यौं ज्यौं पियत अघाइ।**
सगुन सलीने रूप की जु न चरव-तृषा बुझाइ॥४१७॥

रूपचटक

नायिका नायकाकडे स्नेहपूर्ण नजरेनं वारंवार बघते. सखी तिला लोकापवादाच्या भीतीनं तसं न करण्याविषयी बजावते. त्यावर ती म्हणते, "सखे माझ्या या डोळ्यांची तहानच विचित्र आहे ग. सारखे पीत असतात तरीही अतृप्तच, उलट प्याल्यानंतर त्यांची तृषा अधिकच वाढते, त्यांना सगुण स्वरूपाची चटक लागली आहे".

अधाशीच मेली तृषा, पीता अधिकच होय।
लावि चटक दृष्टीस या सगुणरूप रस तोय॥४१७॥

* *

४१८ **अरुन-बरन तरुनि-चरन-अँगुरी अति सुकुमार।**
चुवत सुरँगु रँगु सी मनौ चपि बिछियनु कैं भार॥४१८॥

चरणांगुलि

दूती नायकाजवळ, नायिकेच्या नाजुक लालसर पायांच्या बोटांचं वर्णन करते, "त्या नवयौवनेच्या पायांची बोटं, नाजुक प्राजक्ताच्या कळ्यासारखी लालसर आहेत. जणु काय देहाचा सारा नाजुक भार पडल्यामुळं दबलेल्या बोटांची टोकं लालसुरंग झाली आहेत.

तरुणिचरणअंगुलीअरुणिमा, सुमकोमल अरुवार।

अनुक्रमणिका

ठिबकति रंग सुरंग बिंदुकण, चेपित जंव तनुभार॥४१८॥

*   *

४१९ **मोर- मुकुट की चंद्रिकनु यौं राजत नँदनंद।**
मनु ससिसेखर की अकस किय सेखर सत चंद॥४१९॥

चंद्रमेचक

सखी मोरमुकुट धारी कृष्णाचं वर्णन करून, नायिकेच्या मनात अभिसाराची अभिलाषा उत्पन्न करते. “मोरमुकुट त्याच्या शिरावर इतका सुंदर दिसतो, जणु काय कामदेवच शशिशेखराच्या इर्षेने, शतसहस्र चंद्रकला स्वशिरावर धारण करतो आहे”.

मोरपिसावरि चंद्रकमंडळ धरी शिरीं अभिराम।
शशिशेखर ईर्षायुत धरि शतचंद्र मनोहर शाम॥४१९॥

*   *

४२० **अधर धरत हरि कैं, परत ओठ-डीठि-पट-जोति।**
हरित बाँस की बाँसुरी इंद्रधनुष-रँग होति ॥४२०॥

इंद्रधनू-दुहिता

श्रीकृष्णाला बासरी वाजवताना पाहून सखी राधिकेजवळ त्याची प्रशंसा करीत त्याला भेटायला प्रवृत्त करते. “हरिच्या हाती एक सामान्य हिरवी बासरीदेखील किती सुंदर दिसते. ओठांचा रक्तिमा, पीतपटाची झांक, नीलनयनाची झळक, या सर्व रंगमेळात त्यानं इंद्रधनुष्यच करात घेतल्यासारखं वाटतं--सखे! तूही गेलीस म्हणजे त्याच्या हाती तशीच रंगशील. ‘हरिचा अधर रक्तिमा, डोळ्यातला नीलिमा, आणि पीतांबराची पितळी झाक, याची रंगछाया बासरीच्या मूळ हिरव्या रंगावर पडल्यामुळे ती बासरी इंद्रधनुची दुहिताच वाटते”.

नीलनयन अरुण अधर, पीतांबर मिलित ज्योति।
अधरि धरी हरि बासरि वंशवेल हरित कांति॥
नवल सखे, अधरि शेज चेपित हरि अंग अंग।
स्वराधिका कलंकिनी धरित इंद्रधनुष्य रंग॥४२०॥

*   *

४२१ **तौ अनेक औगुन-भरिहिं चाहै याहि बलाइ।**
जौ पति संपति हूँ बिना जदुपति राखे जाइ॥४२१॥

सुखदुःखाचा साज

जगात केवळ पत राखण्यासाठी किंवा लज्जा रक्षणासाठीच संपत्तीची आवश्यकता आहे. पण ईश्वरच आपली लाज राखण्यास तयार झाला तर संचयाचा मोह कोण करील”

अनुक्रमणिका

नको संपदा अवगुणी सुखदुःखाचा हार।
पत राखिल जरि श्रीहरि, कुणि न तिला शिवणार॥४२१॥

* *

४२२ **प्रीतम-दृग-मिहचत प्रिया पानि-परस-सुखु पाइ।**
जानि पछनि अजान लौं नैंकु न होति जनाइ॥४२२॥

लपंडाव

नायिका मैत्रिणांच्या घोळक्यात आहे.नायक मागून येऊन हळूच तिचे डोळे झाकतो. नायिका हात चाचपीत स्पर्शानं कोण आहे ते बरोबर ओळखते पण, हा सुखद स्पर्श तसाच रहावा म्हणून ती वेड पांघरुन न ओळखल्याचा आव आणित हात तसेच राहू देते. तिची चातुरी कुणालाही कळली नाही. सखी सांगते, “प्रियकराने डोळे झाकताच तिला परिचित स्पर्श जाणवला पण न ओळखल्याचे दाखवित स्पर्शसुखासाठी ते हात तसेच राहू दिले.चतुर खरी!”

प्रियतम डोळे झाकिता चाचपून निमिषांत।
ठेवि सुखद करस्पर्श तो तसाच धरुनी हात॥
ओळखले पुरते मनीं चतुरा करि अनुमान।
ओळख देइ न जाणुनी ओळखता ही अजाण॥४२२॥

* *

४२३ **देखौ जागत वैसिये साँकर लगी कपाट।**
कित है आवतु, जातु भजि, कौजाने किहिं बाट॥४२३॥

चोरवाट

नायिका नायकाला नेहमी स्वप्नात बघते, पण तिला भोळेपणानं वाटतं की रात्री तो खरंच जवळ झोपतो. पण सकाळी बघते तो सारी दारं बंद असतात. ती आश्चर्यानं सखीला सांगते, ‘रात्री दारं कडेकोट बंद करून मी झोपते पण कळेना कुठल्या चोरवाटेनं तो आत येतो ते!’ आणि परत जातो तरी कसा! कारण सकाळी सारी दारं बंद असतात”

न कळे येति कुठुनिं कसे, दुसरी नसेच वाट।
नीट लावते झोपतां सखये कडी कपाट॥
झोपति जवळी येउनी, उडते हे काळीज।
दिसे बंद ते दारही-चळतां माझी नीज॥४२३॥

* *

४२४ **करु उठाइ घूँघटु करत उझरत पट-गुँझरौट।**
सुख-मोटैं लूटीं ललन लखि ललना की लौट॥४२४॥

अनुक्रमणिका

अपांगदर्शन

नायकाला पहाताच नायिकेनं ओढणी घेण्यासाठी हात वर उचलला पण घाईनं पदर सरकून त्याला तिच्या आंतरभागाचं दर्शन घडलं असावं या जाणीवेनं लाजून ती पटकन पाठमोरी वळून आत पळाली".

घेता ती मुखि ओढणी, दिसे उचलता हात।
मंदोदर उर अंग ते, वळति पाठ निमिषांत॥४२४॥

*　　　　*

४२५ **करौ कुबत जगु, कुटिलता तजौं न, दीनदयाल।**
दुखी होहुगे सरल हिय बसत, त्रिभंगी लाल॥४२५॥

त्रिभंगीलाल

भक्ताची भगवंताकडे मागणी "हे दीनदयाल प्रभो, श्रीकृष्णा, जग मला काही म्हणो, मी आपली, कुटिल वक्रता सोडणार नाही. सरळ राहून मी सर्वस्वच गमावून बसेन. हे त्रिभंगीलाल तुम्ही माझ्या सरळ हृदयात कसे राहू शकाल? तुम्हालाच त्रास होईल? सरळ म्यानात वाकडी तलवार कशी राहील?"

कधी न सोडी कुटिलता, निंदो कुणी जगांत।
कपटी काळा वाकडा झालो जरि विख्यात॥
सहज न वसणें हृदयी या, अहो त्रिभंगीलाल।
सरल म्यान असि कुटिल ती जुळे न दीनदयाळ॥४२५॥

*　　　　*

४२६ **निज करनी सकुचेंहि कत सकुचावत इहिं चाल।**
मोहूँ से नित-बिमुख-त्यौं सनमुख रहि, गोपाल॥४२६॥

पापविमोचन

आपल्या करणीनं संकोचित झालेला भक्त, आपल्यावर वृंदावनविहारी गोपालकृष्णाची कृपा झालेली पाहून अधिकच संकोचित होऊन म्हणतो "हे गोपाल, मी आपल्या पापी करणीनं आधीच लज्जित झालो आहे. तुम्ही आपली कृपादृष्टी मजवर वळवून मला अधिक का लाजविता?"

कृति संकोचित मी प्रभो, विन्मुख बंधविमोच।
करिसि कृपा मजवरी तरी, अधिकच हो संकोच॥४२६॥

*　　　　*

४२७ **मोहिं तुम्हैं बाढी बहस, को जीतै, जदुराज।**
अपनैं अपनैं बिरद की दूहूँ निबाहन लाज॥४२७॥

अनुक्रमणिका

पैज

कुणी भक्त श्रीकृष्णाला राज्यपद देऊन स्तुतीनं आपला कार्यभाग साधण्याची मनीषा धरतो. त्याला विडा उचलायला सांगतो. “हे यदुराज तुमची माझी आता पैंज लागलेली आहे. यात कोण जिंकतं तेच आता पहायचं आहे. मी पतित असल्यामुळे पतिताची करणी मी सोडणार नाही. आणि आपण पतितपावन आहात! तेव्हा आपल्या ब्रीदाप्रमाणे तुम्ही मला सदैव पावन करीत रहाल! या चढाओढीत कोण हरतं तेच आता बघू! मी जिंकिन याबद्दल मला खात्री आहे”.

कोण आपुले राखिते ब्रीद बधूं यदुराज।
पैज लागली आपुली कोण जिंकितो आज॥
ब्रीद तुझे तू ‘पतीतपावना’ मी अति दीन पतीत।
हारशील तू मजपुढे होईल माझी जीत॥४२७॥

* *

४२८ **दूरि भजत प्रभु पीठि दै गुन-बिस्तारन-काल।**
प्रगटत निर्गुन निकट रहि चंग-रंग भूपाल॥४२८॥

निर्गुण-मान

यात कवी निर्गुण उपासनेचे समर्थन करतो. सगुणोपासनेत प्रभुच्या अनंत गुणांचा पार लागत नाही. त्यामुळे जो जो विस्तार करावा तो तो प्रभू दूर जातो. पण निर्गुण स्वरूप अंतरातच असल्यामुळे ते सदा निकटचे असते. हे तत्वज्ञान पतंगाच्या रूपकानं तो सांगतो. आपल्या गुणविस्ताराच्या वेळी प्रभू पतंगासारखी पाठ देऊन दूर दूर अंतरानं जातो पण गुणविरहित मात्र निकट असतो. तसाच आपले कला कौशल्यादि गुण विस्तरपूर्वक दाखविणाऱ्या गुणवंताकडे राजा पाठ फिरवतो. पण गुणहीनाला जवळ करतो (पतंगाचा खेळ म्हणजे रागाची लहर)

निर्गुण तो निकटीं वसे, गुणी जातसे दूर।
पाठ फिरवुनी पतंगापरी, नृपाल व्यसनीं चूर॥४२८॥

* *

४२९ **कहै यहै श्रुति सुम्रत्यौ, यहै सयाने लोग।**
तीन दबावत निसक हीं पातक, राजा, रोग॥४२९॥

दुर्बल-घातकी

श्रृति स्मृति व ज्ञानी जन म्हणतात की, राजा, रोग, आणि घातक हे दुर्बलाचाच घात करतात. देवो दुर्बल घातकः हे वचन असत्य नव्हे.

श्रृति स्मृति सांगती सकलही ज्ञानी, येई भोग।
अबलाते घातकी होति हे, पातक, राजा, रोग॥४२९॥

अनुक्रमणिका

*   *

४३० **जो सिर धरि महिमा मही लहियती राजा राइ।**
प्रगटत जडता अपनियै सु मुकटु पहिरत पाइ॥४३०॥

मुकुटमहति

आदरणीय व्यक्तीचा निरादर केल्यास करणाराची जडता व मूढताच प्रगट होते. राजमुकुट शिरी धारण करून महिपाल आपला महिमा वाढवतो. तोच मुकुट पायी तुडवला तर त्याची मूढता प्रगट होते. मुकुटाची महती मळत नाही.

शिरी विराजित, वाढवी मुकुट महति, महिपाल।
पायि तुडविता मूढता प्रगट करीत नृपाल॥४३०॥

*   *

४३१ **को कहि सकै बडेनु सौं लखैं बडीयौ भूल।**
दीने दई गुलाब की इन डारनु वे फूल॥४३१॥

'काय बोलायचं!'

थोरांच्या हातून हिमालयाएवढी चूक झाली तरी त्यांना कोण बोलणार? गुलाबाच्या काट्यानं भरलेल्या सुक्या डहाळीवर विधीनं सुंदर, कोमल आणि सुगंधित फुलाची योजना केली ही त्याची केवढी चूक! पण ती त्याच्या पदरात कोण घालील?

रुक्ष कंटकाकीर्ण ही डहाळ तरिही आब।
फुलतो सुंदर त्यावरी गंदेदार गुलाब॥
दैव जरी दोषी ठरे-देउनि गोंडस फूल।
कुणी न बोले पाहुनी ही थोरांची भूल॥४३१॥

*   *

४३२ **समै समे सुंदर सबै, रुपु कुरुपु न कोइ।**
मन की रुचि जेति जितै, तित तेती रुचि होइ॥४३२॥

सौंदर्यदृष्टि

कवीची उक्ती : त्या सृष्टिकर्त्याची सारीच रचना सुंदर आहे. काहीच सुरुप नाहीं नि कुरुप नाही. योग्य समयीं माणसाच्या अभिरुची प्रमाणे, त्या सुंदर वा कुरुप वाटतात.

सारे सुंदर भासते, जगी न रूप कुरूप।
जैसी ज्याची अभिरुची, तेच होय अपरूप॥४३२॥

*   *

अनुक्रमणिका

४३३ **या भव पारावार कौं उलँघि पार जो जाइ।**
तिय-छबि-छायाग्राहिनी ग्रहै बीचहीं आइ॥४३३॥

छायाग्राहिणी "हा भव संसार तरून जायला कोण समर्थ आहे? स्त्री ही त्या मार्गातील मोठी धोंड आहे. स्त्रीची छबिरूपी छायाग्राहिणी मधेच येऊन त्याला गिळून टाकते. हनुमंतासारखा ब्रह्मचारीच त्यांतून बचावू शकतो".

स्त्रीछबि छायाग्राहिणी, ग्राहि सकल संसार।
हनुमंतापरि लंघिता, हा भवसागर पार॥४३३॥

* *

४३४ **दिन दस आदरु पाइ कै करि लै आपु बरवानु।**
जो लगि काग! सराधपखु, तौ लगि तौ सनमानु॥४३४॥

काकान्योक्ति

नीच माणसाचा काही कारणानं सन्मान झाला तर तो गर्वाने जन्मभर मिरवितो. कविची उक्ती, "हे काक, आज पितृपक्षाच्या दिवशी तुझा आदर झाला म्हणून फुलून जाऊ नकोस! तुझ्या सन्मानाचं स्थान एकच आहे आणि ते म्हणजे स्मशान!"

पितृपक्षि या अवसरी आदरिती जन काक।
हंसापरि तो मिरवितो, उगाच दावित धाक॥
काका, ही कावकाव कां, फुकाचा घ्याया मान।
सन्मानाचे स्थान तुज केवळ एक स्मशान॥४३४॥

* *

४३५ **मरतु प्यास पिंजरा-परयौ सुआ समै कैं फर।**
आदरु दै दै बोलियतु बाइसु बलि की बेर॥४३५॥

काक व शुक

विशेष प्रसंगी गुणी माणसाचा निरादर आणि मूर्खाचा मान पाहून कवी म्हणतो ,"कसा समय आला आहे पहा! पिंडदान प्रसंगी कावळ्याला मोठ्या आदरानं निमंत्रण दिलं जातं पण बिचारा शुक पिंजऱ्यात उपाशीच तडफडत आहे त्याच्याकडे कुणाचच लक्ष नाही!".

उपाशीच शुक पंजरी, वायस घे सन्मान।
पिंडदान समयी तया कालाचे वरदान॥४३५॥

* *

४३६ **वेई कर, ब्यौरनि वहै, ब्यौरौ कौन बिचार।**
जिनहीं उरझ्यौं मो हियौ, तिनहीं सुरझे बार॥४३६।

अनुक्रमणिका

'तेच, बाई ग तेच'

नायिकेनं आपल्या दूतीला नायकाकडे पाठविलं. नायकानं दूतीचे केस नीट विंचरून तिची वेणी गुंफिली. ती परत आल्यावर नायिकेनं ते नेमकं हेरलं, ती म्हणते, "त्यांची वेणी गुंफण्याची तऱ्हा आणि केस विंचरण्याची हातोटी अगदी अशीच आहे. मला वाटतं त्यांनीच तुला शिकवलं असावं! किंवा त्यांचे हात तरी तुझ्या वेणीला लागले असावेत. त्याशिवाय अशी सफाई यायची नाही".

कुणि विंचरले केस ग, दिसते वळण नवेच।
बर का ग वळविती सखे तेहि अगदि असेच॥
हृदय जयाने वळविले, खोवियला शिरपेंच।
लपे न लपता हात तो, तेच,बाइ ग तेच॥४३६॥

* *

४३७ **इहिं आस अटक्यौ रहतु अलि गुलाब कैं मूल।**
है हैं फरि बसंत ऋतु इन डारनु वे फूल॥४३७॥

वसंत-आस

दात्याची संपत्ती नाहीशी झाली तरी गुणीजन त्याचा सहवास सोडीत नाहीत. कवी म्हणतो, "रसिक भ्रमर, गुलाबाच्या काटेरी पर्णहीन डहाळी भोवती पुन्हा वसंतकाल येईल या आशेवर गुंजारव करीत फेर धरितो."

फिरे भोवती मधुप हा, होइल की रसलाभ।
वसंतागमी फुलेल हा सुकला जरी गुलाब॥४३७॥

* *

४३८ **वे न इहाँ नागर, बढी जिन आदर तो आन।**
फुल्यौ अनफूल्यौ भयौ गवँई-गाँव, गुलाब॥४३८॥

मूर्खांचे नंदनवन

मूर्खांच्या मेळाव्यात सापडलेल्या गुणवंताचा निरादर पाहून कवी म्हणतो, "अरे गुलाबा, हे नगरवासी गुण ग्राहक नाहीत, इथं तुझ्या गुणगंधाची कदर कोण करणार? गावठ्या गावात तू उमललास की सुकलास त्यांना सारखंच आहे."

नागरजन सन्मानिती, वाढविती गुण नाव।
फुलता नच फुलल्यापरी गुलाब, गावत गाव॥
गावंढ्या गावात या, गुण गंधा नच वाव।
सुकला फुलला सारखा, तेथे एकच भाव॥४३८॥

* *

अनुक्रमणिका

४३९ **चल्यौ जाइ, ह्याँ को करै हाथिनु के ब्यापार।**
नहिं जानतु इहिं पुर बसैं, धोबी ओड कुँभार॥४३९॥

अस्थानी व्यापार

कुणी गुणी महापुरुष आपल्या गुणाचं प्रदर्शन गावंढळासमोर करताना पाहून कवी म्हणतो, “हत्तीचा व्यापार करणाऱ्या हे व्यापाऱ्या, तू या गावची निवड कशी काय केलीस? तुला कुठलं गिऱ्हाइक मिळणार? अरे या गावात धोबी, कुंभार व धेड यांचीच वस्ती आहे. त्यांना गाढवं लागतात. !”

इथें कराया येसि का हत्तीचा व्यापार।
वसति परि या गावची, धोबी, ढोर, कुंभार॥४३९॥

* *

४४० **रवरी लसति गौरें गरैं धँसति पान की पीक।**
मनौ गुली-बँद-लाल की, लाल, लालदुति-लीक॥४४०॥

नितल गौरांग

सखी नायिकेच्या अमल गौर देहाची प्रशंसा करते. “अहो तिच्या नितळ गौर पारदर्शक कंठातून पानांचा पीक उतरताना दिसतो. असं वाटतं की तिच्या माणिकरत्नचिंचपेटीची गळ्यावर झाकच पडली आहे.”

तांबुल सेवित कामिनी, लाल रंगले ओठ।
गालीं ठेउनि बैसली अपुले नाजुक बोट॥
कंठामधुनी गोरट्या दिसे उतरता पीक।
रत्न झाक ती शोभते गळ्यांत माणिक टीक॥४४०॥

* *

४४१ **पाइल पाइ लगी रहै, लगौ अमोलिक लाल।**
भोडर हूँ की भासि है बेंदी भामिनि-भाल॥४४१॥

स्वयंप्रज्ञ

कवीची उक्ती,: पैंजण आणि बिंदी याच्या अन्योक्तीनं कवी म्हणतो. “अयोग्य व्यक्तीला दुसऱ्याच्या सहाय्यानं श्रेष्ठ पद मिळू शकत नाही. पण ज्यात स्वयंयोग्यता आहे, ती सामान्य व्यक्तीही उच्चपदी विराजित होते. ‘पैंजण नेहमी पायाशीच रहातील त्यात हिरे मांडके जडविली तरी उपयोग नाही. तीच साधी अभ्रकबिंदी सुंदर ललनाच्या भालप्रदेशी सुशोभित सौभाग्याने मिरवेल.”

रत्नजडित ती पैंजणें अमोल, धरिती पाय॥
अभ्रक बिंदी राजते, भालीं ती गुणकाय॥४४१॥

अनुक्रमणिका

*   *

४४२ **कुटिल अलक छुटि परत मुख बढिगौ इतौ उदोतु।**
बंक बकारी देत ज्यौं दामु रुपैया होतु॥४४२॥

अंकमोल

नायिकेच्या सुंदर मुखावर केसाची एक चुकार बट लोळत आहे. सखी नायकाचं तिकडे लक्ष वेधित म्हणते, "तिच्या मुखावर लोळणारी केसांची कुटिल बट, तिच्या सौंदर्याचं मोलच वाढवीत आहे. अंकावर वाकडी रेघ दिली की कलदाराची मोहर होते".

गौरमुखावर चुकार ती, कुटिल अलक लटभार।
अंकमोल ती वाढवी बंकरेघ कलदार॥४४२॥

*   *

४४३ **रहि न सक्यौ, कसु करि रह्यौ, बस करि लीनौ मार।**
भेदि दुसार कियौ हियौ तन-दुति भेदै सार॥४४३॥

काममोहित

नायक नायिकेची सौंदर्यशोभा पाहून काममोहित झाला आहे आणि तिच्या आठवणीनं तो विकल होत आहे. तो आपली अवस्था दूतीला सांगून तिची भेट घडवून आणण्यासाठी विनवितो. "मन आवरण्याचा किती प्रयत्न केला, पण जमत नाही. मदनानं ते अगोदरच विवश केलं आहे. तिच्या सौंदर्यशरानं अगोदरच ते दुभंगलं होतच. त्याचंच शल्य उरात खूपत आहे".

आठव शोभाशल्य तें, सलतें उरीं सदाच।
आवरताहि मनोज हा छेदित द्युति नाराच॥४४३॥

*   *

४४४ **खल-बढाई बलु करि थकै, कटै न कुबत-कुठार।**
आलबाल उर झालरी खरी प्रेम-तरु-डार॥४४४॥

खल-कुठार

कुणी परकीया आपल्या विश्वासू सखीला म्हणते. "सखे, माझ्या हृदयाच्या आळ्यात फोफावलेला प्रीतिचा अंकुर, निंदेच्या कुठाराघातानं तुटणार नाही. दुर्जन लाकुडतोड्यांनी किती प्रयत्न केले नि हात टेकले".

प्रेमतरुचें रोपटें पालवि उर अलवाल।
खलनिंदा वच कुठार ती चले, न तुटे डहाळ॥४४४॥

*   *

अनुक्रमणिका

४४५ **स्यौं बिजुरी मनु मेह आनि इहाँ बिरहा धरे।**
आठौ जाम, अछेह, दग जु बरत बरसत रहत॥४४५॥

नेत्रमेघ

प्रोषितपतिका नायिका सखीला सांगते. "माझ्या डोळ्यांना सतत आसवांची बरसात लागली आहे. जणु काय विरहानं विजेसह मेघच माझ्या डोळ्यात आणून बसविले आहेत".

रातंदिन ही लागली धार, सखे बरसात।
विरह वसवि बिजली सवें मेघ जणूं नयनांत॥४४५॥

* *

४४६ **कत बेकाज चलाइयति चतुराई की चाल।**
कहे देति यह रावरे सब गुन निरगुन माल॥४४६॥

निर्गुण माळ

खंडिता नायिका नायकाला बोलते "हे बघा मला तुमची मखलाशी नको आहे! तुमची चतुराई राहू द्या. तुमचे अवगुण ही तुमच्या उरावर वठलेली निर्गुण माळच सांगत आहे."

पुरे पुरे हो चातुरी, गोडबोल लडिवाळ।
उरीं उमटली कळविते गुण ती निर्गुण माळ॥४४६॥

* *

४४७ **उनकौ हितु उनहीं बनै, कोऊ, करौ अनुकु।**
फिरतु काक गोलकु भयौ दुहूँ देह ज्यौ एकु॥४४७॥

अपूर्व-प्रीति

त्या युगुलाचं अनुपम प्रेम पाहून सख्या आपसांत प्रसन्नतेनं बोलत आहेत. "त्यांचं परस्परावर अलौकिक प्रेम आहे. दोन कुडीतून एकच प्राण काकगोलका सारखा वावरतो आहे असं वाटतं."

दैवानें दिधलें तयां प्रीतीचें वरदान।
काक गोलकापरी फिरे दोन कुडींतुन प्राण॥४४७॥

* *

४४८ **गडे, बडे छबि-छाक छकि, छिगुनी-छोर छुटैं न।**
रहे सुरँग रँग रँगि उहीं नह-दी महदी नैन॥४४८॥

अनुक्रमणिका

करांगळी

नायक नायिकेची करांगळी पाहून भाळतो. टोकाचा मेंदीचा रंग त्याचं मन रंगवितो. ही गोष्ट तिच्या सखीला सांगून तिला प्रसन्न करू पाहतो. "रूपमदिरा पिऊन, मतवाले झालेले माझे डोळे तिच्या टोकाला मेंदी लावलेल्या करांगळीवर खिळले. ती लाल नखं माझ्या हृदयालाच गुदगुदी करीत आहेसं वाटतं."

छबि मदिरा पीता मन हे मस्त बने सुखचैन।
करांगुली नखमेंदी वरती रंगरंगले नैन॥४४८॥

४४९ **वाढत तो उर उरज-भरु भरि तरुनई-बिकास।**
बोझनु सौतिनु कैं हियैं आवति रुँधि उसास॥४४९॥

वक्ष भार

नवयौवना नायिका सखीला सांगते, "यौवनाच्या विकासानं तुझ्या छातीवरील भार वाढतो आहे आणि हृदयही भारावलं आहे. पण त्यामुळं तुझ्या सवतीचाच श्वास कोंडतो!"

हृदयावरती झेलता सखये यौवन भार।
उभारता उर उसासते, असुया सवतविकार॥४४९॥

* *

४५० **अलि, इन लोइन-सरनु कौ खरौ विषम संचारु।**
लगैं लगाऐं एक से दुहूँनु करत सुमारु॥४५०॥

घायाळ-शिकारी

नायकाला आपल्या कटाक्षबाणांनी घायाळ केलेल्या नायिकेला सखी म्हणते, "अग तू आपल्या नयनशरांनी त्याला विद्ध केलंस खरं पण तो बिचारा जखमेनं कण्हतो आहे." त्यावर नायिका म्हणते, "सखे मी देखील तशीच तळमळते आहे ग! या नयनबाणांची फेक दुहेरी असते. ज्यांना लागतात त्यांना घायाळ करतातच पण जो सोडतो तोही घायाळ होऊन पडतो!"

लोचन सायक हे सखे करिती विषम संचार।
शिकार हो घायाळ ती, शिकारिहि बेजार॥४५०॥

* *

४५१ **मूड चढाऐंऊ, कब रहै परयौ पीठि कच-भारु।**
रहै गरैं परि, राखिबौ तऊ हियैं पर हारु॥४५१॥

कुंतल-हार

अयोग्य पुरुषाचा कितीही सन्मान केला तरी तो उच्चपदी स्थिर राहू शकत नाही. पण गुणी पुरुष गळ्यात पडला तरी त्याला हृदयीं धारण करतात. "कचसंभार शिरावर वाढला तरी पाठीवरच पडणार. उलट हार गळा धरतो तरी त्याला हृदयावरच स्थान मिळते".

वरी चढविला किती जरी उचलुनिया कचभार।
शिरिं धरितां पाठिशी पडे, घेत सदा माघार॥
कंठ धरोनी पडे गळां, सुवास मधुर विहास।
गुणीं गुंफिला हार तो, हृदयी करी निवास॥४५१॥

*　　　　*

४५२ **करतु जातु जेती कटनी बढि रस-सरिता-सोतु।**
आलबाल उर प्रेम-तरु तितौ तितौ दढु होतु॥४५२॥

प्रीतिकिनारा

नायिका प्रीतीच्या जाणिवेनं नायकाला भेटायला उत्सुक झाली आहे. पण सखी तिला सांगते की, "तू इतकी उतावीळ होऊ नकोस. त्याचं प्रेम जरा दृढ होऊ दे. तू ओढून धरशील तरच ते दृढ होईल. उत्कटतेचा नदीप्रवाह जसा वाढताना किनारा कापित जातो, तसतसा हृदयाच्या आळ्यात लावलेला प्रेमतरु फोफावत जातो".

मीलनिं, सरिता सरता सखे, वाढतसे रसधार।
प्रीति तरु दृढ होइ तो झिजतां नदी किनार॥४५२॥

*　　　　*

४५३ **राति द्यौस हौंसे रहै, मानु न ठिकु ठहराइ।**
जेतौ औगुनु ढूँढियै, गुनै हाथ परि जाइ॥४५३॥

टिके न तें अवसान

प्रेमगर्विता नायिका सखीला सांगते, "सखे मला नेहमी वाटतं की त्यांनी काही अपराध करावा, आणि मी त्यांच्यावर रुसावं, पण ते काही जुळतच नाही. ते सदाच माझ्या सुखासाठी झटतात, आणि परस्त्रीकडे डोळा उचलून देखील पहात नाहीत. काही अवगुण शोधायचा प्रयत्न करते तो गुणच दिसून येतात. त्यामुळं राग-रंगाच्या चवीपासून मी वंचितच आहे."

मिळे न कारण एक ही करावया अपमान।
अवगुण अंगीं शोधतां ओठीं ये गुणगान॥
रातंदिन मनिं हौस ही, लटका घ्यावा मान।
उगाच धरुनी राग तो-टिके न ते अवसान॥४५३॥

*　　　　*

अनुक्रमणिका

४५४ **मनु न मनावन कौं करै, देतु रुठाइ रुठाइ॥**
कौतुक लाग्यौ प्यौ प्रिय-खिझहूँ रिझवति जाइ॥४५४॥

खट्याळ

नायकाला नायिकेचा कोप अतिशय आवडतो. तिला समजावताना मधेच काही अवखळ बोलून तिला चीड आणतो. पुन्हा ती रुसून बसते. तापविणे व शांतविणे असा सारखा त्याचा खेळ चालू असतो. ती कोपयुक्त रमणी त्याला अतिशय रमणीय भासते.

कोपयुता रमणी रमवी मन, चिडवी तिला खट्याळ।
रुसवी हसवी पुन्हा पुन्हा, कौतुक तें लडिवाळ॥४५४॥

* *

४५५ **बिरह-विपतु-दिनु परत हीं तजे सुखनु सब अंग।**
रहि अब लौं ऽब दुखौ भए चलाचलै जिय-संग॥४५५॥

परित्याग

प्रोषितपतिका नायिका आपली दीनदशा प्रियकराला पत्रातून कळवते;"विरहरूपी आपत्ती ओढवल्यामुळं, सर्व सुखांनीच माझा परित्याग केला. कठिण समयी कोण कामास येतो? आणि आता तर, अशी परिस्थिती आहे की दुःखदेखील, प्राणासह सोडून जाण्याच्या मार्गावर आहे".

विरहकाल येतांच हा, सुख जाई सोडून।
दुःखहि तें जाया बघे प्राणासवें उडून॥४५५॥

* *

४५६ **नयैं बिरह बढती बिथा खरी बिकल जिय बाल।**
बिलखी देखि परोसिन्यौ हरखि हँसि तिहिं काल॥४५६॥

अल्लड विरहिणी

नायिका नववधू व तिचा पहिलाच विरहकाल! ती अत्यंत विरहविकल होते. पण अजून अजाण व अल्लड असल्यामुळं आपली विरहव्यथा सांगायला संकोचते. ती अशी विचारात असता शेजारणीला सचिंत बघते. ती देखील पतिविरहात असावी अशा कल्पनेनं तिला शेजारणीबद्दल सहानुभूति वाटते. ती चतुर असून समदुःखिताची विरहव्यथा कळवूं शकेल या आशेनं ती आनंदित होते. आणि शेजारणीची चोरी उघडकीस आली तरी प्रियभेटीच्या हर्षानं ते दुःख विसरून जाते.

विरहव्यथा लपवी वधू, सांगे न ती कुणास।
हंसे, बघुनि शेजीहि ती विकल तशीच उदास॥४५६॥

* *

अनुक्रमणिका

४५७ **छतौ नेहु कागर हियैं, भई लखाइ न टाँकु।**
बिरह-तचैं उघर्‌यौ सु अब सेंहुड कैसो आँकु॥४५७॥

मिताक्षरी

जेव्हा एखादी वस्तू निकट असते तेव्हा त्याचे काहीच वाटत नाही. पण ती दुरावताच मनाला सारखी हुरहुर लागते व आपले त्या वस्तूवरील प्रेम प्रगट होते. प्रोषितपतिका परकीया जाया ज्यावर प्रेम करीत होती तो दूर गेलेला आहे. निकट असताना तिनं आपलं प्रेम कधीच प्रगट केलं नव्हतं, उलट नायकानं तसा प्रयत्न केला असता तिनं प्रतिकार केला होता. त्याच्या केवळ दर्शनानंच ती प्रसन्न होत होती. पण आता तो दूर गेल्यामुळं तिला रहावेना. आपल्या प्रीतीची मात सांगून ती दूतीला नायकाकडे पाठविते. नायक हे ऐकताच आश्चर्यानं तिला विचारतो, “मी तिथं असताना तिनं कधीच प्रेम दर्शविलं नाही, अन् आताच हे कसं काय? त्यावर दूती उत्तरते, “त्यावेळी ते अलक्षित होतं. आपल्या विरहाच्या आचेनं ते प्रगट झालं. कोऱ्या कागदावर अदृश्य अक्षरानं लिहिलेलं पण विरहाची आंच लागताच ती अक्षरं आता दिसायला लागली”.

हृदयपत्रिकेवरी कोरिला अलक्ष प्रीतीलेख।
विरह आँच लागता दिसे मिताक्षरांत सुरेख॥४५७॥

* *

४५८ **फूली फाली फूल सी फिरति जु बिमल-बिकास।**
भोर तरैयाँ होहु ते चकत तोहिं पिय-पास॥४५८॥

काळोखी पहाट

मानिनी नायिकेला सखी अभिसाराला प्रवृत्त करते. “तुझ्या सवती अगदी प्रसन्न वदनानं थाटमाट करून, प्रियकराबरोबर भटकत हिंडतात. हे आम्हाला सहन होत नाही. तू त्यांचा दिमाख उतरव. तू प्रियकराबरोबर जाऊन त्यांची काळोखी पहाट करून टाक”.

सखे, उमलत्या फुलापरी फिरे सवत करि थाट।
प्रिय सहवासें करि तिची काळोखीच पहाट॥४५८॥

* *

४५९ **अरी, खरी सटपट परी बिधु आधैं मग हेरि।**
संग-लगैं मधुपनु लई भागनु गली अंधेरि॥४५९॥

तिमिर निकुंज

परकीया कृष्णाभिसारिका, रूपगर्विता नायिका अंधाऱ्यारात्री नायकाला भेटायला गेली. चंद्रोदय होण्यापूर्वीच तिचा परतायचा विचार होता. पण नायकाच्या प्रेमविवशतेनं तिला विलंब झाला आणि अर्ध्या वाटेतच चंद्र उगवला. कुणी पाहतील म्हणून ती घाबरली. पण

तिच्या अंगसुगंधाला भाळलेल्या भ्रमरांनी तिच्या भोंवती अंधाराचे कडे केले, त्यामुळे गल्लीतून जाताना ती कुणालाच दिसली नाही."

प्रियामीलनिं रमता सखे, परताया हो रात।
अन् वाटेतच बाइ ग, चंद्र येइ गगनांत॥
अंगसुगंधा भाळुनी सोबत ये अलिपुंज।
जनदृष्टी झाकावया करिती तिमिरनिकुंज॥४५९॥

* *

४६० **चलत घरु घर घर, तऊ घरी न घर ठहराइ।**
समुझि उहीं घर कौं चल, भूलि उहीं घर जाइ॥४६०॥

घर सोडित घरलाज

"घरोघरी तिची निंदा चालली आहे की, तिनं कुललाज सोडली, घरदार सोडून ती कुणाच्या तरी मागे आहे. पळभर घरी रहात नाही. जाणूनबुजून नायकाच्या घरी जाते. लोकनिंदेची तिला पर्वा नाही".

घरोघरी निंदा तिची नाहिंच रीतिरिवाज।
घरीं न राही क्षणभरी, घर सोडित घरलाज॥
रुळली चुकली वाट ती, दिवसा अंधारांत॥
अजाणता वा जाणुनी, जाई त्याच घरांत॥४६०॥

* *

४६१ **इक भीजैं, चहलैं परैं, बूड, बहैं हजार।**
किते न औगुन जगा करै बै-नै चढती बार॥४६१॥

वयाचा अनर्थ

नदीप्रमाणे वय देखील वाढता वाढता अनर्थ करीत जाते. "वयरूपी नदीला वाढ येताच ती किती अनर्थ करीत जाते! कुणाला प्रीतीनं भिजवते, कुणाला झिजवते. काही गाळातच रूतून बसतात. काठावर कुणाला सपाट निजवते. काही बुडतात, काही तरतात. काही वहावत जातात. तेव्हां त्यापासून सावध असणं बरं!"

वय, सरिता अवगुणीं वाढतां, लावित ओढ जनास।
भिजवी, बुडवी, झिजवी कितिका, वाहवीत कितिकांस॥४६१॥

* *

४६२ **गाढ़ैं ठाढ़ैं कचनु ठिलि पिय-हिय को ठहराइ।**
उकसौं हैं हीं तौ हियैं दईं सबै उकसाइ॥४६२॥

अनुक्रमणिका

यौवन विकास

अंकुरित नायिकेची सखी, तिची परिहासपूर्ण प्रशंसा करते, “अग तुझ्या भरदार अन् टोकदार कुचांनी, प्रियकराच्या हृदयाला टोचताच, तुझी कुठली सवत त्याच्या हृदयात नांदू शकेल! अग, आताच आपल्या विस्तारवाढीनं त्याच्या मनात कल्लोळ माजविला आहे. मग ते पीनोन्नत झाल्यावर काय उत्पात करतील सांगता येत नाही. प्रियकराच्या हृदयातून तुझ्या सवतींना पळच काढावा लागेल”.

अंगीं यौवन दाटतां दिसे उरोज उभार।
मनिं उठवी काहूर ती, सवत होइ बेजार॥
होतां पीन कठोर ते, मिठीत टोचित ऊर।
हृदयीं पळ ना थांबती, जातिल भिउनी दूर॥४६२॥

* *

४६३ **दीप-उजेरैं हू पतिहिं हरत बसनु रति-काज।**
रही लपटि छबि की छटनु, नैंको छुटी न लाज॥४६३॥

नग्न दीप्ति

नायिकेच्या शोभादीप्तीचं वर्णन सखी सखीजवळ करते. तिच्या छबीची छटा इतकी तेजान्वित आहे की दिव्याच्या उजेडातही तो तिला नग्न पाहू शकला नाही. कारण त्याचे डोळे तिच्या कमनीय कांतिप्रभेवरच खिळून राहिले. “दिव्याच्या उजेडातच रतिनिमित्त प्रियकरानं तिचं वस्त्र फेडलं पण त्या सुकोमल अंगकांतीच्या दिव्यवलयानंच त्याचे नेत्र दीपित झाले. तिथेच खिळून राहिले. त्यामुळे तिच्या नग्नतेकडे त्याच लक्षच गेलं नाही.”

गौर तनुद्युति दिपविते, वसन हरित रति-काज।
झळाळ तो नयनीं भरे, उरीं न येई लाज॥४६३॥

* *

४६४ **लखि दारत पिय-कर-कटकु बास-छुडावन काज।**
बरुनी-बन गाढैं दगनु रही गुढौ करि लाज॥४६४॥

लज्जाविलास

सुरतारंभी मध्या नायिकेच्या नयनातील लाजेच्या खेळाचं सखी वर्णन करते, “सुरतारंभीच तिची लाजरी लाज संकोचानं लपली आणि हळूच मंद पावलानं धिटाइनं प्रवेश केला आणि त्याच्या सन्निध मान उंचावून ती उभी राहिली.”

अरुणनयनपापणीतुनी लपे लाज भयभीत।
कटिवस्त्र फेडायास तें पतिकर येति निवीत॥४६४॥

* *

४६५ सकुचि सुरत-आरंभ हीं बिछुरी लाज लजाइ।
ढरकि ढार ढुरि ढिग भई ढीठि ढिठाई आइ॥४६५॥

लाजरी धिटाई

रतिविलासानंतर नायिकेने जे हावभाव केले त्याचं वर्णन सखी करते, "संकोचानं प्रियकराजवळून बाजूला सरत, खुदकन् हसून, आळोखेपिळोखे देत तिनं अंग मोडलं आणि पदर आडवा धरून, मान वळवून तिनं जाभई दिली.

जिवलग जवळी, बाजुला हळूच सरुनी दूर।
सैलवसन सावरीत ती आवरीत आऊर॥
अंगमोड उर झाकुनी पदर आडवा घेत।
मिटूनी डोळे कामिनी लांब जांभई देत॥४६५॥

* *

४६६ सकुचि सरकि पिय-निकट तैं मुलकि कछुक, तनु तोरि।
कर आँचर की ओट करि, जमुहानि मुँहु मोरि॥४६६॥

मदालसा

रतिरंगा आरंभिता, पळे लाजुनी लाज।
येत धिटाई रंगुनी निकट धरुनी माज॥४६६॥

* *

४६७ देह-लग्यौ ढिग गेहपति, तऊ नेहु निरबाहि।
नीची अँखियनु हीं इतैं गई कनखियनु चाहि॥४६७॥

प्रणय चातुरी

उपपती नायक परकीयेच्या चातुरीची प्रशंसा तिच्या मैत्रीणीजवळ करतो, "तिचा पती अगदी माझ्या शेजारी उभा असतानादेखील तिनं नजर खाली वळवून नयनकडांतून माझ्याकडे पाहून स्नेहपूर्ण आश्वासन दिलं".

असुनि निकट पति, लाजरी मला खुणविते नीट।
खाली पाहत वळवुनी नजर वाकडी धीट॥४६७॥

* *

४६८ मार्‍यौ मनुहारिनु भरी, गार्‍यौ खरी मिठाहिं।
वाकौ अति अनखाहटौ मुसकाहट-बिनु नाहिं॥४६८॥

अनुक्रमणिका

मोहक भार

नायक नायिकेवर एवढा अनुरक्त आहे की तिच्या शिव्या आणि मारदेखील त्याला गोड लागतो. तिच्या सखीला तो सांगतो, "तिचं चपेटा मारणं देखील किती मोहक आहे! आणि शिव्यातील गोडवा तर काही औरच! हसल्याशिवाय रागानं तिला बोलताच येत नाहीं. अन् डोळ्यातला राग आसवानं भिजलेला."

मुकामार ही मोहवी, शिवीत शीतल राग।
ओठ हासती कोपतां, दिठीं भिजे अनुराग॥४६८॥

*   *

४६९ **नाचि अचानक हीं उठे बिनु पावस बन मोर।**
जानति हौं, नंदित करी यह दिसि नंदकिसोर॥४६९॥

हर्ष-वर्षा

नायिकेची सखी मन रमविण्यासाठी तिला वनात नेऊ इच्छिते. ती म्हणते, "सखे आज मी जेव्हा इकडे येत होते तेव्हा या जवळच्या उपवनात, पाऊस नसतांना देखील, मोर टाहो फोडून नाचायला लागले. मला वाटतं तो घननील तिकडे गेला असावा. म्हणूनच आनंद झालेला दिसतो त्या मयूरांना!"

आज अचानक नाचती वर्षावाचुनि मोर।
हर्षे पुलकित वनदिशा जातां नंदकिशोर॥४६९॥

*   *

४७० **मैं यह तोहीं मैं लखी भगति अपूरब, बाल।**
लहि प्रसाद-माला जु भौ तनु कदंब की माल॥४७०॥

तनुकदम्ब

नायिका देवमंदिरी दर्शनाला गेली. त्यावेळी तिचा प्रियकरही तिथे आला. दोघांनीही देवाला हारफुले वाहिली, आणि पुजाऱ्यानं देवप्रसाद म्हणून फुलांची एक एक माळ त्यांना दिली. त्या घाईत नायकानं वाहिलेली माळ तिच्या गळ्यात घातली गेली. त्यामुळं तिच्या अंगावर रोमांच उभे राहिले. हा तनुकंप लक्षात येताच सखी म्हणते, "अग आज मी एक नवलच बघते आहे. तझी अपूर्व भक्ती पाहून मी चकितच झाले. ती प्रसादमाला तझ्या गळ्यात घालताच तुझी तनुच कदंबाचा हार बनली".

प्रसादमाला मंदिरीं, पडतां प्रिय कंठांत।
तनुकदंब रोमांचिता भाव अपूर्व मनांत॥४७०॥

*   *

अनुक्रमणिका

४७१ जाकैं एकाएक हुँ जग ब्यौसाइ न कोइ।
सो निदाघ फुलै फरै आक डहडहौ होइ॥४७१॥

एकाकी

असहाय व्यक्तीच्या संकटकाळी स्वये प्रभूच सहाय्यकर्ता बनतो. “जगात ज्याचा कुणीच पालनपोषण कर्ता नाही असा मंदारतरु ग्रीष्मातही (इतर वृक्ष सुकले असता) पानाफुलांनी बहरतो. निष्क्रीयाची संपन्नता ही अशीच असते.”

नसे व्याप व्यवसाय वा, पुसे न कुणी जगांत।
अर्कतरू बहरे तरी एकाकी ग्रीष्मांत॥४७१॥

* *

४७२ बतरस-लालच लाल की मुरली धरी लुकाइ।
सौंह करैं भौंहनु हँसै, दैन कहैं मटि जाइ॥४७२॥

मुरलीची चोरी

कृष्णानं आपल्याशी बोलावं म्हणून राधेनं त्याची मुरलीच कुठतरी लपवून ठेवली. यावर दोघातील वादविनोद सखी सांगते, “राधेनं कृष्णाची मुरली लपवली. कृष्ण म्हणतो, “माझी मुरली तू शोधून दिलीस तर मी तुझा फार आभारी होईन, हसतेस काय?” राधिका तरीही हसतच रहाते. कृष्ण तिला मुरली मागतो. ती मुरकत म्हणते, “मला हो काय माहिती! असेल मेली कुठतरी पडलेली. नेहमी ओठाशी तीच असावी अस काय आहे तिच्यात!”

आतुर बोलायास ती, मुरलि ठेवि लपवून।
शपथ घेत, भिवई हसे, नटत वळे मुरकून॥
असेल मागे लागता, असून अपुली चूक।
असेल मेली कुठें तरी, मला नसे ठाऊक॥४७२॥

* *

४७३ रही लूट है, लाल, हौं लखि वह बाल अनूप।
कितौ मिठास दयौ दई इतैं सलौनैं रूप॥४७३॥

मी तर बाई भाळले

दूती नायिकेची प्रशंसा करीत नायकाला म्हणते, “मी तर बाई त्या यौवनसुंदरीला पुरते भाळले आहे. विधीनं त्या मोहक स्वरूपाला जो गोडवा दिला आहे त्याची माधुरी काही आगळीच आहे”.

मी तर बाई भाळलें पाहुनी अनुपम रूप।

अनुक्रमणिका

रसरसलें लावण्य तें अमृतमधुर स्वरूप॥४७३॥

*   *

४७४ **नहिं पावसु, ऋतुराजु यह; तजि, तरवर, चित-भूल।**
अपतु भएँ बिनु पाइ है क्यौं नव दल, फल, फूल॥४७४॥

पतहीन

सामान्य लोकाकडून एखादे काम सहज करवून घेता येते, पण तेच राजाकडून किंवा तत्सम अधिकाऱ्याकडून करावयाचे असल्यास, फार यत्न व निरादरही सहन करावा लागतो. वृक्षावर अन्योक्ती करीत कवी म्हणतो, "हे तरुवरा, हा काही सामान्य वर्षाऋतू नव्हे, ज्याचे औदार्य भेदातीत असते. तो साऱ्यांनाच भिजवितो-हा आहे ऋतुराज वसंत! हे विसरू नकोस! —याच्यासमोर तुला अपत (निर्लज्य किंवा मानरहित, पर्णहीन) झाल्याशिवाय नवे पल्लव, फूल, फलांचा लाभ होणार नाही".

उदार हा वर्षाऋतू, सर्व जगा अनुकूल।
भिजवी सकला सारखे, पाउस न करी भूल॥
वसंत परि ऋतूराज हा उठवि दयेची हूल।
पतहीना देई सदा नवपल्लव फल फूल॥४७४॥

*   *

४७५ **बन-बाटनु पिक-बटपरा लखि बिरहिनु मत मैं न।**
कुहौ कुहौ कहि कहि उठैं, करि करि राते नैन॥४७५॥

वसंत-ठग

नायक विदेशी जायला निघतो. नायिका व तिच्या सख्या, वसंतकालात परदेशगमन हितावह नाही म्हणून मोडता घालतात. "अहो, या वसंतात वनमार्गातून जाताना पिक ठगाची टोळी विरहीजनांना असावध बघून, लाल डोळे करीत कुंहू कुहू आवाजानं घेरतात आणि आम्रमंजिरीच्या सुगंधानं त्यांना मूर्च्छित करतात. तेव्हा अशावेळी तुमचं परदेशी जाणं योग्य नव्हे".

वाटसरू विरही निघे वसंत वन घनदाट।
'कुंहू कुंहू' करिती पाहुनी पिक ठग घेरति वाट॥
आम्रमंजिरी गंधही मोहवितो सहकार।
मूर्च्छनेतही क्रूर हा मन्मथ करी प्रहार॥४७५॥

*   *

४७६ **दिसि दिसि कुसुमित देखियत उपबन-बिपिन-समाज।**
मनहुँ बियोगिनु कौं कियौ सर-पंजर रितुराज॥४७६॥

अनुक्रमणिका

शरपंजर

नायिका रुसवा धरते. 'वसंतकाली असा मान करू नये' असे सखी तिला सांगते. कारण ऋतूराजाचं शासन फार भयंकर असतं. त्याच्या शासनकालात वियोगिनी होणं हा महान अपराध आहे. कारण या अपराध्यांना दंड देण्याकरता या वनोपवनात कामशरांचा पिंजरा बनविला आहे. तू जर मान केलास तर त्यात फसशील बघ! सखे पहा तरी, उपवनात जिकडे तिकडे फुलं फुललेली दिसतात. दाही दिशा सुगंधानं भरलेल्या आहेत. जणु काय वियोगिनीला दंड शासन देण्यासाठी ऋतुराजानं हा केसरपंजरच बनविलेला दिसतो".

रचित विरागिणि शासना शरपंजर ऋतुराज।
दिशिं दिशिं कुसुमित तरुतती उपवनिं विपिनीं आज॥४७६॥

*　　　　*

४७७ **टटकी धोई धोवती, चटकीली मुख-जोति।**
लसति रसौई कैं बगर, जगरमगर दुति होति॥४७७॥

ज्योतिर्मयी

नववधू घरात आली की एका शुभसमयी तिला स्वयंपाक करायला लावून तिच्या हातचं सर्व परिवारानं भोजन घ्यायचं असा आपल्याकडे प्रघात आहे. त्या दिवशीं ती स्वच्छ न्हाऊन, धूतवस्त्र परिधान करून स्वयंपाकाला बसते. त्या प्रसंगी ती प्रसन्न शोभा बघायला सखी नायकाला आवाहन करते. त्यावेळी दोन्हीही हात गुंतले असल्यामुळे तिला झटकन् घुंघट घेता येणार नाही. या संधीचा फायदा घ्या. यावेळी तिचं सौंदर्य वाखाणण्यासारखं आहे. पांढरं स्वच्छ पातळ ती नेसली आहे आणि अग्नीच्या सान्निध्यात तिची अंगकांती अधिकच उजळून दिसते. तिच्या पाककृत्यामुळं घरात तिचं कांतिवलय चोहीकडे झगमगत आहे."

धौतवसन सखि नेसली, अरुणमयी मुख-ज्योति।
रांति घरांतच झगमगे सुगेहिनी तनु कांति॥४७७॥

*　　　　*

४७८ **सोहति धोती सेत मैं कनक-बरन-तन बाल।**
सारद-बारद-बीजुरी-भा रद कीजति, लाल॥४७८॥

शरद-सौदामिनी

दूती नायिकेची देहद्युति प्रशंसिते, "हे सुभग, शुभ्रवसनात ती सुवर्णतनू इतकी सुंदर दिसते की, शरद सौदामिनीही तिच्यासमोर फिकी पडेल.

कांचन तनु श्वेतांबरी शोभत सुंदर साज।
शारदीय मेघांतली वीज घेतसे लाज॥४७८॥

*　　　　*

अनुक्रमणिका

४७९ **बहु धनु लै, अहसानु कै, पारो देत सराहि।**
बैद-बधू, हँसि भेद सौं, रही नाह-मुँह चाहि॥४७९॥

कोरडापाषाण

कुणी नपुंसक वैद्य, धनाच्या लालसेनं रतिशक्ती वाढविण्यासाठी एका धनिकाला पाऱ्याचं रसायन देतो आहे हे बघून त्याची पत्नी म्हणते, “खरंच का पारा एवढा गुणकारी आहे!” आणि त्याच्याकडे पहात उपहासानं हंसते.

देइ रसायन औषधी धनिकातें कविराज।
तोच भोग तो भोगतो, चले न कांहिं उपाय॥
देइल गुण हे सांगता खचितचि आणिल जोम।
पत्नि हासुनी जाणवी काय आणली गोम॥४७९॥

* *

४८० **रहो, गुही बेनी, लखे गुहिबे के त्यौनार।**
लागे नीर चुचान, जे नीठि सुकाए बार॥४८०॥

ओलेकेस

नायक नायिकेची वेणी घालतो. त्या स्पर्शामुळं त्याचं अंग पुलकित होऊन त्याच्या हाताच्या तळव्याला घाम येतो. त्यामुळं तिचे केस ओले होतात. नायिका ते सात्विक भाव ओळखूनही लटकेपणानं त्याच्या वेणी गुंफण्याची थट्टा करते. “अहो, असू द्या, पुरे झालं तुमचं वेणीबंधन! कळलं तुमचं कसब! मी किती कष्टानं माझे केस सुकविले होते, ते फिरून तुम्ही ओले करून टाकले.”

नका आवळू राहु द्या, सोडा माझे केस।
जुळे न वेणीं गुंफणें फुकाच अभिनीवेश॥
सुटे घाम, कां घालता अपुला जीव इरेस।
ओले होउनि निथळती सुकले माझे केस॥४८०॥

* *

४८१ **मीत, न नीति गलीतु है जौ धरियै धनु जोरि।**
खाए खरचैं जौ जुरै, तौ जोरियै करोरि॥४८१॥

आधी प्रपंच

कुणी उदार मित्र कृपणाला उपदेश करतो, “माती खाऊन धन मिळविण्यात काय अर्थ! अरे प्रपंच पुरेपूर सांभाळल्यानंतर उरलेल्या पैशांचा संचय करणं क्षम्य आहे. पण आपली आबाळ करून धन जोडणं निव्वळ मूर्खपणा आहे.”

अर्ध उपाशी राहुनी युक्त न ती धनजोड।

अनुक्रमणिका

सांभाळुनि संसार तो जुळवा लाख करोड॥४८१॥

*   *

४८२ **दुरैं न निघरघय्यौ दियैं ए रावरी कुचाल।**
विषु सी लागति है बुरी हँसी खिसी की, लाल॥४८२॥

चुकचुक

प्रौढा अधीरा नायिका नायकाला म्हणते, "निगरगट्टपणा करून आपली ही कुरीति छपणार नाही. तुमचं खुसुंखुसुं हसणं मला बिलकुल खपत नाही. ती जशी पालीची चुकचुक वाटते."

निगरगट्ट झाला तरी लपे न लहरी चाल।
जहरी भासत हें हसू कीं चुकचुकली पाल॥४८२॥

*   *

४८३ **छाले परिबे कैं डरनु सकै न हाथ छुवाइ।**
झझकत हियैं गुलाब कैं झँवा झँवैयत पाइ॥४८३॥

तिची पाउले

नायिकेच्या पावलांची सुकुमारता सखी नायकाला सांगते, "पाय खरचटतील म्हणून तिची दासी आपले खरखरीत हात तिच्या पावलांना लावीत नाही. गुलाबाच्या पाकळ्या गुंडाळून आपल्या कुचांनी ती चेपते."

छिलतिल नाजुक पाउलें, लावि न राकट हात।
चेपित पाय उरोज ते झाकुनि कमलफुलांत॥४८३॥

४८४ **तिथ-तरसौंहैं मुनि किए करि सरसौंहैं नेह।**
घर-परसौंहे रहे झर-बरसौंहैं मेह॥४८४॥

मेघझडी

वर्षाकाली मेघ ऋषी मुनी व जितेंद्रियाचीही कामवासना जागृत करतात मग आपण असं दूर राहून कसं चालेल? सखी म्हणते, "वर्षामेघ, तापसी मुनींच्या मनातही स्त्रीविषयी अभिलाषा उत्पन्न करून धरामीलन साधतात."

विचलित करिती मुनिजना, उपजवि हृदयीं स्नेह।
वर्षति धारा मेघ हे, कांचन कामिनि देह॥
नयनीं सुख सौदामिनी, कामिनि मुनीं मनांत॥
मेघधरा मधुमीलना, साधित ही बरसात॥४८४॥

*   *

४८५ **घन-घेरा छुटि गौ, हरषि चली चहूँ दिसि राह।**
कियौ सुचैनौ आइ जगु सरद-सूरनरनाह॥४८५॥

येइल वाटसखा

प्रोषितपतिकेची सखी तिला धीर देत म्हणते, "बरसात संपली, आता शरदाचं आगमन होणार. आता वाटा मोकळ्या झालेल्या आहेत. लोक इकडे तिकडे फिरताहेत. तुझे पतीही लौकरच घरी येतील. त्या काळ्या दरवडेखोरांनी पळ काढला. आकाश अगदी निरभ्र झाले. निर्भयतेनं वाटसरू इकडे तिकडे हिंडत आहेत आणि शरद राजानं आपलं अधिकारपद धारण केलं. त्यानं जगाला सुखी केलं. मग तू तरी कशी दुःखी रहाणार! तेही घराच्या वाटेवरच असतील."

आनंदित हो दिगंत ही, शरदराज ये शूर।
बेडा सोडुनि भीतिनें मेघ पळाले दूर॥
चारी वाटा मोकळ्या येती जाती लोक।
चोर लुटारु ना उरे वाटसरु बिनधोक॥
पडेल आज तिकडले पाउल खास घरांत।
चांदण्यात जाईल ग सुखाची रात॥४८५॥

* *

४८६ **पावस-घन-अँधियार महि रख्यौ भेद नहिं आनु।**
रात घौस जान्यौ परतु लखि चकई चकवानु॥४८६॥

दिनानुगान

बरसातीतील काळ्याकभिन्न मेघांनी आकाश व्यापल्यामुळे सर्वत्र दाट अंधार पसरलेला आहे. रात्र आणि दिवस यातील भेद कळेनासा झाला आहे. फक्त चक्रवाक जोडप्यांच्या आरवण्यामुळंच अनुमान काढता येतं.

गगनीं घनअंधार हा, धुंवाधार बरसात।
चक्रवाकयुग आरवे कळून ये दिन-रात॥४८६॥

* *

४८७ **अरुन सरोरुह-कर-चरन, दग खंजन, मुख-चंद।**
समै आइ सुंदरि सरद काहि न करति अनंद॥४८७॥

शारदीय-सुंदरी

कवी शरदऋतूचं वर्णन करतो, "आरक्त कमलासारखे जिचे अवयव आहेत, खंजन पद्मासारखे जिचे डोळे आहेत, आणि चंद्रासारखं मुख आहे, अशा शरदसुंदरीचं आगमन कुणाला आनंदित करणार नाही?"

अनुक्रमणिका

अरुणकंज करचरणयुगें दृगखंजन मुख चंद्र।
शारदीय सुर-सुंदरी, भरे अमित आनंद॥४८७॥

*　　　*

४८८. नाहिंन ए पावक-प्रबल लुवैं चलैं चहुँ पास।
मानहु बिरह बसंत कैं ग्रीषम लेत उसास॥४८८॥

झळाझोंब

प्रोषितपतिका नायिका आपल्या सखीला म्हणते, "अग चहुबाजुंनी अंगाला झोंबणाऱ्या या ग्रीष्माच्या झळा नव्हेत. वासंतिकेच्या विरहतापानं संतप्त झालेल्या ग्रीष्माचे हे उसासे आहेत."

दिसे न वासंतिका कुठें, ग्रीष्म सोडि निश्वास।
विरहानल धग भोवतीं झळा झोंब अंगास॥४८८॥

*　　　*

४८९ कहलाने एकत बसत अहि, मयूर, मृग बाघ।
जगतु तपोवन सौ कियौ दीरघ-दाघ निदाघ॥४८९॥

ऐकात्मता

ग्रीष्मतापात वनचरांचे वैरभाव संपून ते एकत्रित नांदतात. सर्प, मृग, मयूर, वाघ ही सारी जंगली जनावरे समान संकटामुळं एकत्र आलेली आहेत. "

वसति विकल एकत्र ते, अहि, मयुर, मृग, वाघ।
बने तपोवन जगत हे येतां ग्रीष्म निदाघ॥४८९॥

*　　　*

४९०. पग पग मग अगमन परत चरन-अरुनदुति झूलि।
ठौर ठौर लखियत उठे दुपहरिया से फूलि॥४९०॥

पदन्यास

सखी नायिकेच्या पावलांच्या लालीचं वर्णन करीत नायकाच्या भेटीची उत्सुकता जागवते, "वाटेवर एक एक पाऊल उचलून टाकताना, त्या पावलाची अरुणिमा झुलत झुलत बंधुजीवाची फुलं फुलवीत, आणि त्यांच्याच पायघड्यावरून ती चालत आहेसं वाटतं."

मंद मंद पदमंजिरी रुणुं झुणुं पायल बोल।
पायघडी पसरीत ये अरुण रंग हिंदोल॥
उचलुनि टाकित चालतां एक एक पाऊल।
बंधुजीव फुलवी फुलें ठायिं ठायिं अनुकूल॥४९०॥

अनुक्रमणिका

*   *

४९१. नीच हियैं हुलसे रहैं गहे गेंद के पोत।
ज्यौं ज्यौं माथैं मारियत, त्यौं त्यौं ऊँचे होत॥४९१॥

कंदुकान्योक्ति

"नीच मनुष्य चेंडूसारखा नेहमीच हृदयातून फुगला असतो. जो जो त्याच्या माथ्यावर आघात कराल, तसा तसा तो ऊंच उसळतो व स्वतःला श्रेष्ठ मानतो."

फुगूनिया कंदुकापरी नीच करीत प्रपंच।
माथ्यावरती मारतां अधिकच उसळे उंच॥४९१॥

*   *

४९२ ज्यौं ज्यौं बढति बिभावरी, त्यौं त्यौं बढत अनंत।
ओक ओक सब लोक-सुख, कोक-सोक हेमंत॥४९२॥

हेमंतरात

कवी हेमंत ऋतूचं वर्णन करतो. "हेमंतातील रात्र जसजशी वाढत जाते, तसं तसं लोकांचं सौख्य व चक्रवाक युगुलाचं दुःख वाढत जातं."

(जशी जशी वाढते पुढें हेमंतातिल रात।
घरोघरीं सुखहो उणे, दुःखच वाढत जात॥)
वाढत जाय विभावरी, सुखदुःखेहि अनंत।
लोक सुखी, चकवी असुखी, येतां ऋतु हेमंत॥४९२॥

*   *

४९३ रह्यौ मोहु, मिलनौ रह्यौ, यौं कहि गहैं मरोर।
उक्ष दै सखिहिं उराहनौ इत चितई मो ओर॥४९३॥

उंबराचे फूल

परकीय नायिका वडिलधाऱ्या मंडळीत बसलेली आहे. बरेच दिवसांनी तिचा उपपती तिथे येतो, तिची मैत्रिणही अकस्मात येते. त्याला टोमणा मारण्याच्या उद्देशानं नायिका तिला म्हणते, "ओहो आज कुणीकडे दिवस उगवला! अशी वाकडी वाट केलीस ती! उंबराच्या फुलाचं अकस्मात दर्शन घडलं म्हणायचं!" असं बोलत ती सरोष नायकाकडे बघते.

'किती दिसांनीं उगवलें हें औदुंबर फूल।
लटकी माया दाउनी पाडु नको ग भूल'॥
देत उलाहन पाहते चोरनजर रोखून।
कोपयुता ती लोचने बघति प्रीति जोखून॥४९३॥

अनुक्रमणिका

*   *

४९४ **नहि हरि लौं हियरा धरौ, नहिं हर लौं अरधंग।**
एकत ही करि राखियै, अंग अंग प्रति अंग॥४९४॥

सर्वांगी

दूती नायिकेला नायकाजवळ पोचवून म्हणते, "ह्या सुंदरीला, विष्णुसारखं केवळ हृदयातच ठेऊं नका, किंवा शिवासारखं अर्धांगी आसन देऊ नका. सर्वांगानेच हिच्याशी समरस व्हा!"

हरी परी ठेवी नच हृदयीं हरापरी अर्धांगी।
एकसंग-सुख लूट ही अंग अंग प्रत्यंगी॥४९४॥

*   *

४९५ **कियौ सबै जगु काम-बस, जीते जिते अजेइ।**
कुसुमसरहिं सर धनुष कर अगहनु गहन न देइ॥४९५॥

अगहन मास

मानिनीचा मान उतरविण्यासाठी सखी तिला अगहनमास अतिशय उन्मादकारी असल्याचं सांगते. "हिवाळ्यातला हा शीतल अगहन मास अतिशय त्रासदायी असतो. हा पुष्पधन्व्याला करात शरधनूच धरू देत नाही. स्वतःच अग्रेसर राहून सर्व जगाला जिंकून त्याच्या आधीन करून सोडतो. अजिंक्य जितेंद्रियही याच्यापुढे हतप्रभ ठरतात"

पुष्पायुधहि धरी न धनू जिंकि जितेंद्रिय दास।
करी, बिनीवर कामवश सखये अगहन मास॥४९५॥

*   *

४९६ **छकि रसाल-सौरभ, सने मधुर माधुरी-गंध।**
ठौर ठौर झौंरत झँपत भौंर-झौंर मधु-अंध॥४९६॥

मिलिंद- झेप

वसंतवर्णनानं मानिनीचा मानभंग करीत, सखी म्हणते," अग, ही काय मान घेण्याची वेळ आहे! आम्रमंजिरीचा सुगंध पिऊन आणि माधवी मुकुलातील सौरभ भरलेला मकरंद चाखून धुंद झालेला भ्रमरपुंज ठायी ठायी फेर धरून कलिकावर झेपावतात."

रसालमंजिरि गंध घे, माधविमुकुलमरंद।
पिउनि फिरति मदधुंद ते झुकति झुलत मिलिंद॥४९६॥

*   *

अनुक्रमणिका

४९७ **मिलि बिहरत, बिछुरत मरत, दंपति अति रति-लीन।**
नूतन बिधि हेमंत सबु जगतु जुराफा कीन॥४९७॥

जिराफ

सखी हेमंताचं वर्णन करून मानिनीची समजूत घालते, " अग या हेमंतात प्रणयी युगुले, प्रेमपूर्णभेटीत एकत्र विहार करतात आणि ताटातूट झाली की अतिशय विकल होतात. जिराफासारखी त्यांची स्थिती होते."

मीलनिं अमृत विलास ते विरही मृत हा हंत।
वृत्ति जिराफापरी करी नूतन जग हेमंत॥४९७॥

* *

४९८ **पल सोहैं पगि पीक-रँग, छल सोहैं सब बैन।**
बल सोहैं कत किजियत ए अलसोहैं नैन॥४९८॥

छलरैन

प्रौढा धीरा नायिकेची नायकावर पुष्पवृष्टी. " तुमच्या पापण्या तांबुल-रसानं रंगलेल्या आहेत. तुमच्या बोलण्यातून वेदना उमटत आहेत. डोळ्यात आळस भरलेला दिसतो आहे. मग उगाच का डोळे लढविण्याचा प्रयत्न करता! हे सारे एकमुखानं तुमची रातकथा सांगत आहेत."

पानपीक पापणीस साजे, देहावर छळ रैन।
बळें बळें कां पाहती हे आळसले नैन
उगाच आतां आणखी हवा कशाला त्रास।
थकली गात्रें सांगती रात्रीचा इतिहास॥४९८॥

* *

४९९ **कत लपटइयतु मो गर; सो न, जुही निसि सैन।**
जिहिं चंपक-बरनी किए गुल्लाला-रँग नैन॥४९९॥

'ती मी नव्हे'

खंडिता नायिका नायकाला म्हणते, "अहो, तुमच्या गळ्यात पडणारी मी ती मोगरीची माळ नव्हे की जी काल रात्री आपल्या शय्येवर चुरगळली आणि ज्या चाफेकळीनं जागरणांत आपले नयन रंगविले ती चाफेकळी पण मी नव्हे. आता मला कशाला उगाच मिठी मारता?"
सोनजुई मी ती नव्हे,नसे मोगरी माळ।
चंपककांति ही न ती, नसे गुलाबी गाल॥
लोचनिं गुलाल, ही मिठी नकोच या कंठात।
सरोजिनी सुख शेज ती जिथे कंठिली रात॥४९९॥

अनुक्रमणिका

*   *

५०० **नैंक उतै उठि बैठियै, कहा रहे गहि गेहु।**
छुटी जाति वह-दी छिनकु महदी सूकन देहु॥५००॥

ओली मेंदी

स्वाधीनपतिकेची सखी नायकाला म्हणते, " नायिकेच्या नखांना मेंदी लावली आहे. तुम्ही आत राहू नका, जरा बाहेर जा पाहू ! तुम्हाला पाहिलं की तिच्या अंगावरील रोमांचानं घर्मबिंदु उभे राहतात आणि मेंदी सुकायची ती लवकर सुकत नाही.ती तशी ओलीच रहाते."

तुम्हा पाहतां पुलकित होई, अंगी सुटतो स्वेद।
सुकेल मेंदी कशी, ओळखा जरा आतला भेद॥
जा हो जा बाहेर, सोडुनी माजघरांतिल खोली।
घर्मबिंदुनी तिच्या नखांची मेंदी अजुनी ओली॥५००॥

*   *

५०१ **लुटवा लौं प्रभु-कर-गहैं निगुनी गुन लपटाइ।**
वहै गुनी-कर तैं छुटैं निगुनीयै है जाइ॥५०१॥

गुणपतंग

ईश्वरी कृपेने गुणहीन देखील गुणवंत होतो. पण त्याची इच्छा फिरली की गुणवंताचा गुणहीन होतो. ईश्वर ही चकरीधारी आणि मानव त्याच्या हातांतील चकरी. पतंगाच्या चकरीसारखाच चक्रधराच्या इच्छेप्रमाणे मनुष्य गुणी वा निर्गुणी ठरतो.

चक्र धरी तो प्रभूकरी, निर्गुणीहि गुणवान।
सुटतां गुणी करातुनी, नच कीं निगुण मान॥५०१॥

*   *

५०२ **है हिय रहति हई छई, नई जुगति जग जोइ।**
दीठिहिं दीठि लगै, दई, देह दबरी होइ॥५०२॥

दृष्टलागतां

पूर्वानुरागिणी नायिका आपल्या सखीला सांगते, "जगात ही नवलाईची रीत पाहिली की मोठं आश्चर्य वाटतं. दृष्टि दृष्टीला भिडते आणि देह मात्र दुबळा होतो. "

स्तिमित चित्त, बघतां जगी, रीत नवी नवलाइ॥
दिठी दिठ ती लागता, देहच दुबळा होइ॥५०२॥

*   *

अनुक्रमणिका

५०३ **जज्यौं उझकि काँपति बदनु, झुकति बिहँसि,सतराइ।**
तत्यौं गुलाल-मुठी झुठी झझकावत प्यौ जाइ॥५०३॥

लुटुपुटची मूठ

होळीच्या गुलालरंग खेळांत, नायक गुलालमूठ उगारून नायिकेवर फेकण्याचा आविर्भाव करतो. नायिका गुलाल डोळ्यांत जाईल या भीतीनं दचकून चटकन मुखावर ओढणी घेऊन खाली झुकते, आणि मिस्किल हसते. हे तिचे लीलायुक्त हावभाव नायकाला फार मोहक वाटतात. तो फिरफिरून मूठ उगारून ही अभिनयलीला पाहण्यासाठी भीती घालतो पण गुलाल फेकीत नाही. सखी सखीला म्हणते“अग बघ तरी, कशी सुंदर प्रणयलीला चालली आहे ती. जशी जशी ती, आपलं तोंड झाकते, आणि खदखदून हंसते, तस तसा तो तिला मूठ उगारून भीती दाखवितो.”

घेत ओढणी आडवे धरुनी तळवे लाल।
लपवित मुख ती लाजरी, खुदकन् हसती गाल॥
लटकी मूठ उगारुनी खेळत रंग गुलाल।
प्रणयखेळ हा रंगवी राधा सखि ब्रिजलाल॥५०३॥

* *

५०४ **छिनकु, छबीले लाल, वह नहिं जौ लगि बतराति।**
ऊख, महूष, पियूष की तौ लगि भूख न जाति॥५०४॥

बोलमाधुरी

मुग्धा नायिकेची सखी, तिच्या मंजुळ बोलांची प्रशंसा करीत नायकाला ओढ लावते, “अहो जोवर ती तुमच्याशी बोलत नाही तोवरच मधाचा व अमृताचा दिमाख! एकदा कां तिचं बोलणं ऐकलंत, की या सर्वांची माधुरी तुम्हाला फिकी वाटेल.”

ऐकले न जोवरीं तिचे मंजु मधुर मुख बोल।
चाखतांच ती माधुरी सुधा, मधहि हो फोल॥५०४॥

* *

५०५ **अँगुरिनु उचि, भरु भीति दै, उलमि चितै चख लोल।**
रुचि सौं दुहूँ दुहूँनु के चूमे चारु कपोल॥५०५॥

उडते चुंबन

उपपति नायक व परकीया नायिका यांच्या घरामध्ये फक्त एक भिंतच आडवी आहे. एक दिवस संधी साधून ती दोघेही भिंतीजवळ आली. आणि पावलांच्या चवड्यावर उंचावून हातांनी भिंतीवर भार देत, थोडं पुढं झुकून व चंचल नयनानं इकडे तिकडे पहात दोघांनी परस्परांचं ओष्ट चुंबन घेतलं व हळूच गाल कुरवाळले.

उंचावुनिया पाउले, भिंतीवर घे झोल।
इकडे तिकडे पाहुनी कुरवाळिती कपोल॥
पाहतील कुणि भीत ही, करिती कायालोट।
झुकुनी थोडे धीट ते हळू चुंबिती ओठ॥५०५॥

*　　　*

५०६ **नागरि, बिबिध बिलास तजि, बसी गवेंलिनु माँहि।**
मूढनि मैं गनबी कि तूँ, हूठ्यौ दै इठलाँहि॥५०६॥

पत्रावळीसारखा द्रोण

खेडवळात रहाणाऱ्या नगरवासियांना, त्यांच्यासारखेच रहावे वागावे लागते. शहरी शहाणपण दाखविल्यास ते हास्यास्पद होते.

सोडि विविध विलास ते नागरीक व्यवहार।
मूढ, न गणती गुणिजना, हसती गांवगवार॥५०६॥

*　　　*

५०७ **बिथुऱ्यौ जावकु सौति-पग निरखि हँसि गहि गाँसु।**
सलज हँसौहीं लखि लियौ आधी हँसी उसाँसु॥५०७॥

अर्धहसू

नायिकेने आपल्या सवतीच्या पायांना विस्कळित लागलेला महावररंग (आळता) लागलेला पाहिला. ते पाहून तिच्या धांदरटपणाला ती हसली. पण सवतीचे लाजरे मुरकणे पाहून या विखुरलेल्या रंगाचे रहस्य तिला कळले. त्यामुळं ती दुःखित झाली व ओठावर आलेले हसूं आसवात परिणत झाले.

सवत पावलीं विखुरला दिसे महावर रंग।
अधरिं अडे अर्धेच हंसे, उसासतो उरभंग॥५०७॥

*　　　*

५०८ **मोसौं मिलवति चातुरी, तूँ नहिं भानति भेउ।**
कहे देत यह प्रगट हीं प्रगट्यौ पूस पसेउ॥५०८॥

'पुरे अं मखलाशी'

नायकाला पाहून नायिका पुलकित झाली. पण ते लपविण्यासाठी सखीचं लक्ष दुसऱ्याच गोष्टीकडे वेधते. ती तिची मखलाशी ओळखून सखी म्हणते, " या पौष महिन्यात तुझ्या अंगाला घाम फुटला, यावरूनच कळलं की तू मला बनविण्याचा प्रयत्न करतेस. पण ही चातुरी माझ्याशी कशाला? मला कळलं म्हटलं!"

अनुक्रमणिका

अंगावर रोमांच हे, पौषातिल हा स्वेद।
पुरे बाइ ग चातुरी, कळून आला भेद॥५०८॥
* *

५०९ **सौंहें हूँ हऱ्यौ न तै, केती दयाई सौंह।**
एहो, क्यौं बैठी किए ऐंठी ग्वैंठी भौंह॥५०९॥

सुटून गेला बाण

कलहान्तरिता नायिकेच्या अजूनही चढलेल्या भिवया पाहून सखी म्हणते, " अग आता कुणावर रागवतेस! तो बिचारा गेलाय निघून! तुझा राग जावा म्हणून आम्ही व त्यानीही किती शपथा घातल्या! पण तुला कणव आली नाही. तुझा हट्ट आपला कायमच! अखेर तो निराशेनं निघून गेला. आता रागवून काय उपाय! ही खरी पश्चात्तापाची वेळ आहे."

तया न बघसी ढुंकुनी, किती घातली आण।
चढवितेस भिवई अतां, सुटून गेला बाण॥५०९॥
* *

५१० **ही औरै सी है गई टरी औधि कैं नाम।**
दूजैं कै डारी खरी बौरी बौरैं आम॥५१०॥

वायदा सरला

सखी सखीला सांगते "प्रियकर परत येण्याची वेळ टळली. दिलेला वायदा संपला. त्यामुळं ती प्रोषितपतिका अत्यंत विकल झालेली आहे. त्यातून वसंतागमामुळं उमटलेलं आम्रमंजिरीचं सुगंधित हसूं तिला बोचतं. मोहर पाहून ती बावरते."

अवधि टळे प्रिय भेटिचा हुरहुरते सुकुमार।
अधिकच होई बावरी बहरताच सहकार॥५१०॥
* *

५११ **सही रँगीलैं रति-जगैं जगी पगी सुख चैन।**
अलसौंहें सौंहें कियैं कहैं हँसौंहें नैन॥५११॥

शेजारतीचा जागर

नायिकेला रात्रीच्या सुरतरंगाचं जागरण झालेलं आहे. तिचे डोळे आळसले आहेत. ती सखीला उत्सवाचं जागरण झाल्याचं सांगते. पण तिचे डोळे हसतात. ते लक्षित करून सखी म्हणते, "अग हे तुझे डोळेच सांगतात. देवळातल्या उत्सवापेक्षा शेजारतीच्या सुखोत्सवाचा हा जागर आहे म्हणून."

शेजारति हो मंदिरी सरली उत्सवरात।

कळे जागरण लाजरे आळसल्या नयनांत॥
डोळे चुरचुर बोलती कुठे रंगली रात।
पळ न लागली पापणी, नीज कुठें नशिबांत॥५११॥

* *

५१२ **कहा कुसुमु, कह कौमुदी, कितक आरसी जोति।**
जाकि उजराई लखैं आँखि ऊजरी होति॥५१२॥

उसळे नयनि झळाळ

नायक नायिकेच्या गौरांगावर मोहित होऊन स्वगत म्हणतो, "तिच्या अंगकांतीमुळं तिला बघणाऱ्या डोळ्यांनाच नवतेज व चैतन्य लाभतं. तिच्यापुढं फुलं काय, चांदणं काय, किंवा दर्पण काय, साऱ्यांचीच चमक फिकी पडते."

कुसुम, कौमुदी आरसा, भासे तेज मवाळ।
अंगकांति अभिराम ती उसळे नयनिं झळाळ॥५१२॥

* *

५१३ **पहिरत हीं गौरैं गरैं यौं दौरी दुति, लाल।**
मनौ परसि पुलकित भई बौलसिरी की माल॥५१३॥

मुकुलश्री

नायकानं नायिकेला बकुल फुलांची माळ पाठविली. ती कंठात घालताच तिचं सर्वांग पुलकित झालं. प्रेम भावनेनं तिची गौरतनूच मुकुलश्रीची माळ बनली. सखी नायकाला सांगते, "तुम्ही धाडलेली बकुल फुलांची माळ गळ्यात घालताच ती सर्वांगीण फुलीफुलली आणि तिच्या गौरतनूची सुंदर बकुळीची माळ बनली. ती ज्याच्या गळ्यात पडेल तो कंठ भाग्यवान म्हणायचा!"

प्रेमभेट तिज पाठवी तो बकुळीचा हार।
घालित कंठीं प्रेमळा, गौरतनू सुकुमार॥
बकुल फुलें ती कोवळीं, उमल खुलवि सुख सार।
पुलक फुलुनि सर्वांग हो, मुकुलश्री रतनार॥५१३॥

* *

५१४ **रस-भिजए दोऊ दहुनु, तउ टिकि रहे, टरैं न ।**
छबि सौं छिरकत प्रेम-रँगु भरि पिचकारी नैन ॥५१४॥

रंगयुगुल

नायक नायिका परस्परांना पहात नेत्रपल्लवीनं आपलं प्रेम सूचित करतात. होळीच्या रंगखेळावर रूपक करीत सखी म्हणते, "दोघांनीही नयन पिचकाऱ्यांच्या कनुधारांनी,

अनुक्रमणिका

प्रीतिरसानं परस्परांना भिजविलं. सारखा पिचकाऱ्यांचा मारा चालू होता. दोघेही हटले नाहीत.”

बघति एक टक हटति न दोघे भिजवि अंग अनुभाव।
भरुनि नैन पिचकारी मारित रंगछटा शिडकाव ॥५१४॥

* *

५१५ **कारे-बरन डरावने कत आवत इहिं गेह।**
कै वा लखी, सखी, लखैं लगे थरथरी देह॥५१५॥

काळा कुवीत

नायिका आपल्या मैत्रिणीत बसलेली आहे. तेवढ्यात श्रीकृष्ण काही निमित्तानं तिथे येतो. त्याला पहाताच ती रोमांचित होते. आपलं प्रीतिगुपित लपविण्याच्या उद्देशानं आपल्या देहकंपाचं कारण ती सखीला हळूच सांगते. “हा भयंकर काळाकुवीत माणूस बघताच माझ्या जीवाचा कसा थरकाप होतो. तो कशाला आमच्या घरी येतो कुणास ठाऊक!”

सदा घरीं हा येइ कां काळा कपटकुवीत।
दिसे भयंकर बाइ ग, कांपत मी भयभीत॥५१५॥

* *

५१६ **कर के मीडे कुसुम लौं गई बिरह कुम्हिलाइ।**
सदा-समीपिनि सखिनु हूँ नीठि पिछानी जाइ॥५१६॥

कुस्करलेली कळी

सखी नायकाला नायिकेची व्याधी सांगून तिच्याकडे जाण्यास प्रवृत्त करते. “हातानं चुरडून टाकलेल्या फुलासारखी तिची गत आहे. ती विरहानं इतकी कोमेजली आहे की, सदा जवळ असणाऱ्या मैत्रिणींनाही ती ओळखायला येत नाही. कष्टानं तिची ओळख पटते.”

करि चुरल्या कुसुमापरी, कोमजली विरहांत।
ओळखती न सखी तिला समीप असुनि घरांत॥५१६॥

* *

५१७ **चितवत, जितवत हित हियैं, कियैं तिरीछे नैन।**
भीजैं तन दोऊँ कँपैं, क्यौं हूँ जप निबरैं न ॥५१७॥

अनुक्रमणिका

बकध्यान

नायक व नायिका एका पर्वकाली नदीवर स्नान करायला गेले. स्नान केल्यानंकर दोघेही पाण्यात उभे राहून डोळे मिटून ध्यान करतात. पण वाकड्या किलकिल्या डोळ्यांनी परस्परांना पहात प्रेम प्रगट करतात. कितीवेळ तरी त्यांची ही प्रार्थना चालू असते. थंडीनं थरथरतात. पण आराधना सुटत नाही.

ओलेता जप चालवी, कांपत नदी जलांत।
तरंग उठती छेदिती प्रतिबिंबें वलयांत॥
दृष्टि निमीलित पापणी—परस्परास पहात।
किती काळ दोघेहि ते प्रीती जपत मनांत॥५१७॥

* *

५१८ **कियौ जु, चिबुक उठाइ कै, कंपित कर भरतार।**
टेढियै टेढी फिरति टेढैं तिलक लिलार॥५१८॥

वाकडे कुंकू

नायकानं एका हातानं तिची हनुवटी धरून दुसऱ्या हातानं तिच्या कपाळी कुंकू लावलं. प्रेमोर्मिनं हात कंपित झाल्यामुळं कुंकू वाकडं लागलं. पण तेच ती मोठ्या अभिमानानं मिरविते.

भालीं कुंकुम रेखितां हनुवटि उचली नाथ।
सहज लागते वाकडे, थरथरतांना हात॥
वाकडीच दृष्टी तशी, करुनि वाकडी मान।
दावित मिरवी मानिनी, प्रीतीचा अभिमान॥५१८॥

* *

५१९ **भौ यह ऐसोई समौ, जहाँ सुखद दुखु देत।**
चैत-चाँद की चाँदनी डारति किए अचेत॥५१९॥

चैत्रचांदणं

प्रोषितपतिका आपल्या सखीला म्हणते. ‘‘ही वेळच अशी आली आहे गडे, की यावेळी सुख देखील दुखवतं. चैत्राचं चांदणं, या विरहात मला अचेतन करून टाकतं.’’

अशीच येई वेळ ही दुखवी सुख हितकाज।
चैत्राचें हें चांदणें करी अचेतन आज ॥५१९॥

* *

५२० **कत कहियत दुखु देन कौं रचि रचि बचन अलीक।**
सबै कहाउ रह्यौ लखैं, लाल, महावर-लीक॥५२०॥

अनुक्रमणिका

नको बहाणा

रात्रभर अन्य स्त्रीकडे राहून नायक सकाळी परतला आहे. आणि तो रात्री न येण्याचं खोटं कारण तिला सांगतो. एवढ्यात भालावर लागलेला महावररंग ती बघते. ती त्याला म्हणते, "मला चिडवायला आणखी खोटं कशाला सांगता! तुमचं सारं रहस्य त्या महावररंगरेखेनं मला अगोदरच सांगितले आहे."

नको बहाणा तो मुळीं निलाजरा उल्लेख।
कळवी मजला नेमकें भालि महावर लेख॥५२०॥

*　　　　*

५२१ **लोपे कोपे इंद्र लौं रोपे प्रलय अकाल।**
गिरिधारी राखे सबै गो, गोपी, गोपाल॥५२१॥

इंद्र गर्व परिहार

भाविक भक्ताची इंद्र स्तुती; "अकारणच प्रलयकोप करणाऱ्या देवेंद्राचा अभिमान, गोवर्धन उचलून गाई, गोपीजनांचं संरक्षण करून, उतरविला तो भक्ताचं रक्षण कसं करणार नाही. !"

लोपवि कोपित इंद्र तो करितां प्रलय अकाल।
रक्षी गिरिधर सकळिका, गाइ, गोपि गोपाळ॥५२१॥

*　　　　*

५२२ **ढोरी लाई सुनन की, कहि गोरी मुसकात।**
थोरी थोरी सकुच सा भोरी भोरी बात॥५२२॥

श्रवण मंजुळा

नायकानं नायिकेला हसत निर्व्याज बोलताना ऐकलं. त्याला एवढा आनंद झाला की तिचं बोलण वारंवार ऐकण्यासाठी तो आतुर झाला. ही आपली उत्सुकता तो तिच्या सखीला सांगतो, " त्या सुवर्णदेहिनीनं , हळूच मंदस्मित करीत बोलून माझ्या श्रवणांना मधाचं बोट लावलं. माझी वृत्ती ते ऐकायला चटावली."

श्रवण मंजुळा गोरटी भोळि भाबडी पोर।
लावि चटक मधुबोल ते, संकोचित चितचोर॥५२२॥

*　　　　*

५२३ **आज कछू औरै भए, छए, नए ठिकठैन।**
चित के हित के चुगल ए नित के होहिं न नैन॥५२३॥

अनुक्रमणिका

नट खट नैन

लक्षिता नायिकेच्या डोळ्यांतील आगळी चमक बघून, तिच्या प्रेमभावनेला सखी वाचा फोडते. "तुझ्या हृदयाचे हे दोन चुगलखोर हेर आज नव्याच थाटामाटात आहेत. काही काळबेरं असल्याशिवाय असे चमकणार नाहीत!"

चहाड डोळे हे तुझे तव हृदयाचे हेर।
चमक निराळी आज ती, नटति आंत बाहेर॥५२३॥

*   *

५२४ **छुटै न लाज, न लालचौ प्यौ लखि नैहर-गेह।**
सटपटात लोचन खरे भरे सकोच सनेह॥५२४॥

हवेच, तेहि नकोच

नायिका आपल्या माहेरी आहे. नायकही तिथे आला आहे. त्याला पहाण्याची लालसा व आप्तजनांचा संकोच, यांचं द्वंद्व तिच्या मनात चालू आहे. अभिलाषा तिच्या नजरेला नायकाकडे ओढते आणि संकोच खाली ओढतो. अशी तिच्या जिवाची चाललेली ओढाताण सखी सांगते. "प्रियकराला माहेरी आलेला पाहून लालसा तिकडे ओढ घेते, तर संकोच पापणी मिटवतो. या मानसद्वंद्वात तिच्या डोळ्यांची उघडझांप किती मनोहर वाटते!"

माहेरी नव परिणिता, आप्तजनांसमवेत।
आज अचानक भेटिला तिथेच जिवलग येत।
लगबग ती दृग लालसी, लाजत मनिं संकोच।
बघे न बघते अस्थिरा, हवेंच तेहि नकोच ॥५२४॥

*   *

५२५ **ह्याँ तैं ह्याँ, हाँ तैं इहाँ, नेकौ धरति न धीर।**
निसि दिन डाढी सी फिरति बाढी गाढी पीर॥५२५॥

असहाय

पूर्वानुरागिणी नायिकेची उद्वेगदशा सखी नायकाला सांगते. "तिचा धीर सुटला. ती अति विव्हल झाली आहे. रातंदिन विरहानं आंगाची काहली होत असता ती सारखी इकडून तिकडे तळमळत फिरते आहे."

तळमळते ती इथुनी तिथे, फिरते, सुटला धीर।
विरहदाह करिली काह, उरांत जळतां तीर॥५२५॥

*   *

५२६ **बिरह-बिकल, बिनु ही लिखी पाती दई पठाइ।**
आँक-बिहूनीयौ सुचित सूनैं बाँचत जाइ॥५२६॥

अनुक्रमणिका

विनाक्षरी

प्रोषितपतिका नायिका व विरही नायक यांच्या विकलस्थितीतील पत्रसंदेश, दूतिका स्वगत बोलते, "ती विरहविकला पत्र लिहायला बसली. पण विकलतेमुळे ती लिहूच शकली नाही. तेव्हा न लिहलेलं पत्रच तिनं पाठवलं आणि ही विनाक्षरी पत्रिका एकांतात नायकानं तन्मयतेनं वाचली."

नच लिहिताही पाठवी, पत्र विकल विरहांत।
ओवित ओळी आसवें, आशय जो हृदयांत॥
आतुरतेनें घेतसे, तो थरथरता हात।
वाचित पत्र विनाक्षरी तन्मय एकांतांत॥५२६॥

* *

५२७ **समरस-समर-सकोच-बस-बीबस न ठिक ठहराइ।**
फिर फिरी उझकति, फिरि दुरति, दुरि दुरि उझकति आइ॥५२७॥

स्मरसंकोच

परकीया नायिका, आपल्या खिडकीतून नायकाला पाहून काममोहित झाली. पण संकोचानं त्याच्याकडे एकटक पहाण्याचा तिला धीर होत नाही. ती हळूच डोकावून बघते. त्यानं पाहिलं की पटकन लपून बसते. आणि पुन्हा पुन्हा हळूच खिडकीशी येत त्याला चोरून बघते. "

स्मरसंकोचें विवशती अविचल निरखि गवाक्ष।
लपत छपत फिरफिरुनि ये चोरुनि टाकि कटाक्ष॥५२७॥

* *

५२८ **फिरत जु अटकत कटनि-बिनु, रसिक, सु रस न खियाल।**
अनत अनत नित नित हितनु चित सकुचत कत, लाल॥५२८॥

मधुपा

नायिका नायकाला अन्य रमणीसह हसता बोलताना बघते त्यामुळं ती रुष्ट झाली आहे. त्यावर नायकानं तिची समजूत घालीत म्हटलं की मी तिच्याशी अगदी सहज बोलत होतो. खोटं कारण सांगताना अपराधकल्पनेनं त्याचा आवाज थोडासा पडला आणि तो संकोचला. हे पाहून नायिका म्हणते, "अहो, रसिक प्रेमाच्या गुंतावळ्यात न अडकता तुम्ही स्वैर हिंडता, प्रेम नसंल तरी प्रणयलीला आहेतच असंच नं! हे जर खरं तर मग एवढा संकोच कां?"

मधुप फुलावर गुंजसी, रसिक तुझा तो खेळ।
मग मानसि संकोच कां, मिळतां रमणी मेळ॥५२८॥

* *

५२९ **अरैं परै न, करै हियौ खरैं जरै परजार।**
लावति धोरि गुलाब सौं, मलैं मिलै धनसार॥५२९॥

चंदन चटके

विरहिणी नायिकेचा विरहताप शमवायला सखी कापूर, चंदन, गुलाबपाण्यांत घोळून तिच्या अंगाला लावते. ते जास्तच चटके देते. ती सखीला नको म्हणते.

गुलाब जळिं घोळुनी लाविसी कापुर चंदन लेप।
चंदन चटके देइ ग विरही दाह विलेप॥५२९॥

* *

५३० **दोऊ चोर महीचनी खेलु न खेलि अघात।**
दुरत हियैं लपटाइ कै, छुवत हियैं लपटात॥५३०॥

चोर लपंडाव

नायक नायिका चोरलपंडावाचा खेळ खेळतात. पण त्यांची तृप्ती होत नाही. कारण त्यात परस्पर चोरमिठीला भरपूर वाव असतो. दोघेही डोळे झांकून परस्परांच्या मिठीत लपतात अन् पुन्हा सुटतात. पुन्हा डोळेझांक. शिवताना मिठी नि लपताना मिठी. या दुहेरी मिठ्यांच्या खेळाची मिठी सुटत नाही.

दोघे मिळूनी खेळती लपाछपीचा खेळ।
उरीं भेटती छपोनियां, लपता पुरे न वेळ॥
सुटतां शिवती परस्परां, ओढीत परिरंभांत।
मिठींत लपती पुन्हां पुन्हां, हृदय छपवि हृदयांत॥५३०॥

* *

५३१ **मिसि हीं मिसि आतप दुसह दई और बहराइ।**
चले ललन मनभावतिहिं तन की छाँह छिपाइ॥५३१॥

तनु छत्र छाया

जेष्ठा व कनिष्ठा नायिकेबरोबर नायकाचं वर्तन सखी सांगते. भर तळपत्या उन्हात बाहेर कुंजवनात जाणं शक्य नाही असं सांगून व त्यांना वाटेला लावून आपल्या मनमोहिनीला मात्र आपल्या देहाच्या सावलीत लपवीत कुंजवनांत घेऊन जातो.

भर उन्हात या जायचें पोळतील ना पाय।
कोमेजुनी जाईल ही, पळांत नाजुक काय॥
करित बहाणा तो निघे, हळूचं कुंजवनांत।
झांकुनि घे मनमोहिनी तनु छायेत उन्हांत॥५३१॥

* *

अनुक्रमणिका

५३२ **लहलहाति तन तरु नई लचि लग लौं लफि जाइ।**
लगैं लाँक लोइन-भरी लोइनु लेत लगाइ ॥५३२॥

लोचन लावे

नायिकेच्या लावण्यावर मोहित झालेला नायक म्हणतो, " ती आपले ललित लावण्यमय कटिजाल लचकून फेकीत या माझ्या लोचन लाव्यांना गुंतवून फसवते." तिची नूतन तनू लावण्यानं लसलसते आहे. आणि ती कमनीय कटी दृष्टी लागताच लवचिक वेतासारखी लचकून वाकते आणि माझे डोळे झेलून पकडून ठेवते. "

लसलसतें लावण्य तें मोहर जागोजाग।
लवचिक कटि ती लवलवे झुकवी लोचन लाग॥
सळसळती ती नागिणी, सुटे न विटप लपेट।
धनकांतारी एकटी एकांतीं उरभेट॥५३२॥

* *

५३३ **रही अचल सी है, मनौ लिखि चित्र की आहि।**
तजैं लाज, डरु लोक कौ, कहौ, बिलोकति काहि॥५३३॥

कोरीव लेणें

उपपति नायकाने परकियेवरील आपले प्रेम लपवून ठेवले होते. तिला नायकाकडे अचल बघताना पाहुन सखी नायकाला छेडित म्हणते, "बघा, ती अचल दृष्टीने तुमच्याकडे पहात आहे आणि सर्वांगाला जडत्व आल्याप्रमाणे एखाद्या पाषाणमूर्तीसारखी उभी आहे. तुमच्यावर तर ती अनुरक्त नाही. मग अशी ही बघते तरी कोणाकडे?"

कुणाकडे ते पाहती, लालस लोचन चोर।
लोक लाज भय सोडुनी, शोधित चित्त चकोर॥
उभी अचल चित्रापरी, नटरंगी ती पोर।
कोरिव लेणें तें जसें दिसते दृष्टिसमोर॥५३३॥

* *

५३४ **पल न चलैं, जकि सी रही, थकि सी रही उसास।**
अबहीं तनु रितयौं; कहौ, मनु पठ्यौ किहिं पास॥५३४॥

मन हरवलं

परकीयेने आपलं उपपतिवरील प्रेम लपवून ठेवलं. पण सखीनं ते ओळखलं होतं. आता त्याच्या समोर येताच त्यांचं गुप्त प्रेम उघड करीत, ती उपहासानं म्हणते, "त्याला बघताचं, तुझ्या पापण्या अशा कशा स्थिर होतात ग! अगदी भान विसरतेस, श्वास मंद चालतो, लांब उसासे सोडतेस! जणूं काय देहात मन नाहीच, कुठंतरी उडून बसलं!"

अनुक्रमणिका

विस्मित हले न पापणी थकुनि सोडि निश्वास।
तनु ठेउनिया मागुती, मन धाडिसी कुणास ॥५३४॥
* *

५३५ **मैं लै दयौ, लयौ सु, कर छुवत छिनकि गौ नीरु।**
लाल, तिहारौ अरगजा उर है लग्यौ अबीरु॥५३५॥

अर्गजा

पूर्वानुरागिणी नायिकेकडे प्रेमोपहार म्हणून अर्गजा पाठविला होता. त्यामुळं ती उद्दीपित झाली. तिचं शरीर अतिशय तापलं. सखी म्हणते, "अर्गजा मी तुमच्याकडून तिला नेऊन दिला, पण तो त्या स्वरूपात तिच्या उरापर्यंत पोचलाच नाही. तिनं हातात घेताच तो जळून त्याचा अबीर बनला."

देतां तिज, कर स्पर्शतां, उकळत जळलें नीर।
उरीं लावितां अर्गजा जळूनी होत अबीर॥५३५॥
* *

५३६ **चलौ, चलैं छुटि जाइगौ हटु रावरैं सँकोच।**
खरे चढाए हे, ति अब आए लोचन लोच॥५३६॥

आग शमन

कलहान्तरिता नायिकेची सखी नायकाला म्हणते, "तुम्ही आलात तर तिचा उरलासुरला रागही निघून जाईल. आता डोळे निवळून त्यांत अनुरागाची छटा दिसू लागली आहे."

चला, तिला समजावितां निघुन जाइल राग।
बरेच डोळे निवळले, शांत जाहली आग॥५३६॥
* *

५३७ **कहे जु बचन बियोगिनी बिरह-बिकल बिललाइ।**
किए न को अँसुवा-सहित सुवा ति बोल सुनाइ॥५३७॥

शुक बोल

नायिकेचा सरता बोल शुकानं ऐकला. तिच्या मरणानंतर तिचे ते बोल पोपटपंचीनं लोकांना ऐकविताच त्यांचेही डोळे ओले झाले.

विरह विकल विलाप ते सखीचा सरता बोल।
ऐकवितां शुक, लोचनीं अश्रु येति अनमोल॥५३७॥
* *

अनुक्रमणिका

५३८ **छिप्यौ छबीलौ मुँहु लसै नीलैं अँचर-चीर।**
मनौ कलानिधि झलमलै कालिंदी कै नीर॥५३८॥

हलतें प्रतिबिंब

सखी नायिकेचं सौंदर्य वर्णन करून नायकाला प्रलोभित करते. “तिच्या निळ्या वसनात तिचा गौर मुखचंद्र, कालिंदीच्या नील जलात चंद्राचं पूर्ण बिंब हलत आहेसं वाटतं. ”

छबी छबीली सुंदरा, लपवी अंचल नील।
कालिंदी जलिं कलानिधी करि गमते झिलमील॥५३८॥

* *

५३९ **मानु तमासौ करि रही बिबस बारुनी सेइ।**
झुकति, हँसति; हँसि हँसि झुकति, झुकि झुकि हँसि हँसि देइ॥५३९॥

मदिराक्षी

नायिका वारुणी पिऊन धुंद झाली आहे. आणि त्यातून तिनं रुसवा धरला. त्यामुळं चिडताना ती हसते, तर हसताना चिडते. तिचा रुसवा म्हणजे इतरांना गंमत झाली आहे नुसती.

करी तमाशा मानिनी पिउनी वारुणी धुंद।
चिडत हसत बरळते, हासते रडत चिडत बेबंद॥५३९॥

* *

५४० **सदन सदन के फिरन की सद न छुटै, हरिराइ।**
रुचै, तितै बिहरत फिरौ; कत बिहरत उरु आइ॥५४०॥

भृंग धर्मीय

प्रौढा, धीरा, खंडिता नायिका, सापराध नायकाला म्हणते, “घरोघर खिरापत वाटत फिरण्याची आपली संवय सुटत नाही. ठीक आहे! आपल्याच मनासारखं करा! पण इथं येऊन मला कशाला जाळता? ”

सवय सदाची घरोघरीं, फिरुनि वाटतां वाण।
करा मनापरी आपल्या नसे स्त्रियांची वाण॥५४०॥

* *

५४१ **प्रलय-करन बरषन लगे जुरि जलधर इकसाथ।**
सुरपति-गरबु हर्‍यौ हरषि गिरिधर गिरि धरि हाथ॥५४१॥

अनुक्रमणिका

प्रलय मेघ

कृष्ण भक्तांचे आपल्या दैवताचे वीरत्व दर्शन. "गोकुळ बुडवून टाकण्यासाठी इंद्राने प्रलयमेघांना आज्ञा दिली. श्रीकृष्णानं गोवर्धन उचलून गोकुळातील प्राणीमात्राचं रक्षण केलं व इंद्राचा गर्व परिहार केला."

व्रज बुडवाया वर्षाती प्रलय मेघ घनघोर।
वज्रपतीचा गर्व तो हरि गिरिधर धृति थोर॥५४१॥

* *

५४२ **करे चाह सौं चुटकि कै खरैं उडौं हैं मैन।**
लाज नवाऐं तरफरत, करत खूँद सी नैन॥५४२॥

नयन-तुरंग

मध्या नायिकेचे नेत्र प्रियकराला बघण्यासाठी लालसेनं वर उचलतात व लाजेनं खाली झुकतात. ही पापण्यांची वरखाल अश्वरूपकात सखी सांगते. "लालसेची टाच मारून मदनानं पलाण घ्यायला उतावीळ केलेले नयन-तुरंग लज्जेचा लगाम खेचताच जागच्या जागीच थयथयतात. टापा घाशीत रहातात. "

उडुं पाहति दृग-तुरंग ते, झुकत पापणी झूल।
ठायिंच थय थय नाचती, पायीं उडवित धूळ॥
चटक चाह चुटकी भरी, मन्मथ मारित टांच।
खेचित लाज लगाम ती पुढे ओढ घेतांच ॥५४२॥

* *

५४३ **ज्यौं ज्यौं आवती निकट निसि, त्यौं त्यौं खरी उताल।**
झमकि झमकि टहलैं करै लगी रहचटैं बाल॥५४३॥

कामाची घाई

प्रियतमाच्या भेटीसाठी आतुरलेली नायिका, घरकाम घाइघाइनं उरकीत आहे. (संध्याकाळ मोकळी मिळावी या हेतूनं) सखी सांगते, "मीलन लालसेनं भारलेली ती गृहिणी शीघ्रगतीनं व उत्साहानं आपलं घरकाम उरकीत आहे. "

उतावीळ किती होय ती, जवळ जशी ये रात।
दिन सरतां प्रिय भेटिची आतुरता हृदयांत॥
रुमति झुमति करकंकणे, करितां ती घरकाम।
निपटित चटपट गेहिनीं, देहीं उर्जितकाम॥५४३॥

* *

५४४ **रही, पैज किनी जु मैं; दीनी तुमहिं मिंलाइ।**
राखहु चंपक माल लौं, लाल हियैं लपटाइ॥५४४॥

अनुक्रमणिका

चंपक माळ

दूती नायकाला म्हणते, "मी म्हटल होतं की ती दुर्लभ आहे. पण मी पैज हरले, व तुमची भेट करवून दिली. आता ती चंपकमाळा सदैव हृदयाशी धरा. "

आण मोडुनी आणिली तिची भेट घडवून।
ठेवा चंपकमाळ ती हृदयीं नीट जपुन॥५४४॥

*　　　*

५४५ **दोऊ चाह-भरे कछू चाहत कह्यौ, कहैं न।**
नहिं, जाँचकु सुनि, सूम लौं बाहिर निकसत बैंन॥५४५॥

कृपण

नायक व नायिका परस्परांशी बोलायला आतूर आहेत, पण नवप्रितीच्या पहिल्या संकोचानं काही बोलत नाहीत. याचक दारी आलेला पाहून कृपणानं आत दडून बसावं अशी त्यांच्या बोलाची अवस्था झाली आहे.

बोलाया बघती परी बोलुं न दे संकोच।
निघे न वच कृपणांपरी बघता याचक तोंच॥५४५॥

*　　　*

५४६ **सुभर भर्‍यौ तुवगुन-कननु, पक्यौ कपट कुचाल।**
क्यौं धौं दार्‍यौ ज्यौं, हियौ दरकतु नाहिंन लाल॥५४६॥

डाळिंब

प्रौढा खंडिता नायिका नायकाला म्हणते, "तुमच्या गुणकणांनी दाटून भरलेलं माझ्या हृदयाचं डाळिंब, आपल्या कपट कुचालीच्या कपड्यांनी गुंडाळून पिकवलं तरी त्याला तडा गेल्याशिवाय राहणार नाही. "

तव अवगुण कण भरतां उरीं, कपट आवरण बंध।
तडा न जाई तया कसा पिकतां हें डाळिंब॥५४६॥

*　　　*

५४७ **चितु दै देखि चकोर-त्यौं, तीजैं भजै न भूख।**
चिनगी चुगै अँगार की, चुगै कि चंद-मयूख॥५४७॥

चकोर

उच्चपदाची योग्यता असलेल्या व्यक्तीला निकृष्टपद दिलं तर त्याचा स्वीकार न करता, चकोरावरील अन्योक्तीनं तो आपली चित्तवृत्ती सांगतो.

अनुक्रमणिका

अग्नि ठिणगी चाटीत वा चाखित चंद्रमयूख।
चकोरव्रत साचार तें शमवायातें भूक ॥५४७॥

*　　　*

५४८ **तुहूँ कहति, हौं आपु हूँ समुझति सबै सयानु।**
लखि मोहनु जौ मनु रहै, तौ मन राखौं मातु॥५४८॥

विवश मानस

सखी नायिकेला दीक्षा देते, की, "नायकाला तू अस सैल सोडू नकोस, मधुन मधुन त्याला धमकावणी दे आणि रागाव, नाही तर तो तुझ्या हातून अजिबात सुटून जाईल. कायम ओढ रहावी यासाठी मान धरीत जा." त्यावर नायिका म्हणते, "तुझं सारं पटतं ग, पण मी काय करू ! त्यांना बघताच माझं मन माझ्या हातचं राहत नाही – ते सरळ त्यांच्याकडेच धाव घेतं."

कळतें, वळतें न तें सखे, कसा धरुं अभिमान।
बघुनीं मोहन मन चळें, नुरेच ठावठिकाण॥५४८॥

*　　　*

५४९ **धुरवा होहिं न, अलि उठै, धुवाँ धरनि-चहुँकोद।**
जारत आवत जगत कौं पावस-प्रथम पयोद॥५४९॥

पहिला मेघ

प्रोषितपतिकेला वर्षाकालिन पहिला मेघ अतिशय तापद होतो. ती सखीला म्हणते, "सखे, चोहिकडे क्षितिजावर दिसतात ते वर्षाऋतूतील पहिले मेघ जग पेटवित येत आहेत. त्याचा तो धूर दिसतो आहे ग."

जाळित येई जगास हा, पाऊस पहिला मेघ।
निघे धूर तो चहुंकडे क्षितिजीं काळी रेघ॥५४९॥

*　　　*

५५० **नख-रुचि-चुरनु डारि कै, ठगि, लगाइ निज साथ।**
रह्यौ राखि हठि लै गए हथाहथी मनु हाथ ॥५५०॥

नखमोहिनी

नायक नायिकेच्या आरक्त नखावर मोहित झाला. तो सखीला म्हणतो, "ते तिचे ठग हात. नखरुची चूर्णाची मोहिनी टाकून माझं हृदय हातोहात फसवून नेतात."

टाकुनि नखरुचि चूर्ण तें, मोहिति मन निमिषांत।
सहज नेति अपुल्यासवें ओढूनि हातोहात ॥५५०॥

*　　　*

अनुक्रमणिका

५५१ **चलत देत आभारु सुनि उहीं परोसिहिं नाह।**
लसी तमासे की दगनु हाँसी आँसुनु माँह॥५५१॥

आर्द्र हसूं

नायिका शेजाऱ्यावर अनुरक्त आहे. तिचा पती विदेशी जात आहे. तेव्हा तिचे डोळे भरून आले आहेत. पतीनी शेजाऱ्याला घराकडे लक्ष ठेवण्या संबंधी सांगताच तिच्या आर्द्र डोळ्यात हसू उमटलं."

पति प्रवासाते निघे, सांगत शेजाऱ्यास।
घर सांभाळा आमुचें, तुमचा निकट निवास॥
कुटुंब माझें एकटे सुचवी घ्याया भार।
लालस लोचन हांसती आसवांत हळुवार॥५५१॥

* *

५५२ **सुरात न ताल न तान की, उठ्यौ न सुरु ठइराइ।**
एरी, रागु बिगारि गौ बैरी बोल सुनाइ॥५५२॥

वैरी

नायिका एकटीच गाणं गात आहे. तेवढ्यात नायकाचा शब्द तिच्या कानी आला. त्याबरोबर ती प्रसन्न पुलकित झाली व तिचा स्वरभंग झाला. गाणं बेसूर झालेलं ऐकताच सखी विचारते, "कां ग आज असं! एवढी सुरेली तूं!" त्यावर ती म्हणते, "काय करुं ग, आज मेलं मनच चळलं! ताल जुळत नाही नि तान जमत नाही, स्वर नुसता कांपतो. स्थिरताच नाही. त्या वैऱ्यानंच हा घोटाळा केला. मनच उडवलं माझं गाण्यातून. "

लागे ना स्वर आज तो ताल जुळेना तान।
राग येत जरि राग ही, कसें विसरलें भान॥
वर्ज स्वर घेतांच तो वैरी सुचवी बोल॥
वीणा कंपित होय ती झालें गाणें फोल॥५५२॥

* *

५५३ **प्रजऱ्यौ आगि बियोग की, बह्यौ बिलोचन-नीर।**
आठौं जाम हियौ रहै उड्यौ उसास-समीर॥५५३॥

हृदय पतंग

दूती नायकाला, नायिकेची विरहव्यथा कथन करते. "वियोगाग्नीनं जळालेला, आसवांनीं भिजलेला, तिचा हृदय पतंग, निश्वासाच्या वाऱ्यावर दाही दिशात सैरवैर उडतो आहे. "

विरह आग जाळी जया, भिजवी लोचन नीर।
दिशिं दिशिं हृदय पतंग हा उडवि उसाससमीर॥५५३॥

अनुक्रमणिका

*   *

५५४ **उरु उरझ्यौ चितचोर सौं गुरु गुरुजन की लाज।**
चढैं हिडोरैं सैं हियैं कियैं बने गृह-काज॥५५४॥

हृदयांदोलन

एकीकडे नायिकेचं मन नायकावर अनुरक्त झालं आहे. तर दुसरीकडे वडीलमंडळीच्या संकोचानं ती चूर झाली आहे. अशा आंदोलित परिस्थितीत ती घरकाम करते आहे पण ते नीटपणे होत नाही.

प्रियाकडे मन लागले, आप्तजनांची लाज।
झुले हृदय हिंदोल तो करितां सखि गृहकाज॥५५४॥

*   *

५५५ **पट सौं पोंछि परी करौ, खरी-भयानक-भेष।**
नागिनि है लागति दगनु नागबेलि-रँग-रेख॥५५५॥

नागवेली

खंडिता नायिका नायकाला म्हणते, "अहो रंगराज! तुमच्या रसिक डोळ्यांना हा नागवेली पानाचा रस, रंगरेखा लागली आहे. ती माझ्याकडे जहरी नागिणीसारखी फुस्कारित पहाते आहे. ती वस्त्रानं पुसाल तर बरं! माझी भीति तरी दूर होईल!"

पुसा तरी नयनांतला नागवेलिचा रंग।
नागिण जहरी भासते, भयें थरारे अंग॥५५५॥

*   *

५५६ **तो लखि मो मन जो लही, सो गति कही न जाति।**
ठोडी-गाड गड्यौ, तऊ उड्यौ रहै दिनराति॥५५६॥

विचलित चित्त

नायक नायिकेच्या हनुवटीवर मोहित होऊन म्हणतो, "तुला बघून माझ्या मनाची काय स्थिती होते म्हणून सांगू! ते जरी तुझ्या हनुवटीवरील खळीत अडकून पडले, तरी ते ठिकाणावर नाही."

हनुवटीवरी खळी पडे, चित्त गुंतलें त्यांत।
जडतां जीवहि चंचले, मन उडते दिनरात॥५५६॥

*   *

५५७ **मैं लखि नारी-ज्ञानु करि राख्यौ निरधारु यहै।**
वहई रोग-निदानु, वहै बैदु, औषधि वहै ॥५५७॥

रोगनिदान

पूर्वानुरागिणी विरह व्याकुल नायिका आपलं प्रेम प्रगट करीत नाही. सख्या अनेक उपाय करतात पण त्यात यश येत नाही. एकीने मात्र रोगनिदान केले. ती म्हणते, “अग तू घाबरू नकोस! मला तुझा रोगही कळला आणि वैद्यही कळला कोण आहे तो!”

कळवी नाडी ज्ञान तें, तुझें बोलकें मौन।
कुठली व्याधी, औषधी, धन्वंतरि तो कोण॥५५७॥

* *

५५८ **जो तिय तुम मन भावती राखी हियैं बसाइ।**
मोहि झुकावति दगनु है वहई उझकति आइ॥५५८॥

नांव नको

नायकानं नायिकेला चुकून अन्य स्त्रीच्या नावानं हाक मारली. त्यावरती रुष्ट होऊन म्हणते, “ज्या मेलीला तुम्ही आपल्या हृदयात वसवलत, तीच मेली तिनतिनदां डोळ्यात नि ओठावर येऊन मला चिडविते. तिचं नाव नको मला !”

प्रिय ती तुमची मोंहिनी वसे सदा हृदयांत।
मला चिडविते सारखी येउनियां नयनांत।
जीभहि प्रेमळ आपली देई तिजला साथ।
नांव नको तें मुळि मला राहिन मीच अनाथ॥५५८॥

* *

५५९ **दोऊ अधिकाई-भरे एंकैं गौं गहराइ।**
कौनु मनावै, को मनै, माने मन ठहराइ॥५५९॥

प्रणय पैज

नायक व नायिका या दोघांनाही आपल्या रूपाचा गर्व आहे. प्रत्येकाला वाटतं की आपल्याशी बोलल्याशिवाय दुसऱ्याला राहवणार नाही. दोघेही मौन धरून बसले आहेत. पहिले कोण बोलतं याची आपसांत चुरस आहे. ही प्रणय मौज सखी सांगते.

गाल फुगवुनी पाहती दोघें धरुनी आस।
कोण अगोदर बोलते मिळेल मान कुणास॥ ५५९ ॥

* *

अनुक्रमणिका

५६० **उर लीनै अति चटपटी, सुनि मुरली-धुनि, धाइ।**
हौं निकसी हुलसी, सु तौ गौ हुल सी हिय आइ॥५६०॥

विप्रलब्धा

विप्रलब्धा नायिका, संकेतस्थळी नायकाची भेट न झाल्यामुळं परत येऊन सखीला सांगते, "अग, मुरलीचा ध्वनि ऐकून घाइघाइनं मी तिकडे भेटायला गेलें पण कुंजवनांत पोचण्याआधीच सुरांचे वार करून तो निघून गेला. "

आतुरलें मन ऐकुनी मुरली रव संकेत।
स्वरमंजुळ ते कुंजवनी मला ओढुनी नेत।
गेले धांवत जाहले वंचित कुठे न ठाव।
निघून जाई निर्दयी ह्रदयीं करुनी घाव॥५६०॥

* *

५६१ **ब्रजबासिनु कौ उचित धनु, जो धन रुचित न कोइ।**
सु चित न आयौ; सुचितई, कहौ, कहाँ तैं होइ॥५६१॥

भक्ताचे गाऱ्हाणें

ब्रजवासी जनांचं भाग्यधन असा श्रीकृष्ण, त्याची भक्ति कुणाला आवडणार नाही! त्याच्या चिंतनातच मनाला शांतिलाभ होईल.

वृदावनिचें भाग्य तें, रुचे कसे न कुणास।
चिंतिताच चैतन्य तें शांति लाभ सकलांस ॥५६१॥

* *

५६२ **हटु न हठीली करि सकैं यह पावस-ऋतु पाइ।**
आन गाँठि घुटि जाइ, त्यौं मान-गाँठि छुटि जाइ॥५६२॥

भेटीगांठी

मानिनी नायिकेला सखी सांगते, "सखे या वर्षाकालात काहीच ताठ राहू शकत नाही. हट्ट नरमतो व गाठ सुटते. तेव्हा आता उगाच मान धरण्यात अर्थ काय! ऋतूविपरित वागू नये. "

वर्षाऋतु होतां सखे, हट्ट न चाले ताठ।
घट्ट बसे निरगांठ ती, सुटे मनांतिल गांठ॥५६२॥

* *

५६३ **वेऊ चिरजीवी, अमर निधरक फिरौ कहाइ।**
छिनु बिछुरैं जिनकी नहीं पावस आइ सिराइ॥५६३॥

अनुक्रमणिका

प्रवत्स्य पतिका

या बरसातीतील विरह वियोगात जी वाचेल तीच खरी भाग्यवान ती वियोगिनी चिरंजीव ठरेल. पण हाय ते भाग्य माझं नाही. ”

क्षण वियोग ही मरण् दे विरहि जना बरसात।
चिरंजीव जगिं अमर ते जगतां या कालात॥
भाग्य न माझें ते मुळीं चिंता येत मनांत।
वियोगिनी वाचेल का चिरंजीवन सौख्यांत॥५६३॥

* *

५६४ **भेटत बनै न भावतौ, चितु तरसतु अति प्यार।**
धरति लगाइ लगाइ उर भूषन, बसन हत्यार॥५६४॥

मीलनाभास

सखी सखीला सांगते, “नायक परदेशाहून परत आला आहे. उत्कंठित झालेली प्रिया घरात त्याच्या भेटीची वाट बघत आहे. आप्तस्वजनाशी बोलत तो बाहेरच खोळंबला आहे. अखेर तिला न राहवून त्याच्या वस्तू, अलंकार, कपडे उराशी लावून मीलनसुख अनुभवित, ती व्यवस्थित ठेवीत आहे. ”

प्रिय भेटी उत्कंठिता, चित्त तळमळे आंत।
विलंब हा नच साहवे, येइ न माजघरांत॥
तिथेच मागे थांबला बोलत आप्तजनांत।
भूषण, वसनशस्त्रादिका कवळुन ठेवि उरांत॥५६४॥

* *

५६५ **वाही दिन त ना मिट्यौ मानु, कलह कौ मुलू।**
भलैं पधारे, पाहुने, है गुडहर कौ फूलु॥५६५॥

जास्वंदिचे फूल

नायक पाहुणचाराला जाण्याच्या निमित्तानं रात्रभर बाहेरच असतो. सकाळी घरी आल्यावर, नायिका त्याच्या डोळ्यातील लाली पानप्रताप इत्यादि रतिचिन्हे बघून रागावली. कित्येक दिवस तिने त्याच्याशी अबोला धरला. नायकादेखत ती सदाच उदास असते. त्यामुळं घाबरून नायक सखीला विचारतो. सखी म्हणते, “त्या दिवशी तुम्ही पाहुणचाराहून परत येताना अगदी जास्वंदीचं फूल बनून आलात. आणि ते फूल जिथं जिथं जातं तिथं असा कलह ठरलेला! ”

लपविता न लपतो मुळीं, कळला तो आचार।
भले परतला पाहुणे घेउन पाहुणचार॥
लालबुंद फुललें जसें जास्वंदिचे फूल।

अनुक्रमणिका

अंगागांवरि कोरिलें तें कलहाचें मूळ॥५६५॥

*   *

५६६ **मोहिं लजावत, निलज ए हुलसि मिलत सब गात।**
भानु-उदै की ओस लौं मानु न जानति जात॥५६६॥

कृतक-कोप

सखी नायिकेला म्हणते, "मी तुला कितीदा सांगितलं की अशी हुरळू नकोस—जरा ओढून धर, कुऱ्याति घे, पण तू कसली! सरळ जाऊन गळ्यात पडतेस! त्यावर नायिका म्हणते, "मी काय करू? त्याला बघताच हे माझं सारं अंग नि अंग निर्लज्ज बनतं. अनंगाच्या चिथावणीनं अंगावरच जाऊन पडते आणि माझा अभिमान दंवासारखा सूर्यासमोर विरघळून जातो. "

आणित मजसी लाज हे प्रस्फूरति उत्संग।
अंग अंग निर्लज्ज हो, उठति भाव तरंग॥
कसा धरूं तरि सांग ना उगाच लटका मान।
रविउदयीं दंवबिंदु परी विरतो ग अभिमान॥५६६॥

*   *

५६७ **तो तन अवधि- अनूप रुपु लग्यौ सब जगत कौ।**
मो द्दग लागे रुप, द्दगनु लगी अति चटपटी ॥५६७॥

जग सौंदर्य

नायक नायिकेला पाहून मोहित झाला, ती न दिसताच तो बेचैन होतो. तो तिला चिठ्ठित लिहितो, "तुझ्या देहात जगातील सर्व सौंदर्य साठवलेलं आहे. त्यावर माझं चित्त ठसल्यामुळे मनाला सारखी हुरहुर लागली आहे. "

अखिल जगांतिल रुप तें, लागे रचितां रुप।
तव रुपीं दृग लागले, चटक लागली खूप॥ ५६७॥

*   *

५६८ **रहैं निगोडे नैन डिगि, गहैं न चेत अचेत।**
हौं कसु कै रिस के करौं, ये निसुके हँसि देत॥५६८॥

मानदीक्षा

मानदीक्षा देणाऱ्या सखीला नायिका म्हणते, "अग, माझे हे डोळे पंगू असूनही त्याला बघताच चंचल होऊन त्याच्याकडे धावत सुटतात आणि माझी चेतावणी जागच्या जागीच रहाते. मी किती आवरते, तू सांगतेस तसा रागाचा आव आणते पण मेले हे लबाड ऐनवेळी हसून माझा घात करतात. "

अनुक्रमणिका

दिली किती चेतावणी, किती आणते क्रोध।
कोडगेच हे नयन ग रुचे न त्या अनुबोध॥
टक लाउनिया पाहती, भारिच ग उद्दाम।
हसती मेले लालसी करिती ते मुद्दाम॥५६८॥

* *

५६९ **मोहूँ सौं बातनु लगैं लगी जीभ जिहिं नाइ।**
सोई लै उर लाइयै, लाल, लागियतु पाइ॥५६९॥

तिलाच घ्या

नायिकेशी बोलताना नायकाच्या तोंडून सहज सपत्नीच नाव निघतं. त्यामुळं ती साशंक होऊन रागावून बसते. नायक तिला अंगावर बसवून तिची समजूत घालतो तेव्हा ती म्हणते, “हे पहा, मी आपल्या पाया पडते. माझ्याशी बोलताना देखील जिभेवर तिचे नांव नाचतं, तिलाच आपल्याजवळ घ्या. ” आणि ती पटकन उठून बाजूला झाली.

मधेच मजसी बोलता, करी जिभेवर नाच।
पाया पडते, सोडा मला, लावा उरीं तिलाच॥५६९॥

* *

५७० **नावक-सर से लाइ कै, तिलकु तरुनि इत ताँकि।**
पावक-झर सी झमकि कै, गई झरोखा झाँकि॥५७०॥

कडामिनी बाण

नायिका खिडकीमधून नायकावर कटाक्ष टाकून बाजूला लपली. नायक त्या कटाक्षानं घायाळ होऊन, तिच्या भेटीसाठी आतुर झाला. तो आपली दशा दूतिला सांगून तिच्या भेटीची प्रर्थना करतो.

कडामिनी बंदूक ती, नलिका बाण कटाक्ष।
तरुणी वेधित लक्ष्य तें, झुकुनी उंच गवाक्ष॥५७०॥

* *

५७१ **सुख सौं बीती सब निसा, मनु सोये मिलि हाथ।**
मूका मेलि गहे, सु छिनु हाथ न छोडे हाथ॥५७१॥

भिंतीमधून

उपपती नायक व नायिका शेजारी रहातात. मधे केवळ एक आडवी भिंत आहे. त्यात मधेच एक भोकसा पडलेला आहे. एका रात्री दोघांनीही त्या छिद्रातून परस्परांचे हात पकडले. आणि तशीच रात्र घालविली.

अनुक्रमणिका

घर शेजारी भिंत ही मधें आडवी उंच।
भित्ती छिद्रातुनी तरी चालत प्रीति प्रपंच॥
स्पर्श सुखास्तव धरुनियां परस्परांचे हात।
झोपेतच जणूं कंठिती दोघे मिळूनी रात॥५७१॥

*   *

५७२ **बाम बाँह, फरकति; मिलैं जौ हरि जीवनमूरि।**
तौ तोहीं सौं भेटि हौं राखि दाहिनी दूरि॥ ५७२॥

भुज पुरस्कार

नायिकेचा पती विदेशाहून परत आला. तिचा डावा बाहू स्फुरून हा शकुन सांगतो. त्याला उपहार म्हणून ती प्रतिज्ञा करते, "अग, वामभुजे, तू स्फुरून मला आनंदाची बातमी दिलीस, याबद्दल तुला पुरस्कार म्हणून ते आले की उजवी भूजा दूर ठेऊन, तुलाच प्रथम त्यांच्या गळ्यात घालीन".

वामभुजे, तूं सांगसी शकुन स्फुरुनिया आज।
जीवनधन येईल तो प्राणसखा ब्रिजराज॥
उजवी बाजुस ठेउनी, द्याया तुज उपहार।
घालिन कंठालिंगनीं तुझाच ग भुजहार॥५७२॥

*   *

५७३ **छुटे छुटावत जगत तैं सटकारे, सुकुमार।**
मनु बांधत बेनी-बंधे नील, छबीले बार॥५७३॥

कुंतलबंध

नायकानं तिचे मोकळे व बांधलेले असे दोन्हीही केसांचे प्रकार पाहिले आहेत. दोन्हीही तऱ्हा त्याला एकाहून एक सरस वाटल्या. तो आपल्या मनाची अवस्था सखीला सांगतो, "तिचे लांब सडक व मुलायम रेशमी केस सुटलेले पाहून भान सुटतं, आणि वेणी बंधात ती माझं मनही बांधून टाकते".

लांब सडक पाठीवरी सोडित केश गुलाम।
सोडित चित्त जगांतुनी, बांधित मन अभिराम॥
बांधित विंचरुनी जई, मावेना आनंद।
नजर बांधतो नीलिमा कुंतल वेणीबंध॥५७३॥

*   *

५७४ **इहिं बसंत न खरी, अरी, गरम न सीतल बात।**
कहि, क्यौं झलके देखियत पुलक, पसीजे गात॥५७४॥

अनुक्रमणिका

प्रसन्न पुलकिता

नायिका आपल्या मैत्रिणीत बसलेली आहे आणि नायक अचानक समोर आला. तिची पुलकित अवस्था पाहून सखी म्हणते, " या वसंतात वायु एवढा शीत नाही की उष्ण नाही. मग तुझ अंग कंपित झालं अन् घाम देखील आला हे कसलं ग लक्षण? "

वसंत वात न शीत हा, उष्ण न लागे आँच।
कां ग अचानक स्वेद हा अंगावर रोमांच॥५७४॥

* *

५७५ **चित पितमारक-जोगु गनि भयौ, भयैं सुत, सोगु।**
फिरि हुलस्यौ जिय जोइसी समझैं जारज-जोगु॥५७५॥

ग्रहसंकट परिहार

कवी ज्योतिषाचा परिहास करीत सांगतो, "ज्योतिषाला मुलगा झाला. त्याच्या जन्मकुंडलिवरून त्याने जातक पाहिले. त्यांत मूल पितृघातक असल्याचे आढळून येताच तो मनांत भयभीत झाला. पण पुन्हा नीट निरखून व गणित मांडून पहाताच मुलाचा जारजयोग दिसून आला. प्राणसंकट टळल्यामुळं तो मनोमनी प्रसन्न झाला.

नव शिशु जातक वर्तवी—पितृघातक योग।
शोकाकुल भयभीत हो, कसा टळावा भोग॥
निरिक्षितांना तें पुन्हां—कळे अन्यसंभोग।
मनोमनीं आनंद हो, पाहुनि जारजयोग॥५७५॥

* *

५७६ **चमचमात चंचल नयन बिच घुंघट-पट झीन।**
मानहु सुरसरिता-बिमलजल उछरत जुग मीन॥५७६॥

मीन युगुल

सखी नायिकेच्या नेत्रांची प्रशंसा करते. तिच्या विरल ओढणीतून तिचे डोळे असे चमकताना दिसतात की जणु काय स्वर्गंगेच्या पाण्यात मीनाची जोडीच विहरत आहे.

चमकति चंचल नयन ते विरल ओढणी आंत।
सुरसरिता जलिं खेळती मीनयुगुल मौनांत॥५७६॥

* *

५७७ **रहि मुँहु फेरि कि हेरि इत; हित-समुहौ चितु, नारि।**
डीठि-परस उठि पीठि के पुलके कहैं पुकारि॥५७७॥

प्रीतिपाठ

नायिका उपपतीवरील आपला अनुराग लपविण्यासाठी मैत्रिणी व नायकाला पाठमोरी उभी रहाते. त्यावर एक सखी म्हणते, "पाठ करून उभी राहिलीस तरी अनुराग लपत नाही. पाठीवरील रोमांचलहरीच तुझं चित्त प्रीतीसन्मुख असल्याचं सांगतात. "

उभी न सन्मुख राहसी, जरी फिरवीसी पाठ।
दिठीं उठते पुलकावली कथित प्रीत निरगांठ॥५७७॥

* *

५७८ **बिछुरैं जिए, सकोच इहिं बोलत बनत न बैन।**
दोऊ दौरि लगे हियैं किए लजौंहैं नैन॥५७८॥

मौन मिठी

नायक परदेशाहून परतला आहे. विरहात आपण जगणार नाही ही भाषा लटकी होती हे कळून आल्यामुळे दोघेही संकोचित झाले आहेत. त्या लाजेमुळे दोघेही काही बोलत नाहींत. खाली बघतच त्यांनी परस्परांना मिठी मारली.

दिले घेतलें वचन तें, देउ वियोगी प्राण।
विरहें जीवन जाय ते जरी घातली आण॥
भेटताच परि ते पुन्हां, संकोचित धरि मौन।
मिठी मारती धाउनी, झुकति लज्जित नैन॥५७८॥

* *

५७९ **मोहिं करत कत बावरी, करैं, दुराउ दुरैं न।**
कहे देत रँग राति के रँग-निचुरत से नैन॥५७९॥

रंगजागरे

खंडितानायिका नायकाला म्हणते, "मला खोटे सांगून बावळट का बनविता! कळतं म्हटलं मला सगळं! तुम्ही कितीही लपवलंत तरी ते लपणार नाही. तुमचे रंगेल डोळे रात्रीचा रसरंग उधळून सर्व सांगतात."

मला बनविता बावळी, गुपित न लपते चैन।
रैन रंग ते सांगती रंग जागरे नैन॥५७९॥

* *

५८० **छिपैं छिपाकर छिति छुवैं तम ससिहरि न, सँभारि।**
हँसति हँसति चलि, ससिमुखी, मुख तैं आँचरु टारि॥५८०॥

अनुक्रमणिका

तिमिर चंद्र

अभिसारिका संकेतस्थली जायला निघाली. चंद्रास्त झाल्यामुळं मार्गात काळोख झाला. संकेतस्थल निर्जन घनवनात असल्यामुळे तिचे पाऊल भीतीने पुढे पडेना हे बघून सखी तिच्या रूपाची प्रशंसा करीत तिचं धाडस वाढवते. "अग घाबरतेस काय! चंद्र मावळला म्हणून भितेस होय! तू आपली ओढणी बाजूला सार, आता चंद्रोदय होईल बघ अन् पुढला मार्ग सहज दिसेल. "

धरी सुधाकर धरा उरीं छपुनि पडे अंधार।
हसुनी चल ग चंद्रमुखीं, सारित अंचलभार॥५८०॥

* *

५८१ **अपनैं अपनैं मत लगे बादि मचावत सोरु।**
ज्यौं त्यौं सबकौं सेइबौ एकै नंदकिसोरु॥५८१॥

द्वैता-द्वैत

ज्ञानी भक्ताची सिद्धांतआलोचना. "जगात वेगवेगळ्या सिद्धांतांचा व मतामतांचा गलबला माजला आहे. पण सर्वाभूती तो एकच नंदकिशोर नांदतो आहे.

द्वैताद्वैतउपासना भिन्न भिन्न सिद्धांत।
मतामतांचा गलबला, दर्शनीय वेदांत॥
उपास्य दैवत वेगळें, पूजित भाव फुलोर॥
सर्वाभूति सारखा एकच नंदकिशोर॥५८१॥

* *

५८२ **लहि सूनैं घर करू गहत दिठा दिठी की ईठि।**
गडी सु चित नाहीं करति करि ललचौंहीं डीठि॥५८२॥

नेत्रमैत्री

नायक नायिकेची फक्त नेत्रमैत्री आहे. एक दिवस नायकानं संधी साधून एका सामसूम घरात ती एकटी असता तिचा हात धरला. त्याबरोबर आपल्या लालस डोळ्यात कीव आणून स्त्रीसुलभ लज्जेनं आणि कुणी येईल या भितीनं गांगरून 'नको नको ' म्हणत तिनं आपला हात सोडवून घेतला. पण त्या प्रसंगापासून त्याचे भान हरपले. तो दूतीला सांगतो, " आमचा नुसता डोळ्यांचा परिचय होता. परस्परांना पाहिलं होतं इतकच. एक दिवस संधी मिळताच एका निर्वासित घरात मी तिचा हात धरला. त्यावेळी तिची लालसी पण लाजरी नजर, कुतुहल युक्त भयभीत भाव, 'नको नको न' ची ओठांची हालचाल. हात सोडवताना लावलेला नाजूक जोर इत्यादी मनोरम हावभावनं तिची मूर्ती माझ्या मनोमनी ठसली."

दृष्टिभेटि सरावतां सामसूम सदनांत।

संधी साधुन एकदां हळूंच धरला हात॥
'नाहि नको न' दचकुनी, दृग लालसी पहात।
चित्र तिचें तें बावरे, कोरियले ह्रदयांत॥५८२॥

* *

५८३ **पिय कैं ध्यान गही गही रही वही है नारि।**
आपु आपु हीं आरसी लखि रीझति रिझवारि॥५८३॥

वासकसज्ञा

नायिका नायकाच्या ध्यानात इतकी तद्रुप झाली की समोरील दर्पणात पडलेले तिचे प्रतिबिंब त्याचेच म्हणून बघते, आणि प्रतिबिंबाशीच प्रणयलीलात रममाण होते.

आलिहि होई भृंगि ती- घे भ्रमराचा ध्यास।
स्वयेंच रमणी रमण हो, रमवी दर्पण भास॥५८३॥

* *

५८४ **बुरौ बुराई जौ तजै, तौ चितु खरौ डरातु।**
ज्यौं निकलंकु मयंकु लखि गनैं लोग उतपातु॥५८४॥

निष्कलंकित चंद्र

कविची प्रास्ताविक उक्ती :— दुर्जनानं आपली दुर्जनता सोडली तर फार भीती वाटते. चंद्राला कलंकरहित पाहिलं, तर उत्पात होण्याचा संभव असतो!

अवगुण दुर्जन सोडतां वाटे भीति मनांत।
पुसता चंद्रकलंक तो गमे होय उत्पात॥५८४॥

* *

५८५ **मरिबे कौ साहसु ककै बढ़ै बिरह की पीर।**
दौरति है समुही ससी, सरसिज, सुरभि-समिर॥५८५॥

आत्मघात

प्रोषितपतिकेची दयनीय परिस्थिती पाहून सख्या आपसात बोलतात, "निरहताप असह्य झाल्यामुळे मरण यावं म्हणून ती चांदण्यात फिरते, कमल कुरवाळते, अन् सुगंधित वायूच्या सन्मुख धावते. "

करि साहस असहाय ती, विरहें द्याया प्राण।
धांवत जाई दुःखिता अंगी नुरलें त्राण॥
सरिं शशिबिंबित सरोजिनी समूह सुरभि समिर।
विझे न धग ती तगमग वाढवि लोचन नीर॥५८५॥

अनुक्रमणिका

*   *

५८६ कब की ध्यान-लगी लखौं, यह घरु लगि है काहि।
डरियतु भृंगी-कीट लौं मति वहई है जाइ ॥५८६॥

ध्यानमग्ना

पूर्वानुरागिणी, प्रियकाराच्या आठवणीत घरदार, खाणंपिणं सारं विसरून त्याच्याच ध्यानात मग्न आहे. सखी तिला शुध्दीवर आणण्यासाठी म्हणते, " अग तू अगदी ध्यास लागलेल्या भृंगीसारखी रात्रंदिवस त्याच्याच तंद्रीत असतेस! घरादाराकडे अन्नपाण्याकडे जरा लक्ष दे. अशानं कसं होईल बाई? "

ध्यान सदा जिवलगाकडे स्वप्नातच सुखसंग।
तुझी न तूं राहसी सखे बनतां कीटक भृंग॥
कुठे सांग जाशील ग सुटतां हे घरदार।
सर्वस्वी का द्यायचा प्रीतीचा करभार॥५८६॥

*   *

५८७ बिलखी लखै खरी खरी भरी अनख; बैराग।
मृगनैनी सैन न भजै लखि बेनी के दाग॥५८७॥

स्तंभिता

मुग्ध खंडिता नायिकेचा वृतांत सखी सांगते, "प्रियकाराच्या स्कंधावर अन्य स्त्रीचे वेणीचे चिन्ह दिसताच ती मृगनयनी पापणी न हलविता एकटक बघत पुतळ्यासारखी उभी राहिली. डोळ्यात उदासीन भाव दृग्गोचर झाले. "

उदासीन ती दुःखिता, पाहि एकटक नीट।
अंगावरती उमटली वेणीं कुंतल कीट॥५९७॥

५८८ अनियारे, दीरघ दृगनु किती न तरूनि समान।
वह चितवनि औरै कछू; जिहिं बस होत सुजान॥५८८॥

आगळी नजरफेक

कोरदार व आकर्ण नेत्र असलेल्या स्त्रिया जगात अनेक असल्या तरी जी चतुरा गुणीजनांनाही आपल्या जाळ्यात गुंतविते तिचा दृष्टिक्षेप अगदी आगळाच असतो.

कोरदार मृगलोचना, जगांत तरुणि अनेक।
कटाक्ष परि तो आगळा, गुंतवि गुणीं विवेक॥५८८॥

*   *

अनुक्रमणिका

५८९ **झुकि झुकि झपकौंहैं पलनु, फिरि फिरि जुरि, जमुहाइ।**
बींदी पियागम, नींद-मिसि, दीं सब अली उठाइ॥५८९॥

निद्राभिनय

प्रौढा वासकसज्जेच्या चातुरीचं वर्णन सखी सखीला सांगते. प्रियकराच्या येण्याची वेळ अनुमानित करून डुलकी देत, भारावल्या डोळ्यांनी पापण्या मिटत, जांभई देत तिनं नीज आल्याची जाणीव दिली आणि हळूच मैत्रिणीतून उठून ती आत गेली (पर्यायानं मैत्रिणींना जाण्याची सूचना दिली.)

प्रियागमाची लागतां तिच्या मनीं चाहूल।
अंग मोडुनी डुलकि दे, उठवि निजेची हूल॥
आळसले डोळे तिचे, मिटुनि पापणी घेत।
सुचवी सखि ते जावया, चुटकि जांभई देत॥५८९॥

* *

५९० **ओछे बडे न है सकैं, लगौ सतर है गैन।**
दीरघ होहिं न नैंक हूँ फारि निहारैं नैन॥५९०॥

क्षुद्र थोरवी

कविची उक्ती, "कितीही ऊंच वाढले, गगनाला भिडले, तरी क्षुद्र माणूस थोर होऊ शकत नाही. ताणून ताणून डोळे मोठे केले तरी ते विशाल ठरत नाहीत.

गगन ठेंगणें होइना, कितीहि वाढले सान।
दीर्घ न होती लोचनें, बघतां देउनि ताण॥५९०॥

* *

५९१ **गह्यौ अबोलौ बोलि प्यौ आपुहिं पठै बसीठि।**
दीठि चुराई दुहुनु की लखि सकुचौंहिं दीठि॥५९१॥

मध्यस्थी

नायिकेने नायकाला बोलवायला दूतीला धाडले. नायक तिच्याशीच रममाण झाला व दोघेही परत आले. रमणप्रकारान दोघांचेही डोळे संकोचित झाले आहेत. नायिकेच्या हे लक्षात येताच ती मौन धरते. त्यांच्याकडे पहात देखील नाही.

आपण होउनि पाठवी प्रियाकडे ती दूति।
मिळून येती अबोल ते, संकोचित अनुभूति॥५९१॥

* *

५९२ **दुखहाइनु चरचा नहीं, आनन आनन आन।**
लगी फिरैं ढ़का दियै कानन कानन कान॥५९२॥

अनुक्रमणिका

गवगवा

दूती नायिकेला कुंजवनात नायकाकडे चलण्याचा आग्रह करते. पण चहाडखोरांच्या भीतीनं नायिका म्हणते, “यावेळी जांण योग्य नाही. अगोदरच गावात माझ्या नावाचा गाजावाजा झालेला आहे आणि सारे माझ्या पाळतीवर आहेत. हलक्या कानांचे चहाड बोल घरोघरी ऐकू येतात. ”

मुखीमुखीं दे चहाड हे दुःखहता आदान।
वण वण हिंडुनि ऐकती चोरुनि हलके कान॥५९२॥

* *

५९३ **हितु करि तुम पठ्यौ, लगैं वा विजना की वाइ।**
टली तपति तन की, तऊ चली पसीना-न्हाइ॥५९३॥

प्रेमविंझण

नायकानं पाठविलेल्या पंख्याची प्रीतिभेट मिळताच नायिकेचं अंग पुलकित होतं, घर्मजलानं काया भिजते. सखी तिच्या प्रेमाधिक्याचं वर्णन करते, “तुम्ही दिलेल्या पंख्यानं वारा घेताच तिचं अंग आर्द्र पुलकित झालं.”

विंझण, वारा घ्यावया पाठविला उपहार।
निववि ताप तरि पुलक तनू सुखद स्वेद दंवहार॥५९३॥

* *

५९४ **ध्यान आनि ढिग प्रानपति रहति मुदित दिन राति।**
पलकु कँपति, पुलकति पलकु, पलकु पसीजति जाति॥५९४॥

स्वयं-प्रसन्ना

नायिकेच्या स्मृतिदशेचं वर्णन सखी करते, “प्रियकराच्या आठवणीत मग्न राहून ती सदैव प्रसन्न असते. कधी कंपित होते, पळात पुलकित होऊन घामानं चिंब भिजते. ”

ध्यानिं मनीं आणुनी प्रियकरा, प्रसन्न ती दिनरात।
पळ कंपित, पळ पुलकिता, स्वेदयुताहि पळांत॥५९४॥

* *

५९५ **सकै सताइ न तमु बिरहु, निसी दिन सरस सनह।**
रहै वहै लागी दगनु दीपसिखा सी देह॥५९५॥

देहदीपिका

नायक म्हणतो, “विरह मला छळू शकत नाही. विरहतमात तिची सस्नेह देहदीपिका माझ्या डोळ्यात असल्यामुळे मी प्रसन्नमग्न आहे. ”

विरह तिमिर नच हा छळी-हृदयिं प्रेम दिनरात।
नयनिं उभी ती उज्वला, स्नेह स्निग्ध तनुकांत॥५९५॥

* *

५९६ **बिरह-जरी लखि जीगननु कह्यौ न डहि कै बार।**
अरी, आउ भजि भितरी; बरसत आजु अँगार॥५९६॥

अंगार वर्षाव

वर्षाऋतूत वियोगिनीला काजवे देखील जळत्या ठिणग्यासारखे भासतात. ती सखीला म्हणते, "अग, आज बाहेर अंगारवर्षाव होतो आहे. तू लगबग आत ये पाहू. या काजव्यांनी तू देखील जळशील."

बरसांतीतिल काजवे, बघुनि विरहिणी नार।
बोलवि ये सखि आंत ये, वर्षत अजि अंगार॥५९६॥

* *

५९७ **फिरि धर कौं नूतन पथिक चले चकित-चित भागि।**
फूल्यौ देखि पलासु बन, समुही समुझि दवागि॥५९७॥

पलाश-वणवा

वसंतऋतूत वनात फुललेला पळस, वणवा पेटल्यासारखा दिसतो. कवी वर्णन करतो, "वनात फुललेले पळस पाहून, वणव्याच्या आभासानं वाटसरू परत घराकडे वळतो."

चकितचित्त नवपथिक ते, परतुनि येति घरास।
पलाशवन फुलतां गमे दावानल हा खास॥५९७॥

* *

५९८ **गडी कुटुम की भीर मैं रही बैठि दै पीठि।**
तऊ पलकु परि जाति इत सलज हसौंहीं दीठि॥५९८॥

चोर नजर

नायिका आपल्या कुटुंबियात आहे. तिचा उपपती कार्यवश तिथे येतो. त्याला पहाताच ती तोंड फिरवून बसते. पण सस्मित लाजऱ्या नजरेनं त्याला पुरेपूर बघून घेते. ही तिची प्रेमचातुरी सखी दुसरीला सांगते.

कुटुंबांत ती कामिनी खेळत सारीपाट।
मी जातां संकोचुनी बसे फिरवुनि पाठ॥
कवडी फासे नयन ते, फेकितसे आडून।
हसति हळूच लाजरे, बघति नजर चोरून॥

अनुक्रमणिका

डाव जिंकितें चातुरी पोबारा पडतांच।
नरद पटावर मारली, मला न वर बघतांच॥ ५९८॥

*   *

५९९ **नाऊं सुनत हीं है गयौ तनु औरै, मनु और।**
दबै नहीं चित चढी रह्यौ अबै चढाऐं त्यौर॥५९९॥

उतरे ना चितचोर

आकृतीलक्षिता नायिकेला सखी सांगते, "नायकाचं नांव घेताच तुझ्या तनूवर शिरशिरी उठून तू वेगळीच दिसायला लागलीस. भिवया चढवून उगाच धाक दाखविला म्हणजे चित्तातला चावट चोर पळतो वाटतं!"

मनांत भरता पुलकिता होसी ऐकुनि नांव।
चढतां भिवई ना लपे, चित्तचोर हो साव॥५९९॥

*   *

६०० **दुसह सौति-सालैं, सु हिय गनति न नाह-बियाह।**
धरे रूप गुन कौ गरबु फिरै अछेह उछाह॥६००॥

रूपगर्विता

नायकाच्या दुसऱ्या विवाहाची तयारी चालू आहे. पण त्यामुळे नायिकेला मुळी देखील दुःख होत नाही. ती रूपगुणगर्विता असल्यामुळे नायक आपल्या हातातून सुटेल असे तिला वाटतच नाही. उलट उत्साहानं या विवाहकार्यात ती भाग घेते.

गणी न ती गुणगर्विता, स्वपतीसवतविवाह।
रूपवती मंडपीं फिरे, दावित बहु उत्साह॥६००॥

*   *

६०१ **डिगत पानि डिगुलात गिरी लखि सब ब्रिज बेहाल।**
कंपि किसोरी दरसि कै खरैं लजाने लाल॥६०१॥

चलित मति

श्रीकृष्णाने गोवर्धन उचलून धरला त्यावेळी त्याची दृष्टि राधेकडे वळली. तिला पहाताच प्रेमोर्मीनं देह पुलकित झाला. आणि तनुकंपित झाल्यामुळे करांगुलीवर तोललेला गिरी डोलू लागला. त्यामुळं व्रजवासी जन घाबरले, ते बघून श्रीकृष्णाला आपल्या चलितवृत्तीची लाज वाटली.

सन्मुख बघतां राधिका, पुलकित हो ब्रिजराज।
डगमगला गिरी, अंगुली हलतां उपजे लाज॥

अनुक्रमणिका

गोकुल व्याकुल होइ तें गोप गोपिका वृंद।
प्रीती सात्विक भावना लज्जित हो गोविंद॥६०१॥

*   *

६०२ **और सबै हरषी हँसतिं, गाँवति भरी उछाह।**
तुँ हीं, बहू, बिलखी फिरै क्यों देवर कैं ब्याह॥६०२॥

अमंगला

नायिका आपल्या दिरावर अनुरक्त आहे. त्याच्या विवाहप्रसंगी सहाजिकच तिला दुःख होतं. सखी तिची मनोवृत्ती ओळखून म्हणते, "अग घरातील सर्व स्त्रिया त्याच्या विवाहोत्सवात भाग घेत आहेत. मग तूच का अशी मलूल दिसतेस?"

वहिनी उदास कां अशी, मंगल आज विवाह।
दीर तुझा तो धाकला दिसे न कां उत्साह!॥६०२॥

*   *

६०३ **बाल छबीली तियनु मैं बैठी आपु छिपाइ।**
अरगट हीं पानूस सी परगट होति लखाइ॥६०३॥

दीपवती

दूती नायिकेच्या सौंदर्याचं वर्णन करते, "सर्व रमणीजनात तिचं तेज अगदी आगळं आहे. तेजोवलयात शोभणाऱ्या दिपकळीसारखी ती सुंदर दिसते.

सुंदर रमणी वृंद तो, ज्योत आगळी एक।
तेजोवलयीं वेढिली दीपकळी सुरेख॥६०३॥

*   *

६०४ **एरी, यह तेरी, दई, क्यौं हूँ प्रकृति न जाइ।**
नेह-भरैं हिय, राखियै, तेउ रुखियै लखाइ॥६०४॥

स्नेह विन्मुख

सखी मानिनी नायिकेला सांगते, "गडे, त्याच्या स्नेहपूर्ण हृदयात राहून देखील, तू अगदी कोरडीच राहिलीस, हे खरोखरी आश्चर्य आहे!"

स्निग्ध हृदयिं ठेविलें तरी, पालटला न स्वभाव।
कोरडीच अजुनी तशी, पडे न स्नेहप्रभाव॥६०४॥

*   *

६०५ **इहिं काँटैं मो पाइ गडि लीनी मरति जिवाइ।**
प्रीति जनावत भीति सौं मीत जु काढयौ आइ॥६०५॥

संशय फिटला

नायिका कुणा नायकावर अनुरक्त आहे. पण तो तिच्यावर प्रेम करतो किंवा नाही याची तिला जाण नाही. एका प्रसंगी नायिकेच्या पायी कांटा बोचला असताना, तो त्यानं मोठ्या हळूवारपणानं प्रेमळ धीर देत बाहेर काढला. यावरून त्याच्या प्रेमाची तिला प्रचिती आली.

रुतला ग काटा सखे पायीं, नयनीं नीर।
फुंकर घालुनि हळुं हळूं काढिति देउनि धीर॥
किति ग प्रेमळ ते गडे, कळलें बाई आज।
फिटवी संशय आंतला, काटा काढित लाज॥६०५॥

* *

६०६ **नाँक चढै सीबी करै जितै छबीली छैल।**
फिरि फिरि भूलि वहै गहै प्यौ कँकरीली गैल॥६०६॥

वाकडी वाट

नायक व नायिका मिळुन कुठे जात आहेत? नायिका गुळगुळीत वाटेवरून तर नायक मुद्दाम खडी वाटेवरून चालत आहे. त्याच्या पायाची बोच हिच्या सित्कारात उमटते. ती त्याला जवळून चालायला सुचविते. पण तिचा सित्कार ऐकण्यासाठी तो पुन्हा पुन्हा, त्या खडी वाटेवर जातो.

‘खडि वाटेतुनि जवळिं या ’ करि नाजुक सित्कर।
सहज मनोहर तो तिचा अविर्भाव अरुवार॥
ऐकाया सित्कार तो मुग्ध भावनोद्‌गार।
सोडि न वाकडि वाट ती, खट्याळ जिवलग फार॥६०६॥

* *

६०७ **नटि न, सीस साबित भई लुटी सुखनु की मोट।**
चुप करि ए चारी करति सारि-परी सलोट॥६०७॥

चोरसंग

अन्यसंभोगदुःखिता नयिका दूतीची चूरलेली साडी पाहून म्हणते, अशी मुरकू नकोस, माझ्या सुखाच्या लुटीचं गाठोडं तुझ्या माथी दिसतयं आणि तुझ्या चुनरीची चुरगळ चुपचाप चुगली करते आहे. तेव्हा साळसुदपणा पुरे”.

मुरकसि कां, ग कळे मला, माझी बाग उजाड।
सुख माझे लुटलेंस तूं लपविसी पदराआड।

अनुक्रमणिका

भ्रमर भाळला पाहुनीं सुंदर पिवळा पाड।
चुरली चुनरी ही तुझी झाली आज चहाड॥६०७॥

* *

६०८ **जिहिं भामिनि भूषनु रच्यौ चरन-महावर भाल।**
उहीं मनौ आँखियाँ रँगीं ओठनु कैं रँग लाल॥६०८॥

क्रोधवती

नायक सकाळीच नायिकेकडे आला. त्याच्या कपाळी महावर रंग लागलेला आहे. आणि डोळे लालसर आहेत. ते पाहून नायिका विचारते, " काल जागरण झालं वाटत? 'नाही बुवा' तो म्हणतो. "असं, असं' मग मला वाटतं ज्या क्रोधवतीच्या चरणाचा रंग कपाळावर लागला आहे, तिच्याच ओठांचा रंग डोळ्यात भरला असावा!"

रंगविला का आळता, पायी टेकुनी भाल ।
कलाचतुर ती सुंदरी रंगवि लोचन लाल ॥ ६०८ ॥

* *

६०९ **तूँ मोहन-मन गडि रही गाढी गडनि, गुवालि।**
उठै सदा नटसाल ज्यौं सौतिनु कैं उर सालि॥६०९॥

विसंगती

दूती, नायिकेला नायकाच्या प्रितीची वृत्तकथा सांगते. "अग गौळणी, तू मोहनाच्या मनात इतकी रुतून बसली आहेस, की त्याचं शल्य तुझ्या सवतीच्या मनांत सलतं".

मोहन मनिं तूं राधिके रुतुनि बैसलिस खोल।
शल्य सलें तें सवतीते, अधरीं दुखरे बोल॥६०९॥

* *

६१० **लाज-लगाम न मानहीं, नैना मो बस नाहिं।**
ए मुँहजोर तुरंग ज्यौं, एचत हूँ चलि जाहिं॥६१०॥

लाज लगाम

सखी नायिकेला सांगते की, विवशतेनं नायककडे पहाणं बर नव्हे. तू जरा अभिमान धरायला हवा." त्यावर ती म्हणते, "काय करु ग, हे डोळे मोठे मुजोर आहेत. माझ्या मुळीच ताब्यात नाहीत. लगाम खेचूनही, बेफाम घोड्यासारखे ते तिकडेच धाव घेतात".

काय करुं ग खेचतां कितिही लाज लगाम।
मुजोर नयन तुरंग हे, ओढ घेति बेफाम॥६१०॥

* *

अनुक्रमणिका

६११ **कर-मुँदरी की आरसी प्रतिबिंबित प्यौ पाइ।**
पीठि दियैं निधरक लखै इकटक डीठि लगाइ॥६११॥

मुद्रादर्पण

मध्या नायिकेची अचलदृष्टीनं नायकाचं रुप न्याहाळण्याची चातुरी सखी सांगते; "हातातील मुद्रिकेच्या आरशात प्रियतमाचं प्रतिबिंब झेलून पाठमोरी वळून, एक टक आणि निश्चिंतपणे मन भरुन त्याला ती निरखीत होती".

कर मुद्रांकित दर्पणीं प्रतिबिंबित छबिरुप।
पाहत निर्भय होउनी, पाठमोरि प्रियरुप॥६११॥

* *

६१२ **इती भीर हूँ भेदि कै, कित हूँ है, इत आइ।**
फिरै डीठि जुरि डीठि सौं सबकी डीठि बचाइ॥६१२॥

दृष्टि चातुरा

नायक यात्रेतील लोकांच्यां गर्दीत उभा आहे. आणि थोड्या अंतरावरच नायिका तिथे उभी आहे. नायिकेची दृष्टि लोकभीड फोडून नायकावर येऊन स्थिरावते. आणि जनदृष्टि चुकवून डोळे भेट घेऊन परतते. नायक तिच्या अवसोकनचातुरीचं कौतुक करतो.

दृष्टि फिरे चौफेर ती, येई भेदुनि भीड।
दिठीं दीठ ती भेटवी मनीं ठेउनी भीड ॥६१२॥

* *

६१३ **लाई, लाल, बिलोकियै, जिय की जीवन-मूलि ।**
रही मौन के कोन मैं सोनजुही सी फुलि ॥ ६१३ ॥

सुख संजीवनी

नायक नायिकेला प्रकिक्षा करीत, कुंजवनात बसलेला आहे. तो अचेतसा दिसतो आहे. तेवढ्यात दूती नायिकेला घेऊन तिकडे येते, नायकाला सावध करीत ती म्हणते, "अहो, जरा सावध होऊन पहा तरी, मी आपल्यासाठी ही संजीवनी आणिली आहे. ती बघा कुंजकोनात कशी फुलते आहे ती !"

पहा जिवाची जिवलगा, येत करुन शिणगार ।
निकुंज कोनीं सोनजुई फुलवि वसंतबहार ॥ ६१३॥

* *

६१४ **ओठु उँचै, हाँसी-भरी दग भौंहनु की चाल ।**
मो मनु कहा न पी लियौ, पियत तमाकू, लाल ॥ ६१४ ॥

अनुक्रमणिका

तंबाखूपान

नायिका, नायकाला तंबाखू ओढताना बघते. त्याच्या त्यावेळच्या चेहऱ्याची हालचाल बघून ती मोहते. आपल्या सखीला ती म्हणते, "बाई ग, तंबाखू ओढतांना त्यानं ओठ जुळवले. आणि ऊंच करीत डोळे मिटून निमुळते करुन व भिवयाची कमान करीत, त्यानं त्याबरोबर जणु काय माझं मनच पिऊन टाकलं."

ओठ जुळवी, दृग हासती भिवई करी कमान।
प्याले ग मन माझे सखे पिता तंबाखू पान॥
(खेंचुन चुंबन घेइ तो, लागे मनीं हुरहूर।
जळता क्षण, तो राहिला ओठीं नुसता धूर)॥६१४॥

* *

६१५ **जे तब होत दिखा दिखी भई अमी इक आँक।**
दृगैं तिरीछी डीठि अब है बीछी कौ डाँक॥६१५॥

सुखद वेदना

नायक नायिकेनं कुठंतरी परस्पर वाकड्या नजरेनं पाहिले. दोघेही घायाळ झाले. ती वाकडी नजरच विरहात वेदना देत आहे.

अमृतमय तो वाकडा, दृष्टादृष्टविलोक।
विरहीं आठव देइ ग वृश्चिक दंशितशोक॥६१५॥

* *

६१६ **नैंको उहिं न जुदी करी, हरषि जु दी तुम माल।**
उर तैं बासु छुट्यौ नहीं बास छुटैं हूँ लाल॥६१६॥

निर्माल्यमांळ

नायकानं नायिकेला प्रेमानं सुगंधित माला दिली. ती त्यानं दिलेली असल्यामुळे ती तिला अतिशय प्रिय झाली. ती सदैव गळ्यात घालून मिरवू लागली. सुगंध संपून निर्माल्य झाले तरी तिनं ती कंठातून काढली नाही.

हर्षे कंठी घातली, तिला सुगंधित माळ ।
वास उडाला, उरीं तरी वास तिन्ही त्रिकाळ ॥ ६१६ ॥

* *

६१७ **बिहँसि बुलाइ, बिलोकि उत प्रौढ तिया रस धूमि।**
पूलकि पसीजति, पूत कौ पिय-चूम्यौ मुँहु चूमि॥६१७॥

अनुक्रमणिका

चुंबितचुंबन

नायक नायिका दोघेही आप्तमंडळीत बसलेली आहेत. नायकानं मोठ्या प्रेमानं लहानग्या मुलाचं चुंबन घेतल. हे बघून नायिकेनं हळूच त्या मुलाला जवळ बोलावलं आणि प्रियकरानं चुंबन घेतलेला त्याचा गाल त्याच ठिकाणी चुंबिला.

हंसत कडे घे बाळ ती, प्रियाकडेच पहात।
प्रियचुंबितमुख, चुंबिते, पुलकित तनु हो स्नात॥६१७॥

* *

६१८ **देख्यौ अनदेख्यौ कियैं, अँगु अँगु सबै दिखाइ।**
पैठति सी तन मैं सकुचि बैठी चितै लगाइ॥६१८॥

धीट संकोच

नायकानं नायिकेचे जे हावभाव पाहिले ते सखीला सांगतो, "मला पाहिलं न पाहिल्यासारखं करुन पदर इकडे तिकडे करित, अंग अंग दर्शित केलं. अन् नंतर अचानक माझ्याकडे बघून, आताच लक्ष गेलं असं दाखवित, एकदम लाजून, पदर सावरीत खाली मान घालून बसली ".

पाहुनि ही नच पाहतां, अपुल्यातच जणुं गुंग।
अंग अंगना दाखबी, अनंग मोडुनि अंग॥
जणूं अचानक दृष्टि ती वळे मजकडे तोंच।
सावरि आवरि बावरी, उरीं लाज संकोच॥६१८॥

* *

६१९ **पटु पाँखै, भखु काँकरै, सपर परेई संग।**
सुखी परेवा, पहुमि मैं एकै तुँहीं, बिहंग॥६१९॥

सुखी विहंग

कोणि भोजन, वस्त्र उपार्जनासाठी वणवण हिंडणारा प्रापंचिक म्हणतो, " हे कपोता ! तुझ्या सारखा सुखी जगात कुणीही नाही. अन्न, वसन, आसरा ह्याची ददात नाही. कसली विवंचना नाही. ते तुला सहजच मिळत. खाण्यासाठीं चुनखडी मुबलक आहे. पांघरायला तुझे रेशमी पंख आहेत. विहाराला एवढे थोरले गगन. विसाव्याला वृक्षराजी आहेत. आणि सहवासासा तुझी सहचरी सतत सन्निध असते. तेव्हा तूच खरा सुखी विहंग आहेस".

खाया कंकर, पंख पट सदा सहचरी संग।
सुखी कपोता तूं खरा जगांत एक विहंग॥६१९॥

* *

अनुक्रमणिका

६२० **अरे, परेखौ को करै, तुँहीं बिलोकि बिचारि।**
किहिं नर, किहिं सर राखियै खरैं बढैं परिरारि॥६२०॥

मर्यादातिक्रम

जगातील थोरांच्या वागणुकीवर कवीची ही प्रास्ताविक उक्ती. “मना, तूच विचार करुन पहा. मान जास्त वाढला की थोरांची मर्यादा सुटते, मानव, मान, तलाव किंवा सरिता, या वाढल्या की त्यांना मर्यादा रहात नाही”.

करि विचार माझ्या मना, ओळख नीट स्वभाव।
मर्यादा नच राहते जशी वाढतें हाव॥
सोडुन सीमा वाहता नदी बुडविते गांव।
मर्यादेत राहती मानव, मान, तलाव॥६२०॥

* *

६२१ **तौ, बलियै, भलियै बनी, नागर नंदकिसोर।**
जौ तु नीकैं कै लख्यौ मो करनी की ओर॥६२१॥

फोल आशा

भक्त श्रीकृष्णाला डिवचतो. “ हे प्रभो माझ्या पापपुण्याचा विचार करुन माझा उध्दार करण्याचा तुझा मानस असेल तर मला मुळीच आशा नाही. माझ्या पापांचा भार तुला पेलवणार नाही. ”

पापपुण्य तें पाहुनी तुलिता, नंदकिशोर।
तारिशील ना या जिवा, पाप होय शिरजोर॥६२१॥

* *

६२२ **चाह भरीं, अति रस भरीं बिरह भरीं सब बात।**
कोरि सँदेसे दुहुनु के चले, पौरि लौं जात॥६२२॥

विरह संदेश

नायक विदेशी जाताना प्रियेचा निरोप घेऊन पायरीपर्यंत पोचतो न पोचतो, तोच दोघांचाही विरह प्रबल होऊन परस्पर करुण संदेशाची देवाण घेवाण सुरु झाली.

पायरिवरि ती पोचवीं, प्रियकर जाय विदेश।
विरह, प्रणय अभिलाष ते कोटि उभय संदेश॥६२२॥

* *

६२३ **सुनि पग-धुनि चितई इतै न्हाति दियैं हीं पीठि।**
चकी, झुकी, सकुची, डरी, हँसी लजी सी डीठि॥६२३॥

अनुक्रमणिका

स्नानकातरा

नायिका नदीवर स्नानाला गेली आहे. तेवढ्यात नायकही तिथे येतो. नायिका पाठमोरी असते. पायांची चाहूल लागताच तिनं किंचित मान वळवून पाहिलं. ती चकित होऊन खाली झुकली. भीतीनं संकोचली, लाजऱ्या दृष्टीनं हसली. नायक, नामोहरम झाला.

हळूचं वळूनी पाहते पाठमोरि ती न्हात।
नदीकिनारीं ऐकतां पदरव, ती सुस्नात॥
चकित झुकत संकोचिता, भीत हसत धरि लाज।
कसा अचानक येइ ग केले न हा ब्रिजराज॥६२३॥

* *

६२४ **कर लै, सूँघि, सराहि हूँ रहे सबै गहि मौनु।**
गंधी अंध, गुलाब कौ गवईं गाहकु कनु॥६२४॥

गाजरपारखी

गावंढळात गुणग्राहकता शोधणाऱ्या गुणवंताला उद्देशून कवी म्हणतो, " अरे गंधी, या गाजरपारख्यांत तुला कोण ग्राहक मिळणार? उगाच वरवर पहातील अन् स्वस्थ बसतील. "

करांत घेत प्रशंसती सुगंध, धरिती मौन।
गंधी, ग्रामिण अंध हे, ग्राहक होइल कोण॥६२४॥

* *

६२५ **मिलि चलि, चलि मिलि, मिलि चलत आँगन अथयौ भानु।**
भयो मुहुरत भौर कौ पौरिहिं प्रथमु मिलानु ॥६२५॥

निरोप

नायक पहाटेच परदेशी जायला निघाला. नायिकेचा निरोप घेऊन तो ऊंबरठ्यापर्यंत आला. पण प्रेमातिशयामुळे, पावलोपावली घडणाऱ्या भेटीगाठीत अंगणातच संध्याकाळ झाली आणि प्रस्थानाचा पहिला मुक्काम पायरीवरच पडला.

निघे जावया निरोप घेउनि उंबरठ्यावर पाय।
येइ पोंचवावया मागुती गृहिणी कोमलकाय।
निरोप देती, पुन्हा भेटती, होई सायंकाळ।
देवडीवरी पडाव पहिला मुहूर्त प्रातःकाळ॥६२५॥

* *

६२६ **पचरँग-रँग बेंदी खरी उठै ऊगि मुख-जोति ।**
पहिरैं चीर चिनौटिया चटक चौगुनी होति॥६२६॥

अनुक्रमणिका

चटक चुनरी

सखी नायिकेच्या तनुद्युतिचं वर्णन करते. "तिच्या अंगाच्या झळकीनं तिची चुनरी देखील झळाळू लागली. "

तनु झळक चुनरीवरी, चमक चौगुणी होत।
पंचरंगी बिंदी खुले, प्रतिबिंबित मुख ज्योत॥६२६॥

* *

६२७ **हँसि ओठनु-बिच, करू उचै, कियैं निचौंहैं नैन।**
खरैं अरैं प्रिय कैं प्रिया लगी बिरी मुख दैन॥६२७॥

तांबूल-प्रणय

विश्रब्ध नवोढा नायिक नायकाच्या मुखात तांवूल देत असताना पाहून, तो प्रसंग सखी हावभावंसह सांगते, "प्रियकरावर आता तिचा एवढा विश्वास बसू लागला की त्यामं हट्ट करताच ओठी हसत, हात ऊंचावून आणि पापण्या खाली वळवून त्याच्या मुखात ती विडा भरविते".

ओठी हांसत, बघत खालती, उंचाउनिया हात।
प्रिया-हट्ट पुरवी सखी, तांबुल घालि मुखात॥६२७॥

* *

६२८ **बारौं, बलि, तो दृगनु पर अलि, खंजन, मृग, मीन।**
आधी डीठि-चितौनि जिहिं किए लाल आधीन॥६२८॥

अर्धोन्मिलित

दूती नायिकेच्या नेत्रांची प्रशंसा करीत नायक तिच्यावर अनुरक्त असल्याचं सांगते "सखे तुझ्या डोळ्यावरून मृग, भृंग, खंजन हे सारे ओवाळून टाकावेसे वाटतात. अग, तुझ्या अर्ध्या मिटल्या पापणीनं, अर्धवट दृष्टीनंच तूं प्रियकराला आधीन करून घेतलं आहेस".

तुजवर ओवाळीन ते अलि, खंजन मृग मीन।
अर्धोन्मिलित नेत्र हे करिति प्रिया आधीन॥६२८॥

* *

६२९ **जात सयान अयान है, वे ढग काहि ठगैं न।**
को ललचाइ न लाल के लखि ललचौंहैं नैन॥६२९॥

ते डोळे

शिकवण देताना सखीला नायिका म्हणते, "अग, मीच काही त्यांच्या डोळ्यांना भारले नाहीं, भल्या भल्यांना त्यांनी मोहित केलं".

अनुक्रमणिका

भल्या भल्यातें ठगविती, दृग ठग फेकित जाल।
एकदांच बघतां सखे लालस नैन विशाल॥६२९॥

* *

६३० **लखि लखि अँखियनु अधखुलिनु, आँगु मोरि, अँगिराइ।**
आधिक उठि, लेटति लटकि, आलस-भरी जम्हाइ॥६३०॥

रम्य पहाट

रतिश्रमित नायिकेच्या प्रातःकालीन जागत्या सौंदर्याचं, सखी वर्णन करते, "तिचे ते अर्धे मिटलेले डोळे, किल किल दृष्टीक्षेप, आळसलेली जांभई, आळोखे पिळोखे देत अंग मोडून पुन्हा लोळणं. सावरीची उशी कवळीत अंग चोरणं ही अवर्णनीय शोभा काय सांगू!"

अर्धी मिटली लोचनें, किल किल दृष्टी क्षेप।
सावरिची कवळिते उशी, साधितसे उरचेप॥
आळस भरली जांभई, अंगमोड कमनीय।
उठते, शयनीं लोळते हालचाल रमणीय॥६३०॥

* *

६३१ **प्रेम अडोलु डुलै नहीं मुँह बोलैं अनखाइ।**
चित उनकी मूरति बसी, चितवानी माँहि लखाइ॥६३१॥

अढळ प्रेम

लक्षितानायिकेचा अनुराग पाहून सखी तिला चिडविते तेव्हा ती लटकेच रागावून बसते. सखी त्यावर म्हणते, "तू कितीही रागावलीस तरी तूझ्या मनातील प्रेममूर्ती अढळ आहे, हे तुझ्या डोळ्यावरून कळतं".

ढळे न प्रीती, आढळे, रागव बाइ खुशाल।
हृदयीं भरली मूर्ति जी, कळविति नेत्र विशाल॥६३१॥

* *

६३२ **नाक मोरि, नाहीं ककै नारि तिहोरैं लैइ।**
छुवत ओठ बिय आँगुरिनु बिरी बदन प्यौ देइ॥६३२॥

ओठ तांबूल

नायक नायिकेला आपल्या हातानं पान भरवितो. त्यावेळचे नायिकेचे हावभाव व तिची चेष्टा सखी सांगते, "नाक उडवून ती म्हणते, 'मला नको' पण आग्रह करताच नाही नाही म्हणत तोंडात विडा धरते. आणि प्रियकर दोन्ही ओठ बोटांनी कुरवाळीत विडा भरवतो व ओठांनी आत दाबून धरतो".

अनुक्रमणिका

'नकोच' ओठी बोल हे, उगाच मुरडत नाक।
आग्रह घेई अंगना करुनी डोळे झाक॥
अधरी अंगुलि स्पर्श तो हळूंच देई भूल।
विडा रंगवी गोडसा तोडुनियां तांबूल॥६३२॥

* *

६३३ **गिरै कंपि कछु, कछु रहै कर पसीजि लपटाइ।**
लैयौ मुठी गुलाल भरी, छुटत झुटी है जाइ॥६३३॥

रंगखेळ

नायक व नायिका होळी खेळताना, परस्परावर गुलालमुठी उधळतात. पण दूर स्पर्शानंही अंग रोमांचित झाल्यामुळं काही गुलाल किलकिल्या मुठीच्या बोटांच्या फटीतून गळतो व उरला तळहाताला चिकटून बसतो. त्यामुळं उघडल्यानंतर दोघांच्याही मुठी रित्याच असतात.

कंप सुटत करमूठ ती भरली, गळे गुलाल।
उरला स्वेदकणीं भिजे हातच होती लाल॥
एकमेक ते उधळती प्रणयरंग लयलूट।
लक्ष न ये लक्षांतही उघडी पडली मूठ॥६३३॥

* *

६३४ **देखत कछु कौतिगु इतै; देखौ नैंक निहारि।**
कब की इकटक डटि राही टटिया आँगुरिनु फारि॥६३४॥

जवनिका

परकीया नायिका, आपल्या खिडकीवरील पडदा बाजूला सारून बाहेर उभ्या असलेल्या नायकाला बघते. पण त्याचं लक्ष दुसरीकडे असतं. त्याचं लक्ष वेधण्यासाठी सखी म्हणते,"अहो तिकडे कुठं बघता! इकडे बघा की जरा. ती बिचारी खिडकीचा पडदा सारून व पापणीची जवनिका उघडून केव्हाची एकटक तुमच्याकडे बघते आहे".

कौतुक इकडे पहा जरा, अपुल्या ध्यानीं चूर।
लालबुंद मृदु अंगुली, सारित पडदा दूर॥
टक लाउनियां पाहते कधिचा नवखा नूर।
सावरीत पदरांतळी तो धडधडतां ऊर॥६३४॥

* *

६३५ **कर लै, चूमि, चढाइ सिर, उर लगाइ, भुज भेटि।**
लहि पाती पिय की लखति, बाँचति, धरति समेटि॥६३५॥

अनुक्रमणिका

तिकडचं पत्र

प्रोषितपतिकेला प्रियकराचं पत्र मिळताच झालेला आनंद सखी निवेदित करते "प्रियकराचं पत्र पहाताच, हातात घेऊन त्याचं तिनं चुंबन घेतलं डोळ्याला लावलं, छातीशी धरलं आणि भुजांना शिववून मोठ्या हर्षानं वाचलं. आणि घडी करून हृदयाशी खोचून ठेवले".

पत्र तिकडचे पोचतां, हर्ष मनी अनिवार।
करि घेउनि ती विव्हला चुंबित वारंवार॥
घेइ शिरावरि आदरें, उरि लावित, भुजभेट।
घडि मोडुनिया वाचते, लपवी हृदयीं थेट॥६३५॥

* *

६३६ **चकी जकी सी है रही, बूझैं बोलति नीठि।**
कहूँ डीठि लागी, लगी कै काहू की डीठि॥६३६॥

दृष्ट

पूर्वानुरागिणी नायिकेच्या जडजीविताची आलोचना सख्या आपसात करतात. "ती स्तंभित झाल्यासारखी अबोल अशी राहते, तोंडातून बोल उमटत नाही. हिला कुणाची दृष्ट लागली की हिची कुणावर दृष्टी लागली काही कळत नाही".

स्तिमित चित्त घे मौन ही बोल न उमटे नीट।
दृष्टी हिची लागली कुठें वा हिला कुणाची दीठ॥६३६॥

* *

६३७ **भावरि-अन भावरि-भरे करौ कोरि बकवादु।**
अपनी अपनी भाँति कौ छुटै न सहज सवादु॥६३७॥

आवड नावड

कविची प्रास्ताविक उक्ती, "प्रकृतिस्वभाव काही सुटत नाही. माणसाची आवडनिवड त्यावरच अवलंबून असते".

वितंडवाद उगाच हा सुटे न सहजस्वभाव।
आवडनावड दाखवी आप आपुले भाव॥ ६३७॥

* *

६३८ **दुऱ्यौ खरे समीप कौ लेत मानि मन मोदु।**
होत दुहुनु के दगनु हींबतरसु, हँसी-बिनोदु॥६३८॥

अनुक्रमणिका

दूरध्वनि

नायक नायिका दूर दूर उभी आहेत. पण डोळ्यांच्या इषाऱ्यांनी त्यांचे बोलणे व हास्य विनोद चालू आहेत. त्या आनंदात ती इतकी मग्न आहेत की त्यांना दुसरं कसलंही भान नाही. आपण अगदी निकट आहोत असंच त्यांना वाटतं.

दूर दूर दोघेहि ते निकट नेत मनबंध।
हास्य मोद स्वच्छंद तो, लुटती नयनानंद॥६३८॥

* *

६३९ **मुख उघारि पिउ लखि रहत रह्यौ न गौ मिस-सैन।**
फरके ओठ, उठे पुलक, गए उघरि जुरि नैन॥६३९॥

खोटी नीज

"नायिका चेष्टा म्हणून डोक्यावर पांघरूण घेऊन झोपेचं सोंग घेत पडली आहे. नायक, ती खरीच झोपली की काय, हे बघण्यासाठी तोंडावरील पांघरूण दूर करतो. तिला सोंग जमलं नाही. तिचे डोळेच किलकिले झाले".

पांघरूण तें काढता तोंडावरुनि हळूंच।
मिटली खोटी नीज ती, सुटे तया लालूच॥
स्फुरति ओठ ही लवलवे, झाले पुलकित अंग।
दृग झाले किल किले तसे भेटवि हसत अनंग॥६३९॥

* *

६४० **प्रिय-मन रुचि-हैबौ कठिनु, तन-रुचि होहु सिंगार।**
लाखु करौ, आँखि न बढैं, बढैं बढाऐं बार॥६४०॥

वृथा श्रृंगार

कुणी मूढमती राजा व धनिकावरील अन्योक्ती "नुसता साज श्रृंगार करून प्रियकाराचं मन मोहविता येणार नाही. गुण वाढविले तरी डोळ्यात भरणार नाहीत. केस वाढतात डोळे वाढत नाहीत!

प्रिय मन मोहवितां न ये, करुनि साज श्रृंगार।
वाढति कच, नच लोचने, अजानु कुंतलभार॥६४०॥

* *

६४१ **मनमोहन सौं मौहु करि, तूँ घनस्यामु निहारि।**
कुंजबिहारी सौं बिहरी गिरिधारी उर धारि॥६४१॥

अनुक्रमणिका

मनोगत

हे मना, तू सदा मोहनाचा मोह धर, कुंजविहारीसह विहार कर, आणि आपल्या हृदयांत त्याचीच मूर्ती प्रस्थापित कर, तनमनधनाने त्याची भक्ती कर."

हे मनमोहन मोह धरी, निरख नयनिं बनवारी।
कुंजविहारि सवें विहरी, उरि धरि नित गिरिधारी॥६४१॥

* *

६४२ **मैं मिसहा सोयौ समुझि, मुँहु चुम्यौ ढिग जाइ।**
हस्यौ, खिसानी, गल गह्यौ, रही गरैं लिपटाइ॥६४२॥

अनुनय

नायिका आपल्याच कुर्यात होती. नायक तिची समजूत घालताना निराश होऊन बाजूला डोळे मिटून पडला. तो झोपलेला समजून तिनं त्याचं चुंबन घेतलं. त्या बरोबर तो हसला, अन् ती लाजून चूर झाली. ती लाज लपविण्यासाठी तिनं गळ्याला मिठी मारून, कुशीत तोंड लपवलं.

चुंबियलें मुख मी सखे, बघुनि लागली झोप।
हसले ते, मी लाजले, पळांत जिरला कोप॥
मिस्किल ग किती बाइ ते, मला न कळला भास।
लाज लपविली, मिठीत मी, गळ्यांत ये करपाश॥६४२॥

* *

६४३ **नीठि नीठि उठि बैठि हूँ प्यौ प्यारी परभात।**
दोऊ नींद भरैं खरैं, गरैं लागि, गिरि जात॥६४३॥

पहाट झाली तरी

रात्रीच्या रतिश्रमान थकलेल्या दंपतीचं सकाळी उठताना दिसणारं रमणीय दृश्य सखी कथन करते. "पहाट होताच, मोठ्या कष्टानं आळसलेल्या देहानं आणि मिटलेल्या डोळ्यानं दोघेही कसेबसे उठतात आणि परस्परांचा तोल सांभाळित, मिठी घालून पुन्हा पडतात".

नयनीं नीज अजूनही, झाली जरी पहाट।
कसे तरी उठले सखे, ओसरली स्मरलाट॥
तसेच शयनावरी पुन्हां पडती झुकता तोल।
सावरिताहि परस्परा मिठींत जाई तोल॥६४३॥

* *

६४४ **तनक झूठ न सबादिली कौन बात परि जाइ।**
तिय-मुख रति-आरंभ की नहिं झूठियै मिठाइ॥६४४॥

नकार माधुरी

नायक आपल्या, मित्राला, सुरतारंभीचा प्रियेचा नकार गोडवा कथन करतो. "कुठल्याही गोष्टीत खोटेपणा आला की त्याचा स्वाद जातो. ती गोष्ट नीरस होते पण रतिआरंभी स्त्री मुखांतून येणारे 'नको नको' चे लटके बोल, जास्तच गोड लागतात. त्या नकार माधुरीची लज्जत काही और असते".

'नको नको' ची माधुरी, करिता रतिआरंभ।
चाखताच तो आगळा गोड मुखीचा दंभ॥६४४॥

* *

६४५ **नहि अन्हाइ, नहिं जाइ घर, चितु चिहुँट्यौ तकि तीर।**
परसि, फुरहरी लै फिरति बिहँसति, धँसति न नीर॥६४५॥

तीरी बघत अधीर

नायिका ज्या जलाशयात स्नान करते तिथेच नायकही आलेला आहे. ती त्याला बघण्याच्या लालसेनं पाणी गार आहे या बहाण्यानं, स्नानाला विलंब लावते, आणि अंग शहारून, पाण्यातून किनाऱ्याकडे येते. त्यामुळे नायकाला ती सहज पाहू शकते. सखी सांगते, "ती जलाशयात आंघोळही करीत नाही आणि घरीही जात नाही. नायकाला पहाण्याच्या मिषानं पाण्याला स्पर्श करीत अंगावर गारट्याचे शहारे आणते, आणि तोंड वळवून तीरावर येते. हा तिचा सारखा खेळ चालू होता."

चित्त लागलें तिचें तिथे, निरखी नदीकिनार।
जाइ घरिं जलिं न्हाइना, शिरे न सलिलीं नार॥
अंग शहारत अंगना, स्पर्शित शीतल नीर।
परते हसत पुन्ह पुन्हां, तीरीं बघत अधीर॥६४५॥

* *

६४६ **सटपटाति सैं ससिमुखी मुख घूँघट-पटु ढाँकि।**
पावक-झर सी झमकि कै गई झरोखा झाँकि॥६४६॥

बरसातीची सर

नायकाला खिडकीतून पहात, पटकन् बाजूला लपणाऱ्या नायिकेचे प्रणयचेष्टित नायक स्वगत उच्चारतो. "संकोचानं घुंघट बाजूला करून खिडकीतून माझ्याकडे कटाक्ष टाकीत, पुन्हा घुंघट घेत, झर्रकन बरसातीच्या सरीसारखी ती आली व नाहीशी झाली. पुन्हा आभाळ मोकळे!

अनुक्रमणिका

मनिं संकोचित चंद्रिका घुंघट झाकुनि घेइ।
सर बरसाती झर्रर ती, झुकुनि गवाक्षी पाहि॥६४६॥

*   *

६४७ **ज्यौं कर त्यौं चिकुटी-चलति; ज्यौं चिकुटी, त्यौं नारि।**
छबि सौं गति सी लै चलति चातुर कातन-हारि॥६४७॥

रेशमी गुंत

तिला चरखा चालविताना पाहून, हावभावावर मोहित झालेला स्वगत म्हणतो, "ज्या गतिलयीत तिचा उजवा हात फिरतो, त्याच गतीनं डाव्या हातचा कापूस सुटून त्याला पीळ पडतो. हनुवटी धाग्याबरोबर तशीच वर खाली होते. हे तिचे सुंदर ध्यान मनाला पीळ पाडून गुंतवतं."

चतुरा चरखा चालवि ती, करचुटकी धरि कापूस।
वरवरती कर नृत्यगती, वळवीत कोवळी कूस॥
भरि पीळ सुतासम देहि तसा, मन ओढित रेशिमगूत।
चिबुक हले कमनीय किती, करि कामिनि कातत सूत॥६४७॥

*   *

६४८ **बुधि अनुमान, प्रमान श्रुति किंऐं नीठि ठहराइ।**
सूछम कटि पर ब्रम्ह की अलख, लखि नहिं जाइ ॥६४८॥

सूक्ष्म कटिमध्य

नायक नायिकेला प्रसन्न करण्यासाठी तिच्या सूक्ष्म कटीची प्रशंसा करतो. प्रमाण, श्रुति, किंवा अनुमानानं जगात ब्रम्हाची सत्ता जाणवते. त्याप्रमाणेच तुझा अगोचर कटिमध्य बुद्धीनेच जाणावा लागतो.

बुद्धि ज्ञान तें जाणवी, प्रमाण श्रुति, अनुमान।
सूक्ष्म तिचा कटिमध्य तो, ब्रह्म अगोचर जाण॥६४८॥

*   *

६४९ **खिचैं मान अपराध हूँ चलि गै बढैं अचैन।**
जुरत डीठि, तजि रिस खिसी, हँसे दुहुनु के नैन॥६४९॥

प्रेमसमेट

सखी नायक नायिकेच्या प्रेमाधिक्याचं वर्णन करते. "प्रियकराच्या अपराधानं ती रागवली, पण परस्पर दृष्टिभेट होताच दोघेही बेचैन होऊन हास्य उमटलं आणि ते मिठीत परिणत झालं".

अनुक्रमणिका

कोप नयनिं धरि भामिनी, प्रिय अपराधी नैन।
दृष्टी मिळे नच दृष्टीला, मन होई बेचैन॥
लपंडाव हा खेळता घडली डोळे भेट।
कोप विरे अपराध ही, मिठीत होय समेट॥६४९॥

* *

६५० **रुप-सुधा-आसव छक्यौ, आसव पियत बनै न।**
प्यालैं ओठ, प्रिया-बदन, रह्यौ लगाए मैन॥६५०॥

सौंदर्य सुधा

प्रियेच्या सौंदर्य धुंदीत, नायकाला मद्यपानही नकोसं वाटतं!

मदिरासव मधु माधुरि अधरी धरी न चैन।
प्रियावदन छबि सुधासवा पीती लोलुप नैन॥६५०॥

* *

६५१ **यौं दलमिलियतु, निरदई, दई, कुसुम सौ गातु।**
करु धरि देख्यौ, धरधरा उर कौ अजौं न जातु॥६५१॥

क्रूर चित्तमयूर

सखी नायिकेची सुकुमारिता व नायकाचं क्रौर्य याचं वर्णन करीत नायकाला तिच्या भेटिला उत्कंठित करते. "अहो, त्या सुकुमार प्रीतिफुलाची पाकळी तुम्ही चुरगळून टाकलीत! केवढं हे कौर्य! त्यामुळं तिनं एवढा धसका घेतला आहे, की तुम्ही हात लाऊन बघा तिचा ऊर अजूनही धपापतो आहे."

सुम कुस्करितां कां असें, निर्दय चित्तमयूर।
चुरगाळुनि केलीस तूं पाकळि पाकळी चूर॥
चाखिलास रसमाधुरी, दिले फेकुनी दूर।
वक्ष पहा कर लाउनी-अजुनि धपापे ऊर॥६५१॥

* *

६५२ **किती न गोकुल कुलवधू, किहिं न काहि सिख दीन।**
कौनैं तजी न कुल-गली है मुरली-सुर-लीन॥६५२॥

परोपदेश

सखी नायिकेला शिकवण देते, "अग, तू कुलवंताची लेक आहेस! मुरलीचा ध्वनि ऐकून असं हुरळणं, कुलरीत सोडून त्याच्यामागे धावत सुटणं बरं नव्हे'! त्यावर नायिका म्हणते, "गोकुळात मी एकटीच कुलवधू आहे वाटतं! कित्येक कुलवधूंनी मला तुझ्यासारखीच

शिकवण दिली. पण मला सांग मुरलीचा मंजूळ ध्वनि ऐकून, कोणत्या कुलवधूनं आपली मर्यादा उल्लंघन केली नाही? हा परोपदेश बरं".

किती गोकुळीं कुलवधू इतरा सांगति नीत।
मुरलीख परि ऐकतां, सुटते ग कुलरीत॥६५२॥

* *

६५३ **खलित बचन, अध खुलित दग, ललित-स्वेद-कन-जोति।**
अरुन बदन छबि मदन की खरी छबीली होति॥६५३॥

उपहास

अन्यसंभोगदुःखिता नायिका आपल्या दूतीला म्हणते. "अर्धे उघडे, ते आळसलेले डोळे, विसंगत बोलणं, घामानं चिंब झालेला देह, धडधडतं हृदय, मुखावर लाली ओसंडलेली, जणुं काय रतिमदनानं रसरंगच उधळला आहे. अशी ती सुंदर छबी पाहून मी धन्य झाले."

खलित वचन, अर्धखुले नयन ते ललित स्वेदकणज्योति।
अरुणवदन, रतिमदनकेलितन, छबि मनोहर कांति॥६५३॥

* *

६५४ **बहकि न इहिं बहिना पुली, जब तब, बीर, बिनासु।**
बचै न बडी सबील हूँ चील-घोंसुवा माँसु॥६५४॥

घारीच्या घरट्यांत

नायिकेची चतुर शेजारीण, नायिकेशी बहिणीचं नातं जोडते आणि त्या नात्यानं त्याला घरी बोलावते. सखी नायिकेला सावध करण्याच्या हेतूनं म्हणते, "हे बघ, या बहिणीच्या नात्यानं हुरळू नकोस बरं! सावध रहा! घारीच्या घरट्यांत गेलेला मासखंड कोणत्याही उपायानं वाचत नाही."

जुळवी नातें बहिणिचें, शेजी लावित तांत।
मांस खंड ना वाचतो घारीच्या घरट्यांत॥६५४॥

* *

६५५ **लहि रति-सुखु लगियै हियै लखी लजौहीं नीठि।**
खुलति न, मो मन बँधि रही वहै अधखिली डीठि॥६५५॥

मदन मंजिरी

रतिसमयीचे हावभाव प्रणयाविष्कार, लाजरी चेष्टेने आठवीत, सखीला पुन्हा नायिकेच्या मीलनाची इच्छा प्रगट करतो. "सुखसंगानंतर,ती मदनमंजिरी गलितवसना संकोचानं अधोमुख उभी राहून निमीलित नेत्रांनी माझ्याकडे बघत होती. अहाहा! ती सुंदर कमनीय

तनू आणि तिची अधोन्मिलित लाजरी दृष्टी माझ्या मनाला रेशमी जाळ्यात गुंतवून बांधून टाकते".

अधोमुखीं ती लज्जिता, सरता रतिसुखसंग।
पाहत मिटुनी पापणी, वसनें विगलित अंग॥
खुलतें तन सुकुमार तें, पापणीत मधुरैन।
खुले न तरि मन बांधते, अर्धे उघडे नैन॥६५५॥

* *

६५६ **कियौ सयानी सखिनु सौ, नहिं सयानु यह, भूल।**
दुरै दुराई फूल लौ क्यौं पिय-आगम-फूल॥६५६॥

प्रियागम

परकीया आगतपतिका नायिकेनं आपल्या मित्राचं आगमन सखीपासून लपवून ठेवलं. पण तिची प्रफुल्लता पाहून सखीनं ते नेमकं ओळखलं. ती म्हणते, "अग प्रियकराचं आगमन तूं लपविलंस, तरी फुलाची प्रफुल्लता आणि आनंपसुगंध काय कोंडून ठेवता येतो! तो बाहेर पडायचाच!"

चतुरे लपविसी प्रियागमा, नसे उरांत उसंत।
प्रफुल्लता तव सांगते, आला मधुर वसंत ॥
फुली फुले सर्वांग हे, लपे न बाइ सुगंध।
डोळे झांकुनि आपुले म्हणसी इतरां अंध॥६५६॥

* *

६५७ **आयौ मीतु बिदेस तैं काहू कह्या पुकारि।**
सुनि हुलसीं, बिहँसीं, हँसी दोऊ दुहुनु निहारि॥६५७॥

प्रियवार्ता

दोन परकीया नायिका, एकाच पुरुषावर अनुरक्त आहेत. दोघीही मैत्रिणी असल्या तरीही प्रेमप्रकरणं परस्परांच्या चोरून चाललेली आहेत. नायक विदेशी गेल्यामुळे दोघीही दुःखित होतात. परस्पर सहानुभूतीमुळे ही संवेदना आहे असं त्यांना वाटत होतं, तरी मनात संदेह होताच. एक दिवस दोघीही एकत्र असता 'तो येणार आहे' ही वार्ता त्यांच्या कानावर पडली. त्याचं नाव ऐकताच दोघीही आनंदित झाल्या आणि एकमेकीकडे पहात बसल्या. गुपित उघड होताच प्रसन्नतेनं मनांतून खदखदल्या.

'आले ग प्रिय' कळतां तया कुणी घेतले नांव।
उल्हासित दोघीजणी, उचंबळे अनुभाव॥
हसून निरखिति परस्परां सूचक ते दृग हेर।
प्रसन्न मिळुनि हासती गुज येतां बाहेर॥६५७॥

अनुक्रमणिका

६५८ **जद्यपि सुंदर, सुघर, पुनि सगुनौ दीपक-देह।**
तऊ प्रकासु करै तितौ, भरियै जितैं सनेह॥६५८॥

स्नेह शोभा

मानिनी नायिकेला सखी समजविते की, “त्याच्याशी स्नेह करण्यातच तुझी शोभा आहे, अग, तुझा सुवर्ण सुडौल, आणि सुगुणी देहदीपक, स्नेहावाचून प्रकाशमान होणार नाही. त्याच्याशी स्नेह जोड”.

सुडौल सुगुणी सुंदरा सुवर्णदीपक देह।
प्रकाश देई तोवरीं उरी जोवरीं स्नेह॥६५८॥

* *

६५९ **पलनु प्रगटि, बरुनीनु बढि नहिं कपोल ठहरात।**
अँसुवा परि छतिया, छिनकु छन छनाइ, छिपि जात॥६५९॥

विरहाश्रू

दूती नायकाला नायिकेची विरहव्यथा कथन करते. “तिच्या हृदयातील विरहताप एवढा वाढला आहे, की आंच लागून कढत आसूं पापणीत तरळतात. त्यांची धार गालावरून वहात जाऊन, थेंब थेंब वक्षःस्थळावर पडताच, तापलेल्या तव्यावर पडल्याप्रमाणे सळकन् जळून जातात”.

विरहताप हा वाढता, कढे तिच्या हृदयांत।
आच लागुनी येइ ती भरूनियां नयनांत॥
पापणीत तरळती वाहती ओघळती गालांत।
पडतां पक्षी आसवें जळती सळळ पळात॥६५९॥

* *

६६० **फिरि सुधि दै, सुधि द्याइ प्यौ, इहिं निरदई निरास।**
नई नई बहुऱ्यौ, दई! दई उसासि उसास॥६६०॥

वेडी विरहिणी

नायिका विरहव्यथेने बेशुद्ध पडली आहे. पोपटाचा ‘पिऊ, पिऊ’ शब्द कानी पडताच ती सावध होते, प्रियकराच्या आठवणीनं पुन्हा तिचा ताप वाढतो.

‘पिय पिय’ पोपट बोलता, आठव जागृत होय।
देत हुंदका उसासते, नयनीं भरलें तोय॥
हा दैवा छळिसी कसा, अचेत भाव निराश।
थकली वेडी विरहिणी सुनमुन होय हताश॥६६०॥

* *

अनुक्रमणिका

६६१ **समें-पलट पलटै प्रकृति, को न तजे निज चाल।**
भौ अकरून करूना करौ इहिं कपूत कलि काल॥६६१॥

कलिप्रभाव

काळ बदलला की सगळचं बदलत. कलिच्या प्रभावानं करुणाकर प्रभूही अकरुण झाला आहे.

काळ पलटतां पाउलें पडती उलटी चरल।
अकरुण हो करुणाकरही येतां हा कलिकाल॥६६१॥

* *

६६२ **पार्‍यौ सोरु सुहाग कौ इनु बिनु हीं पिय-नेह।**
उनदौंहीं अँखियाँ ककै,कै अलसौंहीं देह॥६६२॥

चतुर सवती

नायिका आपल्या सवतींच्या डोळ्यातील लाली आणि त्यांचे आळसलेले देह पाहून संशयाने दुःखीत झाली. सखी सांगते. "अग हे सारं तुला चिडविण्याचं ढोंग आहे. तूं सदा कुढलेली राहिलीस तर पतिच्या मनातून हळू हळू उतरशील असा त्यांचा डाव आहे. हे लक्षात घे, आणि सावध रहा. एका रात्रित नायक सगळ्याकडे राहील हे संभवतं तरी का?"

नयनिं जागरण लालिमा, आळसलेले देह।
धूर्त सवति या दाविती नसतांही पतिस्नेह॥६६२॥

* *

६६३ **इन दुखिया अखियानु कौं सुखु सिर ज्यौई नाँहि।**
देखै बनै न देखतै, अनदेखैं अकुलाँहि॥६६३॥

कुचंबणा

नायिका आपल्या प्रियसखीला सांगते, "सखे, माझ्या लोचनांना एवढं देखील सुख नाही ग,! पाहिलं तर लाजेनं चूर होतात न पाहिलं तर उताविळ होतात, अन् जीवाला चैन पडत नाही."

नाहीं ग सुख लोचनां, दुःखच देई दैव।
उचले नच ती पापणी, छळिते लाज सदैव॥
पाहुनिही नच पाहती, होती लाजुन चूर।
परी पाहिल्या वाचुनी लागे मनि हूर हूर॥६६३॥

* *

अनुक्रमणिका

६६४ **लगी अनलगी सी जु बिधि करी खरी कटि खीन।**
किए मनौ वैं हीं कसर कुच, नितंब अति पीन॥६६४॥

कटिबंध

सखी नायिकेच्या कटीची क्षीणता व कुचनितंबाचा भरदारपणा, याची नायकाजवळ प्रशंसा करते. "तिची कंबर इतकी बारीक आहे, की तो साधा दिसत देखील नाही. पण उरली भर घालून तिचे स्तन, आणि नितंब भरदार बनविले आहेत".

दिसे न सांधा जोड तो, विधि करि अति कटि क्षीण ।
उरली ती भर घालुनी नितंब कुच अति पीन॥६६४॥

* *

६६५ **छिनकु उघारति, छिनु छुवति, राखति छिनकु छिपाइ।**
सबु दिनु पिय-खंडित अधर दरपन देखत जाइ॥६६५॥

गोड चावा

रात्री चुंबन घेताना नायकानं तिच्या ओठावर आपला दंश उमटविला आहे. नायिका दर्पणात बघून, कधी त्यावरून हात फिरविते, बोटांनी चाचपते. पुन्हा पुन्हा ओठात दाबून लपविते. असा तिचा स्मृतिचाळा चालू आहे.

क्षणिं लपवी, क्षणिं स्पर्श करी, दाबुनि अधरीं राही।
दिन भरि प्रिय खंडीत अधर ती दर्पणिं लाजत पाही॥६६५॥

* *

६६६ **मुँहु परवारि, मुडहरु भिजै, सीस सजल कर छवाइ।**
मौरु उचै घूँटेनु तैं नारि सरोबर न्हाइ॥६६६॥

ओलेती

नायक, नायिका जलाशयात न्हात असताना तिच्या रमणीय हालचालीचं मित्राजवळ वर्णन करतो. "गुडगे मोडून ती जरा खाली झुकली आणि ओंजळीनं अंगावर पाणी घेऊन तिनं आपलं वस्त्र ओलचिंब केलं."

नारी न्हात सरांत की लावण्यच मनचोर।
जलवलयीं प्रतिबिंबिता, नाजुक कलती कोर।
वाकविते गुडघे जलीं, करांजली जलधार।
सिंचित वक्षीं कामिनीं भिजवी वस्त्र तुषार॥६६६॥

* *

अनुक्रमणिका

६६७ **कोरि जतन कोऊ करौ, तन की तपनि न जाइ।**
जलौं भीजे चीर लौ रहै न प्यौ लपटाइ॥६६७॥

भिजले चीर

विरहव्याकुळ प्रौढा नायिका आपल्या सखीला म्हणते. "कितीही उपाय केले तरी ही आग शमत नाही ग, चंदन, कापूर विंझणवाळा या कशानंही ती शांत व्हायची नाही. प्रियकराचं भिजलेल्या वस्त्रासारखं पुलकित आलिंगन लाभेल तेव्हाच ती शमेल."

केले किती सायास ग शमे न हा अनुताप।
चंदन लेप न शांतवी, विंझण केकिकलाप॥
अखेर एकच, उपाय हा शमवी जीव अधीर।
प्रियालिंगनीं भासते वेढित भिजले चीर॥६६७॥

* *

६६८ **चटक न छाँडतु घटत हूँ सज्जन-नेह गँभीरू।**
फीकौ परै न, बरु फटै, रँग्यौ चोल-रँग चीरु॥६६८॥

सज्ञन स्नेह

सज्ञनांचा स्नेह कधीही आटत नाही. ऋणानुबंध तुटत नाहीत. पक्के रंग दिलेले वस्त्र फाटले तरी रंग विटत नाही.

घटे न सज्ञन स्नेह हा सुटतो ना अनुसंग।
फाटुनि जाई चीर ते, फिका न होई रंग॥६६८॥

* *

६६९ **दुसह बिरह दारुन दसा, रहै न और उपाइ।**
जात जात ज्यौं राखियतु प्यौ कौ नाऊँ सुनाइ॥६६९॥

तुझे नांव

नायिकेच्या विरह व्यथेची सखी आलोचना करते. "विरहानं तिची दशा अगदी दारुण झाली आहे. आता दुसरा कसलाच उपाय उरला नाही. तुझं नाव घेताच मात्र जाता जाता तिचे प्राण परत येतात".

दुःसह विरह दारुण दशा न उरे उपाय आत।
नांव तुझें ऐकतां परतती जातां जातां प्राण॥६६९॥

* *

६७० **फिरि फिरि दौरत दौरत देखियत, निचले नैंक रहैं न।**
ए कजरारे कौन पर करत कजाकी नैन॥६७०॥

अनुक्रमणिका

काजळले डोळे

परकीया नायिका गच्चीवर उभी राहून, उपपतीला इकडे तिकडे पहात शोधित आहे. सखीला ते चंचल डोळे कुणासाठी सैर भैर फिरताहेत हे ठाऊक आहे. तरी तिची चेष्टा करीत ती म्हणते, "सखे तुझे हे डाकू डोळे काजळ माखून, आता कुणावर दरवडा घालणार आहेत?"

काजळ माखुनि लोचनें, धरुनी सावध मौन।
आज कुठें ग दरवडा घालति डाकू दोन॥६७०॥

* *

६७१ **को छूट्यौ इहिं जाल परि; कत, कुरंग अकुलात।**
ज्यौं ज्यौं सुरझि भज्यौ चहत, त्यौं त्यौं उरझत जात॥६७१॥

कुरंग पाश

प्रोषितपतिका नायिका सखीला म्हणते, 'जो मनुष्य फासात फसला, तो सुटण्याच्या प्रयत्नात अधिकच गुरफटला जातो. कवी हरिणावर अन्योक्ती करून म्हणतो.

पाशातुनि कोणि सुटे न या, धडपड वृथा कुरंग।
अधिकच गुंते तोडतां सुटत गुरफटे अंग ॥६७१॥

* *

६७२ **अब तजि नाउँ उपाव कौ, आए पावस-मास।**
खलु न रहिबौ खेम सौं केम-कुसुम की बास॥६७२॥

कदंब केसर

प्रोषितपतिका सखीला म्हणते,"सखे आजवर मला वाचविण्याचे तू अनंत उपाय केलेस पण उपयोग झाला नाही. आता असू दे. वर्षाऋतूचे दिवस आले आहेत. कदंब फुलांचा सुगंध घेत जगणं आता मला कठीण वाटतं."

नांव नको नि उपाय ते, आला पावसमास।
सहज नसे ग राहणे घेत कदंब सुवास॥६७२॥

* *

६७३ **लसै मुरासा तिय-स्त्रवन यौं मुकतनु दूति पाइ।**
मानहु परस कपोल कै रहे स्वेद-कन छाइ॥६७३॥

अनुक्रमणिका

मोतीवेल बुगडी

तिच्या कानातील चमकदार मोतीवेल बुगडी, त्या सुंदर मुलायम गालांना सारखी कुरवाळीत असल्यामुळे, त्या स्पर्शानं तिचं अंग पुलकित होऊन गालावर घर्मबिंदूची महिरप उतरते.

मोतिवेल बुगडी रुळे, कुरवाळी अलुमाल।
पुलक स्वेद कण रंजिता खुलती दोन्ही गाल॥६७३॥

*   *

६७४ **मिलि परछाहीं जोन्ह सौं रहे दुहुनु के गात ।**
हरि राधा इक संग हीं चले गली महिं जात ॥६७४॥

चंदेरी छाया

गल्लीमध्ये कुठं चांदण पडलेलं आहे तर कुठं अंधारछाया आहे. सखी सखीला सांगते. शाम आणि राधा एकत्र बोळीतून जाताना कुणालाच दिसले नाहीत. ते एकएकटेच जात आहेत वाटलं. कारण छायेत शामछबी विलीन व्हायची आणि राधा एकटीच दिसायची आणि चांदण्यात गौरांगी राधा मिसळून जायची तो शामही एकटाच वाटायचा."

छाया कौमुदि झांकती उजळि देह अनुरुप।
पाणंदीतुनिं चालता दृश्य दिसे अपरुप।
चांदण्यात ये सावली, विरे सावळा रंग।
सावलीत ये चांदणे राधा माधव रंग॥६७४॥

*   *

६७५ **बिधि, बिधि कौन करै; टरै नहीं परैं हूँ पानु ।**
चितै, कितै तैं लै धऱ्यौ इतौ इतैं तन मानु ॥६७५॥

मुलखाचा राग

सखी मानिनी नायिकेला म्हणते. "तुझा राग अगदी मुलखावेगळा आहे बाई, तो तुझ्या कितिदा पाया पडला तरी तुझा राग काही ओसरला नाही. एवढा मोठा अहंकार या इवल्याशा नाजुक देहात कसा ग मावतो!"

पाया पडताहि ना सुटे सखे घातली आण।
काया नाजुक, एवढा कसा मावतो मान॥६७५॥

*   *

६७६ **मोर चंद्रिका, स्याम-सिर चढि कत करति गुमानु।**
लखिवी पाइनु पर लुठति, सुनियतु राधा-मानु॥६७६॥

अनुक्रमणिका

मोरचंद्रिका

अग मोरचंद्रिके! तुला श्रीकृष्णानं डोक्यावर धरलं, म्हणून एवढा अभिमान बाळगू नकोस! तू केव्हा तरी राधिकेच्या पायावर पडशील हे लक्षात असू दे, तिचा मान तुझ्याहून मोठा आहे. ती शामसुंदराच्या हृदयात बसलेली आहे.

मोर चंद्रिके शाम शिरीं धरिसि उगा अभिमान।
पायीं पडशिल राखितां, राधा सखिचा मान॥६७६॥

* *

६७७ **चिरजीवौ जोरी, जुरै क्यौं न सनेह गँभीर।**
को घटि; ए वृषभानुजा, वे हलधर के बीर॥६७७॥

चिरजीवी

राधिका स्वभावानं हट्टी तर श्रीकृष्ण अति खट्याळ. एकदा राधा रुसून बसली. कृष्णानं तिला समजावल पण तिचा मान काही उतरेना. तेव्हा श्रीकृष्णही राग धरून बाजूला बसले. दोघेही हटवादी कुणीच कुणाशी बोलेना. त्या दोघानांही हसविण्याच्या उद्देशानं एक चतुर गोपी त्यांच्या कानी जाइल एवढ्या मोठ्यानं म्हणते. "अग यात कोण कुणाला हार जाणार व दोघंही आपापल्यापरी थोर आहेत. ती आहे वृषभानुजा आणि ते आहेत हलधराचे बंधू. असलं हे युगुल चिरंजीव असो! वृषभाची अनुजा व हलधर हे वृषभाचे बंधू. मग पशुवृत्ती कशी सुटावी?"

चिरजीवी हो युगुल हे, जुळे न स्नेह गंभीर।
हटवादी वृषभानुजा, हलधर अनुज अहीर॥६७७॥

* *

६७८ **औरै गति, औरै बचन, भयौ बदन-रँगु औरु।**
द्योसक तैं पिय-चि चढी कहैं चढैं हूँ त्यौरू॥६७८॥

अंग अंग बोलकें

सखी म्हणते "गडे तुझा एकंदर रंग ढंग, मुख तेज, बोलण्यातील मार्दव, हे सर्व, तू भिवया चढवून बसलीस तरी मुखर होऊन सांगतात की कुठं तरी पाणी मुरतंय, आणि कुणाच्या तरी चित्तात तुला अधिवास मिळालेला आहे."

बोल आगळे, ढंग हा गालीं रंग गुलाल।
चढविसी भिवई तरि कळे, चोरा चित्त बहाल॥६७८॥

* *

६७९ **बेंदी भाल, तँबोल मुँह, सीस सिलसिले बार।**
दग आँजे, राजै खरी एई सह सिंगार॥६७९॥

अनुक्रमणिका

सहज श्रृंगार

नायिका स्नात होऊन, सहज शृंगार करून बसली आहे. सखी तिचं वर्णन करून नायकाच्या भेटीची उत्सुकता वाढवते.

भालीं कुंकुम तांबूल मुखीं, ओला कुंतल भार।
अंजन नयनी साजतो, तिला सहज श्रृंगार॥६७९॥

*   *

६८० **अंग-अंग-प्रतिबिंब परि दरपन सैं सब गात।**
दुहरे, तिहरे, चौहरे भूषन जाने जा॥६८०॥

कांति वलय

सखी नायिकेच्या नितळ अंगाचं वर्णन करून नायकाचं कुतुहल जागविते. “तिच्या नितळ अंगसुवर्णाचं व अवयवाची प्रतिबिंबे परस्परावर पडून दर्पणासारखी कांतिवलये निर्माण होतात आणि त्यामुळं अंगावरील आभूषणं एका जागी अनेक वाटतात.”

अंग बिलोरी आरसा, नितळ कोवळे लिंब।
अगणित दिसती भूषणें पडे बिंब प्रतिबिंब॥६८०॥

*   *

६८१ **सधन कुंज-छाया सुखद सीतल सुरभि-समीर।**
मनु है जातु अजौं वहै उहि जमुना के तीर॥६८१॥

श्रीकृष्णाभास

श्रीकृष्ण मथुरेला गेल्यानंतर, विरहकातर गोपिकांचा शोकसंवाद. - “सख्यांनो, श्रीकृष्ण गोकुळातून गेले, तरी त्यांच्या पदरजांनी पावन झालेल्या या गोकुळ वृंदावनाच्या परिसरात, अजूनही त्यांचा भास होतो आहे.”

सोडुनि जाई गोकुळा, सरला रास विलास।
आठवितां मनमोहना अजुनि होय तो भास॥
रमतें मन क्रिडास्थळीं, कदंब यामुना तीर।
सधन कुंजछायेत वा सुखद सुगंध समीर॥६८१॥

*   *

६८२ **मोहिं भरसौं, रीझि है उझकि झाँकि इक बार।**
रुप-रिझवान हारु वह, ए नैना रिझवार॥६८२॥

अनुक्रमणिका

झाक झरोका बाइ

नायकाला प्रत्यक्ष पाहिल्यावर, त्याच्या सौंदर्यानं ती मोहित होईल आणि तिच्या मनात प्रेमोद्‌भाव होईल या हेतूनं सखी म्हणते, “त्याला एकदाच पाहिल्यानंतर तू देहभान विसरशील, अशी मला खात्री आहे. एकदा त्या झरोक्यातून वाकून बघ तरी, आज तो इकडे आलेला आहे.”

पहा झरोका झाकुनी एकदांच ते रूप।
एका ठायीं नांदती गुणकीर्ती अनुरूप॥
पुरा भरवसा सखे मला, मदन मनोहर देह।
गुणग्राही डोळे तुझे सहज लाविती स्नेह॥६८२॥

*　　　　*

६८३ **भौंहनु त्रासति, मुँह नटति, आँखिनु सौं लपटाति।**
ऐंचि छुडावति करू, इँची आगैं आवति जाति॥६८३॥

नको ऽ, नको नं

परकीया नायिका, पहिल्यानं नायकानं हात धरताच जी हालचाल व अविर्भाव दाखविते, त्याचं वर्णन सखी सखीजवळ करते. “तिचा हात धरताच भिवयांनी भीती दाखवित, तोंडानं, ‘नकोऽ नं’ म्हणत डोळ्यांनी देह वेढते हात ओढीत सोडवीत स्वतःच झोक पुढे जाऊ देते.”

भिवई भिववित वाकडी, वदनीं उहुं उहुं बोल।
डोळे भिडवित बोलतां हात देतसे झोल॥
येत जवळ ती हळु हळूं सोडवीत मणिबंध।
मला न अवडे, जा, नको भलता सलता छंद॥६८३॥

*　　　　*

६८४ **रुक्यौ साँकरैं कुंज-मग करतु झाँझि झकुरातु।**
मंद मंद मारुत-तुरंगु खूँदतु आवतु जातु॥६८४॥

निराश क्लेशा

विप्रलब्धा नायिका संकेत निकुंजात, नायक न भेटल्यामुळे निराश झाली. तिला तो सधन कुंज, आणि मंद शीतल वात अतिदुःखदायी वाटू लागला. घोड्याच्या टापाखाली देह तुडविला जावा, असा तो समीर तिला तुडवित आहे असं वाटलं.

सखि संकेत निकुंजि या, घनतम वाट निरुंदा।
वाहत मंद समीर तुरंग, तुडवित देह कबंध॥६८४॥

*　　　　*

अनुक्रमणिका

६८५ **जदपि लौंग ललितौ, तऊ तूँ न पहिरि इक आँक।**
दा साँक बढियै रहै, रहै चढी सी नाक॥६८५॥

लवंगफल

क्रोध आला असता स्त्रिया आपल्या अंगावरील दागिने उतरून टाकतात. मलीन वस्त्रे परिधान करतात. पण नासिका भोंडी ठेवणं सौभाग्यदृष्ट्या वर्ज्य आहे म्हणून त्यावेळी एखादी लवंग नाकात खोचतात. शठ नायक गोड गोड बोलून तिला झुलवीत आहे. तो तिच्या लवंगफूल घातलेल्या नासिकेची प्रशंसा करतो, "तुझ्या नासिकेत हे लवंगफूल शोभून दिसतं खरं, पण मला वाटतं ते तू घालू नयेस. तुझ्या नाजुक चाफेकळीसारख्या नाकाच्या पडद्यांना ते झेपत नाही. ते नेहमी चढल्यासारखं वाटतं, आणि खरोखरीच शंका येते की खरोखरीच हिचा राग नुसता नाकावरच आहे."

लवंग फूल सुशोभिता नासिक सुंदर देह।
चढलें भासे तें सदा, येत मनीं संदेह ॥६८५॥

* *

६८६ **बरजै दूनी हठ चढै, ना सकुचै, न सकाई।**
टूटत कटि दुमची-मचक, लचकि बचि जाइ॥६८६॥

झुलवंती

अज्ञातयौवना झुल्यावर बसून पाय मारीत सारखी झोके घेते आहे. सखी, तिला असला अवखळपणा करू नकोस म्हणून अडविते तरी ती दुप्पट उत्साहानं दुमची घेत वर वर झोका चढविते. तिच्या हट्टी स्वभावाचं, तिच्या सूक्ष्म कटीचं सौकुमार्य आणि लचक व नवयौवन सुलभ अल्लडपणाचं, सखी कौतुक करते.

झोके घेई झरझरा, निर्भय ती निस्संग।
पदर फडफडे वरि उडे, उघडे पाहित अंग॥
लवचिक लवते चारुता, लचकत दुमची घेत॥
तुटेल कंबर वाटते झुलवती झुलकेत॥६८६॥

* *

६८७ **कर समेटि कच भुज उलटि, खऐं सीस-पटु सारि।**
काकौ मनु बाँधे न यह जूरा बाँधन हारि॥६८७॥

नजरबंदी

नायिका अंबाडा बांधीत असता तिची मनोहर हालचाल पाहून नायक स्वगत म्हणतो, "उलट्या भुजा करून, हातांनी केस सावरून विंचरीत पदर खाली घरंगळलेली, केसांचा अंबाडा बांधणारी ही मनमोहिनी कुणाला भुरळ पाडणार नाही."

भुजा उलट धरि, कुंतल विंचरि पदर सारुनि दूर।
वेणी बांधित बांधते, नजर, गुंतवी ऊर॥६८७॥

*   *

६८८ **पूछैं क्यौं रुखी, परति, सगि बगि गई सनेह।**
मन मोहन-छबि पर कटी, कहै कँट्यानी देह॥६८८॥

कांटेरी देह

उपपती नायकाला पहाताच नायिका रोमांचित झाली आणि तिच्या भालावर धर्माबिंदू महिरले. सखीनं असं काय? विचारतांच ती उदास रुक्षतेनं काही तरी सांगून मनातली गोष्ट टाळते. पण तिचा हा आविर्भाव जाणून सखी म्हणते, "अग त्याला पहाताच तू स्नेहानं चपचप भिजलीस मग अशी रुक्षतेनं का बोलतेस! तू त्या मनमोहन रुपाला भाळलीस हे तुझा हा काटेरी देहच बोलतो आहे."

रुक्ष बोलसी कां सखे, चिंतन तें दिनरात।
अंग अंग हे जाहलें, स्वेद बिंदु कण स्नात॥
मनमोहन छबि पाहतां, उरि दाटला स्नेह।
अंतरंग उघडे करी हे काटेरी देह॥६८८॥

*   *

६८९ **सोहत औढें पीत पटु स्याम, सलौनैं गात।**
मनो नीलमनि-सैल पर आतपु परयौ प्रभात॥६८९॥

निळे उन्ह

सुंदर शामल देह, पीतपट शोभत, सरता रात।
नीलमणी शैलावर जणुं की उगवे ऊन्ह, प्रभात॥६८९॥

*   *

६९० **भाल लाल बेंदी, ललन, आखत रहे बिराजि।**
इंदुकला कुंज मैं बसी मनौ राहु-भय भाजि॥६९०॥

सुमंगला

नायिका स्नानपूजन करून बसली आहे. तिच्या भालावर लाल टिळा लागला असून काही अक्षताही चिकटल्या आहेत. सखी त्या शुचिर्भूति सौंदर्याचं वर्णन करते. "भालावरील लाल तिलक आणि त्यावरील अक्षता अशा दिसतात की जणु चंद्राच्या कळा राहूच्या भितीनं मंगळाच्या आश्रयाला आल्या आहेत."

भाली कुंकुम अक्षता, राहु भयें भयभीत।
इंदुकला लपली गमे, मंगल ग्रहीं पुनीत॥६९०॥

*   *

६९१ **अग अंग छबि की लपट उपटति जाति अछह।**
खरी पातरीऊ, तऊ लगै भरी सी देह॥६९१॥

गुलछडी

सखी नायिकेच्या देहद्युतीचं वर्णन नायकाजवळ करते. "तिच्या अंगांगाची झळक परावर्तित होऊन वाढल्यामुळं ती सडपातळ असली तरी रसरशीत भरल्यासारखी वाटते."

झलक उजळ नित अंग तें नितळ गौर सुकुमार।
सडपातळ चण कामिनी देह दिसे भरदार॥६९१॥

*   *

६९२ **दृग थिरकौंहें, अधखुलैं, देह-थकौंहें ढार।**
सुरत सुखित सी देखियति, दुखित गरभ कैं भार॥६९२॥

गर्भकांति

कुणा गर्भवतीचं वर्णन कवी रसिकतेनं करतो. "गर्भभारानं दुःखित जड अर्धे उघडे डोळे, देह शिणलेला, अशी ती सुरतरंगाच्या थकव्यानं सुखावलेली रमणी या गर्भकांतीनं किती खुलून दिसते!"

भारवती बहुदुःखिता, सुरतसुखी रतिरंग।
लोचन स्थिर अति थकित ते गर्भरेशमी अंग॥६९२॥

*   *

६९३ **बिहँसति, सकुचति सी, दिऐं कुच-आँचर-बिच बाँह।**
भीजैं पट तट कौं चली, न्हाइ सरोबर माँह॥६९३॥

ओले सौंदर्य

स्नान करून ओलेत्याने जलाशयातून बाहेर येणाऱ्या नायिकेची तनुशोभा नायक रसिकतेनं मित्राला सांगतो. "सरोवरात स्नान करून ओलेती किनाऱ्यावर येत असता, तिनं कुचावरून आडवे हात बांधून घेतले. संकोचानं इतस्ततः पाणी उडवीत व आपले प्रतिबिंब तरलित करीत ती विरलवसना ओलेती तिरावर आली."

सावरीत चिर ये तिरीं, लगबग ओलीचिंब।
जलवलयीं तें गोरटें तरल दिसे प्रतिबिंब॥
अलिकुलपुंज कलक तें सलिलीं रक्त सरोज।
भिजल्या पदरीं झांकते भुजबंधांत उरोज॥६९३॥

*   *

अनुक्रमणिका

६९४ **बरन, बास, सुकुमारता, सब बिधि रही समाइ।**
पँखुरी लगी गुलाब की गात न जानी जाइ॥६९४॥

गुलाब-गंधिता

सखी, नायिकेची तनुलालिमा, सुगंधा आणि सुकुमारिता इत्यादी वर्णन करून नायकाला सांगते, "तिच्या देहाला चिकटलेल्या गुलाबाच्या पाकळ्या वेगळ्या दिसून येत नाहीत. गुलाबाचा सुगंध व सौकुमार्य तिच्या देहाशी तद्रुप झाले आहेत."

प्रीति सुगंध सुकुमारता, सुवर्ण रमणीरंग।
गुलाब पाकळी वेगळी दिसे न मीलित अंग॥६९४॥

* *

६९५ **रंच न लखियति पहिरि यौं कंचन सैं तन, बाल।**
कुँभिलानैं जानी परै उर चंपक की माल॥६९५॥

सुवर्ण चंपक

नायिकेच्या सुवर्णकांतीची सखी प्रशंसा करीत म्हणते. "तिच्या कांचनकायेवर सोनचाफ्याची माळ स्पष्ट दिसूनच येत नाही इतकी तिच्या सुवर्णकांतीत मिसळून जाते. माळ कोमेजल्यानंतरच तिचं अस्तित्व कळून येते."

दिसे न कंठी घातला, कांचन तनु सुकुमार ।
कळेल कोमेजतां उरीं लोळत चंपक हार॥६९५॥

* *

६९६ **गोधन, तूँ हरष्यौ हियैं धरियक लेहि पुजाइ ।**
समुझि परैगी सीस पर परत पसुनु के पाइ ॥६९६॥

गौरव गर्व

कुणा व्यक्तीचा सन्मान झाल्यावर (पद्मश्री मिळाल्यावर) ती व्यक्ती उगाच अभिमानानं मिरविते. गोवर्धनावर अन्योक्ती करीत कवी म्हणतो, "हे गोवर्धना! क्षणभर मनांत हर्षित होऊन थोडा वेळ तू आपलं पूजन करवून घे. पण त्यानंतर थोड्याच अवकाशात तू पशूंच्या पायी तुडविला जाशील, तेव्हा या बहुमानाचं सुख तुला कळेल!"

गोवर्धन, पळ पूजिता, गर्वित होसी काय।
गोमय गिरि शिर तुडविती वनीं पशूंचे पाय॥६९६॥

* *

६९७ **मुहुँ धोवति, एडी घसति, हसति, अनगवति तीर।**
धसति न इंदीबरनयनिं कालिंदी कैं नीर॥६९७॥

अनुक्रमणिका

पुलिन लीला

नायिका यमुना स्नान करायला आली आहे. नायकही तिथे आलेला आहे. ती उगाच किनाऱ्यावर रेंगाळत आहे. पाण्यात शिरायला मुद्दामच विलंब लावीत आहे. नायकाला बघण्यासाठी उगाच तीरावर ही टंगळमंगळ, चालू आहे. हे तिचे मनोवांछित व त्यानुसार घडणारी हालचाल सखी सांगते.

मुख मार्जित, कधिं हासते, कधिं ती घासत टांच।
रेंगाळत तिरावरी चाळा करी उगाच।
किरण नेमका साधते, चोरनजर अविनीत।
शिरे न इंदीवर लोचना कालिंदी जलि शीत॥६९७॥

* *

६९८ **बढत निकसि कुच-कोर-रुचि, कढत गौर भुजमूल।**
मनु लुटि गौ लोटनु चढत, चोंटत ऊँचे फूल॥६९८॥

लावण्याची लूट

नायकानं नायिकेला उंच वृक्षावरील फूल तोडताना पाहिलं. हात उंचावून आणि हनुवटी पुढे करीत आणि कलता वाक घेऊन ती फूल तोडीत होती. पाठीला वाक मिळाल्यामुळे वक्षाचा टणक उभार, आणि अंचल सरल्यामुळे तिचे बाहूमूल मंदोदर व नाभिकमल दृग्गोचर झालं. हे कमनीय दृश्य पाहून नायक वेडावला. तो आपली चित्तावस्था सखीला सांगून तिच्या भेटीची उत्कंठा प्रगट करतो.

तोडित कलती कोर ती उंचावरले फूल।
उचलि चिबुक तळवे वरी मान गळत दुकूल॥
उठुनि दिसे कुच कोर ती, कांतिगौर भुजमुल।
सर पदर मंदोदरी त्रिवली पाडित भूल॥६९८॥

* *

६९९ **अहे, दहेंडी जिनि धरै, जिनि तूँ लेहि उतारि।**
नीकैं है छीकैं छुवै, ऐसैंई रहि, नारि॥६९९॥

चित्ररमणी

शिंक्यावर दहीहंडी ठेवताना नायिकेची हालचाल नायकाला अतिशय मोहक वाटली. त्या अवस्थेचं रम्य चित्र थोडावेळ बघावं म्हणून तो तिला म्हणतो, "अग ती दह्याची दुतली शिंक्यावर ठेऊ नकोस, तशीच धरून काही वेळ उभी रहा. लोभस चित्र माझ्या मनावर कोरून घेऊ दे."

दुधली तो शिंक्यावरी, भुजा, उभारुनि ऊंच।
उतरि न ठेवी गोरटी, आवरी दुग्धप्रपंच॥

असुं दे दुधली तिथेच ती राही उभी तशीच।
चित्ररमणी तूं भासशी, शिल्पाकृती नवीच॥६९९॥

७०० **न्हाइ पहिरि पटु डटि, कियौ बेंदी-मिसि परवानु।**
दग चलाइ घर कौं चली बिदा किए घनस्यामु॥७००॥

सलील स्नान

नायिका यमुना स्नान करते आहे. कृष्ण मुरली वाजवीत वाकड्या डोळ्यांनी तिच्याकडे पहातो आहे. स्नान करीपर्यंत दोघांच्याही दृष्टीचा प्रणयलपंडाव चालू होता. नायिकेला वाटलं त्याचं इथं उभं रहाणं बरं नव्हे. आणखी इतरही गोपिका नदीवर येतील. या शंकेनं तिनं वस्त्र नेसल्यावर बिंदी लावण्याच्या बहाण्यानं, श्रीकृष्णाला प्रणाम करून तिथून निघून जाण्यासाठी डोळ्यांनी खुणावलं".

कालिंदीजलिं राधिका, पुलिनिं उभा श्रीरंग।
न्हाउन नेसे वसन ती, चतुरा झाकित अंग॥
कर उचलुनि करि प्रणाम ती, कुंकु लाविता भालि।
खुणवि लोचनें जावया तिथूनि दूर वनमालि॥७००॥

* *

७०१ **ज्यौं हैहौं, त्यौं होउँगी हौं, हरि अपनी चाल।**
हठु न करौ, अति कठिनु है मो तारिबौ, गुपाल॥७०१॥

मी पापी इरसाल

कुणी भक्तकवी श्रीकृष्णाला अतिशय सुकुमार समजून भावविव्हलतेनं म्हणतो. "कृष्णा, मी इरसाल पापी आहे. मला तारणे तुम्हाला अतिशय कष्टदायी होईल. तेव्हा हे कार्य तुम्हाला झेपणार नाही. तेव्हा हे प्रभो, तुम्ही वृथा श्रम घेऊन माझा उद्धार करू नका."

कठीण अति मज तारणें, पापी मी इरसाल।
नका शिणवुं अपुल्या जिवा, ताराया गोपाल॥७०१॥

* *

७०२ **परसत पोंछत लखि रहतु, लगि कपोल कैं ध्यान।**
कर लै प्यौ पाटल, बिमल प्यारी-पठए पान॥७०२॥

गोविंद विडे

नायिकेनं नायकाकडे गुलाबपाकळ्यात गुंडाळलेले गोविंदविडे भेट म्हणून पाठविले. नायकाला, त्या गुलाब पाकळ्या पाहून तिच्या दोन्ही कपोलांची व ओठस्पर्शाची सुखद आठवण झाली. तो ते विडे नुसता कुरवाळीत रहातो.

अनुक्रमणिका

कलीदार तें कोंवळे नागवेलिचें पान।
गोविंदविडा पाठवी बांधुनि प्रेमनिधान॥
पुसत हळूं करि परवसे, मूक चेतवी काम।
गुलाब पाटल, आठवीं कपोलस्पर्श मुलाम॥७०२॥

* *

७०३ **बामा, भामा, कामिनी कहि बोलौ, प्रानेश ।**
प्यारी कहत खिसात नहिं पावस चलत बिदेस ॥७०३॥

शेजेची कामिनी

नायक वर्षाऋतूत विदेशी जायला निघतो आहे. नायिकेला 'प्रिये लाडके' असे संबोधून तो धीर देतो. 'प्रिये' हा शब्द ऐकून नायिका म्हणते. "हे प्राणेश्वरा! तुम्ही मला 'प्रिये' म्हणून यावेळी तरी दुखवू नका. भांडखोर, स्वार्थी, शेजेची बाइल काय वाटेल ते म्हणा! या वर्षाऋतूत आपण दूर विदेशी जायला निघालात, तेव्हा जाते वेळी 'प्रिये' म्हणून मला का छळता! वास्तविक असं संबोधताना तुमच्या मनाला काही वाटायला हवं! मी प्रिय असते तर या वर्षाकालात असे सोडून गेला नसता. त्यापेक्षा मनात अन् ओठात अंतर न ठेवता सरळ 'शेजेची कामिनी' म्हणून खुशाल निघून जा."

क्रूर होउनी चालला, लागतांच बरसात।
जातिल उडुनी प्राण हे तळमळता दिनरात॥
वामा, भामा, कामिनी, म्हणा प्रणयिनी, हूर।
'पिया' म्हणुनि कां टोचतां सोडुनि जाता दूर॥७०३॥

* *

७०४ **उठि, ठकु ठकु एतौ कहा पावस कैं अभिसार।**
जानि परैगी देखियौ दामिनि घन-अँधियार॥७०४॥

कृष्णाभिसार

नायिका पावसाळी रात्री कृष्णाभिसार करून संकेत स्थळी जायला निघते. काळी साडी ती नेसलेली आहे. अभिसाराला उशीर झाला म्हणून सखी घाई करीत तिला म्हणते, "चल गडे, तुझा शृंगारसाज लौकर आटोप नाही तर वेळ चुकेल. पावसाळी अंधारी रात्र आहे. काळे ढग चहुकडे जमुन आले आहेत. त्यातून तू कुणाला दिसलीस तर वीज चमकल्याचा भास होईल एवढंच!"

चल बाई ग लौकरी, पाहिल आतुर वाट।
कळे व कोणा पाहुनी असुं दे आतां थाट॥
पावसांत प्रियमीलना, जरि काळा अभिसार।
तरि बिजली परि भासशी भंवति सघन अंधार॥७०४॥

* *

अनुक्रमणिका

७०५ **कैवा आवत इहिं गली रहौं चलाइ, चलै न।**
दरसन की साधै रहै, सूधे रहैं न नैन॥७०५॥

लाजवंती

परकीया नायिका डोळे भरून नायकाला पहाण्याच्या आशेनं उतावीळ झाली आहे. पण लज्जेमुळं ती आशा मनातल्या मनातच राहते.

बघत रहावें सारखे मुख तें पुरे न आस।
दृष्टभेट होतांच ती कंप सुटे देहास।
काय करूं सखि विवश हे लोचन येति न तोंच।
वर उचलेना पापणी उरी लाज संकोच॥७०५॥

* *

७०६ **बेंसर मोती, धनि तुहीं ; को बूझै कुल, जाति।**
पिबौ करि तिय-ओठ कौ रसु निधरक दिन राति॥७०६॥

बेसर मोती

नायक नायिकेवर अनुरक्त झालेला असून, तिच्या अधरपानासाठी आतुर झाला आहे. तिच्या ओठावर रुळणाऱ्या बुलाक मोत्याचा त्याला हेवा वाटतो. तो आपुली असूया नायिकेला व्यक्त करतो.

(बेसर) बुलाक मोती धन्य तो, कुणि न विचारी जात।
अधर माधुरी चाखतो धीटपणें दिनरात॥७०६॥

* *

७०७ **तिय-मुख लखि हीरा-जरी बेंदी बढै बिनौद।**
सुत-सनेह मानौ लियौ बिधुपूरन बुधु गोद॥७०७॥

चंद्रवात्स्यल्य

सखी नायकाजवळ नायिकेच्या हिरेजडित बिंदीची उत्प्रेक्षेनं प्रशंसा करीत नायकाला भेटीची अनुकूल वेळ सुचविते. "तिच्या भालावरील जडाव बिंदीची अप्रतीम शोभा पाहून कुणाला आनंद होणार नाही? जणु काय पुत्रवात्स्यल्यानं चंद्रानं बुधाला आपल्या अंकावर घेतलं आहेसं वाटतं."

हिराजडित बिंदी मुखीं पाहुनि हो आनंद।
जणुं घेई अंकावरी बुधवात्स्यल्यें चंद्र॥७०७॥

* *

७०८ **गोरी गदकारी परैं हँसत कपोलनु गाड।**
कैसी लसति गवाँरि यह सुनकिरवा की आड॥७०८॥

गावगौर

कुण्या ग्रामीण सुंदरीच्या निरागस सौंदर्याचं रसिक वर्णन करतो.

हसे निरागस गोरटी, गावगौर भरदार।
खळी पडे गालीं सजे सोनबिंदि जरतार॥७०८॥

* *

७०९ **जौ लौं लखौं न, कुल-कथा तौ लौं ठिक ठहराइ।**
देखैं आवत देखि हीं, क्यौं हूँ रह्यौ न जाइ॥७०९॥

विपरीत रीत

उच्च कुलातील आचरण, कुललाज, इत्यादी उपदेश करणाऱ्या सखीला नायिका म्हणते, “कुलाचरण, रीतभात, लोकलाज, याची पत्राज तोवरच चालते, जोवर त्याला बघितलं नाही. एकदा ते रूप पाहिलं, की सारी रीत सुटते विपरीत वागण्यातच आनंद वाटतो.”

दृष्टी पडे ना जोंवरी पाळित मी कुलरीत।
पहातांच परि एकदां, घडे सर्व विपरीत॥७०९॥

* *

७१० **सामाँ सेन, सयान की सबै साहि कैं साथ।**
बाहुबली जयसाहिजू, फते तिहारैं हाथ॥७१०॥

रणरंग

कवी राजा जयसिंहाच्या रणचातुरीचं वर्णन करतो.

संगरांत रणचातुरी, असो सैन्य चतुरंग।
बाहुबली जयशाह हो विजयशालि रणरंग॥७१०॥

* *

७११ **यौं दल काढे बलक तैं तैं, जयसिंह भुवाल।**
उदर अघासुर कैं परैं ज्यौं हरि गाइ गुवाल॥७११॥

रणधैर्य

जयसिंहाचे रणधैर्य.

अरिघेरांतुनि सोडवी सेना जयभूपाल।

अनुक्रमणिका

अघासुरी उदरांतुनी जेंवि गाइ गोपाल॥७११॥

* *

७१२ **घर घर तुरकिनि, हिंदुनी देतिं असीस सराहि।**
पतिनु राखि चादर, चुरी तैं राखी जयसाहि॥७१२॥

विजयशालित्व

विजय शालित्व.

घरांघरांतुनि तुरकिनी, हिंडुनि देति अशीश।
राखिसी चादर, बांगडी जयसिंहा नतशीश॥७१२॥

* *

७१३ **हुकुमु पायि जयसाहि कौ, हरि राधिका-प्रसाद।**
करि बिहारी सतसई भरी अनेक सवाद॥७१३॥

उपसंहार

कवी या सत्सईचा उपसंहार करताना म्हणतो, "जयसिंह नृपाच्या आदेशानं आणि हरि-राधिकेच्या प्रसादानं, ही नवरसरुची सतसई बिहारीनं रचली आहे."

प्रसाद हा हरिराधिका, दे जयनृपआदेश।
रची बिहारी सतसई नवरसरुचि संदेश॥७१३॥

* *

पर्यायी भाषांतर

शतक पहिले

२ **यौवन उदारता** : स्वजन जाणुनी आपुलें उदार यौवन भूप।
नितंब, स्तन, मन, नयन ते विस्तारी अनुरूप॥२॥

३ **यौवनागम** : चित्त, चतुर, पण लाविती हे हटवादी नैन।
मिळेल मन्मथ थोरवी, कुणा अधिक सुख चैन॥३॥

७ **यौवनचंद्रिका** : कळतो म्हणुनी बाइ ग सुरम्य रूपविकास।
भास न ही चंद्रानना सांगे सखि सहवास ॥७॥

१० **कांतिविवतृ** : कामसुंदरा भोवतीं चित्त फिरे अनिवार।
भोवऱ्यांतली नांव की सुटे लाजव्यापार॥१०॥

११ **गजेंद्रतारक** : पडे न कानीं काय ही हाक अहो हे तात।
सोडिलेस कीं ब्रीद तें ‘गजेंद्रतारक’ नाथ॥११॥

१५ **दुःखानंद** : होई सासर सोडतां खेद प्रीतिचे बंध।
आतुरता माहेरची देत मना आनंद॥१५॥

२० **बेसर** : श्रुतिभूषण ताटंक ते घेइ अधोगत मान।
नासिकेतली बेसरी घेइ सदा सन्मान॥२०॥

२८ **दिठोणा** : गालि दिठोणा लावि ती कधी न लागो दीठ।
दृष्टी सारखी लागते, खुलवी शोभा तीट ॥२८॥

२९ **मानापमान** : नयनिं तिच्या उपहास, तयाच्या लोचनांत स्मित हास।
मानिनिचा अभिमान जाणुनी जिवलग करी निरास॥२९॥

३० **कठपुतळी** : आलोकित जनमंडळा, परते दृष्टि समोर
कठपुतळी परि थांबली पाहुनियां मनचोर॥३०॥
(मंत्र कटोरी परि ठरे पाहुनिया मनचोर)

३८ **अकाल भोग** : १ रस भरला नच गंध वा, दिसे न सुमन पराग।
उलली ना ती पाकळी, कळे न तिज अनुराग
परी कळीवर भाळला, भ्रमर खुळा स्वच्छंद।
आजच इतुका धुंद, मग पुढें आनंदी आनंद॥३८॥

२ नच होय अजून विकास पुरा, फुलले न पराग तिला पुरते।
रसकेसरिं ना मधुगंध भरे, उलली नच पाकळि कोष रिते॥
तरिही कलिकेवरि भाळुनियां, अलिगुंजित फेर धरी भंवती।
कामांधपुरा आतांच असा, पुढती मग होइल काय गती!॥३८॥

३९ **पाउस झड** : १ तव विरहाचा वन्हि हा अधिक चेतवी, नीर।
तापकालही तापवी, जळे झळीत शरीर॥३९॥

अनुक्रमणिका

२ पाउसझड ही वाढवी तव विरहाची आग ।
उन्हाळझळ तनु जाळते, अधिकाधिक हो आग ॥३९॥

४० **यौवन ज्योति** : १ अंग अंग उजळीत ये जैसी यौवन ज्योति।
तशी तशी तव सवतिची मलूल हो मुख कांति॥४०॥
२ वयें वाढती रक्तिमा, मदनाचें वरदान।
चढे मुखावर काजळी, सुटे सवतिचा मान॥४०॥

४१ **दृग परीस** : जगत जयानें दाविले, तया पाहिले नाहीं।
जरी पाहती भोवती, नेत्र न नेत्रा पाही॥४१॥

४२ **मंगल गुरूचंद्र** : मंगल कुंकुम, केशरी गंधचिरी मुखचंद्र।
शुभ गुरू ग्रह युति संगमीं, प्रणय लोचनीं धुंद॥४२॥

४५ **नगमृगया** : १ खेळवि शिकवि काननीं चतुर शिकारी मार।
नरमृगया ती नैनमृगा, लक्षवेध श्रृंगार॥४५॥
२ लक्षवेध भ्रूभंग तो धीट साजश्रृंगार।
तेढे काजळ तीर ते करिति घाव सुकुमार।
बेसावध सावजास या देत सारखी हूल।
नच लागे चाहूल ही, नच वाजे पाऊल॥४५॥

४६ **तिचे डोळे** : नेत्र निरागस ते तिचे लीलारस श्रृंगार।
काजळहीन करिती जळीं कमळांचा परिहार॥४६॥

५२ **स्वयंदूतिका** : लपते तरू छायेतुनी, विसांवते सदनांत
भरदुपारची सावली जेष्ठातील उन्हांत॥५२॥

५३ **डोळ्यांचे पारणे** : दाखवि गे मुखचंद्र तो. सुखशीतल चांदणे।
फिटुं दे बाई आमुच्या डोळ्यांचे पारणे॥

ओढणीतला चंद्र : चंद्रकांत पाझरेल ग लालस लोचन धुंद।
कर कौतुक करि मोकळा, ओढणीतला चंद्र॥
पाहतांच मुखचंद्र तो, फुलतील नयनसरोज।
सरोष सवती देखतां, असुया उडवि उरोज
असुयेनें भरतां पिसे, हो सवतीचे हसे।
दडुनी लांछन दाविती चंद्रावरले ससे॥५३॥

५५ **मायाविनी सांज** : १ त्रिविधरंग वरि लोचनें, मायाविनि ती सांज।
लपति मीन जाली कमले मिटती संकोचित ये लाज॥५५॥
२ सायंतन मायावी, नयन नटति त्रिविध रंग।
जलवलयी लपति मीन संकोचित कमलभृंग॥५५॥
३ मायावी सांजेपरी नयन त्रिविध रंगलीन।
संकोचित कमलभृंग, जलवलयीं लपति मीन॥५५॥

अनुक्रमणिका

५६	**व्यथेची कथा**		पहा तरी चल सखे जरा, उचल पाय करि घाई। मरणीं मरता मिटली व्यथा, हाय न बोलत कांही॥५६॥
५८	**नयन मारिती मूठ**	१	आज कळेनां कां अशी कृपा तुझ्या डोळ्यांत। लावण्याची लूट ही कोणाच्या दैवांत॥५८॥
		२	आज कळेना लागले डोळे कुठे अतूट। कुणा भाग्यवंतास ही लावण्याची लूट॥५८॥
५९	**गुणमहिमा**		अरसिक ते हेटाळती अनादरे गुणवंत। गुणसुगंध तो वाहता नसे तयाला खंत। गुणमहिमा नच हो कमी बघती डोळस अंध पिन्नस रोग्यातें जसा, सोरा कापुरगंध॥५९॥
६०	**पहिले पत्र**		'पत्र लिहूं मी काय सुचेना,' लाजत ती लिहितांही । तुझे नि माझे हृदये एक तें कथील सारे कांही ॥६०॥
७०	**शरसंधान**		सहज जिंकिते मन्मथा. अचूक शरसंधान । हरिणी नयनाहुनि ही सुंदर नैन हरिति हरि प्राण ॥६७॥
७१	**जगरीत**	१	किती हाकारु विठ्ठला येसि न अजुनी हाय!! जगन्नाथका जगंरीत ही तूहि पाळसी काय?॥७१॥
		२	जगन्नायका कशि रे तुला ऐकुं न येई साद। जगरीतीला तूंहि का देसि असा प्रतिसाद॥७१॥
७३	**पंचाग तिथी**		कलापूर्ण तो पाहतां सुंदर सखि मुखचंद्र। पौर्णिमाच तेथे सदा संभ्रमांत जनवृंद॥ चंद्रोदय तो सारखाइंदूवदन विकास। पंचांगाविण ना कळे. तिथीहि शेजारास॥७३॥
७४	**अग्निदिव्य**		अशोकवनिं ती जानकी आठवीत अभिराम। दशवदनीं संकोच हा, करी विवश मन शाम॥ अग्नि दिव्य करते पहा प्रीती पावन पाप। विरहानलिं जाळीत ती जीवन. द्या उःशाप ॥७४॥
७५	**मीलनमोह**		अम्हास नको तव युक्ति दुजी, मनमोहन मीलन मुक्ति खरी रे भेटवि, भेटवि प्राण सखा, सजणासह प्रिय हो नरकपुरी॥७५
७७	**मंतरलेला गूळ**	१	अभिमंत्रित साखर खडा, चाखुनिया बेचैन – भारूनि जाती मागुती छबिलोलुप हे नैन॥७७॥
		२	गोडरुप खडिसाखरी खुचानी मंत्रित भाग। चटावली ही लोचने निघती मागोमाग॥७७॥
८२	**रद दंश**	१	झिजले सोनें बुगडिचे, मिळे सुवर्णी गाल। रदन दंश तो भासतो चिन्ह, उमटले लाल॥८२॥

अनुक्रमणिका

२ सुवर्ण विरले सुवर्णांत या गालीं कर्णफुलांचे।
रदन दंश कीं चिन्ह लालसर उरले तें नवलाचे॥८२॥

८३ **गुंतागुंत** : मला दिलें मन राजसा, देऊं नका कुणास?
गुरफटला गुंतला जीव हा, लाऊं नका हो फास॥८३॥

८४ **चटक पहाट** : कुंजांतुनि जाऊं या घरी, पहाट झाली शाम।
गुलाबकळि चटकाहट करि उलतांना अभिराम॥८४॥

८५ **पंजर कीर** : कुलकलहा भिउनी कुलशीला, कथी न लंपट दीर।
सुके रातदिन मांजरापुढे पंजरांतला कीर॥८५॥

८७ **अनंग चोर** : कुचशैलीं लपले पहे अनंग घातक चोर।
कुचलावे तरि तया कसे हाच जिवाला घोर॥८७॥

९० **कर्पूरगौरी** : हासत कंठातली. दिनीं त्या, दिलीत लवंगमाळ।
कापरापरी त्या प्राणाचे तीच करील संभाळ॥९०॥

९१ **लक्षित शाम** : कोटि नको. दश कोटि नको. धनसंपद संग्रहिता विभवें।
भवतारक संकटमोचन तो, प्रभुचरणी केवळ लक्ष हवें॥९१॥

९३ **रानगौरी** : १ तरणी अजाण ती गौरी मळवट भरलें भाल।
मुरके कटि कर ठेऊनी—सहज करी घायाळ॥९३॥

२ गौरांगी रानगौराई, तरणी नटमोगरी।
रेखिली लाल कुंकाची कपाळी आडवी चिरी॥
मुरके, थरके, फिरके, कटीवर कर ठेऊनी।
करी घायाळ ते डोळे नेमके घाव घालुनी॥९३॥

९५ **विपथ मनोरथ** : स्नेहसुगंधित कुंतला, तरल स्निग्ध शुचि शाम
पथ विपथ सुचे ना मना, बघतां ते अभिराम॥९५॥
[कुरल बटा गालावरती रुळती केस चुकार
मन माझे ओढाळ हे गुंतवि नवती नार॥]

९६ **झाकाझाक** : अधर झाकशी ते जरी, दिसे सहज प्रियसंग।
चुंबनलाली आगळी, पुसतां तांबुल रंग॥९६॥

९७ **मदन गुलेल** : मोत्यांची मणिमाळ ती उमटविते उरझेल।
मतंगमन वळवीत ने मारित मदन गुलेल॥९७॥

९८ **हिरवी डहाळ** : विरहें जळली जरि प्रेमलता, नच कोमजली नित होय नवी।
नवयौवन पल्लव पालविता, लतिका दिसते हिरवी हिरवी॥९८॥

१०० **दंतद्युति** : आवर हासूं आपले, सखे सोड ती खोड।
दंतद्युति अंधारवी, तें न चांदणे गोड॥१००॥

(शतक पहिले पूर्ण)

* *

अनुक्रमणिका

शतक दुसरे

१०४ **भ्रूभंग** :
कुंकू कंकर भ्रूधनू, मदन खेचितो बाण।
भाल तिलक चंद्राकृती, भेदित हरिण अजाण॥१०४॥

१०७ **किति ग समजाऊ** :
हां हां, करिता आम्ही हारलो, पडला तो पाया।
तरिही ताठा तुझा सांगतो, तयास परताया॥१०७॥

१०८ **रागाविर्भाव** :
केले ग मी हृदय कठिण हें ऊंच ओढिल्या भिवया।
रुक्ष बोलले, मान मुरडली, नच दावियले विनया॥
आव आणिला असा, तरी ग काय करूं मी बाई।
तया पाहतां आवरते किति दृष्टिच हासत राही॥१०८॥

१११ **गर्वकठोर** :
कृपण संपदा वाढता, होती गर्वकठोर।
अधिकच वैभव लाभता, उरोज होति मुजोर॥१११॥

११३ **तांबुलपीक** :
रागे भिवई चढविशी चंचल नयनीं तीख।
श्रुतिमणि कपोल झाक ती, नव्हे ग तांबुल पीक॥११३॥

११४ **उत्कंठिता** :
१ विरहाने अतिक्षीण हो, दिसे न देह मुलाम।
अवचित ज्योत विकासते तुझें ऐकतां नाम॥११४॥
२ दिसून येईना मुळीं विरहें तनु ती क्षीण।
तुझे नाम परि ऐकतां फुलते ज्योति नवीन॥११४।

११५ **कुठें कंठिली रात** :
१ नभलाली चाळते निशा, झुंजमुंज येइ प्रभात।
वनमाली तरि येइना, कुठे कंठिली रात॥११५॥
२ नभलाली उमटली सखे, चिंवचिंव होय पहाट।
न ये शाम रमला कुठें, भिजवी काजळकांठ॥११५॥

११७ **वळणाचे पाणी** :
कुंतल ते कुलवंत ही श्रेष्ठपदी हो लीन।
ताठरती कुच नीच ते, विभव संपता दीन॥११७॥

१२१ **आगळीरीत** :
कळे न अनुरागी हृदयाची आगळीच ही रीत।
शामरंगिं रंगता चित्त हें उज्वल होय पुनीत॥१२१॥

१२३ **प्रेममुद्रिका** :
नवी नवी नवलाइची पहिलीच प्रेममुद्रिका।
पुन्ह पुन्हां तिला पाही साक्षीची प्रीतचंद्रिका॥
चुंबिते घालतें बोटीं प्रेमें हृदयास लाविते।
संकोचे काढुनी मुद्रा, पोटीं खोचून ठेविते॥१२३॥

१२६ **गोरस चोर** :
१ वाटेवर कां अडवितां धरा जनाची लाज।
गोरस घ्याया या घरी, लाभे तो ब्रिजराज॥१२६॥
: २ वाट अडवुनी मागशी, धरी मनाची लाज।
मिळेल सदनीं साजणा, गोरस तो रस आज॥१२६॥

१२७ **मीलन संकेत** :
१ कांतारी यमुनातिरीं मधु गुंजित अलिपुंज।

अनुक्रमणिका

तमालतरू आलिंगतो मालति मीलन कुंज॥१२७॥

: २ उन्ह उतरतां घेइ विसावा, कलित ललित अलिपुंज।
यमुनातीरीं तमालतरु आलिंगित मालति कुंज॥१२७॥

१२८ **गोदान** : हंसुनि अडवि तो घालतां कळपामध्ये गाय।
मुरकुनि ती तिज सोपवी, चतुरा कंपित काय॥
सुचवी, ठेवा लक्ष तें, परते घाई घाई।
डोळे भेटित येति की पाण्यावरती गाई॥१२८॥

१३० **मूकसंमति** : रति विपरीत करावया विनवी प्रिया समीप।
हसे हळूच न बोलतां, विझवी फुंकुन दीप॥१३०॥
(दावित दीप हसे हळू विझवी फुंकूनि दीप)

१३९ **पापणीतले चोर** : हंसी परि ती पाउले डगमग डोलत नार।
चालत ती मनहंसिका थबकत पैंजण झार॥
घेति वळण तें वाकडे पापणीतले चोर।
चित्त चोरुनी चोरटे, जाती लाउनि घोर॥१३९॥

१४४ **विरजण** १ पडवीतुनि ती परतली हासत हळूंच आंत।
‘विरजण न्याया विसरलें’ जीव लाउनी जात॥१४४॥

२ पडवीतुनि परतली शेजि ती विरजण न्यायासाठी।
दृष्टभेट होता ह्रदयाच्या पडती प्रेमळ गांठी॥१४४॥

१४७ **खंजनचाप** : पायरीवरी आपुल्या नुकते आले मी बाहेर।
मला पाहतां खुणाविति हासत ते डोळ्यांचे हेर॥
आणि सखे ग खंज नयन, मन बांधुनि लावी चाप।
नेई ओढत वनीं पाय हें वळती आपोआप॥१४७॥

१४८ **समाधान** : १ विरह दुःख हे सहे न दोघे समान दुःखित व्हावे।
मरणांतरि ती सुटे, एवढे समाधान मानावे॥१४८॥

२ विरहांतच या संपुनि जाई प्रीतीचा संसार।
सुखी होय ती मरणानंतर समाधान साचार॥१४८॥

१४९ **प्रीतीसंकेत** : अमित्रासवें पाहतां हंसत करी संकेत।
ठेवि शिरी कर, लाविते उरी, कळविते हेत॥१४९॥

१५० **व्रजवणवा** : कळेन होइल काय बाइ ग व्रजास वणवा लागे।
डोळ्यांना या आग लागली मानस जळते माझे॥
सोसवे न धग मुळीं जिवाला, पेटत वाहे वारा।
अधाशीच हा अग्नी गिळतो अविरत अश्रूधारा॥१५०॥

१५३ **डोळ्यांची लाली** : १ सरितेत सख्यासह करितां जलक्रीडा राजसवाणी।
ओंजळी भरुनि पिचकारी डोळ्यांत उडवितो पाणी॥

अनुक्रमणिका

जिवलगा, चेष्टितें असली पाहतांच रमणीवृंद।
रक्तिमा भरे सर्वांगी लोचने जाहली धुंद॥१५३॥

२ जलक्रीडा करिता हरी निरखित ती नवनारि।
सरिता सलिलीं चेष्टितें करित कसा बनवारि॥
नयन नवोढेचे भरी करपिचकी जल मारि।
होती लोचन लाल ते बघतां दुसऱ्या नारि॥१५३॥

१५५ **विपरीत रति** : राधा धरि कृष्ण वेष, कृष्ण होय राधा।
वेषांतर करुनि युगुल हरति विषय बाधा॥
अंतरता वेषांतर अंगना अनंगा।
रति ती विपरीत सहज सुरत येत रंगा॥१५५॥

१५७ **निलाजरे नैन** : चंद्र पाहुनि धावती घेती आतुर वेग।
कटाक्ष किरणी नाहती सरता शामल मेघ॥
अचपल मन हें सांगना सखे आवरू कसे।
ससेमिरा हा लाविती हे डोळ्यांचे ससे॥१५७॥

१५८ **मेले लोभी** : भरले सुंदर रुप तें नख शिख हृदयीं घ्यास।
पहावया एकदां तरी, गालावर स्मित हास ॥
अडले डोळे हे तिथें कसा आवरूं क्षोभ।
अति लोभी ही लोचनें सुटे न यांचा लोभ॥१५८॥

१५९ **त्रिपाद भूमी** : बळी देत विश्वासिता, -- घेत बळी भूदान।
बटुवामन झारीतला शुक्र करी थैमान॥१५९॥

१६१ **अंतर्यामिन** : हृदय मंदिरीं ती बसे, मूर्ति मनोहर शाम।
जगी रूप प्रतिबिंबते तेजोमय अभिराम॥१६१॥

१६२ **अचानक भेट** : सखे वडाच्या दाट वनांतुन किती भटकलें बाई।
वाट दिसेना कुठें भीतिनें मन चिंतातुर होई॥
धरुनि ठेविती वटपारंब्या, मिठी मारूनी देही।
तोंच अचानक मुकुट सावरित तिथें सावळा येई॥
दैवच माझें देव भेटला, संकटांत लवलाही।
हात धरोनी वाट दाखवी, शामसखा सुखदायी॥१६२॥

१६३ **प्रियागम** : १ विरहि वसन तनु म्लान कुंतली गुंतावळ निस्नेह।
प्रियकर येतां कांति मुखावर रोमांचित हो देह॥१६३॥

२ मलिन वसन तनु केश गुंतले, विरहे म्लान स्वरूप।
प्रियागमीं मुखकांति आगळी, शोभा ती अनुरूप॥१६३॥

३ म्लान तनू निस्नेह कुंतल वसन मलीन।
येतां जिवलग कांति मुखीं ये रोमांचित दृग लीन॥१६३॥

अनुक्रमणिका

१६४	**विरहकातर**	:		प्रेम पत्रिका उरीं लावते, नयनिं वहाते नीर। कातरते ती विरह कातरी देत मनाला धीर॥१६४॥
१६७	**कायव्यूह**	:		नृपति छबी प्रतिबिंबवी अगणित शीशमहाल। मन्मथ जग जिंकावया काया मायाजाल॥१६७॥
१७३	**संभ्रमिता**	:		नव्हे चुना तो अधरीं तुझिया, बेसरमोती झाक। पदराने पुसतेस सारखी, जाइ न पुसतां लाख॥१७३॥
१७५	**वैरी सौरभ**	:		विकसित नवमालतिचा परिमल पसरित मंदसमीर। वाहुनि विरही हृदय जाळि तो पहिला पाउस, नीर॥१७५॥
१७८	**कंदुक गोल** *चौगान ['पोलो' सारखाच घोड्यावरून खेळण्याचा मैदानी खेळ.]	:	१ २	चित्त तुरग अनुरागी चुकवित टोलवीत दे झोल। जिंकिशील ग चतुरे मारुनि सहजच कंदुक गोल॥१७८॥ सरसचित्त अनुराग तुरग तो करी उठावण रीत। चकवित चुकवित गेंद टोलवित, होइल तुझीच जीत॥१७८॥ चित्ततुरंगा ॥ टाच ॥ दे करि गे नीट उठाण। चुकवित कंदुक गोल हा जिंकि प्रेम-चौगान*
१८२	**प्रिय आठव**	:		अजुनिहि नयनां सुखविती स्थलें रम्य अभिराम। जिथें जिथें खेळला, राहिला उभा सखा घनशाम॥१८२॥
१८३	**रतिसुखगर्विता**	:		सुरतरंगि रंगलीं रात ती मिठीत जिवलग भेट। गर्वभरें ती मानिनी ठुमके दावित ऐट॥१८३॥
१८५	**नजरचोर**	:		लपे न केली लपवितां रतिकेली नुकतीच। नजर चुकवितां चुकून मिळतां संकोचित हो तीच॥१८५॥
१८६	**नखलेखा**	:		मरकत भाजनिं बिंबली, इंदुकला निरखून। शामलदेहीं उमटली, गमे नखाची खूण॥ आणित मेली कौतुकें, चंद्रकलेचा नूर। उगारला खंजीर हा, चिरतो माझा ऊर॥१८६॥
१८९	**रंससंगति**	:		तनुकांतीत विलीन हो आभरणांचा रग। वस्त्रविहीनच भासते सखिचें सुंदर अंग॥१८९॥
१९२	**मादकसुवर्ण**	:		लक्ष सुवर्णाहून ही मादक मन बेबंद। सुवर्णललना पाहता, होती लोचन धुंद॥१९२॥
१९३	**सज्ञा रज्जु**	:		मन हें डोंबाऱ्यापरी, धरुनी प्रीती सोल। अंधातरीं तें धावते सुटूं न देई तोल॥१९३॥
१९६	**गव्हाळी नागीण**	:		नितळ अंग, सळसळत सावळी नागिण घेत लपेट। डसे जिव्हारी, मुरडून हसे, जाई निघुनी थेट॥१९६॥
१९८	**संगीनसंगर**	:	१	अग्रचमू ही निघे फोडुनि झिरमिर घुंघट गोट। नजरानजर भिडे चतुरंगी घुसला सेनालोट॥१९८॥

अनुक्रमणिका

२ फोडुनि घुंघट गोट अघाडी सेना करी बिमोड।
भिडती नैनानैन संगिनी-संगरीं न तडजोड॥१९८॥

१९९ **केशर किंजल** : अंगि चिकटले ते सखे केशर कुसुम पराग।
जखम नखाची ती नव्हे, उगाच धरिसी राग॥१९९॥

२०० **उलटा फासा** : झाकि प्रियेचे नयन येउनी हळूच मागे, नाथ।
हात परवसे सहज ओळखी दोन कुणाचे हात।
आलिंगित ती ओढुनी खालीं उलटे भुजबंधांत।
अंग अंग दाबून ठेविते मांसल उत्संगांत॥२००॥

(शतक दुसरे पूर्ण)

शतक तिसरे

२०२ **मुकेबोल** : न पाहतांही, मला पाहुनि, हळूंच हलले ओठ।
पुटपुट ती टोचते मनाला, उपहासाचे बोट॥२०२॥

२०३ **अपुरी हौस** : १ विरहकाल नुकतांच संपला झाली कुठें न भेट।
तोच परत जायचे बोलता तोडुनि प्रणय लपेट॥
आली नच ती कांति मुखावर, चढला पुरता रंग।
पुरली हौस न पुरती अजुनी, नच धरले हो अंग॥२०३॥

२ विरहातच सोडून परतता झाली कुठें न भेट।
झाले नाही अजून हिरवें तें वेळूचें बेट॥
कांति मुखावर आली नच तो चढला पुरता रंग। ॥
हौस न पुरली पुरती अजुनी, नच धरले हो अंग॥२०३

२०४ **बकुल माळ** : जवळ घेउनि कौतुकें, धरूनी दोन्ही हात।
बकुळमाळ घाली गळां, स्वकरें गुंफुनि नाथ॥
महिरुनि येई अंग ते यौवन खुले भरांत।
कांति खुलावी अधिक ती नवलाई नवजात॥
थरथरते ती ओवळी नाजुक सुमनसरांत।
जाइजुई ओठीं उले हसे लाज नयनांत॥२०४॥

२०७ **निशाभिसार** : नील वसन नेसुनी निघालिस निशा झाकि अभिसार।
लपविशील कशि दीपशिखेसम देह तुझा सुकुमार॥२०७॥

२१५ **हरिगर्जित** : येता ती हरिगर्जितें सिंव्हाचा हुंकार।
राजबंदिनी रुक्मिणी, हसत करी सत्कार॥२१५॥

२१६ **उन्हाळ झळ** : उन्हाळ झळ ती लागुनी अंकुर तो करपेल।
त्यांत तुझी ही रुक्षता, सुकवी जीवन वेल॥
हृदयी पाझर येउ दे तिला उराशीं झेल।

अनुक्रमणिका

जल सिंचुनिया पालवी, नको करूं रे खेळ॥२१६॥

२२२ **शकुनवंती** :

उत्साहें डोळा लवे डावा सखिचा आज।
स्फुरति भुजा, उत्संग ते, मनीं मोहरे लाज॥
करि श्रृंगाराभिसार ती वसन रेशमी साज।
शकुन अंगिचें सांगाती, येइल ग ब्रिजराज॥२२२॥

२२४ **चुनला खोडा (कदंब चोर)** :

भुज ऊंचावुनि दोन्हिही वरती हात आपुले जोडा।
रवि वंदन ते करा, सांगतो हरि हा चुनला खोडा॥
देइन चुनरी तरीच ही, असे ऐकतां बोल।
खुदकन हसले ओठ सकल ते, कुपित लोचनें लोल॥२२४॥

२२९ **पाहुंतरी** :

पाहतांच ती सुंदरी हुरहुर हो चित्तांत।
सहजच नेइल ओढुनी मन हे हातोहात॥२२९॥
(पाहताच मृदु रेशंमी कांतिगौर ते हात।
मन हे तुमचे मोहना राहिल ना हातात)

२३० **अयाचित** : १

कपर्दकडिची साखळी, आवळले असुबंध।
अलख निरंजन लोचनें, मिटुनि अयाचित धुंद॥२३०॥

मलंग .. : २

कपर्दकडिची साखळी बंध करकचे अंग।
अवघड डोळे बांधुनी पडे अचेत मलंग॥२३०॥

२३६ **जातीची सुंदरा** : १

अलंकार अंगराग काजळ सुर्मा मेंदी रंग।
नकोत, कांचन कांति ती सुतनु, गोजिरे अंग॥२३६॥

२

सहज सुशोभित कांति विलासिनि, तन सुंदर सुकुमार।
नको साज श्रृंगार वेगळा, कशास हा अभिसार॥
अलंकार नच अंजन नयनीं अंगराग बहिरंग।
रक्तगौर प्राजक्त पाउलें मेंदी लाल सुरंग॥२३६॥

२३७ **गुंजमाळ** :

तरुणि कुचावर लोळते, ती गुंजेची माळ।
उच्चपदी वसता गमे, माणिकरत्न सुढाळ॥
फुकाच घेई मोल ती, ठगवी सारा गांव।
तुटतां सूतच, निर्गुणीं घेई मूल स्वभाव॥२३७।
(निर्गुण तुटतां सूत ते, उतरे सारा भाव)

२४२ **प्रणयचेष्टित** :

मी जातां सहजच तिचिया दारापुढें।
ऊंचावुनि भिवई पाहियले मजकडे॥
खांद्यावर उलटा पदर टाकुनि असा।
मंदोदर दावित त्रिवली कुंच गेंदसा॥
थबकते कबूतर लचकत मुरकत उरीं।
कटिबंध झुलविते टपोर नटमोगरी॥

अनुक्रमणिका

हंसापरि वेळित मान मुरडुनि पाही।
दृष्टीस दृष्टी भिडवीत आंत जातांही॥
परि पाय निघेना, थबके क्षण दारांत।
लावुनियां चटका वीज पळाली आंत॥२४२॥

२४३ **नयनगोपन** : हसत हसत बोलशी सहज शशिकले।
प्रणयकांत कौमुदी बघुनि मन भुले॥
लोचनांत इंद्रगोप धुंद रक्तिमा।
गालावर शोभतसे गोड लालिमा॥
भासतेस भामिनी, प्रसन्न कामिनी।
सांग गूढ ते कांय ते, मला विलासिनी॥२४३॥

२४६ **गोडगुलेल** : १ अंग अंग फुलले तिचें दीर ददोरा देह।
हसे मनाशीं लाविता, औषध सखि सस्नेह॥२४६॥
२ आले फुलुनी अंग ते फुले मारितो दीर।
सूज न ती सुजना कळे—हसें मनीं दिलग़ीर॥२४६॥

२४७ **नयनझुंज** : कटाक्ष खर तरवार ती चालवि वारंवार।
ढाल अडविते पापणी सहज झेलिंते वार॥
कटि खाली कधिं नेम घे, करि घावावर घाव।
वक्षावरि सहजी सखी झेलित घाव बजाव॥२४७॥

२४९ **नादिनी** : ध्वनि मुरलीचा ऐकतां—रातदिन तें ध्यान।
गुंजित मिलिंद माधुरी, रुचे न कोकिल गान॥
नाद लागला एक तो सदा काननी कान।
नको श्रवणि ध्वनि अन्य तो, जणूं घातली आण॥२४९॥

२५३ **अंधारी भेट** : अरुंद अंधारली गली – अनोळखी उरभेट।
स्पर्श परस्पर जाणवी, पहिली ओळख थेट॥२५३॥

२५५ **काटेरी डहाळ** : फुला फुलांचा बहर संपला-गेला वसंत काळ।
गुलाब, कुठला, पर्णहीन ही काटेरीच डहाळ॥२५५॥

२५६ **देहदहेज** : १ कड फिरवुनिया झोपशी, सखे नीट सांभाळ।
गुलाब पाकळी लागुनी खरचटती हे गाल॥
एका शेजेवरी न ये नीज राहुनी दूर।
गुलाब चुरतिल बाई ग होतिल मोतीचूर॥२५६॥
२ कड फिरवुनि निजलीस का सांगु तुला किति वेळ।
गुलाब पाकळि लागुनी ओरखडा उमटेल॥२५६॥

३६१ **सगुण दर्शन** : अधमोद्धारा, मुक्ति दे, अधमाधम मी अंध।
बंधनिं तुज संतोष दे सगुण भक्तिचे बंध॥२६१॥

अनुक्रमणिका

२६४ **पुराणरंग** : सांगति पुराण रंगुनी, परकीयांरत दोष।
हसे हळूं कुणि परकिया, खुदकन, दावित तोष॥
अभिप्राय, उपहास तो, कळतां दाबुनी ओठ।
हसूं उमटले लपविती करूनी, वरती बोट॥२६४॥

२७४ **संगम सीमा** : पुण्यमयी ही शुभतिथी, सूर्य संक्रमण काल।
किशोर यौवन संगमी, स्त्रीसुख सुसंधि काल॥२७४॥

२७७ **जळ्ळीमेलीप्रीत** : मरणीं मरते तळमळते ग, मीनेपरि असहाय
जळली मेली असली प्रीती पळपळ वाढत जाय॥२७७॥

२७८ **सवतसंताप** : जपते विरहदशेतही प्राणपतीचे प्राण।
सवतींचा संताप हो, पाहुनि सुटतें भान॥२७८॥

२८० **फाग** : फेकित नयनीं गुलाल तो खेळ खेळतां फाग।
निघे न डोळे चोळिता प्रिय जरि होई आग ॥२८०॥

२८४ **नटपुतळी** : सुंदरतनु ती रंगभू., नटपुतळी रसभाव।
नयनलास्य गति चंचला दावित ललित विभाव॥२८४॥

२८५ **माघातली झळ** : पथिक गावचा सांगतो, माघांतहि ये झळा।
कळून येई तया, विरहिणी ती जीवित प्रेमळा॥२८५॥

२९० **भली रीत** : दिले, परत घेतलें चित्त हें क्षणी फिरविली पाठ।
कुठली शिकला रीत ही, नजर चुकविता वाट॥२९०॥

२९३ **तुझा आठव** : गोपगोपिका गोकुळी झुरती क्षीण शरीर।
ठायी ठायीं वाहते डोळ्यामधले नीर॥
ओसरतो ना ओघ तो जीवन, तुटे न धार
पथा पथांतुनी वाहते नदी अथांग अपार॥२९३॥

२९६ **मनमोहिनी** : यौवन ये नवतनूवरी, सोडुनी शव देश।
प्रिय ती होई प्रियकरा-जातां दूर विदेश॥२९६॥

२९७ **हरिहर** : मनोरमा हृदयी वसे भालिचंद्र, नखरेख।
भले शोभले आज हे हरिहर रूप सुरेख॥२९७॥

२९९ **दीपशिखा** : काजळकाळी रात अंधेरी, कुंजतिमिर घनदाट।
गौरकाय ती दीपशिखेपरी जातां उजळिल वाट॥२९८॥

३०० **कुऱ्हाडीचा दांडा** : पुण्य, स्वार्थ नच, श्रमच वृथा, बाज करी विचार।
स्वैर विहंगा विवश होऊनी करिसि स्वजन संहार॥३००॥

(शतक तिसरे पूर्ण)

*   *

अनुक्रमणिका

शतक चौथे

३०७ **घटिकापात्र** : हरि सलील रूपजलीं लहरि नयन छबि चूर।
बुडति तरति घटिकेपरी होति न पळही दूर॥३०७॥

३१३ **क्षण संयोग** : १ घडिचा प्रियसंयोग हा, धरी न तूं अभिमान।
ज्येष्ठामधली सावली, माघांतच घे प्राण॥३१३॥
२ वेडे गर्व धरूं नको, घडिचा प्रियसंयोग।
छाया ती ज्येष्ठातली, करि माघात वियोग॥३१३॥

३१५ **काजळतीज** : १ सवती सजती सणासुदी येता काजळतीज।
नटती लेउनि भूषणें सरता जागरनीज॥
मुखमलिना भिजली जलें, चुरगळला अभिसार।
पाहुनि चुरलें वस्त्र ते, जळे हृदयिं अंगार॥३१५॥
२ घर्मजलें भिजली तनू, गालीं कज्जल नीर।
मलिन मुखें हो सवतिची पाहुनि चुरले चीर॥३१५॥

३१६ **वाकडीमोड** : अलक, ज्वाल, गड, दृष्टि, भ्रूधनु यांस वाकडी मोड।
तरुणि तुरंगम तान तीं चढता लाविता ओढ॥३१६॥

३१७ **तनुहिंदोल** : १ विरह कृशा ती सारखी फिरतां मनीं उदास।
इकडुनि तिकडे हिंदोलयापरि डुलवि श्वासनिश्वास॥३१७॥
२ विरहानें कृश जाहली फिरे मनांत उदास
हिंदोळ्यापरि देह हा डुलवि श्वास निश्वास॥३१७॥

३१८ **सौंदर्यधुंदी** : सौंदर्याची निशा एकदा चढतां नसे उतार।
उरे न भीती, ठरे न नीती, नीज न लागे तार॥३१८॥

३२० **गवाक्ष विहंग** : अंगमोड ती गोडशी, जातां आळस देत।
दृष्टि लाउनि तो उभा, पुरवि न ती संकेत॥
गवाक्षातल्या दृष्टीची होई गुंतागुंत।
जाता परतुनि ती तुटे, मनास लावी खंत॥३२०॥

३२२ **शोभा भार** : अलंकार हे घालता शोभेचा हो भार।
साहवेन बाई तुला तनु ही तव सुकुमार॥३२२॥

३२३ **साशंक स्वागत** : भृकुटि सरल, सस्नेह नयनही, अधरीं स्मित, मधुबोल।
क्षण क्षण मन साशंक हो, बघुनी भाव विलोल॥३२३॥

३२४ **नको नकोऽन!** : ऊहूं ऊहूं ती करी सारखी करि धरितांच दुकूल ।
भिवई हसत परि सुचविते रतिसमरा अनुकूल ॥३२४॥

३२५ **प्रेमनगरी** : वसती प्रेमनगरची, सुटता सुटे न चाल।
घायाळा आघात हो, घातक फिरे खुशाल॥३२५॥

३२६ **शामारजनी** : चंद्रकला चुनरी निळी तारांकित निशि साज।

अनुक्रमणिका

			इंदुबिंदुली गोजिरी-नीज न येई आज॥३२६॥
३२७	**कुंकुमकांती**	:	अंकावरती बिंदु तो वाढवि दशगुणि (संख्या) मोल। भालीं कुंकुम रेखिता कांति खुले अनमोल॥३२७॥
३२९	**जासवंद**	:	जातां प्रियकर, एकली, शून्य भासते गेह। विरहें सुकली वल्लरी-मलिनकांत कृश देह॥ पिउनि आसवे पालवी हरित भरित हो स्नेह। जळे जवासा, जपा फुले जसा बरसतो मेह॥३२९॥
३३०	**सोनसळी**	:	फिरे हळाळत पाहिले सोनसळी ते अंग। वसन दुकूलहि रंगवी तनू केशरी रंग॥३३०॥
३३१	**मनोसरोज**	:	सलिल संपदा वाढतां वाढत मानसकंज। सुकता सर कोमेजते समूळ पंकजभंज॥३३१॥
३३३	**कांति सौंदर्य**	:	कांचन द्युति तनु कनक तें कळे न कांति स्नात। जाणवती करभूषणें कठोर, धरितां हात॥३३३॥
३३६	**गुपितस्मित**	:	नेत्रपल्लवी चालवी लपत छपत संकेत। नयनभेट होतांच ती स्मित कळवी सुख हेत॥३३६॥
३३८	**रंगत्रिवेणी**	:	गौर करांगळि निळी अंगठी छान । त्रिवेणीत या पावन होती लोचन करितां स्नान ॥३३८॥
३४२	**माघनिदाघ**	:	निशिसुख देई सुदिन हा, किरणें शीतल शांत । फिरे चकोरी संभ्रमे, रवि तो, रजनीनाथ ॥३४२॥
३४३	**तोडगा**	:	दुलई होई तोकडी, उन्हें शीत शिशिरांत। थंडीची ती हुडहुडी मावे ना शरिरांत॥ १ शमे न मेली चावरी, उपाय केलें लाख। फुले निखारा झाकते शेगडीतील राख॥ ऊब हवी ती वेगळी, तीच पहा दे हात। गाढालिंगन ते गडे आणि ऊब देहात॥३४३॥ २ दुलई जाड वा शेगडी, जाय न थंडि उन्हांत । मिठी वाचुनि हुडहुडी निवे न ती शिशिरांत ॥३४३॥
३४४	**उबेचा पळ**	:	१ ऊब पळे थरकापुनी शिशिरशीत भयभीत। कुचयुग दूर्ग निवासिता होई शरण विनीत॥३४४॥ २ ऊब पळे ती चुकवायाते शिशिर थंडिचा त्रास। चढण कठिण गड डोंगरीत या कुचयुगिं करित निवास॥३४४॥
३४५	**उच्छिष्टे**	:	उच्छिष्टें वचनें मुखीं मन दे नच प्रतिसाद। नयन मानधन बोलती, मनांतील पडसाद॥३४५॥
३४८	**मायाविनी**	:	केलें त्याला हातचें गाव गवगवा होय।

ओढ लाविता आपुली दोषमुक्त ती होय॥३४८॥

३५१ **अर्कगौरव** : गुणी गुणीं वाखाणितां निर्गुणी न गुणवान।
अर्क तरू न प्रकाश दे अर्कापरि द्युतिमान॥३५१॥

३५४ **गाढाश्लेष** : १ देहालिंगन देत ती अग्निशलाका वीज।
शीत चंद्रिका भासते, उरीं उगवते बीज॥३५४॥
२ ज्वालेपरि ती लपेट घे, कवळि हृदयिं नवनीत।
सिंचित सजल गुलाब कीं, गेंद उरीं दडपीत॥३५४॥

३५५ **रविचंद्रग्रहण** : भालीं कुंकुम रेखिलें, विखरे कुंतल बंध।
राहू ग्रास करी जणूं, एकसमयिं रविचंद्र॥३५५॥

३५७ **द्विराज्य** : दुःसह द्विराज्य काजीं प्रजा, वाढे दुःखद द्वंद।
धनांधकारी भेटती, अमावसी रविचंद्र॥३५७॥

२५८ **भावगोपन** : प्रियकर जाता अवलोकिता नयनीं आसव येई।
बघतिल मैत्रिणी या भये लटकि जांभई देई॥३५८॥

३६३ **प्रीतिची रीत** : सुखवी अंतर, भेट निरंतर रीत न सुटते नीत।
तुटतां अंतर, तुटे न अंतर दुखवी विरहीं प्रीत॥३६३॥

३६४ **लाडीगोडी** : नजर नाचवित पाहसी, नच अधरीं स्मित राग।
दिसतां मुखीं विराग तो येत मनीं अनुराग॥३६४॥

३६५ **आलिंगानवशेष** : स्नातवेणि रमणीप्रिया, कुंकू ओले केस।
अंगरख्यावर उमटले आलिंगन अवशेष॥३६५॥

३६६ **जलशोध** : ज्येष्ठांतिल जलशोध तो शमवायास तहान।
मरूदेशी टरबूज तें दर्यापरी महान॥३६६॥

३६९ **चतुरमिलिंद** : घे न झेप रसभृंग तो कुस्करि केसर घेर।
मुकुलतनू सुकुमार ती गुंजत धरूनी फेर॥३६९॥

३७० **निर्दयप्रीत** : निर्दय किति ग तूं सखे, कधि न पाहिली रीत।
मरतां मरतां मारणे प्रीत अशी विपरीत॥३७०॥

३७१ **मनोधिःकार** : भजरे भज तूं श्रीहरी, कथिलें देशि न कान।
मूढा भजनीं लागुनि होसि विषयिं रममाण॥३७१॥

३७२ **दर्शन लालसा** : १ दर्शन लालस नेत्र हे जिवा लागली आस।
रुचे दुजे ना कांहिही व्यर्थ सखे सायास॥३७२॥
२ उत्कंठित बहु लागले नेत्र, जिवाला आस।
देशी धीर किती जरी, व्यर्थ दुझे सायास॥३७२॥
३ जिवा लागली आस ही, जाइ न जातां प्राण।
सांगशि ब्रह्मज्ञान मी कोरडाच पाषाण॥३७२॥

अनुक्रमणिका

३७३ **पतंग सावली** : बघत अंगना अंगणीं, प्रियकर उडवि पतंग।
धरायास ती सावली, धांवत स्वैर विहंग॥३७३॥

३७४ **उडता दृष्टीक्षेप** : “तो बघ घेई झेप ग, गगनीं ऊंच कपोत”।
“तरीच डोळे लागले, ये लाजेचा झोत”॥३७४॥
“गगनीं ती बघ बाइ ग, कबूतराची झेप”।
“तरीच हा सौधावरी, उडतां दृष्टिक्षेप”॥३७४॥

३७५ **वाकडातीर** : १ कुटिल कटाक्ष तीर हे, हृदय छेदिती पार।
दुभंगताही, सारखा, उरांत सलतो खार॥३७५॥

३७७ **भाग्यशाली** : २ गुणी खरा गुणवंत तो, धरी न आदरमान।
हसे असूया पाहुनी, भाग्याचे वरदान ॥३७७॥

३७९ **मुद्रादोष** : बघतां प्रियाची अंगठी ती शेजिच्या बोटांतुनी।
“राहुं दे ग आज ही माझ्याकडे” घे मागुनी॥
भेटीत एकांतीं सखी, नुसतीच निरखी बोट तें॥
पति लक्ष तिकडे वेधिते, ओठांत रोषें हासते॥३७९॥

३८१ **दुष्ट ग्रह शांति** : कुणी पुसेना सज्जना, जगीं दुर्जना मान।
दुष्ट ग्रह शांतीस तें देती सुवर्ण दान॥३८१॥

३८२ **समालिंगन** : १ तो तर तिकडे, प्रेमभरानें मला मारिसी मिठी।
वडवानल ना विझे जलानें दे आलिंगन दिठीं॥३८२॥
२ दूर उभा तव जिवलग सखये, उचंबळुनि ये ऊर।
मलाच का ग मिठी मारूनी शमवितेस काहूर॥
विझेल कैसा वडवानल तो, घेता सागर लाट।
मन मिनले जे नयनमीलनीं, बिलग तया घनदाट॥३८२॥

३८४ **विद्युल्लता** : १ शामल तनु घननील तो डोलत जाइ नभांत।
घेत तया विद्युल्लता आलिंगन बंधांत॥३८४॥
२ प्रीती पाहत भीतिनें थरकतसे काळीज।
दे आलिंगन साजणा कडकडता नभिं वीज॥३८४॥

३८६ **कुचस्पर्श** : करूनि बहाणा येइ तो उचलुनि घ्याया मूल।
लागे कुचयुगुला हळू बोटांची चाहूल॥३८६॥

३८७ **मदिर मुग्ध** : १ मुग्धा ती मदिरा पिता करि चाळे स्वच्छंद।
मुग्ध होति प्रिय नयन ही पाहुनिया बेधुंद॥३८७॥
२ मुग्धा होई धिटुकली पीता मदिरा धुंद।
धुंद मदालस लोचनें, करि चाळे बेबंद॥
हसे बरळते बावरी प्रौढेपरि स्वच्छंद।
मधुविलास ते प्रियकरा, दे अधिकच आनंद॥३८७॥

अनुक्रमणिका

३८८ **कुंजसमीर** : किणति भृंग घंटावली, स्त्रवत मधुर मकरंद।
कुंजवसंत समीर हा उधळित भवति सुगंध॥
मथरगति कुंजरापरि वाहत मंद अमंद।
रंग गारुडी गुंतवी हृदयीं नाजुक बंध॥
(हळूच फुंकर घालुनी मुकुलित करि सुमबंध)॥३८८॥

३९३ **चुरचुरते सौंदर्य** : सुंदर अति लावण्य तें स्नेह सुखद हुरहुरती।
कटुवचनें परि बोलतां सुरणापरि चुरचुरती॥३९३॥

३९४ **दृगसंवाद** : १ शपथेवरती सांगतां का मग नयनीं लाज ।
कर न तयाला डर नसे द्या डोळा महाराज ॥३९४॥
२ शपथ घेऊनी सांगता कां मग मन ओशाळे।
धीटपणे द्या माझिया या डोळ्यांना डोळे॥३९४॥

३९८ **नीज हरवली** : भरलें नयनीं रूप तें, हुरहुरते काळीज।
मिटते ना पळ पापणी, कुठे हरवली नीज॥३९८॥

३९९ **प्रीतिजोड** : दोन जिवाच्या प्रीतिची, दूती जुळवी जोड।
तिला टाळुनी शेवटीं, करिती डोळेमोड।
भेटी गाठी चोरुनी, गुजगोष्टी त्या गोड।
दूती झाली दूरची, हवी कशाला धोंड॥३९९॥

४०० **पांचालीचे चीर** : दुःशासन अवधिच हा, द्रौपदिचे चिर हरता।
वाढवितो काल अधिक, विरह वसन तें सरता॥४००॥

(शतक चौथे पूर्ण)

* *

शतक पाचवे

४०१ **भक्त उक्ति** : तारियले नर वानरा, सेतुसागरी जाण।
कसा न तारिल तो तुला, वत्सल भक्तनिधान॥४०१॥

४०२ **पावसाळी डोळे** : पावक झळ सहते तरी, साहे नच बरसात।
जाळि स्पर्श तनु पाहतां, अश्रु झरे नयनांत॥४०२॥

४०३ **वनविहारिणी** : वनविहारिणी हरिणी ती थकित, थकवि दृगचार।
ललित स्वेदकण कलित ती अरुणमुखीं सुकुमार॥४०३॥

४०८ **निरोप** : १ निरोप घेतांना तिचा, बोलवे न हितबोध।
डबडबले डोळे तिचे, करिती कंठनिरोध॥४०८॥
२ डबडबले डोळेच ते घेतां तिचा निरोप।
मौन उभी ती पाहते, पापणीतला लोप॥
उमटेना परि बोल ते, ऐकाया सोत्कंठ।

अनुक्रमणिका

निश्वासांची भेट ती दाटुनि आला कंठ॥४०८॥

४०९ **हितचिंतन** : १ प्रियकर तूं प्राणातें, प्रिय माझे मजसि प्राण।
जगवाया केवळ ते, तळमळते मी अजाण।
तुजसाठीं नच वेड्या, स्वार्थाविण जगति कोण।
मोडियलें माझ्यास्तव, अपुले हे गूढ मौन॥४०९॥

२ प्राणातें प्रिय तूं सख्या, प्रिय माझे मज प्राण।
माझे हित मी पाहते, नव्हेच हे उपदान।
मौन मोडिलें मीच हें, माझ्यास्तव साचार।
वृथा विनय हा दाविता, कशास हे आभार॥४०९॥

४१० **संध्यारुण** : येशि पहाटे तूं तरी, सांज फुले नयनांत।
संध्यारुण एकत्र हा करी चकित सभ्रांत॥४१०॥

४१२ **परिहास लीला** : भालावरि भिवई चढे, मुखीं येति कटुबोल।
लपवी सन्मुख पाहतां हसरे नेत्र विलोल॥४१२॥

४१३ **दृष्टीचे पायपोस** : कधी न लागो मलीन दृष्टी ती लागट लोचनें।
दृष्टीचे ते पायपोस कीं देहावर दागिने॥४१३॥

४१८ **चरणांगुलि** : नितंब स्तन भाराने लवली, लज्जित नवयौवना।
सावरीत तनुतोल चेपिता बोटावर अंगना॥
प्राजक्ताच्या कळ्या लालसर पडतां पायातळी।
अरुणबिंदु सर सुरंग अग्रें सुंदर चरणांगुली॥४१८॥
[नितंब स्तनभारानें लवली नवललना लाजरी
सावरीत तनुतोल अंगना चेपित बोटावरी]

४२० **इंद्रधनुदुहिता** : अरुण अधर, नीलनयन, पीतांबर झळक नवी।
अधरावरि धरि बासरि वंशवेल ती हिरवी॥
नवल सखे अधरि शेज, चेपित हरि अंग अंग।
स्वराधिका कळंकिनी वरित इंद्रधनुष्य रंग॥४२०॥

४२१ **सुखदुःखाचा साज** : मोहसंपदा गुंफिते सुखदुःखाचा साज।
स्पर्श कुणी न करी जरी यदुपति राखिल लाज॥४२१॥

४२३ **चोरवाट** : विझवि दीप, निद्रेत मी असतांना अंधार।
कळेच ना किमया मुळीं, पुरता जादूगार॥
झोपत जवळी येउनी, किती ग बेदरकार।
जागताच परि बंद ते, दिसे लागले दार॥४२३॥

४२४ **अपांगदर्शन** : १ भुजा उचलते घ्यावया, घुंघटपट ती नार।
पाठमोरि हो पटकिनी, दिसू न देइ अनार॥४२४॥

२ “घूंघट घे भुज उचलुनी, अर्धा झाला जीव।

अनुक्रमणिका

मंदोदर, उर अंग ते—दिसे माल राखीव।
घडले दर्शन आंतलें – होता ही जाणीव।
पाठमोरि ही पटदिशी लाजेला ये कींव॥४२४॥

४२५ **त्रिभंगीलाल** : कपटी मी निंदा जगीं होवो दीनदयाल।
सुलभ तुम्हां बसणे हृदीं, अहो त्रिभंगीलाल॥४२५॥

४२८ **निर्गुणमान** : १ पाठदेउनी दूर जात प्रभु गुण विस्तारण काल।
प्रगटत निर्गुण पतंगापरि, निकट धरी भूपाल॥४२८॥
२ गुण दोरीनें पाठ फिरवुनी, पतंग जाई दूर।
निर्गुणीच तो, लहरि नृपाच्या, निकटी चरणीं चूर॥४२८॥

४३३ **छायाग्राहिणी** : स्त्री छबि छाया ग्राहिणी, ओढिल तुज, हा हंत।
स्वरूपसुंदर गेहिनी, मिळूं न देत उसंत॥
भवसागर उल्लंघिता, कुणिही संतमहंत।
गिळते छायाहि ती पहा, सुटे एक हनुमंत॥४३३॥

४३५ **काक व शुक** : उपाशीच शुक पंजरीं, काळाचा संकेत।
पिंड खावया बोलवी, वायस आग्रह घेत॥४३५॥

४३७ **वसंत** : सुकता गुलाब वेल ही, भ्रमर घालिती फेर।
येईल वसंत, आस ही, फुलेल फिरूनी वेल॥४३७॥

४३८ **मूर्खांचे नंदनवन** : नागरजन गुणग्राहिते वाढविती तव आब।
फुलता नच, फुलल्यापरी, गावरान गुलाब॥

४४२ **अंकमोल** : चुकार लट गालावरी, गौरमुखी सुकुमार।
अंकमोल कीं वाढवी, पुतळी हो, कलदार॥
वळण वाकडी रेघ ती, शोभत सुंदर नार।
सुवर्ण तें बावनकशी, मोहोर भारंभार॥४४२॥

४४३ **काममोहित** : १ आवरले तरि विवश करी, मनसिज हृदय दुभंग।
तनुद्युति, शोभा-शल्य सले, आठव देत अनंग॥४४३॥
२ मन आवरलें किती जरीं, विवशच करी अनंग।
सलें शल्य ते या उरी, तनुशोभा अव्यंग॥४४३॥

४४४ **खलकुठार** : १ कटुनिंदा खल कुठार ती, कठोर घालित घाव।
बोथट होय तुटे न ती डहाळ, प्रीतिप्रभाव॥४४४॥
२ प्रेमांकुर तो उरांतला, पालविता सुकुमार।
घाव घालिते क्रूर ती, खलनिंदाच, कुठार॥
तुटे न खांदी, पालवी झडे न, करितां वार।
अखेर थकती बापडे, बोथट होई धार॥४४४॥

४४५ **नेत्रमेघ** : रातंदिन बरसात ही, क्षितिजिं विजेची रेघ।

विरहासह डोळ्यांत या, वसले पाउस मेघ॥४४५॥

४४६ **निर्गुणमाळ** : कसे कुठें गुण उधळले सांगत रम्य सकाळ।
कुणी कुणावर फेकला, पुसला रंग गुलाल॥४४६॥

४४७ **अपूर्व प्रीति** : प्रेम तयांचे अपूर्व तें, एकमेव हे जाण।
निंदा वंदा कुणी किती, एक जीव कीं प्राण॥४४७॥

४४८ **करांगळी** : पीता मदिरा रूप हे, चढतां डोलत अंग।
मन बनले मतवाल तें, नैन खेळती रंग॥
मेंदी लालसुरंग नख, करांगळीचे टोक।
लावण्याचा कळस कीं, टोचित झुकवी झोक॥४४८॥

४५० **घायाळ शिकारी** : १ लोचन सायक हे सखे करिति विषम संचार।
लक्षविलक्षहि विकल हो करिती उलटा वार॥४५०॥
२ लोचन सायक हे सखे, करिति विषम संचार।
पिसे लाविले बाण ते, पिसें लाविती पार॥
ओढ लाविती ओढतां, करिती उलटा वार।
शिकारीहि घायाळ हो, विव्हल होय शिकार॥४५०॥

४५१ **कुंतल भार** : शिरिं धरिताही. पाठिशी, राही कुंतलभार।
कंठ धरोनी पडे गळा, हृदयिं सदा सुमहार॥४५१॥

४५२ **प्रीति किनारा** : अधीर होऊं नकोस ग, अजाण प्रीतीपाठीं।
ओढुनि धरितां व्हायच्या दृढ, त्या मीलनगाठीं॥
मोडुनि मार्गी अडथळे, धांव घेत साचार।
उत्कटतेनें वाहतां, झिजुं दे नदीकिनार॥
गालावरूनी वाहती, नयनामधलें बोल।
प्रेमतरू फोफावतो, मिळतां पुलिनी ओल॥४५२॥

४५३ **टिके न तें अवसान** : वंचित मी सखये पुरी-पळतो दूर अनंग।
कसा खेळुं ग त्यासवें, नवतीचा रसरंग॥४५३॥

४५५ **परित्याग** : सुख गेलें सोडोनियां, विरहकालिं हा देह।
दुःखहि सोडाया बघे, प्राणासवेंच गेह॥४५५॥

४५६ **अल्लड विरहिणी** : १ सखिचा पहिला विरह हा, लपवी भाव उदास।
अजाण ती नव परिणिता, कथी न दुःख कुणास॥
सुनमुन हो शेजीहि ती, झुरे सदय सदनात।
सहकंपा तिज जाणवे, हर्षित होय मनात॥४५६॥
२ चोरी कळता आपुली शेजीच्या हृदयांत।
चतुरा हो आनंदितां येतां नाथ घरांत॥४५६॥
३ चतुरा ती संबंधिता एकच पति विरहांत।

तरिही हो आनंदिता, असुनी चोर घरांत॥४६६॥
४५८ **काळोखी पहाट** : सखे, उमलल्या फुलापरी, प्रियतम सुख सहवास।
सवत तुझी तमधूसर हो-सहे न हा उपहास॥४५८॥
४५९ **अंधाराचे कडे** : रमले प्रिय भेटीत मी, झाला फार उशीर।
घाबरले किति बाइ ग, परतायास अधीर।
बघतिल कुणि वाटेवरी, चंद्र येइ गगनांत।
अंगसुगंधा भाळुनी, भ्रमर झाकती रात॥४५९॥
४६२ **यौवन विकास** : भालफळानी हुसकती, प्रियालिंगनी चूर।
ससेहोलपट सवतिची, करील यौवन क्रूर॥४६२॥
४६३ **नग्नदीप्ति** : लाजते न ती अंगना, हरता वस रतिरंग।
पतिनयना दिपवी तनू, छटा झळाळत अंग॥
खिळले नेत्र तिथेच ते, मुग्धच, निम्न न होति।
आलोकित ती उर्वशी, झगमग नग्न ज्योति॥४६३॥
४६६ **मदालसा** : सुरतारंभी लाज ही संकोचुनि हो दूर।
पाउल टाकित ये हळूं, जवळ धिटाई शूर॥४६६॥
४६७ **प्रणयचातुरी** : असुनी पति सन्निध ती चतुरा, निरखीत सकारण भूमीतळा।
मिटुनी लव पापणि ती अरधी, खुणवी नजरेतुनि नीट मला॥
सुख आश्वासन दे प्रेममया, अंवती भंवती, कळलें न कुणा।
पतिसंगत संग न हासत ती हळुवार, करी आनंद दुणा॥४६७॥
४६८ **मोहक मार** : ओठ हासती कोपतां, पापणींत ये पाप।
मुकामार हा मोहवी, शापातहि उःशाप॥
शिवे न अशिवा आसवे, शिवीत शीतल राग
मिठींत लोभी मौन तें, दिठींत ये अनुराग॥४६८॥
४६९ **हर्षवर्षा** : नसतांही बरसात, कां आज नाचती मोर।
आनंदित हो वनदिशा, येतां नंदकिशोर॥४६९॥
४७३ **मी तर बाई भाळले** : मी तर बाई भाळलें, रसरसलें लावण्य।
विकसित अनुपम रूप तें, पाहुनि झालें धन्य॥४७३॥
४७४ **पतहीन** : १ वसंतऋतु ये तरूवरा, पाउस न करी भूल
पतहीना सहजीं न दे, नवपल्लव फल फूल॥४७४॥
२ ये ऋतुराज वसंत हा, पवन देत चाहूल।
अपत तरू ते देइ तो, नवपल्लव फलफूल॥४७४॥
३ भिजवी सारे जगत हे उदार वर्षामान।
वसंत परि ऋतुराज हा, सहज न देइल दान॥
व्हावे लागे त्यापुढें वृक्षा तुज पतहीन

तरीच फुटते पालवी, फुले फळें, कृतिदीन॥४७४॥

४७६ **शरपंजर** : धरूनि मान कां बाइ ग, करिसि वृथा अपराध।
वसंत नृप खवळेल ग! स्वार्थ आपुला साध॥
केशरपंजर पाश हे, छळतिल कामनिषाद।
कुठवर आवरशील ग, उतावीळ उन्माद॥४७६॥

४७७ **ज्योतिर्मयी** : शुभ्रवसन ती नेसली ज्योर्तिर्मय मुख लाल।
राति घरांतच झगमगे गृहिणी फुंकित जाळ॥४७७॥

४७९ **कोरडा पाषाण** : धन्वतरि दे औषधी साधाया पुरुषार्थ
हसे जाणुनी भेद ती, घरिं दारी ती व्यर्थ॥
गृहिणी करि परिहास ती, असे कसें हो नाथ।
असे रसायन हे नवे, फलदायी न घरांत!॥४७९॥

४८३ **तिची पाउलें** : छिलतिल नाजुक पाउलें, कठिण करें हो घाय।
पसरुनि गुलाब पाकळी, कुचयुगिं चुरते पाय॥४८३॥

४८७ **शारदीय सुंदरी** : सुंदर कर युग चरणकंज, नयन खंज, मुखचंद्र।
शारदीय सुरसुंदरी भरे हृदयिं आनंद॥४८७॥

४८८ **झळाझोंब** : वसंत विरहें ग्रीष्म हा, सोडि दीर्घ निश्वास।
पावक प्रबल सभोवतीं, झळा झोंब अंगास॥४८८॥

४९३ **उंबराचे फूल** : "आठवले का आज मी, आलिस घ्याया गांठ।
कधिची माया आटली कीं चुकलिस ग वाट"॥
देत उलाहन, हासते धरूनी सखिचा हात।
कोपदृष्टि ती चोरटी, हळूंच मजसि पहात॥४९३॥

४९४ **सर्वांगी** : ठेवि न हृदयीं हरी परी, गौरीहर अर्धांगिं।
एकसंग मुख लूट ही, अंग अंग प्रत्यंगी॥४९४॥

४९५ **अगहन मास** : धरि न करी धनु पुष्पायुधही, घेई न मुळि सायास।
अगहन हा बहु गहन बिनीवर, करी अंतरी वास॥
जिंकी जितेंद्रिय इंद्रचंद्र ही, करि थोरांना दास।
सोडिता न शर, सहज मोहवश करि, हा शीतल मास॥४९५॥

४९६ **मिलिंद झेप** : ठायीं ठायीं गुंजती, भवती धरूनी फेर।
झेपावति कलिकेवरी, उलवित केसर घेर॥४९६॥

४९९ **ती मी नव्हे** : गळ्यांत पडतां हुंगिली, शय्येवर बेहाल।
चुरगळली राती जिला, मी न मोगरी माळ॥
चंपक केसर लोचनीं-जागरणानें लाल।
कशास आलिंगिता मला, दूर सरा ब्रिजलाल॥४९९॥

५०० **ओली मेंदी** : तिथेच थांबा हो जरा, वाट बघा बाहेर।

अनुक्रमणिका

अजुनि न पुरता लागला, नखमेंदीचा घेर॥
तुला पाहतां प्रियकरा, सुटतो अंगी स्वेद।
सुकेल मेंदी तरी कशी, जरा ओळखा भेद॥५००॥

(शतक पाचवे पूर्ण)

*   *

शतक सहावे

५०१ **गुणपतंग** : १ पतंग, मानवकरांतुनि सुटे, उडतो असता गुणी।
चक्रधार तो घेतां जवळी, होइल की निर्गुणी॥५०१॥
२ गुणबंधनिं या ठरतो मानव, पतंग तो गुणवान
गुण तुटतां, हातांतुनि सुटतां, सहजी निर्गुणमान॥५०१॥

५०२ **दीठ** : स्तिमित चित्त, बघतां जगी, नवलाईची रीत।
देहच दुबळा होइ हा, दिठीं लागतां दीठ॥५०२॥

५०३ **लुटपुटूची मूठ** : १ घेत ओढणी, आडवे धरुनि लाल तळहात।
खुदकन हसते लाजरी, लपवित मुख पदरांत॥५०३॥
२ मुठी मुठी जणुं फेकतो, लटका गुलाल रंग।
भयभीता ती अंगना, झुकवी लवचिक अंग।
रिती उगारित मूठ, तो लटूपटूचा थाट।
स्पर्शातुर कीं गुलाब ते, गोल पाहती वाट॥५०३॥

५०५ **उडते चुंबन** : १ बोटावर उंचावुनी, धरुनि भिंत घे, झोल।
झुकति बघत चोहीकडे, चुंबित चारु कपोल॥५०५॥
२ उंचावुनि अंगुली उचकती धरुनि भिंत, निरखीत।
झुकति पुढें, मुख चुंबिती, चोरनजर चुकवीत॥५०५॥

५०७ **अर्धे हसूं** : १ पायीं अळता विखुरला, बघतां हसे मनांत।
अधरिं अडवि, आले हसूं, सोडि उसास क्षणांत॥५०७॥
२ दिसे विखुरला रंग महावर सवतीच्या पायीं।
हसूं येत ती, मनांत म्हणते 'किती धांदरट बाई'॥
सवतस्मित लाजरे कळविते, गुपित आंतले पाही।
अडलें ओठी हसूं, उसासे, ऊर भरुनि येई ॥५०७॥

५०८ **पुरे अं मखलाशी** : पुरे बाइ ही चातुरी, पौषातील हा स्वेद।
गुपित लपविसी मानसीं, कळून येई भेद॥५०८॥

५०९ **सुटून गेला बाण** : तया न बघसी, ढुंकुनी, किती घातली आण।
ओवाळुनियां टाकले, तुजवर पंचप्राण।
तरिही उतरेना धनू, तुझा अकारण ताण।

अनुक्रमणिका

				चढवितेस भिवई अतां, सुटून गेला बाण॥५०९॥
५१०	**वायदा सरला**	:		आम्रमंजिरी गंध तो, घालित हृदयीं साद।
				मोहर भरला, टोचितो, मनीं भरे उन्माद॥५१०॥
५१३	**मुकुलश्री**	:		घालि गौरकंठांत ती, मुकुलश्रीचा हार।
				पुलक फुलुनि सर्वांग हो, मुकुलश्री रतनार॥५१३॥
५१८	**वाकडे कुंकू**	:	१	धरुनि हनू, कर कंपिता कुंकुम रेखित नाथ।
				भाललेख तो वाकडा, मानिनि मिरवित जात॥५१८॥
			२	धरि हनुवटि कर कंपिता, लावी कुंकुम रेख।
				दावित दिमाख वाकडा, मिरवी ललाट लेख॥५१८॥
५१९	**चैत्र चांदणे**	:		दुखवी सुख हें मला सखे, अशीच आली वेळ
				चैत्राचें मधुचांदणें, अचेत करि तनुवेल॥५१९॥
५२२	**श्रवणमंजुला**	:		श्रवणमंजुला, गोरटी, अजाण, धरि संकोच।
				चिंव चिंव लावी चटक ती, उघडित चिमणी चोंच॥५२२॥
५२४	**हवेच तेहि नकोच**	:		भिर भिर पाहे अस्थिरा, सुचे न उरला पोच।
	(ओढाताण)			दृष्टि वळविते आतुरा बघेन बघते तोंच॥५२४॥
५२५	**असहाय**	:		सुटत धीर, तळमळत फिरे, इथुनि तिथें, दिनरात।
	(पत्रिका)			होइ जिवाची काहली, जळते ती विरहांत॥५२५॥
५२६	**विनाक्षरी**	:	१	विरह विकल ती पाठवी, पत्र, न तें लिहितांच।
				वाचित तो, एकांति, ती, विनाक्षरी बघतांच॥५२६॥
			२	कागद झेलित अक्षरें, कीं मोत्यांची ओळ।
				दावि कला, विकलाच ती अश्रुबिंदुची ओल॥
				नच लिहितांही पाठवी, विरहाकुल चित्तांत।
				विनाक्षरी ती पत्रिका, वाचित एकांतांत॥५२६॥
५२९	**चंदन चटके**	:		कशास बाई गुलाबजळ तें, कापुर सारे लटके।
				विरहदाह हा विझे न सखये, देई चंदन चटके॥५२९॥
५३०	**चोरलपंडाव**	:		डोळे मिटुनी खेळती, शिवाशिवीचा डाव।
				शिवता सुटुनी, भेटती, तिचाच हो पाडाव।
				मिठीत लपती, शोधती, गळ्यांत घालुनि हात
				हृदयीं हृदया छपविती, सुटती परिरंभात ॥५३०॥
५३१	**तनुछत्र छाया**	:		कसें बाइ ग जायचें, पोळतील ना पाय।
				कोमेजुन जाईल ही, उन्हात कोमल काय॥
				देहसावलीतळी तिला, झांकुनि तशा उन्हांत।
				सांगुनि इतरातें, निघे, घेउनि कुंजवनांत॥५३१॥
५३२	**लोचन लावे**	:		लसलसतें लावण्य तें, तनु नवती करवाल।

पृथुल जघन नितंब ते, अनंग रंगमहाल॥
लोळत मेखलबंध तो, ठुमकत, मोहकचाल।
लोचन लावे गुंतवी, लवचिक तें कटिजाल॥५३२॥

५३७ **शुक बोल** : विरहविकल ती विरहिणी, बोलत सरते बोल।
ऐकवि ते, शुक ऐकुनी, अश्रु येति अनमोल॥५३७॥

५३८ **हलतें प्रतिबिंब** : निळे वसन तें, झाकला गौर सखी मुखचंद्र।
कालिंदी जलिं बिंबला, पुनवेचा आनंद॥
वलयांकित लहरीवरी आंदोलित अविलंब।
सलिल नील झिलमिल करी, प्रतिबिंबित विधुबिंब॥५३८॥

५३९ **मदिराक्षी** : पिउनि वारुणी धुंद ती, करी मजेचा खेळ।
ताल सुटे, ना तोलही, कुठें कशाचा मेळ॥
चिडता, बरळे हासुनी, रडतां, येई चीड।
लाज फिटे संकोच तो, नुरली कसली भीड॥५३९॥

५४० **भृंगधर्मीय** : १ मिळेल घ्या मनसोक्त तो, अपूर्व प्रीतीभोज।
मला कशाला जाळता, इथे येउनी रोज
सवय सदाची घरोघरीं, फिरत खेळता रास।
सुखें मनापरि होउ द्या, मला कशाला त्रास॥५४०॥

२ फुलाफुलांवर झेप घे, रसलोलुप हा भंग।
कुंज निकुंजी जा सुखे, लुटायास रसरंग॥
कुणिही रमणी पाहतां, हवा तिचा सहवास।
कशास मग येतां घरीं-मला द्यावया त्रास॥५४०॥

५४५ **कृपण** : [ओठीं अडुनी बोल तो, मनांत परते थेट।
निघुन जायची, न बोलता, अशीच पहिली भेट]॥५४५॥

५४६ **डाळिंब** : अवगुण दाणे दाटुनी, उरि भरलें डाळिंब।
कपटपटीं गुंडाळतां, फुटुनी होत दुभंग॥५४६॥

५४७ **चकोर** : चकोर चाखित चांदणे, सेवित वा अंगार।
शमवायाते भूक ती, व्रत धरितो साचार॥५४७॥

५४८ **विवश मानस** : कळतें, न वळे कसा धरूं मान, करूं तरि काय।
पाहताच मनमोहना, मन हे उडुनी जाय॥५४८॥

५५० **नख मोहिनी** : करि सुंदर मेहदिबुंद दिसे, रुचिपूर्ण तसे मांसल तळवे।
मारित मूठ हळूच रमा, मन होय कसे हळवे हळवे॥
नखचंद्रक रक्त करांगुलिलाघव, आवळुनी करि जादुगिरी।
फेकित मंतरले रुचिचूर्णच, जिंकित अंतर, शांति हरी॥५५०॥

५५१ **आर्द्र हसूं** : 'घर सांभाळा' सांगतो जातां पति गांवास।

अनुक्रमणिका

आसवांत ही हासती, डोळे तिचे हताश॥
कुटुंब माझे एकटे, तरि तुमचा शेजार।
हवे नको तें द्या तिला, सुचवी घ्याया भार
(नाजुक ती कुसुमापरी उचला इतुका भार)
आज किलकिले जाहले, बंद सदाचे दार।
शेजारीही मानतो, मनोमनी आभार॥५५१॥

५५२ **वैरी** : वीणा कंपित होय ती, बेसुर हो आलाप।
दिला आज या प्रीतीनें, मनास माझ्या शाप॥
सैलच मध्यम तार ती उतरुनि जाय जवार
वैरी जिवलग हा करी अनवट राग प्रहार॥५५२॥

५५३ **हृदयपतंग** : अश्रुसरी भिजवी तया, विरहे विटला रंग।
जळुनी होई फाटका, तरिही हृदयपतंग॥
उलटे वारे वाहतां, घेइ दिगंती झेप।
निश्वासावरती उडे, सैरभैर निर्लेप॥५५३॥

५५४ **हृदयांदोलन** : मन तिकडे लागले तिचे, घरांत छळते लाज।
हिंदोळ्यावर हृदय हे, झुलत करी गृहकाज॥५५४॥

५५६ **विचलित** : धरुनि हनुवटी लोळते, नाजुक गोड खळीत।
चंचल मन चंचरीक हें, रमते मुग्ध कळींत॥५५६॥

५५९ **प्रणय पैज** : गाल फुगवुनी बैसले, दोघे धरूनी मौन।
असे मानसी आस ही, पैज मोडतो कोण॥५५९॥

५६१ **भक्ताचे गाऱ्हाणें** : व्रजवासि जना ये, उचित धन, रुचते न तें कुणास।
चिंतिता न चित्तांत ते, शांति न लाभे त्यास॥५६१॥

५६२ **भेटीगाठी** : हट्ट न करि हटवादिनी, येता ऋतु बरसांत।
घट्ट बसे निरगांठ, मनांतिल सुटते गांठ, क्षणांत॥५६२॥

५६४ **मीलनाभास** : वाटे भेटायास ते, घरांत येतिल थेट।
उत्कंठित ती बहुपरी, कशी व्हायची भेट॥
बाहेरच तो थांबला, आप्तजना समवेत
उदास होई मानसी, चुकता मीलनहेत
सहे न विलंब हा तिला, घडेल कधिं सहवास।
भूषण, शस्त्रे वस्त्रे ती, कवळुनि लावि उरास॥५६४॥

५६७ **जगसौंदर्य** : १ रचिता नवरूप विधी, योजित रस भावयुता।
रमणी लावण्यमयी, विश्वातील सुन्दरता।
जिंकाया जग सारे तव हें सौंदर्य सजे।
चटक लागली नयना, पाहुनीयां रूप तुझे॥५६८॥

अनुक्रमणिका

२ लागत रूप जगांतले, रचिता सुंदर रूप ।
दृग तव रूपी लागले, लागे चटक अमूप ॥५६८॥

५६८ **मानदीक्षा** : निलाजरे किति नयन हे, भारिच मेले द्वाड।
हसति पाहुनि वाकडे, दडति पापणी आड॥
किती आणते आव मी, रागाचा संघात।
घरभेदी ही लोचने, वेळिच करिती घात॥

५७० **कडामिनी बाण** : लपे शिकारी तो कुठें, घेई उलटा आळ।
भेटूं पाहे घातका, सावज ते घायाळ॥५७०॥

५७१ **भिंत** : धरिति भिंत छिद्रांतुनी, परस्परांचे हात।
सुख स्वप्नातच कंठिती, दोघे मिळुनी रात॥५७१॥

५७३ **कुंतलबंध** : पीतगौर पाठीवरी, सुटले केस मुलाम।
सुटते चित्त जगांतुनी, सुटते जीवित काम॥
बांधित विंचरुनी जई, देत मना आनंद॥
नजर बांधतो, चित्त ही, कुंतल वेणीबंध॥५७३॥

५७५ **जारजयोग** : पितृघातक वर्तवी जातक, ये भयशोक।
कळतां जारज योग तो, हर्षित मनिं, बिनधोक॥५७५॥

५७८ **मौनमिठी** : विरही जगताहि भेटती, संकोचे धरि मौन।
मौन मिठीच परस्परां, मारिती लज्ञित नन॥५७८॥

५८० **तिमिरचंद्र** : निघे साजणी निर्जनीं करोनिया अभिसार।
विझला, चंद्रच, दाटला, भवती घन अंधार॥
सोड भीति ही सारिके, उडतो का ग ऊर।
चंद्रोदय होईल ग, सार ओढणी दूर॥५८०॥

५८२ **नेत्रमैत्री** : परस्परातें पाहिलें, कितिदा येता जाता।
नेत्रपरिचय जाहला, हासत बघता बघतां॥
संधी साधुनि एकदां, सामसूम सदनांत।
बेसावध ती जाणुनी, हळूच धरिला हात।
'सोडाना हो, काय हे, नको न' म्हणती ओठ।
हाव भाव अति मधुर ते, सोडवि धरुनी बोट॥
भयशंकित ती मानसीं, असेल कुणी पहात।
'मनगट माझे तुटेल ना' गळा लाविता तात'
दचकुनि ती लाजली तरी, नयनीं लालस भाव।
चित्रे तिचें तें बावरें, घेई हृदयीं ठाव॥५८२॥

५८३ **वासकसज्ञा** : मीलनोत्सुका कामिनी, तिला लागला ध्यास।
तिचेच दर्पणबिंब ते, देई प्रियाचा भास॥

करी प्रणय रमणीय ती, धर्मजले हो चिंब।
रमणी ती रममाण हो, चुंबुनिया प्रतिबिंब॥५८३॥

५८६ **ध्यानमग्ना** : ध्यान सदा जिवलगाकडे, स्वप्नांतच सुखसंग।
तुझी न तूं राहसी सखे, बनता कीटक भृग॥
सुटता हे घरदार ग, वणवण फिरतिल प्राण।
प्रीतीसाठी देउनी, सर्वस्वाचे दान॥५८६॥

५८७ **स्तंभिता** : १ बघत एकटक प्रियकरा, इंगित ते जाणून।
स्कंधावर ती उमटली, ती वेणीची खूण॥५८७॥
२ बघत सारखी प्रियकरा, दुःखित होय उदास।
कुंतल गुंत कलंक तो, चुरला अंगविलास॥५८७॥
३ बघत एकटक प्रियकरा, नयनी येत विराग।
कुंतल गुंत कलंक तो, अंगचोर अनुराग॥५८७॥

५९१ **मध्यस्थी** : देउनि संदेश दूति, पाठवी प्रियाकडे।
व्हायचे प्रियसवे इथेच, ते तिथे घडे॥
मिळूनि येति दोघेही, पाहता तयाकडे।
संकोचित अपराधी, पडे तयांस सांकडें॥
जाणुनि संदेशपूर्ति, ओठिं बोल तो अडे
मौन सांगते प्रियास 'काम संपले गडे'॥५९१॥

५९२ **गवगवा** : कशि येऊ ग कुंजवनी, लावि जिवाला घोर।
पोखरती की पहाड हे, सगळे चहाडखोर॥
पाळतीवर माझिया, सुटले फुकटे हेर।
गाव गवगवा जाहला, कशी पडूं बाहेर॥
घराघरांतुन चालले, माझें गुणकीर्तन।
श्रवणभक्तिने ऐकती, हलके कान नि मन॥५९२॥

५९३ **प्रेमविंझण** : पाहतांच ती तुम्ही धाडिली, तिला प्रीतिची भेट।
कमलकळी ती डुलूं लागली, झुकलें खाली देठ॥
पंख्यावर ती पहा भाळली, लावि उरीं निःशंक।
रोमांचित हो नाजुक काया, थरारले ते पंख॥
वारा वाहिल तशीच, फिरवी अतां आपुली पाठ।
अंतरांत उसळते तिच्या, ती आनंदाची लाट॥
घर्मजलें डंवरली तनू ती, भिजवी बिंदु तुषार।
सुखावली बघतांच कामिनी, रम्य असा उपहार॥५९३॥

५९५ **देहदीपिका** : छळी न तम दिनरात या विरहिं, प्रीत हृदयांत।
तनुज्योती ती उज्वला, जळे, स्नेह नयनांत॥५९५॥

अनुक्रमणिका

५९९ **चित्तचोर** : हुरहुर मनिं, तनु शिरशिरी, ऐकुनि केवळ नांव।
उतरेना चितचोर तो, भिवई चढतां भाव॥५९९॥

(शतक सहावे पूर्ण)

*   *

शतक सातवे

६०१ **चलितमति** : बघुनि किशोरी राधिका, कंपित तनु ब्रिजराज।
डगमगतो गिरि, अंगुली हलता, उपजे लाज॥६०१॥

६०२ **अमंगला** : लग्नमंडपी चहुंभरी भरला गे आनंद।
हसति, नाचती करवल्या, गायन परिणय छंद॥
उदास कां गे तूं अशी, दिसे न मनि उत्साह।
दीर तुझा तो धाकला, मंगल आज विवाह॥६०२॥

६०५ **संशय फिटला** : १ काटा पायीं रुतून हा जगवी मरता जीव।
संशय फिटवी काढतां, प्रीती कळवी, कीव॥६०५॥

२ रुतला कांटा माझिया पायीं, नयनीं नीर।
किती ग काळजि, धाउनी येती द्याया धीर॥
फुंकर घालित हळुहळूं काढिती उचलुनि पाय।
फिटवी संशय आतला काटा तो मृदु काय॥६०५॥

६०६ **वाकडी वाट** १ चढवि नाक, सित्कार करी छेल छबीली नार।
वाट न सोडी तो तरी, विसरुनि वारंवार॥६०६॥

२ बिकट वाट ती, जवळि या, सुचवि तिचा सित्कार
वाट वाकडी सोडि ना, खट्याळ जिवलग फार॥६०६॥

६०८ **क्रोधवती** १ 'कळलें हो नच नेत्र हे जागरणानें लाल।
अधरी भरते भामिनी, रंग लोचनी लाल॥६०८॥

२ आळ नव्हे हा आळता, शोभवि भाल विशाल।
पायावरती लोळता, होउनिया बेहाल॥६०८॥

६१० **लाज लगाम** मिटता झापड पापणी, तिरकी उसळे लाट।
नजर शोधते वाकडी ती वळणाची वाट॥
लाज लगाम न मानिती, करिती खेंचाखेंच।
मुजोर नयन तुरंग हे, ओढ घेति तिकडेंच॥६१०॥

६११ **मुद्रादर्पण** : करांगुली मुद्रिका दर्पणीं, प्रतिबिंबित छबिरूप।
टक लाउनियां पाहते, निर्भय तें प्रियरूप॥६११॥

६१२ **दृष्टि चातुरा** : लोकभीड भेदुनी फिरे, दृष्टि तिची चौफेर।
दिठींदीठ भेटवी, ठेउनी भीड चोरटा हेर॥६१२॥

६१३ **सुख संजीवनी** : तुमची जीवन संजीवनी, पहा आणिली नीट।
सोन जुई परि ती फुले निकुंजकोनीं धीट॥६१३॥

६१४ **तंबाखूपान** : ओठ जुळवि, दृग हासती, भिवई करी कमान।
प्याले ग मन माझे सखे, पिता तंबाखू पान।
खेचुनि चुंबन घेई तो, लागे मनि हुरहूर।
जळता क्षण तो, राहिला ओठीं नुसता धूर॥६१४॥

६१५ **सुखदवेदना** : दीठींदीठ ती भेटतां, वर्षत अमृत अंश।
विरहीं आठव देई ग, सहस्त्र वृश्चिक दंश॥६१५॥

६१६ **निर्माल्य माळ** : १ हर्षे तिजला घातली, पळ न विसंबे माळ।
वास नुरे, तरी उरीं तिचा, वास तिन्ही त्रिकाळ॥६१६॥

२ हर्षे साजण घालि ती, माळ तिच्या कंठांत।
पळ न विसंबे प्रेमळा, मिरवी ती दिनरात॥
सुकली, नुरला वासही, तरिही तिन्ही त्रिकाळ।
रूळते हृदयीं आजही, निर्माल्याची माळ॥६१६॥

६१८ **धीट संकोच** : कुंचित तनु, किंचित हसे, करितां दृष्टि विलोच।
सावरि, आवरि, बावरि, मला पाहतां तोच॥६१८॥

६१९ **सुखी विहंग** : मिळे चुनखडी खावया, पांघरसी पट पंख।
सदा जवळ ती सहचरी, उडावया निःशंक॥
अन्न, वसन आसरा जगीं, मिळे प्रियेचा संग।
सुखी कपोता तूं खरा, जगांत एक विहंग॥६१९॥

६२० **मर्यादातिक्रम** : सरिता, वनिता, सारख्या, दिसती एक स्वभाव।
मर्यादेत न राहती, जशी वाढते हाव॥
सोडुनि-सीमा वाहतां, नदी बुडविते गांव।
वनिता सांडि कुलीनता, स्वयें बुडविते नाव॥६२०॥

६२१ **फोल आशा** : माझी करणी पाहुनी। पाप पुण्य अविचार।
मला न आवा ती प्रभो, होईल कीं उद्धार॥६२१॥

६२२ **विरह संदेश** : १ पायरिवरि तो पोचतां, प्रियकर जाय विदेश।
प्रणय आस विरहांतले, कोटि उभय संदेश॥६२२॥

२ निरोप घेउनि निघे जावया, प्रियकर तो परदेशी।
पायरीवरी तया पोचवी, थबके उंबरठ्यापाशी॥
उभय कोटि संदेश, विरह तो प्रणयाच्या परिवेषी।
सुख माझें हे नेशि, जिवलगा परत कधी रे येशी॥६२२॥

६२५ **निरोप** : मिळुनि चालती, चलता मिळती, झाली सायंकाळ।
पायरिवर प्रस्थान ठेवले, मुहूर्त प्रातःकाळ॥६२५॥

अनुक्रमणिका

६२८ **अर्धोन्मिलन** : कुरवंडी करितील ते, अलि खंजन, मृग मीन।
अर्धोन्मिलित लोचने, करिति प्रिया स्वाधीन॥६२८॥

६३० **रम्य पहाट** : १ मदलालस लोचन, अधरखुले, अंगमोड अंगाइ।
आळस चुटकी जांभई, शयनी लोळत राहि॥
अजूनही उरली नशा, निशा सरे रंगेल।
लावण्याचे लळित की, रमणीचा रति खेळ॥६३०॥
२ झुंजुमुंजु होतां ओसरे, भुजकुंजांतिल झुंज।
विस्कटला रमणीय तो, रमणीकुंतल पुंज॥
घुंगुर भंवती विखुरले, तुटले पदमंजीर।
चुरले गजराहार ते, सुटले सुमजंजीर॥६३०॥

६३३ **रंग खेळ** : १ गळे मुठीतुनि गुलाल तो, स्वेदें भिजत अतूट।
रंगखेळ लटकाच तो, सुटतां उघडी मूठ॥६३३॥
२ गळे कांपऱ्या मुठीतुनी गुलाल भिजवी स्वेद।
उरला तळहाती भिजे, कळोनि येई भेद॥
एकमेक ते उधळती प्रणयरंग लयलूट
रंगखेळ लटकाच तो पडता उघडी मूठ॥६३३॥

६३५ **तिकडचं पत्र** : ठेवि भुजांतरि पत्र तें, शिरीं धरी प्रिय भेट।
उरि लावित ती वाचते, गाली घेत चपेट॥६३५॥

६३९ **खोटी नीज** : १ मुखावरण तें काढतां, मिटली खोटी नीज
संकोचित, मन बावरे, ओठी खुलते बीज।
रोमांचित देहावरी, स्वेदकणांची भीज
घडतां ती दृगभेट, ये पापणीत काळीज॥६३९॥
२ मुखावरुनिया काढले, पांघरुण हलकेच।
फाजिल मेले नेत्र हे, किलकिल बघति लगेच।
ओळखली ग नीज ती, भारिच ग मिस्कील।
अंग लवे रोमांच ये, मालविला कंदील॥६३९॥

६४३ **पहाट** : नयनीं भरली नीज ही, पहाटपंची बोल।
उठति, मिठी घालती पुन्हां, पडति जाउनी तोल॥६४३॥

६४४ **नकारमाधुरी** : १ खोटेपण कसलेहि तें, करित फिका मधुस्वाद।
रतिआरंभी नकार, दे मधुर मधुर आस्वाद॥६४४॥
२ भेसळरस लटकाच तो, मिसळुनि घेतां स्वाद।
सुरतारंभी नकार दे, आगळाच आस्वाद॥६४४॥

६४५ **तीरीं बघत अधीर** : चित्त लागले तिचें तिथे, नयन निरखती तीर।
जाइ न घरि, ती न्हाइना, परते स्पर्शुनि नीर॥६४५॥

अनुक्रमणिका

६४६ **बरसातीची सर** : मनि संकोचित चंद्रिका, ओढित घुंघट लक्ष।
बरसातीच्या सरीपरी, बघे झुकून गवाक्ष॥
आला गेला झर्रर तो, शिरवा किंचित्काळ॥
अभ्राच्छादित मोकळे, होत पुन्हा आभाळ॥६४६॥

६५० **सौन्दर्य सुधा** : मदिरासव रसमाधुरी ओठीं तया रुचे न।
प्रिय मुखचंद्र सुधासवा, पीती लोलुप नैन॥६५०॥

६५१ **क्रूर** : कुस्करिले सुम निर्दया, पाकळि पाकळि चूर।
पहा तरी कर लाउनी, अजुनि धपापे ऊर॥६५१॥

६५२ **परोपदेश** : किती कुलवधू गोकुळीं, इतरा करि उपदेश।
परि मुरलीरव ऐकतां, विरे नीति आदेश॥
सोडि स्वयें कुलरीत ती, अधीर होति मनांत।
घरांतुनी कुलकामिनी, धावति कुंजवनांत॥६५२॥

६५३ **उपहास** : अर्धी मिटलीं लोचनें, वचन विसंगत बोल।
स्वेदबिंदु भिजवी तनू, कंपित उरिं हिंदोल॥
अरुण वदनिं रति मदन कीं, खेळतसे रसरंग।
सखी मनोहर रूप तें, अंगी भरे अनंग॥६५३॥

६५४ **घारीचे घरटें** : घारीची सावली पडे, डोईवरी उन्हांत।
शेजारिण सग बहिण ती, कळे न काय मनांत॥
झांकशील जरि तू किती, करील तुजवर मात।
मासखंड ना वाचतो, घारीच्या घरट्यांत॥६५४॥

६५७ **प्रियवार्ता** : ‘आले ग प्रिय’ कळता तयां, कुणी घेतले नांव।
उल्हासित हो मैत्रिणी, उचंबळुनि ये भाव॥
हसून निरखिति परस्परा, सूचक ते दृग हेर।
मिळुनि हसति दोघीजणी, येतां गुज बाहेर॥६५७॥

६५९ **विरहाश्रु** : पापणींत तरळती, वाहती, ओघळती गालांत।
वक्षस्थळिं पडताच ती, जळती सळ्ळ् पळांत॥६५९॥

६६० **वेडी विरहिणी** : ‘पिउ, पिउ’ पोपट बोलता, अचेत भाव निराश
थकली वेडी विरहिणी, सुनमुन होय हताश॥६६०॥

६६१ **कलि प्रभाव** : प्रकृतिपालट होइ तो, पडते उलटी चाल।
हो अकरुण करुणाकर ही, दृष्प्रवृत्त कलिकाल॥६६१॥

६६३ **कुचंबणा** : नाही ग सुख लोचना, दु:खित सखे सदाच।
नच उचले ही पापणी, करी जिवाला जाच॥
पाहुनिही नच पाहती, जाति पुरे लाजून।
राहती न पाहिल्याविना, पाहति नच पाहून॥६६३॥

अनुक्रमणिका

६६४ **कटिबंध** : १ चतुर विधी, करि क्षीण तो नाजुकसा कटिबंध।
दिसे न सांधे जोड ही, सुंदर कला प्रबंध॥
उरली ती भर घालुनी, करि कौतुक कैवार।
नितंब पीन कुचाग्र ते, जघन पुष्ट भरदार॥६६४॥
२ निर्मि विधी ती कलाकृती, करुनी डोळेमोड।
कंबर बारिक ती तिची, दिसे न सांधेजोड॥
उरली ती भर घालुनी, करि तो किमयागार।
टोकदार कुच, नितंब ते, रतिसुंदर भरदार॥६६४॥

६६५ **गोड चावा** : १ चावा अधरीं उमटवी, चंचुपुटी कलहंस।
बघत दर्पणी सारखी, ओठावर रददंश॥
फिरवि अंगुली लाजरी, स्पर्श करी हळुवार।
झाकुनि पाहि पुन्हःपुन्हा, करि चाळा सुकुमार॥६६५॥
२ चावा अधरीं उमटवी, चंचुपुटीं कलहंस।
पाहत ती प्रियदर्शिनी, दर्पणात रददंश॥
फिरवि अंगुली लाजरी, लपवी दाबुनि ओठ॥
चाचपते सुखवेदना, रिता प्रीतिचा घोट॥
एकपात्रि हा खेळ, ती खेळत वारंवार।
चालवि चाळा दिनभरी, सुखदु:खी नवनार॥६६५॥

६६६ **ओलेती** : १ वाकवुनी गुडघे जलीं, नारी न्हात सरांत।
मुखमार्जित करि अंजली, भिजवी वस्त्र जलांत॥
२ नारी न्हात सरांत ती गुडघ्यावर दे भार
सिंचित मुख ती करांजली, भिजवी वस्त्रतुषार।
मदनधनू कीं वाकले, सोडितसे जलतीर।
ओलेती अभिसारिका, तें सौंदर्य अधीर॥६६६॥

६६७ **विरह उपाय** : १ किती केलें सायास ग, अनुताप न हा जाय।
प्रिय परिरंभण हा अतां, एकच तरणोपाय॥
चंदनलेप न शांतवी, न विंझण निववी काय
स्वेदजले भिजवी तनू, शमवि चीर प्रिय काय॥६६७॥
२ विरहताप हा जाइना, केलें किती उपाय।
चंदनलेप न शांतवी माझी कर्पूर काय॥
विंझणवारा वाहतो उलटा चटके देत।
काय करू, मी सांग ना एकच उरला बेत॥
प्रिय आलिंगन तें हवे, ओले पुलकित अंग।
भिजले वस्त्रच तें जणू, शमवी विरह तरंग॥६६७॥

६६८ **सज्ञन स्नेह** : सज्ञन स्नेह अभंग हा, सुटती ना संबंध।
भेट गांठ होता न ती, तुटति न ऋणानुबंध॥६६८॥

६६९ **तुझे नाव** : दु:सह दारुण दशा तिची, दिसे उपाय न आन।
नांव तुझे ऐकतां, परत ये, जाता जातां प्राण॥६६९॥

६७० **काजळले डोळे** : पळभर स्थिर नच धावती,सैरभैर चौफेर।
काजळले डोळे तुझे कुणास करिती जेर!॥६७०॥

६७२ **कदंब केसर** : नांव नको न उपाय, ते आला पावसमास।
क्षेम न घेउनी राहणे, कदंबपुष्प सुवास॥६७२॥

६७३ **मोतीवेल बुगडी** : मोतिवेल बुगडी रुळे, कुरवाळित मृदु गाल।
सुखद स्पर्श तनु पुलकिता, गुंफित मायाजाळ।
स्वेदवल्लरी ती झुके, सोडित केशकलाप।
बिंदुमाळ ती सुंदरा, गालावरि महिराप॥६७३॥

६७४ **चंदेरी छाया** : १ पाणंदीतिल चांदणें, उघड झांक अनुरूप।
राधा माधव मीलनीं, भरे सावळे रूप॥६७४॥
२ छाया कौमुदि चालता, चांदण्यात पाणंद।
सावलीत ये चांदणे, गुंतवि गति गोविंद॥६७४॥
३ मधे मधे अंधार, चांदणे, खुले चांदण्याराती॥
राधामाधव संग सोबती, पाणंदीतुन जाती॥
तमात न दिसे शाम, राधिकां विरे चंद्रकांतीत।
दोघे असुनी एक एकटे, दिसती पाणंदीत॥६७४॥

६७५ **मुलखाचा राग** : पाया पडला किती तुझ्या, सखे घातली आण।
केलिस बाई आज तूं, अभिमानावर ताण॥
तीक्ष्ण लपे तरवार ती, वरी मखमली म्यान।
नाजुकशा देहांत या, पहा केवढा मान॥६७५॥

६७६ **मोरचंद्रिका** : मोरचंद्रिके बाइ ग, नको धरू अभिमान।
शिरी धरी तुज श्रीहरी, भाग्याचें वरदान॥
हृदयिं वसे ती राधिका, देतां तिज बहुमान।
पायीं पडशिल मेचका, चुरेल तव अभिमान॥६७६॥

६७७ **चिरजीवी** : हटवादी दोघेहि ते, कुणी न घे माघार।
नसे स्नेह गंभीर, तो सारासार विचार॥
चिरजीवी हो युगल हे, कलहप्रिय मतिहीन।
ती धन्या वृषभानुजा, हलधर अनुज कुलीन॥६७७॥

६७८ **अंग अंग बोलके** : १ बोल आगळे ढंग हा करिसी जरि भ्रूभंग।
चित्तचोर उरिं राहुनी, भरतो गालीं रंग॥६७८॥

अनुक्रमणिका

			२	चढविसि जरि तूं भिवया, अंग अंग बोलके। चित्तचोर तो हृदयीं, नयन सांगती सखे॥६७८॥
६७९	**सहजश्रृंगार**	:		अंग सुगंध अमंद हा, लावित वेड जिवास। विमुक्त कचपाशात या शिकाकाईचा वास॥६७९॥
६८४	**निराश क्लेशा**	:	१	सखि, संकेत निकुंजि या घनतम वाट निरुंद। वाहत मंद पवन तुरंग, तुडवित देह कबंध॥६८४॥
			२	सखि संकेत निकुंजि या, घनतम निरुंद वाट। चालत मंद मरुत तुरग, तुडवित देह पिसाट॥६८४॥
६८५	**लवंगफूल**	:	१	मिरी लवंगहि साजवी नासिक, लावित स्नेह। चढले भासे नाक तें होइ सदा संदेह॥६८५॥
			२	मिरी लवंगहि साजते, नासा भरली शेस। चढली वरी संदेह हो, सदा लागली खेंस॥६८५॥
			३	लवंग सुशोभित नासिका सुकांत सुंदर देह। चढली भासे ती सदा, येत मनीं संदेह॥६८५॥
६८७	**नजरबंदी**	:	१	विंचरि, कच धरि, भुजा उलटवी, पदर सारुनी दूर। वेणी बंधनिं बांधते, नजर गुंतवी ऊर॥६८७॥
			२	भुजा उलट धरि विंचरी, ललाट कुंतल लटा। पदर सारुनी दूर कामिनी, दावित मोहक छटा॥ बांधित अंबाडा बोटें ती नाचवीत सुंदर । नजर बांधते कचबंधासह, गुंतविते अंतर॥६८७॥
६८९	**निळें उन्ह**	:	१	सुंदर शामल देह, करि पीतांबर परिधान। उन्ह पसरले भासते निलाचलावर छान॥६८९॥
			२	शामलदेहीं पीतपट, झळक दिसे उसळून। निलाचलावर भासते, निळे कोवळे ऊन्ह॥६८९॥
६९३	**ओलें सौंदर्य**	:		सरिता ताटिं ती एकटी, सालिलीं उतरे धीट। तरि दृष्टी चलबिचल ती, दूर निरखिते नीट॥ चिर भिजले, कुच सावरी, पदर भुजांतरी चिंब। मुरकत ये संकोचिता, तरलित जलिं प्रतिबिंब॥६९३॥
६९५	**सुवर्ण चंपक**	:		गौरांगी ती सुंदरा, रसरसली अळुमाळ। दिसे न कंठी घातली सुवर्ण चंपक माळ॥ चंपक तनु कांतीत, तो मिसळे रंग झळाळ। केवल कोमेजतां कळे निर्माल्याची माळ॥६९५॥
६९६	**गौरवगर्व**	:		पूजा गौरव हो तुझा गोवर्धन गिरिराज। नको हुरळुं रे पर्वता, लेउनि गोमय साज॥

अनुक्रमणिका

'केलें रक्षण मी कसें होता वर्षाघात।'
उचलाया तुज लागला जनार्दनाचा हात॥
केवळ चारा चरावया, योग्य तुझी ही काय।
तुडवितील दुसऱ्या क्षणीं, तुला पशूंचे पाय॥६९६॥

६९८ **लावण्याची लूट** : उचलि चिबुक ती उंचवी तळवे, तोडित फूल॥
उडुनि दिसे कुचकोर ती, कांति गौर भुजमूल।
सरे पदर, मंदोदरी त्रिवली, मन बेछूट।
झेलित अंगी लाट ती लावण्याची लूट॥६९८॥

७०० **सलील स्नान** : नारि किनारी पाहते, शंकित, हो आनंद।
कळेल, साऱ्या गोकुळा- येईल गोपीवृंद।
नसता कांहीं जीवनीं, करिशिल रे बदनाम।
'जा निघुनी आतां तरी, नको छळूं रे शाम॥७००॥

७०४ **कृष्णाभिसार** : काळे काळे गगनीं बघ हे भरून आले ढग।
चल बाई (लगबगा) पाहती वाट तुझी जिवलग॥
पुरे गडे श्रृंगार भोवतीं अंधाराचे जग।
चंद्रकळा नेसलीस तरि ही बिजली करि झगमग॥७०४॥

७०६ **बेसर मोती** : नथीतला मोती खरा, धन्य जरि न कुलवंत।
अधरसुधारसमाधुरी चाखित दे न उसंत॥७०६॥

७०८ **गावगौर** : गावगौर ती गोरटी मांसल, तनु सुख माज।
हसतां गालीं खळी खुले, सोनाबिंदिचा साज॥७०८॥

७०९ **विपरीत रीत** : कुलमर्यादा तोंवरी, जोवरि दिसे न लाल।
पाहतांच परि एकदां मन होई चवचाल॥७०९॥

(शतक सातवे पूर्ण)

*　　　*

अनुक्रमणिका

“रसलीना”

माय बोलिचा बोल हा अमृतास दे साद
अशी मराठी मोहिनी रसमय हा पडसाद
वीणारव बागीश्वरी छेडित मंजु निनाद
बिहारिचा वागविलास हा शारदीय आल्हाद
रचिता रसना रंगते शब्दांकित हा छंद
भावविभावन लोभवी करिते मानस धुंद
ललित रम्य कविता कृती प्रणयी सुखसंवाद
रूचेल रूचिरा हा तुला रसिका रसानुवाद
सत्सईचे दोहरे तीक्ष्ण विलक्षण तीर
दिसती इवले सानसे घाव करिति गंभीर
सानुभूत सूखजीवनीं व्हायातें रसलीन
‘रसलीने’चे रंग हे इंद्रधनूच नवीन

--राजा बढे

अनुक्रमणिका